धाव व सर्व शक्ति काहीतरी बनण्यासाठीच खर्च होत असते. आज घर बनवावयाचे आहे. उद्या महाल तर परवा संपत्तीचे साम्राज्य. यांत किती किती स्पर्धा आहे हे रात्रंदिवस आम्ही पाहतो. दुसऱ्यापेक्षा माझ्याकडे जास्त असणे म्हणजे मी धनी. जणू अशा प्रकारे धनी होण्यातच जीवनाचे गंतव्य स्थान आहे. टॉलस्टॉय सारख्याच्या कथेप्रमाणे अशा बनण्यात एक प्रकारे दमछाक होते. पळापळीत हृदयाचे ठोके वाढतात. यातच हार्टअॅटॅक येऊन माणूस असंतोषानेच मरण पावतो. ही स्पर्धा साधारण पुरुषांत अथवा स्त्रीयांत होते असे नाही, तर मठाधीशांत व आचार्य म्हणवल्या जाणाऱ्या विद्वान पंडितात पण होते. यांतच एक दुसऱ्यावर निंदा, शिव्याशापाची लाखोली वाहिली जाते. शेवटी दांभिक माणूस शिल्लक राहतो. म्हणून साधू व संत ओळखणे अतिशय कठीण आहे. जगाच्या स्त्रोताच्या विरुद्ध दिशेने हा प्रतिस्त्रोत आहे. हे गूढ रहस्य यात गोवले गेले आहे. जीवनाचे अंतिम लक्ष शान्ति आहे. सर्वांना शान्ति हवी आहे. परंतु काही केल्या शान्ति मिळत नाही. गोस्वामी तुलसीदासजी पण उल्लेख करतात - स्वान्तसुखासाठी श्रीरघुनाथ गाथा रचली गेली. स्वान्तसुख म्हणजेच आत्मशान्ति. पुढे मानस पूर्ण लिहून झाल्यावर म्हणतात, "पायो परम बिश्राम." श्रीराम समान प्रभू नाही. त्यांच्या कीर्ती गायनाने हा परम विश्राम मिळाला. काम-क्रोध-लोभ-मोह-मत्सर, इर्शा, स्पर्धा या उठणाऱ्या वावटळीत श्रीराम प्रभूंचे दर्शन शक्य नाही व परम विश्रामही शक्य नाही.

"कुछ बनना नही" याचा दुसरा भाव असा आहे. जग जसे वाहात आहे त्या अनुस्त्रोताने आम्हीसुद्धा वाहात गेलो तर "मी व माझ" ही विचारधारा मजबूत होते. माझे घर, माझे संबंधी, माझे नातेवाईक, मी हे केले व मी ते केले. माझ्यामुळे हे सर्व झाले. या देहात्मबुद्धीच्या गाठी इतक्या पक्क्या होतात की, नंतर त्या काही केल्या सुटत नाही. तुलसीदासांची मायेची अत्यंत सोपी परिभाषा "मी आणि माझं म्हणजे माया" या मायेच्या पाशात जीव आपल्यामुळेच आपण स्वतः कसा बांधला जातो हे स्पष्ट होते. देह हासुद्धा आपला नसतो पण देहाबद्दल किती आसक्ती? या देहाला जपण्यासाठी, वाचवण्यासाठी किती प्रयत्न? परंतु जी वस्तू आपली नाही ती आपल्याकडे कशी राहणार? हे कटू सत्य आहे. हे सर्व कळत असूनसुद्धा बुद्धी वळत नाही. "कुछ बनना नही" या अर्थाने एक महावाक्योपदेश आहे. हा उपदेश स्पष्ट झाला तर, "सत हरि भजन, जगत सब सपना" याची स्पष्ट अनुभूती येते. हेच प्रतिस्त्रोत आहे. जग ज्या दिशेने वाहात आहे त्याच्या विरुद्ध दिशेने वाहणे परम अकिंचन बाबा गंगादास हेच या महावाक्याच्या माध्यमातून सांगत आहेत.

यावरून सहज स्पष्ट होईल की, बाबा गंगादासांचा काय आध्यात्मिक अधिकार होता. स्वामी प्रज्ञानानन्द सरस्वती म्हणजे एका अर्थाने बाबा गंगादासाचे मानसपुत्र. एका पुत्राला घडविण्यासाठी काय करावे लागत नाही. परंतु अशाच कीर्तीवंत पुत्रामुळे पित्याची (गुरुंची) कीर्ती दशदिशेत होते.

बाबा चिंचणी (तारापूर) हून गेले ते प्रवास करीत हिमालयात गंगेला मिळणाऱ्या अलकनंदा नदीच्या तीरावर, बद्रीनारायणाच्या वाटेवर, किंचित दूर झोपडी बांधून राहिले. सन १९४९ च्या डिसेंबरमध्ये हिमालयातील अलकनंदा तीरावर, या महात्म्याने श्रीरामधाम गमन केले.

या कराल कली काळात, अशा परम विरागी, ज्ञानी, परमभक्त शरणागतवत्सल, अन्तर्बाह्य त्यागी, महापुरुषाचे दर्शनसुद्धा दुर्लभ आहे. परंतु स्वामी प्रज्ञानानन्दजी लिहितात - श्रीरघुनाथ कृपेने ६/७ वर्षे बाबांच्या सत्संगाचा लाभ मिळाला. ते पुढे म्हणतात, "भेटती संत विशुद्ध तयासी। रामकृपें अवलोकति ज्यासी ॥" "बिण हरिकृपे भेट नहि संता। सत्संगति करि संसृति अंता ॥" हे शरीर जीवंत असता, त्याचे चर्म काढून, त्या चर्माचे जोडे करून बाबांच्या चरणांत घातले तरीसुद्धा बाबांच्या उपकारांच्या ऋणातून अल्पांशानेही मुक्त होता येणार नाही. "महत्संगो दुर्लभोऽ मोघश्च" (ना.भ.सू) अशा दुर्लभ हरिभक्तांचा व त्यांना वश होणाऱ्या भगवंताचा महिमा कोणीही वर्णन करू शकणार नाही.

यस्याशीर्वादघनो मानसगूढार्थवृष्टिनां हृदयं ।
सततं प्लावयतीदं गंगादासं नमामि भक्त्यातम् ॥

॥ जय जय बाबा गंगादास ॥
॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

श्री. श्रीराम सी. गिल्डा
४, श्रीगणेश, अनंतराज सोसायटी, जलाराम मंदिराजवळ,
डोंबिवली पूर्व, जि. ठाणे ४२१२०१.

स्वामींची आरती

आरती सद्गुरुनाथांची
स्वामी प्रज्ञानानंदांची ॥धृ.॥
देह धर्माचरणी लाविला
कधी ना खंड मध्ये पडला
आशीष 'बाबां'नी दिधला
रामप्रभु प्रसन्न बहु जाहले ।
जीवनी कृतार्थ त्वां केलें ॥१॥
मानसीं क्रीडा बहु करुनी,
बुद्धिच्या नौकेवर बसुनी
गुरुंना वंदन ते करुनी,
सुखकल्लोळ हृदिं उठले ।
मस्तक गुरुचरणीं ठेविले ॥२॥
मस्तकीं तव हस्त ठेविले
पूर्ण निःसंदेह तुम्हां केले,
गुरुंनी गूज निरोपियले,
आता भ्रांती नसे कांही ।
कृतार्थ झाला याची देही ॥३॥

रचित - शरयू दाते - रामदासी,
सोलापूर

स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींचे संन्यास गुरु प. पू. वासुदेवानंद सरस्वतींचे चरित्र

(ब्रह्म) ज्ञानचिंतामणी

डॉ. कमल वैद्य

प.पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींच्या अंतरंग शिष्या. पती निधनानंतर मॅट्रिकपासून एम.ए., पीएच.डी. पर्यंत शिक्षण [illegible] पूर्ण. 'एकनाथी भागवतातील [illegible]' [illegible] लेखन, [illegible]' पारितोषिक प्राप्त. [illegible] [illegible] [illegible] केला आहे. 'स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती व गोस्वामी तुलसीदास' ही चरित्रात्मक पुस्तके प्रकाशित. [illegible] निवृत्त [illegible] श्रीरामचरितमानसद्वारे आपले जीवन-पुष्प सद्गुरुंना समर्पित करीत आहेत. स्वामींच्या सर्व शिष्य परिवारास त्या प्रतिस्वामी असून त्या [illegible] 'पू. कमाताई' आहेत.

''यत्पाद - पंकज - पराग - पवित्र
मौलिर्भूयो न पश्यति नरो जठरं जनन्याः ।
तं वासुदेवमजमीशमनन्तबोधं श्रीमद्गुरुं
शरणदं प्रणतोऽस्मि नित्यम् ॥''

असा आत्यंतिक नम्रभाव प्रज्ञानानंद ज्यांचे विषयी नमूद करतात ते किती पारमार्थिक महान अधिकारी होते ते आपण त्यांच्या चरित्राचा मागोवा घेऊन त्याद्वारेच पाहू.

प. पू. वासुदेवानंद सरस्वतींचे पूर्वाश्रमीचे नाव त्रिविक्रम विष्णू पोटे 'भागीरथी' मातेच्या पोटी श्री क्षेत्र परशुराम ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथे यांचा जन्म श्रावण शुक्ल अष्टमी शके १८०६ मध्ये झाला. त्यांना तीन भाऊ व तीन बहिणी होत्या. वयाच्या चौथ्या वर्षीच माता-पिता निवर्तल्याने ते अनाथ बनले व मोठी बहीण सौ. गंगा हिच्याकडे रहावयास गेले. तेथे सुमारे ८ वे वर्षापर्यंत होते. नंतर 'रामदासी' बनलेले वडीलबंधू समवेत वाईस रहावयास गेले. तेथे श्रींचे उपनयन आठवे वर्षी झाले. परंतु त्यापूर्वी त्रिविक्रमास रुपावली, समासचक्र व अमरकोष मुखोद्गत झालेले होते.

मौजी बंधनानंतर श्री संध्या, पूजा, रुद्र,पंचसूक्त पवमान इ. शिकले. अन् वाईमध्ये दररोज श्रीगणपती व मारुतीची नित्यनेमे देवळात जाऊन यथाविधी पूजा करीत. सर्व मुलांमध्ये मिसळण्याऐवजी एकटेच हिंडत व झाडावर चढून चिंचा, आवळे, बोरे, कैऱ्या, कवठे इ. खाणेचा छंद होता.

श्रींची कुशाग्र बुद्धी व असामान्य धारणाशक्ती पाहून श्रींचे वडील बंधू कृष्णा उर्फ तात्या यांनी त्या काळी श्रींजवळ रु. ६०/- देऊन त्यांना एकट्यास काशीस अध्ययनासाठी पाठवले अन् ते गेलेही. यावरूनच श्रींची निर्भयवृत्ती, आत्मविश्वास, अध्ययनाबाबत वाटणारी तीव्र ओढ इ. दिसून येते.

काशीस वेदमूर्ती भिकंभट पटवर्धन यांचेकडे श्रींचे वेद, वेदांगे, कौमुदी व वार्तिके यांचे अध्ययन केवळ तीन वर्षात पूर्ण झाले. श्रीमद् भागवताचे यथार्थ ज्ञान श्रींना श्री. मौनी स्वामी व सोहोनी शास्त्रींकडून मिळाले. या साऱ्या ज्ञानसमृद्धीचे आधारे श्रींनी अभंगाची गाथा इत्यादी बरेच ग्रंथलेखन केले. परंतु संग्रहवृत्ती पूर्ण त्यागल्यामुळे जिथे ग्रंथ लिहून ठेवला तेथेच तो राही. याप्रमाणे ४/५ वर्षात सर्व विद्या ग्रहण केल्या. अन् एके दिवशी परमहंस परिव्राजकाचार्य त्रिविक्रमानंद सरस्वती, दुधाहारी मठ, भोसले घाट, काशी यांचेकडून विधीपूर्वक दंडग्रहण करून संन्यासाश्रम स्वीकारला. सद्गुरुंनी श्रींचे 'वासुदेवानंद सरस्वती' असे नामाभिधान केले.

संन्यास घेतल्या वर्षीच श्री प. पू. वासुदेवानंद सरस्वती, स्वामी = प्रज्ञानानंद सरस्वती हे गृहीत धरावे.) सातव्या एडवर्डच्या राज्यारोहण प्रसंगी इ. स. १९०१ साली दिल्लीत खास भरलेल्या दरबारात हजर होते.

श्रींचे वडील बंधू तात्या (कृष्णा) रामदासी चास किंवा चासकमान ता. खेड, जि. पुणे येथे रहात असता एके दिवशी अगदी अनपेक्षितपणे श्री वडीलबंधूंसमोर येऊन उभे ठाकले - गोंडस गुटगुटीत शरीरबांध्याचा, कोमल, सशक्त व निरोगी, पिवळसर गौरवर्णाचा विद्येच्या तेजाने तळपणारा संन्यासी काषायवस्त्रातील बालब्रह्मचारी जणू साक्षात दत्तात्रेयच ! ओळख पटल्यावर उभयतांना जो आनंद झाला असेल तो कोणत्या वाणीने, कोण व कसा वर्णू शकेल ! आपल्या धाकट्या भावाची ती वैराग्य संपन्न, ब्रह्मतेजाने तळपणारी मूर्ती पाहून तात्यांना नक्कीच 'कुलं पवित्रं, जननी कृतार्था, वसुन्धरा पुण्यवती च येन' असे वाटले तर त्यात नवल ते कसले?

काही दिवस श्री. तात्यांजवळ राहिले व त्यानंतर श्रींनी चारी धाम यात्रा केल्या. कोणी पैसे दिले तर घेत. काही वेळा मागतही. फक्त घोडा व बैल सोडून कोणत्याही वाहनात बसत. मात्र कुणाच्याही घरी न उतरता मारुती वा अन्य कोणत्याही देवळात मुक्काम करीत. कोणी ब्राह्मणाने जेवायला बोलावले तर जात अन्यथा उपाशी रहात. पण माधुकरी मागणे व पैशाने काहीही खरेदी करून खाणे नव्हते.

संन्यासानंतरही जशी वृत्ती उठेल त्यानुसार कोणाकडूनही पैसे मागून रुद्र वा पवमानाभिषेक करीत असत. प्रवासात चिल्लर नाण्यांचे ओझे बाळगीत पण एकही नोट त्यात नसे असा विचित्रपणा असे. भीमानदीच्या वाळवंटात भर उन्हात केवळ कौपीन नेसून अनवाणी पायाने डोक्यावर ओल्या छाट्या ठेऊन २-३ तास तटस्थ उभे रहात किंवा गारगोट्या वेचीत असत. त्यामुळे लोक त्यांना वेडे किंवा गारगोटेस्वामी म्हणत.

काही वर्षे कोल्हापूर, काही वर्षे खेड येथे व्यतीत करून शेवटची १३/१४ वर्षे मु. आळे, ता. जुन्नर, जि. पुणे येथे कुलकर्णी यांचे माडीवरच गेली.

१९४० ते ४३ पर्यंत प्रज्ञानानंद स्वामींना यांचे विषयी सोने-चांदी-पैसे मागतात, संग्रह करतात इ. माहिती कळल्याने श्रीं विषयी मनातून आदर वाटत नसे. परंतु अंतर्मन (Inner voice) मात्र 'हेच श्रोत्रिय ब्रह्मविद् वरिष्ठ आहेत. यांचे चरणांवर शिष्यभावाने डोके ठेवण्यातच खरे समाधान आहे' इ. वृत्त निश्चयपूर्वक ग्वाही देऊ लागले अन् झाले... ! तो पवित्रतम सुवर्णदिन उजाडला...

१८।१।१९४३ रोजी दुपारी शिष्याने सद्गुरुंचे प्रथम दर्शन घेतले. श्रींचे प्रसन्न मुख व ब्रह्म तेजाने तळपणारे असे समाधान करणारे दर्शन घडले. श्रींचे भोजन सुरू असलेने वंदन न करताच स्वामी स्वस्थ उभे राहिले तो श्रींनी स्वामींचा पूर्वाश्रमीच्या 'कर्वे' आडनावाने संबोधून संस्कृत मधून संभाषण सुरू केले. अन् विशेष म्हणजे प्रथम दर्शनदिनीच योगपट्टविधीपूर्वक दत्तात्रेय नारायण कर्वेचे 'प्रज्ञानानंद सरस्वती' असे चतुर्थाश्रम नाव यथासांग घडले. अन् संकल्पमात्रे शक्तिपाताने सद्गुरुने शिष्यास प्रज्ञानानंद नामाभिधान कसे संपूर्णतः सार्थ ठरले ते मानस अनुवाद गूढार्थचंद्रिका व इतरही बहुमोल ग्रंथसंपदेने सिद्धच केले.

१९४३ नंतर प्रज्ञानानंदांकरवी श्रींची आपल्याला खरी ओळख होते ती अशी – श्रींचा योगाभ्यास अत्यंत उच्च कोटीला पोहोचलेला होता ते त्यांच्या क्षुधा-तृषाजयावरून व व्याधींच्या या यातनांच्या सहन करण्यावरून सिद्ध होते. उन्हाळ्यातही १/२ घोटच पाणी पिणे, जिव्हाजय तर इतका की जेवणातील एकेक पदार्थ क्रमशः खाणे (उदा. प्रथम तूप नंतर भात, नंतर भाजी व आमटी नुसतीच - अशा प्रकारे) अर्धांग व मधुमेहामुळे डावे अंग पूर्ण निरुपयोगी व मांड्या वगैरे भागांवर जखमा - त्यांवर डांस-माशा बसूनही हूं नाही की चूं नाही. अर्धांगामुळे उठणे-बसणे अशक्य. त्यामुळे जागेवरच सर्व विधी होत पण अशा स्थितीतही सदैव प्रसन्न असत अन् वृत्ती अगदी बालकाप्रमाणे असे.

योग, छायापुरुषसिद्धी, वेद-वेदान्त इ. चा सूक्ष्म व तीक्ष्ण अभ्यास झालेला असूनही कधी तोंडाने त्याबद्दल उच्चारही नसे. अगदी अनवधानाने कधी कधी बोलताना त्या त्या ज्ञान शाखेचे खूणेने शब्द अल्प प्रमाणातच बाहेर पडत. तसा स्वामींसारखा जाणकारच जाणू जाणे ! त्याचबरोबर सत्य व प्रामाणिकतेशी मात्र इतकी पक्की खुणगांठ बांधलेली की, सगुण साक्षात्कार झाला आहे का असे विचारता 'नाही' असे स्पष्ट सांगणे झाले परंतु भ. गीतेतील 'नमो नमस्तेस्तु सहस्त्रकृत्व'सारखे श्लोक कानी पडताच स्फुंदून स्फुंदून रडू लागत इतके हृदय भक्ती प्रेमाने अति कोमल होऊन द्रवत असे. स्वामी श्रींना श्रीरामचरितमानस वाचून दाखवित असता अशी स्थिती वारंवार होत असे.

केवळ स्वामींशी अगदी मोकळेपणाने व सरळ बोलत. परंतु इतरांबरोबर बोलताना अगदी कमी वा गूढ शब्द वापरून बोलत असत. श्रींच्या संगतीत ज्यांनी २०/२५ वर्षे काढली, आजारीपणात अगदी नीच सेवाही केली त्यांना देखील श्रींनी आपल्या आडनावांखेरीज काहीही थांगपत्ता लागू दिला नाही.

शेवटची दहाबारा वर्षे एकाच ठिकाणी बसून वा झोपून असत म्हणून कधी एका शब्दानेही कुरकुर वा तक्रार नाहीच. उलट बसल्या जागीच लघुशंका वा शौचविधी झाले तरी त्याच अवस्थेत 'प्रसन्न मुद्रा - बालकवत्' रहात असत.

उशाला चंदनाची वा बेलाची खोडेच घेत. उशा ठेवल्यास फेकून देत. एकदा तर बराच वेळ एकाच स्थितीत हात राहिल्याने दंडाचे हाड कट्कन मोडले तरीही तोंडातून ब्र नाही - अशी असाधारण तितिक्षा (सहनशक्ती) आणि परमावधीची प्रशान्त वृत्ती कोठे पहावयास मिळेल?

श्रींचे हे देहकष्ट पाहून स्वामींनी ते घेण्याची तयारी दर्शविता श्री त्यांना म्हणाले, 'मी देऊ शकेन व तुम्ही घेऊ शकाल, हे अगदी खरे; पण ज्याने केले त्यानेच भोगणे योग्य. शिवाय प्राण ब्रह्मरंध्रात चढविताच कसले दुःख, कसले कष्ट व कोणत्या यातना?'

अर्धांगानंतर काही वेळा भावावेशात येऊन स्त्रीवेष करून अनेक स्त्रियांचे अलंकार घालून 'आता नंदीबैल चांगला दिसतो की नाही' असे विचारीत. त्यांच्या या भावाभिनिवेशाचे रहस्य कोणाला कधी कळलेच नाही.

विक्षिप्तपणे द्रव्य मागणे, पूर्वायुष्यासंबंधी विचारल्यास शिव्या देणे असे वागत असत. पण त्यांची सर्वज्ञता व पारमार्थिक अधिकार इ. स्वामींसारखेच जाणणार ! बाकी इतर लोकांना श्रींचा हा वेडेपणा व विक्षिप्तपणाच भासणार - हे निःसंशय !

अशा ह्या बाह्यात्कारी विक्षिप्तपणामुळे त्यांचा अधिकार जाणून स्वामींखेरीज कुणीही दुसरा जवळ न फिरकण्याने स्वामींचे गुरुबंधू वा भगिनी कोणीही नाहीत.

शेवटी प्रायोपवेशनाप्रमाणे जवळ जवळ केवळ पाणीच पीत, अन्न वर्ज्यच केले. त्यानंतर सुमारे १५ दिवसांनी पौष शुद्ध द्वितीयेस शके १८७० रोजी दु. ११-११।। चे दरम्यान श्रींचे चैतन्य अनंतात विलीन झाले.

आश्चर्य असे की केवळ १५ दिवस पाण्यावर राहूनही प्राणोत्क्रमणानंतर मुखावरील तेज, देहाचे गोंडसपण व गौरवर्ण यात सुमारे ९ तासानंतरही किंचित् ही कमीपणा जाणवला नाही.

बाह्यात्कारी जणू उकिरड्यावर लपलेला दिव्य ब्रह्मतेजयुक्त चिंतामणीच ! अशी विभूती होणे नाही !

विभूतत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती !

प्रज्ञाशिष्या रामदासी
ब्लॉक नं. ५, प्रोफेसर्स क्वार्टर्स, गव्हर्मेंट मेडिकल कॉलेज,
मिरज ४१६४१०.

ऋतंभरा प्रज्ञेचा आलोक

आचार्य किशोर व्यास

बी.ए. आचार्य पदवी तत्त्वज्ञान विद्यापीठ वाराणसी. १७ व्या वर्षी भागवतकथा पहिल्यांदा सांगितली. गेली २५ वर्षे श्रीमद् भागवत, वाल्मीकी रामायण, तुलसी रामायण, ज्ञानेश्वरी, दासबोध, योगवासिष्ठ यावर प्रवचने. कॅनडा, अमेरिका, नेपाळ प्रवचन दौरे. चैतन्य आश्रम वेदव्यास प्रतिष्ठान स्थापना फेब्रुवारी १९९०, [illegible] वेदपाठ शाळांना मार्गदर्शन. गीता परिवार तर्फे (संगमनेर) १६ वर्षे भारत व भारताबाहेर संस्कारवर्ग. १९-२० पुस्तके प्रकाशित. धर्मश्री अध्यात्मिक मासिक. श्रीकृष्ण सेवानिधी - वैद्यकीय उपचार, [illegible] शिबीर, संस्कृत प्रतिष्ठान - मासिक (अध्यात्मिक) [illegible]

परमेश्वरी कृपा असल्याशिवाय संतांची संगती लाभत नाही असे म्हणतात आणि हा निकष समोर ठेवला तर संतसाहित्य व संतसहवास या बाबत बालपणापासून ही परमेश्वरी कृपा मला सहजपणे प्राप्त होत गेली असे म्हणावे लागेल. लहानपणापासून घरातील धार्मिक वातावरण, भागवत आदि ग्रंथांचे श्रवण सहज घडत असल्यामुळे व त्याचप्रमाणे आध्यात्मिक पुस्तकांचे वाचनामुळे पारमार्थिक पिंड आपोआप विकसित होत गेला. पण तत्त्वज्ञान-विद्यापीठात पाश्चात्य दर्शनांचे वाचन करताना सनातन वैदिक धर्मशास्त्रातील नित्यकर्मावरील श्रद्धा डळमळीत होऊ लागली. वृत्ती आध्यात्मिक राहिली तरी, धर्मशास्त्राचे सूक्ष्म नियम अनावश्यक नव्हे तर अध्यात्मविसंगत वाटू लागले.

या गोंधळलेल्या मनःस्थितीत ज्या ग्रंथांनी मला मोलाचे मार्गदर्शन केले त्यात मानवतापूर्तीसाधन अर्थात संध्योपासना या पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतीमहाराज यांच्या ग्रंथाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. हे पुस्तक योग्य वेळी माझ्या हातात आले व ते मी पुन्हा कितीतरी वेळा वाचले. त्यामुळे संध्यावंदना आदि अनेक नित्यकर्मातील महत्त्वाच्या गोष्टींबद्दल निर्माण झालेली उपेक्षाबुद्धि पुन्हा दूर होण्यास फार मोठा हातभार लागला.

यानंतर पू. स्वामींच्या सर्व साहित्याकडे माझे लक्ष वेधले गेले पण त्यांचे फार त्रोटक साहित्य प्रकाशित होते. 'गीतेचा मराठी अनुवाद', 'वेदस्तुती', 'कीर्तनतरंगिणी', इ. छोट्या पुस्तकांतून त्यांच्या प्रज्ञेच्या प्रखरतेचा अनुभव येत असला तरी त्यांचा मुख्य ग्रंथ 'गूढार्थदीपिका' हा प्रकाशित नसल्यामुळे प्रज्ञेचा विलक्षण आवाका अनाकलनीयच होता. भगवत्कृपेने हळूहळू तोही ग्रंथ प्रकाशित होत गेला व आता ७५०० पृष्ठांचे हे अमूल्य भाष्य गीता प्रेस गोरखपूरने प्रकाशित करून महान कार्य तडीस नेले आहे. 'गूढार्थदीपिका' या ग्रंथामुळे पू. स्वामीजींचे नाव नव्हे तर अवघ्या महाराष्ट्राचे नाव देशाच्या साहित्यिक व सांस्कृतिक इतिहासात उजळले आहे. हिंदी भाषीय नसूनही पू. स्वामीजींचे नाव रामचरितमानसाच्या भाष्यकारांमध्ये अग्रगण्य राहील. रामायणाच्या प्रत्येक अभ्यासकाला त्यांच्या विचारांची दखल घ्यावीच लागेल व त्यांच्या विलक्षण प्रज्ञेतून झालेली रामकथाविषयक समस्यांची उकल शिरोधार्य मानावी लागेल.

पू. स्वामीजींनी केवळ रामायणावर भाष्य लिहिले नाही तर रामायणप्रणीत संपूर्ण धर्मविचार आपल्या जीवनात पूर्णांशाने उतरविला. उत्कट गुरुभक्ती, अदम्य शास्त्रनिष्ठा, विद्वन्मान्य साहित्यलेखन, पवित्र शास्त्रोक्त आचरण, कमालीचा अपरिग्रह आणि प्रायोपवेशनाने देहत्याग या त्यांच्या जीवनातील सर्व गोष्टी प्राचीन भारतीय वैदिक ऋषिसंस्कृती अजुनही अखंडपणे या देशात नांदते आहे याची निःसंदिग्ध प्रचीती देतात. त्यांच्या पवित्र स्मृतीस सादर प्रणाम !

आचार्य किशोर व्यास

'धर्मश्री', मानसर अपार्टमेंटस्, पुणे विद्यापीठ मार्ग, पुणे ४११०१६.

प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींनी आपल्या सद्गुरुंची केलेली आरती (प. पू. वासुदेवानंद सरस्वती थोरले स्वामींची)

जय जय परात्परा बोधमया स्वामी सद्गुरु सदया ।
भावें तुजवरूनी ओवाळूं कारण आणी कार्या ॥ ध्रु. ॥

माया मोह नदी घोर अती जीव पडे आवर्ती ।
काम क्रोध रिपु थोर किती जळचर दुर्धर खाती ॥१॥

जप-तप योगादि विधिकर्मे साधन विविधा नेमें ।
करितां सुटती नां, 'जों प्रेमें सेविती ना पदपद्में ॥२॥

नामाच्या नौकें बसवीशी ज्ञान वल्हें करिं देसी ।
सद्गुरु नाविक तूं जैं हो सी परतीरातें नेसी ॥३॥

नाना पंथ जगीं विनादिती जीवातें भ्रमविती ।
बोधुनि सार तया तूं अंति वारिशी भव-दव खंती ॥४॥

चरणामृत-वारि अघरारी वचन-रवी तम वारी ।
करिसी कृपा जरी, मुक्ती तरी पायी लोळिती चारी ॥५॥

'विविधा मति वृत्ती या वाती श्रद्धा घृत शुभ वरती ।
प्रेमें पेटविलीं त्वां हाती विमल ज्ञान ज्योति ॥६॥

स्थिरचर या लहरी तुजवरतीं विभो विहारां करती ।
होतां कृपा तुझी, शुद्धमती ज्ञानें पावती शान्ती ॥७॥

प्रज्ञानां भक्ती तव चरणी, दे भव-सरिता तरणी ।
तव गुण गण गानीं, मन वाणी चित्तही विरमो ध्यानीं ॥८॥

प. पू. प्रज्ञानानंद सरस्वतींचा श्रीरामचरितमानस गूढार्थ-चंद्रिका

प्रस्तावना खंड

सौ. रेखा नीळकंठ पटवर्धन

एम.ए. (संस्कृत) प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींच्या [illegible] श्रीरामचरितमानसाचे [illegible] श्रीरामचरितमानसावर लेख. [illegible], प्रसार इ. [illegible] प्रसिद्ध. श्रीरामचरितमानसावर [illegible] प्रसिद्ध. श्रीरामचरितमानस [illegible]. श्री. नी. व. पटवर्धन यांच्या सहकार्याने गेली १-४ वर्षे श्रीरामचरितमानसावर प्रवचने - पुणे, सांगली, मिरज.

गूढार्थ चंद्रिका म्हणजे विश्वकोश किंवा बृहत् ज्ञानकोश तर प्रस्तावना खंड म्हणजे छोटेखानी ज्ञानकोश ! कारण ज्या प्रमाणात मूळ टीकेची व्याप्ती (६५००/७५०० पृष्ठे) त्या प्रमाणात त्याच्या प्रस्तावनेची व्याप्ती ७००-७१३ पाने.

प्रथमतः संन्यास वा दीक्षा गुरु वासुदेवानंद सरस्वती व त्यानंतर रामायण गुरु बाबा गंगादास व गोस्वामी तुलसीदास यांची सविस्तर चरित्रे देऊन प्रज्ञानानंदांनी प्रथमतः आपला विनय व कृतार्थतेतून आलेला कृतज्ञ भावच जणू नमूद केलेला दिसतो. त्यानंतर मानसातून दिसणारे तुलसीदासांचे चरित्र आणि त्यांचे ज्ञान व भाव उलगडून दाखविले आहेत. 'ढोल गवांर शूद्र पशुनारी । हें सब ताडनास अधिकारी' तुलसीदासांवर आरोप वा आक्षेप घेणाऱ्या चौपायीचा खास अंतर्भाव करून गोस्वामींचा नारीविषयक दृष्टिकोन किती उदात्त होता हे सिद्ध करून दाखविले आहे.

टीकेचे स्वरूप, त्याची व अनुवादाची तसेच अनुवादाच्या द्वितीय आवृत्तीची आवश्यकता, टीकेचे नाव, त्याचा विस्तार, टीकेचे आधार व मूळ प्रेरणा या सर्वांची प्रामाणिक चर्चा या प्रकरणात येते. नाट्यमहाकाव्य कसे आहे, कमल-कमलिनी संबंध, बोली भाषेतील शब्द इ. अनेक विषय मोकळेपणाने मांडले आहेत. त्यानंतर यातील चार वृत्ते-चौपाया, सोरठा, दोहा, छंद यांची काव्य साहित्याच्या अंगाने चर्चा करून पुढील प्रकरणात छंदांचे वैविध्य व त्यांची अर्थानुसार अनुवादात केलेली रचना यांचा उहापोह केला आहे. अलंकार इ. चे महत्त्व सांगून पुन्हा गूढार्थ चंद्रिकेचे वैशिष्ट्य अनेक अंगांचा विचार करून मांडले आहे. मानस पीयूषमध्ये नसलेले अध्यात्मपर वा योग-पर अर्थ कसे आहेत याचे नमुन्यासह दिग्दर्शन केले आहे.

या टीकेत शंकास्थाने नेमकी जाणून त्याचेही समाधान लेखकाने स्वतःच करून ठेवले आहे. उपदेशस्थानांचा नेमकेपणा स्पष्ट केला आहे. तसेच अनेक ठिकाणी आलेली 'काव्यविनोद' स्थळेही दाखवून दिली आहेत. इतकेच नव्हे तर मा. पीयूषासह आनंद व भावार्थ रामायणातील यादी मांडून दाखविली आहे. प्रबंधाचे वैचित्र्य स्पष्ट करून सांगितले आहे आणि कोष्टकवार पार्वतीचे २२ प्रश्न व त्यांची उत्तरे दिली आहेत. तुलसीदासांचे अद्भुत संकेत, ११ ओळीत शिवासंबंधीचे उल्लेख, ९ या महत्तम अंकाचे महत्त्व खास विशद केले आहे.

तर मानसामध्ये गंगा, रामचंद्र, रघुराया, विश्राम, मंदिर, मंगळ हे शब्द नेमके योजकतेने का, कुठे, कसे व किती वेळा वापरले आहेत ते अभ्यासपूर्ण संशोधक वृत्तीने दाखवून दिले आहे. त्याप्रमाणे श्रुती किंवा वेदांना शास्त्रांचे सिद्धांतांचेही कोठे, कसे उल्लेख आहेत हे निर्देशित केले आहे. २८ नक्षत्रांच्या २८ स्तुतींचे तर अनुक्रम, नांव-तारेसंख्या, आकार देवता व फलश्रुती या साऱ्यांसह कोष्टकाद्वारे उत्तम माहिती दिली आहे. तर मुळापेक्षाही अनुवाद कसा काही ठिकाणी सरस झाला आहे तेही दाखवले आहे. महाकाव्याची सर्व लक्षणे नमूद करून त्यात नाट्यमयतेची भर पडल्याने हे नाट्य महाकाव्य कसे आहे ते सोदाहरण स्पष्ट करून सांगितले आहे. उपमा, उत्प्रेक्षादि अलंकारांपेक्षाही तुलसीदास रूपक सम्राट कसे आहेत हे व्यवस्थितपणे पटवून दिले आहे.

तुलसीदासांची शब्दकला कशी अतुलनीय आहे हे पटवून कसे दिले आहे पहा - कमळ या एका शब्दासाठी पंकज, सरोज, नलिनी, सरोरुह, पद्म, अंबुज इ. अनेक वेगवेगळे शब्द वेगवेगळ्या स्थानी योजण्यातील समय-प्रसंगोचितता सिद्ध करून दाखविली आहे. असे अनेक शब्द आहेत. त्यांची प्रदीर्घ यादी अशीच सविस्तर सांगोपांग चर्चेद्वारे सिद्ध केली आहे. शब्दांतून त्वरा वा गती कशी ध्वनित होते ते पाहण्याजोगे आहे.

काही ठिकाणी येणारी फसवी पुनरुक्ति, यतिभंग, मात्रान्यूनता इ. ची यथार्थता पटवून दिली आहे.

तर 'श्रीराम' हा क्षत्रिय वंशातील धीरोदात्त नायक मूळचा निर्गुण निराकार परब्रह्म असून तो प्रसंगोपात्त सगुण साकार कसा होतो ते ही उत्तम रीतीने दाखवून अवतारातील त्याचे मर्यादा-पुरुषोत्तमत्त्व एक संशोधक-अभ्यासू-शिक्षकी ढंगाने पटवून दिले आहे. जीव-जगत-ईश्वर या त्रिमितीचाही यथाशास्त्र उलगडा करून दाखवला आहे. ज्ञान, मोक्ष व वैकुंठ यांचे अनेक संदर्भानुसार यथार्थ स्पष्टीकरण केले आहे.

श्रीरामचरितमानसाचा मूळ हेतू राम-शिव अभेद व भक्ती (ज्ञानोत्तर भक्तीचे) श्रेष्ठत्व संपूर्ण मानसभर जागोजागी, ठायी ठायी अक्षरशः जीव ओतून गोस्वामींनी पटवून दिलेले आहे. अन् त्यासाठी नरदेहाचे दुर्लभत्व अगदी सुर-दुर्लभावही सुरेख पद्धतीने प्रतिपादन केले आहे.

भवतरणोपायाचे स्पष्ट निर्देश केले आहेत ते असे - सीता, संत, रामभक्त हनुमान भरतादींचा अनुनय केल्याशिवाय रामभक्ती नाही अन् प्रामुख्याने सद्गुरुकृपा व शिवकृपेखेरीज रामकृपा नाही. रामनाम, रामचरित्र, रामगुणगान श्रवण, रामेश्वर सेतू - अयोध्या-दर्शन हे काही ठळक हमखास उपाय सांगून त्याचे मानस-संदर्भ कांड-दोहा-चौपाई क्रमांकासह देण्याची लेखकाची खास पद्धत प्रस्तावना-खंडात व संपूर्ण गूढार्थ चंद्रिकेत सर्वत्र आढळते. सद्गुरु महिमा-कृपा, वंदन इ. चा तर जेथे म्हणून संधी मिळेल तेथे तेथे लेखकाने त्याचा आवर्जून विनयाने प्रेमादरपूर्वक उल्लेख सविस्तर

केलेला दिसतो. भवरोगहारक औषधी प्रकरणात लेखकाचा सद्गुरु, राम, रामनाम यांसह आयुर्वेदाचाही सूक्ष्म अभ्यास ध्यानी आल्याशिवाय रहात नाही. मंत्र व तंत्र यांचाही अभ्यास लपत नाही.

नारीधर्म षोडश संस्कार, कुलरीती परंपरारक्षण, पुत्र व शिष्य धर्म, भूप (राज) धर्म, सेवा-संन्यास-मित्र-वैद्य अशा अनेक धर्मांची म्हणजे त्यांच्या कर्तव्याची यथाशास्त्र चर्चा केली आहे.

तर वेद-इतिहास-पुराण कथा श्रवणाचे महत्त्व, मानसाचा प्रभाव, संतदर्शन व सत्संग महिमा यांचेही सर्वत्र वर्णन आढळते.

अनेक सिद्धांत कर्मविपाक, पूर्वजन्मसंस्कार, वर्णाश्रमधर्म पुण्यापुण्य, उत्तम वक्ता व श्रोता कसा असावा, नीती असे अनेकविध विषयांची मानसाशी उत्तम सांगड घालून चर्चिलेले आहेत.

निषेधासाठी - दु:संग, पापी, कपटी, असत्य, दंभ या गोष्टी आवर्जून टाळण्याचे कटाक्षाने सांगितले आहे. अशा दुर्वासनांचे खोलवर रुजलेल्या कुसंस्कारांमुळे प्रतापभानू, कैकयी, मंथरा, अरिमर्दन, दक्षकुमारी यांच्या उदाहरणाने त्याचे विपरीत व घोर परिणाम दाखवून दिले आहेत.

तसेच रामचरितमानसातील प्रत्येक पात्र कसे आदर्श आहे ते एकेका प्रकरणातून समजाऊन दिले आहे. उदा. सेवामूर्ती लक्ष्मण, श्रीसीता, कौसल्या, सुमित्रा, निषादराज, सुग्रीव, कुंभकर्ण, अंगद इ. आणि ते आपल्या या पात्र रचनेनुसार म्हणजे उदाहरणार्थ अनुक्रमे आदर्श बंधू-सेवक, पत्नी, माता, मित्र, सखा इ. कसे आहेत ते सोदाहरण ससंदर्भ स्पष्ट करून दृष्टोत्पत्तीस आणून दिले आहे. रावणदेखील आदर्श वैरी कसा आहे ते जाणवून दिले आहे.

तर इंद्रादि देव, काक (कावळा), स्त्री, किरात (भिल्ल) कलि यांचे स्वभाव वर्णन केलेले आहेत. शिव-विप्र व गुरुद्रोह यांचे महाभयंकर परिणाम विस्तृत वर्णिले आहेत.

रामराज्य वर्णनातून आदर्श राज्याचे सुंदर शब्दचित्र उभे केले आहे. तसेच कलियुगाचे वर्णन वाचताना जणू आज सर्वत्र घडणारा अन्याय-अत्याचार-भ्रष्टाचार याचे स्पष्ट चित्र त्या वेळी तुलसीदासांच्या मनावर किती स्पष्टपणे उमटलेले होते हे पाहून त्यांच्या दूरदर्शीत्वापुढे वाचक, नतमस्तक होतो.

रामदास रामाहुनि मोठे हे हनुमान, भरत, अंगद, लक्ष्मण, वसिष्ठ, विश्वामित्र व रामदूत वानर यांचे उदाहरणांवरून सिद्ध करून दाखविले आहे.

'देव जोडे तरी करावा अधर्म' या प्रकरणात शंकराचा सतीत्याग (पत्नी-त्याग), विश्वामित्राने तपस्वी ब्राह्मण असून (रामांची) याचना करणे, लक्ष्मणाचा व भरताचा पत्नी माता-पिता-राज्य त्याग, मारीचाने नीच रावणास केलेली मदत, वालीचे पत्नीच्या उपदेशाकडे दुर्लक्ष, मंदोदरीचे पतीचा अपमान करणे, त्यास शिव्या देणे अशा अनेक उदाहरणांनी रामप्राप्तीसाठी अधर्म करूनही ह्या सर्व व्यक्ती 'विभूति' बनल्या हे दाखवले आहे.

त्याचप्रमाणे चतुर, भाग्यवंत, अभागी, धन्य कोण यांचे विवेचन एकेका प्रकरणातून सुंदरपणे कथन केले आहे.

श्रीराम व श्रीकृष्ण यांची तुलनात्मक सुरेख चर्चा वाचताना मन रंगून जाते.

तसेच अनेक व्यावहारिक गोष्टी तत्त्वज्ञान व शास्त्रसंमतही कशा त्याचेही सुरेख विवरण येते. शिष्टाचार कसे पाळावेत, वस्तू वा व्यक्तीचे महत्त्व कोणत्या चार गोष्टींवर अवलंबून असते. विचारल्याशिवाय सल्ले देऊ नयेत, लहानांची स्तुती मुखावर करू नये स्वागत-सन्मान कोणाचे कसे करावेत, सुहृद वा गुरुजनांचे उपदेश न मानल्याचे परिणाम, शुभाशुभ शकुन कोणते, त्या काळच्या अयोध्या-मिथिला वगैरेतील रीती रिवाज असे अनेक विषय सुंदर तऱ्हेने मांडणी केलेले आहेत आणि बऱ्याच प्रकरणांचे शेवटी 'वाचकांनी वा संशोधकांनी न्यून पूर्ण करावे वा अनेक प्रकारे भर घालावी' अशी पुष्टीही जोडली आहे.

सहा प्रकारची रघुवीरता, श्रीरामाचे हास्य व त्याचे परिणाम आणि रामांचे विश्वरूप दर्शन एकेका प्रकरणाद्वारे सविस्तर चर्चिले आहे. तसेच राम मारणाऱ्यासही तारतात हा सिद्धांत सांगून भक्तापराध्यास मात्र शासन करतात हे सुमारे १३-१५ उदाहरणांनी दाखवून दिले आहे. अन् शेवटी 'स्वामी रघुपती समान नाही', श्रीरामस्वभाव, श्रीरघुपतीला प्रिय कोण, अथ रामानुशासनम्, प्रिय रघुवीरा भक्तीच प्यारी, महती दासांसदा देतसां, श्रुति-सेतू पालक राम, रामांचे सद्गति देणे-भेटणे हृदयाशी धरणे, जवळ बसविणे, मस्तकी हस्त ठेवणे अशा अनेकविध प्रकारांनी रामांचा महिमा-प्रभाव-यश हे अत्युत्तम, सर्वोत्कृष्ट कसे आहे हे वाचकांच्या मनावर पूर्णपणे बिंबविण्यात सिद्धहस्त लेखक पूर्णांशाने यशस्वी झाला आहे, यात तिळमात्र शंका नाही.

खरोखरच भगवंत प्रसन्न होऊन भक्ताच्या साक्षात समोर ठाकला अन् त्यानेच सांगितले की 'वत्सा, तुला काय हवे ते माग' तर मागावे कसे, काय याचा उत्तम वस्तुपाठ मनु-शतरुपाख्यानात मिळतो. असे सांगून प्रत्येक कांडातील उदाहरणांनी भक्तांची, त्यांच्या मागण्यांची व भगवंतांच्या वरदानांची वैविध्यता लक्षणीय-मननीय आणि अनुकरणीय अशीच आहे.

जर भक्त अत्यंत प्रामाणिक, पारदर्शी व अनन्य असेल तर त्याच्या अडचणींत भगवंत कसे धावून येतात हेही साती कांडातील उदाहरणांनी स्पष्ट निर्दिष्ट केले आहे. अन् त्यायोगे चतुर भक्त कोण, भक्तीत चतुरता कोणत्या प्रकारची असते तेही सुंदर तऱ्हेने समजावले आहे. अशा परम बहुभागी भाग्यवंतांमध्ये सर्वश्रेष्ठ व सर्वप्रथम श्रेणीचे अनुमान का व कसे हे वाचकांनी सूक्ष्म तऱ्हेने अभ्यासावे.

मग कलियुगात सामान्य मानवाने भक्ती कशी करावी, किती प्रकाराने करावी हे वारंवार प्रतिपादले आहे. रामनाम-रामकथा-रामगुणगानदान अन् शेवटी हे सारे अंगिकारले असता कलिचे दोष अशा साधकाप्रत जात नाहीत असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

अशा भक्तीची लक्षणे नवविधा, चतुर्दशविध, त्रिविध व चतुर्विध असे भक्तीचे अनेक प्रकार सांगितले आहेत. ते जिज्ञासू साधकाने वा भक्ताने मानसाद्वारे शोधून त्यांचा अंगिकार करावा, हेच तुलसीदासांचे प्रमुख ध्येय होय.

म्हणून तर त्यांनी मानसभर भक्तीची प्रधानता ठायी ठायी वर्णिली आहे. ज्याला जो मार्ग आवडेल तो त्याने स्वीकारावा. शबरीप्रमाणे प्रभूची डोळ्यात प्राण आणून आजन्म वाट पहावी, जटायू प्रमाणे होता होईल तितकी काया रामकार्यात झिजवावी, कुणी सुतीक्ष्णाप्रमाणे ध्यानमग्न व्हावे तर काकभुशुंडीप्रमाणे दिनचर्या आखून जप, मानसपूजा, रामकथा यात सारे जीवन कृतार्थ करावे.

हनुमंताप्रमाणे अनन्य सर्वसमर्पण बुद्धीने शेवटी आत्मनिवेदनात नित्य रत व्हावे अशी अनेकविध पैलूंनी तुलसीदासांनी भक्ती मानसात उदाहरणे

पुरेपूर भरून ठेवली आहेत, ज्याला जशी जमेल तशी त्याने उचलावी.

प्रस्तावना खंडाचा समारोप करताना प्रज्ञानानंद स्वामींनी बिभीषणाची लंका कुठे होती, चित्रकूट-पंचवटी-अगस्ती आश्रम, दक्षिण सागर प्रवास यांची रामायणकालीन स्थळे व अंतर इ. दृष्टिकोनातून सध्याच्या भारतातील भौगोलिक प्रदेशांशी उत्तम सांगड घालून दाखविली आहे.

अन् परिशिष्ठ प्रकरणात मानस पीयूष व मानसमणि, मानसमणितील लेखसुचि, श्रीरामवनवास-तिथीपत्रक, पुराण संदर्भ कथा सूची व गूढार्थचंद्रिकेतील तुलना सूची देऊन कांड परिशिष्ट सूचीने समाप्ती केली आहे.

गूढार्थ-चंद्रिकेची संदर्भ-ग्रंथ सूची पाहता लेखकाचा आवाका ध्यानी येऊन वाचकाचे डोळे आश्चर्याने विस्फारलेलेच राहतात. अशा ह्या छोटेखानी ज्ञानकोशास इतक्या संक्षिप्तपणाने बद्ध करण्यात काही त्रुटी राहिल्या तर क्षमाशील वाचक नक्कीच उदारपणे क्षमा करतील.

श्रीसीतारामचंद्रार्पणस्तु । श्रीगुरोःशरणम् ।

सौ. रेखा नीळकंठ पटवर्धन
अक्षय रेस्टॉरंट समोर, स्टेशन रोड, मिरज ४१६४१०

रामभक्त माता पिता वंश बंधू हरिदास ।
गुरुभक्ती ही सत्संगति तिथे घाल जन्मास ।।

रामचरितमानस किष्किंधाकाण्ड

प्राचार्य क. श्री. काळे

एम.ए.एम्.एड्. शारीरिक शिक्षण पदविका, फर्स्टएड्, रेडक्रॉस, स्काउटिंग, फर्स्ट एड्, ट्रॅफिक व सिव्हिल सेफ्टी, अल्पबचत वगैरे क्षेत्रातील प्रमाणपत्रे. सांगली शिक्षणसंस्था आजीव दीर्घकाळ प्रशासन, महाविद्यालय प्राध्यापक, प्राचार्य, विद्यापीठ समित्यांचा सदस्य इ. सदस्य या नात्याने संस्था कार्यवाह एन.सी.सी. ऑफिसर, मा. शा. मुख्याध्यापक, डिस्ट्रि. स्काउट कमिशनर पदावरून ४० वर्षे सेवा. सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रात काम. 'सुजन-वाणी' हे एकच पुस्तक प्रकाशित. विपुल स्फुटलेखन, दैनिके व मासिके यांमधून लेखन अनेक वर्षांपासून प्रकाशित

भारतीय मनाला आदर्शाचे अपार आकर्षण आणि पूर्णतेची अनावर ओढ अनादिकालापासून वाटत आलेली आहे आणि रामायणात श्रीरामाच्या उत्तुंग आदर्श जीवनाचे चित्रण आहे; म्हणून भारतीय जीवनात रामायणाला अनन्य साधारण, महत्त्वपूर्ण स्थान आहे. 'रामनाम' मय व भवतारक असल्याची श्रद्धा, भारतीय जनमानसात कायमची रुजलेली व दृढावलेली आहे. जनसामान्यात अभिवादन 'राम राम' या शब्दांनी केले जाते. उत्तरेत अन्त्ययात्रा 'राम नाम सत् है' या घोषात निघते. यासारख्या गोष्टी वरील श्रद्धेच्या द्योतक आहेत. 'रामचंद्र दशरथ सूर्यवंशी' नावाची कोणी व्यक्ति इतिहासात होऊन गेली असो वा नसो, समाजमनातील 'राम' ही कोणी व्यक्ती नसून, जीवनातील उत्तम व उत्तुंग आदर्शाचे प्रतीक आहे, तत्त्व आहे. 'रामोपासना' व रामचरित्राचे (कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील) गायन, भारताच्या, विविध भागांत आदिवासीसह सर्व जाती जमातीत, युगानुयुगे चालत आले आहे. 'रामनाम' जीवनाधार, जीवनोद्धारक व आराध्य दैवत मानणारी आणि होऊन राहिलेली 'वाल्मिकी'पासून म. गांधींपर्यंत अनेक लहान-मोठी माणसे भारतात होऊन गेली आहेत. भव्य सुंदर राम मंदिरे बांधली गेली आहेत. आजही बांधली जात आहेत, पुढेही बांधली जाणार आहेत. भारताखेरीज अन्य काही देशांतही राममंदिरे बांधली गेली आहेत व जात आहेत. रामनाम माहात्म्य मानले गेले आहे, जात आहे. 'रामोपासना' चालत आहे. 'वाल्मिकी रामायण', एकनाथ महाराजांचे 'भावार्थ रामायण' तुलसीदास महाराजांचे 'रामचरितमानस' ते अलीकडचे 'गदिमां'चे छोटेखानी 'गीतरामायण' पर्यंत अनेक रामचरित्रे, भारताच्या विविध भागांत, विविध भाषांत व विविध स्वरूपात लिहिली गेलेली उपलब्ध आहेत. त्या सर्वांमध्ये 'वाल्मिकी रामायण' आणि 'रामचरित मानस' यांचे स्थान आगळे-वेगळे व अग्रगण्य राहिले आहे.

तुलसी रामायण

तलशीदासांचे 'रामचरित मानस' हा भक्तिमार्गावरील सर्वोत्तम ग्रंथ मानला जातो. महाराष्ट्रात हा ग्रंथ फारसा ज्ञात नाही. कारण त्याचा प्रसार म्हणावा तसा झालेला नाही. उत्तरेत त्याचे माहात्म्य व लोकप्रियता फार मोठी व मोठ्या प्रमाणावर आहे. महाराष्ट्रातही परमपूज्य स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती हे या ग्रंथाचे अंतरंग प्रेमी व अत्यंत अधिकार संपन्न प्रवक्ते व भाष्यकार अलीकडेच होऊन गेले. 'गूढार्थ चंद्रिका' ही त्यांची 'रामचरितमानसा'वरील मराठी टीका (बालकांड ६ भाग, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड इ.) आणि 'रामचरितमानस' - संपूर्ण समवृत्त मराठी अनुवाद, ही पुस्तके या संदर्भात विशेष महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय आहेत. स्वामीजींच्या विषयी, त्यांच्या महान कार्याविषयी आणि प्रचंड ग्रंथसंभाराविषयी निस्सीम आदर, उदंड प्रेम व आंतरिक आस्था बाळगणारे 'रामचरितमानस प्रेमी मंडळ' (डोंबिवली), श्रीहंसमंडळ, परांडा वगैरे संस्था आणि श्रीमती डॉ. कमल वैद्य, सौ. रेखा पटवर्धन, श्री. मा. द. पर्वते वगैरे या भागातील 'चरितमानस' भक्त, स्वामीजींच्या साहित्याचा प्रसार, प्रकाशन कार्यात आपापल्या परी महत्त्वाचा वाटा उचलणे, लेख लिहिणे, ग्रंथप्रसार वगैरे द्वारे अत्यंत निष्ठापूर्वक करीत आले आहेत, करीत आहेत. या संदर्भात आणखी एक आनंदाची गोष्ट म्हणजे पुण्याची 'ओंकार ट्रस्ट' ही संस्था या वर्षीचा आपल्या 'कल्याणी' वार्षिकाचा विशेषांक 'स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती विशेषांक' या विषयावर काढून या कार्यात प्रशंसनीय योगदान देत आहे. श्रीमती डॉ. कमल वैद्य यांच्या प्रेरणेने आणि 'सेवा घडे सेवक बुद्धिनेही' या विनम्र भावनेने, 'ओंकार ट्रस्ट'च्या वरील कार्यात सहभागी होण्याच्या हेतूने, या लेखाचा प्रपंच केला आहे. हे काहीसे विषयांतर येथेच आवरते घेतो.

किष्किंधाकांड

'वैराग्य व ज्ञान प्राप्तीनंतर रामनामामृताची गोडी' हा 'किष्किंधाकांडा'चा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. म्हणून हे कांड 'सकलकलिकलुष विध्वंसक' मानले जाते. हे कांड मुख्यतः रामनामपर आहे. यांत रामनामाचा महिमा 'मंगला चरणां'च्या दुसऱ्या श्लोकापासून उपसंहारापर्यंत वर्णिला आहे. प्रभु रामचंद्रांनी, 'राम' हे आपले नाव फक्त याच कांडांत आपल्या मुखाने सांगितले आहे. राम, हनुमान, सुग्रीव यांचे मीलन याच कांडात झाले आहे. श्रीहनुमानचरित्रास याच कांडात प्रथम सुरुवात झाली असून, या कांडात शेवटीसुद्धा हनुमान चरित्र आहे. इतर कांडातील बहुतेक सर्व विषय या कांडात आले आहेत; म्हणून हे कांड 'रामचरित मानसचे 'हृदय' मानले जाते. कारण 'हृदय' हा मानवी शरीरातील सर्वात महत्त्वाचा असा सर्वात लहान अवयव आहे. 'रामचरितमानस'मधील 'किष्किंधाकांड' हे सर्वात लहान, म्हणजे अवघ्या ३० दोह्यांचे आहे.

टीकेतील साक्षेपीपणा

स्वामीजींची 'मानस'वरील टीका स्वामीजींच्या सखोल व्यासंगाचा, व्युत्पन्नतेचा व साक्षेपीपणाचा प्रत्यय आणून देते. ती विस्तृत, पर्याप्त आणि स्फटिकवत् पारदर्शी आहे. येथे 'किष्किंधाकांडा'पुरते या विशेषांचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. 'मंगलाचरणा'च्या पहिल्या श्लोकांवरील टीकेपासूनच वरील विशेष ध्यानी येतात. मनावर ठसा उमटवून जातात. उदाहरणार्थ पहिल्या श्लोकात श्रीराम-लक्ष्मणांच्या संदर्भात 'विज्ञानधामौ' व 'सद्धर्मवर्मौ' ही दोन विशेषणे आली आहेत. ती 'धामौ' व 'वर्मौ' ही रूपे व्याकरणदृष्ट्या चूक आहेत. असाआक्षेप पुष्कळजण घेणे संभवनीय व शक्य असल्याने त्या बाबत स्वामींनी स्पष्टीकरण करताना लिहिले आहे

- 'धामन्' आणि 'वर्मन्' हे शब्द अधिक रूढ असले तरी 'धाम' व 'वर्म' असे 'अ' कारांत शब्दही 'गुणादयोबहुलम्' या पाणिनीच्या सूत्राच्या आधारे (पाणिनी ३।३।१) सिद्ध होतात. (म्हणून 'धामौ' व 'वर्मौ' ही रूपे व्याकरणदृष्ट्या चुकीची नाहीत) स्वामींच्या टीकेतील बारकावा व विशेष शंकानिरसनाचा साक्षेप या उदाहरणावरून लक्षात येईल. टीकेतील साक्षेपीपणाचे उदाहरण याच श्लोकावरील पुढील विवेचनात आढळते. 'राम-लक्ष्मणांचे संदर्भात 'कुंदेंदीवरसुंदरौ' असे विशेषण येथे येते. कुंदाची फुले श्वेतगौर वर्णाची असतात. लक्ष्मण श्वेतगौर सुंदर आहे. इन्दीवर नील वर्णाचे असते. राम नीलवर्णाचे आहेत. या विशेषणांद्वारे लक्ष्मणाचा उल्लेख रामाच्या पूर्वी केला आहे. हा क्रमविपर्यय मर्यादा भंग करणारा आहे.' असा पूर्वपक्ष करून स्वामी उत्तर पक्षात त्याचा खुलासा करताना लिहितात - 'येथे लक्ष्मणाचा उल्लेख रामापूर्वी करण्याने कवीने अत्यंत गूढ भाव ध्वनित केला आहे. येथे 'विलोमराम मंत्राची' महती सूचित केली आहे. नामसाधनेत अशा उलट्या नामाच्या जपाचा एक प्रकार आहे. 'नर-नारायण'मध्येही 'नर' धाकटा भाऊ व 'नारायण' वडील भाऊ, यांचा उलटा उल्लेख आहे. (पहा 'नरनारायण समसुभ्राते' चौपाई - १।२०।५) अशा नामजपानेही अनंत पापराशी नष्ट होऊन उद्धार होतो.' वाल्याचा वाल्मीकी ऋषी अशाच 'उफराट्या' नामजपाने झाल्याचे समर्थांनी एके ठिकाणी म्हटले आहे. हे कांड भक्तिमाहात्म्यपर आहे. भक्तिपंथात अशा गोष्टी आढळतात. विस्तार भयास्तव हा भाग आणखी उदाहरणे देऊन न लांबविता आवरता घेतो.

तुलसीदास - व्यक्तिमत्त्व, कार्य व भाषाशैली

गोस्वामी तुलसीदासांची जन्मतिथी, जन्मस्थान, जात, गुरु, मातापिता या सर्वांबद्दल मतभिन्नता आहे. त्यांची बहुसंख्य विद्वानांना मान्य झालेली जन्मतिथी भाद्रपद शुद्ध एकादशी, मंगळवार संवत् १५८९ (इ. स. १५३२) ही असून मृत्युतिथी श्रावण वद्य तृतीया (शनिवार) संवत् १६८० (इ. स. १६२३) अशी आहे. तुलसीदासांचे बालपण फार कष्टात गेले. जन्मानंतर दहा महिन्यांतच त्यांच्या आईवडिलांचा मृत्यू झाला. असे सांगतात की त्यांचा जन्म मूळ नक्षत्रावर झाला होता. ते अनाथ झाले. लहानपणी त्यांना एका हनुमान मंदिरात आश्रय मिळाला. उदरनिर्वाहासाठी त्यांना भिक्षांदेही करावी लागली. यथावकाश रत्नावलि नावाच्या मुलीशी विवाह झाला. तरुणपणी ते पत्नीवर खूप आसक्त होते. माहेरी गेलेल्या पत्नीला, वादळा पावसातही, सापाची दोरी करून माडीवर भेटायला गेले असता पत्नीने चांगलेच खडसावल्यामुळे त्यांचे मन संसारातून उडाले व ते रामभजनी स्थिर झाले. ही जनश्रुति खरी आहे, असे पुष्कळ संशोधकांचे मत आहे. त्याला काव्यांतर्गत पुरावाही सापडतो. (संदर्भ - 'मराठी विश्वकोश' पृ. ४२८).

तुलसीदासांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक होते. ते गौरवर्णाचे, दयाळू व परोपकारी होते. त्यांचे तत्त्वज्ञान समन्वयवादी होते. तुलसीदासांचा भक्तिमार्ग श्रीरामाच्या अनन्य भक्तीवर आधारलेला आहे. कलीने गांजलेल्या जीवांना, अपार संसार सागरातून तरून नेण्यासाठी, रामभक्तीची सुगम नौका तुलशीरामायणाच्या रूपाने त्यांनी सर्वसामान्यांच्या दारी नेली. प्रत्यक्ष वाल्मिकीच गोस्वामी तुलशीदासांच्या रूपाने अवतरला आहे, अशी भक्तांची भावना होती व आहे. तुलसीदासांची भक्तिरचना विपुल आहे. त्यांची एकूण ग्रंथ संख्या ३९ ते ५४ इतकी होती - आहे. 'रामचरितमानस' हा त्यांचा सर्वश्रेष्ठ ग्रंथ - त्यांच्या सर्व साहित्याचा 'मुकुटमणी' आहे. संपूर्ण भारतीय साहित्याला तो ललामभूत आहे. यातील रचना चौपाई व दोहा या लोक छंदात आहे. असा हा श्रेष्ठ ग्रंथ 'अवधी' या लोकभाषेत लिहून सर्वसामान्य जनतेला परमार्थाचा मार्ग त्यांनी खुला करून दिला आहे. विशेषतः उत्तर भारतात हा ग्रंथ घरोघरी मोठ्या भक्तियुक्त अंतःकरणाने वाचला जाई, आजही वाचला जातो. काव्य, भक्ति व तत्त्वज्ञान यांचा त्रिवेणी संगम या ग्रंथात झाला आहे. सर्वसामान्यांमध्ये रामभक्ती रुजवण्यासाठी लिहिलेल्या या ग्रंथाचा 'प्रसाद' हा अंगभूत गुण आहे. या ग्रंथात शब्द चमत्कृतीचे वा अलंकार प्राचुर्याचे प्रदर्शन नाही. उत्कट भक्तिभावना पदांच्या व गीतांच्या रूपाने व्यक्त करण्याची आत्मनिष्ठा त्यांच्या ठिकाणी होती. अलंकारांचा औचित्यपूर्ण संयमित उपयोग, वर्णने, संवादांतील नाट्यमयता इत्यादी बाबतीत त्यांची प्रतिभा महाकवीची होती. तुलसीदासांच्या शेकडो अनुभवगर्भ, लालित्यपूर्ण काव्यपंक्ती नंतरच्या लोकजीवनात आणि साहित्यात म्हणी व वाक्प्रचार म्हणून प्रचलित झाल्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांचे भक्तिरसपूर्ण गोड साहित्य लोकमानसावर अधिराज्य करून राहिले आहे, ते वरील सारख्या गोष्टींमुळेच होय. रामायणे देशविदेशात अनेक झाली. पण तुलसीदासांनी रामकथेला ज्या उंचीवर नेले तितके किंवा त्यापेक्षा अधिक उंचीवर नेणे अन्य कोणा कवीला जमले नाही. त्यांच्या या 'मानसा'ने प्रेम, सहिष्णुता, क्षमाशीलता, दया, करुणा वगैरे गुणांना समाजात प्रेरणा दिली आहे. ज्ञान, भक्ति, निर्गुण-सगुण, वैयक्तिक कल्याण-लोककल्याण सांप्रदायिक सामंजस्य वगैरेंचा सुंदर संगम व समन्वय त्यांच्या काव्यांत आढळतो. एकूणात मानवतेच्या कल्याणासाठी त्यागमय जीवन जगणाऱ्या प्रभु रामचंद्रांच्या रूपाने मानवी जीवनाचा आदर्श, गोस्वामी तुलसीदासांनी समाजापुढे ठेवला आहे. लोकमंगलाची उत्कट भावना हा तुलसीदासांच्या साहित्याचा आणि जीवनाचा गाभा आहे.

श्रीज्ञानेश्वर-नामदेवानंतर तीनशे वर्षांनी होऊन गेलेल्या गोस्वामी तुलसीदासांवर त्यांनी लिहिलेल्या, विशेषतः 'रामचरितमानस' या ग्रंथाचे संदर्भात, ज्ञानेश्वर-नामदेवांच्या ज्ञानेश्वरी वगैरे साहित्याचा प्रभाव असंभवनीय नाही, असा विचार किष्किंधाकांडावरील स्वामींचे भाष्य व किष्किंधाकांड वाचताना मनात येऊन गेला. तसेच मत कोणी व्यक्त केल्याचे वाचनात नाही. तथापि दोघांच्या ग्रंथांमधील काही प्रमुख सिद्धांत, शिकवण, प्रचलीत प्राकृत मराठी व 'अवधी' यासारख्या लोकभाषांचा अंगिकार, ओवी-अभंग आणि चौपाई दोहे वगैरेंचा वापर अशी काही साम्ये वरील दोघांमध्ये दिसतात. नामजपासारखे सोपे, परमार्थाचे साधन, सर्वसामान्य प्रापंचिकांसाठी (सर्व जाती जमातीमधील, सर्व स्तरातील) दोघांनीही प्रतिपादले आहे,ही गोष्ट या संदर्भात विचारात घेण्याजोगी आहे. आणखी असे की, नामदेवांनी उत्तरेत जाऊन हिंदी भाषेत भक्तिसाहित्य लिहिले, कीर्तनाद्वारे ज्ञानेश्वरप्रणीत भक्तिपंथाचा प्रचार व प्रसार केला. त्या प्रदेशातही त्यांच्या या कार्याचा फार मोठा प्रभाव होता, या गोष्टी लक्षात घेता, गोस्वामी तुलसीदासांसारख्या संताला त्याने प्रभावित केले असणे अशक्य नाही. अनुकरण नाही, तरी प्रेरणा मिळाली असणे संभवते. सहज मनात आले ते लिहिले इतकेच. फार गांभीर्याने ते घेण्याजोगे आहे, असा माझा दावा नाही. 'जय श्रीराम'

प्रा. क. श्री. काळे

'हेरंब', सिटी हायस्कूलसमोर, संत मामा महाराज केळकर मार्ग,
गावभाग, सांगली ४१६४१६.

श्रीरामचरितमानस गूढार्थ चंद्रिका

प्रज्ञाशिष्या रामदासी

एम.ए. (संस्कृत) प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींच्या अनुग्रहामुळे श्रीरामचरितमानसाचे वेड. लहानपणापासून श्रीरामचरितमानसावर लेख, जीवनविकास, संतकृपा, प्रसाद इ. मासिकात प्रसिद्ध. श्रीरामचरितमानसावर पीएच.डी. करण्याची मनिषा. श्रीरामचरितमानस प्रेमी मंडळाच्या सचिव. श्री. मो. ग. पटवर्धन यांच्या सहकार्याने गेली ३-४ वर्षे श्रीरामचरितमानसावर प्रवचने - पुणे, सांगली, मिरज.

प्रास्ताविक

'मानस गूढार्थ चंद्रिका' म्हणजे आदर्श टीका वा भाष्य कसे असावे याचा जणू सुरेख वस्तुपाठच होय. श्रीरामचरितमानस हा अलौकिक सद्ग्रंथ आहे. 'रचुनि महेश मानसिं राखिती' अशी याची व्युत्पत्ती किंवा जन्मकथा या ग्रंथातच सांगितली आहे. तसेच गोस्वामी तुलसीदासांना हा मूळ ग्रंथ लिहिण्याची आज्ञा काशीमध्ये साक्षात् विश्वेश्वरांनी स्वप्नदृष्टांताद्वारे केली -त्यानुसार त्यांनी हिंदी-बोली भाषेतून याची रचना केली. तसेच याचा मराठी अनुवाद प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींनी केला तोही रामांच्याच आज्ञेने 'रामाज्ञया स्वभाषायां प्रज्ञानेनाऽनुवाद्यते' असा स्पष्ट उल्लेख आहे. त्याचप्रमाणे यावरील टीका मानसगूढार्थ चंद्रिका लेखन देखील झाले ते 'प्रेरक हृदिं रघुवंशविभूषण' या दिव्य मूळ धाग्यामुळे तसेच सद्गुरु वासुदेवानंद सरस्वतींचा शुभाशीर्वाद अन् रामायण गुरु बाबा गंगादासांचा अमोघ आशीर्वाद - 'तुलसीदासजी तेरे मुखसे बोलेंगे ।' या दोन आशीर्वादांची सुंदर गुंफण केवळ त्यामुळेच हे टीका लेखन झाले आहे असे सत्यप्रतिज्ञ अन् प्रामाणिक निवेदन प्रज्ञानानंदांनी अत्यंत विनयाने 'प्रज्ञास्वामी लिहि यंत्रसा' असे स्पष्ट म्हटले आहे.

मानस हे केवळ महाकाव्य नसून नाट्यमहाकाव्य कसे आहे ते गूढार्थ चंद्रिकेद्वारे जागोजागी दाखवून दिले आहे. मंगलाचरणामध्ये अनुबंध चतुष्ट्य, वस्तुनिर्देश मंगल व स्तुतीपर मंगल यांचा समावेश आहे. प्रत्येक कांड हे एकेक मोक्षपुरीचे द्योतक आहे हे प्रत्येक कांडाच्या वैशिष्ट्यांसह स्पष्ट करून दाखवले आहे.

टीकेची पद्धती

हिंदी टीकेत मूळ हिंदी चौपाई, दोहा, सोरठा, छंद वा श्लोक त्यानंतर त्याचा सरलार्थ व त्यानंतर त्यावरील सविस्तर प्रत्येक शब्दाची फोड करून दाखविणारी संशोधक, मर्मज्ञ अथवा सर्वज्ञाच्या दृष्टिकोनातूनची टीका. अन् मराठी टीकेत मूळ हिंदी चौपाई दोहा सोरठा वा छंदानंतर मराठी समच्छंद, समवृत्त देऊन सरलार्थ व टीका असाच क्रम ठेवला आहे आणि सरते शेवटी हिंदीत ध्या.र. = ध्यानमें रखिये किंवा मराठीत वि.ल.ठे = विशेष लक्षात ठेवा अशी पुष्टीही जोडली आहे. तर काही ठिकाणी जेथे टीका फार विस्तृत होते तेथे 'सिंहावलोकन' या सदरात विशेष ठळक गोष्टी पुन्हा एकत्रितरीत्या नमूद केलेल्या आहेत.

प्रसंग, अर्थ वा भावानुसार अध्यात्मपर अर्थ, नक्षत्र मंडल स्तुतीमध्ये 'नक्षत्र मिलान' काही ठिकाणी साम्यभेद वा तद्संबंधी कोष्टकरूपाने विषय समजावून देणे योगपर अर्थ, साहित्यशास्त्रातील नवरस, तात्त्विक चर्चा, मानस-पीयूषमधील अर्थ वा त्याचे खंडन-मंडन, प्रसंगोपात्त आलेले उपदेश, तुलसीकृत काव्य संकेत व पदरचनेतील मात्रा बदल, माधुर्य-ओजादि गुण इ. अनेक विषयांची चर्चा टीकेत अगदी सविस्तरपणे मांडली आहे. आवश्यक तेथे वाल्मीकी-अध्यात्म रामायणातील भाग उद्धृत केला आहे. पद्म पुराणादिचे आधार स्पष्ट केले आहेत. त्याचप्रमाणे रामचंद्र, रघुराया, विश्राम, मंगल असे शब्द का व कुठे अन् किती व कसे वापरले आहेत ते सांगितले आहे. श्रुती सिद्धांतांचीही यथासांग चर्चा त्या त्या विषयानुरुप केली आहे. तुलसीदास 'रूपक-सम्राट' कसे आहेत ते सविस्तर कोष्टकरूपानेही जागोजागी दाखवून दिले आहे. माया-जीव (ईश्वर) व जगदीश्वर यांचीही चर्चा करून तुलसीदासांचा अद्वैत सिद्धांत स्पष्ट करून दाखवला आहे. तसेच मानसाचे खास वैशिष्ट्य राम-शिव अभेद सर्वत्र सुस्पष्ट केला आहे. तसेच श्रीराम हा परब्रह्म परमात्मा-मूळ निर्गुण निराकार असून गोब्राह्मण संतजनांसाठी नरनाट्य करीत असतानाही कसा मर्यादा पुरुषोत्तम पूर्णावतार आहे हेही प्रत्येक ठिकाणी सुस्पष्ट करून उकलून दाखवले आहे. अन् त्यायोगे कलियुगात ज्ञानोत्तर भक्तीलाच कसे प्राधान्य आहे हे वाचकांच्या पूर्णपणे मनावर बिंबवून अगदी शिक्कामोर्तब केले आहे. 'रामनाम अवलंबन एकु' हा भवतरणाचा कलियुगातील एकमेव उपाय हे साध्य - मानवी देहाचे अंतिम साध्य वा ध्येय आहे याद्वारेच रामप्राप्ती होईलच होईल असा स्पष्ट दिलासा दिला आहे.

बालकाण्ड

बालकांडात प्रथम मंगलाचरण मराठीत अनुवादकाच्या मंगलाचरणांचीही सात श्लोकांची भर पडली आहे. त्यानंतर गुरुवंदनेपासून वंदन प्रकरण सुरू होते. त्यामध्ये संत, खल, कार्पण्य भावाने वंदन, कवि समष्टी सीताराम-परिवार व धाम तसेच चरणोपासक वंदना इतके विषय अंतर्भूत होतात. तर दो. १९ ते २८ रामनामवंदना हे प्रकरण अतिशय अप्रतिम असे आहे. त्यानंतर रामगुणवर्णन, मानस-परंपरा व मानस महात्म्य यांचे वर्णन येते. त्यानंतर मानसाची निर्मिती कोणी, कोठे व का केली, श्रीरामचरितमानस हे नाव कसे पडले, कोणी दिले याची लिखित स्वरूपात रचना कोणी, कोठे, कशी केली, ही पार्श्वभूमी सविस्तर सांगून मानस सरोवर व रामचरित यांचे अत्यंत प्रदीर्घ असे सांग रूपक चार संवादातून चारी पुरुषार्थ प्राप्तीसाठी कसे भरून जाते ते फारच सुंदर तऱ्हेने सांगून त्या सरोवरातील कमळे कोणती इ. ८५ प्रकाराने समजावून दिले आहे. त्यापुढे मानससरोवर व पंपा सरोवर यांची १७ प्रकारे तुलना केली आहे. अन् त्यानंतर मानस-सरोवराचा मूळ स्त्रोत शरयू नदी कशी तेही ३१ प्रकारांनी तुलनात्मक दृष्ट्या समजावून दिले आहे. पुढे पार्वतीचे प्रश्न २२ व त्यांना दिलेली उत्तरे यातून ही कथा कशी बहरते ते दाखवून दिले आहे.

इथे हिंदी प्रथम खंड समाप्त होतो. तर यासाठी मराठीतून श्रीरामचरितमानसप्रेमी मंडळाने सुमारे दोन खंड खर्ची घातले आहेत.

हिन्दी बालकांड दुसरा खंड याज्ञवल्क्य-भरद्वाज संवादाने सुरू होतो. सर्वज्ञ अशा याज्ञवल्क्य मुनींना भरद्वाज विचारतात की, 'त्रिपुरारी महेश ज्यांचे ध्यान करतात तेच हे अवधेश राम की दुसरे?' त्यावर याज्ञवल्क्य भरद्वाजांना सांगतात, भवानी पार्वती मातेने शंकरांना हाच प्रश्न विचारला होता.' अशी प्रस्तावना करून संपूर्ण रामकथेच्या अंतर्गत सती मोह, पार्वतीचे तपाचरण, शिव-पार्वती विवाह, नारद मोह इ. उपप्रकरणे येतात. अन् त्या ओघातच उदारपणे रावणावतार सांगून रामवताराचे प्रमुख हेतू - प्रतापभानूचा शाप, नारदांचा शाप, मनु-शतरूपांना वरदान इ. कथा सांगून पुन्हा रावणाच्या अत्याचाराचे वर्णन, त्यामुळे त्रस्त झालेली धरणी व तिच्यासह ब्रह्मदेवादिकांनी परमात्म्याची केलेली प्रार्थना इ. कथाभाग येतो अन् मग प्रत्यक्ष रामावतार, रामांचे बालपण-शिक्षण-विश्वामित्रांबरोबर जाऊन मखसंरक्षण, ताटिका मर्दन, अहल्योधारण व धनुर्भंग अशी रामकथा श्रेणी चढत्या क्रमात वरवर जाते. 'पुष्पवाटिका-प्रसंग' या एका उत्कृष्ट भावविभोर प्रसंगाने हे बालकांड फारच सुंदरपणे बहरते व विवाह प्रसंगाने फुलते. सीतेसह तिन्ही बहिणींचा रामलक्ष्मण-भरत-शत्रुघ्न यांचेशी एकाच वेळी एकाच मंडपात विवाह संपन्न होऊन सर्व वऱ्हाड व वरात अयोध्येत परत येते अन् अयोध्येत आनंदोत्सव उत्सवास खऱ्या अर्थाने उधाण येते. परंतु मध्येच परशुराम-प्रसंगाने थोडासा खारट-तिखटपणा येऊन मूळचा 'प्रेमरंग' अधिक गहिरा बनतो - खुमासदार-खमंग-खुसखुशीत अशा या नाट्यमय प्रकरणाने.

ही झाली बालकांड विषय सूचि. पण गूढार्थ वाचताना गुरुवंदन व महात्म्य, रघुवीराचे (सहा गुण) संत व सत्संग वर्णनातील सखोलता, राम-नामवंदनेतील सूक्ष्म अभ्यासूपण, श्रीशंकर व पार्वतींचे जगत्पितृत्व व जगदंबेची सखोल माहिती, 'परम रम्य' कोणकोणते खास आश्रम, श्रीरामांचे सर्व सद्‌गुण अशी अत्यंत सखोल-माहिती अगदी ज्ञानकोश सदृश कशी आहे ते गूढार्थ चंद्रिका अभ्यासू व जिज्ञासू बनून वाचल्याशिवाय कशी कळणार? जनकांच्या मिथिलेपेक्षा अयोध्येचे श्रेष्ठत्व गूढार्थ चंद्रिकेशिवाय कळणे केवळ अशक्य !

अयोध्याकांड

अयोध्याकांडाची सुरुवात रामांच्या युवराज्याभिषेक तयारीने अत्यानंदात होते परंतु संपूर्ण हा सोपान करुण रसाने अगदी काठोकाठ भरून गेला आहे. मंथरेची बुद्धी का फिरवली जाते अन् तीही कैकयीच्या सत्त्व तमोगुण प्रधान वृत्तीद्वारे प्रत्यक्ष कशी कार्यान्वित होते हे तुलसीदासांनी त्यांच्या नेहमीच्या रूपक ढंगाने सूक्ष्म रीतीने व्यक्त केलेले विचार गूढार्थ उकलून प्रज्ञानानंदांनी त्याचे अनेकविध पैलू पूर्णपणे उलगडून दाखविले आहेत. 'वनवास' या वरदानाचा विचार प्रत्येक व्यक्तीगणिक कसा बदलतो ते अगदी दशरथ-कौसल्येपासून सर्व अयोध्यावासीयांपर्यंत ते प्रेक्षणीय व मननीय आहे. प्रत्यक्ष वनात जाताना, वनात गेल्यावर 'श्रीराम' या नायकाचे 'धीरोदात्तपण' उजळणारे अनेक पैलू गूढार्थ नजरेस आणून देते. लक्ष्मण गीता, केवट-प्रसंग, निषाद-भेट, प्रयागवर्णन प्रत्येकाचे खास वैशिष्ट्य तुलसीदासांच्या दृष्टीतून पहावयास मिळते तर वाल्मीकींचे मुनीत्व वर्णिताना याज्ञवल्क्य, भरद्वाज, अगस्ती वगैरेंशी तुलनात्मक वर्णन करून प्रत्येकाचे वेगळेपण जाणवून दिले आहे. चित्रकूटावर श्रीराम-लक्ष्मण-सीता यांना स्थिर करून तुलसीदास जणू फिरत्या रंगमंचाप्रमाणे वाचकप्रवाह सुमंतांकरवी अयोध्येकडे सहज कुशलतेने फिरवितात. तेथे दशरथांचा मृत्यु, भरताचे आगमन, दशरथांचे अंत्यस्कारादि उरकून भरताच्या मनाचे जणू दर्पणवत् दर्शन गोस्वामी सुबकपणे वाचकांना घडवितात. भरताचे रामांवरील अतीव प्रेम त्यास वनात श्रीरामदर्शनास कसे बाध्य करते हे वाचताना अगदी पाषाण हृदयालाही पाझर फुटेल इतके भरत-चरित्र कोमलतेने व पारदर्शित्वाने गोस्वामींनी हाताळले आहे. भरताची चित्रकूट-यात्रा ही तर इतकी हृदयद्रावक आहे की त्या करूण रसाच्या पुरात वाचक अक्षरशः बुडून जातो. प्रत्यक्ष 'राम-भरत भेट' म्हणजे जणू प्रेम व प्रेमी यांचा हृदयंगम मिलाप, त्यानंतर तेथे भरणारे अनेक दरबार, भरताच्या प्रेमापुढे वसिष्ठांसारखा ब्रह्मर्षिही हतबल होतो हे दाखवताना भक्तीने ज्ञानावर मिळविलेला विजय जणू गोस्वामी खास निर्देश करून दाखवून देतात. शेवटी भरतच काही आलंबनार्थ म्हणून राम-पादुका मागून घेतो व पाच दिवसांत रामाज्ञेने चित्रकूट यात्रा करून अयोध्येस पादुकांरुपी रामांसह निर्गमन करतो व तेथे पादुका सिंहासनाधिष्ठित करून शत्रुघ्नाच्या मदतीने मातृसेवा व प्रजासेवा यात रामानुसंधान पूर्णपणे सदैव राखून रत होतो. भरताची ती राहणी, ते व्रतनेम पाहून मी मी म्हणणारे थोर ऋषि-मुनी देखील लाजेने माना खाली घालतात. प्रत्येक कांडाचे वैशिष्ट्य गूढार्थ चंद्रिकेत दिलेले आहेच. त्यावरूनही प्रत्येक कांडाचा आवाका त्यातील रस, भाव, नाट्य, पदलालित्य, छंदोरचना इ.सह दृष्टीसमोर सारांश रूपाने तरळतो.

अरण्यकाण्ड

हा तिसरा सोपान म्हणजे अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका द्वारावतीपैकी मायानगरी कशी आहे ते प्रारंभीच्या इंद्रपुत्र जयंत प्रकरणानेच झलक रूपाने कळते. या कांडात अत्रि, शरभंग, सुतीक्ष्ण, अगस्ती सारख्या ऋषी-मुनींची तपस्या, त्यांचे रामांवरील प्रेम स्तुतीरूपाने किती विविध प्रकारे नटलेले आहे ते ध्यानी येते. तर विराध, खरदूषण, कबंध या राक्षसांना मारून तारलेली - हा रामांचा 'उदारपणा' खास दृष्टीत भरतो. पती पत्नीतले प्रेम, एकांतातील सीतेचा पुष्पशृंगार व तिचे अग्निमध्ये सुरक्षित ठेवणे यातील गूढ-प्रेम उलगडून दाखविताना कोठेही शृंगाराने सात्विकतेचा आधार सोडलेला नाही. शूर्पणखेचे नाक-कान खंडण, मारीचाचे कपट (कांचन-मृग), सीताहरण व रामांचा विलाप यातून रामांच्या गूढ लीला व त्यांचे परब्रह्म स्वरूप - लोकवक्तु लीला कैवल्यम् उलगडून दाखवणे यात तुलसीदासांचे कौशल्य पणास लागलेले दिसते. जटायूचा अद्‌भुत पराक्रम, शबरीची तितिक्षा व तिला रामांनी उत्स्फूर्तपणे केलेला नवविधा भक्तीचा सुंदर उपदेश अत्यंत अप्रतिम कायमचा ठसा उमटविणारे हे प्रसंग व या व्यक्तिरेखा मन हेलावून टाकतात. त्यानंतर राम-विरहाद्वारे येणारे ऋतू-वर्णन त्यातूनही साधकाला कसे उत्तम मार्गदर्शन मिळते ते अनेक उपमांनी खुलवून खुलवून गोस्वामींनी खुबीदारपणे रंगविले आहे अन् या मायावी जंगलातून साधकाने सुटका करून घ्यायची असेल तर नारदांसारखा संत व राम-नामासारखे अमोघ शस्त्ररुपी शास्त्र यांचेच वरदान कसे उपकारी ठरते हे श्रीराममुखाने सांगण्याची तुलसीदासांची अवर्णनीय अशी शब्दकला-शब्दलाघव वा शब्दलावण्य इथे पूर्णार्थाने पणास लागले आहे.

या एका अरण्यकांडात नवविधा भक्तीचे सारे प्रकार व सारे अष्ट

सात्विक भाव यांचे सुंदर दर्शन घडविले आहे. तसेच चारी मुक्तीचेही दर्शन येथे होते.

किष्किंधाकाण्ड

ऋषीप्रमाणे मूक व गुप्त असलेला 'हनुमंत' (आत्यंतिक अनन्य रामभक्त) इथे प्रगट रूपाने प्रवेशतो. त्याचे करवी राम-सुग्रीव यांची अग्निसाक्षीने घडलेली सुसंस्कारित मैत्री, वालिवध आणि मूळची अत्यंत ज्ञानी असलेली वालीपत्नी तारा हिला रामांनी केवळ ५ चौपायांत ज्ञानोपदेश देऊन 'तारले' तर सुग्रीवाला राज्य-कोष-पत्नी देऊन मित्रत्वावर शिक्कामोर्तब केले. अन स्वतः श्रीराम चातुर्मास कसा व्यतीत करतात हे सांगताना गूढ रूपाने साधक-बोध उच्च स्तरावरचा सहजी हाती येतो. सुग्रीवांची विषयलोलुपता व हनुमंतांची सावधता वा सजगता खुबीदार शैलीने जणू एका नाण्याच्या दोन बाजू दाखवाव्यात इतक्या स्वच्छपणे उघड करून दाखवले आहे. त्यानंतर लक्ष्मणागमनाने कार्य-स्मरण होऊन कार्यास प्रत्यक्षपणे लागलेले सुग्रीवांसह सारी वानर जमात त्यातही विशेष खाशी तुकडी-हनुमान, जांबूवान, अंगद नल नीलादींची ! साऱ्यांचे रामकार्यार्थ भटकणे, स्वयंप्रभेच्या विवरातून सागरतटी पोचणे व तेथे संपातीस पाहून सर्वांचे गर्भगळीत होणे अशा अनेकविध छटांनी, रंगांनी वैविध्याने नटलेले असे हे किष्किंधाकांड 'काशी-पुरी' कसे आहे हे परिशिष्टात सांगून इथे हा सोपान विरमतो.

सुग्रीव-वाली-हनुमान-जांबुवान या महान शक्तीशाली रामदूतांचे कार्यदर्शन घडविता घडविता त्या ओघात येणाऱ्या अनेक पौराणिक कथांची सविस्तर चर्चा, सुसंगतवार अनेक सिद्धांतांची मांडणी, शेवटी हे सारे विषय परमात्म तत्त्वाशी मूळ रूपाने जोडून दाखविले आहे.

सुंदरकांड

सुंदरकांड याची सांगोपांग सोदाहरण सविस्तर चर्चा करून त्या नंतर टीकेस प्रारंभ होतो. हनुमंताच्या अपार-अद्‌भुत अशा रामकार्याने परिपूर्ण भरलेले असे हे कांड ही कांचीपुरी आहे यात शिवकांची महारुद्रावतार, हनुमच्चरित्र व विष्णुकांची म्हणजे श्रीरामचरित्र यांचा सुंदर मिलाफ आहे. 'रामदास रामाहुनि मोठे' हे सूत्र सिद्ध करण्यासाठी जणू सुरुवातीस भक्तगाथा व त्यानंतर प्रभुगाथा असा क्रम येथे ठेवला गेला आहे. रावणाच्या लंकेत राहूनही बिभीषण का व कसा 'रामभक्त' राहिला त्यास हनुमानाकडून जणू रामप्रेमामृत लाभले अन्‌ प्रत्युकारार्थ त्याने सीतान्वेषणास त्याला केलेले सहाय्य हे सारे सारे लोभनीय आहे. मंगलाचरणाच्या श्लोकातील अतुलितबल धामं... श्लोकातील प्रत्येक पदानुसार हनुमानाचे सद्‌गुण-दर्शन संपूर्णपणे याच कांडात आढळते. श्रीसीता-हनुमान संवाद हा यातील परमोच्च शिखरबिंदू (climax) म्हणता येईल इतका अप्रतिम आहे. बिभीषणाचे राम शरण्यत्व व रामांचे औदार्यपूर्ण वरदान किती म्हणून सुंदरतेचे दाखले द्यावेत ! बिभीषण-सख्याच्या सल्ल्यानुसार लक्ष्मणेच्छेविरुद्ध रामांचे सागरास विनवणे अन्‌ शेवटी सागराची शरणागती-अशा सुंदर सुंदर प्रसंगांनी भरलेले हे सुंदरकांड असून शांत व शाश्वत श्रीरामाला निर्भरा भक्तीचे वरदान देणारे हे कांड अति सुंदर न ठरले तरच विशेष !

रामकार्यास अविरत, अविश्रांत कटिबद्ध हनुमान, सीता-बिभीषणापुढे सूक्ष्मरूप घेणारा, तर तोच पवनसुत रावण-मेघनादादी निशिचरांपुढे प्रचंड प्रभंजन बनलेला महारुद्र, महाकाय, पुन्हा सीतेचा निरोप घेताना तिला धीर देऊन आश्वस्त करणारा रामदूत, तर रामकार्यात सफल झालेला आनंदी सुग्रीव-सचीव व कपीश्वर, तोच रामप्रभुंपुढे अत्यंत विनीत होऊन भावविव्हळ होणारा रामसुत, बिभीषणास पाहून आनंदमग्न - रामभक्त, अशी विविध व एकापेक्षा एक सुंदर रूपे हनुमानाची याच कांडात दिसतात. कमलदलाची पाकळीन्‌ पाकळी उकलून दाखवावी तसे गूढार्थाने 'हनुमद्‌दर्शन' सुंदरकांडाद्वारे स्वामींनी घडविले आहे.

लंकाकांड

रामसेतूवरील परम रम्य रामेश्वर-दर्शनाने लंकाकांडाची सुरेख सुरुवात होते. त्यानंतरच्या परमरम्य सुवेल पर्वत-शिखरावरील रामांची सुरेख ध्यान-मुद्रा व रामभक्तांचे मनोगत प्रगट करणारा छोटासाच पण रमणीय प्रसंग ! मंदोदरीकडून श्रीराम-परमात्म्याचे विश्वरूप विराट दर्शन ! त्यानंतर अंगद-शिष्टाईचे सर्वांग परिपूर्ण प्रकरण-राजकारण, नीती, धर्म व भक्तीचे अनुपम दर्शन घडविणारे व त्यानंतर राम-रावण युद्ध. नर आणि वानर जमातीचा बलदंड अशा निशाचर जातीवरील विजय म्हणजेच नीती वा धर्माचा, अधर्मावरील विजयाचे हुबेहूब वर्णन. युद्धासारख्या प्रसंगाचे वर्णनही कंटाळवाणे वा रटाळ न होता - वीर ओजपूर्ण अन्‌ अत्यंत गतीमान असे आहे. लक्ष्मण वीरघातिनी शक्तीने मूर्च्छित झाल्यावर रामांचा विलाप, हनुमंताचा पुनः शक्ती-युक्तीयुक्त पराक्रम त्यातही भरताचे किंचित दर्शन, त्यानंतर कुंभकर्णाचे निमित्ताने थोडासा बीभत्स-रस व राम-लक्ष्मणांचे नाग-पाशात बद्ध होणे अशा अनेक अद्‌भुत लीलांनी हे लंकाकांड भरलेले असून त्या लीलांचे रहस्य गूढार्थात समग्रपणे उकलून दाखवले आहे. यातच धर्ममय-रथाचे विहंगम दृश्य मन वेधून घेते. त्यावरून भक्त वा साधक कसा परिपूर्ण व परिपक्व हवा त्याचा उत्तम वस्तुपाठ मिळतो. शेवटी रावणाला मारले व सद्‌गती देऊन तारले कसे व का हेही सविस्तर कथन केले आहे. रावण-वधानंतरचे युद्धवीर रामांचे वर्णन, सीतेचे अग्निदिव्य, बिभीषणाचा राज्याभिषेक आणि त्यानंतर सर्व देव, ब्रह्मदेव, इंद्र व महेश किंवा त्रिपुरारि शंभुकृत स्तुती प्रत्येकाचे वैशिष्ट्य व त्यांचे नक्षत्रानुसार आकार-देवता-फलश्रुती इ. साम्य दर्शविणे हे सविस्तर सूक्ष्मदृष्टीने, शोधक नजरेने वाचल्यावरच त्यातला 'गाभा' ध्यानी येतो. लंकाकांडाच्या उपसंहारात भरताच्या तीव्र आठवाने ओलावलेले डोळे व हृदय यांनी विशोभित श्रीरामप्रभूंचे काही आगळे-वेगळेच दर्शन घडते अन्‌ ते अत्यंत गतीशीलतेने पुष्पक-विमानातून अयोध्येकडे प्रयाण करतात. प्रयाग-गंगा-पूजन करून केवटास वरदान देऊन, निषादास प्रेमतृप्त करून सर्वांसह (कपिं-बिभीषणादींसह) श्रीराम अयोध्येप्रत येतात. भक्तीरसाने सुरू झालेले, वीर रसाने न्हालेले पुन्हा प्रेम-भक्तीत आर्द्र बनून हे लंकाकांड-अवंतिका पुरी इथे समाप्त होते.

उत्तरकांड

भरताची परम कातरता, विव्हलता व प्रतीक्षा यांच्या परमावधिस हनुमंत प्रेमबंधाने बांध घालण्यास येतो. अशी अत्यंत भावुक सुरुवात या अंतिम कांडाची होते. त्या पाठोपाठ श्रीराम-सीता-लक्ष्मणांसह पुष्पक विमानातून अगणित नवीन अयोध्या स्नेह्यांची लूट सारी अयोध्या भरभरून लुटते. अन्‌ अत्यंत त्वरेने वसिष्ठांचे मार्गदर्शनाखाली राम-राज्याभिषेकाचा

सुंदर आनंदोत्सव सोहळा पार पडतो. त्याबरोबर वेद, शंभु हे स्तुती करून जातात अन् या अभिषेकाची विशेष फलश्रुती गोस्वामी वाणीबद्ध वा लेखणीबद्ध करतात. सहा महिन्यांनी श्रीराम राजे एकेकाची अत्यंत प्रेमादरपूर्वक पाठवणी करतात. अन् आपले मर्यादा पुरुषोत्तमत्व सिद्ध करतात. अन् रामराज्याचे सुंदर चित्र रेखाटन करायला गोस्वामी अत्यंत प्रेमादरपूर्वक नवीन उत्साहाने सुरुवात करतात.

त्या रामराज्याची बीजे कुठे व किती व कशी खोलवर रुजलेली होती ते गूढार्थाने सांगायला मात्र मुळीच विसरत नाहीत. अन् त्यानंतर खऱ्या अर्थाने उत्तर रामचरित्र सीता-परित्याग, लव-कुश जन्मादी अत्यंत गूढ रूपाने मानसात केवल अंगुली निर्देश करतात. सारे अयोध्यावासी खुष होऊन श्रीरामांची तोंडभर स्तुती गातात इतकेच नव्हे तर सनकादिकही स्तुती गायला अगदी अनावर होतात. त्या बाल ब्रह्मचाऱ्यांचा किंवा बटूंचा प्रभू कसा सत्कार करतात ते अत्यंत अनुकरणीय आहे. त्यानंतर श्रीराम मुखाने संत व असंत गुण-वर्णन भरतादी ऐकण्यास उत्सुक असतात यावरून शिष्याने वा भक्ताने नेहमी सद्गुरुंकडून काय व कसे श्रवण करावे ते गूढार्थात स्पष्ट होते. 'पुरजनगीता' म्हणजे आजच्या आदर्श राष्ट्रपती वा पंतप्रधान संदेशाचा अत्यंत उत्कृष्ट आदर्श नमुना होय ! त्यावरची प्रजाजनांची प्रतिक्रियाही तितकीच लक्षणीय आहे. वसिष्ठांचे सारखे ब्रह्मर्षी देखील भक्तीचा अनुनय किती प्रेमपूर्वक करतात ते त्यांचे व नारद स्तुतीने अगदी सिद्ध होते.

'श्रमहारी प्रभुला श्रम झाले । शीतल आम्रवनीं तैं गेले' यातील सकल लोकांना विश्राम देणाऱ्या श्रीरामाला कोणते श्रम व का झाले ते टीकेतूनच वाचावे ! नारद-स्तुतीनंतर राम-चरित्र विरमते व श्रोता-वक्त्यांचे सुंदर गूज एकमेकाला धन्य व कृतार्थ कसे करते ते पाहण्याजोगे आहे - गूढार्थाद्वारेच ! यानंतर उत्तरकांडाचा पूर्वार्ध संपून उत्तरार्ध सुरू होतो. काकभुशुंडी-चरित्र, त्यांची दिनचर्या या गोष्टी मननीय व अंशरूपाने तरी निदान अनुकरणीय अशाच आहेत. त्यानंतर येणारे कलियुगाचे वर्णन वाचताना जणू तुलसीदासांनी त्या काळी 'आज' फोटोत जणू उतरविला असे वाटते इतके हे वर्णन हुबेहूब आहे. काकभुशुंडीची सगुण भक्तीची तीव्र ओढ व त्यानुसार त्यांनी केलेले अथक प्रयत्न, त्याअंतर्भूत गुरुमहिमा हे सारे सारे साधकास आत्मावलोकन करून साधन प्रेरित करणारे असेच आहे. इतकेच नव्हे तर अनन्य अव्यभिचारिणी-निर्भरा-अनपायिनी अशी भक्ती केली असता राम आणि शिव, वरदानांची - कृपेची कशी बरसात करतात हे दाखवून प्रत्येक मानवाने आपले हृदय सिंहासन अशा अति परम-तरल प्रेमरूप भक्तीने भरून सजवून ठेवावे हेच जणू गोस्वामी व प्रज्ञानानंद अक्षरशः जीव ओतून कळवळून सांगत आहेत असेच दिसते. ठायी ठायी ध्यानासाठी संपूर्ण मानसभर शिव, विष्णू, राम यांच्या अनेकविध मुद्रा भरभरून ठेवल्या आहेत. यातील एक तरी स्वीकारा असे दोन्ही संत अंतःकरणापासून विनवून सांगत आहेत हे स्पष्ट दिसते.

साधकाला आपल्या आवडीनुसार ज्ञान-योग-कर्म-भक्ती स्वीकारण्याचे स्वातंत्र्य आहे हेही सांगून पण सर्वात अत्यंत सुलभ व सुरक्षित मार्ग भक्तीमार्ग हे अनेक उदाहरणांनी इथे सिद्धांत रूपाने सांगितले आहे. तत्पूर्वी सहाही कांडांतून अनेक उदाहरणांनी हे सुस्पष्ट केलेले तर आहेच आहे.

शेवटी भक्तिचिंतामणी व ज्ञानदीप यांची सांगता रूपकांद्वारे तुलना करून ज्ञानोत्तर भक्तीचे सुलभत्व व श्रेष्ठत्व वाचकावर बिंबवले आहे.

शेवटी सप्तप्रश्न व त्यांची उत्तरे, मानस-रोग व त्यांवर रामबाण उपाय यांची सांगोपांग चर्चा करून संपूर्ण मानसाच्या उपसंहाराकडे लेखक वळतो. अन् पुन्हा राम-भक्ती, राम-नाम, राम-कथा, राम-यशगान, राम-लीला इत्यादींनी कशी फुलते-बहरते-फळते हे सांगून भक्तीच्या साधनानेच भक्तीरूपी साध्य कसे साधायचे व अमृत-स्पर्शित व्हायचे हे सांगून हा अत्यंत सुंदर सद्ग्रंथ श्रीरामचरितमानस-गूढार्थ-चंद्रिका इथे विरमतो. शेवटी रामभक्तच कसा धन्य वा कृतार्थ आहे हे श्रवणादी कोणत्याही एका भक्तीनेच सिद्ध होते हे 'अमृत-बीज' सांगितले आहे.

या संपूर्ण गूढार्थ चंद्रिकेचे हे धावते रेखाटन आहे. कारण हा ग्रंथ ७५०० (हिंदी) वा ६५०० (मराठी) पृष्ठांचा - इतक्या सारांश रूपाने त्याचा आढावा घेताना कित्येक विषय यातून सुटण्याची शक्यता नाकारता येतच नाही.

तेव्हा श्रीरामप्रेमी वाचकहो आपणा सर्वांना हात जोडून, नतमस्तक होऊन, नाक घासूनही माझी इतकीच नम्र व प्रांजळ विनंती वा प्रार्थना - कृपया आपण प्रत्येकाने ही गूढार्थ चंद्रिका निदान एकदा तरी वाचावीच वाचावी. कारण जो वाचेल तो याच्या प्रेमात पडेलच हे अगदी निःसंशय !

श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ।

श्री गुरुः शरणम् ।

प्रज्ञाशिष्या रामदासी

"भव बाधा"

गुरुराया येवढी पुरवी आस
दूर करी बाधा जडली खास ॥
विषयांचा ज्वर वाढला फार
रामनाम काढा त्याला उतार ॥
लोभ, मोह, हीव वाजते जिवा
कृपेचा कांबळा पांघरी देवा ॥
कामनेची भूक सतावी सदा
आत्मसुख रस पाजी एकदा ॥
अहंकार तृष्णा शोषवी पहा
शरण्यता जल शांतवी अहा ॥
क्रोधाची उबळ येते सारखी
विवेकाचा काय घावा हो मुखी ॥
मदमत्सराची ठणक भाळी
वैराग्याची सुंठ लावू कपाळी ॥
हाव मळमळ थांबेना जरा
समाधान गोळी उपाय खरा ॥
दंभाभिमानाची आग लोचना
शांतिलेप एक उपाय जाणा ॥
भवरोगाने हा जीव बेजार
गुरुकृपेवीण नाही उतार ॥

सौ. प्रभा टेंभेकर

अभिनव रामायण व स्फुट काव्यसंग्रह

श्री. माधव पर्वते

एम.ए. (हिंदी) बी.एड., राष्ट्रभाषा रत्न (हिंदी) मराठी साहित्य विशारद (प.सा.प.पुणे) [illegible]
[illegible]

कै. ना. भा. जोशी, मुख्याध्यापक, कुंडल हायस्कूल यांनी १९५३ साली प्रथम प्रसिद्ध केलेल्या व नव्याने अलीकडेच पुनर्मुद्रित झालेल्या या छोट्याशा ग्रंथाबाबत असे म्हणता येईल की, श्री स्वामींचे अनेक आवडते विषय त्यात संग्रहित झालेले आहेत. जणू 'गागरमें सागर' भरून ठेवला आहे. किंबहुना त्यामुळेच मिरजेच्या प्रज्ञा शिष्या रामदासी यांना तो ग्रंथ नव्याने छापावा अशी निकड वाटली. कित्येक वर्षे परांडा मठात त्यातील काही उपासना-पदे म्हणतात.

श्री स्वामींना आपले विचार सहजपणे पद्यातून प्रकट करता येत असत. बालपणी कीर्तने ऐकली, मेळे पाहिले, त्यातून अनेक चाली काना-मनात ठसल्या व पुढे काही साहित्याच्या मार्मिक अभ्यासामुळे त्यांना आवडल्या असे दिसते.

'अभिनव रामायण' नाव दिलेला, पुस्तकाच्या उत्तरार्धातील पद्यखंड म्हणजे 'नर्कुटक' वृत्तात रचलेली दोन कांडे - किंष्किंधा व सुंदर. जसे श्रीरामदासांनी सुंदर व युद्ध दोनच कांडे हौसेने श्लोकबद्ध केली तसेच येथे श्रीमद्‌भागवतातील 'वेदस्तुति' हे प्रकरण वाचून मन रमल्यामुळे तीच चाल मराठीत यावी, असे मनाने ठरवून स्वामी प्रथम ओव्या लिहू लागले. त्यांच्या गुरुने त्यांची ही 'आळी' ही पुरवली ! 'वृत्त नर्कुटक कर्णमधुर । परी वाटे अति दुष्कर । वृत्ति उठली शक्यतर । लिहावे काही ॥' - 'न जभज जलगगण । पादीं अक्षरें सतरा जाण ॥' (यति ७ व १० अक्षरांवर, ओळी ४) म्हणजेच नमन जनास भारत जनास जनास लागा - अशी एक ओळ होते) प्रस्तावना १२ ओव्या. २ कांडे - रचना कशी? पहिल्या ५ श्लोकांत श्रीरामगुणवर्णन पुढे श्लोक ११ अखेर रामायण प्रसंग निर्देश (बालकांड ते अरण्यकांड) मग ६२ श्लोकांपर्यंत किष्किंधाकांडवर्णन (प्रसंगांना आधार तुलसी रामायण) केले. त्यातच ७३ व्या श्लोकात हे का घडले याचा खुलासा - गुरुकृपा = 'कधि नच वृत्त नर्कुटक काव्य मराठि बघे । परिगुरुची कृपा करि सुदुष्कर हे अवघे ॥' - पुढील दोन श्लोकांत त्यांचा निश्चय त्यांनी प्रकट केला आहे. ती त्यांना पुनरुक्ति वाटत नाही. राम व हरी एकच — १. हरिगुण गानाने चंचल मनाला रंजवावे. २. गृहधनकामिनी बाबत आसक्ती नको. ३) रामनामाची गोडी रात्रंदिन जिभेला लागू दे. ४) हरिपद चिंतनात अखंड त्या मन पाखराला रमू दे. ५) सद्‌गुरुंनी दिलेला हा बोध पळभरही विसरू नये. ६) या जगातील असंख्य भेद मनात राहूच देऊ नको. आपल्या हृदयात त्या गुरुंचे स्मरण निश्चयाने राहू दे मग सदैव शांति-सुखच, हे प्रज्ञाना तुझ्याकडे येईल.'

नंतर सुंदर कांडाबाबत ते म्हणतात - (ओवी) 'पुढे लोटता बहुत दिन । प्रारंभिले सुंदर कांड लेखन ।' २१५ श्लोकात ते केले मुख्यतः 'रघुवर मारुती सुयश' हा विषय - मात्र २१६ ते १८-३ श्लोक हिंदी छंदवृत्तांत लिहिले. त्यातील एक ओळ अशी —

'नरकूटकवृत्तहि सुंदर सुंदरि सर्वच सुंदर काव्य नसे?''

उपसंहार व समर्पणादाखल केलेल्या अंतिम दोन श्लोकांत आपल्याला ते म्हणतात — हे मना, चंचल मर्कटा, अरे नामसुधेला चाटून तर पाहा, मग तू विषयरूपी विषवृक्षफळे या पृथ्वीवर धुंडणार नाहीस, अरे नामामृत प्राशन कर, राम कल्पतरू आहेत. तिथे जा - त्यांच्या भक्तीमुळे, मोह लोभरूपी तृष्णाच उरणार नाही. या घोर भवसागरात नाम, जप, योग, तप हेही जमत नाहीत म्हणून रघुनायकाच्या रम्य कथामृत-सागरात स्नान करावे एवढेच एक सोपे साधन आहे. त्याचे गुणगान - कथा श्रवण ! त्यामुळेही भवसागर तरून जाता येईल, मात्र त्या गुणगानात अगाध प्रेम हवे. तेही त्या रामचरणीच मागायला हवे. यावरून त्या दोन पद्यखंडांची सामान्य कल्पना येईल. एवढे तरी का लिहिले तर याबाबत असे माहितपूर्ण कुठे लिहिले गेलेले नाही. त्यामुळे पुस्तकाचा निम्मा भाग दुर्लक्षिला जातो ! सुभाषितवजा पंक्ती असंख्य, काही तुलसी रामायणावर आधारलेल्या, काही स्वामींच्या अनुभवाच्या (व्यावहारिक).

उदा. :

१) जगिं कृतघ्नते सम नसे अघ हो दुसरे
क्षण नच वैद्यराज अठवे जइं रोग सरे ॥ (मराठी म्हणीचा प्रभाव)
२) नर परमार्थ पंथि निघता चि सवेग अती
प्रथम सुद्दव विलंबिति, सुबुद्धि ममत्व गती ॥ (स्वजनांचा नित्य नेमाला अडथळा) (स्वामी चरित्र पाहा).
३) जगतिं मुख-प्रसन्न अति सात्विक ही बघता ।
रघुवर भक्ति वास सहजें कळतो पुरता ॥ (अनेकांचा अनुभव)

या नर्कुटक रामायणाची भाषा कुठे संस्कृत शब्दावलीने भरलेली तर कुठे अगदी सोपी, संतवाणीसारखी, सहज संवादात्मक, कुठे नाट्यमय, कुठे कल्पनारम्य-वृत्त सवयीनेच मधुर वाटणार, त्यामुळे हे रामायण अभिनव आहे, छोटेसे आहे तरी लोकप्रिय झाले नाही. शिवाय प्रचार / प्रसार नाही. त्यामुळे ५३ साली स्वामी असताना प्रथमावृत्ती व अलीकडे ४-५ वर्षापूर्वी नव्याने प्रकाशनशिवाय मोठ्या तुलसी रामायणाऐवजी हे सुद्धा भाविकांना तोच पठनलाभ करून देईल असे श्रीस्वामींनी यात स्पष्ट आश्वासन न दिल्यामुळे उपेक्षित राहिले - साहित्यातील लेखन प्रयोग असे म्हणावे काय?

स्वामींनी खास केलेली ब्रह्मानंदोपासनो

हा या ग्रंथातील दुसरा महत्त्वाचा भाग समजावा. एक साक्षात्कारी महापुरुष (सन १८६० ते १९०८) भिलवडी, कुंडल, दुधोंडी येथे किर्लोस्करवाडी (सांगली) जवळच्या परिसरात होऊन गेले. त्यांचे बाबत स्थानिक भक्तांसाठी केलेली पद्यमय उपासना या ग्रंथात संपादकांनी घेतली. (त्यांचे विषयी सुरुवातीच्या १ ल्या आवृत्तीत गद्य माहितीही दिली होती) ती काव्यरचनात्मक उपासना श्रीस्वामींनी अतिशय तन्मयतेने लिहून दिली. त्या भागात फिरल्यावर ते आबाल वृद्धांना कसे दत्तावतार वाटत ते ऐकले. त्यांच्या तपस्थळी कुंडलचे एरण्णा डोंगरावर बसून स्वामींनी देशाच्या आपत्ती निवारणार्थ १ कोटी प्रणवानुष्ठान केले. त्यांना प्रत्यक्ष ध्यानात दर्शन झाल्यावर अभेद भक्तीने जी उपासना केली ती यात समाविष्ट

आहे. (पान ५० ते ५४ व पान १७) त्याच ४-५ पानांची एक स्वतंत्र पुस्तिका त्या काळात निघाली होती असे अनेक स्थानिकभक्त सांगतात. (अलीकडे कै. डॉ. रा. वा. चिटणीस (डोंबिवली) यांनी आपल्या 'ब्रह्मानंद जीवनगाथा' चरित्रात ही सारी माहिती स्वामींच्या उल्लेखासह प्रसिद्ध केली होती.) आज त्यातील काकडारती व सायंकालीन आरती परांड्यात स्वामींचे अनुयायी म्हणतात. त्याचे कारण लोकांना वाटते स्वामी व ते ब्रह्मानंद एकरूपच. 'प्रज्ञानं ब्रह्म' तसे दोघेही 'करुणालय', व जनसामान्यांसाठी जीवन वेचणारे विरागी संत. त्यांचेबद्दल ही भावना स्वामींनी भूपाळी, काकडारती, पंचपदी अभंग, शेजारती, विडा, भजन, धावा इ. चालीत मांडली आहे. त्यातील आर्तता खरोखरच स्वामीभक्तांनी वारंवार म्हणून (दैनिक उपासनेत) अनुभवावी अशीच आहे. ब्रह्मानंदष्टक रचले आहे ते 'बहु असोत सुंदर' या महाराष्ट्र गीताच्या धवलचंद्रिका या जातिवृत्तात किंवा 'मित्रा मम जन्मकथा' या नाट्यगीताच्या चालीत, त्या मधील शेवटच्या ओळींतून स्वामींचे उद्दिष्ट व हृद्गत समजते.

प्रज्ञातनु राष्ट्रकार्यि नित्य वाहवो ।
शांतीच्या साम्राज्या, विश्वि पसरवो ॥

हे मीच म्हणतो असे नव्हे. स्वामींच्यावर प्रबंध लिहिणाऱ्या डॉ. सौ. केळकर यांनीही या ओळींचा सादर उल्लेख केला आहे. या ग्रंथातील स्फुट वाङ्मयाचा छोटासा संस्कृत व मराठी स्तोत्रे / अष्टके हा भाग उपासकांना महत्त्वाचा वाटतो कारण त्यांची नादमय (प्रमाणिका वृत्तातील) संचलन गीतासारखी चाल व शब्दरचना, श्रीगणपति, सूर्य, शंकर, हनुमान यांचे वरील संस्कृत स्तोत्रेही वरील चालीमुळे तसेच फलश्रुति-व्यावहारिक लाभाची स्पष्ट सांगितल्यामुळे लोकांना आवडतात तर रामजयकार स्तोत्र, भवानी अष्टक, मल्लारी स्तोत्र त्यातील वर्णनाला दिलेल्या कटावाच्या चालीमुळे (पादाकुलक-चौपाई एकच) तुलसी मानसातील गोडी व प्रभाव दाखविते आणि प्रत्येक वेळी 'माझी रामभक्ती वाढो' हे त्या देवतेजवळ केलेले मागणे वाचून अनन्य भावनाही समजते. सर्वसाधारण सारस्तोत्र (भोजनविधी) तर मराठीतील स्मरणीय रचना 'मालिनी' वृत्तामध्ये स्वामींनी आदर्श आचारधर्म सांगितला आहे.

'सद्‌गुरु माहात्म्य व भेट' हे प्रकरण आहे छोटेसेच पण स्वामींचे स्वभाव दर्शक बनले आहे. मुळात ते बाडात स्वतंत्र आहे तसेच गीताकीर्तनतरंगिणी च्या १९ व्या श्लोकावरील विवरणात त्यातील बराच भाग आल्यामुळे नमुना म्हणून संपादकांनी या स्फुट भागात ते घेतले असावे. त्यांचे छंदोरचना कौशल्य सहज प्रगट होते. कितीतरी श्लोकांच्या चाली एका प्रकरणात - शार्दूल विक्रीडित, स्रग्धरा अश्वधाटी, पंचचामर, शिखरिणी, भुजंगप्रयात, उपजाति इ. चालींनी विषय रंगविला आहे. गुरुभेटीची तळमळ, गुरु कसा असावा व कसा नसावा, केव्हा भेटतो? मग फलित काय? त्याची आवश्यकता किती इ. अनेक गोष्टी 'तीव्र सक्रिय जिज्ञासेनेच व रामकृपेने सद्‌गुरु भेट होते' हा स्वामींचा अनुभव यातही आहे व सद्‌गुरु कल्पतरु, चिंतामणि, कामधेनू, सूर्य, चक्रवर्ति राजा यांचेहूनही कसा श्रेष्ठ ते मांडले आहे. शेवटी प्रसिद्ध आर्या वृत्ताच्या निर्धारात्मक स्वरात 'वदवेना, वदवेना, सद्‌गुरु महिमा अणूहि वदवे ना' असे नकारात्मक वर्णन केले किंवा 'सद्‌गुरु सद्‌गुरु ऐसा' असा आपला अनुभव 'अनन्वय' अलंकारातून प्रगट केला आहे. हे ४ पानी प्रकरणही संतवाङ्मयाला साजेसे किंवा पूरकच आहे. संमिश्र वृत्त योजनेमुळे त्यात पंत-पंडितांच्या साहित्याची माधुरी एकवटली आहे.

स्वामींची स्फुट पदे (स्वतंत्रपणे) एकूण कमीच, या संग्रहात एक गुरुवर्णनपर संगीत चाल/ताल देऊन छापले आहे. दुसरे बालरूप रामचंद्र पूर्ण उगवला' पद (चाल - भजभजभवजलधिमाजी) काहींना वाटले की, स्वामींना त्या स्वरूपात 'रामदर्शन' एकदा तरी झाले असावे. (बाकी चरित्रात सगुणदर्शनाचे वेगळे उल्लेख आहेतच.)

स्फुट अभंग स्वामींचे बरेचसे अलीकडे 'प्रज्ञानांजलि भाग २' या पुस्तिकेमधे एकत्र केलेले आहेत. त्याशिवाय हे पूर्वीचे इथे आढळतात. शीर्षक आहे १. वर्णन, २. भाव, ३. शरणागती, ४. दोघे बंधू (आख्यानकाव्य) यापैकी वर्णन म्हणजे गणपतीवर एक अभंग, सद्‌गुरुंवर एक व रामरायावर चार अभंग. त्यातील काही व्याख्या नित्यस्मरणीय आहेत. वेगळ्या आहेत. उदा. :

१. गण इंद्रियांचा पती । तोचि नमूं गणपती ।
२. नमूं माया जी शारदा । होते बंध मोक्षप्रदा ।
३. गुरु चैतन्याचा गाभा । पावविती आत्मलाभा
४. भक्त तोचि झाला । विभक्त जो नव्हे. (रामदासी विचार पचवलेला).

भाव विषयक ५ अभंग आहेत. बाकी इतर संतांप्रमाणे समान वाटतात. 'भाव तसा देव' म्हणणारे फक्त एक इषारेवजा रामकृपा करी । गृहधन त्याचे हरी । ध्यानात ठेवा, कधी असेही घडेल बरे ! तरीसुद्धा भाव चोख राहिला तर खरी निष्ठा हा इत्यर्थ. शरणागति किंवा प्रपत्ती या मार्गाचा जोरदार पुरस्कार त्यावर १३ अभंग आहेत. अनन्य भावातूनच ही प्रगटते. गीतेत तरी कृष्णाने काय सांगितले? 'मामेव शरणं व्रज ।' मुख्यतः शरणागत कोण त्याची ६ लक्षणे आहेत. मार्मिक विवेचन आहे. हेच अधिक स्पष्ट व्हावे म्हणून दोघे बंधू - हे आख्यानात्मक १० अभंग - संक्षेप असा - दोघे भाऊ होते. थोरला ज्ञानी अहंभावाने भवसागरात गोंधळला. दुसरा लहान - रामाईवर विसंबला. तिचेमुळे तरला - 'गुरु राम दोन्ही एक रूप जाणा । भेदाची भावना तेथे सोडा ।' हा निर्णयात्मक आदेश स्वामी देतात. मधेच म्हणतात, गुरु म्हणजे सुकाणूप्रमाणे मार्गदर्शक पण तो भेटतो - 'रामकृपे भेटी, रामरूप गुरू । तेव्हा हा संसारु मिथ्या होय ।''

अभंग विवरणानंतर ३ भूपाळ्यांबाबत जरा स्वतंत्रपणे विचार करू या – एक पहिली आहे ब्रह्मानंद स्वामी उपासनेतील. त्यांचेसाठी प्रातःकाळी कसे सादर विनीत भावे जावे हे सांगणारी, दुसरीमध्ये त्यांचे नाव आहे पण स्वातंत्र्योत्तर देश कसा आहे हे त्यांना सांगणारी (स्वतंत्र चौकट पाहा) व तिसरी वेदांतपर भूपाळी 'ही रोज पहाटे म्हणत जावी' असा शिष्यांना स्वामींचा प्रेमळ आग्रह आहे. अर्थात नित्य त्याला ब्रह्मभावाचे स्मरण व्हावे. त्याची देहबुद्धि कमी व्हावी ही त्यांची इच्छा. (अशीच ५ कडव्यांची भूपाळी प्रसिद्ध भक्तिमार्ग प्रदीपमधे शिवराम स्वामींची आहे.) सोहंस्मरण व्हावे हा हेतू. जसे तुकाराम म्हणतात, 'राम म्हणता रामाचि होसी । भाक घेई मजपासी ।' स्वामींनी आपल्यासाठी तेच केले आहे. सुरुवातच आहे - 'ऊठ जाग बा जीवा वेगे निजहित साधी तूं काही । - भाग्यें नरतनु लाभ जाहला. पुनरपि मिळणे ही नाही ॥'

आरत्या : यांचेबाबत प्रबंधामध्ये सौ. केळकर बाईंनी उत्तम विवेचन केले आहे. मला वैशिष्ट्य वाटते की स्वामी आरत्या नेहमीच्या जयदेव जयदेव या चालीत लिहीत नाहीत. ती आरती 'भुवनसुंदराची' अशा त्या वेळच्या लोकप्रिय चालीत असेल. रामचरित वर्णन त्यात येईल किंवा

तुळजा अंबिकेच्या आरतीत तिच्या तिन्ही स्वरूपांचे वर्णन येईल. (ते तिला कुंडलिनी योगशक्तिही म्हणतील.) समास-बहुल शब्दरचना नादमयेकरिता करतील. शेवटी त्यांचे मागणे एकच - रामचरणिं रति वाढो. मग आरती दत्ताची असो की श्री हनुमानाची असो - चाली मात्र जातिवृत्तांच्या, एकूण सर्व आरत्या भावमय कविता. घोळून घोळून ओळी म्हणता येतील अशी ही सोय. हिंदी स्वरतालांचा प्रभावहि मनावर असावा. त्यामुळे पहिल्या ओळीत जय जय आरती हे शब्द थाटात येतात. श्रीसद्गुरुंची आरती तर 'बाळा जो जो रे' या पाळण्याच्या प्रसिद्ध चालीत संथपणे नित्य मठात म्हणतात. आर्त भावना परिपोषक गंभीर विषयाला ती चाल योग्यच आहे. महाकवी तुलसीकृत हनुमानचालिसा हे समवृत्त अनुवाद काव्य स्वामींचे फारच प्रभावी व सरस उतरले आहे असे संपादकांना वाटल्यावरून नित्य पाठासाठी या पुस्तकात घातले आहे. मुळातील आशय (चालीसह) कायम राहिल्यामुळे आज त्याचेच 'हनुमानचालिसा यज्ञ' करताना तेच स्वामीभक्त वापरतात. हिंदी भाषीकांनाही ते काव्य वेगळे वाटत नाही. व्यावहारिक लाभासाठी याचे सकाम अनुष्ठानही फलप्रद आहे म्हणतात.

एक 'कृष्णनामावली' (२१२ नावांची) या पुस्तकात घातली आहे. कृष्णचरित्रातील प्रसंगांची आठवण व्हावी हा त्यामागे स्वामींचा निश्चित हेतू आहे. उत्तर भारतात त्यांनी ही रीत मंदिरा-मंदिरातून अनुभवली असावी. चाल कटाव - ताल केरवा - ठेका दिल्यामुळे ती नावे नुसती वाचायची नाहीत तर सामुदायिक नामघोष व्हावा ही कल्पना आहे. (आज नमःशिवाय किंवा गायत्री मंत्र इ. ध्वनिफिती स्वरांच्या मधुरतेमुळे व संथ लयीतील समान ठेक्यांमुळे श्रोत्यांचे मन वेधून घेतातच). स्वामी रामभक्त पण भागवताच्या सूक्ष्म अभ्यासाला संस्कृत सामासिक शब्दांचे सहाय्याने दिलेला हा सूत्रमय साज आहे. केवळ नामनिर्देश पण प्रसंग आठवतो. (अशीच त्यांनी गुरुनामावलीही रचली होती. सध्या स्वतंत्रपणे ती 'हनुमानचालीसा व इतर स्तोत्रे' यात छापून आलेली दिसते.)

पंचीकरण स्मृति चंद्रिका ही कविता विषय तात्त्विक पण चाल जातिवृत्तातील भूपाळीसारखी म्हणून कुणालाही वाचता येते. 'चित्त आत्मरुपी स्थिर करावे' ही सूचना समजते. 'प्रपंची पाहिजे सुवर्ण । परमार्थी पंचीकरण (रामदास) हे दासबोधात ऐकल्यावर गरजेपोटी कुणाही जिज्ञासूला ही गेय रचना अभ्यासयोग्य वाटेल, सवयीने आवडेलही.

वेदांतपर झोपाळ्यावरील ओव्या याही अशाच तात्त्विक स्वरूपाच्या पण लोकप्रिय चालीच्या धाटणीने लक्ष वेधून घेतात. पहिली माझी ओवी असे करीत विसावी माझी ओवीपर्यंत स्वामी लिहीत गेले. कधी ३, ४, ५, ६ या आकड्यावर संकेतानुसार अधिक ओव्याही आहेत. त्यावरून त्यांची बहुश्रुतताही जाणवते. मात्र वाचकाला वेदांत परिभाषा माहीत हवी नाही तर मर्म किंवा सूत्रमयता कळणे कठीण जाते. पण तेरावी माझी ओवी तेराचि अक्षरे । अखंड जो स्मरे । मुक्त होय' ही रामनामावर केलेली ओवी सहज व सोपी वाटते. शिवाय स्वामी वेदांत सांगताना नेहमीच तो कसा समोरच्या श्रोत्याला अनुसरणीय होईल हेही पाहतात ते समजते. त्यांना पांडित्य मिरवायचे नाही. जणू तुकारामांचे प्रमाणे वाटते आहे. मनात बुडत हे जन... येतो कळवळा म्हणूनिया ।

शेवटी ३४ ते ४३ ओळी अभंगरूप आहेत. त्यात महत्त्वाचा एक विचार आहे, 'संकल्पाचा नाश जेधवा जहाला । तेधवांचि झाला अंतकाळ । हा विचारांच्या पलीकडला टप्पा स्वामींची चिंतनशीलता दाखवितो, अंतरंग-

शिष्य व ॲडव्होकेट यांमुळे कै. ना. भा. जोशी अशी निवड या संग्रहात करू शकले.

अशा प्रकारे या ग्रंथातील किंवा पुस्तकातील नानाविध विषय जरी संक्षेपाने वाचले तरी वाटते आदरणीय संपादकांनी संग्रहातील वेच्यांची निवड प्रातिनिधिक स्वरूपात चांगली केली आहे. (जशी अर्वाचीन संत गाथेमध्ये प्रा. डॉ. ज. वा. जोशी यांनी त्यांच्या सुमारे ४० स्फुट रचना घेऊन केली आहे.) श्रीस्वामी समजण्याला त्यांचा खचित उपयोग होईल. आता वाचकांचे काम एवढेच उरते – (अर्थात् स्वानंद सुखासाठी)

'संत गुरु वाक्यीं विश्वास धरावा ।
चिंतेचा करावा समूळ नाश ॥ (प्रज्ञानानंद सरस्वती)

श्री. माधव दत्तात्रय पर्वते
५ बी, शिवसाई कॉम्प्लेक्स, आनंद नगर, सिंहगड रस्ता, पुणे ४११०५१.

रघुवर सुहृदाला नित्य चित्ती धरावे ।
स्थिर चर जग त्याचे रूप हे आठवावे ॥

'स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींचे प्रेरक स्मरण'

डॉ. अशोक कामत

एम.ए. (मराठी), एम.ए. (हिंदी), पीएच.डी. (मराठी), पीएच.डी. (हिंदी) १९८५ पासून प्रमुख संत नामदेव अध्यासन, संत अध्ययन व संशोधन केंद्र पुणे विद्यापीठ. मराठी संत साहित्याचे अध्यापन, अभ्यासन, प्रबंध, लेखन, संशोधन व शोधकार्यासाठी मार्गदर्शन. सामाजिकप्रबोध व व्याख्यान. एम.फिल, पीएच.डी. पदवीसाठी १० शोध प्रबंध पूर्ण. ७५ संशोधन ग्रंथ संत साहित्याच्या अभ्यासकांकडून [illegible] विविध पुरस्कार प्राप्त.

आरंभिक

परण्ड्यात समाधिस्थ असणारे आधुनिक काळातील सत्पुरुष स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती ह्यांचे जीवन हा एक अद्‌भुत ज्ञानयज्ञ होता. त्यांनी कालोचित दृष्टी ठेवून आध्यात्मिक सरणीने काही लोककार्यही केले. त्यांनी केलेल्या रामचरितमानसानुवादामुळे आणि 'गूढार्थ दीपिका' नामक विराट मानस टीका ग्रंथामुळे ते 'महाराष्ट्राचे तुलसीदास' ठरले.

आधुनिक महाराष्ट्रीय संत-सत्पुरुषांच्या मांदियाळीत त्यांचे एकूण कार्यकर्तृत्व महत्त्वाचे आहे. आजच्या काळातील काही समस्यांची सोडवणूक करण्यासाठी प्रेरकही आहे. त्याचे संक्षेपाने पण साक्षेपाने प्रस्तुत लेखात सूचन दिसेल.

संतपरम्परा

संतपरम्परा हे भारतीय संस्कृतीचे एक ठळक वैशिष्ट्य होय. वेदोपनिषदकालीन दार्शनिक ऋषिमुनींनंतर आचार्य पण्डितांची टीका-भाष्यकारीची एक मोठी सशक्त परम्परा आपल्याकडे दिसते. त्यानंतर आधुनिक भारतीय भाषांच्या आरंभकाळापासून नरनारायण संत-भक्तांची एक मोठी थोरली मांदियाळी आपल्याकडे झाली.

महात्मा बसेवश्वर, चक्रधरस्वामी, संत ज्ञानदेवादी भावंडे, संत नामदेव, संत एकनाथ, भक्त पुरंदरदास, संत तुकाराम, समर्थ रामदास अशी कर्नाटक-महाराष्ट्रातील संत मंडळी आणि संत कबीर, गुरु नानकदेव, सूरदास, तुलसीदास, मीराबाई, नरसी मेहता, वेमना, अखा, शंकरदेव अशा अन्य प्रांतीय संतभक्त व्यक्ती, विशेष प्रसिद्ध आहेत.

या संतभक्तमालिकेत गणना करण्यासारखे अनेक महात्मे साध्वी अलीकडील काळातही झाल्यामुळे आपली संत परम्परा अखण्ड टिकली आहे, असे म्हणता येईल. श्रीरामकृष्ण, स्वामी विवेकानंद, अक्कलकोट स्वामीमहाराज साईबाबा, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, गुलाबराव महाराज, गुळवणी महाराज, स्वामी स्वरूपानंद, हंसराजस्वामी अशी काही नावे आधुनिक सत्पुरुषांमध्ये विशेष प्रसिद्ध आहेत. यापैकी प्रत्येकाची काही वैशिष्ट्ये सांगता येतील. प्रस्तुत लेखात या नवसंतमांदियाळीतील स्वामी प्रज्ञानानंदांचे वेगळेपण सांगावयाचे आहे.

काळाचे आव्हान आणि आवाहन

प्रज्ञानानंदांचा जीवनकाळ इ. स. १८९३ ते १९६८, त्यांचे मूळ नाव दत्तात्रेय नारायण कर्वे. प्रथम त्यांनी चांगले शिक्षण घेतले. बी.ए.एस्.टी.सी. होऊन शिक्षक पेशा स्वीकारला. माहिम, बदलापूर, मुरुड, बडोदा, मुरबाड, वसई, डहाणू, चिंचणी, तारापूर अशा विविध गावी ते राहिले. तीक्ष्ण बुद्धिमत्ता, चिकित्सक वृत्ती, त्यांच्यात होती. याचबरोबर पारमार्थिक ग्रंथांचे वाचन करून मननचिंतन करण्याचा त्यांना नाद होता. त्यांनी प्रपंच मांडला. पण त्यात तें गुरफटले नाहीत. प्रपंच परमार्थमय कसा करता येईल, याचा विचार करीत राहिले.

१९३१ साली त्यांच्या जीवनात एक अद्‌भुत घटना घडून आली. बाबा गंगादास नामक साधूशी त्यांची अकल्पित भेट झाली. सात-आठ वर्षांचा सत्संगही लाभला. 'तुझ्या मुखाने तुलसीदास बोलतील' असे गंगादासांनी भविष्य व्यक्त केले. ते पुढे अक्षरशः खरे ठरले आणि द. ना. कर्वे मास्तर स्वामी प्रज्ञानानंद झाले. त्यांचा जीवनप्रवासच बदलला. या प्रवासाचे वा जीवनचरित्राचे तपशील अन्यत्र लिहिण्यात आले आहेत.

स्वामींचा सुमारे तीस वर्षांचा कार्यकाळ स्वातंत्र्या पूर्वकालीन, तर वीस वर्षांचा काल स्वातंत्र्योत्तर आहे. इंग्रजी राजवटीत पाश्चात्य प्रभावामुळे समाज आपली जीवनमूल्ये हरवून बसत होता. भारतीयता टिकवणे हे स्वराज्य प्राप्ती इतकेच महत्त्वाचे होते. पुढे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही अशी प्रकारची आवश्यकता अधिकच वाढली. एकतर स्वामी ज्या भागात अखेरीस येऊन राहिले, तेथे एका होऊ घातलेल्या पाकिस्तानाचे वातावरण होते. रझाकार अतिरेकी जोरात होते. निझामी राजवट भारतात राहण्यास प्रतिकूल होती. देशात पोटातच हा एक देश झाला असता. जसा दोन काखात दोन देश झालेच होते. आहेतही. स्वामींनी मर्यादा पुरुषोत्तम प्रभु रामचंद्रांची आदर्श कथा परोपरीनं सांगून आणि हिंदुत्वाचा, पर्यायाने भारतीयत्वाचा काव्यमय उद्‌घोष करीत राहून जनजागरण केले. त्यांचे काव्य शब्दालंकारांनी सजलेले नसेल; पण ओज, आवेश, अस्मितायुक्त जोश यांनी खचितच भारलेले आहे. त्या काळातील परिस्थितीतून उद्‌भवलेले एकूण आव्हान आणि स्वकीय नेत्यांची एकूण अवस्था नीट ध्यानी घेतली आणि अभ्यास केला तर स्वामींच्यातील समर्थ लोहपुरुष जाणवतो. त्यांचे त्या वेळच्या निझामी मराठवाड्यातील कार्य देशनिष्ठ पोलादपुरुष वल्लभभाई पटेलांनी घेतलेल्या कर्तव्यकठोर निर्णयांना निश्चितच प्रेरक आणि पूरक ठरले आहे.

आजचा भारतीय मराठवाडा स्वामींचा कायमचा ऋणी आहे. याची जाणीव साऱ्यांनीच ठेवायला हवी.

प्रसंग आणि झेप

स्वामींनी पुरेसे पाश्चात्य शिक्षण घेऊन तत्कालीन शिक्षण व्यवस्थेमध्ये भरपूर अनुभव घेऊन बारकाईने जनावलोकन केलेले होते. इ. स. १९१६ ते १९३६ असा जवळपास वीस वर्षांचा त्यांचा काळ हा सत्त्वशील प्रापंचिक आणि कर्तव्यनिष्ठ शिक्षकाचा आहे. पुढे त्यांनी जसा नोकरीचा निरोप घेतला तसाच जाणीवपूर्वक ते प्रपंचातून विरक्त झाले. हे करताना त्यांनी एकदम काही केले नाही. सारे ठरवून, सांगून, सवरून, संघर्ष न करता केले. खेडला जाऊन गायत्री पुरश्चरण साधना केली. वासुदेवानंद सरस्वती

यांचेकडून दण्डग्रहण केले. मग चासकमान सारख्या ठार खेड्यात लोकेषणेपासून अलिप्त राहून मानस-साधना केली. समसंख्य, समचंद्द अनुवाद-कार्य करून ते महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने तुलसीदास झाले. त्यांनी केवळ तुलसीरामायण मराठीत आणले असे नव्हे तर तुलसीदासांच्या प्रत्येक शब्दाचा त्यांनी चिकित्सक मागोवा घेत एक विशाल टीका-सागर सिद्ध केला.

तुलसीदास हे उत्तरभारतीयांचे पंचप्राण आहेत. त्यांनी अवधीत एक रामायण लिहून जनता-जनार्दनासमोर रामकथा अधिक सुलभ स्वरूपात तर ठेवलीच पण त्याहून मोठी सामान्य जनशक्ती त्यांनी सात्त्विक सामर्थ्याने संघटित केली. रामायणातील जीवनचरित्रांचे सज्जनत्त्व आणि नैतिक सामर्थ्य त्यांनी सर्वमुखी केले. भक्ती ही सामाजिक जागरण आणि क्रियाशीलता यांना कशी आणि किती प्रभावीपणे पूरक ठरते, हे दाखवून दिले. पाश्चात्य भाषाशास्त्री अभ्यासक सर जॉर्ज ग्रियर्सन याने म्हटल्याप्रमाणे गोस्वामी तुलसीदासांच्या काव्य-कार्यामुळे उत्तरेतील हिंदू धर्मक्षेत्रे शिल्लक राहिली. पर्यायाने तिथली भारतीय संस्कृती टिकली. स्वामींनी ध्येयनिष्ठ राहून तुलसी-कार्य एका वेगळ्या पातळीवर मराठवाड्यात केले. त्यांच्या उदण्ड हिंदी-मराठी लेखन कार्यामुळे त्यांचे हे कार्य केवळ त्या प्रदेशापुरते न राहता महाराष्ट्रात आणि अन्यत्रही पोहोचले. या कामी त्यांच्या काही निवडक पण निरंतर क्रियाशील राहिलेल्या शिष्य समाजाचा उत्साह आणि गुरुभक्ती अभिनंदनीय आहे.

स्वामींनी आपली अंतिम आठ-नऊ वर्षे परंड्यात व्यतीत केली. इथे समर्थशिष्य कल्याण स्वामींचा मठ आहे. नाथपंथीय संतकवी श्रीनाथ-भुजंगाची समाधिस्थान आहे. हंसराज स्वामी, अनंतदासी रामदासी आणि स्वामींची समाधी एकमेकांशेजारीच आहे. या सर्वच थोर महात्म्यांचे कार्य तुलनात्मक रीतीने अभ्यासले तर ते अधिक स्पष्ट होऊ शकेल. आणि स्वामींनी महाराष्ट्रातील अध्यात्मकारणाला जी व्यापक भारतीय बैठक देण्याचा प्रयत्न केला, ती स्पष्ट होईल. आपल्या ध्यानी येईल की, स्वामी एका अर्थाने समर्थ रामदासांचे विसाव्या शतकातील अवतार आहेत.

काळाची आवश्यकता

स्वामींच्या जीवनयात्रेची आणि जीवितध्येयाची ओळख नव्या पिढीला व्हावयास हवी. एखादा शिक्षक, समाजशिक्षक आणि सत्पुरुष म्हणून कसे कार्य करू शकतो, याचे ते एक प्रेरक उदाहरण ठरेल. आज आपण नाना प्रकारच्या जातीयवादी, भ्रष्टाचारी, ध्येयशून्य धटिंगण मंडळींच्या तावडीत सापडत चाललो आहोत. आपले सार्वजनिक लोकजीवन अक्षरशः झाकोळून गेले आहे. लोकशाहीचे ठोकशाही रूप भयावह असते. आपण ते अनुभवीत आहोत. सारा दोष केवळ राजकारण्यांचाच आहे काय? आजचा समाजशिक्षक, प्रबोधक वर्ग नेमके काय करीत आहे? आपली शिक्षण व्यवस्था पुरेशी कर्तव्यशील दिसते का? एक उत्तम अभ्यासक - अध्यापक, श्रेष्ठ गुरुनिष्ठ साधक, ध्येयवादी आध्यात्मिक सत्पुरुष म्हणून जर स्वामींच्या प्रत्येक कृतीचा विचार केला, तर पुष्कळ मंडळींना कितीतरी कार्याची नवी क्षितिजे धांडोळता येतील.

स्वामींनी जशी तुलसी रामायणाची 'गूढार्थ दीपिका' टीका लिहिली तसेच त्यांनी मानस अनुवादही केले आणि अभिनव रामायण, वेदान्तसार रामायण इत्यादी रचनाही केली. मानवतापूर्तिसाधन आणि संध्योपासना हे ग्रंथही त्यांच्या परिणत प्रज्ञेचे दर्शन घडविणारे आहेत. त्यांची समश्लोकी गीता, श्रीगुरुगीता प्रबोधिनी, श्रीरामनामवंदना भाष्य, श्रीवेदस्तुतिभास्कर, ब्रह्मस्तुती इत्यादी त्यांची प्रकाशित आणि अन्य अप्रकाशित रचना त्यांच्यातील थोर संस्कृतिपुरुषाची प्रचीती आणून देणारी आहे.

स्वामी जसे अनुवादक, टीकाकार, भाष्यकार तसेच ते वैद्यक, ज्योतिष, योगशास्त्र, मंत्रशास्त्र, धर्मशास्त्र, वेदान्त इत्यादी अनेक विषयांचे पंडित होते. त्यांना संस्कृत, इंग्लिश, गुजराती आणि हिंदी-मराठी भाषा चांगल्या अवगत होत्या. त्यांची गुरुभक्ती जशी आदर्श, तशीच त्यांची शिष्य प्रीती होती. ते आदर्श धर्माचरण करीत. इतरांनी करावे म्हणून प्रयत्न करीत. त्यांच्या आचार-विचार-उच्चारात ऐक्य असल्यामुळे त्यांचा परखडपणा, स्पष्टवक्तेपणा इतरांनी शिरोधार्य मानला. त्यांचे वैराग्य प्रखर होते. संकल्पाने कुंडलिनी जागृत करण्याची विद्या त्यांनी संपादन केली होती. त्यातूनही त्यांचेभोवती एक तेजोवलय निर्माण होऊ शकले.

२३ मार्च १९६८ रोजी त्यांनी प्रायोपवेशनाने निर्धारपूर्वक देहत्याग केला. पण त्यांचे अक्षरग्रंथ, त्यांचे अद्‌भुत कार्य आणि त्यांचे साधे स्मरणही स्फूर्तिदायी ठरावे असे आहे.

प्रा. डॉ. अशोक प्रभाकर कामत
प्रमुख संत नामदेव अध्यासन, संत अध्ययन व
संशोधन केंद्र पुणे विद्यापीठ, पुणे.

प्रज्ञानानंद सरस्वती चरित्रः

सौ. मनीषा अभ्यंकर

एम.ए. गोल्ड मेडॅलिस्ट, शिवाजी युनिव्हर्सिटी. विवाहानंतर शिक्षण प्राप्त. ८ वी ते १२ वी संस्कृत [illegible]. प. पू. स्वामी स्वरूपानंद यांच्या अनुग्रहीत [illegible], उत्तम साधक व आदर्श गृहिणी.

भारतभूः सत्पुरुषानां जन्मभूमिः । नैकैः सत्पुरुषैः पदस्पर्शेन एषा भूमिः पवित्रीकृता । ज्ञानेश्वरैकनाथरामदास तुकारामादिभिः सत्पुरुषैः महाराष्ट्र प्रदेशः पवित्रीकृतः । एतै सत्पुरुषैः प्राकृतभाषायां विपुलं साहित्यं रचितम् । योगनीति भक्तितत्त्वज्ञानावयः विषयाः स्वसाहित्ये तैः स्पष्टीकृताः । आधुनिकयुगे एषा परम्परा प्रज्ञानानंद नाम सत्पुरुषेण प्रचलिता ।

कर्वेकुलं धन्यमेव यस्मिन् कुले एषः प्रज्ञानानंद नाम सत्पुरुषः संजातः । त्रिनवाष्टैकमिते 'मे' मासस्य पञ्चदशदिने वैशाख मासस्य अमावास्यायां अयं जनिं लेभे । 'नारायण' इति अस्य पितुः नाम । सौभाग्यशालिनी गंगा इति अस्य माता आसीत् । माहीम नाम ग्रामे मातामहस्य गृहे अस्य जनिः अभवत् । अस्य जन्मसमये अस्य मातामहेन पृथिवीं खनता धनकुंभः लब्धः । 'दत्तात्रेय' इति अस्य मात्रा नामधेयं कृतम् । गर्भाष्टमे वर्षे अस्य उपनयनसंस्कारः संजातः । मुरुडनगर्या माध्यमिक शिक्षण लब्ध्वा सः उच्च शिक्षणं प्राप्तुं गुजराथराज्ये बडोदा नाम नगर्या गतः । संस्कृत विषये अनेन बी.ए. पदवी प्राप्ता । शंकरराव देव महोदय समाजसेवकः श्री देवधर महोदयाच अस्य सहाध्यायिनौ आस्ताम् । त्रीण्यपि मित्राणि महाविद्यालये एव स्वध्येयं निश्चितं अकुर्वन् । देवमहोदयस्य राजकारणं प्रियम् । देवधर महोदयस्य समाजकारणं प्रियम् । श्री कर्वे महोदयस्य धर्माचरणं प्रियम । 'ईश्वरोपलब्धिः' इति अस्य ध्येय आसीत् । चतुर्दशनवैकतमे संवत्सरे अयं एस. टी. सी परीक्षामपि उत्तीर्णवान् ।

विवाहाय सः उत्सुकः नासीत् । अपि तु प्रारब्ध शरणं गत्वा जननीजनकौ संतोषयितुं अनेन श्रीधर जोशी महोदयस्य द्वारका नाम कन्यया सह विवाहः कृतः । अनेन चिंचणी नाम नगर्या 'कांजी धरमसी हायस्कूल' नाम विद्यालये अध्यापनव्रत स्वीकृतम् । उपासना सदृशा अस्य दिनचर्या आसीत् ।

त्रिद्विनवैकतरे संवत्सरे अस्य प्रथमः पुत्रः मृतः संजातः । पञ्चत्रिनवैकतमे संवत्सरे अस्य द्वितीयः पुत्रः संजातः । सोऽपि धनुर्वातेन अष्टमे दिने पञ्चत्वं गतः । नवद्विनवैकतमे सवंत्सरे अस्य अनुजोऽपि पञ्चत्वं गतः । परिणामतः अयं चिन्तनशीलः अभवत् । वैराग्येण सः परमार्थमार्ग गन्तुं प्रारब्धवान् । सद्गुरु विना जीवनं सफलं न भवेत् इति मत्वा सद्गुरुदर्शनस्य इच्छा तस्य मनसि जागृताऽभवत् । श्रीधरस्वामिनः दर्शनेन तस्य मनसि भक्तिः वृद्धिंगताभवत् । मुमुक्षुः सः स्वामिनं पत्र लिखितवान् । सद्गुरुः तं त्रयोदशाक्षरैः युक्तं रामनाम दत्तवान् । भक्तिविषयकं मार्गदर्शनार्थं सः स्वामिनं व्यज्ञापयत् । सद्गुरुः तमादिशत्, "त्रिकोटि जपसंख्या पूर्ण कृत्वा आगच्छ ।" जपसंख्यां पूरयितुं स अतीवोत्सुक अभवत् । तदर्थ सः स्वहितक्रमं प्रत्यावर्तयत । प्रातःकाले शीतजलेन स्नानं कृत्वा सूर्योदयात् पूर्वं संध्यां, गायत्रीजपं, ब्रह्मयज्ञं इष्टदेवतायाः च जपं कृत कृत्वा सः पाठशाला अगच्छत । विराम् काले अपि विद्यालयान् गृहं आगत्य सः जपसंख्यां पूरयितुं प्रायतत । 'गृहे उषित्वा साधनां न भवेत्' इति मत्वा चिंचणीग्रामे गृहसमीपे उटजं बद्ध्वा तस्मिन् उरजे सः अवसत् । अग्निस्पृष्टात् पदार्थान् उपभुज्य, ब्रह्मचर्य पालयित्वा तेन मन्त्रपुरश्चरणं प्रारब्धम् । प्रत्यहं पञ्चाशत् सहस्रं जपसंख्यां पूरयितुं सः प्रायतत । कठोरै परिश्रमैः जपसंख्यां पूरयित्वा सः सद्गुरुं श्रीधरस्वामिनं मिलितुमगच्छत् । श्रीरामः एव तुभ्यं मार्गदर्शनं यच्छेत् इति आशीर्वादात्मकं उत्तरं सद्गुरुः तं दत्तवान् । सद्गुरोः कथनानुसारं श्री बाबा गंगादास नाम सत्पुरुषस्य सहवासं सः लब्धवान् । श्री गंगादासस्य प्रेरणया सः तुलसीदासस्य रामचरितमानसं अध्येतुं प्रारब्धवान् रहस्यमपि प्राप्तवान् च । श्री गंगादासस्य कृपया सः निर्विकल्पां समाधिमपि आतवान् । 'तव मुखेन तुलसीदासः वदिष्यति' इति आशीर्वाद श्रीगंगादासः अयच्छत् । श्री गंगादासस्येवाशीवदिन तेन श्रीरामचरितमानस्य समवृत्तः समच्छन्दः अनुवादः मराठीभाषायां कृतः । रामचरितमानसे 'श्रीमानसगूढार्थचन्द्रिका' नाम विस्तृता टीकापि तेन लिखिता । एतदेव तस्य खलु महत्कार्य अस्ति । तुलसीरामाणमधिव्रत्य सः प्रवचनं कर्तु प्रारब्धवान् ।

सप्तत्रिनवैकतमे संवत्सरे अध्यापकपदं परित्यज्य वैराग्यं दृढीकृत्य तेन तीर्थयात्रा प्रारब्धा । नर्मदातीरे कानने विद्यमाने कोटेश्वर मंदिरे तेन साधना समारब्धा । ईश्वरोपासतयैव सः स्वस्य जीवनं सफलयितुं प्रायतत । रामचरितमानस्य प्रसारमेय तस्य जीवितध्येयम् यतः श्रीगंगादासेन एता एवं गुरुदक्षिणा याचिता । नर्मदातीरे कोटेश्वर मन्दिरे तेन ब्राह्मणरूपेण महादेवस्य दर्शन लब्धम् । रामचतुष्टयस्य दर्शनमपि अयं तत्रैव लब्धवान् । घोरे अरण्ये उषित्वा व्याघ्रसर्पनक्रादीन अविगणय्य तेन एकान्तसाधना कृता । जपनामस्मरणध्यानधारणासु अस्य समय व्यतितोऽभवत् ।

संन्यासाश्रमं प्रवेष्टुं सोऽतीवोत्सुक आसीत् । पत्न्याः मान्यतां लब्ध्वा सः त्रिचतुर्नवैकतमे संवत्सरे पौष शुक्ल द्वादस्यां चतुर्थाश्रमं प्राविशत् । चतुर्थाश्रमं स्वीकृत्य सः दण्डग्रहणार्थ श्रीवासुदेवानंद सरस्वती महोदयं शरणं गतः । श्रीवासुदेवानंदसरस्वतीमहोदयं दृष्ट्वा सः अतीव मुदितोऽभवत् । द्वयोः गुरुशिष्ययोः संयोगः मणिकाञ्चनसंयोगः आसीत् । यथा निवृत्तिदासस्य ज्ञानेश्वरः, जनार्दनस्य एकनाथः, रामकृष्णस्य विवेकानंदः, समर्थ रामदासस्य कल्याणः तथैव श्रीवासुदेवानंद सरस्वती महोदयस्य प्रज्ञानानंदः श्रीवासुदेवानंदसरस्वती महोदयेन अस्य 'प्रज्ञानानंद' नाम कृतम् ।

खेडग्रामे गुहायां ध्यानसमये अनेन आदिशक्तेः दर्शनमपि लब्धम् ।

वृषस्कन्धारूढां परमरुचिरां सस्मितमुखीं
त्रिशूलाढ्यां पद्माभयवरकरां नित्यसुखदाम् ।
सुवर्णाभां दुर्गा दुरितहरिणीं रक्तवसनां
नमाम्यन्तर्बाह्ये नयनविषयां विश्वजननीम् ॥

एतस्मिन् श्लोके तस्याः दर्शनस्य वर्णनमस्ति । श्रीरामचन्द्रस्य बालरूपे दर्शनं महालक्ष्म्याः च दर्शनं अपि अयं लब्धवान् । शंकरपार्वत्याः अपूर्व दर्शनमपि अनेन उस्मानाबाद नाम ग्रामे लब्धम् ।

महाराजस्य हृदयं वज्रादपि कठोर कुसुमादपि कोमलं आसीत् । प्रायोपवेशन देहत्यागं कर्तु अनेन निश्चितीकृतम् । परंडा नाम ग्रामे चैतन्य रूपेण वस्तुं सः सज्जीभूतः । नैके शिष्याः सुहृदः तस्य निर्णयेन अखिद्यन्त । श्रीधरस्वामीमहोदयोऽपि तं परावर्तितुं प्रायतत । अपि तु न सः निश्चयात् व्यरमत् । फाल्गुन-कृष्ण-दशम्यां अयं प्रायोपवेशनेन स्थूलं देहं त्यक्तवान् । परंडा नाम ग्रामे अस्य समाधि अस्ति ।

अनेन अमूल्या साहित्यसेवा कृता । तुलसीदासस्य 'रामचरित मानस' नाम ग्रन्थस्य समच्छन्दः अनुवादः मराठीभाषायां कृतः । 'श्रीमानसगूढार्थचंद्रिका' नाम विस्तृता टीकापि हिन्दीभाषायां मराठीभाषायां च लिखिता । 'श्रीगुरुगीता प्रबोधिनी, संगीत समश्लोकी गीताः, वेदान्तसार अभंग रामायणम्, परमामृतप्रकाशः, वेदस्तुती प्रभाकरः, श्रीवेदस्तुतीकीर्तनभास्करः, श्रीभगवद्गीता कीर्तन तरंगिणी, श्री ब्रह्मस्तुतिः इत्यादयः तस्य महत्वपूर्णा ग्रन्थाः सन्ति । पश्चादशाधिकाना ग्रन्थानामनेन रचना कृता ।

प्रज्ञानानंदस्य चरितं वर्णयितुमशक्यमेव । अल्पमत्या मया यत् लिखितं तत् तमेव समर्प्यतं प्रणम्य लेखनविरामं करोमि

सौ. मनीषा अभ्यंकर
रामजानकी बंगला, चंदनवाडी सांगली-मिरज रस्ता, सांगली.

कधी पर गुण दोषा अंतरी नाठवावे ।
त्वरीत तरीच येथे मुक्ती सायुज्य फावे ॥

प्रज्ञानानंद स्वामींचे वेदांतसार रामायण

प्रा. डॉ. अंजली माधव पर्वते

एम.ए., पीएच.डी. (संस्कृत) विषय अध्यात्म रामायण एक चिकित्सक अभ्यास. गीताव्रती गीताधर्म मंडळ किसनवीर कॉलेज वाई संस्कृत अधिव्याख्याती विवेकचूडामणी, नागानंद व प्रबोध चंद्रोदय - महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार पत्रिका व प्रसन्न राघव - टि.म.वि.चा कमळ तांबे पुरस्कार. प्रभाव पत्रिकेत संस्कृत साहित्यिकांच्या संदर्भात वेगवेगळे स्फुट लेख. आकाशवाणी सांगली 'प्रकाश किरण' व सातारा 'अंतरंग' कार्यक्रमाचे लेखन. संस्कृत भाषेच्या प्रसारासाठी विविध मासिकांत भाषणे. शंकराचार्य व समर्थ रामदास, अध्यात्म रामायण, महाभारत यांवर विविध ठिकाणी भाषणे. टिळक विद्यापीठाचा गुणवंत पुरस्कार.

'रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड न्यावी' असे श्रीसमर्थ रामदास स्वामींनी दासबोधात आग्रहाने सांगितले आहे. स्वतः त्यांनी सतत 'कोदंडधारी राम'च संसारी माणसापुढे आदर्श म्हणून मांडला आणि परमार्थमार्गी साधकाला सांगितली 'आत्माराम उपासना'. समर्थांच्या मनात रामकथेचे हे जे प्रेम होते वा त्यांनी कोदंडधारी राम हाच आत्माराम हा जो विश्वास होता तसाच विश्वास वा तेच रामकथा प्रेम पुढच्या काळात प. पू. प्रज्ञानानंद स्वामींच्या मनात असलेले दिसते. 'अभिनव रामायण (किंवा नर्कुटक रामायण) व वेदांतसार अभंग रामायण' ही त्यांची दोन स्फुट प्रकरणे वाचली की हे विशेषत्वाने जाणवते.

एकदा नर्कुटक नामक अपरिचित वृत्तांत रामकथेची रचना स्वामींनी केली आणि दुसऱ्या वेळी रामकथेसाठी अभंग हा प्रासादिक रचनाबंध स्वीकारला. मात्र या अभंगरूपात रचलेल्या रामकथेचे वैशिष्ट्य हे की त्यात त्यांनी रामकथेतील महत्त्वाची पात्रे व प्रसंग हे वेदान्तातील महत्त्वाची तत्त्वे व सिद्धान्त यांच्याशी रूपकात्मक रीत्या जोडून दाखवले.

कोणत्याही काव्याचे एक निश्चित प्रयोजन असते. त्या प्रमाणे स्वामींच्या या काव्याचेही मुख्य प्रयोजन आहे. 'स्वान्तः सुख' - मम्मटाच्या भाषेत सांगायचं तर 'सद्यः परनिर्वृति' - तात्काळ मिळणारा अननुभूत / अवर्णनीय असा आनंद. मात्र दुसरं प्रयोजन स्वामींनी प्रारंभीच्या प्रास्ताविक अभंगात किंवा मंगलाचरणात नोंदवले आहे. 'रामकथा सार वेदांत विचार । भवसिंधुपार पावविती' रामकथेचे सार असणारे वेदान्ततत्त्वज्ञान मोक्षप्राप्ती करून देणारे असल्यामुळे आपण ही रचना केली असल्याचे स्वामींनी सूचकतेने नमूद केले आहे.

वेदान्ताचा शास्त्रशुद्ध अभ्यास झालेल्या स्वामींना बाबा गंगादासांसारख्या रामकथेची दीक्षा देणारा गुरु भेटल्यामुळे स्वामी रुक्ष तत्त्वज्ञानी राहिले नाहीत. रामकथेतील भक्तिरसाची जोड त्यांच्या अद्वैत विचाराला मिळाली. साहजिकच तत्त्वज्ञान प्रासादिक स्वरूपात लोकांना सांगता यावे अशी उर्मी मनात जागली. गुरुकृपेने रामकथेचे परिशीलन करता करता रामकथेतच अवघा वेदांत गूढ रीतीने गुंफला गेला आहे, हे त्यांना प्रकर्षाने जाणवले. शिवाय स्वामींसमोर आली होती ती रसाळ रामकथा होती तुलसीदासांनी रामचरितमानसात सांगितलेली. त्यामुळे तुलसीदासांच्या उत्कट भक्तिभावाचा आणि शास्त्रज्ञानाचा संस्कारही सहजगत्या झाला होता. या सगळ्या गोष्टींचा उत्स्फूर्त आविष्कार म्हणून स्वामींकडून 'वेदांतसार अभंग रामायणा'ची रचना झाली.

प्रथम १०७ च अभंग रचली गेलेली ही रचना काही प्रदीर्घ अभंग लहान केले गेल्यामुळे आणि काही नवीन स्फुरल्यामुळे १७० अभंगांची झाली. या अभंगातील रामकथेचा मुख्य आधार अर्थातच 'रामचरितमानस' हा आहे आणि काही तपशीलांसाठी मात्र आनंद रामायण, अध्यात्म रामायण, वाल्मीकी रामायण व अद्भुत रामायण ही ४ संस्कृत रामायणे व नाथांचे मराठी भावार्थरामायण इ. चा रामायणांचा आधार ही स्वामींनी घेतला आहे.

राम आणि सीता म्हणजे विशुद्ध परमात्मा व त्याच्या ठायी झालेले 'अहं'चे स्फुरण म्हणजेच त्याची स्फूर्ति माया. या मायाशक्तीमुळे विशुद्ध परब्रह्म शबल झाले आणि मग त्या दोघांना मिळून 'शिवशक्ति', 'प्रकृति पुरुष' इ. नावे लोक देऊ लागले असे स्वामींनी प्रारंभी प्रतिपादन केले आहे. त्यानंतर सगळी रामकथा वेदान्त तत्त्वज्ञानानुसार लावून दाखविली आहे.

अयोध्या म्हणजे देहरुपी नगरी, तिचा राजा दशरथ हा जीव. या दशरथाची पत्नी कौसल्या म्हणजे जीवाची सुबुद्धी वा सद्बुद्धी. त्यांना पुत्र नाही म्हणजे शुद्ध / निर्मळ सुखाचा लाभ नाही म्हणून ते दुःखी. अशा वेळी निर्मळ सुखलाभाच्या हेतूने ते गुरुस्वरूप वसिष्ठाला शरण जातात. तो यमनियम पालनाविषयी सूचना देतो. त्यानुसार अहिंसा, सत्य, अस्तेयादि यम व तप, संतोष, अस्तिक्यादी नियम पाळून यज्ञास सिद्ध होतात. विवेकरुपी ऋष्यशृंगाला बोलावून चित्तशुद्धीरुपी यज्ञ करतात. त्या वेळी वैराग्यरुपी अग्निदेव त्यांना शमदमुमुक्षारुपी पायस देतो. जीवरूपी दशरथाच्या बुद्धिरुपी राण्या तो पायस भक्षण करतात. त्या वेळी ज्ञान त्यांच्या गर्भात अंकुरते.

मात्र ते अवतरते योग्य मुहूर्त साधून व तो मुहूर्त असतो चैत्रशुद्ध नवमीचा ! सद्गुरुकृपा रुपी वसंतात बुद्धीच्या वृत्तिरुपी वेली विषयरूप पाण्याविनाच बहरतात आणि चित्तशुद्धीरुपी शुद्ध पक्षात नवमी या रिक्ता तिथिला चित्त अहंकाररहित व निर्विकार झाल्यावर जीवाच्या बुद्धीठायी ज्ञानरुपी रामाचा जन्म होतो. याच रामाच्या अंशातून अन्य तिघांचा जन्म होतो. पुढे थोडे मोठे झाल्यावर रामलक्ष्मणांना यज्ञविध्वंस करणाऱ्या राक्षसांचे पारिपत्य करण्यास विश्वामित्र घेऊन जातात. श्रवण, भजन हे ते यज्ञ असतात आणि देहबुद्धीरुपी ताटिका, लिंग / सूक्ष्मदेहरूपी मारिच या यज्ञांचा विध्वंस करत असतात. यापैकी देहबुद्धीरुपी ताटिकेचा वध राम करतो. मारिचरुपी सूक्ष्म देह हा फार उपद्रवी नाही म्हणून फक्त त्याला दूरवर फेकून देतो व कारणदेहरुपी किंवा अविद्यारुपी सुबाहूचा मात्र ज्ञानरुपी राम वध करतो. अन्य किरकोळ उपद्रव करणाऱ्यांना वैराग्यरुपी लक्ष्मण शासन करतो. त्यामुळे सत्संगति, श्रवण, भजनादी यज्ञ यथासांग पार पडतात. विश्वामित्रांच्या सत्संगाने ज्ञानरुपी रामाची शक्ती वाढते ती त्याला बलाबला विद्यांचे ज्ञान ते देतात त्यामुळे !

पुढे 'संसाररुपी शिवचापाचा भंग' करून ज्ञानरुपी राम शांतिरुपी सीतेला प्राप्त करून घेतो. ज्ञानाशिवाय अन्य कुणाला संसारचाप नष्ट करता येत नाही हेच खरे ! पुढे ज्ञान अधिक परिपक्व व्हावे म्हणून

जीवरूपी दशरथ रामाला राज्याभिषेक करायचे ठरवतो ते इंद्रियरुपी देवतांना सहन होत नाही. कारण मग त्यांना विषयत्याग सक्तीचा होणार असतो. पण या इंद्रियदेवतांना जीवाच्या सुबुद्धीची म्हणजेच कौसल्येची भीती असते म्हणून ते मंथरारूपी वासनेला कुबुद्धीरुपी कैकयीला क्षुब्ध करण्यासाठी पाठवतात आणि कुबुद्धीच्या मोहपाशात अडकलेला जीवरुपी दशरथ ज्ञानरूप रामाला वनवासी करतो आणि साहजिकच ज्ञान दुरावल्यावर आणि तमोगुणी कुबुद्धीने ग्रासल्यावर जीवरुपी दशरथ दुःखी होतो.

ज्ञानरूप राम आपला प्राणच असलेल्या भक्तिरूप सीतेला अयोध्येत राहण्यास समजावतो पण ती ज्ञानाविणा राहण्याबाबत असमर्थता व्यक्त करून त्याचे अनुसरण करते. लक्ष्मण हा तर ज्ञानरूपी रामाचा जागृतीतील अंश 'विश्व' होय. तो रामाशिवाय राहण्याचा विचारही करू शकत नाही. तो जागृतिरुपी उर्मिलेला सोडून ज्ञानरुपी रामामागे वनात जातो. तिथे जागृती तर दूरच पण विपरीत ज्ञानरुपी स्वप्नावस्था व अज्ञानरुपी निद्रा दोघींनाही जवळ फिरकू न देता तो ज्ञानरूप राम व भक्तिरूप सीतेची सेवा करत राहतो. निद्रारुपी मांडवीसह असलेला प्राज्ञरूप भरत व स्वप्नावस्थारूप श्रुतकिर्तिसह असलेला तेजस रूप शत्रुघ्न दोघेही तुर्यावस्थारूपी सीतेसह असलेल्या ज्ञानरुपी रामापर्यंत पोचू शकत नाहीत.

पुढे ज्ञान-भक्ति-वैराग्यरुपी रामसीतालक्ष्मण त्रिगुणातीत कैवल्य निवासरुपी चित्रकूट पर्वतावर जातात. तिथे सर्व ऋषिमुनींना त्रिगुणातीत करतात पण मग उपाधी वाढू लागते म्हणून पंचविषयरुपी पंचवटीत जाऊन राहतात. तिथे कठोर भाषणरुपी खर व दोषदृष्टीरुपी दूषण त्यांना भेटतात. वासना शूर्पणखा भुरळ घालण्यास येते. या तिघांना अनुक्रमे ज्ञान व वैराग्य - राम व लक्ष्मण शासन करतात.

विरुप झालेली वासनारुपी शूर्पणखा अज्ञानरुपी लंका नगरीत राहणाऱ्या अहंकाररुपी रावणाकडे जाते. मोह रुपी कुंभकर्ण हाही त्या रावणाचा भाऊच. अहंकाररुपी रावणाने इंद्रियांच्या ज्या अधिपति देवता वरुणादी त्यांना पर्यायाने इंद्रियशक्तींनाच बंदी बनवलेले असते. ज्ञानरुपी रामाशिवाय आपला नाश करणारा कुणी नाही हे ठाऊक असल्यामुळे अहंकाररुपी रावण यतिरूपाने शांतिरुपी सीता पळवून नेण्यास अंतररुपी अरण्यात पोचतो. पण अहंकाराला शांतिची प्राप्ती केवळ अशक्य असते. त्यामुळे मारीचाच्या (सूक्ष्म देहाच्या) साह्याने छाया सीता नेतो. ज्ञानरुपी राम व्यवहारी माणसासारखा शोक करतो. पुढे संतसेवारुपी शबरीला भेटून तिने दिलेल्या भावरूपी फळांनी प्रसन्न होऊन तो तिला सायुज्य मुक्ती देतो. पुढे मूर्तिमंत दास्यभक्ति रूप हनुमंत आणि अवर्णनीय सख्यरूप सुग्रीव सखा भेटतो. त्यांच्यासाठी भक्तविरोधी वालीला ज्ञानरुपी राम यमसदनाला पाठवतो आणि शुद्ध प्रेम भक्ति हेच जिचे स्वरूप अशी किष्किंधा सुग्रीवाच्या हवाली करतो. देवांचे अंश असलेल्या वानरांना सुग्रीव सीताशोधार्थ पाठवतो.

अंगद हनुमंतादी वानर दक्षिणेला सागरतीरी येतात आणि चिंताग्रस्त होतात. त्या वेळी संपाती सीता लंकेत असल्याचे सांगून 'भवसागर तरून जाऊ शकेल तोच शांतिरुपी सीतेचा शोध लावू शकेल' असे स्पष्ट करतो. त्यानंतर जांबवंतरुपी गुरु मारुतीरुपी सदसद्विवेकाला जागवतो. 'तत्त्वमसि' सारखा 'तूच हा भवसागर पार करण्यास समर्थ आहेस' असे ठासून सांगतो. गुरुकृपेने जागा झालेला सदसद्विवेक मोहाचा सागर पार करण्यास सिद्ध होतो. मग देहसुखलाभाचा लोभ उत्पन्न करणारा मैनाक, मृत्यूचे भय दाखवणारी देवप्रणित सुरसा, सावलीला गिळंकृत करणारी अविद्यारुपी सिंहिका - कुणीही त्याला अडवू शकत नाही. देहबुद्धीरुपी लंकिनी अज्ञानरुपी लंकेच्या रक्षणार्थ सिद्ध असते. तिला सत्संगाच्या बळावर निरसून विवेकरुपी मारुती-शांतिरुपी सीतेच्या शोधार्थ लंकेत शिरतो. नक्की कुठे शोध घ्यावा या विचारात असताना शुद्ध शरणागतिरुप बिभीषणाशी त्याची भेट होते आणि शांतिरुपी सीतेचा शोध लागतो. तिला ज्ञानरूप रामाचे कुशल सांगून नंतर प्रपंचसत्यत्वरुपी रावणपुत्र अक्षकुमाराला श्रवणरुपी वृक्षाने, संशयरुपी जंबुवंताला मननरुपी शिळेने ठार करतो. पुढे कामरुपी इंद्रजिताने योजलेल्या ब्रह्मास्त्राचा मान राखण्यासाठी आणि अहंतारुपी रावणाला गोष्टी सांगेन युक्तीच्या चार म्हणून विवेकरुपी मारुती स्वतःला बद्ध करून घेतो आणि अहंकाररुपी रावणाला शासन म्हणून अज्ञानरुपी लंकेची नासधूस करतो.

शांतिरुपी सीतेच्या अनुज्ञेने ज्ञानरूप रामाकडे परतून विनम्रभावाने सर्व वृत्तांत सांगतो. राम वानरसैन्याला घेऊन रावणाचे पारिपत्य करायला निघतो. वाटेत आलेल्या मोहरुपी सागराला विरागाग्नि रुपी बाणाने शोषावे आणि शांतिरुपी सीतेच्या मुक्ततेसाठी पुढे जावे असा उपाय वैराग्यरूप लक्ष्मण सुचवितो; पण ज्ञानरुपी राम 'दंडाऐवजी सामाने कार्य साधते का पाहावे' म्हणून प्रयत्न करतो. शेवटी सागराला शासन करण्यास उद्युक्त झाल्यावर मोहसागरात शास्त्रविचाररुपी पर्वत अभ्यासरूपी नलनीलांनी टाकावेत असा उपाय सांगितला जातो. हे शास्त्रविचाररुपी पर्वतही सहज स्थिर होत नाहीत. मोहसागरात ते तरंगत राहतात; मग ज्ञानरुपी रामाच्या नामस्मरणाने ते स्थिरावतात आणि 'शमदमादी' साधनरुपी सेतू तयार होतो. त्यावरून साधकरुपी वानर परतीरी पोहोचतात. या साधकांचेही मंद, मध्यम, तीव्र व तीव्रतर असे प्रकार असतात. अंगद, हनुमानादी तीव्रतर साधक होत. हे सारे त्रिकूट शिखरावर मोठ्या कष्टानेच पोचतात. रामकृपेनेच त्यांना ते शक्य होते. मात्र त्रिकूटावर पोचूनही शांतिरुपी सीतेचे फक्त दर्शनच होते. तिची प्रत्यक्ष भेट प्रयत्नांनीच होणार असते.

मध्यंतरीच्या काळात अंगद वेदशास्त्रचर्चारूपी शिष्टाई करून पाहतो. अहंकाररुपी राक्षस काही मानत नाही. मग अंगद भक्तिभावरूपी पाय रोवून राक्षसांनी तो उचलून दाखवावा असे आवाहन करतो पण तमोगुणी राक्षसांना ते शक्य होत नाही.

पुढे अहंकाररुपी दुर्गाची जी चार दारे वाणी, हस्त, उदर, उपस्थ त्या चारही दारांवरील शत्रूंचे पारिपत्य करण्यासाठी रामसेनेचे चार भाग करतो. अहंकाराने या दारांवरील राक्षसवीरांचा उत्साह वाढवलेला असतो. त्यामुळे वानरांची वाताहत होते; पण विवेकरूपी हनुमंत सर्वांना धीर देऊन उभे करतो. मग अंगद व तो सरळ राक्षसवीरांचा नायनाट करत फिरतात.

कामरुपी इंद्रजीत ज्ञानरुपी रामाला नागपाशात बद्ध करतो; पण मारुती गरुडाला घेऊन येतो आणि राम मुक्त होतो. पुढे इंद्रजित वैराग्यरूप लक्ष्मणावर रजोगुणी शक्ती फेकतो. ज्ञानाच्या दृढ पाठबळा अभावी वैराग्यरुपी लक्ष्मण मूर्च्छित होतो. ज्ञानरुपी रामही वैराग्याच्या विरहामुळे दुःखी होतो. अशा वेळी सदसद्विवेकरुपी मारुती औषधी आणून दोघांना पुन्हा एकदा संजीवनी देतो. वैराग्यविवेकरुपी जांबवत इंद्रजिताला लंकेत फेकून देतो.

मग रावण तमोरुपी कुंभकर्णाला साह्यार्थ बोलवतो. तम मोहरुपी कुंभकर्णामुळे मृत्यू समोर उभा ठाकल्याचे जाणून साधकरुपी वानर भक्तांचे आश्रयस्थान (भक्ताराम) असणाऱ्या रामाला मुक्तीसाठी हाक मारू लागतात.

तेव्हा तो वरद कृपाघन त्या तमभोहरुपी कुंभकर्णाचा वध करतो.

त्यानंतर कामरुपी इंद्रजित युद्धात जय मिळावा म्हणून यज्ञ करू लागतो. त्या यज्ञाचा रामाज्ञेने ध्वंस करून वानर राक्षससेनेचा आणि शेषावतार लक्ष्मण इंद्रजिताचा वध करतात. शेवटी अहंकाररुपी रावण सूक्ष्मदेहरुपी रथात बसून इंद्रियांच्या वृत्तिरुपी दहा मस्तके, दहा इंद्रिये व दहा प्राण हे वीस हात धारण करून युद्धाला येतो. ज्ञानरुपी रामाने पुन्हा पुन्हा त्या मस्तकांचा व हातांचा नाश केला तरी ते पुन्हा पुन्हा निर्माण होतात; कारण त्यांचे मूळ असणारे जे मनरुपी अमृत ते त्याच्या नाभीत असते. राम शेवटी ते मनच नाहीसे करतो. अहंकाराचे मूळ असणारे अज्ञान खंडून टाकतो. मात्र रथधारी रावणाशी भूमीवर उभे राहून रामाने युद्ध करावे हे योग्य नाही हे जाणून बिभीषण इंद्राला विनंती करतो. इंद्र धर्मरुपी दिव्य रथ पाठवून देतो. शौर्य व धैर्य ही त्याची चाके असतात. शील व सत्य हे ध्वज असतात. परहित, बल, इंद्रियसंयम व सुविचार हे चार घोडे असतात. विरक्ती ही ढाल, संतोष ही तलवार, दान हा परशू, बुद्धी ही शक्ती, विज्ञान हे धनुष्य, स्थिर मन हा भातात आणि यमनियमादी बाण हे त्याची शस्त्रास्त्रे बनून येतात. गुरु व विप्रपूजा हे ज्ञानरुपी रामाचे अभेद्य असे कवच बनते. शेवटी राम अहंकाररुपी रावणाचा नाश करतोच. अहंता विज्ञानात विलीन होते. रावणाचे तेज रामात प्रवेशते. रावणाला सायुज्य मुक्ति मिळते.

पुढे सीतेला अग्निदिव्य करायला लावून मग सख्य, दास्य व आत्मनिवेदन म्हणजेच सुग्रीव, हनुमंत व बिभीषण यांच्यासह रामसीता अयोध्येत परतात. वसिष्ठ रामाला राज्याभिषेक करतात. अयोध्या ज्ञानरूप रामाच्या विरहाने क्षीण झालेली असते ती उल्हसित होते. परमात्मा राम देहरुपी अयोध्येत परतल्यावर सर्वत्र 'आनंद कोंदलाहे' अशी स्थिती होते.

प्रज्ञानानंद स्वामींनी रामकथा रूपकात्मक पद्धतीने थोडक्यात मांडली आहे ती अशी ! यातून स्वामींचे अद्वैत वेदान्ताचे ज्ञान किती दृढ व सखोल होते हे जाणवते. जीवाला देहबंधनातून मुक्तीपर्यंत करावा लागणारा प्रवास, शांतीच्या प्राप्तीसाठी करावे लागणारे प्रयत्न, येणारी विघ्ने साऱ्यांची यथार्थ कल्पना रामकथेच्या माध्यमातून स्वामींनी साधकांना दिली आहे.

रामकथेतून वेदांत स्पष्ट करताना स्वामींनी यमनियमांच्या ज्या व्याख्या दिल्या आहेत त्या बऱ्याचदा व्यावहारिक व आध्यात्मिक (पारमार्थिक) अशा द्विविध स्वरूपात आहेत तर काही वेळा त्या त्रिविध स्वरूपाच्या आहेत. उदा. 'मन, वाणी आणि देह' यांच्या सहाय्याने भूतमात्रांना त्रास न देणे ही झाली व्यावहारिक अहिंसेची व्याख्या व आत्मा छेदता न येणारा, जाळता न येणारा व सर्वगत आहे असे मानणे ही अहिंसा. ही झाली अहिंसेची पारमार्थिक दृष्टीने केली गेलेली व्याख्या. मृत्तिका व जळाने होणारे वा केले जाणारे शौच - (शुद्धता) ते बाह्यशौच, मीपण व ममत्व या मलमूत्रांचा त्याग हे स्वामींच्या शब्दात 'खरे शौच' आणि तिसरा प्रकार स्वामी सांगतात. 'शुद्ध ब्रह्म मीच' हे जे मनन - म्हणजेच 'सोऽहं' ही जी भावना वाढवणे ते 'शुद्धतम शौच' होय. स्वामींच्या या व्याख्या हे त्यांचे वेगळेपण आहे. या वेगळ्या व्याख्या वाचताना 'प्रश्नोत्तर रत्नमालिका' या प्रकरणात आचार्यांनी (शंकराचार्यांनी) 'सत्य कोणते?' 'शौच कशाला म्हणावे?' 'यज्ञ कोणता?' वगैरे प्रश्नांची अशाच वेगळ्या प्रकारे दिलेली उत्तरे आठवतात. आचार्यांच्या व्याख्याही अशाच विलक्षण आहेत.

'साहित्य हा मनाचा आरसा असतो' असे म्हटले जाते ते खरेच आहे. साहित्यात त्या त्या व्यक्तीचे काही विशेष सहजगत्या प्रतिबिंबित होत असतात. स्वामीही याला अपवाद नाहीत. स्वामी स्वतः संन्यासमार्गी असल्यामुळे 'नारी-संग' विषयी त्यांची मते तीव्र आहेत. इथे या रामायणात किमान ३ ते ४ अभंग 'नारी-संग' कसा दोषार्ह, घातक हे स्वामींनी शूर्पणखेच्या निमित्ताने वर्णिले आहे. या वर्णनाच्या वेळी स्वामींची अन्यत्र प्रासादिक, मृदु असलेली लेखणी कठोर, तिखट झालेली जाणवते. स्वचेतन, मंत्र, अचेतन मंत्र या बाबतीत विवेचन करताना सचेतन मंत्रोपदेश गुरुने करावा हा स्वामींचा आग्रही विचार दिसतो. जप आणि ईश्वरपूजन यांचे वर्णन करताना स्वामी भरभरून लिहितात. अर्थात् आपण या विषयांत मूळ विषय बाजूला ठेवून थोडे अधिकच रमलो हे त्यांनाही जाणवते आणि समर्थ जसे दासबोधात अनेकदा 'श्रोतीं क्षमा केली पाहिजे' असे म्हणतात. तशीच क्षमा स्वामीही मागताना दिसतात. रूपक वर्णनात रामचरित मानसातील कल्पनांचा आणि तुलसीदासांच्या शैलीचाही फार मोठा प्रभाव स्वामींवर असलेला दिसतो.

'दंड हा शेवटचा उपाय आहे, कोणतेही कार्य आधी सामोपचाराने साधण्याचा प्रयत्न करावा.' हा राममुखाने मांडलेला विचार स्वामींचे राजनीतीचे ज्ञान दाखवणारा आहे. 'तारुण्य तोवरी करावे साधन । येता वृद्धपण घडेना की हा वृद्ध जांबवनाच्या तोंडी घातलेला विचार तरुण पिढीने लक्षात घेण्यासारखाच आहे. इंद्रजिताने युद्धात विजय मिळवण्याच्या इच्छेने यज्ञाचे आयोजन केले' हे सांगताना स्वामी म्हणतात - 'राक्षसचि होते परी यज्ञीं श्रद्धा । मानवा अश्रद्धा आता येथे । काय त्यां उपमा द्यावी तरी सांगा । आले त्यांच्या भाग्या दैन्य जाणा.' यज्ञसंस्कृती विषयीची वाढती अश्रद्धा पाहून स्वामींना वाटणारी खंतच येथे प्रकर्षाने व्यक्त झालेली दिसते.

स्वामींनी रूपकांची मांडणी सोप्या शब्दात केली असली तरी काही रूपके स्पष्ट केलेली नाहीत. 'त्रिकूट' व 'अ-त्रि-वास' ही दोन रूपके अशी स्पष्ट न होणारी रूपके आहेत. अर्थात् त्यांचे स्पष्टीकरण स्वामींच्या 'मानसगूढार्थचंद्रिका' या 'मानसा' वरील टीकेत आपल्याला वाचायला मिळते.

'प्रज्ञा-वासुदेव' 'प्रज्ञा म्हणे' अशी नाममुद्रा असलेले हे स्वामींचे १७० अभंग प्रासादिक आहेत. काही वेळा काही सुरेख संवाद मांडणारे आहेत. 'हाकेने त्या दापी । दातांनी त्या कापी । कोणी देई थापी मस्तकांत ॥' अशी प्रासात्मक रचनाही मारुती वर्णनात आहे. रामाच्या राज्याभिषेकाचे वर्णन चित्रोपम व अलंकारिक आहे. काही कल्पनांवर भासाच्या प्रतिमा नाटकातील उपमांचीही छाया आहे.

प्रासादिक व चित्रोपम शैलीत रचले गेलेले हे रामायण स्वामींची विद्वत्ता दर्शविणारे तर आहेच पण रामकथेवरील - विशेषतः मानसातील रामकथेवरील स्वामींचे उत्कट प्रेमही व्यक्त करणारे आहे. स्वामींनी ते लिहिले आहे ते अंतःस्फूर्ती अनावर होऊन, त्यामुळेच ते अधिक प्रभावी झाले आहे. 'करुणाकीर्तनाच्या लोटे । कथा करावी घडघडाटे' असे समर्थ म्हणतात, स्वामींनी नेमके हेच केले आहे त्यामुळेच मुमुक्षू 'श्रोतयांची पुटे आनंदे भरावी' हा हेतू आपोआपच साध्य झाला आहे.

प्रा. डॉ. अंजली माधव पर्वते
५ बी, शिवसाई कॉम्प्लेक्स, आनंदनगर,
सिंहगड रस्ता, पुणे ४११०५१.

प्रज्ञानानंद सरस्वती आणि समाज प्रबोधन

डॉ. सौ. अनिता प्रभाकर केळकर

एम.ए.पीएच.डी - 'स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती व्यक्ती आणि वाङ्मय.' १९९२ मध्ये पुणे विद्यापीठ संत नामदेव अध्यासन परिषदेत सहभाग. १) गुळवणी महाराज एक परिचयात्मक अभ्यास, २) प्रा. श्री. म. कुलकर्णी व्यक्ती आणि वाङ्मय हे प्रकल्प पूर्ण. ३) १९९६-९७ मधील संतसाहित्य विषयावरील पुस्तकांचे परीक्षण. ४) [illegible] आणि [illegible] विविध संस्थांचा व [illegible] हे पुरस्कार प्राप्त.

प्रज्ञानानंद सरस्वती - पूर्वाश्रमीचे दत्तात्रेय नारायण कर्वे. पूर्वाश्रमी तत्त्वनिष्ठ शिक्षक असलेल्या या सत्पुरुषांनी बहुविध व्यासंग केला. सद्गुरुनिष्ठा, परिश्रमशीलता आणि अनन्य रामभक्ती हे त्यांचे बळ होते. गोस्वामी तुलसीदासांवर त्यांची कमालीची श्रद्धा होती. तुलसीदासांच्या रामचरितमानसाचा चौपाई, सोरठा आणि दोहा छंदात दोनदा अनुवाद केला. या मराठीकरणात कमालीचा काटेकोरपणा आहे. इतके करून ते थांबले नाहीत. जाणकारांनाही न उमगलेल्या तुलसीदासांच्या नानाविध काव्यकला त्यांनी प्रथम अनुभवल्या. सर्वार्थाने जाणल्या. मराठी, हिन्दी या दोन्ही भाषांमधून 'गूढार्थ चंद्रिकेच्या' रूपाने लोकांसमोर ठेवल्या. त्यांच्या साऱ्याच वाङ्मयामध्ये शास्त्राचा अपलाप, लोकरंजन किंवा बुद्धीभेद करण्याची वृत्ती आढळत नाही. सामान्यजनांना येणाऱ्या शंकांचे साधार निराकरण करून, अनुभवसिद्ध उदाहरणे देत समाज प्रबोधन करणारे सत्पुरुष ही या लेखनामागील भूमिका आहे. त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करताना हे परिमाण सहज स्पष्ट होत राहते.

मराठवाड्यासारख्या (पूर्वीच्या मोंगलाईतील) क्षेत्री 'परांडा' या गावामध्ये त्यांनी वास्तव्य केले. अनेक जातीजमातीच्या बांधवांना एकत्र आणले. वेगवेगळ्या देवतांची उपासना सांगत असतानाच 'रामभक्ती'च्या सूत्रामध्ये संघटित केले. अनुयायी बांधवांना योग, सत्संग, नामसाधना आणि सद्गुरुभक्ती या चतु:सूत्रीचे अधिष्ठान दिले. सांप्रदायिक वा स्वकर्तृत्वाचा अभिनिवेष बाळगला नाही. आपला उत्तराधिकारी नियुक्त केला नाही. मठपरंपरा किंवा लोकोत्तर प्रसिद्धीची आकांक्षा बाळगली नाही. इतर सांप्रदायिकांबद्दल द्वेषभाव वा अधिक्षेपाचा मागमूसही त्यांच्या लेखनात आढळत नाही. साहजिकच त्यांचे 'प्रबोधन कर्त्याचे' रूपच अधिक ठळकपणे लक्षात राहते. स्वत:विषयीचे औदासीन्य हे भारतीय संतमनाचे ठळक वैशिष्ट्य असले तरी स्वामी त्याला अपवाद होते. त्यांच्या जीवनातील चढउतार, बरेवाईट अनुभव, संकटे यांची ते नेहमी चर्चा करीत. पुस्तकांच्या प्रस्तावना, मनोगत, साधकांना त्यांनी लिहिलेली पत्रे, त्यांचे बहुविध स्फुट काव्य, उपलब्ध हस्तलिखिते या साऱ्या सामग्रीतून त्यांचे हे प्रबोधनकाराचे रूप अधिकच धवल होत जाते.

स्वामींच्या या समाज प्रबोधनाचा अभ्यास करताना त्यांच्या कालखंडाचे स्वरूप जाणणे अपरिहार्य आहे. संतवाङ्मयाच्या निर्मितीचे अनुसंधान अखेरीस सापेक्षपणे त्या त्या युगमानसाशी संबंधित असल्याचे आजवर अनेक अभ्यासकांनी सिद्ध केलेले आहेच. प्रज्ञानानंद सरस्वतींच्या प्रारंभीच्या काळातील काव्य वाचताना हे सहजध्यानी येते. त्यांचा जीवनकाल इ. सन १८९५ ते १९६८ असा आहे. साधारणपणे स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वीचे अर्धशतक आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतरची दोन दशके असा हा काळ आहे. पहिले महायुद्ध, टिळकयुग, ब्रिटिश वसाहतवादी राजवटीचा मध्यान्हकाळ, गांधीयुग, दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी भारतीयांनी दिलेला अपूर्व लढा, ब्रिटिश राजवटीचे अंतिम पर्व आणि विसर्जन, स्वातंत्र्यासाठी मोजावी लागलेली फाळणीची किंमत, भारत-पाक युद्धे आणि स्वातंत्र्योत्तर जीवन अशा अनेक घटनांनी प्रस्तुत काल व्याप्त आहे. प्रज्ञानानंद सरस्वतींच्या काव्यामध्ये या घटनांचे अनेक पडसाद आपल्याला दिसतात. त्यामधून त्यांची स्पष्ट विचारसरणी आणि समाजाकडून त्यांची असलेली अपेक्षा स्पष्ट होते. इ.सन १९२० च्या नंतर लो. टिळकांच्या जहाल मतप्रणालीऐवजी गांधीजींच्या असहकार चळवळींना सुरुवात झाली. नैतिक बळ वाढविण्यासाठी उपोषण, स्वदेशीच्या जागी खादी, निवडणुकात भाग न घेणे, शासनसंचलित शाळा, महाविद्यालयात प्रवेश न घेणे, पदव्या-पदांचा त्याग करणे, परकीय वस्तूंचा वापर न करणे, परकीय न्यायालये बहिष्कृत करणे अशा प्रकारच्या या चळवळी होत्या. प्रज्ञानानंद सरस्वतींसारख्या निर्भीड वृत्तीच्या व्यक्तिमत्त्वाला हा अहिंसात्मक प्रतिकार पटत नसे. हिंदू धर्माच्या तत्कालीन स्थितीने ते खिन्न होत. हिंदूंना एकत्रित येण्याचे आवाहन करीत.

'भारतदेशी या हिंदू संख्येने बहु जरी असला ।
विपटित आहे द्वेषमत्सरे, स्वस्थ असे पंगू बसला ।'

आपसातील दुहीचा नाश होऊन जर सारा हिंदू समाज संघटित झाला तरच स्वातंत्र्य मिळणे शक्य आहे अशी त्यांची स्पष्ट विचारसरणी होती. 'दुहीनेच ही दास्यता प्राप्त झाली', 'दुहीनेच परकीय सत्ता बळावे' अशा आशयाची अनेक काव्ये त्यांच्या वाङ्मयात आहेत.

'जिथे संघ नाही तिथे सौख्य नाही । जिथे संघ नाही तिथे दुर्दशाही ।
सदा जूटीने पारतंत्र्या हरावे । अहो हिंदूंनो संघसंपन्न व्हावे ।'

किंवा

'वसे ही गृही एकता पूर्ण जेथे । भजेना कदा दैन्य डोकावू तेथे ।
स्वधर्मीय लोकी जरी ऐक्य व्हावे । तरी नाही स्वातंत्र्य दूरी पहावे ।'

असा विश्वास, दिलासा ते आपल्या काव्यातून देत असत.

रझाकार आंदोलनाच्या वेळेस स्वामींचे वास्तव्य परांडा या गावी होते. या गावी त्या काळी फार अस्थिर वातावरण होते. हैद्राबाद संस्थान कायदेशीर रीत्या भारतात विलीन झाले असले तरी धर्मांतर आणि रझाकारांकडून होत असलेल्या छळाला जनतेला तोंड द्यावे लागत होते. स्वामींच्या गूढार्थ चंद्रिकेमध्ये एके ठिकाणी अशी प्रतिक्रिया व्यक्त झाली आहे. 'जर रझाकारांचा हल्ला झाला आणि स्त्रियांची बेअब्रू, विटंबना होण्याचा प्रसंग आला तर हा स्वामी संन्यासी असला तरी हाती तलवार घेऊन प्राणपणाने रझाकारांशी मुकाबला करून तुमचे रक्षण करील.' आपल्या काव्यातून

हिंदूंना प्रतिकार करण्याचा आदेश ते देत असत.

'परधर्माते सेवुनि जगणे, इष्ट नसे श्रेष्ठचि मरणे ।
धर्मरक्षणी वीर हिंदूंनो । शिवसंभाजी कृती करणे ।
ज्या शस्त्रांनी शत्रू तुमचे, सुसज्ज असती ती मिळवा ।
साधनमार्गाही तसाच साधा, शक्तीयुक्तीने खळ तुडवा ॥'

रामभक्ती प्रचार-प्रसाराचे कार्य हाती घेतलेल्या एका तपस्वी, दंडधारी संन्याशाचे हे उद्गार चकित करतात. भयग्रस्त हिंदूंना त्यांनी दिलेला अश्वासक भावही फार फार मोलाचा आहे.

'जैशासी तैसा मिळे तदा तो आक्रमणाते रिपु विसरे ।
म्याऊ कोणी न भी कदाही । सशक्त होता भीती सरे ।
व्यर्थ बोल तो वदू नये की, करणे ते करूनी दावा ।
जेणे राक्षस पुन्हा धजेना, बघण्याही तुमच्या गावा ।'

आपल्या तऱ्हेने प्रत्यक्ष कृती करण्यासाठी हिंदूंना प्रवृत्त करण्याचे कार्य ते सदैव करीत. धर्माचरणात दंभ किंवा खोटेपणा त्यांना कधीही रुचत नसे. 'समर्था गुरो धर्म रक्षार्थ यावे', 'गुरु तारका श्रीसमर्था स्मरावे', 'दूर करी शीघ्र जाच हा', 'धावा श्रीरामाचा', 'भवरा हरा भूभार' अशा अनेक कवनातून हिंदूंची अगतिकता, मुस्लिमांची अश्लाघ्य शिरजोरी, राज्यकर्त्यांचा नाकर्तेपणा, गोहत्येविषयीचा सात्विक संताप व्यक्त होतो. यामधील प्रामाणिकपणा, सच्चे सूर आणि समाजाविषयीची तळमळ अंतःकरणाला भिडते.

'निजस्वार्थ योगे न अन्या मिळावे, स्वदेशाचिया द्रोह पापा त्यजावे ।
सदा धर्मनिष्ठेसि चित्ती धरावे, सदा वासुदेवा पदी घ्या रमावे ।'

हे सूर अंतर्मुख करतात. हिंदू लोकांसाठी त्यांनी सांगितलेला आचारधर्म आजच्या बदलत्या धर्मसंकल्पनांच्या युगातही उद्बोधक ठरेल असाच आहे.

'सदा मायबापासी मानीत जावे । गुरु विप्र संतांसी व्हा नम्र भावें ।
सदा रामनामा स्वचिती स्मरावे । स्वये उद्धरोनी दुजा उद्धरावे ।
सुसेवा सदा संकटग्रस्त लोका । स्वये साहूनी क्लेश दुःखा अनेका ।
सदा आडल्यांच्या उपेगासी यावे । अहो हिंदूंनो संपसंपन्न व्हावे ॥

परमार्थाविषयीच्या साधकांच्या भ्रामक कल्पनाही ते अनेक उदाहरणे स्पष्ट करून दूर करीत.

प्रज्ञानानंद सरस्वतींनी आपल्या सहवासातील व्यक्तींना स्त्रियांकडे आदराने पाहण्याची शिकवण दिली. स्त्रियांच्या रक्षणासाठी जिवाचीही पर्वा करू नये असे ते आर्जवाने सांगत.

'धर्माच्या नारींच्या रक्षणी, झटता जरि की देह पडे ।
स्वकर्म करुनी कीर्ति इथे त्या स्वर्ग दारही मग उघडे ।'

मुलांवर हरिभजन, शुद्ध आचार यांचे संस्कार करावेत. मुले भक्तिमान, सुशील व सज्जन होतील याची काळजी घेणे हा स्त्रियांचा पहिला धर्म आहे असे ते मानीत. असा व्यापक धर्म स्त्रीधर्म प्रत्येक स्त्रीने आचरणात आणावा. म्हणजे पितृकुल, मातृकुल आणि पतिकुलाचा उद्धार होतो व आपोआपच समाजामध्ये परिवर्तन होते अशी त्यांची शिकवण असे. ते स्वतः संन्यासी होते. संन्यास धर्माची सर्व पथ्ये त्यांनी अत्यंत काटेकोरपणे सांभाळली. असे असूनही त्यांनी एखादा अपवाद वगळता संन्यासधर्माची दीक्षा कोणालाही दिलेली नाही, हे वैशिष्ट्यपूर्ण आहे.

प्रज्ञानानंद सरस्वतींचा काळ अगदी अलीकडचा असल्याने त्यांनी लिहिलेली अनेक पत्रे आज उपलब्ध होतात. या व्यक्तींमध्ये वैद्यकीय, वकील, संपादक, गृहस्थ, साधक स्त्रिया अशा विविध स्तरावरील लोक आढळतात. यामुळे त्यांची लोकसंग्राहक वृत्ती, समाजाभिमुखता आणि प्रबोधनकर्त्याची भूमिकाच अधिक ठळकपणे लक्षात राहते. ते लिहितात,

'रामावीण कोणी मज नाही जगी । स्वार्थाची सलगी करिती सर्व ।
सर्व उणेपुरे राम सांभाळितो । पाळितो पोषितो राम मज ।''

या भावनेने संसार केला असता प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालणे सहजसाध्य होते असाच त्यांचा सूर आहे. वडीलकीच्या अधिकाराने निवेदन करीत असूनही विवरणातील सापेक्षता आणि विषयानुरूप बदलणारे निवेदनाचे स्वरूप थक्क करणारे आहे. त्यामधील जवळीक, ओलावा, उत्कटता त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिकच धवल करणारी आहे.

गुरु अनुग्रहानंतर आणि दंडधारी संन्यासत्व स्वीकारल्यानंतर प्रज्ञानानंद सरस्वतींच्या जीवनाची वाटचाल शिक्षक-साधक-सिद्धपुरुष अशी होती. स्नान-संध्या-नामस्मरण, सत्‌ग्रंथश्रवण, अध्ययन, लेखन यांपासून ते कधीही दूर राहिले नाहीत. या साऱ्या गोष्टींना अनुभवांचे अधिष्ठान होते. बाबा गंगादास आणि वासुदेवानंद सरस्वती-पोटे स्वामी हे दोघेही गुरु लोकांनी अज्ञानी, साधनाहीन समजावे म्हणून विचित्र वाटणारे बाह्य व्यवहार करीत असत. उभयतांच्या या जीवनपद्धतीमुळे सर्वमान्य लोकांचा पारमार्थिक लाभाच्या दृष्टीने त्यांचेवर झटकन विश्वास बसत नसे. प्रज्ञानानंद सरस्वतींनी मात्र आहार सेवनातील, बाह्य वर्तनातील विचित्र वर्तणुकीला पूर्ण फाटा दिला. मूळचा पिंड शिक्षकाचा असल्याने ज्ञात गोष्टी इतरांना समजावून सांगण्याची अभिजात शिक्षकी वृत्ती अंगिकारिली. शिस्तबद्धता त्यांचा बहिश्चर प्राण होता. चमत्कार आणि सिद्धी यांना त्यांनी कधीही स्थान दिले नाही. सहाजिकच प्रज्ञानानंद सरस्वतींकडून पारमार्थिक लाभ घेतलेल्यांची संख्या बरीच मोठी आहे. या साऱ्यांना ऐहिक आणि पारमार्थिक जीवन विषयाचे स्वामी मार्गदर्शन करीत. मराठी, हिन्दी, संस्कृत, इंग्रजी आणि गुजराथी भाषेवर त्यांचे उत्तम प्रभुत्व होते. सात्विक शुद्ध आहार, सत्यभाषण, नामजपांची सततची अनुष्ठाने यामुळे त्यांना वाचासिद्धी प्राप्त झाली होती. शास्त्रप्रचीती, गुरुप्रचीती आणि आत्मप्रचीतीवरील निष्ठा यामुळे त्यांचा लोकसंग्रह बराच होता. विद्वत्तेच्या जोडीला त्यांचे जीवन म्हणजे धगधगीत वैराग्याचा आविष्कार होता. आपल्या शुद्ध आचार-विचारांचा वस्तुपाठ लोकांसमोर ठेवून त्यांनी समाज प्रबोधन केले. आपल्या पद्धतीने केलेले हे स्वामींचे जन-जागरण वैशिष्ट्यपूर्णच आहे.

प्रज्ञानानंद सरस्वतींनी आपल्या जीवनात खूप तीर्थाटन केले. तीर्थाटनामध्ये रामभक्तीचे स्वीकृत कार्य तडीस नेण्यासाठी त्यांनी 'प्रवचन' माध्यमाचा अंगिकार केला. लोकभाषेच्या माध्यमातून अध्यात्मविचारांचे भांडार रामकथेद्वारा अनेकांपर्यंत पोहोचविले. मध्य प्रदेशातील 'सतना' गावातील हिंदी प्रवचने, चौक, सातारा, चासकमान येथील त्यांची प्रवचने वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे त्यांचे शिष्य आजही सांगतात. स्वामी बहुश्रुत, अभ्यासू आणि संतसाहित्याचे उत्तम जाणकार होते. गूढार्थ चंद्रिका टीका वाचत असताना त्यामधील माहिती, उदाहरणे, विवेचन यांच्या सहाय्याने एखादा जाणकार उत्तम कीर्तन प्रवचन करून रामचरितमानसाचा प्रचार-प्रसार करू शकेल याची खात्री होती. गूढार्थचंद्रिकेमध्ये निरनिराळी आख्याने, पुराण कथादिकांचा संग्रह, त्याचे आजचे समाजजीवनातील संदर्भ, कीर्तनकार आणि श्रोते यांच्यामधील आचारसंहितेविषयीचे विवेचन, श्रोत्यांच्या मनातील

भगवद्भावना जागृत ठेवण्याविषयीची त्यांची सजगता, तत्कालीन राजकीय स्थितीचा उल्लेख विनोदी पद्धतीने त्यांच्यामधील स्पष्ट केलेल्या उणीवा वाचत असताना समाज-पुरुषाला जागृत करण्याचे त्यांचे प्रबोधन कार्य आपल्याला चकित करून टाकते. समाज स्थिर ठेवून त्याला सन्मार्गाला लावण्यासाठी दैनंदिन जीवनात कसे आचार-विचार ठेवावेत हे स्वामी आर्जवाने सांगतात. गूढार्थ चंद्रिकेमध्ये अशी अनेक उदाहरणे आढळतात. वर्तमानपत्रे, मासिके, व्याख्याने या साधनांचा उपयोग काही विशिष्ट वर्गच करीत असतो. अशा स्थितीत सामान्य जनसमूहाला आत्मकर्तव्याची जाणीव स्वामींनी प्रवचनांच्या द्वारा करून दिली.

प्रज्ञानानंद सरस्वतींच्या काळात परमार्थाच्या नावाखाली अनेक धर्म संप्रदायाचे स्तोम माजू लागले होते. चमत्कार आणि सिद्धींच्या मागे धावण्याची प्रवृत्ती बळावत चालली होती. काही भोंदू लोक याचा गैरफायदा घेत. योगाभ्यासी लोकांमध्ये साध्य-साधनांचा घोटाळा निर्माण होत असे. अशा स्थितीत स्वामींनी विरक्तीला प्राधान्य दिले. सद्गुरुभक्ती, नामस्मरण, रामभक्ती आणि योगसाधना हा आचारधर्म ठासून सांगितला.

'जिथे चित जाई, तिथे राम पाही । समाधान तेथे नसे दूर काही' अशी सहजसोपी शिकवण दिली. 'धर्माचरणाने वैराग्यप्राप्ती, वैराग्यप्राप्तीच्या बळाने योगसाधना आणि योगसाधनेच्या बळाने ज्ञानप्राप्ती' हे सूत्र स्वतःचा वस्तुपाठ देत लोकांना समजावले. प्रपंचाचा त्याग करून निवृत्ती मार्ग स्वीकारण्यास तर सांगितले नाहीच. परंतु अशा मार्गाने जाणाऱ्यांना स्वामींनी परावृत्त केले. स्वामी लोकगंगेच्या प्रवाहाविरुद्ध उभे राहिले नसले तरी जे जे सवंग, अज्ञानजन्य, दांभिक दिसले त्याचा खरपूस समाचार त्यांनी आपल्या काव्यातून, प्रवचनांतून घेतला.

'शब्दमाधुरी बाह्यलीनता समयी सूचकता ।
दावूनी लोका आव आणिती विरक्त साधूचा ।
चमत्कार करण्याची शक्ती प्राप्त तपस्येने ।
साधुत्वाची प्राप्ती होतसे भक्ती ज्ञानाने ।
साधुत्वाने परिक्षिप्याते स्वये साधु बनणे ।
चमत्कारी भुलता धन देऊनी धर्मनाश न करणे ।
परोपदेशी कुशल नाचरे ते भोंदू जाणा ।
मुखे अशांच्या स्वहितकांक्षा स्वप्नी नच आणा ।'

असा सावधगिरीचा इशारा वारंवार देऊन समाजमनाला जागृत करण्याचे कार्य स्वामींनी अथकपणे केले.

'भगवद्गीता शिकवण आचरणी, ज्या दिनी जगी पसरे ।
तद्दिनी दैन्य, दुराशा, दुर्जनता, दुःख, दोष ताप सरे ।'

असा आश्वासक दिलासा समाजमनाला दिला.

डॉ. सौ. अनिता प्रभाकर केळकर
बाणेर रोड, पुणे.

नामाचा महिमा ज्याला उमगला, त्याला इतर साधने तुच्छ वाटतात. पण सोप्या व फुकट औषधाची किंमत नसते.

मानवतापूर्ती साधन व संध्योपासना

प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी

एम.ए. मराठी-हिंदी संस्कृत पीएच.डी. 'श्रीएकनाथी भागवताचा विवेचक अभ्यास' प्रबंध प्र. संत वाङ्मयाच्या व्यासंग-प्रवचने-लेखमाला.

॥ ग्रंथमहती - परिचय ॥

प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांनी दण्डग्रहण केल्यानंतर गुरुकृपेने त्यांची प्रातिभशक्ती जागृत होऊन त्यांनी अनेक अध्यात्मग्रंथ लिहिले. प्रासादिक, ओघवती आणि ओजस्वी लेखनशैली हे त्यांच्या सर्वच ग्रंथांचे वैशिष्ट्य असून संस्कृत, मराठी, हिंदी, गुजराथी व इंग्रजी भाषांवरील त्यांचे प्रभुत्व पदोपदी जाणवते. वैदिक ज्योतिषादि सकल शास्त्रांचा सखोल अभ्यास, योगशास्त्र, मंत्रशास्त्रांची प्रत्यक्ष अनुभूती इत्यादीमुळे त्यांच्या लेखनाला प्रचीतीचा रोखठोक भक्कमपणा प्राप्त झाला आहे. भारतीय अध्यात्मशास्त्रात संध्योपासनेचे महत्त्व अनन्यसाधारण असून प्रस्तुत 'संध्योपासना' या विषयावरील इतके शास्त्रशुद्ध, सांगोपांग प्रचीतीचे विवेचन करणारा ग्रंथ मराठीत दुर्लभच म्हणावा लागेल. स्वतः प. पू. स्वामी हे 'त्रिकाल संध्या करणारे. गायत्री पुरश्चरण हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. कुशाग्र तत्त्वग्राही आणि चिकित्सक बुद्धीबरोबर अनेक संदर्भ ग्रंथाचा धांडोळा घेण्याची विलक्षण क्षमता असल्याने... या शास्त्रीय ग्रंथामध्ये आधुनिकांच्या बुद्धिवादाला आवश्यक वाटणाऱ्या कार्यकारणभावाचे विश्लेषण मानसशास्त्रीयदृष्ट्या केले आहे.'

॥ संध्योपासनेवरील प्रबंध ॥

प्रस्तुत ग्रंथ म्हणजे प. पू. स्वामीजींचा हा एका अर्थी प्रबंध ग्रंथच होय. संध्योपासनेचे सांगोपांग विवेचन यात प्रकटले आहे. या ग्रंथाच्या प्रास्ताविक निवेदनात स्वामीजी म्हणतात -

"नाऽयं ज्ञानी नवाज्ञानी न शास्त्री न च पंडितः ।
धार्ष्ट्यं तथापि कृतवान् संध्योपासन लेखने ॥"

अर्थात आपण ज्ञानी, शास्त्री, पंडित नाही तथापि आपण संध्योपासना लेखनाचे धाडस करीत आहोत. यात लेखकाचा संपूर्णतः विनय आहे हे निश्चित ! प्रस्तुत ग्रंथासाठी वापरलेल्या आधारभूत ग्रंथांची नावे व यादी पाहूनही छाती दडपून जाईल अशी स्थिती आहे. अनेक उपनिषदे, स्मृतिग्रंथ, पुराणे, उपनिषद् भाष्य ग्रंथ, इतर भाष्य ग्रंथ, निबंध ग्रंथ, संध्येच्या विविध पोथ्या आणि इतर ग्रंथ असे ९८ ग्रंथ इथे नमूद केलेले असून आधारास घेतलेले स्मृत्यादि ग्रंथ देखील ५०/६० इतके आहेत. ही आधारभूत, सारभूत ग्रंथांची भक्कम प्रमाणे पू. स्वामीजींच्या प्रगाढ पांडित्याची, बृहद्व्यासंगाची प्रत्यक्षच साक्ष आहे. प्रबंध वाचताना हे आपल्या ध्यानी येईल. स्वामीजी केवळ शास्त्रीय पंडितच नाहीत तर बहुभाषाकोविद आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व आत्मानुभूतिसंपन्न असे आहे. असे असूनही - 'बुडती हे जन न देखवे डोळा ।' अशा कळवळ्याने सकल सामाजिक घटकांच्या उद्धारासाठी आत्मीयतेने पण परखड, रोखठोकपणे त्यांनी संध्योपासना मांडली आहे. संध्योपासनेसारखे 'साधन' आणि 'गायत्री'सारखा दिव्यमंत्र याचा सर्वांनी वाणवसा घ्यावा अशी आंतरिक ओढ आणि तळमळ दिसून येते. त्यामुळेच मानवतापूर्तीसाठी संपूर्ण जीवनाचा विचार करून –

"संध्या स्नानं जपो होमः देवतानां च पूजनम् ।
वैश्वदेवं तथा ऽऽ तिथ्यं षट्कर्माणि दिने दिने ॥"

अशा नित्य कर्मांचा ते आग्रहपूर्वक विचार मांडून पुरस्कार करतात. किंबहुना प्रस्तुत प्रबंध विवेचनाचा हाच मुख्य विषय असलेला दिसून येतो.

॥ भगवद्कृपा ॥

१) आपल्या लेखनामागील प्रेरणा स्पष्ट करताना - "भगवत् प्रेरणा आणि भगवत् कृपा याच्या मुळाशी आहे" (२) ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट ते स्वतःच सांगतात. एवंच स्वामींच्या लेखनामागे 'हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा झाली ॥' हा भगवदादेश पदोपदी दिसून येतो. त्यांच्या स्वानुभूत अनुभव निवेदनातून याचे प्रत्यंतर येते. या संबंधी ते सांगतात की, "संध्येसारख्या शास्त्रीय विषयावर सविस्तर, शास्त्रशुद्ध, साधार लिहिणे आणि त्यातून आधुनिकांच्या बुद्धिवादाला अत्यावश्यक वाटणारे कार्यकारणभावदर्शक वैज्ञानिक व मानसशास्त्रीय दृष्टीने विवरण सानुभव करणे क्रमप्राप्त ठरले." (३) "हे कार्य त्या विश्वसंचालकानेच केले." (४) सनातन धर्माच्या प्रत्येक व्यक्तीस "हा ग्रंथ द्विजास व द्विजेतरासही उत्तम प्रकारे परमहित मार्गदर्शक होईल." (५) असा लेखकास पूर्ण विश्वास आहे.

ग्रंथ-विषय विभागणी

संध्योपासना या "ग्रंथाचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन विभाग असून पूर्वार्धात - शौच आचमनापासून ते संध्यासमाप्तीपर्यंतच्या विविध उपांगांची व अंगांची गायत्री जप ध्यानरूपी मुख्य संध्येची, विधिनिषेध वर्णनासह शास्त्रीय चर्चा केली आहे." (६) स्वामीजींच्या उपरोक्त निवेदनात - "हे प्रतिज्ञोत्तर बोल माझे । उघड आइका ॥" असे सांगण्याचे सामर्थ्य आहे. ते सांगतात की, "सूर्योदयापूर्वी संध्या करून सूर्योदयावेळी सूर्यासमोर उभे राहून मंत्राचा उच्चार निदान सहा महिने तरी करून पहा. आणि सुख, समाधान व आरोग्य यांची रुपयात अर्धा आणासुद्धा वृद्धी न झाली तर हा (लेखक) एका बाजूची मिशी ठेवील !" (७) लेखकाने इतक्या निकराने सांगावे यात ठाम निश्चिती आणि मानवधर्माची कळकळ स्पष्ट होते.

१) "ब्राह्मण्यस्य रक्षणादेवस्यात वैदिको धर्मः ॥" शंकराचार्य.

२) "ब्रह्मतेजो बलंबलम् ।" हा दृष्टिकोन स्पष्टपणे समोर असल्यामुळे जीवनातील यमनियमांचा ते आग्रह धरताना दिसतात. "आचार प्रथमोधर्मः ॥" हा त्यांचा परखड आग्रह आहे.

॥ अहरहः संध्या मुपासीत ॥

दुसऱ्या प्रकरणापासून प्रत्यक्ष "संध्योपासना" या विषयाचे विवेचन सुरू होते. विप्र हा एक वृक्ष असून संध्या त्याची मुळे आहेत. चार वेद त्याच्या मोठ्या शाखा आहेत. धर्म व धर्मकर्मादि त्याची पाने आहेत. म्हणून संध्यारूपी मुळांचे प्रयत्नपूर्वक रक्षण केले पाहिजे. मुळेच तुटली की मग वृक्षशाखा इ. काहीच नाही.

"विप्रो वृक्षः तस्य मूलानि संध्या ।
वेदाः शाखाः धर्म कर्माणि पत्रम् ।
तस्मात् मूलं प्रयत्नतः रक्षणीयं ।
छिन्नं मूले नैव वृक्षो न शाखाः ॥ (दे. भा.)

अर्थात नित्य संध्येचे महत्त्व धर्मकर्मात सर्वोपरी आहे.

॥ संध्येची व्याख्या ॥

संध्या म्हणजे काय? याचे व्याख्येसहित त्यांनी विवरण मांडले आहे. संध्या म्हणजे साक्षात् चिच्छक्ति देवताच होय.

"संध्या नाम चिच्छक्ति देवता ॥"

अर्थात संधीकाळी केली जाणारी सूर्यमंडलांतर्गत सच्चिदानंद स्वरूपिणी आदिशक्ती सावित्रीची - गायत्रीची जी उपासना ती संध्योपासना होय. श्रीवेदव्यासांच्या शब्दात - संधीकालात केली जाणारी सूर्याची जी उपासना ती संध्योपासना होय. "उपासनं संध्या सूर्यस्य ॥"

यापुढे संध्या आणि गायत्री या विषयीच्या अनेकानेक शंकांचे समाधान करीत प्रश्नोत्तराच्या स्वरूपात विवेचन मांडले आहे. उदा. गायत्रीचे ध्यान कोठे करावे? ब्रह्मरंध्रात की, नाभिस्थानी? या शंकाप्रश्नाचे यथायोग्य निरसन करून त्याचे परिणामही त्यांनी सांगितले आहेत. संध्या ही अशौचात आपत्कालीदेखील कशी करता येईल, केली पाहिजे हे ते सांगतात.

प्रकरण ३ मध्ये उपनयन आणि पुनरुपनयनाचा विषय मांडून पुढे यज्ञोपवीताचा विषय बारकाव्याने दिग्दर्शित केला आहे.

'ज्ञानात्मक विष्णूने ब्रह्मदेवास मायारुपी सूत्र घातले म्हणून ब्रह्मसूत्र म्हणतात. यज्ञाने म्हणजे विष्णूने घातले म्हणून यज्ञोपवीत म्हणतात. गुण (सूत्र) मय मायेचे सूचक म्हणून सूत्र म्हणतात.'(८) "...जानव्यावर तीन वेद, तीन देव, तीन अग्नी, तीन लोक इ. वास करतात. गाठीवर तीन मात्रा नाद यासह ॐकार आणि गाठीतून बाहेर आलेल्या टोकावर गायत्रीदेवी वास करते."(९)

स्वामीजींनी पाचव्या प्रकरणात गायत्रीचा महिमा सविस्तर, साधार मांडलेला आहे. १) देवी भागवत पुराणातील २५ अध्यायातून गायत्री, संध्या वर्णन मांडले आहे.

२) भागवत पुराणाचा आरंभ व समाप्ती 'धीमहि' शब्दाने केलेली आहे.

३) वाल्मिकी रामायण २४ हजार श्लोकांचे आहे. याचे कारण प्रत्येक हजाराच्या आरंभीच्या श्लोकाचा प्रारंभ गायत्री मंत्रातील २४ अक्षरांनी केलेला आहे. इ. ग्रांथिक आधाराचे बारकावे सादर करून त्यांनी गायत्रीचे माहात्म्य परोपरीने स्पष्ट केले आहे. गायत्रीचा महिमा प्रत्यक्ष ब्रह्मदेव नारदमुनींना सांगताना म्हणतात —

"चतुर्वेदाश्च गायत्री पुरा वै तुलिता मया ।
चतुर्वेदात परा गुर्वी गायत्री मोक्षदा शुभा ॥"

अर्थात तराजूच्या एका पारड्यात चारही वेद आणि दुसऱ्या बाजूस गायत्री घालून तोल केला तेव्हा गायत्री सर्वश्रेष्ठ (गुर्वी) श्रेष्ठ - शुभं मोक्षदायक आहे. म्हणून नारदा तू गायत्रीचे जपध्यान कर."(१०) प्रस्तुत विवेचनात "गायत्री परमा गतिः ॥" हा विचार परोपरीने मांडला आहे.

॥ संध्योपासनेतील उपांगे - पूरक माहिती ॥

संध्योपासनेच्या संदर्भात विचार करता द्विजाने संध्या ही केलीच पाहिजे. किंबहुना त्यावरच ब्राह्मण्य अवलंबून आहे. इतक्या कडक शब्दात त्यांनी संध्येचा पुरस्कार केला आहे.

संध्योपासनेतील भांडी, (ताम्हण, पळी, भांडे, तांब्या इ.) शौचविधी, आचमन, शिखाबंधन व मोचन, स्नान व तीर्थे भस्मधारण, पवित्रक धारण, मृत्तिका भस्मादि पुण्ड्धारण, प्राणायाम इत्यादी गोष्टी संध्योपासनेला आवश्यक आहेत म्हणून हा समग्रविषय त्यांनी प्रकरणशः सविस्तर समजावून साधार मांडला आहे. (प्रकरण ८ ते १६) संध्यावंदन करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या प्रत्येकाने वाचून बोध घ्यावा अशी एकत्रित माहिती इथे आपणास सहजी मिळते.

॥ दिग्बंध - आसन विचार ॥

संध्येचा संकल्प मार्जन, मंत्राचमन, अघमर्षण, सूर्याला अर्घ्यप्रदान आणि प्रदक्षिणा इ. गोष्टी संध्योपासनेत अतीव महत्त्वाच्या आहेत. या गोष्टींचा साक्षेपी विचार त्यांनी विवरण करून मांडला आहे. त्याही पुढे जाऊन संध्येला बसण्यासाठी लागणाऱ्या आसनाचा विचार देखील त्यांनी स्वानुभवाने मांडला आहे. संध्येतील दिग्बंधाच्या संदर्भात आसनविधीचा प्रभाव फार मोठा असून आश्चर्यकारक आहे. उदा. "अपक्रामन्तु... मंत्राने कोणत्याही कार्याचा दिग्बंध केला असता डास, माशा इ. उघड्या अंगाला स्पर्शसुद्धा करू शकत नाहीत. झोपतानादेखील -

"अपक्रामन्तु भूतानि पिशाच्चा सर्वतोदिशम् ।
सर्वेषामविरोधेन निद्राकर्म समारभे ॥"

असा दिगबंध केला तरीसुद्धा डास भराभर पळून जातात. हे चक्षुर्वैसत्यम् आहे." (११) याच प्रकरणात (प्र. २१) आसनाचा विचार मांडताना वंद्य, पूज्य व्यक्ती समोर प्रौढासन घालून बसू नये. तसे त्यांच्या देखत घालणे म्हणजे त्यांचा अनादर, अपमान करणे ठरते." (१२) असा सामाजिक शिष्टाचाराचा विचार मांडून व्यावहारिक आचाराचे प्रबोधनही ते करतात.

॥ मंत्र म्हणजेच देवता ॥

मंत्रासंबंधीचे विचार प्रत्यक्ष अनुभूतीच्या प्रचीतीने मांडताना स्वामीजी लिहितात की, 'मंत्रातच देवता असते व मंत्रातून मंत्रानेच प्रगट होते. याचा अनुभव १९३२-३३ पासून अनेक मंत्रांच्या बाबतीत अनेक वेळा घेतला होता... गेल्या २८/२९ वर्षात या लेखकाने शेकडो वेळा अनुभव घेतले... गायत्री मंत्र सिद्ध झाला की कोणताही मंत्र सहज सिद्ध होतो" (१२) पू. स्वामीजींची ही भाषा त्यांच्या प्रत्यक्ष प्रचीतीच्या बोलण्याची आहे. 'प्रचीतिवीण बोलणे । ते अवघेच कंटाळवाणे ॥' असे समर्थ सांगतात. इथे प्रचीतीमुळेच पू. स्वामींच्या लेखनाला वजनदारपणा आला आहे.

॥ दैवी प्रातिभ स्फुरण ॥

"गोविंदादि नामाचा अंगुष्ठादिकाशी संबंध" हे तेवीसावे संपूर्ण प्रकरण म्हणजे प. पू. स्वामीजींच्या दैवी प्रातिभ प्रत्यक्ष दर्शनच होय. उदा. लेखक सांगतात - "गोविंदाचा अंगुष्ठाशी, महीधराचा तर्जनीशी, हृषीकेशचा मध्यमेशी, त्रिविक्रमाचा अनामिकेशी, कनिष्ठिकेचा विष्णूशी व माधवाचा करतलाशी काही संबंध आहे का अशी शंका लेखकास आली आणि या शंकेचे समाधान तत्काळ स्फुरण पावू लागले. तेच खाली दिले आहे." (१३) वाचकांनी मुद्दाम वाचावे असे हे प्रकरण आहे. (प्र.२३)

या न्यासानंतर प्रणवन्यास, सप्तव्याहृति न्यासांचे विविध अर्थ त्यांनी

स्पष्ट केले आहेत. (प्रकरण २४)

॥ गायत्रीचे ध्यान व आवाहन ॥ (प्रकरण २५)

"या संध्या सैव गायत्री सावित्री च सरस्वती ॥"

अर्थात जिला संध्या म्हणतात तीच गायत्री, तीच सावित्री व तीच सरस्वती. म्हणूनच "मुक्ता विद्रुम" या श्लोकात वर्णिलेले ध्यानच संध्येचे ध्यान मानणे संयुक्तिक आहे असे ते सांगतात. गायत्री ध्यानाचा श्लोक असा –

अथ गायत्री नाम देवतां ध्यायामि –
"मुक्ताविद्रुम - हेमनीलधवलच्छायैर्मुखैस्त्रीक्षणै ।
युक्तामिन्दुकलानिबद्धमुकुटां तत्त्वार्थवर्णात्मिकाम् ॥
गायत्रीं वरदाऽभयाऽङ्कुश-कशा-शूलं कपालं गुणं ।
शंखं चक्रमथारविन्दयुगुलं हस्तैर्वहन्तीं भजे ॥"

ध्यानातील या गायत्री देवीचे आवाहन म्हणजे निमंत्रण, बोलावणे. ये अशी प्रार्थना मंत्राने करणे. कारण "मंत्राधीनं तु दैवतम् ।" देवता या मंत्राच्या अधीन असल्याने त्यांना यावेच लागते. ध्यानाने चित्ताची एकाग्रता वाढते. शुद्धसुखाची प्राप्ती होते.

॥ ध्यातस्य पूजां कुर्वीत ॥

ज्या देवतेचे ध्यान धरून आवाहन केले जाते तिची पूजा केली पाहिजे. मनानेच त्या देवतेची पंचोपचार पूजा करावी. गायत्रीची पंचोपचार पूजा सांगताना - पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचभूते अर्पण करणे हा पंचोपचार पूजेतील मुख्य विषय आहे, असे ते सांगतात. पंचमहाभूतांचा व पंचविषयांचा पसारा म्हणजे प्रपंच. (प्र + पंच) अशी प्रपंचाची व्याख्या ते सहजी सांगून जातात. पंचोपचार मानसपूजेत अपार आनंद मिळतो. इथेही स्वतःची प्रचीती सांगून ते लिहितात - "मनाने अर्पण केलेल्या पदार्थाचा सुगंध प्रत्यक्ष घ्राणेंद्रियास येऊ लागतो ! हे लक्षात ठेवावे की, अनेकांनी गेल्या ५/१० वर्षांच्या काळात हे अनेक वेळा अनुभवले आहे. हे त्रिविध प्रचीतीने सिद्ध झालेले सत्य आहे." (१५)

॥ मुद्रा वर्णन ॥

इष्ट देवतांच्या प्रीत्यर्थ हात व हातांची बोटे वगैरेंनी करावयाच्या विविध आकृती म्हणजे मुद्रा होत. मुद्रा ही देवांना आनंद देणारी व पापांना पळवून लावणारी आहे.

"मोदनात् चैव देवानां द्रावणात पापसंततेः ।
तस्मात् मुद्रेति सा ख्याता सर्व कामाऽर्थ साधिनी ॥"

संध्योपासनेत गायत्रीचे ध्यान, आवाहन व पूजा केल्यानंतर मुद्रा दाखवावयाच्या असतात. म्हणूनच प्रस्तुत प्रबंधात मुद्रा वर्णनाचे विस्तृत आणि सविस्तर केलेले वर्णन उद्‌बोधक अणि आवश्यक ठरले आहे. सुमुखं, संपुटं, विततं, विस्तृतं, द्विमुखी, त्रिमुखी इ. २४ मुद्रा कशा कराव्या याचे प्रात्यक्षिकच २६ व्या प्रकरणात वर्णन करून मांडले आहे. शिवाय या २४ मुद्रांच्या रेखाकृतीदेखील देऊन संध्योपासकांची व मुमुक्षू साधक अभ्यासकांची फार मोठी सोय झाली आहे.

॥ गायत्री जप ॥

संध्योपासनेत गायत्री मंत्रजप हा अत्यंत महत्त्वाचा आहे. किंबहुना "संध्या म्हणजे गायत्रीचा जपच होय. शौनक स्मृती हेच सांगते." (१६) जप हा फार सावकाश किंवा फार घाईने उच्चारू नये. 'वरेण्यं' चा उच्चार "वरेणियम्" असा केला पाहिजे अशी सूक्ष्म बारकाव्याची सूचनाही ते अवश्य देतात. गायत्री मंत्राचे तीन्ही पाद तोडून म्हणावे. जोडून म्हटल्यास ब्रह्महत्येचे पातक लागेल. तोडून म्हटल्यास ब्रह्महत्येचा विनाश होईल. प्रणव हा पुरुष आणि गायत्री ही प्रकृति असून गायत्री जपाने प्रणव श्रवणी ऐकू येऊ लागतो. "गायत्री प्रकृतिर्ज्ञेयः प्रणवः पुरुषः स्मृतः ।"

– बृ. पाराशर स्मृती अ. ३।५

लय योगाने प्रकृतीचा पुरुषात लय होतो. या प्रणवाचा 'तस्य वाचकः' असलेल्या ब्रह्मात लय झाला की निर्विकल्प समाधी सिद्ध होते. गायत्री जपाने ब्रह्मज्ञान प्राप्त होते व मोक्ष मिळतो तो याच मार्गाने इ. निष्कर्ष स्वामीजींनी प्रत्यक्ष स्वानुभूतीतून मांडले आहेत.

यापुढे मंत्र जापकाने शुद्धाचरणी असले पाहिजे. त्याने पाळावयाचे नियम इत्यादींचे मार्गदर्शन, तपशीलवार बारकाव्याने केले असून ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे. उदा. गायत्री मंत्राचा जप हा अंधारात, अपवित्र ठिकाणी, आसनाशिवाय, उष्ट्या तोंडाने, अंथरूणावर करू नये. नग्न देहाने जप करू नये. डोक्यावर वस्त्र नसावे. शेंडीला गाठ मारलेली असावी. जपमाळेला डाव्या हाताने स्पर्श करू नये इ. इ.

जपमाळेसंबंधी देखील पू. स्वामीजींनी मांडलेले विवेचन अत्यंत शास्त्रीय व उद्‌बोधक असेच असून जिज्ञासू साधक, अभ्यासूंनी अवश्य वाचावे असेच आहे. गायत्रीचे सकाम प्रयोग देखील आज विज्ञान युगाचे नगारे बडविणाऱ्या तथाकथित बुद्धिवाद्यांनी अवश्य पाहावेत.

॥ चोवीस नावांची साखळी ॥

प्रकरण ३६ मध्ये पू. स्वामीजींनी केशवादी चोवीस नावांचा अर्थ आणि त्यांचा परस्पर संबंध उलगडून मांडला असून तो खरोखरीच त्यांच्या अंतस्फूर्त प्रभाप्रज्ञेतून प्रकटलेला आविष्कार आहे असेच म्हणावे लागेल. अत्यंत शास्त्रीय पद्धतीने केशव-नारायण-माधव-गोविंद इ. २४ नावांची परस्पर संबद्ध - एकातून एक विशेषत्व प्रकट करणारी शृंखला उलगडून मांडली आहे. हे विवेचन अनोखे असेच आहे.

संध्योपासना ग्रंथाच्या पूर्वार्धातील अभ्यासपूर्ण, चिंतन, मनन, व्यासंग आणि निजध्यासातून अनुभव संपन्न अशी ३८ प्रकरणे मांडल्यानंतर उत्तरार्धात ऋग्वेदी, यजुर्वेदी आणि तैत्तिरीय संध्यांचे प्रयोग क्रमाने मांडले आहेत. प्रत्येकाची वैशिष्ट्ये व वेगळेपण बारकाव्याने दाखवून दिले आहे.

॥ पसायदान ॥

ग्रंथाच्या शेवटी –

"आमच्या आध्यात्मिक - आधिभौतिक व आधिदैविक तापाचा नाश होऊन ब्रह्मस्वरूप प्राप्तीरूपी शांती आम्हास मिळो" - अशा शब्दात अखिल मानवजातीसाठी त्यांनी वैश्विक मागणे मागितले आहे. एका अर्थी संध्योपासना या ग्रंथाचे हे पसायदानच आहे असे म्हणता येईल.

एवंच ब्र. भू. प. पू. परिव्राजकाचार्य श्री स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांच्या 'संध्योपासना' या प्रबंध ग्रंथाने अखिल विश्वातील मानव जातीवर महदुपकार झाले असून त्यांचा हा शेवटचा ग्रंथप्रसाद (शेंडेफळ) म्हणून स्वीकारून आपले जीवन कृतकृत्य करून घ्यावे. गायत्री उपासना म्हणजे

साक्षात तेजाचीच उपासना असून अखिल भरत खंडातील समग्र अध्यात्म वाङ्मयात तेजोपासनाच सर्वमान्य आहे. उपनिषत्कारांनी तर मानवांना "तमसोमाज्योतिर्गमय ।" असाच आदेश दिला आहे. तेजाची उपासना हे तर मानवी जीवनाचे ब्रीदवाक्य असून 'तेजोऽसि मे तेजो देहि ।" अशी तेजाचीच मागणी केलेली आहे. प. पू. स्वामीजींनी हा तेजोपासनेचा - संध्योपासनेचा सांगोपांग विस्तृत प्रबंध ग्रंथ लिहून महान राष्ट्रीय कार्य केले आहे. राष्ट्रातील आचारसंपन्न तेजस्वी जीवनसंपदा घडविणारी ही "घटना" आहे. अतः भारतातील प्रायः सर्व, निदानपक्षी प्रमुख भाषांतून या ग्रंथाचा अनुवाद होऊन सर्वच प्रांतात हा दैवी आदेश पोहोचला पाहिजे असे वाटते. भारतीय अध्यात्मसाधनेचा प्राण ठरलेली ही तेजोपासना मराठीत प्रकट करून स्वामींनी मराठी भाषेवर आणि महाराष्ट्रावर थोर उपकार केले आहेत. हा ग्रंथ प्रसाद अन्य भाषिकांनाही प्राप्त व्हावा असा मानस प्रकट करून ही अल्पशी लेखनसेवा प. पू. श्री स्वामींच्या चरणी अर्पण करीत आहे.

"राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय !!"

शुभं भवतु ।

संदर्भ :

१) 'संध्योपासना' - पृ. ०३ - डॉ. सौ. अनिता केळकर

२) तत्रैव - लेखकाचे निवेदन - पृ. ०६

३) तत्रैव - लेखकाचे निवेदन - पृ. ०७, ४) तत्रैव - लेखकाचे निवेदन - पृ. ०७

५) तत्रैव - लेखकाचे निवेदन - पृ. ०८, ६) तत्रैव - लेखकाचे निवेदन - पृ. ०८

७) मानवधर्म प्रकरण १, पृ. ३९

८) तत्रैव - प्रकरण ४, पृ. ६३

९) तत्रैव - प्रकरण ४, पृ. ६४

१०) तत्रैव - प्रकरण ५, पृ. ६७

११) प्रकरण २१ - पृ. १४०, १४१

१२) प्रकरण २२ - पृ. १४४

१३) प्रकरण २३ - पृ. १५३

१४) प्रकरण ३२ - पृ. २०६

१५) प्रकरण २५ - पृ. १६०

१६) प्रकरण २७ - पृ. १७७

प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी
सांगली

नको विभव राज्यादि सुख सत्ता विपत्ती मूळ ।
नाम सुधारस नित्य दे, निर्दालक भव शूळ ॥

पथाशिखा मयूराणां नागानां मणयो यथा। तद्वद्वेदांग शास्त्राणां ज्योतिषं मूर्धनि स्थितम् ॥

वेदांच्या विविध शाखांमध्ये ज्योतिष हे प्रधान आहे, असे वरील श्लोकात महर्षि लगध म्हणतात. व्यवहारातही पावलोपावली ज्योतिषाची गरज भासतेच. पूर्वापार काळापासून प्रथम कुतूहल म्हणून, नंतर अभ्यास म्हणून मानवाचे खगोलाकडे लक्ष वेधले आहे. नक्षत्र, ग्रह, ताऱ्यांची प्रमाणबद्ध गती आणि त्यांचे मानवी जीवनावर, इतकेच नव्हे तर एकंदरीत निसर्गावर होणारे दृश्य परिणाम पाहता, अनुभविता याचे एक शास्त्र बनले. पिढ्यानूपिढ्या, वर्षानुवर्षे याची प्रचीती घेतली गेली. संशोधकांनी ग्रंथ रचले. अभ्यासकांनी समाजहितासाठी त्याचा उपयोग करून घेतला. अनेकांना अनेक प्रकारच्या संकटांमधून मुक्त करण्यासाठी उपाय योजना सुचविल्या.

प. पू. प्रज्ञानानंद सरस्वती आणि ज्योतिषशास्त्र

वे. मू. ज्यो. नीळकंठ नागेश हेर्लेकर

दशग्रंथी, अहिताग्निपालक, वेदाध्यायी, सदाचरणी पुरोहित. सुमारे २०० भागवतकथा वाचन-कथन वेद-वेदांग-पुराणे यांचे गाढे अभ्यासक. प. पू. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामींचे [illegible]. ज्ञानेश्वरी, श्रीरामचरितमानस [illegible] उत्तम परिशीलन कर्ते. पुण्याच्या [illegible] शास्त्रींकडे वेदाध्ययन. प्रज्ञानंद गुरुकुलाचे संस्थापक ([illegible]) १०/१९ [illegible]

सांगितलेले भविष्य किंवा सुचविलेला उपाय सुफलित होण्यासाठी ज्योतिषालाही काही पथ्ये पाळावी लागतात. यशस्वी ज्योतिषी होण्यासाठी जसा शास्त्राचा सांगोपांग अभ्यास आवश्यक आहे, त्याहीपेक्षा शुद्ध आचरण, दैवी उपासना, गुरुकृपा आणि सत्यनिष्ठता यांची नितांत आवश्यकता आहे. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास प. पू. प्रज्ञानानंद स्वामींच्या ठिकाणी हे सर्व होतेच. शिवाय ते ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरु असल्यामुळे समोर येणाऱ्या व्यक्तींच्या, शिष्याच्या पूर्वकर्माचे आकलन त्यांना होत असल्यामुळे त्या कर्माच्या निरासासाठी त्याने कोणती उपासना करणे आवश्यक आहे हे जाणून ते त्याचेकडून करवून घेत असत. पण त्याचा त्यांनी कधी बाजार मांडला नाही. त्यामुळे त्यांची शिष्यसंख्या तशी मर्यादितच राहिली. गुरुमंत्र घेण्याची एखाद्याची इच्छा असेल तर वरीलप्रमाणे सर्व पाहून त्याच्या कुंडलीचा अभ्यास करून त्याला काही उपासना, अनुष्ठान सांगून ते झाल्यावर मग कुंडलीनुसार त्याची इष्टदेवता जाणून त्या देवतेचा गुरुमंत्र देत असत. त्या शिवाय व्यावहारिक दृष्ट्याही त्यांच्या ज्ञानाचा उपयोग अनेकांनी करून घेतला होता. अजूनही तसे दाखले सांगणारे त्यांचे शिष्य आहेत.

ज्योतिषविषयक त्यांचे ज्ञान किती सूक्ष्म होते ते पहायचे असेल तर स्वामींनी रामचरित मानसावर जी गूढार्थचंद्रिका नावाची बृहत् टीका लिहिली आहे ती पहावी. जिथे ज्योतिषविषयक संदर्भ आले आहेत तिथे त्यांनी ते स्पष्ट उलगडून दाखविले आहेत. उदा. 'कल्पभेद हरि चरित सुहाए । भाँती अनेक मुनीसन्ह गाए ॥' यातील कल्प म्हणजे काय? कालगणना कशी, काळाची परिमाणे कोणती हे मांडत असताना लव, निमेष, पल, घटिकापासून कल्पापर्यंत गणना दाखविली आहे.

पुढे 'नौमी भौमवार मधुमासा । अवधपुरी यह चरित प्रकासा ॥' इथे नवमी ही रिक्ता तिथी असली तरी (रिक्ता तिथी शुभकार्यास वर्ज्य) मंगळवारी रिक्ता तिथी शुभ. यासाठी 'शनिभौमगता रिक्ता सर्वसिद्धि प्रदायिनी' असे ज्योतिष शास्त्राचे उद्धरण देऊन रामनवमी रामोपासनेसाठी, कृष्णाष्टमी कृष्णोपासनेसाठी शुभ म्हणून गोस्वामींनी त्या तिथीस चरित्र प्रकाशित केले असे प्रतिपादन आहे. त्याबरोबरच पूर्वीची महिन्यांची नावे ही पहायला मिळतात. मधु-चैत्र, माधव-वैशाख वगैरे.

'तिथिर्वारंच नक्षत्रं योगं करणमेवच, पंचांगम्' ॥ श्रीराम जन्माचे वेळी आलेल्या गोस्वामींच्या 'जोग लग्न ग्रहवार तिथी सकल भए अनुकूल' ह्या दोह्यावरील टीका तर मुळातच पहावयास हवी. पंचांगशुद्धी म्हणजे काय, योग कशाला म्हणतात, करणाची व्याख्या, निरयन व सायन लग्न कुंडली, तिथीबद्दल सगणित विवेचन १ तिथी = सूर्य व चंद्र यांच्यात १२ अंशांचे अंतर. हेच अंतर विशिष्ट प्रमाणात कमी-जास्त होते त्यामुळे होणारी क्षय-वृद्धी. नंदा, भद्रा, जया, रिक्ता, पूर्णा = १।२।३।४।५ तिथी अभिजित नक्षत्राचे स्थान, अभिजित नक्षत्र आणि अभिजित मुहूर्त यातील फरक अशा कित्येक मुद्द्यांचा उहापोह केला आहे. राम इ. चौघांच्या जन्मकुंडल्या व त्यावर केलेली चर्चा. त्यातील राम, लक्ष्मण, शत्रुघ्न यांच्या कर्क लग्न कुंडल्या असून भरताची मीन लग्न कुंडली आहे. रामांच्या व लक्ष्मण, शत्रुघ्न यांच्याही कुंडलीतील चार प्रमुख केंद्रस्थानी लग्नी कर्क, गुरु, चतुर्थात तूळेचा शनी, सप्तमात मकरेचा मंगळ, दशमात मेषेचा रवि, भाग्यात मीनेचा शुक्र असे पाच ग्रह उच्चीचे असून पूर्ण राजयोग, रामजन्म नवमी माध्यान्ह, पुनर्वसू नक्षत्र, भरत दशमी सूर्योदय पुष्य नक्षत्र आणि लक्ष्मण-शत्रुघ्न जुळे, दशमी माध्यान्ह, आश्लेषा नक्षत्र.

तिघांच्या कुंडल्या सारख्या असल्या तरी अंशभेद, नक्षत्र-चरणभेद दशवर्ग भेद इ. मुळे सर्वांच्याही चरित्रात फरक दिसून येतो असे याबद्दल स्वामी प्रतिपादन करतात.

रामजन्मा वेळी सूर्य एक महिना माध्यान्ह समयीच थबकून राहिला, याबद्दल स्वामींनी हा अतिशयोक्ती अलंकार म्हणून वर्णन केले आहे. कारण निसर्ग व ज्योतिषशास्त्र दृष्ट्या हे अशक्य आहे. तसे घडले असते तर सर्व जगच सूर्याचे उष्णतेने भस्म झाले असते. ईश्वराची लीला म्हणून ही स्वामी हे मान्य करीत नाहीत. कारण या सर्वांना (सूर्य इ.) त्यानेच मर्यादा घालून दिली. त्यात तो ईश्वरच हस्तक्षेप कसा करील? हे स्वामींचे म्हणणे पटते.

रामांचे उपनयन प्रसंगी उपनयन मुहूर्ताबद्दलची चर्चा, विवाहाचे संदर्भात मुहूर्ताची आवश्यक माहिती सविस्तर आली आहे. मास, तिथी, नक्षत्र याबद्दल विवेचन आहेच. शिवाय लग्नशुद्धी, मुहूर्ताचे वेळी कोणत्या स्थानी कोणते ग्रह असावेत. निषिद्ध काय व उक्त काय याचे विस्तृत विवेचन केले आहे. षड्वर्ग शुद्धी ही आवश्यक सांगतात. हे सर्व पाहून जर विवाह केला तर उभयतांना निश्चितच सुखप्रद होईल अशी टीपही जोडली आहे. पण हल्ली कार्यालय रिकामे ज्या दिवशी असेल तोच मुहूर्त असे झाले आहे.

अयोध्या कांडात मंथरेला तुलसीदासांनी 'अवध साढसाती' असे विशेषण दिले आहे. या संदर्भात साडेसातीबद्दल स्वामी फारच रोचक विवेचन करतात. साडेसातीतून सुटका मिळवण्यासाठी दोन उत्तम उपाय ही त्यांनी दिले आहेत. वाचकांचे माहितीसाठी ते इथे देत आहे. १) दर शनिवारी सूर्योदयापूर्वी अभ्यंग करावे. काळ्या रंगाच्या नवीन कापडाच्या तुकड्यावर २/३ मुठी तेल लावलेले उडीद, तेवढेच मीठ व एक लोखंडाचा तुकडा घेऊन शनी मंदिरात शनीसमोर किंवा दक्षिणमुखी मारुती समोर ठेवावे. ११ प्रदक्षिणा घालाव्या. असे ११ शनिवार करावे. नंतर शनी किंवा मारुतीस तेलयुक्त शेंदूर लावावा. रुईची पाने, फुले व उडीदाच्या वड्यांचा हार घालावा. ११ बटूंना चुरम्याचे जेवण द्यावे. २) शनिवारी शनीचे होऱ्यात उडदांची तुला करावी म्हणजे तराजूच्या एका पारड्यात शनी पीडीत व्यक्ती व दुसऱ्यात तितकेच उडीद ठेवावे. नंतर त्याचे ९ भाग करून ते ९ काळ्या कापडांवर ठेवावे. सोबत मीठ व लोखंड ठेवावे. ते ९ भाग गरीब लोकांना द्यावेत. ते घेत नसतील तर वर थोडे पैसे द्यावे किंवा स्मशानात नेऊन ठेवावे.

आणखीही बरेच लिहिता येईल. पण लेख मर्यादा असल्यामुळे इतकी उदाहरणे पुरेत.

कोणतेही काम करावयाचे झाले म्हणजे ते सांगोपांग करून साध्य झाल्याशिवाय थांबायचे नाही असा स्वामींचा स्वभाव. 'विघ्नैः पुनः पुनरपिप्रतिहन्यमानाः प्रारब्ध मुत्तम जना न परित्यजंती' त्यामुळे टीकेच्या निमित्ताने त्यांनी केलेल्या ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाचाही पडताळा येतो. त्याचे यथाशक्ती, यथाबुद्धी विवेचन करण्याचा (त्यांच्याच ग्रंथांवरून) माझा हा प्रयत्न वाचकांनाही आवडेल अशी आशा वाटते.

वे. मू. ज्यो. नीलकंठ नागेश हेर्लेकर
शहापूर - बेळगांव

प. पू. श्रीस्वामींची नामनिष्ठा

डॉ. बि. ना. जोशी

बि.ए.एल.एल., श्रींचे अनुग्रहित मिरज येथे वैद्यकीय व्यवसाय. पन्नासवर्षे पासून पारमार्थिक वाटचाल सुरू आहे.

महासागरात विहार करणाऱ्या एखाद्या लहानशा माशास त्या सागराचा विस्तार, त्याचा अथांगपणा याबद्दल विचारल्यास त्याची मनाची जी अवस्था होईल तशी माझी होत आहे. श्रींच्या नामनिष्ठेबद्दल मी काय व कसे लिहिणार? परंतु त्यांच्याचकडून कृपेची, अंतःकरणापासून प्रार्थना करून मी सुरुवात करीत आहे.

श्रींच्या अध्यात्मिक जीवनाची सुरुवातच नामसाधनेपासून झाल्याचे त्यांच्या चरित्रावरून स्पष्ट दिसते आहे. अनुवंशिक संस्कार अत्यंत धार्मिक पद्धतीचे असल्याने बालपणापासूनच भगवत् भक्तीचे बाळकडू मिळत गेले असले तरी त्या बीजाची वाढ ज्या आश्चर्यकारक पद्धतीने झाली त्यावरून 'शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते' या उक्तीप्रमाणे मूळचा पिंडच एखाद्या असामान्य योगभ्रष्टाचा असला पाहिजे याची खात्री पटते.

राम नाम जपास सुरुवात

१९३० साली श्रींची श्रीधरस्वामी या सत्पुरुषाची भेट झाली व अत्यंत तळमळीने शरणागत पूर्वक प्रार्थनेनंतर त्यांचेकडून त्रयोदशाक्षरी राममंत्र मिळाला व साडेतीन कोटी जप करण्याबद्दल आज्ञा झाली. कधी एकदा हा जप पुरा करतो व सद्गुरु पुढील मार्ग दाखवतील असा ध्यास लागला. यामुळे साधनेस फारच वेग आला. नोकरी व नित्यक्रम सांभाळून रोज ४० ते ५० हजार जप करीत असत. दिवसाचा एक क्षणही वाया जाणार नाही याची काळजी घेत. ठराविक जप संख्या पुरी झालीच पाहिजे हा कटाक्ष असे. घरातील वातावरण अनुकूल नाही असे वाटलेवरून घराशेजारीच स्वतंत्र झोपडी बांधून १९३२ साली नामस्मरण "अहो येता जाता उठत बसता काम करता" असे नाही मंत्रपुरश्चरण सुरू केले. ब्रह्मचर्ययुक्त राहून उपवासाचे शिजवलेले पदार्थाचेच केवळ भक्षण करूनही कठोर साधना सुरू केली. पहाटे ४ वाजता उठून नित्यकर्म आटोपून जपास सुरुवात करीत ते शाळेची वेळ होईपर्यंत. मधल्या सुट्टीतही घरी येऊन वस्त्रे बदलून हातपाय धुवून जप करीत असत. संध्याकाळी शाळेतून आलेवर स्नान करून मंत्रानुष्ठानास सुरुवात करीत ते रात्री ठराविक संख्या पुरी होईपर्यंत झोपत नसत. झोप येऊ नये म्हणून शेंडी खुंटीस बांधून ठेवीत. परंतु शेंडीस हिसका बसल्याने झोप आली नाही अशी वेळ कधी आली नाही. एका वर्षात साधारण दीडकोटी तरी जप होई. या प्रमाणे साडेतीन कोटी ऐवजी साडेचार कोटी जप पुरा करून श्रीगुरुंच्या भेटीस गेले व पुढील मार्गदर्शनाची विनंती केली. तेव्हा 'राम तुला सर्व सांगेल' हे थोडक्यात आशीर्वादात्मक उत्तर मिळाले व त्याप्रमाणे परम दयाघन रामरायाने सर्व काही स्पष्ट सांगून निर्भय केले !

अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने आचार करून साधना केल्याने मूळच्या रामभक्तीस अधिकच वेग आला. मन रामी रंगले. आपोआपच केवळ नामजपाने कुंडलिनी जागृत झाली व योग मार्गातील दिव्य अनुभव येऊ लागले. अंगास एक प्रकारचा सुवास येऊ लागला. सहज मनात एखादी गोष्ट आली तर ती पुरी होई. एक प्रकारे वाचिक तपही झाल्याने वाक्सिद्धी प्राप्त झाली. सहज बोलले तरी खरे होई.

नामसप्ताह

'रघुपति राघव राजाराम - पतित पावन सीताराम' या मंत्राचा सप्ताह चिंचणी येथे १९३१ साली श्री रामाचे आज्ञेने श्रींनी पुढाकार घेऊन केला. त्यामुळे गावावर चोऱ्यांचे आलेले संकट तीन दिवसातच निवारण झाले. या प्रत्यक्ष अनुभवाने कृतज्ञतेबरोबरच श्रेष्ठ प्रेमभक्तीचा लाभ झाला. तो इतका की सप्ताहाचे अखेरचे दिवशी सामोपचाराचे काव्य वाचून दाखवीत असता प्रेमाश्रू अनिवार होऊन कंठ इतका दाटून आला की वाचन पुरे करणेही कसेबसे तरी संपवावे लागले. १९२८/२९ सालापासूनच जी नामसाधना सुरू होती ती आता जवळ जवळ पूर्णत्वास पोचली होती. जप अखंड चोवीस तास सुरू झाला. संख्या मोजणे व लिहून ठेवणे ही गोष्ट यापुढे बंदच झाली.

रामनामावर लहानपणापासूनच प्रेम होते. त्यात श्रीसद्गुरुंकडून नामाचा उपदेश मिळाला. अशा प्रकारे तीव्र साधन केल्यावर त्या सबीज नामाचा अंतःकरणात डौलदार वृक्ष तयार झाला यात काय नवल? यातच अखेरची कृपा झाली ती प. पू. बाबा गंगादासांची. ते स्वतः श्री संततुलसीदासांच्या परंपरेतील कठोर वैरागी. रामचरितमानसचे परम अधिकारी होते. त्यांनी या रामायणाची गोडी लावली व श्रींचा अधिकार पाहून 'तुझ्या मुखाने प्रत्यक्ष तुलसीदासच बोलतील' असा आशीर्वाद दिला. तसेच परमार्थातील सर्वात श्रेष्ठ असा आत्मसाक्षात्कारही करविला. आता या पुढील श्रींचे सर्व आयुष्य या रामायणाची पारायणे (त्रिदिन - १०८-साल १९५०, १ दिन, ९ - १९५५, २ दिन, १०० , १९५९, तु. रामायणाची सप्तरंग पोथी - १९५९, पंचरंगी पोथी १९५३ लिहून काढली.) टीका लेखन प्रवचने यातच व्यतीत झाले. हेच रामकार्य स्वतःचे जीवीत कार्य त्यांनी मानले. प्रायोपवेशनपूर्वक समाधी घेण्याचे वेळी 'श्रीराम श्रीराम' नामाचा घोष करीतच देह विसर्जन केला. केवढी ही नाम निष्ठा ! श्रीसद्गुरुंच्याकडून आलेल्या मंत्राचे त्यांचे आज्ञेमुळेच केवळ कसेतरी वेठीस धरल्याप्रमाणे, माळेने जप करीत असता सर्व लक्ष कधी एकदा मेरुमणी येतो व संख्या पुरी होते व यातून रिकामा होतो याकडे अशा प्रकारे जप करणाऱ्या आम्हा साधकांनी श्रींची ही नामनिष्ठा कशी वर्णावी? त्यांनीच कृपा केली तरच काही हातून घडेल. त्यासाठी त्यांच्या परमपावन चरणी विनम्र प्रार्थना !

श्रींच्या गू.चं. मधील इतर लिखाणातील तसेच शिष्यांच्या पत्रांच्या उत्तरांतील नामासंबंधी काही उल्लेख –

परमगुरुंच्या आरतीत –
नामाच्या नौके बसवीशी सद्गुरु नाविक तूं जै
होशी परतीरासे नेशी ॥ असा उल्लेख आहे.

इतर काव्ये

जिथे चित्त जाई तिथे राम पाही ।
समाधान तेथे नसे दूर काही ॥
रघूनायका आत्मरूपे पहावे ।

गुरुतारका श्री समर्था स्मरावे ॥
सर्व काळ सोपे नाम हे साधन ।
नाही एक क्षण परतंत्र ॥
न लागे जागीचे हालावे चालावे ।
न लागे वेचावे तनु धन ॥
ज्ञानोबा तुकोबा आणि रामदास ।
तेवी तुलसीदास संत बहू ॥
बहू वर्णिताती नामाचे महत्त्व ।
थकले, ना कळत रामासीही ॥
एक साधनाते दृढ साधिल्यास
तुजी अनायास जवळी येती ।
ईश्वर दासा गोडी नामाची लागली ।
वार्ताही नुरली दुःखाची ही ॥
नामे होते चित्तशुद्धी ।
नामे मल विक्षेप गळती ॥
नामे कुंडलिनी जागृती ।
योगानुभव येती सहज की ॥
आपणासारिखे करीतसे नाम ।
सोडूनिया काम सदा घेता ॥
जगी सर्वसुखी असा तोचि आहे ।
जयाच्या मुखी सर्वदा नाम राहे ॥

शिकवण

श्रींची स्वतःची रामनामावर अपार श्रद्धा-निष्ठा असल्याने त्यांनी शिष्यांना तशीच शिकवण दिली. त्यातील नामासंबंधीचे काही उतारे थोडक्यात :

हरिनामाला बाळगा प्रेमे सदा मुखांत ।
सत्यधर्म पाळा सदा लोळा परमसुखांत ॥
मुखी नाम हाती काम । हाचि ठेवा सदानेम ॥
तेणे दुःख सुखावेल । रामकृपाही फावेल ।
स्नान संध्या योग्य वेळी । मुखी नाम सर्व काळी ॥
बहुत काय सांगावे । राम नाम जपत जावे ।
स्वधर्म कर्म न त्यागावे । हेचि सार ॥
नित्य कर्म संपाविल्या उपरी । फावलाही अवसर जरी ।
नाम जपाची कांस धरी । एकाग्र चित्ते ॥
नाम जयाचे सदामुखी । चित्त तयाचे सदा सुखी ।
राम नाम दुग्ध सुधा तुल्य लाभते ।
राम भक्ति तूप पहा जिथे प्रकटते ।
विश्व रामरूप चित्त नित्य पाहते ।
प्राप्त भोग हर्ष शोक रहित भोगते ॥

श्रींचे स्वतःचे रामावर प्रेम इतके होते की त्यांचे आवडते भजन, 'राम राम राम दयाळू राजाराम माझा स्नेहाळू राजाराम' हे म्हणू लागले की कंठ सद्‌गदित होऊन नेत्रातून धारा लागत. तुलसीरामायण तर त्यांचा जीव की प्राण होते. संन्यासी असून तु. रामायण कसे वाचता नरकांत जाल असे एकजण म्हणाल्यावर तु. रामायण वाचणारा संन्यासी नरकात जाणेच अशक्य. आणि या उपर जाणे झालेच तर या स्वामींची तयारी आहे पण रामायण सोडणार नाही आणि स्वामी तेथे रामायण घेऊन गेला की नरकाचा स्वर्ग बनेल असे ठाम उत्तर दिले.

नामावरील निष्ठाही अशीच दृढ. त्याबद्दल ते सांगत की, जो कोणी संत नामाच्या विरुद्ध बोलत असेल, प्रचार करीत असेल तो संतच नव्हे असे खुशाल समजावे. असो.

श्रींच्याच कृपाशीर्वादाने ही अत्यल्प वाङ्मय सेवा करण्याची संधी शक्ति मिळाली ती त्यांचेच चरणी सादर, समर्पण इदं न मम !

श्रींचे कडून परम पावन रामनामाचे बीज त्यांच्या परम दयाळूपणाने प्राप्त होऊन धन्य झालेला एक अनुग्रहीत व नगण्य नामप्रेमी त्यांच्या चरण रज - बंडा.

डॉ. वि. ना. जोशी
बत्तीस शिराळा, जि. सांगली ४१५४०८

श्रीरामा, तव नामीं सुखदायी नित्यचित्त रंगावे ।
कोमल पदकमळी तव मन मधुपे नित्यची तरंगावे ॥

प्रज्ञानानंद सरस्वतींचे तत्त्वज्ञान

डॉ. सुनीता सदानंद तांबे

एम.फिल (मराठी) 'रत्नाकर मतकरींच्या एकांकिका', पीएच.डी. 'एकनाथ षष्ठक'. एस.एन.डी.टी. मुंबई मधून मराठी पत्रकारिता हा लघुकोर्स पूर्ण. कला व वाणिज्य महाविद्यालयात वाघोली व केसरी संपदी कॉलेज पिंपरी येथे अभ्यागत व्याख्याता २१/२१ लेख व लघुकथा प्रकाशित. काही कथा प्रसिद्ध.

॥ आरंभिक ॥

"ब्रह्म अनंत अरुप ।
शुद्ध विज्ञान स्वरूप ॥१॥
स्वयें तेंचि मी अव्यय ।
एकमेव अद्वितीय ॥२॥
सुख दुःख काही नेणें ।
कैसे कोणाला तें होणे ॥३॥
माझे ठायी नाही माया ।
कल्पनेचा भ्रम वाया ॥४॥
प्रज्ञा म्हणे स्वये ब्रह्म ।
गुरुकृपा दावी वर्म ॥५॥

सद्‌गुरुकृपेने 'ब्रह्मपदी' विराजमान झालेले 'महाराष्ट्राचे तुलसीदास' स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांच्या या अभंगात त्यांनी जणूं आपल्या तत्त्वज्ञानाचे सारच सांगून टाकले आहे.

अर्वाचीन संत कवी प्रज्ञानानंद सरस्वतींच्या सर्व रचनांना अद्वैत वेदांताचे अधिष्ठान लाभलेले दिसते. तत्कालीन परिस्थितीत समाजातील सर्वसामान्यांपर्यंत ते तत्त्वज्ञान पोहोचविण्यास त्यांनी पूर्वसुरींप्रमाणेच अग्रक्रम दिला. त्यासाठी संपूर्ण भारताचे सांस्कृतिक संचित असलेल्या उपनिषदे, ब्रह्मसूत्रे व भगवद्‌गीता या प्रस्थानत्रयीचा आधार घेऊन समाजप्रबोधनासाठीच काव्यरचना आरंभिल्या. त्यांच्या काव्यरचनांद्वारे व्यक्त झालेल्या त्यांच्या तत्त्वविचारांचाच या लेखातून धांडोळा घ्यायचा आहे. त्यासाठीच प्रथम प्राचीन भारतीय संस्कृतीचे प्रमुख अंग असलेल्या तत्त्वज्ञानासंबंधी थोडे काही जाणून घेणे महत्त्वाचे ठरावे.

भारतीय संस्कृतीच्या तत्त्वज्ञानास हजारो वर्षांचा इतिहास आहे. श्रीमद् शंकराचार्य ते अर्वाचीन संतांपर्यंतच्या महान विभूतींनी लोकांसमोर जे आदर्श ठेवले, ते या तत्त्वज्ञानातूनच आलेले आहेत. त्यात वैविध्य असले तरी विविधतेतून एकत्वाचाच साक्षात्कार त्यातून घडतो. भारतीयांच्या अनेकातून एकत्व शोधण्याच्या वृत्तीचा उगम देखील वेदोपनिषदातील तत्त्वज्ञानातच आहे. 'वेदांत' याचा अर्थ वेदांच्या अंती असणारी जी उपनिषदे त्यात समाविष्ट असलेले तत्त्वज्ञान ! उपनिषद वाक्यांची मीमांसा करून, त्यांच्यात समन्वय घडवून तात्पर्य सांगण्यासाठी 'वेदांतसूत्रे' वा 'ब्रह्मसूत्रांची' रचना झाली. सर्व वेदांत विचारांचा उगम या तीन स्थानी पहावयाचा व वेदांत विचारांची सत्यता तसेच शुद्धता या उगमापाशी येऊन पारखावयाची, हा सर्व वेदांत तत्त्ववेत्त्यांचा परिपाठ आहे. याचसाठी निरनिराळ्या आचार्यांनी प्रस्थानत्रयीवर आपापली भाष्ये रचिली. त्यांच्यात मतभिन्नता असली तरी साम्य पाहू जाता दिसते की, या विश्वाची प्रतिष्ठा 'ब्रह्म' या चेतन तत्त्वावर आहे. जडावर नाही. 'मोक्ष' हा परमपुरुषार्थ ! आत्मस्वरूप साक्षात् जाणण्याने मोक्षप्राप्ती होते. 'मोक्ष' ही नित्यवस्तू आहे आणि या सर्व सिद्धान्तांना 'वेद' हेच प्रमाण होत. सर्व आचार्यांच्या तत्त्वविचारास सर्वाधिक मान्यता श्रीमद् शंकराचार्यांच्या 'अद्वैत' वेदांतास प्राप्त झाली आणि पुढील काळात तिच्या दृढीकरणाने लोकमानसात 'तत्त्वज्ञान' म्हणजे 'शांकराद्वैत' असेच समीकरण बनून गेले. प्राचीन-मध्ययुगीन व अर्वाचीन संत-महंतांनी त्यासच अनुसरित आपापल्या काव्यरचना केलेल्या आढळतात. प्रज्ञानानंद सरस्वतीही त्यास अपवाद नाहीत. येथे त्यांच्या काव्यरचनांतून दिसणारे तत्त्वज्ञान जाणून घ्यावयाचे आहे. त्यासाठी प्रथम श्रीमद् शंकराचार्यांचे 'अद्वैत तत्त्वविचार' काय आहेत त्याची माहिती करून घेऊ.

॥ श्रीमद् शंकराचार्यांचे अद्वैत तत्त्वविचार ॥

तत्त्वज्ञानात तात्त्विकदृष्ट्या विश्वाचे स्वरूप जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. भारतीय तत्त्वज्ञानाचा, विशेषतः वेदांत दर्शनाचा अभ्यासविषय म्हणून जीव-जगत्-जगदीश्वर यांच्यातील संबंधांचा निर्देश केला जातो. या संबंधातील शांकर अद्वैती तत्त्वज्ञानाची भूमिका 'ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या, जीवो ब्रह्मैव नापरः' या विधानात व्यक्त झाली आहे. अद्वैत मताचे बहुतेक सर्व सिद्धान्त स्थूल मानाने या श्लोकात ग्रंथित झाल्याचे आढळते. यातील 'ब्रह्मा सत्यम्' हा पहिला सिद्धान्त ! 'ब्रह्म' हेच काय ते सत्य आहे. 'ब्रह्म' म्हणजे जाणीव ! चिद्‌वस्तू ! आपल्याला एकसारखे होत जाणारे भान ! 'जाणीव' ही स्वयंसिद्ध वस्तू आहे. ती स्वतःच स्वतः जाणते. अद्वैत वेदांत 'वस्तू' म्हणजे नित्य, निरपवाद पदार्थ मानतो. या वस्तूला उद्देशूनच ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या पहिल्याच ओवीत म्हटले आहे 'ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ॥ जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ (ज्ञा. अ. १:१) 'आत्मा' हा स्वयंसिद्ध आहे. या विशाल विश्वात आत्याहून भिन्न अशी एकही वस्तू नाही. नामरूपात्मक विचारांच्या आत सर्वत्र एकच एक आत्मस्वरूप चैतन्याने प्रकाशित आहे. या जगात एकच एक अखंड सत्ता विद्यमान आहे ती म्हणजेच आत्मसत्ता ! तिला जो जाणतो तोच खरा तत्त्वज्ञानी ! या आत्मसत्तेलाच 'ब्रह्म' म्हटले आहे. ही आत्मसत्ता निर्विकल्प, निरुपाधिक व निर्विकार असते. 'ब्रह्म' हेच परमार्थतः 'सत्य' होय. ते ज्ञानस्वरूप तसेच अनंतही आहे. ब्रह्माचे स्वरूप 'सच्चिदानंद स्वरूपी' आहे. 'ब्रह्म' हे 'चित्' आहे. 'जाणीव' आहे. ते निर्गुण, भेदरहित, नित्य आहे. जागृतावस्था, स्वप्नावस्था व सुषुप्ती या तीनही अवस्थेत एकरूप, विशेषरहित असलेली ही 'स्वयंप्रकाश जाणीव' कधी उदय पावत नाही वा अस्तासही जात नाही. भेदरहित अशी ही नित्य जाणीव म्हणजेच 'ब्रह्मवस्तू' तीच तेवढी सत्य आहे. इतर सर्व दृश्य पदार्थ-दृश्य जग मिथ्या होय. 'जगन्मिथ्या' हा अद्वैत तत्त्वविचारांतील दुसरा सिद्धान्त ! शंकराचार्यांच्या अद्वैत मतात 'जग मिथ्या' असल्याचे सांगितले आहे. जग परिच्छिन्न आहे म्हणून ते मिथ्या आहे. परिच्छिन्न असणे म्हणजे अवकाश, काल वा अन्य पदार्थांने मर्यादित असणे. जेव्हा आपण जगाचे आपल्याला भान होते असे म्हणतो तेव्हा आपल्याला काही नामरूपांचेच भान होते. नामरूपांचा उगम आपल्या वाणीत आहे. या अभिप्रायाने उपनिषदात म्हटले आहे 'वाचारम्भणं विकारो नामधेयं, मृत्तिकेत्येव सत्यम् (छांदोग्य : ६.४.१) मातीच्या घड्यात 'घडा' हे केवळ नामरूप असते. मृत्तिका हीच काय ती सत्य ! मातीला आकार

दिल्याने घडा बनला. ते नाव देणारे आपणच आणि आपल्या दृष्टिकोनातून 'घडा' या आकाराला आपण विशेष महत्त्व दिल्याने ते नाव त्यास प्राप्त झाले. ज्या द्रव्याची ती नामरूपे आहेत त्याच्या अपेक्षेने ती सर्व नामरूपे मिथ्या होत. असा हा युक्तिवाद आहे. 'नामरूपे' मिथ्या ठरल्यावर जगदेखील मिथ्या ठरते. 'जीवो ब्रह्मैव' हा अद्वैत वेदांतातील तिसरा सिद्धान्त म्हणजे ज्याला आपण 'मी' अथवा 'आपण' म्हणतो तोच वस्तुतः 'ब्रह्म' होय. 'ब्रह्म' हे एकमेवाद्वितीय आहे. पण व्यवहारात आपण 'मी' व 'तू', 'माझा' आणि तुझा 'जीव' अशी भिन्नत्वाची भाषा वापरतो. त्याचप्रमाणे 'ब्रह्म' हे 'कूटस्थ' 'नित्य' आहे. ती सनातन वस्तू आहे. जीवाच्या वस्तू स्वरूपाच्या अपेक्षेने त्यास 'आत्मा', 'परमात्मा' प्रत्यगात्मा अथवा 'साक्षी' अशी नावे आहेत. 'जीव' वस्तुतः ब्रह्म आहे. याचाच अर्थ 'आत्मा' 'ब्रह्म' होय. प्रत्यगात्मा साक्षीचैतन्य 'ब्रह्म' होय ! आत्म्यास अवस्था नाही. तो नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्त-स्वभाव आहे. जागृती, सुषुप्ती व स्वप्न या तीनही अवस्थांतील अनुभवाविषय बदलले तरी अनुभव घेणारे 'साक्षीचैतन्य' एकच होय. तेच ब्रह्म ! जीव हा विकारास्पद आहे. तो ज्ञानविषय होऊ शकतो पण 'आत्मा' मात्र कधीही विषय होऊ शकत नाही. तो भासतो पण विषयरूपाने नाही. तैत्तरीय उपनिषदात (२.२.५) एका रूपकाच्या साहाय्याने 'आत्मा' व 'जीव' यातील फरक विशद केलेला आहे. त्यावर भाष्य करताना शंकराचार्यांनी त्या रूपकाचा विस्तार करून 'पंचकोश' नावाची संकल्पना रूढ केली. त्यांच्या मते अंतरात्म्यावर एकावर एक अशी पाच आवरणे वा कोश आहेत. त्या कोशांवर आत्मा घेतल्यास त्यास 'जीव' म्हणता येईल. पण ही आवरणे काढल्यावर जे उरते तेच त्याचे सत्य स्वरूप. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय असे ते पाच कोश होत. या सर्व कोशांच्या आत राहतो तो 'आत्मा' ! तो केवळ साक्षीरूप असून 'आनंद' हे त्याचे स्वरूप होय. हा साक्षीभूत-कूटस्थनित्य 'आत्मा' म्हणजेच ब्रह्म ! तोच काय तो सत्य ! त्याच्या अपेक्षी जीव म्हणजे 'कोशयुक्त जीव' हा देखील असत्य होय. उपाधिमुळे त्यास जीवत्व भासले तरी तो निर्लेप आहे.

'तत् त्वमासि' हे छांदोग्य उपनिषदातील (६.१६.३) वाक्य वेदांत संप्रदायातील महावाक्य आहे. ते 'ब्रह्म' 'तू' आहेस अशी ग्वाही ते वाक्य देते. प्रयत्न, संस्कार, क्रिया वा कोणाच्या अनुग्रहानेही जीवास ब्रह्मत्व प्राप्त करून घ्यावयाचे नाही. 'जीव' हा ब्रह्मरूपच आहे असा बोध करून घ्यावयाचा असल्यास अविद्या-अज्ञानाचा नाश करून घ्यायला हवा. प्रकाशाने जसा अंधःकार मागे सरतो तसे ज्ञानाने अज्ञान मागे सरते. अज्ञानाच्या नाशासाठी ज्ञानाखेरीज उपाय नाही. म्हणूनच अद्वैत वेदांताने 'ज्ञानानेच मोक्ष मिळतो', 'ज्ञानान्मोक्षः' असा चौथा सिद्धान्त सांगितला आहे. मोक्ष म्हणजे आत्म्याची शुद्धावस्था - वास्तविक स्वरूप ! मोक्ष अंतिमतः ज्ञानप्राप्तीने लाभतो. भक्ती वा कर्म अशा अन्य उपायांनी तो साक्षात् मिळणार नाही. परंपरेनेच मिळेल असे वेदान्त सांगतो. वेदांतात ज्ञान म्हणजे कसलाही आडपडदा नसलेला साक्षात् अनुभव ! 'अपरोक्षानुभूती ! मी 'ब्रह्मरूप' आहे अशी खरी जाणीव ! याच ज्ञानासाठी चित्तशुद्धी आवश्यक ! ती निष्काम कर्म व भक्ती यांनी होते. ही दोन्ही परंपरेने मोक्षोपयोगी होतील, मात्र मोक्ष साधनेतील अखेरचा दुवा 'ज्ञान' हाच होय ! चित्तशुद्धीस्तव वेदांताने साधन चतुष्टये सांगितली. ती अशी १) नित्यानित्यवस्तुविवेक, २) इहामुत्रार्थफलभोगविराग, ३) शमदमादि साधन संपद् आणि ४) मुमुक्षुत्व - मोक्षाविषयीची जबरदस्त इच्छा ! यानंतर साधकाने श्रवण-मनन-निदिध्यास करणे महत्त्वाचे. सद्गुरुंची आवश्यकताही महत्त्वाची. परिणामी साधनचतुष्टय याने युक्त असा साधक सद्गुरुंकडे जातो. सद्गुरु त्यास 'अहं ब्रह्मास्मि', 'तत्त्वमसि' या सारख्या एखाद्या महावाक्याचा उपदेश करतो. खऱ्या साधकास योग्य गुरुपदेशाने तात्काळ ब्रह्मसाक्षात्कार घडतो. 'मीच ब्रह्म' असल्याचे त्याला साक्षात् भान येते. हीच मोक्षावस्था ! 'ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति'(मुंडक : ३.२.९) ज्ञानाने मोक्षप्राप्ती करून देण्यासाठी वेदांत सिद्ध असतो.

समर्थ रामदासांनी आपल्या एका अभंगात महावाक्यांचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. ते सांगतात –

'तत्त्वमसि' आणि 'अहंब्रह्म' ऐसे । जाण हे विश्वासे महावाक्य ॥१॥
'अयमात्मा ब्रह्म' आणि 'प्रज्ञानब्रह्म' । दास म्हणे वर्म वेदवाक्य ॥२॥
वेदवाक्य राम रामदास पाहे । मुख्य पद लाहे निवेदने ॥३॥

भारतातील संत व त्यांच्या साहित्यकृतींवर या औपनिषदिक तत्त्वविचारांचाच प्रभाव होता. प्रज्ञानानंद सरस्वतींनीही ब्रह्मसत्यवादी असे शांकर तत्त्वज्ञान आत्मसात करून आपल्या काव्यरचना केल्या तसेच दैनंदिन जीवनातील उपासनेतूनही ते आविष्कृत केले. त्या विषयीचाच विचार आता करायचा.

॥ प्रज्ञानानंद सरस्वतींची जीवन दृष्टी ॥

प्रज्ञानानंद सरस्वतींच्या समग्र जीवनदृष्टीचा विचार करता, असे लक्षात येते की, ते शांकरद्वैतास अनुसरले आहेत. शंकराचार्यांचा संन्यास तसाच योगही त्यांनी स्वीकारला. जीवाचा परब्रह्मासी योग (ऐक्य) घडवून आणणारी, ब्रह्मस्वरूपाचे ज्ञान होण्यासाठीची जी साधने, त्यांचाही विचार त्यांनी केला. कर्मयोग, भक्तीयोग, सांख्ययोग, पातंजल वा ध्यानयोग इत्यादी ज्ञानप्राप्तीची विविध साधने ! त्यांचा विचार भागवतात तसेच भगवद्गीतेतून सांगितला गेला आहे. 'सर्व खल्विदं ब्रह्म' या सिद्धान्ताचा जीव-जगत्-ब्रह्मैक्यपर असा जो अर्थ शंकराचार्यांनी केलेला आहे तो ज्ञानेश्वरसंप्रमाणेच प्रज्ञानानंद सरस्वतींनीही स्वीकारला आहे. सर्वत्र चिन्मय परब्रह्मच असताना तद्भिन्न भासणारे जग मिथ्या व मायिक आहे, या विषयी शंकराचार्य ते वामन पंडित यांच्यापर्यंत सर्वांची एकवाक्यता आहे. 'जे जे विनाशी तें तें' 'मायिक' मिथ्यामायिक ! अद्वैतवाद स्वीकारला की भासमान द्वैताची उपपत्ती लावण्यासाठी त्यामागोमाग मायावाद येतो आणि द्वैत दिसले तरी ते खरे नसून अद्वैतच खरे आहे असेच तो सांगतो. अद्वैत सिद्धान्तांसंबंधी श्रीमद्शंकराचार्यांच्या या तत्त्वज्ञानाचा संपूर्ण भारतास धार्मिक, सांस्कृतिक आणि तात्त्विक दृष्ट्याही फार मोठा आधार लाभला आहे.

आत्मज्ञानप्राप्तीच्या साधनांपैकी प्रज्ञानानंदांनी 'योग' व 'भक्ती' ह्याही साधनांना पुरस्कारिले. या दोन्हींद्वारे त्यांनी अद्वैताच्या व्यवहाराचे स्वरूप विशद केलेले आहे. त्यामुळे त्या दोन्हींचा विचारही येथे प्रस्तुत आहे.

योगासंबंधीचा विचार

योगशास्त्राचे प्रयोजन व्यक्तीला कैवल्याचा साक्षात्कार करून देणे हेच आहे. पातंजलात अष्टांगयोग सांगितला आहे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी अशी त्याची आठ अंगे

असून त्यातील पहिली पाच बहिरंग साधने असून शेवटची तीन अंतरंग साधने होत. योगदर्शनात 'योग' म्हणजे चित्ताच्या वृत्तींचा निरोध ! हा वृत्तीनिरोध संप्रज्ञात व असंप्रज्ञात समाधीत क्रमशः पूर्णतेस जात असल्याने 'अभ्यास' व 'वैराग्य' ही त्यासाठीची साधने सांगितली गेली आहेत. समाधी साधण्यासाठी बहिरंग साधने असून निरोधाच्या तीनही साधनांच्या अनुष्ठानाने जी ज्ञाने व सामर्थ्ये योग्याच्या अंगी प्रकट होत असतात, त्यानंतर त्यास कैवल्यावस्था प्राप्त होते आणि योगी विदेह मुक्तीस प्राप्त होतो. योगदर्शनात व्यक्ती तसेच समाजाचा विचार केलेला आहे. व्यक्ती ही समाजाचाच एक घटक असल्याने व्यक्तीच्या उन्नतीकडे लक्ष देतानाच समाजोत्कर्षही साधावा लागतो. म्हणूनच योगशास्त्रकारांनी व्यक्तिधर्म व समाजधर्म यांचा उत्कृष्ट समन्वय साधला. समाजहितासाठीच शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान हे पाच नियम सांगितले आहेत. हे यम-नियम पाळून आत्मोत्कर्ष इच्छिणाऱ्या प्रत्येकाने प्रत्यही ठराविक वेळी घरातील पवित्र ठिकाणी आसनावर बसून योगाभ्यास करीत जावा. प्राणायाम, प्रत्याहारादिंचा अभ्यास करून धारणा, ध्यान व समाधी ह्या अंतरंग साधनेस लागावे. संप्रज्ञात समाधीत चित्ताला सूक्ष्म आलंबने देत देत अखेरीस ते चित्त केवळ 'मी' आहे 'अस्मि' ह्या शुद्ध व अति सूक्ष्म आलंबनावर स्थिर करावयाचे असते. त्यानंतर 'अस्मि' ह्या स्फुरणाचाही उपशम करून असंप्रज्ञान समाधी सिद्ध होत असते. या ठिकाणी जीवाला जो तात्त्विक स्वरूपाचा प्रत्यय येतो, तोच 'आत्मसाक्षात्कार' होय. एकदा हा साक्षात्कार घडला की योगी सर्व जगद्व्यवहार साक्षीरूपाने पाहून जगदुद्धारार्थ सात्त्विक कर्माचरण करीत जीवन मुक्तिसुखाचा अनुभव घेतच सत्त्वापत्ती, असंसक्ती, पदार्थाभविती आणि तुर्यगा ह्या उत्तरोत्तर श्रेष्ठ अवस्थांत उत्क्रांत होत जातो. ह्यातील पहिल्या दोन अवस्थांतील योग्यात जगदोद्धारार्थ लोकसंग्रहादी उपकारक कामे करीत राहावे ह्या शुभवासनेचा संवेग जर तीव्र असेल तर तो 'तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हांसी' ह्या भावनेस अनुसरून पुनः पुन्हा जन्म घेऊन लोकोद्धार करीत राहतो अणि अखेरीस सृष्टीतील नियतकार्ये निरहंतकारितेने करणाऱ्या देवतास्वरूपी राहतो. त्यानंतर पदार्थभाविनी व तुर्यगा अवस्थेत प्रवेश करून शेवटी अविद्येमुळे ज्या परिच्छिन्न जीवभावास प्राप्त झालेला असतो त्यातून 'ज्ञानाने' मुक्त होऊन अपरिछिन्न अशा सर्वात्मभावास प्राप्त होतो. ह्यालाच 'स्वरूपप्रष्ठा चित्तीशक्तीः' असे या दर्शनाच्या अंतिम सूत्रात म्हटले आहे.

'योग' हा मनावरील दुष्ट संस्कार घालविण्यास उपयोगी पडणारा आहे. 'ज्ञान' अथवा 'भक्ती' या दोन योगांपेक्षा या योगाचा विशेष म्हणजे तो मन, प्राण व शरीर यांना संघटित करतो. ज्ञानासाठी शरीर दृढ हवे. ते योगसाधनेने होते. शरीर हे धर्माचरणाचा पाया असल्याने तो दृढ करून साधकास वरच्या पायरीवर नेणारा हा 'योग' आहे. ज्ञानयोगाने मुक्ती मिळेल पण योगाने 'भुक्ती' व 'मुक्ती' दोन्हींचा लाभ घडतो. योगात दिलेले अनुभव भक्तीमार्गानेही येतात. उदा. :

'लक्षुनिया योगी पहाती आभास । तो दिसे आम्हा दृष्टिपुढे ॥१॥
कर दोनी कटी राहिलासे उभा । सांवळी हे प्रभा अंगकांती ॥२॥'

येथवर आत्मज्ञानप्राप्तीच्या 'योगा'विषयी आपण थोडक्यात, काही जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आता 'भक्ती' योगासंबंधीचा विचार करणे आवश्यक आहे. प्रज्ञानानंद सरस्वतींनी 'भक्ती'चा पुरस्कार आपल्या काव्यरचनांद्वारे केलेला आढळतो. ते प्रभू श्रीरामचंद्राचे अनन्य भक्त होते. तुलसीदासांच्या रामचरितमानसाचा त्यांचा अभ्यास त्यांची श्रीरामचंद्रावर असलेली भक्तीच दर्शवितो. आपल्या प्रवचन कीर्तनातून त्यांनी रामभक्तीचा प्रसार केलेला आहे. भक्तिशिवाय केलेल्या साधनेस त्यांनी विधवेच्या साजशृंगाराची उपमा दिलेली आहे. त्यांचे 'शबरी' गीतेचे लेखन नवविधाभक्तीसंबंधातच आहे.

॥ भक्तीयोगाचा विचार ॥

योगदर्शनात ईश्वरप्रणिधानाचे म्हणजेच भक्तियोगाचे महत्त्व मान्य केलेले आहे. (पाद २, सूत्र १:२) योगदर्शनाचे साध्य जी जीवन्मुक्ती ती भक्तियोगानेही मिळू शकते. (पाद २, सूत्र २३) कारण भक्तियोगाच्या अनुष्ठानात अष्टांग योगाचेही अनुष्ठान सहजपणेच घडत असते. अष्टांगयोगानुष्ठज्ञानाने योग्याला पौरुष प्रयत्नांच्या बळावर जी गती लाभते तीच गती सर्व भार ईश्वरावर टाकणाऱ्यास भक्तियोगाने प्राप्त होते. याचाच अर्थ 'योगी' व 'भक्त' दोघेही आपापल्या मार्गांनी 'यद्गत्वा निवर्तन्ते' अशा एकाच परमधामास जाऊन पोहोचतात.

'शिवो भूत्वा शिवं यजेत्' ही भक्तिची वैदिक भूमिका ! शंकराचार्य व ज्ञानेश्वर यांच्या भक्तीस तिचेच अनुष्ठान आहे. 'देव होऊनि देवास भजणे' हे भक्तिचे वर्म ज्ञानदेवांनी सांगून ठेवले आहे. महाराष्ट्रातील भागवतधर्मीय संतांनी याचाच पुरस्कार केलेला आहे. तेथे अद्वैत व भक्तीचा समन्वय आहे. मात्र ती 'ज्ञानोत्तर भक्ती' आहे. संत एकनाथांच्या भागवतात याच भक्तीचा पुरस्कार केलेला आहे. संत तुकारामही म्हणतात 'गाय वासुदेव वासुदेवा । भिन्न नाही आणिका नावा ।' भक्तीमार्ग सर्वसामान्यांना तारणारा आहे. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी म्हटले 'जो पुरुषार्थ सिद्धी चौथी । घेऊनिया आपुलिया हाती । रिगाला भक्तिपंथी । जगा देतु ॥'' (ज्ञा. अ. १२ : २१९) ज्ञान, योग, भक्ती, कर्म या सर्वांचे फळ आत्मज्ञानप्राप्ती ! तिची साधने म्हणून यांना अतिशय महत्त्व आहे. भारतीय संतांनी या सर्वांचा समन्वय साधला आणि सांस्कृतिक दृष्ट्या भारताचे ऐक्य टिकविण्यास मोठाच हातभार लावला. प्रज्ञानानंद सरस्वतींच्या रचना त्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठराव्यात. श्रीमद् भागवतात 'भक्ती' म्हणून प्रल्हादाची पुढील उक्ति सांगण्यात येते. 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वन्दनं दास्य साख्यमात्मनिवेदनम् ।' भक्तीचे हे वेगवेगळे आविष्कार आहेत. 'भक्ती' म्हणजे 'अस्मिन् परमप्रेमरूपा' असे नारदमुनींनी सांगितले. भक्तीत प्रेम हे मुख्य आहे. बाह्योपचार गौण आहेत. भक्ती म्हणजे संपूर्ण जीवन ईश्वर प्रेमाने भरून जाणे. ज्ञानेश्वर, भक्तीची बैठक अद्वैतज्ञानच समजतात. काही न होऊन सहज स्थितीने राहाणे असे या भक्तीचे स्वरूप आहे. 'एऱ्हवी तिजी ना चौथी । हे पहिली ना सरती । पै माझिये सहजस्थिती । भक्ती नाम ॥' (ज्ञा.अ. १८:१११३) 'या ज्ञानभक्ती सहज । भक्त एकवटला मज ।...'' सर्व विश्वाच्या रूपाने श्रीहरीच नटला आहे; असे जाणून आपल्यासकट सर्व ठिकाणी त्याला पाहणे हीच अव्यभिचारी भक्ती ! या भक्तिविचारात ज्ञान, योग व भक्ती यांचा समन्वय होत असल्याचे ज्ञानेश्वर सांगतात. 'ऐसेनि बा समरसे । दृष्टि जे उल्हासे । तें भक्ति पै ऐसे । आम्ही म्हणो ॥' आणि ज्ञानाचे सांगावे । इयेचि दृष्टि नावे । योगाचेही आधवे सर्वस्व हें ॥' (ज्ञा. अ. १४ : ओ. ३८७-३८८) 'जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत । हा भक्तियोगु

निश्चित । जाण माझा ॥' (ज्ञा. अ. १०:११८) सर्व ठिकाणी परमात्मा भरलेला आहे असे जाणून भजणे ही अनन्यभक्ती !

'भक्तिमार्ग' हा सिद्धावस्थेचे जसे साधन आहे तसेच तो ज्ञानोत्तर सिद्ध स्थितीचा आविष्कारही आहे. अद्वैताच्या व्यवहाराचे सूत्र 'जनी जनार्दन' पाहणे. दुसऱ्या दृष्टीने हीच 'विश्वात्मक ईश्वराची उपासना' हे त्याचे सूत्र आहे. 'विश्वी विश्वंभर' वा 'जनी जनार्दन' पाहणे हे सर्वच संतांनी मांडलेले पराभक्तीचे रहस्य ! 'ईशावास्यमिदंसर्वम्' 'वसुदेवः सर्वमिती', 'सर्व खल्विदं ब्रह्म' या सत्याचा साक्षात्कार व्यवहारात आणणाऱ्या ज्ञानी भक्ताची स्थिती ज्ञानेश्वरही वर्णितात 'विचरे विश्व होऊनि । विश्वामाजी ।' जिच्यात सर्व भेद मावळतात, सर्व भूते साम्या येतात अशी ही स्थिती ! ब्रह्मज्ञानी माणसानेही सगुण उपासना सोडू नये असे ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे. जोपर्यंत आपण देहधारी आहोत तोपर्यंत उपासना आवश्यक असल्याचे प्रज्ञानानंदही सांगतात. त्यांच्या मते ईश्वरप्राप्तीचा 'योग' हा साधनमार्ग असल्याने 'भक्ती' हेच त्याचे फलीत आहे अशीच त्यांची धारणा होती. 'गूढार्थ चंद्रिकेच्या' हस्तलिखितात या विषयीचे उल्लेख अनेकदा येतात. भक्तीसाठी त्यांनीही नामस्मरण, सत्संग व सद्गुरुकृपेचे महत्त्व सांगितले आहे. नामस्मरणाला ते ईश्वरप्राप्तीचे रोकडे साधन मानतात. नामाची अमृतसंजीवनी स्पष्ट करताना स्वानुभवाची ग्वाहीही ते देतात. नाममहिमा दर्शविणारे त्यांचे अनेक अभंग आहेत. उदा :

'साराचेही सार राघवाचे नाम । तेंणें आत्माराम ठायी पडे ॥१॥
आवडीने सदा रामनाम घेसी । करी कालयाची चिंता मग ॥२॥
दोनचि अक्षरे महामंत्र राम । तेंणें पूर्ण काम शीघ्र होसी ॥३॥
प्रज्ञा वासुदेव पदी शुद्ध भाव । संसाराचे नाव जुरे नामा ॥४॥'

प्रज्ञानानंदांनी जीवनात सत्संगास महत्त्व दिले. सत्संगाने मनुष्यास विषयाची आस सोडण्याची प्रेरणा मिळते. श्रेष्ठांच्या सहवासाने आपले दोष-न्यूनता कळते आणि अहंकार निवळतो. सत्पुरुषावर प्रेम करणारा माणूस भगवंताला प्रिय असतो. त्याच्या जन्म-मरणाच्या फेऱ्या चुकतात. कोणालाही आपल्यापेक्षा हीन वा कमी लेखणे योग्य नाही ह्या गोष्टीचे आकलन सत्संगाने होते. सत्संगाचा त्याग करणारा माणूस गुंजा घेऊन कोहिनूर देणारा आत्मघातकी ठरेल. सत्पुरुषांशी श्रद्धा-प्रेमयुक्त, निरहंकारी, नम्र वृत्तीने व निष्कपटतेने वागल्यासच संतकृपा घडते, यासाठीही सत्संगाविषयीची तळमळ, यमनियमांसहित निष्काम अनुष्ठान आणि काया-वाचा-मने दीनांवर दया करणे आवश्यक असल्याचे प्रज्ञानानंद सांगतात. सत्संगाचे महत्त्व विशद करताना ते चमत्कार करून दाखविणाऱ्यांपासून दूर राहायला सांगतात. त्यांच्या मते 'सिद्धी-चमत्कार असतील तेथे ज्ञान वा साधुत्व असतेच असे नाही. अखंड साधना व सत्संग असेल तर साधक सहजरीत्या सिद्धावस्थेपर्यंत पोहोचतो.' ते म्हणतात -

'संतसंगेवीण रामनाम गोडी । यत्ने लक्ष कोडी उपजेना ॥१॥
संतांचे चरणी नम्र व्हावे भावे । तरीच पावावे नामरत्ना ॥२॥
नामरत्न मूल्य अनुभवी जाणे । शाब्दिक शहाणे नेणती ते ॥३॥
प्रज्ञा वासुदेव कृपालाभ झाला । अमूल्य मिळाला नाममणी ॥४॥

भक्तीसाठी प्रज्ञानानंदांनी सद्गुरुकृपाही सांगितली आहे. बाबा गंगादास व वासुदेवानंद सरस्वती यांना त्यांनी डोळसपणे गुरु केले. त्या दोघांविषयी त्यांना अत्यंत आदर वाटत असे. त्यांच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचे लेखन म्हणजे सद्गुरुकृपेचा वर्षाव होता. 'स्वये उद्धरोनी दुजा उद्धारावे, तरी सद्गुरु ऐसे म्हणावे' असे ते मानीत. त्यांच्या दृष्टीत सद्गुरु म्हणजे देवरूप, मोक्षदाते, दुःख वासनांचा नाश करणारे ! भवतापापासून संरक्षण करणारे, वात्सल्यदायी आहेत.

'गुरु तोचि देव, गुरु देव देव । येथे दुजाभाव धरू नको ॥१॥
धरू नको चित्ती ज्ञानाची अहंता । गुरु मोक्षदाता सेवी भाव ॥२॥
भावे सेवी गुरु, स्थूल सूक्ष्म देहे । कारण तें राहे तरी दूरी ॥३॥
तरी दूर नाही समाधान नित्य । देह हे अनित्य जाणोनिया ॥४॥
जाणोनिया प्रज्ञा वासुदेवी एक । गुरुपदी रंक राज्य पावे ॥५॥'

प्रज्ञानानंद सरस्वतींच्या मते 'सद्गुरु कृपा, सत्संग, रामनाम हेच ब्रह्माचे स्वरूप जाणण्यासाठी अधिक उपयुक्त ठरते. सतत नामस्मरण, हरिभजन, सत्‌शास्त्र-श्रवण व प्रत्येक व्यक्ती ईश्वररूप मानून कर्माचरण केल्यास रामकृपेने सद्गुरु भेटतात. अंतःकरणात करुणाभाव, त्यासाठी हृदयाची आर्त, आणि आत्यंतिक तळमळ हवी. तरच सद्गुरुकृपा लाभते. सद्गुरु व परमात्मा यांच्यात परमात्म्याची गाठ घालून देणारे सद्गुरु अधिक वंदनीय असतात.' 'स्वये उद्धरोनी दुजा उद्धारावे । तरी सद्गुरुदास ऐसे म्हणावे ।' असे ते मानीत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडण-घडणीत बाबा गंगादास व वासुदेवानंद सरस्वती या दोन्ही गुरुंचा महत्त्वाचा वाटा आहे. तीर्थाटण, शिवोपासना, रामनामभक्ती, तुलसीभक्ती, प्रसिद्धी पराङ्मुखता, परिश्रमशीलता, वेदोपनिषदे, श्रीमद् भागवत, भगवद्गीता, पुराण ग्रंथ आणि संतसाहित्याचा अभ्यास, अध्ययनशील वृत्ती या त्यांच्या गुणांचे संवर्धन सद्गुरुंच्या सहवासात झाले.

॥ प्रज्ञानानंद सरस्वतींचा मोक्षप्राप्तीचा मार्ग ॥

प्रज्ञानानंद सरस्वती निष्कांचन होते. द्रव्यस्पर्श झाल्यास ते सचैल स्नान करीत. अत्यंत कर्मठ तसाच काहीसा कडक स्वभाव. सोवळे-ओवळे, संन्यास धर्माचे काटेकोर आचरण असूनही त्यांनी अनुग्रह देताना जात, पंथ, वय, स्त्री-पुरुष याचा विचार न करता, अनुग्रहाची इच्छा धरणाऱ्या मुमुक्षू साधकांच्या प्राणदेहात कोणताही आपपर भाव न ठेविता आपल्यातील संचित शक्तीद्वारे, शक्तिपातविधेद्वारे, साधकाची कुंडलिनी जागृत करून अनेकांना सहज योगाच्या साहाय्याने मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखविला. शक्तिपात करणे याचा अर्थ अतींद्रिय विषय ग्रहण करण्याचे सामर्थ्य देणे. यात शिष्याला कष्ट नाहीत. गुरुकृपेच्या बळाने कुंडलिनी त्वरित जागृत होते. एकदा कुंडलिनी जागृत झाली की साधकास काही करावे लागत नाही. पुढचा अभ्यास सहज होतो. 'अभ्यासच अभ्यासाला वरती' 'माथा हातु ठेवणे' हा शक्तिपाताचा प्रकार ! कुंडलिनी शक्ती ही चित्‌शक्ती आहे. ज्ञानस्वरूप आहे. हिलाच श्रृतीत 'प्राण' म्हटले आहे. येथे गुरुंचे महत्त्व असते. सर्व मार्गात गुरुंनी शक्तिपात कल्पनेस मोठे स्थान दिले आहे. कुंडलिनी जागृत होत असता आसन स्थिर होते. उड्डियान, मूळ व जालंधर हे तीन बंध आपोआप लागतात. जीभ खेचरी मुद्रेप्रमाणे उलट होऊन आत जाऊ लागते. इतकी स्फूर्ती उत्पन्न होते की स्थिर होऊन बसणे अशक्य होते. हात-पाय खेचले जातात तेव्हा समजावे कुंडलिनी जागृत झाली. मूलाधारापासून प्राणवायूचा ओघ सहस्त्रारमध्ये जात आहे असे भासणे, आतल्या आत प्रणवाचा जप होणे, नाना तऱ्हेचे सुखानुभव येणे, नाना प्रकारचे नाद उत्पन्न होणे, मेरुदंडात कंपन होणे, सर्वत्र शून्यवत् भासणे, डोळे उघडता न येणे, शरीरातून विजेसारखा प्रवाह बाहेर जात असल्याची भावना होणे या सर्व क्रिया होत राहणे म्हणजेच 'शक्तीजागृत

होणे'. शक्ती जागृत झाली की प्राण व अपान या दोहोंचे उत्थान होते. मग ती सुषुम्नेत प्रवेश करते. चक्राचे वेध करून नाडी शुद्ध करते (ज्ञाने. अ. ६ मधील पंथराजाच्या व्याख्यानात हे सर्व सविस्तरपणे आले आहे.) स्वामी विवेकानंदांना रामकृष्ण परमहंसांनी शक्ती जागृतीद्वारेच आत्मज्ञान सांगितले. गुरुपासून मंत्रोपदेश म्हणजे शक्तीदान-शक्ती देण्याची रीत ! तुकाराम महाराजही म्हणतात 'सांपडविले वाटे जाता गंगास्नान । मस्तकी तो जाणा ठेविला करू.'

प्रज्ञानानंद सरस्वतींनी धर्माचरणाने वैराग्यप्राप्ती, वैराग्यप्राप्तीच्या बळाने योगसाधना आणि योगसाधनेच्या बळाने ज्ञानप्राप्ती हे सूत्र आपल्या आचरणानेच स्पष्ट केले. मात्र स्वतः संन्यासी असूनही संन्यासमार्गाचा पुरस्कार केला नाही. मोक्षासाठी गृहत्याग करण्याची गरज नाही असेच त्यांनी समर्थ रामदास वा एकनाथांप्रमाणे आपल्या शिष्यांच्या मनावर बिंबविले. वैराग्याची कास जीवनास आवश्यक आहे हे स्पष्ट करताना ते म्हणतात, 'वैराग्यावीण ज्ञान तें श्वानाचे रुदन, वैराग्येवीण योग तो जाणावा महारोग । वैराग्येवीण कर्म भूसे भरिली व्याघ्रचर्म । वैराग्येवीण भक्ती, ती दांभिकाची युक्ती ॥'

'जग हे मिथ्या असून आपण स्वतःच ब्रह्म आहोत.' ह्या अद्वैत वेदान्ताच्या तत्त्वविचाराची प्रचीती येण्यासाठी 'हरिभजन' आवश्यक असून, परमात्म्याशी एकरूप झाल्याखेरीज हे शक्य नाही. परमात्मा देहापुरताच मर्यादित नसून सर्व चराचरात वस्तूत व्यापून आहे. प्रज्ञानानंद म्हणतात –

'रात्रीवेळी शशी तेज तो वर्षतो । निज सुधे शमवितो । ताप सारा ॥ इंदूचे तेज जे, शीत जरी वर्तते । अर्जुन जाण बा मीच की ते ॥ लोक अग्नीने अन्न रांधिती । उष्ण सेवुनी शीत नाशिती । आहुती मुखी घालुनि तया । येथे चालती याज्ञिकी क्रिया ॥ अशी उष्णता जी वसे अग्नीमाजी । असे शक्ती ती उष्णरूपे ही माझी ॥ तसे बीज तारांगणाचे हि तेज । असे रूप माझेच जे जे सतेज ॥'

प्रज्ञानानंद सरस्वतींनी रामचरितमानसातील योग वर्णन योगशास्त्राच्या साहाय्याने गूढार्थ चंद्रिकेत उलगडून दाखविले आहे. पातंजल योगशास्त्रात आढळणाऱ्या सिद्धींची टीकेमधील उदाहरणेही वैशिष्ट्यपूर्ण म्हणता येतील. अष्टमहासिद्धीच्या गूढार्थचंद्रिकेमधील 'आर्या' वृत्तातील व्याख्याही महत्त्वपूर्ण ठरतील.

''आणिमा म्हणजे अणुहुनि होवोनि सान विश्वी वर्तावे । महिमा मोठे होऊनि लघु असता जगी महत्त्व पावावे । लघिमा कार्यी लाघव हलकेपणा अति तनूस जे येणे । गरिमा अति जड वाटे तेवी देहाजडत्व जे येणे । प्राप्ती संकल्पाने दुर्लभ वस्तूस सहज देते ती । प्राकाम्य कामनेने इच्छित रूपे अनेक धरणे ती । ईशित्व सर्व लोकी शासन जन मानिती तिला म्हणजे । वशिता जीवा वश करि सिद्धी महा आठवी तिला गणणे ।'

जगाचे मिथ्या भासत्व जाणण्यासाठी ज्ञानाची आवश्यकता असल्याचे प्रज्ञानानंद आग्रहाने प्रतिपादितात. 'क्षुधित बहु दिनांचा । अन्न सुग्रास आले । अतिशय सुख पाटी । बैसता त्यास झाले ॥ विषमय परी आहे मित्र सांगे तयासि । हृदयी तिळ न राहे । आवडी भक्षणासी ॥' (श्रीगीता कीर्तन तरंगिणी)

॥ काव्यनिर्मितीचे स्वरूप ॥

प्रज्ञानानंदांनी सिद्धावस्थेनंतरच्या जीवनात निर्मिलेल्या बव्हंश काव्यरचना अद्वैत वेदांतासाठीच्या ज्ञान, योग, कर्म व भक्तिमार्गाच्या स्पष्टीकरणासाठी मोलाच्या आहेत. श्रीगुरुगीता प्रबोधिनी, भगवद्गीता, संगीत समश्लोकी गीता, धर्मगीता, सुग्रीव गीता, श्रीमद्भगवद्गीता तरंगिणी, वेदस्तुती कीर्तन प्रभाकर, वेदस्तुती कीर्तन भास्कर, वेदांतसार, परमामृत प्रकाश, श्रीमद् भागवताच्या दशमस्कंधामधील ब्रह्मस्तुतीवरील प्राकृत टीका, मानचरितमानसावरील गद्य टीका, गूढार्थचंद्रिका, शंकराचार्यांच्या अनेक स्तोत्रांचे अनुवाद, स्फुट काव्यरचना, संध्योपासना इत्यादी त्यात महत्त्वाच्या आहेत. मात्र त्यांच्या संपूर्ण साहित्यरचनांचा धांडोळा घेतल्यास दिसून येते की, त्यांनी संस्कृतातील अनेक मौलिक ग्रंथांचा सर्वसामान्यांसाठीच सुलभ-सोप्या अशा मराठी भाषेत अनुवाद करून श्रीरामावरील आत्यंतिक भक्ती आणि अंगिकारिलेल्या जीवनमार्गावरील उत्कट श्रद्धेने रामचरितमानसातील चैतन्याचा दृढतेने आविष्कार केला.

॥ व्यक्तिमत्त्वातील विशेष ॥

प्रज्ञानानंद सरस्वतींचे व्यक्तिमत्त्व योगीजनास साजेसे होते. संन्यास ग्रहणानंतर त्यांचा वेषही कटिसूत्र, कौपीन, भगवी छाटी, दंड, कमंडलु असाच होता. 'शोभे कशी ही गुरुराजमूर्ती । काषाय वस्त्रे प्रगटे त्रिमूर्ती ॥'' असेच वर्णन त्यांच्या एका शिष्याने केलेले आहे. वैराग्यशीलता, अभ्यास, व्यासंगता, संन्यासधर्माच्या सर्व उपाधींचे पालन, सत्यवचन - अनुष्ठानांनी प्राप्त झालेली वाचासिद्धी, शास्त्रप्रचिती, गुरुप्रचिती व आत्म प्रचीतीवरील निष्ठा, त्याचबरोबर तीर्थाटणे व प्रवचन-कीर्तनांद्वारे प्रकटणारी विद्वत्ता, बहुश्रुतता, बहुभाषिकता, प्रेमळपणा, लोकसंग्रह या सर्वांमुळे ते लोकप्रिय होत गेले. सिद्धावस्था-प्राप्तीनंतरही त्यांनी साधकावस्थेचा त्याग केला नव्हता, परिणामी स्नानसंध्या, नामस्मरण, सद्ग्रंथश्रवण-पठण-मनन-अध्ययन लेखन यात ते व्यस्त असत. गुरुकृपेनंतर या सर्वच गोष्टींना अधिष्ठान प्राप्त झाले. त्यानंतरचे त्यांचे जीवन सर्वसामान्यांच्या प्रबोधनास्तव-आनंदास्तव व्यतीत झाले. आपल्या बहुतेक काव्यरचना त्यांनी प्रवचन-कीर्तनकारांना मार्गदर्शक ठरतील अशाच केलेल्या आढळतात.

॥ समर्थ संप्रदायाविषयीची निष्ठा व जागरूकता ॥

अर्वाचीन संतकवीत समर्थ रामदासांनंतर श्रीचौंडेमहाराज, श्रीगोंदवलेकर महाराज, श्रीकेशवबुवा बोरगावकर, श्रीशंकर श्रीकृष्ण देव, श्रीश्रीधरस्वामी इत्यादी महानुभवांनी समर्थ संप्रदायाविषयी लोकात जागृती निर्माण केली. या परंपरेत प्रज्ञानानंद सरस्वतींचा उल्लेख आवर्जून करायला हवा. संन्यासग्रहणापूर्वी ते स्वतःस 'ईश्वरदास रामदासी' म्हणवीत. सज्जनगडावर बराच काळ वास्तव्यास असत. त्या संप्रदायानुसार आपला आचारधर्म पाळीत. पूर्वाश्रमी सज्जनगडावर केलेल्या पायी यात्रा, कोरडी भिक्षा, माधुकरी, तीर्थाटन, रामकथा निरूपण त्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. दैनंदिन दासबोध वाचनावर त्यांचा कटाक्ष असे. समर्थ रामदास व त्यांच्या शिष्यांच्या कथाही ते सांगत. समर्थ रामदास व श्रीरामभक्तीस त्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान होते. विशेषतः स्वतः करुणाष्टके म्हणत. इतरांनाही म्हणायला सांगत. व्यासपौर्णिमा, दासनवमी उत्सवाच्या दिवशीची रक्कम सज्जनगडावर पोहोचती करीत. त्यांच्या स्फुट काव्यावर समर्थांच्या रचनांचा ठसा स्पष्टपणे जाणवतो. 'समर्था गुरो धर्म रक्षार्थ यावे', 'अहो, हिंदुंनो संघसंपन्न व्हावे' यासारख्या रचना त्याची साक्ष देतात. गूढार्थचंद्रिकेतील त्यांची भूमिका 'दासांचा दास' अशी आहे. रामचरितमानसातील अनेक संकल्पना स्पष्ट करताना समर्थ वचनांचा आधार त्यांनी घेतला. उदा.

देहाचे अनित्यत्व सांगताना 'माझी काया गेली हे तो खरे । परी मी पाहे जगदांतरे ।' या शब्दांतून त्यांनी आपले अद्वैती तत्त्वज्ञानच आविष्कृत केले असे म्हणता येते.

॥ संदर्भ ग्रंथ ॥

१) स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती : 'व्यक्ति आणि वाङ्मय', डॉ. अनिता प्रभाकर केळकर, पुणे विद्यापीठाच्या पीएच.डी पदवीसाठी सादर केलेला प्रबंध.

२) सार्थ ज्ञानेश्वरी (संपा.) श्री. शंकर वामन दांडेकर, वारकरी शिक्षण संस्था प्रकाशन, आळंदी देवाची, आवृत्ती नववी, १९९२.

३) पातंजल योगदर्शन : कृष्णाजी केशव कोल्हटकर, आवृत्ती दहावी, १९५१.

४) अर्वाचीन संतगाथा : (संपा.) ज. वा. जोशी व सुनीता जोशी, वै. प्रा. शं. वा. दांडेकर धार्मिक व सांस्कृतिक वाङ्मय प्रकाशन मंडळ, पुणे. कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती.

डॉ. सुनीता सदानंद तांबे

२, आसावरी, गणेशखिंड रोड, औंध, पुणे ७.

श्री गुरुगीता - प्रबोधिनी

प्रा. डॉ. सौ. अनुराधा कुलकर्णी

एम.ए., पीएच.डी., उपप्राचार्य कन्या महाविद्यालय मिरज. मराठी विभाग प्रमुख, प्रबंध विषय : 'प्राचीन' मराठीतील स्फुट आख्यान काव्ये, प्रबंध ग्रंथ प्रकाशित, संत वाङ्मयावर लेखमाला व प्रवचने.

ग्रंथ परिचय

प. पू. ब्रह्मीभूत प्रज्ञानानंद सरस्वती यांचे संपूर्ण जीवन एका आदर्श गुरुभक्ताचे असून त्यांनी हाती घेतलेल्या प्रत्येक ग्रंथाचा अभ्यास चोखंदळपणे केलेला आढळतो. परमेश्वरावरील प्रगाढ श्रद्धा सद्गुरुंवर अनन्य निष्ठा असल्यामुळेच गुरु व ईश्वर एकच आहेत किंबहुना सद्गुरु हेच ईश्वराचे स्वरूप आहे या विश्वासातूनच गुरुगीतेवरील हे प्रबोधक टीकालेखन स्वामींनी केलेले आढळते. श्रीमत् सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी (पोटे स्वामी) यांच्याकडून स्वामींनी दंड ग्रहण केल्यानंतर त्यांची काव्यशक्ती जागृत झाली आणि त्यांनी रामचरितमानसाचा समसंख्य समच्छंदी अनुवाद केला. त्यानंतरच्या लेखनात वेदांतसार, अभंग रामायणाबरोबरच गुरुगीता प्रबोधिनीचे लेखन घडले. गुरुगीता प्रबोधिनी ही गुरुगीतेवरील टीका असून गुरुकृपेशिवाय ती कळणार नाही. स्वामींच्या शब्दात सांगायचे तर -

''जयासी वाटे मोक्ष व्हावा । तेणे सद्गुरु करावा ।
सद्गुरुवीण देवाधिदेवा । पाविजेत नाही ॥ - समर्थ.

असे सांगून समर्थांनी 'तेणे पहावी गुरुगीता' असा हवालाही दिला आहे. 'गुरुविण भवनिधी न तरे प्राणी । विश्वी शिवसम जरी असले कोणी ॥'' (तुलसी). 'सद्गुरुवाचोनी सापडेना सोय । धरावे ते पाय आधी आधी ॥ (तुका.) 'तद्विज्ञानार्थं सद्गुरुमेवाभिगच्छेत् ।' (श्रुती)''

प. पू. स्वामींनी अशा प्रकारे गुरुमाहात्म्य सांगणारी अनेक प्रमाणवचने दिली आहेत. स्वामीजींनी सद्गुरुंची जी उत्कट प्रचीती घेतली तिचेच फलीत ही 'प्रबोधिनी' टीका आहे. सद्गुरुवरील अपार निष्ठेमुळेच त्यांचा हा ग्रंथ संभाराचा वटवृक्ष बहरून आलेला दिसतो. अन्यथा गुरुगीतेसारखा महान ग्रंथ अवघ्या ९ तासांत हातावेगळा करणे ही सोपी गोष्ट नाही. प. पू. स्वामीजींची अद्वैत भाष्यावरील निष्ठा, अभ्यास आणि अधिकार यामुळेच हे असाध्य कार्य सिद्ध झालेले दिसते.

गुरुगीतेचे महत्त्व

भारतीय अध्यात्म भक्तिसाधनेच्या इतिहासात 'गुरुगीता' हा ग्रंथ विशेष मान्यता पावलेला असून परमार्थ साधकांनी आत्मसात करावे असे 'गुरुदर्शन' त्यात मांडले आहे. 'गुरुगीता' ही स्कंदपुराणातील उत्तराखंडात आली असून स्कंदपुराण हे प्राचीन पुराण आहे. त्यामुळे गुरुगीता ही प्राचीन ठरते. यात शिव-पार्वती संवादात्मक असे तिचे स्वरूप आहे. दत्तसंप्रदायात गुरुगीतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. 'सद्गुरु-शिष्य' ही आत्मज्ञान प्रकाशित करणारी प्राचीन परंपरा सनातनपणे चालत आली आहे. साधक भक्तांच्या दृष्टीने गुरु व शिष्य यांचे स्वरूप समजणे अगत्याचे असून त्यांच्या आचार-विचारांचे ज्ञान व्हावे लागते. शिष्याची स्थिर धारणा आणि सद्गुरुंची कृपा यामुळे विशिष्ट अवस्था प्राप्त होऊ शकते. गुरुशिष्य परंपरा ही सर्व संप्रदायात असतेच. त्यामुळे 'गुरुगीता' हा ग्रंथ सार्वत्रिक स्वरूपात मान्यताप्राप्त ठरला आहे. साधनेचा कोणताही संप्रदाय असला तरी परमज्ञानाचा अंतिम प्रकाश दाखविण्यासाठी सद्गुरुची नितांत आवश्यकता आहे. ते परमज्ञान म्हणजे आत्मज्ञान असून 'आत्मज्ञानं विनापार्थ सर्व कर्म निरर्थकम् ।' असे आत्मज्ञान केवळ सद्गुरुच देऊ शकतात. म्हणूनच गुरुगीता ही सनातन आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे आदिनाथ शिवशंकरापासून सर्व साधनापंथ निघाले. सकलसिद्धांचे गुरु म्हणून त्यांचा उल्लेख येतो -

'आदिनाथ गुरु सकल सिद्धांचा' असे हे भगवान शंकर गुरुमहिमा समजावून सांगत असून आदिमाया, आदिशक्ती पार्वती शिष्याच्या भूमिकेतून प्रश्न विचारीत आहे. असा हा बोध सुदुर्लभ गुरुसेवा जाणून, परंपरा मार्ग चालण्यासाठी केला आहे, कारण

गुरुमूर्तीसी संतोष होता । त्रयमूर्ती तुष्टता तत्त्वता ।
वेदशास्त्री असे संमता । पारंपर गुरुमार्ग हा ॥
(गुरुचरित्र अ. ४१ - १४ + १८)

असा निर्देश केला असून वसिष्ठ वाल्मिक जनकादिकीना या गुरुसेवेनेच पूर्णता प्राप्त झाली म्हणूनच -

'सद्गुरुसी भजता सद्भावेसी । सद्गती होईल तुम्हा भरवसी ।
या कारणे स्थिर मानसी । शरण रिघावे श्री गुरुमूर्तीस ॥

असे या ग्रंथाचे तात्पर्य असून मोहशमन करून अज्ञान निरसन करणारा आगम-निगम सिद्धांत म्हणून गुरुगीता ग्रंथ गुरुत्व पावला आहे.

यात सद्गुरुचे महत्त्व अनन्यसाधारण असून 'गुरु' म्हणजे हृदयाकाशाच्या अंगुष्ठमात्र निर्वात पोकळीत गुप्तरूपाने राहणारे ते गुरुरूप आहे. तेच प्राणभूत तत्त्व असून ते निजगुरुत्त्वाच्या योगानेच ज्ञात होत असते. गीतेत वर्णिल्याप्रमाणे 'यथादीपो निवातस्थो नेऊ । ते सोपमास्मृते' अशा प्रकारे एकांत एका जागी तेवणाऱ्या नंदादीपाप्रमाणे स्नेहवातीशिवाय प्रकाशणारे हे स्वयंसिद्धरूप गुरुरूप असून ते चर्मचक्षूंनी दिसत नाही म्हणून ते गुह्य आहे. पण गुरुकृपादृष्टीने ते सहज साध्य होते. सद्गुरुस्वरूप स्वयंभू स्वयंप्रकाशित असून चंद्र, सूर्य, अग्नी या तिन्ही तेजांना प्रकाशित करणारे आहे. हे गुरुतेज रंग-गंधांनी कांतिमान असून गतिमान आहे. हे गतिमान आहे म्हणून त्यात दशविध नाद कोंदटले आहेत. हे घुमणारे नाद - त्या गुरुरुपात श्रुती रूपाने घुमणारे हे गीत म्हणजे गुरुगीता होय. निरंजन सद्गुरुंच्या गुरुरूपाचा नादप्रकाशयुक्त साक्षात्कार घडवणारे गीत म्हणजे गुरुगीता. ते गीतेचे श्रवण करण्यासाठी कैलास पर्वतावर ऋषिमुनी, सिद्धसाधक आतूर होऊन राहिले आहेत व सूतांना त्यासंबंधी विनंती करत आहेत. चतुर्विध पुरुषार्थाची सिद्धी करून देणारी पंचमपुरुषार्थी अशी ही गुरुगीता आहे.

रम्य अशा कैलासशिखरावर पार्वती शिवशंकरांना हा प्रश्न विचारीत आहे. आदिनाथ गुरुंची पार्वती ही सर्वश्रेष्ठ शिष्य होय. कारण औपनिषदिक नियमाने 'परिप्रश्नेन सेवया' या भावनेने ती विचारते आणि 'आशुतोष' म्हणजे अल्पशा भक्तीने - पत्रपुष्पाने प्रसन्न होणारे भगवान कृपाळूपणे

प्रसन्न होतातही. 'नमामि चरणी तव' म्हणून त्यांच्या चरणी लोळण घेऊन ती हा लोकोपकारक प्रश्न विचारत आहे.

'केन मार्गेण भो स्वामीन् देही ब्रह्ममयोभवेत' इथे शिवपार्वती - प्रकृती परमेश्वर - माया-ब्रह्माची द्वैत स्वीकारून ही अद्वैताची रहस्य विचारणा आहे. गुरुशिष्यात परम अद्वैत असून 'ये हृदयीचे ते हृदयी' असूनही गुरुगुह्याची गुरुकिल्ली मातापार्वती मागत आहे. प्रसन्नचित्त भगवान शिव उत्तर देत आहेत. दोन आरसे एकमेकांसमोर ठेवावेत दिव्याने दिवा लावावा अशा स्थितीत गौरीहर आपलेच प्रतिरूप पाहात विश्वोपकारक प्रश्नाला विश्वरहस्य उकलणारे उत्तर देत आहेत, अशी ही प्रसन्न मनोहारी गुरुगीता भगवान शिव सांगतात - 'मम रूपासि देवी त्वं'... हे पार्वती देवी तू माझेच रूप आहेस. म्हणून तुझ्यावर प्रसन्न होऊन याचे उत्तर देईन कारण हे विश्वकल्याणी असा विश्वाला उपकारक - कल्याणकारी प्रश्न आजवर कोणी केलाच नाही. म्हणून 'गुरुशिवाय या त्रिलोकात अन्य श्रेष्ठ तत्त्व नाही हे त्रिवार सत्य आहे.'

स्वामींनी या गुरुगीतेचे वर्णन करताना तिला नवरत्नांचा हार म्हटले आहे. कस्तुरीप्रमाणे ती गंधयुक्त असून कष्टसाध्य आहे व गुरुसेवेने व निष्ठेने प्राप्त होणारी आहे. प. पू. स्वामींचे आपल्या सद्‌गुरुकृपेचे प्रत्यंतर या गीताप्रबोधिनीत प्रकटले आहे. सद्‌गुरुसेवा हा ज्याचा त्याचा उत्कट अनुभव आहे. त्यातील आनंदही स्वसंवेद्य असतो. पण तो अनावर झाला की शब्दरूपाने साकार होऊ लागतो आणि कवित्वाचे स्फुरण देते. स्वामींचे नेमके हेच झाले आहे. आजवर झालेली तपश्चर्या कृपेचा क्षण येताच फुलून आली आहे.

मोगरा फुलला मोगरा फुलला
फुले वेचिता बहरू कळियासी आला ।

अशी त्यांची अवस्था झाली आहे. त्यामुळे समश्लोकी करता करता कधी कधी विस्तारही होत गेलेला दिसतो.

मंगलाचरण

गुरुगीता-प्रबोधिनीत सविस्तर मंगलाचरण आले असून स्वामींनी आपली गुरुपरंपरा सांगितली असून श्रीराम, रामभक्त आणि गुरुभक्तांना वंदन केले आहे. त्यानंतर २३ व्या श्लोकापर्यंत स्वामींनी सुंदर भावानुवाद केला आहे. यात जागोजागी स्वामींच्या उत्कट गुरुभक्तीचा प्रत्यय येत राहतो. पण गुरुभक्ती हा त्या त्या व्यक्तीचा स्वसंवेद्य असा स्वानुभव असतो. त्यानुसार श्लोकावर टीका करताना अधिक ओव्या लिहिल्या गेल्या आहेत. एकनाथ-ज्ञानेश्वरादी संतांनाही आपल्या सद्‌गुरुंचे स्मरण होताच त्यांच्या जाणीवेनेच भावांचे भरते येते आणि शब्दांच्या साहाय्याने त्याचे वर्णन केले जाते. येथे अष्टसात्त्विक भावांची दाटणी होते आणि 'कंठी प्रेम दाटे नयनी नीर लोटे । हृदयी प्रगटे रामरूप ॥' अशी अवस्था होते.

अशा परम सद्‌गुरुसाठी काय करू आणि काय नको असे होऊन जाते आणि 'ठेविता हा पायी जीव थोडा' असे होणे अगदी स्वाभाविक आहे. स्वामींचीही स्थिती अगदी अशीच झालेली दिसते. 'माझी मज झाली अनावर वाचा' झाल्यामुळेच पुढील श्लोकावर भाष्य करताना ते म्हणतात -

गुरुवक्त्रस्थितं ब्रह्म प्राप्यते तत्प्रसादतः ।
गुरुमूर्तेः सदा ध्यानं कुलस्त्री स्वपतिं यथा ॥२४॥
होय सदा गुरुध्यानरतासी । जैसा रुक्मिणीस परमात्मा ।

कुलस्त्रीं स्वपतिं यथा - या श्लोकार्धावर केलेली त्यांची टीका बिनतोड आहे. कारण या शिवाय अन्य कोणीही त्यांना दिसत नाही. स्वामींच्या ठिकाणी असणाऱ्या या मूळ उदात्त भावनेला अक्षरशः तोड नाही.

'गुरोरन्यन्न भावयेत् ॥२५॥ यावर स्पष्टीकरण देताना सद्‌गुरुंवर परम निष्ठा कशी असावी याचे सविस्तर विवेचन ३५ ते ४० अशा ६ ओव्यांतून दिले आहे. पुढे ३२ व्या श्लोकांवर - 'साधकेन प्रदातव्ये गुरुसंतोषकारकम्' भाष्य करताना - गुरु प्रसाद प्राप्त व्हावा म्हणून जे शक्य ते सर्व करावे. इतकेच नव्हे तर गुरु सुखावेल जेणे करून । ते सर्वभावे करावे ॥' या चरणात सर्वभावे करावे' यास अधिक महत्त्व आहे. 'शेवटी प्राण तोही अर्पावा' अशा सद्‌गुरुंची कायावाचामनेचित्तेवित्ते सर्व भावे सेवा करावी. कारण गुरु हे अज्ञानरुपी अंधाराचा नाश करून ज्ञानाचा दीप प्रकाशित करतात. मातापिता बंधु सखा दैवत सर्व काही तेच असतात. अशी अनन्य भावाने केलेली गुरुभक्तीच शिष्याचा उद्धार करणारी असते म्हणून सद्‌गुरुंना मनोभावे नमस्कार करतात.

''यस्यामतं तस्यमतं, मतं यस्य न वेद सः ।
अनन्यभावभावाय तस्मै श्री गुरवे नमः ॥

ज्ञानी वा अज्ञानी या दोन्हीच्या पलीकडे कोणतीच वृत्ती उठत नाही. म्हणजेच ज्ञानही नाही, अज्ञानही नाही फक्त एक गुरुभाव उरतो. ती अनन्यभाव ठेवणारी अवस्था स्वामींनी -

'— ज्यासी वाटे मज ज्ञान झाले । त्याचे अज्ञान नाहीचि सरले ।
वृत्तिवीण जे समरसले । तेचि धन्य तव कृपे ॥

'वृत्तिवीण जे समरसले' अशा नेमक्या शब्दात मांडले आहे. विशिष्ट शब्दाची मांडणी योग्यतेशिवाय होत नाही. स्वामींच्या श्रेष्ठत्वाचाच हा नमुना होय. 'शिवे क्रुद्धे गुरुस्त्राता' - या श्लोकानुसार शिव कोपल्यावर गुरु तारणहार होतात पण तेच जर क्रुद्ध झाले तर शिवदेखील वाचवू शकत नाही. म्हणून नरदेहामाझारी येऊन गुरुला सर्व भावे शरण जावे. मोक्षश्री प्राप्त करून देणारे श्रीगुरुचरण ज्या दिशेस आहेत त्या दिशेस सतत मी वंदन करतो. पुढे ५७ व्या श्लोकात

'श्रीनाथादि गुरुत्रयं... इ. शिवप्रणीत ६४ तंत्रांचा उल्लेख केला आहे. अर्थात ही वामाचारी तंत्रसाधना असल्याने त्याचा विस्तार व विचार स्वामींनी मांडलेला नाही. (पृ. २७) कारण या साधना वेदविरोधी मार्गातील आहे आणि वेद प्रामाण्य मानणाऱ्या स्वामींना ते मान्य नाही हे उचितच होय. तथापि त्या तंत्राच्या प्रवर्तक देवतांना ते वंदन करतात. या देवता ऐहिक ऐश्वर्याची प्राप्ती करून देणाऱ्या आहेत. मोक्ष साधताना किंवा ब्रह्मप्राप्तीची इच्छा करताना पारलौकिकाकडे चाललेली वाटचाल ऐहिकाने मागे आणू नये हे उचित होय.

पुढे 'अभ्यस्तै सकलै सुदीर्घमनिलै व्याधिप्रदैदुष्करै । - या श्लोकावर स्वामींनी ५ ते १४ ओव्यांतून विस्तार केला आहे. प. पू. स्वामींचा योगाभ्यासात अधिकार असल्याने योगाचे उल्लेख येतात. त्यांचे मन हठयोग शक्तीपातादियोग प्रक्रियेत रमून जाते. 'त्यामुळे योगविवरणाची ओवी संख्या आपोआपच वाढते. तीच अवस्था श्लोक १२७ व्या श्लोकावरील टीकेतही दिसून येते. पुढे स्वगुरु रूपदेहाचे चिंतन तेच भगवान शिवाचे ध्यान चिंतन होय आणि सद्‌गुरुचे नामसंकीर्तन तेच शिवाचे नामसंकीर्तन होय म्हणून शिव हा गुरुरूप होय. त्यामुळे शिवाचे रूपातीत निरंजन स्वरूप सांगताना त्यांच्या योगवृत्ती पल्लवीत होतात आणि पिंड, कुंडलिनी,

सकार-हकार, सोहंहंस आणि षट्चक्रभेदन होऊन पुढे नीलबिंदूंचे (मसुराकार) दर्शन घडणे व त्यातच सगुण ध्येयमूर्तीचा साक्षात्कार ते वर्णितात. अशा वेळी त्रिपुटी नाहीशी होऊन निर्विकल्प समाधीचा अनुभव ते शब्दबद्ध करतात. इथे स्वामींची आत्मानुभूती झळाळून प्रकट झालेली दिसते. या मार्गाने सिद्ध होणारा गुरुमार्गी शिष्य हा सर्वज्ञ होतो. ही गुह्य ज्ञानाची गुरुगीता भगवान शिवशंकरांनी पार्वतीला सांगितली असून पुढे मूळ गुरुगीतेप्रमाणेच फलश्रुती त्यांनी मांडली आहे.

शेवटी गुरुगीतेच्या समाप्ती मुद्रिकेत 'गुरु वासुदेवेचि वदविली' (२४९) असे सांगून आपल्या प्रबोधिनी टीकेचे सर्व श्रेय सद्गुरुचरणी समर्पित केले आहे. ते म्हणतात -

श्री वासुदेव कृपेचा प्रभाव । अंतःस्फूर्तीस उठाव ।
प्रबोधिनी अर्पूनी शुद्ध भाव । तत्पायभजनी मागणें ॥२५५॥

शेवटी आपल्या टीकेत त्यांनी कालोल्लेखही केला आहे. प. पू. स्वामींची योगसाधना व योगाधिकार संपन्न व्यक्तिमत्त्व पदोपदी जाणवते. अंतरी पराकोटीची गुरुभक्ती असूनदेखील योग हा त्यांच्या व्यासंगाचा विषय असलेला जाणवतो. पण गुरुगीतेसारख्या श्रेष्ठ ग्रंथावर लिहीत असताना त्यांच्या उत्कट गुरुभक्तीचा जागोजागी प्रत्यय येतो. श्रीमत आद्य शंकराचार्यांप्रमाणे अद्वैत तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करून ज्ञान, भक्ती, योग यावर सारख्याच अधिकारवाणीने विवेचन करताना निष्काम कर्ममार्गाचे आचरणही त्यांनी मांडले आहे. अर्थात सिद्ध पुरुषांना यातील काहीच करावे लागत नाही. ते सहज होत असते. पण म्हणून ते आपली साधना सांडत नाहीत. ती सतत चालूच राहते आणि ते अनन्य गुरुभक्तीने सर्व साध्य करून घेतात. आपल्या हृदगतात आत्यंतिक विनयाने स्वामींनी स्वतःच सांगितले आहे की -

'भगवत्कृपेशिवाय सद्गुरुची भेट होत नाही. सबब अनन्यभावाने पूर्ण कळवळून, अत्यंत तळमळीने, सद्गुरुप्राप्तीसाठी दयाघन श्रीरामचंद्रांची प्रार्थना करावी म्हणजे तोच सद्गुरु रूपाने भेटतो व त्यावर साधकाची निष्ठा बसते. एकदा का सद्गुरु पदकमलांची भेट होऊन तेथे अनन्यभक्ती उत्पन्न झाली म्हणजे परमार्थ राजमार्गासारखा होऊन प्रपंचदेखील परमार्थरूप होतो. अंतर्बाह्य समाधान होऊन -

'याच देही याच डोळा । भोगी मुक्तीचा सोहळा ।
देही असून देहावेगळा । धन्य होतो ॥'

असे आपले हृदगत ते सांगतात आणि यातच त्यांच्या गुरुगीता प्रबोधिनीचे रहस्य सामावलेले दिसते.

प्रा. डॉ. सौ. अनुराधा कुलकर्णी
सांगली

कीर्तीची लालसा हा तर परमार्थातला फारच मोठा खाडा होय.

श्री स्वामी प्रज्ञानानंद - अलौकिक लोकोत्तर विभूतिमत्व

श्री. वा. का. पाठे गुरुजी

[illegible]

महाराष्ट्र ही साधुसंत सत्पुरुषांची महाभूमी आहे. म्हणूनच आपल्या प्रदेशाच्या मागे महा हे उपपद लावून ही भूमी महाराष्ट्र झाली आहे. गेल्या सहस्त्र वर्षात जवळ जवळ सर्वच शतकांत निरनिराळ्या ठिकाणी आणि स्थानी साधु, संत, सत्पुरुष, महात्मे अवतरले. त्यांनी त्या त्या भूमीत अध्यात्माचे बीज पेरले. अध्यात्मविद्येचे रोपटे लावले. जनजागरणार्थ आपले सारे जीवन वेचले. तपस्या, साधना, देहदंड सोसून केलेली उपासना भोगाकडे पाठ फिरवून त्यागाचे जीवन आवडीने पत्करले. 'आम्हा हे उचित । जगा द्यावी नीत । करावे फजित । चुकती जें ॥' ही त्यांच्या कार्याची दिशा होती. 'मार्गाधारे वर्तावे । विश्वमोहरे हे लावावे' यातही त्यांचे महत्त्व होते आणि तेही 'अलौकिक नोहावे । लोकाप्रति ॥' अशा अंतरिक वृत्तीने. 'अगा जे जयाचे विहीत । ते ईश्वराचे मनोगत ॥' हा स्वधर्म वा आचारधर्म संत सांगत आले. 'हे विहीत कर्म पांडवा । आपुला अनन्य वोलावा । अजि हेची मज सेवा । सर्वात्मकाची ॥' असा व्यक्तिधर्म त्यांनी या भूमीत रुजविला. 'आता गृहादिक आधवे । हे काही नलगे त्यजावे ।' असे सांगत सांगत प्रपंचधर्म सांगताना म्हटले, 'परी आसक्त होऊनीया तेथें । सर्वथा चित्ते नसावे ॥' अशी आवश्यक तेवढी अनासक्ती सांगितली. पारमार्थिक आचार सांगताना श्री एकनाथ महाराज सांगून गेले, 'भावे करिती माझी भक्ती । विषय वासना जळुनी जाती । निर्विकल्प उपजे शांती । माझे भक्तीपंथी चालता ॥' हे भगवंताचे मनोगत सांगून आणखी आचारधर्मही कथून गेले.

'अन्न, वस्त्र मान दान । पोटीच्या कळवळ्याने जाण । करावे भूती प्रियाचरण । हा स्वधर्म जाण भक्तांचा ॥' असा गृहस्थी व्यापक अतिथी धर्मही नाथ सांगते झाले. 'ज्यासी अपंगिता नाही । त्यासी धरी जो हृदयी । तोचि साधु वोळखावा । देव तेथेचि जाणावा ॥' हा साधुसंकेत संतांनी आचरला. 'तैसा पोळे संकटे । पुढिलचेनि' असा सर्वविषयी' हे समस्त श्री वासुदेवो हा शास्त्रार्थ ही सांगितला. साधु-संत-संन्यासी यांचे जीवनच लोकहितासाठी-लोकपरहितासाठी उदित झालेले असते. 'शोधूनिया हिताहित । आले संत जगाचे ॥' असे श्री निळोबारायांनी म्हटले आहे. संतवृत्तीचे मनोगत सांगताना श्रीतुकोबारायांनी म्हटले आहे, 'आम्ही वैकुंठवासी । आलो याची कारणासी ॥ बोलीले जे ऋषि । साच भावे वर्ताया ॥' 'झाडु संतांचे मार्ग । आडरानी भरले जग ।' संत जीवनात परहिताचा विचारच अपार आहे. संतांचे सर्वात महत्त्वाचे, मोलाचे आणि महत् कार्य म्हणजे - 'काय सांगू मी या संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ॥'

मानवी देहाचे जगणे महत्त्वाचे नाही. जागून म्हणजे विचार करून जगणे महत्त्वाचे आहे. संत, विचारांच्या माध्यमांतून जनलोकमानसाला सतत आणि अखंड जागवितात. म्हणून साधुसंतांचे मानवी जीवनाला सुसंस्कारीत करण्यातही अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. त्यातही प्रत्येक साधु वा संत वा संन्यासी याच्या जीवनकार्यात काही खास वैशिष्ट्य असते. आपल्या अभूतपूर्व विचारांचा ठसा ते एवढा ठळकपणे उमटवितात की तो कोणत्याही काळात वा परिस्थितीत पुसला जात नाही.

या दृष्टिकोनांतून विचार केला तर थोरसंन्यासी परम वंदनीय स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांचे जीवनकार्य काही आगळेच मानावे लागेल. त्यांची वैराग्यशीलता तर अपूर्वच होती. ते वैराग्य भोगसापेक्ष नव्हते, ते निखळ वैराग्य होते.

सति आणि सत्पुरुष । दानशील । तपस्वी अलौकिक । संन्यासी जे ॥ ज्यांच्या गाठी अलौकीक तपस्येसह संन्यस्तत्व आहे त्यांच्यापाशी भगवंत नित्य राहतात. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती या मालिकेतील थोर संन्यासी होते. आणि 'मी माझे आठवण । विसरले जयाचे अंतःकरण । पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ॥' हा संकेत स्वामींच्या जीवनाचा मूलाधार आहे. ऐन तारुण्यात विषयेच्छा धरून समीप आलेल्या स्त्रीला त्यांनी बाजूला सारले. 'पराविया नारी रखुमाई समान । आम्ही विष्णुदास तैसे नव्हे' हे सार्थ करून दाखविले. 'परधन मानो थुक बराबर । परस्त्री माता समान । इतने उपर हरी ना मिले । तो तुलसीदास जमान ॥' ही गोस्वामीजींची वाणी त्यांच्या कानी पडण्यापूर्वीच ते या विचारांचे आचरण करीत होते. लाभालोभाचे, मोहाचे विषय विकार जोपर्यंत सामोरे येत नाहीत तोपर्यंत वैराग्याच्या गप्पा ठीक आहेत. परंतु विषय सामोरा आला तर त्याकडे पाठ फिरवणे कठीण असते. स्वामी त्यापासून दूर सूदूर राहिले. श्रीमत् प्रज्ञानानंदांचे जीवन ब्रह्माकार वृत्तीचे होते. विषयासंबंधीचे अपार वैराग्यच जीवाला ब्रह्मस्वरूपाजवळ घेऊन जाते. श्रीज्ञानदेवांनी म्हटले आहे, 'ते हे विषय वैराग्य । आत्मलाभाचे भाग्य । जेणे ब्रह्मानंद योग्य । जीव होती ।'

स्वामींचे जीवन एवढे निर्मळ, निष्कलंक, निर्हेतुक, निरागस आणि निश्चयात्मक बुद्धीचे होते. ज्ञानाची सखोलता, भक्तीची प्रेमलता, कर्माची निर्व्याज्यता त्यांच्या ठायी एकवटलेली होती. गृहस्थाश्रमात प्रवेश करूनही लवकरच त्यांनी तो सोडला. 'देव भक्तालागी करू नेदी संसार । अंगे वारावार करूनी ठेवी' असे श्रीमत् स्वामींच्या संदर्भात घडले. हे स्वामींच्या जीवनातले वैशिष्ट्य आहे. 'तैसा हृदयामध्ये मी रामु । असता सर्व सुखाचा आरामु ॥' याची साक्षात अनुभूती स्वामींनी स्वानंदे उपभोगिली. सामान्यांना 'भ्रांतासी कामु । विषयावरी' असल्याने जवळचा राम प्रचीतीला येत नाही म्हणून जीवनात राम उरत नाही.

स्वामींची आणि श्रीगोस्वामीजींच्या 'रामचरितमानसा'ची गाठ पडली

आणि अवघे जीवन राममय, तुलसीरामायणमय झाले. श्रीतुलसीदासांच्या अमर, अमृतमयी, अक्षर-ब्रह्मरूपी वर्णनांनी त्यांच्या हृदयाचा ठाव घेतला आणि 'सवेचि वस्तू घेऊनी उठी' असे घडले. महाराष्ट्रात त्या समयी होऊन गेलेल्या सर्व संतांनी मराठी संतांच्या वाङ्मयाचा आश्रय घेतला त्यावर बोलत, लिहीत राहिले. परंतु स्वामींनी कालाचा वेध घेतला. ज्या समयी गोस्वामी तुलसीदासजी रामचरितमानसाला शब्दरूप आकार देत होते त्याच वेळी इकडे महाराष्ट्रात श्रीनाथराय 'भावार्थ रामायण' अक्षरबद्ध करीत होते. रामचरित 'शतकोटी प्रविस्तरम्' आहे. तो वेध स्वामींनी घेऊन ती हिंदी रामकथा स्वामींनी मराठीत आणली. श्रीरामचरितमानस या ग्रंथाचा गौरव साक्षात् भगवान शंकरांनी केल्याचा उल्लेख श्रीतुलसीदासांच्या चरित्रांत आला आहे.

श्रीगोस्वामींच्या विचारांचे विराटत्व श्री स्वामी प्रज्ञानानंदांच्या ध्यानी येण्यास विलंब लागला नाही. किंबहुना गोस्वामींची कथा मराठीत आणण्यासाठीच स्वामींचा जन्म होता. ईश्वरी सूत्र मोठे अनाकलनीय असते. स्वामींच्या हाती तुलसीरामायण आले. त्यांनी नमन केले. ग्रंथरचनेच्या प्रारंभी श्रीगणेश, शारदा (सरस्वती) देवदेवता ऋषि, महर्षि, साधुसंतांना नमन करण्याचा प्रघात आहे. ग्रंथ कार्यसिद्धिस जावे असा या मंगलाचा अर्थ असतो. या सर्वांच्यापेक्षा आगळे असे नमन गोस्वामी श्रीतुलसीदासांनी श्रीरामचरितमानसाचे प्रारंभी केले आहे. अन्य ग्रंथकारांप्रमाणे परंपारिक नमन तर केलेच आहे. परंतु अगदी आवर्जून खल-दुर्जनांनाही वंदन केले आहे. यात श्रीतुलसीदासांची समदृष्टि आणि समाजाभिमुखता लक्षात येते. त्यांनी म्हटले आहे. 'बहुरी बंदी खल गन सति भाये । जे बिनु काज दाहिनेउ बाये ।' अशी सुरुवात केली आहे. या सर्व नमनाचा आशय असा आहे की आता मी खऱ्या भावनेने दुष्टांना नमन, वंदन करतो की जे अकारण, आपले हित करणारालासुद्धा त्रास देतात, विरुद्ध वागतात, दुसऱ्याच्या हिताची हानी झालेली पाहून ज्यांना हर्ष होतो, ज्यांना दुसऱ्याच्या नाशात आनंद व दुसऱ्याच्या लाभांत विषाद वाटतो हरिहरयशरूपी राकेशास (पूर्णचंद्रास) हे राहूप्रमाणे ग्रासू पाहतात. दुसऱ्याच्या नाशासाठी त्यांना सहस्त्रबाहूंचे बळ प्राप्त होते. दुसऱ्यांच्या दोषांना ते सहस्त्र नयनांनी पाहतात. दुसऱ्याच्या हितासंबंधी तुपात पडलेल्या माशीसारखे ज्यांचे मन असते म्हणजे माशी तुपात पडून स्वतः मरते व ते तूप खराब करते. ज्ञानदेवांनी म्हटले आहे, 'माशी आपण याते गिळवी । आणि पुढिलांते वांती शीणवी ।' अशा प्रकारे दुष्ट लोक होऊ घातलेल्या कामात अडथळे आणतात. जे दुसऱ्यांना नेहमी ताप देतात आणि पाप आणि अवगुण या संपत्तिनेच जणू ते कुबेर बनलेले असतात अशा खळांनाही गोस्वामी तुलसीदासांनी सीताराममय ('हे समस्त श्रीवासुदेव') या भावनेने वंदन केले आहे. तुकारामांनी म्हटले आहे, 'खलांची संगती उपयोगासी नये । आपणा अपाय त्याचे संगे ।' असे असताना गोस्वामीजींची व्यापक भावना खळ दुष्टांनाही नमन करून जाते.

श्री तुलसीदासांच्या अपार समत्व भावांचा विचार ऐकून-पाहून स्वामींचे मन हरखून गेले. त्यांनी रात्रंदिवस तुलसीदासांच्या विचारात स्वतःला गुंतवून घेतले. ते श्रीगोस्वामीजी त्यांना प्रभु रामचंद्रासह भेटले असावेत. त्यांची चैतन्यशील प्रज्ञा श्रीसद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामींच्या कृपेने क्रियाशील झाली इतकी की ज्ञानेश्वर माऊलींनी ज्या मराठी भाषेविषयी 'माझा मराठीचा बोल कौतुके' वगैरे म्हटले त्या मायमराठीत त्यांनी तुलसीरामायणाचा समवृत्त समच्छंद अनुवाद केला. एवढेच नव्हे तर त्यावर हिंदी व मराठीत जवळ जवळ ६००० पृष्ठांचे भाष्यही लिहिले. या भाष्याचा गौरव उत्तर भारतात झाला. स्वामीचे ज्ञानहृदय गोस्वामींच्या वाणींचेच चिंतन करीत राहिले आणि मराठी सारस्वताला तुलसीदासांची वाणी देऊन गेले.

केवढे अपार वाङ्मय त्यांनी केवळ तुलसीदासांच्या 'मानसा'वर निर्माण केले ! माणूस स्तंभित व्हावा अशी ही निर्मिती आहे. राघवाची कथा अगोदरच सर्वश्रेष्ठ. त्यावर श्रीतुलसीदासांची मंत्रमय ब्रह्मरूप वाणी अवतरली. त्यावर प्रज्ञानानंद स्वामींनी अलंकार चढविला. 'देशी आणि संस्कृतवाणी । एका भावार्थाच्या सुखासनी' बसाव्या तसेच येथे हिंदी मराठीचे झाले आहे. ज्ञानदेवांनी यासंबंधी एक दृष्टान्त दिला आहे. 'जैसे अंगाचेनी सुंदरपणें । लेणिया अंगची होय लेणें । तेथे अलंकारिजे कवण कवणें । हे निर्वचेना ।।' म्हणजे ज्या प्रमाणे शरीराच्या सौंदर्याने शरीरच दागिन्यांना शोभविते आणि कोणी कोणाला शोभा आणली याचा निवाडा करता येत नाही. त्याप्रमाणे तुलसीदासांची रामचरिताची वाणी व त्यावर अलंकाररुपी स्वामी प्रज्ञानानंदांची रामचरितमानस मराठी अनुवादित वाणी यात कोणी कोणाला शोभा आणली याचा निवाडा होत नाही. अशी स्वामींची ब्रह्मस्वरूपवाणी महाराष्ट्राला भाग्याने प्राप्त झाली आहे, असे स्वामींचे कार्य मोठे उदात्त-उदार आहे. त्यांचे अवघ्या भारतवर्षावर उपकार आहेत. त्यांच्या चरणी सहस्त्र दंडवत !

श्री. रा. का. थावरे गुरुजी
सांगानी, स्टेट बँक ऑफ इंडिया कॉलनी, सोलापूर.

चरणकमलें

चरण कमलें नित पुजू श्री गुरुंची ।
भावगंध त्यातुनी उमलती ।।धृ।।
अज्ञानाचे तम सरले आता ।
सफल जाहली जीवनगाथा ।।
कमंडलुतील अमृतधारा ।
मंत्ररूपाने मला त्वा दिली ।।१।।
जनी वनी श्रीगुरु शंकर दिसले ।
वृंदावनीचे कृष्णाही दिसले ।।
गुरुस्मृतींची फुले प्रेमलें ।
अजूनी उखाणे मला घालिती ।।२।।
गीतेचे मज मर्म उमजलें ।
विश्वामधले गूढ उकललें ।।
गुरुकृपेचे कवच लाभता ।
घडो सदा सेवा चरणांची ।।३।।

श्री. संतोष प्रल्हाद दंडवते

मानसांतर्गत स्वामींचे स्वतंत्र कवित्व

डॉ. सौ. सुषमा श. [illegible]

[illegible]

परमपूज्य स्वामी प्रज्ञानानंद यांनी, आपल्या वाङ्मय कर्तृत्वाची फार मोठी देणगी आपल्या शिष्यांना आणि साधकांनाही देऊन ठेवलेली आहे. त्यापैकीच एक ग्रंथ म्हणजे 'रामचरितमानसा'चा मराठी अवतार होय. यानेच स्वामींना 'महाराष्ट्राचे तुळसीदास' ही भूषणास्पद पदवी प्राप्त झाली. हा ग्रंथ म्हणजे, प्रसिद्ध संतकवी गोस्वामी तुलसीदास यांच्या 'रामचरितमानसा'चा मराठीतून केलेला अनुवाद आहे. हा समवृत्त, समच्छंद (दोहा, चौपाया, सोरठा, छंद इ. मुळाप्रमाणे तंतोतंत) अनुवाद जन्माला आला तो बाबा गंगादासजींच्या आशीर्वादानेच.

वास्तविक पाहता एखाद्या वाङ्मयीन कृतीचा अनुवाद करायचा म्हटले की, अनुवादकावर अनेक बंधने येत असतात. नवनिर्मिती करताना कवीकडे असलेले स्वातंत्र्य अनुवादकाजवळ नसते. अनुवाद करताना मूळ कलाकृतीमधील आशयाला, रसनिष्पत्तीला कोठेही कमीपणा येऊ न देता, त्यातील आशय, रस, दृष्टांत इ. गोष्टी अनुवादामध्ये जशाच्या तशा उतरवणे हे अवघड आणि कौशल्याचे काम आहे. अनुवाद करतानाच तो केवळ अनुवाद न वाटता स्वतंत्र साहित्यकृती शोभली पाहिजे अशी काळजी उत्तम, प्रतिभावंत अनुवादक घेतच असतो.

त्याचप्रमाणे मूळ लेखकाची कलाकृती स्वतःच्या शब्दांमध्ये बद्ध करत असताना त्यामधून, कोठे ना कोठे, अनुवादकाची प्रतिभा दर्शन देऊन जाते. मूळ कवीच्या - लेखकाच्या आड राहूनही स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व वाचकांना जाणवून देण्याचे काम प्रतिभावंत अनुवादक करत असतो. याच गोष्टीकडे अंगुली निर्देश केला असता असे निदर्शनास येते की, 'रामचरितमानसा'मध्येही स्वामींचा असा, स्वतंत्र ठसा उमटलेला आहे. त्यामधून कवीची प्रतिभा, विचारांची प्रगल्भता, ज्ञानसंपन्नता इ. चा प्रत्यय सहजगत्याच येतो. म्हणूनच रामचरितमानसामधून, अनुवादक-स्वामी प्रज्ञानानंद यांचे स्वतंत्र दर्शन कोठे कोठे झाले आहे, त्याचेच दिग्दर्शन करण्याचा हा एक प्रयत्न आहे. त्यासाठी मानसामध्ये प्रत्येक काण्डापूर्वी आलेल्या, संस्कृत श्लोकांमधून व्यक्त झालेल्या मंगलाचरणांचा विचार करणे आवश्यक आहे.

काव्याच्या प्रारंभी 'मंगलाचरण' करून श्रीगणपतीला वंदन करण्याची प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे. तिलाच अनुसरून स्वामींनी आपल्या रामचरित-मानसाच्या अनुवादाच्या प्रारंभी मंगलाचरणाचा समावेश केला असून त्याला 'अनुवादकाचे मंगलाचरण' असेही म्हटले आहे. त्यावरूनच असे लक्षात येईल की, या ग्रंथात जरी तुलसीदासकृत मंगलाचरण असले तरीही स्वामींनी स्वतःचे असे स्वतंत्र श्लोक या अनुवादात समाविष्ट केले आहेत.

त्याचप्रमाणे या सप्तकाण्डात्मक काव्यातील प्रत्येक काण्डाच्या प्रारंभीही मंगलाचरण आलेले आहे. या सर्व श्लोकांमधून (ते जरी विविध वृत्तांमध्ये असले तरी सोयीसाठी श्लोक म्हटले आहे.) गणेश-शारदा-वंदना, श्रीरामस्तुती, हनुमंत स्तुती, गुरुची महती आणि गुरुवंदना असे अनेक विषय आलेले आहेत.

सर्वप्रथम आलेल्या श्लोकात गणेशाला आणि शारदेला वंदन केले आहे. जसे –

'श्रीरामनाम-महवित् पूजाग्र्यो विघ्ननाशको देवः ।
तं गणनाथं वन्दे हंसारूढां च शारदां रसदाम् ॥' (आर्या)

यातूनच ग्रंथाचा हेतू स्पष्ट करताना स्वामी म्हणतात की, 'पूजनीय अशा श्रीरामाची महती गावी असा विचार आहे. परंतु त्यापूर्वी विघ्ननाशक आणि अग्रपूजेचा मान मिळाला आहे. अशा गणनाथाला पहिले वंदन करतो. त्याचप्रमाणे काव्याला रसमय करणाऱ्या, हंसावर आरूढ झालेल्या शारदेलाही वंदन करतो.' या वंदनातूनच, हे काव्य निर्विघ्नपणे पूर्ण व्हावे आणि रसमयही व्हावे अशी स्वामींची मनीषा असल्याचे जाणवते.

त्यानंतर उल्लेख आला आहे तो म्हणजे वीरशिरोमणी, भक्तशिरोमणी अशा हनुमंताचा. स्वामी म्हणतात –

'श्रीरामभक्तवंद्यं रघुपतिभक्तार्तिनाशनं वीरम् ।
वन्दे रघुवीरनुतं शरणागतरक्षकं महावीरम् ॥' (आर्या)

श्रीरामाचे भक्त श्रीरामाला वंदन करतातच. परंतु त्याबरोबरच या वीरश्रेष्ठाचीही पूजा करतात. म्हणून रामभक्तांना हनुमंत हा सुद्धा रामाइतकाच वंदनीय आहे. 'प्रेम हे नेहमी द्यावे आणि घ्यावे' याला अनुसरून हा हनुमंतही श्रीरामाच्या भक्तांवर अतिशय प्रेम करतो. म्हणूनच त्यांच्या दुःखांचे निवारणही करतो. असा हा धीरगंभीर तर आहेच शिवाय प्रत्यक्ष श्रीरामही याची प्रशंसा करत असतात. अशा या 'बुद्धिमतां वरिष्ठं' हनुमंताला स्वामींनीही वंदन केले आहे.

मंगलाचरणाच्या तिसऱ्या श्लोकात स्वामींनी श्रीरामाला वंदन केले आहे. श्रीरामाची स्तुती करताना स्वामींच्या वाणीमध्ये चैतन्य ओतप्रोत भरले असल्याचे जाणवते. म्हणूनच विविध विशेषणांद्वारे केलेले श्रीरामचंद्राचे वर्णन अभ्यासताना आपणही तन्मय होऊन जातो. श्रीरामाच्या श्यामल वर्णाला स्वामींनी, शरद ऋतूमध्ये आकाशाला प्राप्त होणाऱ्या निळाईची उपमा दिली आहे. श्रीरामाच्या मुखचंद्राचे साम्य शरद ऋतूमध्ये, सरोवरामध्ये प्रफुल्लित झालेल्या कमळाशी दर्शविले आहे. रामाचे श्रेष्ठत्व सांगू गेले तर, प्रत्यक्ष ब्रह्मदेव आणि शंकरही त्याला वंदन करतात. तसेच वाल्मिकी ऋषींनी आपल्या शुद्ध वाणीने रामाची महती गाइलेली आहे. अशा अनेक शब्दांमधून स्वामींनी श्रीरामचंद्राची स्तुती गाइली आहे, आणि वंदनही केले आहे. जसे –

'शरदंबराभनीलं शरत्सरोरुहसुरम्यमुखकञ्जम् ।
रामं विधिशिववन्द्यं वन्दे वाल्मीकिविमलवागीड्यम् ॥' (आर्या)

यापुढील दोन श्लोकांमधून 'रामचरित-मानसा'चा कर्ता श्री तुलसीदास आणि ज्यांच्या आशिर्वादाने रामचरित-मानस मराठी भाषेत अवतरले त्या बाबा गंगादासजींना भक्तिपूर्वक साष्टांग नमस्कार केला आहे. यामध्ये

तुलसीदासांना आद्यकवी-वाल्मीकींचा अवतार म्हटले आहे. ते शिवभक्त असून त्यांनी भवतारक अशा रामकथेचा विस्तार केल्याचे म्हटले आहे. तसेच बाबा गंगादासजींविषयी सांगताना स्वामी म्हणतात की, 'त्यांच्या आशीर्वादाच्या प्रभावानेच रामचरित-मानसातील गूढ अर्थाविषयीचे ज्ञान मला होत गेले. म्हणूनच या मराठीतील अवताराला शब्दाकार प्राप्त झाला.'

गणेश वंदनेने सुरू झालेल्या मंगलाचरणाला सद्गुरुवंदनेशिवाय पूर्णता नाही. म्हणूनच पुढे स्वामींनी आपल्या सद्गुरुंना-वासुदेवानंद सरस्वती (पोटे महाराज) ना भावपूर्ण शब्दात वंदन केले आहे.

'यत्पादपंकजपरागपवित्रमौलि - ।
भूयो न पश्यति नरो जठरं जनन्याः ।
तं वासुदेवमजमीशमनंतबोधम् ।
श्रीमद्गुरुं शरणदं प्रणतोऽस्मि नित्यम् ॥ (वसंततिलका)

गुरुची महती वर्णन करताना स्वामी म्हणतात की, माझे गुरु हे अज, ईश, अनंतबोध आहेत. त्यांना शरण जाऊन त्यांची कृपा प्राप्त करून घेतली असता पुनर्जन्म टळतो. अर्थातच मोक्षलाभ होतो. गुरुचे सामर्थ्य असे मोठे आहे. अशा गुरुंना मी नेहमीच नमस्कार करतो.

यामध्ये शेवटी या अनुवादाविषयी सांगितले आहे. हे सांगताना 'रामरूपी भ्रमराच्या सान्निध्याने शोभिवंत दिसणाऱ्या तुळशीच्या मंजिरीप्रमाणे शुद्ध असलेली रामकथा' असे वर्णन केले आहे. पुढे स्वामी म्हणतात की, अशा या कथेचा अनुवाद मी स्वभाषेत - मराठी भाषेत करत आहे. पण हे काम मी श्रीरामचंद्राची अनुज्ञा घेऊनच करतो आहे.

हे झाले ग्रंथारंभीचे मंगलाचरण. अशाच पद्धतीची श्लोकबद्ध रचना या ग्रंथातील प्रत्येक काण्डाच्या सुरुवातीस आलेल्या मंगलाचरणांची आहे.

अयोध्याकाण्डाचे प्रारंभी आलेल्या पहिल्या श्लोकामध्ये प्रभु सदाशिवाची - काशीविश्वेश्वराची अनेक प्रकारे स्तुती केली आहे.

मुमूर्षु - मरणोन्मुख - जनांना नामामृत ऐकवणारा, हलाहल भक्षण करणारा, प्रसंगोपात्त दानवांचे आणि देवांचेही रक्षण करणारा, साधकांमध्ये उत्पन्न झालेली विरक्ती वाढवून त्यांना अनासक्त करणारा, अशा अनेक शब्दांनी नावाजलेला काशीपती, माझेही रक्षण करो. असे स्वामींनी श्लोकाच्या अंती म्हटले आहे.

यातील दुसऱ्या श्लोकामध्ये स्वामी, श्रीरामचंद्राचे चरणी नतमस्तक झालेले दिसतात. याचा विशेष असा की, रामचंद्राला उद्देशून जी विशेषणे वापरली आहेत त्यामधून अयोध्येत घडलेल्या घटना, अतिशय कौशल्यपूर्ण रीतीने सूचित केल्या आहेत. जसे –

'यत्प्रेम्णाम्भोधिपारं कथमपि गमने नैव शक्तो वसिष्ठः ।
सुप्रेम्णा निर्जितान्तर्वचनवशमभूयस्य वै रामचंद्रः ।
यस्य प्रेमातिरेकाद्भयवशमगमद्राममाताऽप्यरण्ये ।
भावं वक्तुं विदेहः स्वयमपि भरतं नैव शक्तो नतोऽस्मि ॥' (स्रग्धरा)

वसिष्ठ गुरुंवर आत्यंतिक प्रेम करणारा श्रीराम; ज्याने प्रेमामुळे पत्नीला दिलेल्या वचनाला वश होऊन जणू पराभूत होऊन त्यातच अंत झाला आहे असा राजा दशरथ ज्याचा पिता आहे असा श्रीराम, ज्याच्यावर अतिशय प्रेम केले, तोच वनवासाला निघालेला पाहून ज्याची माता भयभीत झाली आहे असा श्रीराम; त्याचप्रमाणे विदेहः देहात असूनही देहापासून अलिप्त असलेल्या - ज्याच्या विषयीचे भाव प्रत्यक्ष भरतही व्यक्त करू शकला नाही असा श्रीराम; (यात दोन भाव आहेत. एक म्हणजे श्रीराम म्हणजे प्रत्यक्ष परमात्म स्वरूप म्हणून अवर्णनीय आणि रामाचा राज्यत्याग - वनवासाचा स्वीकार इ. घटनांमुळे भरत गहिवरून जणू अबोल झाला. काहीच बोलू शकला नाही.) अशा श्रीरामाच्या चरणी मी नतमस्तक होतो आहे असे स्वामींनी शेवटी म्हटले आहे.

रामाच्या प्रेमाच्या वर्षावाने न्हाऊन निघालेले गुरु वसिष्ठ; कैकयीला दिलेल्या वचनाने अगतिक झालेला व आपला अंत जवळ आला आहे हे जाणून हतबल झालेला राजा दशरथ; राम, राज्यसुखाऐवजी वनवासातील कष्टप्रद जीवनाचा स्वीकार करणार या काळजीने ग्रासलेली राममाता; रामलक्ष्मणासह सुकुमार जानकीही हे कष्ट कसे काय सहन करणार? या विचाराने भयग्रस्त झालेली कौसल्या; आणि ज्याला अयोध्येत घडलेल्या - माता कैकयीनेच घडविलेल्या - कारस्थानाची कल्पनाही नाही आणि त्याचा काही दोषही नाही तरीही अपराधीपणाची किंचित् भावना असलेला भरत; रामाला वनवासापासून परावृत्त न करू शकलेला भरत रामाची समजूत काढू शकला नाही. अशा अनेक घटनांचा उल्लेख यात करून अयोध्याकाण्डात वर्णन केल्या जाणाऱ्या प्रसंगांची जणू सूचनाच दिलेली आढळून येते.

यानंतर येते ते अरण्यकाण्ड. येथेही पहिल्या श्लोकात श्रीरामालाच वंदन केले आहे. यामध्ये वनवासाला गेलेल्या श्रीरामचंद्रांचे केलेले वर्णन चित्तवेधक आणि अतिशय प्रभावी आहे. ते वाचले असता राम-सीता-लक्ष्मण यांच्या वनात चालत असलेल्या आकृती दृष्टीसमोर उभ्या राहतात :

'वामे यस्य शरासनं सुरुचिरं बाणः करे दक्षिणे ।
पृष्ठे यस्य विभाति भूमितनया तत्पृष्ठतो लक्ष्मणः ।
वृक्षत्वक्कृतनिर्मलाम्बरधरो यो वै जटाजूट धृग् - ।
भक्तानामभयप्रदो रघुवरो नः पातु कान्तारगः ॥' (शा. वि.)

रामांच्या डाव्या हातात सुंदर धनुष्य आणि उजव्या हातात बाण आहेत. त्यांच्या पाठीमागून भूमिकन्या सीता चालत असून अतिशय शोभून दिसत आहे. तिच्याही पाठीमागून लक्ष्मण चालत आहे. या सर्वांनी वृक्षाच्या सालीपासून तयार केलेली निर्मल वस्त्रे धारण केली आहेत. (अर्थात वल्कले). रामाने मस्तकावर जटाजूट धारण केले आहे. असा हा भक्तांना अभय देणारा श्रीराम आमचेही रक्षण करो. अशी इच्छा स्वामींनी व्यक्त केली आहे. यात श्रोता आणि वक्ता, अशा दोघांचेही रक्षण स्वामींना अभिप्रेत आहे.

यानंतर गुरुकृपेच्या महात्म्याचा उल्लेख आलेला आहे. यात स्वामींनी म्हटले आहे की, गुरूचरण हे मनाला निर्मल करणारे आहेत. मुक्ती देणारे आहेत. संन्यासवृत्ती धारण करून गमन करणारे आहेत. परमपावन आणि मनोरथ पूर्ण करणारे आहेत. स्वतःच्या आत्मसुखरूपी जलाने भवभयरूपी अग्नीचे निवारण करणारे आहेत. आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक अशा त्रितापरूपी दावाग्नीचे, वणव्याचे निवारण करणारे आहेत. तसेच जन्म-मृत्यू इ. सर्व प्रकारच्या भयाचे निवारण करणारे हे गुरूचरण माझेही रक्षण करोत.

यातून, गुरुची महती सांगतानाच गुरु कशा प्रकारे शिष्याच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील असतो याचे दर्शन सहजगत्याच घडवले आहे.

किष्किंधाकाण्डापूर्वीच्या पहिल्या श्लोकातून पुन्हा एकदा रामचरित्रातील उल्लेखनीय घटनांचा संदर्भ आला आहे. स्वामी सांगतात की –

'वैदेहीं मार्गमाणः प्रतितरुकुरगं जानकीं मन्यमानो ।
गाढश्लेषं च दत्त्वा वितरति सुगतिं दुर्लभां मुक्तिरूपाम् ।

दत्ते शोकप्रलापैः स्वहितपथवतां कामरूपे विरक्तिं ।

कामान्धानां चरित्रं जनिमृतिभयदं दर्शयन् पातु रामः ॥ (स्रग्धरा)

याची पार्श्वभूमी म्हणजे, रावणाने सीतेचे हरण केलेले आहे आणि राम तिचा शोध घेत घेत वनात हिंडत आहे. सीतेच्या विरहाने व्याकूळ झालेल्या रामाचे वर्णन यात आले आहे.

वैदेहीच्या मार्गाचा शोध घेणारा राम, दुरून दिसणाऱ्या, वृक्षाच्या बुंध्यामध्ये ललनाकृतीचा भास झाला असता, ती जणू जानकीच आहे असे मानून त्या वृक्षालाच दृढ आलिंगन देत होता. विरहावस्थेतील रामाला जानकीचाच भास होत होता. परंतु स्वामी म्हणतात की, या निमित्ताने राम ज्या ज्या वृक्षाला आलिंगन देत होता. त्या त्या वृक्षाला, दुर्लभ अशी मुक्तिरूपी उत्तम गती प्राप्त करून देत होता.

शोकपूर्ण प्रलापांनी विरहवेदना दर्शवून, स्वतःच्या हिताच्या पथावरून चालणाऱ्यांना (ज्यांनी अजून काम जिंकला नाही अशांना) काम रूपातून विरक्ती देत असतानाच, कामांध मनुष्याच्या जीवनात असलेल्या जन्ममरण-भयाचे दर्शन देणारा श्रीराम आमचे रक्षण करो.

सीतेच्या विरहाने व्याकूळ होऊन दुःख करणारा श्रीराम साधकांना सांगू इच्छितो की, अरे बाबांनो ! कामाला स्वाधीन करून घ्या. नाहीतर अशी दुःखी अवस्था प्राप्त होते. तसेच जन्म-मरण-भयातून मुक्तताही होत नाही. म्हणून कामांध न होता कामालाच वश करून घ्या.

यानंतर आलेल्या श्लोकात रामनामाची महती वर्णन करून, त्या रामनामाचे स्मरण करा, जप करा अशी कळकळीची विनंती स्वामींनी मानवांना केली आहे. हे अलंकारिक भाषेत केलेले वर्णन पाहण्यासारखे आहे. हे रामनाम कसे आहे?

प्रपंचापासून निर्माण होणाऱ्या महाभयाचे निवारण करणारे, कलियुगातील दोषांना जाळून टाकणारे आहे. त्रितापरूपी कमळाला उष्णतेप्रमाणे - कोमेजून टाकणारे आहे. (त्रिताप नाहीसे करणारे.) श्रीहरीचे चरणकमल दाखवणारे, भ्रम आदि अविद्याजन्य तमाचा नाश करणारे, निजसुखरूपी (आत्मसुख) प्रभेला सूर्याप्रमाणे असणारे, स्मर म्हणजे मदन, त्याचा शत्रू जो शिव त्याला सुखदायक असणारे असे हे रामनाम आहे. हे मनुजा - साधका - तू सतत त्याचे स्मरण कर.

यानंतर आले आहे ते सुंदरकाण्ड. त्यातील श्लोक असा –

'उत्तीर्ण यस्य नैव प्रभवति भवितुं रामचंद्रः स्वयं तं ।

भक्तानामग्रगण्यं खलगणगहन-ध्वंसकं वायुसूनुम् ।

संसाराम्भोधिपारे गमनकृतमतिः प्राप्नुयायत्सहायं ।

वन्दे ऽ हं वानराणां मरणभयहरं आञ्जनेयं कपीशम् ।' (स्रग्धरा)

यामध्ये कपिश्रेष्ठ हनुमंताचे गुणवर्णन आले आहे. जसे –

ज्याच्या प्रभावाशिवाय - सामर्थ्याच्या मदतीशिवाय - स्वतः रामचंद्रसुद्धा (समुद्र) तरून जाण्यास असमर्थ होते अशा, भक्तश्रेष्ठ, दुष्टांच्या समूहाचा विध्वंस करणाऱ्या, वायुपुत्र, संसाररूपी सागरातून पार जाऊ इच्छिणाऱ्यांना ज्याच्या साहाय्याने तशी युक्ती सापडते - तशी बुद्धी प्राप्त होते अशा, वानरांचे मृत्यूचे भय हरण करणाऱ्या, अंजनीसुत कपिश्रेष्ठाला मी वंदन करतो.

दुसऱ्या श्लोकामध्ये गुरुची महती आणि स्तुती असा विषय आला आहे. येथे गुरुचे महत्त्व, ब्रह्मनिष्ठांमध्ये श्रेष्ठ, चिन्मूर्तिरूप केवलानंद अशा शब्दांमधून विशद केले आहे.

यानंतर लंकाकाण्डातील मंगलाचरणाचा पहिला श्लोक पाहू –

'अहं दशास्यं घटकर्णमोहं कामाभनादं परिवारयुक्तान् ।

हत्त्वा रिपून् मैथिलराजपुत्र्या शान्त्या समेतोऽभयदोऽस्तु रामः ।'

यामध्ये एक सुंदर रूपक मांडले आहे. येथे सीतेचे परमशान्तीशी साधर्म्य मानले आहे. सीता जशी रावण-कुंभकर्ण-मेघनाद यांच्या कृष्णकृत्यांमध्ये बंदिवान झाली होती तशी ही 'शांती' अहंकाररूपी रावण, मोहरूपी कुंभकर्ण आणि कामरूपी मेघनाद यांच्या अधिपत्याखाली बंदिस्त झाली होती. म्हणून रामाने, अहंकार, मोह आणि काम या शत्रूंना मारून शांतीला व रावण, कुंभकर्ण व मेघनाद या शत्रूंना मारून सीतेला बंधनमुक्त केले. अशा शांतिस्वरूप असलेल्या मिथिलेच्या राजकन्येसमवेत असलेला राम आम्हालाही अभयदान देवो.

यातील दुसऱ्या श्लोकात सद्गुरुंची महती वर्णन करून मोक्षगुरुचा लाभ होण्यासाठी प्रभुकृपेची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. अशी गुरुकृपा, अमृतप्राशनापासून होणाऱ्या लाभांपेक्षाही श्रेष्ठ असल्याचे सूचित केले आहे.

शेवटी येते ते उत्तरकाण्डापूर्वीचे मंगलाचरण. यातील पहिल्या श्लोकात श्रीरामांना मूर्तिमंत आत्मस्वरूप मानून केलेली स्तुती आलेली आहे. उदा -

'यो द्रष्टुं नैव शक्यैः कथमपि मनसा चक्षुषा वा कदाचित् ।

मिथ्यामायाऽऽवृतः सन् घनपटलगतो भास्करः खे विवेव ।

श्रीरामप्रेरितेन प्रबलगुरुकृपामारुतेनाऽऽहृतेऽस्मिन् ।

अज्ञानभ्रांतिमेघे प्रगट इव भवेदात्मरूपः स रामः ॥' (स्रग्धरा)

अतिशय कष्ट करूनही ज्याला मनाने किंवा डोळ्यांनी पाहणे शक्य होत नाही असा, आकाशात सूर्य जसा दाट ढगांच्या योगे झाकला जातो, त्याप्रमाणे मिथ्या असलेल्या मायेच्या योगाने झाकला गेला आहे, अशा श्रीरामांनी प्रेरणा दिलेल्या आत्यंतिक गुरुकृपेच्या वायूने आमच्या अज्ञानभ्रांतिरूपी मेघपटलाला हरण करून नेले असता, तो आत्मस्वरूपरूपी श्रीराम प्रगट झाला.

दुसऱ्या श्लोकामध्ये लक्ष्मण, वायुनन्दन-हनुमान, भरत आणि शत्रुघ्न यांना वंदन केले आहे. त्यामध्ये लक्ष्मणाला मूर्तिमंत वैराग्याचे प्रतिक, हनुमंताला विवेकाचे प्रतिक, भरताला शमादिषट्क - म्हणजेच शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधान याचे मूर्तिमंत प्रतिक आणि शत्रुघ्नाला मुमुक्षुत्वाचे प्रतिक मानून वंदन केले आहे.

शेवटी आलेल्या श्लोकात विदेहराजनंदिनी-सीता-हिचे मनोहारी वर्णन करून तिच्याजवळ आपल्या रक्षणाची, तिच्या आशीर्वादाची-कृपाप्रसादाची-मागणी स्वामींनी केली आहे. तो श्लोक असा –

'विदेहराजनंदिनी निजात्मशान्ति - रूपिणी ।

निजस्वरूपभद्रांक - सुस्थितार्ति - हारिणी ।

विमोहता - विशोकता - विरागताऽऽत्मलंकृता ।

ह्यनन्त - सौख्य - दिव्यदीप्ति - संयुता हि पातु माम् ॥' (पंचचामर)

विदेहराजाची कन्या (सीता), स्वतःच्याच आत्म्याच्या शांतीचे रूप असणारी, आत्मस्वरूपात निमग्न राहणाऱ्या शांतीचे स्वरूप अशी आत्मस्वरूप अशा श्रीरामाच्या शुभ अंकावर विराजमान झालेली, दुःख दूर करणारी, मोहातून-शोकातून-आसक्तीतून-मुक्ती हेच अलंकार धारण करणारी, चिरकालीन सुख आणि दिव्य तेज यांनी युक्त अशी सीता माझे रक्षण करो. मला पावन करो.

रामचरित-मानसातील प्रत्येक काण्डापूर्वी आलेले श्लोक व त्यातील शब्दाशब्दातून, राम-सीता-हनुमान-सद्गुरु इ. विषयीचे स्वामींच्या मनात असलेले भक्तियुक्त प्रेम कशा प्रकारे व्यक्त झाले आहे ते थोडक्यात पाहण्याचा हा एक प्रयत्न आहे. या शिवाय ग्रंथाचे अंती आलेले स्वामींचे विचार 'उपसंहार' आणि 'अनुवादकाची सज्जनांस विनंती' या शीर्षकांखाली व्यक्त झाले आहेत, ते पाहणेही आवश्यक आहे.

'उपसंहार'

यात स्वामींनी श्रीरामाला आळवले आहे - विनंती केली आहे. स्वामी म्हणतात की, 'हे श्रीरामा ! अखंड सुखदायक अशा तुझ्या नामामध्ये माझे चित्त रंगून जावे. माझ्या मनरूपी भ्रमराने तुझ्या सुकोमल अशा पदकमलावर सतत रुंजी घालावी.

गगनाहूनही गहन, गोड, गंभीर असा तुझा महिमा मी नेहमीच गाईन असे कर आणि त्रितापशमन करून तुझ्या चरणाचे दर्शन होईल असे करावेस.'

पुन्हा विनंती करतात की, 'प्रज्ञानाला अशी काया द्यावी की, जिच्यायोगे या विश्वाची आणि हे परमेश्वरा तुझीही सेवा निश्चितपणे करता यावी.'

'अनुवादकाची सज्जनांस विनंती'

स्वामी म्हणतात की, 'मी काही कुशल कवी नाही किंवा जनांना काही शिकवावे-उपदेश करावा अशी योग्यताही माझ्याजवळ नाही. परंतु सर्वसमर्थ रघुरायाने सनाथ केल्यामुळेच हे कार्य हाती घेतले आहे. तो कवी-तुलसीदास स्वतःच सर्व काही करवून घेतो आहे, असे असता या वाङ्मयकृतीविषयी 'माझी' असे म्हणून मोठेपणा का बरे मिरवू?'

यातून कवीचा नम्रपणा, अहंकाररहितता, मोठे - महत्त्वाचे - कार्य करूनही त्यातून अलिप्त राहण्याची वृत्ती असे सर्व गुण दिसून येतात. येथे रामाच्या कृपाप्रसादाविषयी उल्लेख आला असून स्वामींनी सुंदर उपमा दिली आहे. जसे 'सूर्य उगवला की त्याच्या किरणांच्या योगे सूर्यकांतमणी पाझरू लागतो. म्हणजे त्यात मण्याचे काहीच कर्तृत्व नसून सूर्यकिरणांचा प्रभाव असतो. त्याचप्रमाणे रामाची कृपा आणि कवी तुलसीदास यांच्या प्रभावानेच हे काव्य रचले गेले आहे. त्यात माझे कर्तृत्व काहीच नाही' असे स्वामींनी सांगितले आहे.

स्वामींनी स्वतःकडे विनयवृत्ती घेतानाच स्वतःला अजाण, मतिमंद म्हटले आहे. तसेच रेड्यामुखी वेद वदवण्यासारखे अशक्य कृत्य शक्य करून दाखवणाऱ्या हरीने स्वतः, मला हाताशी धरून हे अनुवादाचे कार्य करविले आहे. अशा राघवाला जे शरण जातील त्यांना नित्य सुखलाभ होईल.

ग्रंथाची फलश्रुती म्हणता येईल असा हा श्लोक पुढे आला आहे.

'सुसंगति धरुनि जे पठति या चरित्रा नव ।
स्वधर्म अवलंबुनी भजति राम भक्तीस्तव ।
विवेक विरती तसे जपति नाम जे राघव ।
जिवंत असता तनू सहज लंघिती ते भव ।' (पृथ्वी)

स्वामी म्हणतात, 'सत्संगतीत राहून जे जन या चरित्राचे पठण करतील, तसेच स्वधर्मानुसार वागून श्रीरामाचे भक्तिपूर्वक भजन-पूजनं करतील, तसेच भेदरहित होऊन जे श्रीरामनामाचा जप करतील त्यांना याचि देही आणि याचि डोळा मुक्तीचा अनुभव येईल.'

पुढे स्वामी म्हणतात की, माझ्या हृदयस्थ रामानेच ही वाङ्मयकृती तयार करविली आहे. जसे आपण शिकवू तेच शब्द पोपट बोलतो, तसेच हृदयस्थ रामाने शिकवलेले बोलच आपण या ग्रंथात प्रगट केले आहेत.

असे भाव व्यक्त करून स्वामींनी आपल्या ग्रंथकर्तृत्वाचे श्रेय गोस्वामी तुलसीदास आणि प्रभु रामचंद्र यांनाच दिले आहे.

विविध अलंकारांनी नटलेले हे मंगलाचरण; आर्या, पृथ्वी, स्रग्धरा इ. अनेकविध वृत्तांच्या आधाराने अतिशय मधुर आणि रसपूर्ण झाले आहे. 'उपसंहार' आणि 'विनंती' यातील पंडिती काव्याची धाटणी असलेले हे श्लोक म्हणजे, स्वामींचे स्वतंत्र कवित्व, स्वामींचे भाषेवरील प्रभुत्व, उत्कृष्ट वर्णनशैली, लालित्यपूर्ण शब्दयोजना आणि या सर्वांच्या मुळाशी असलेला स्वामींच्या अंतःकरणातील रामप्रेमाचा-रामभक्तीचा झरा, असा सर्व गोष्टींचा प्रत्यय आणून देणारे असेच आहे. यातून अनुवादकाचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्रकट झाले आहे असे निश्चितपणे अनुभवास येते.

मुख्य संदर्भ : रामचरितमानस (मराठी) प. प. प्रज्ञानानंद, प्रसाद प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, १९६१.

डॉ. सौ. शुभदा श. कोशे
१२६२ ब वसंत वैभव, फ्लॅट क्र. ४०१, शिवाजी रोड, पनवेल,
जि. रायगड ४१०२०६.

सद्‌गुरुकृपेसहित नाम नि सत्संग हवा

'ब्रह्मस्तुति'मध्ये प्रकटलेला अध्यात्मबोध

प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे

[illegible]

महर्षी व्यासांनी भागवत ग्रंथातील दशमस्कंधात भगवान श्रीकृष्णाची लीला पाहून ब्रह्मदेवाने त्याची जी स्तुती केली ती 'ब्रह्मस्तुती' या नावाने प्रसिद्ध आहे. श्रीप्रज्ञानानंद सरस्वती यांनी तिचा मराठीत अनुवाद केला असून त्यातील भक्तितत्त्व विशद केले आहे. सृष्टिकर्ता कोण? यासंबंधी ब्रह्मदेवाला झालेल्या गर्वाचे श्रीकृष्णाचे हरण केल्यानंतर ब्रह्मदेवाने ही स्तुती केली. पण गर्वहरणाचा प्रसंग निमित्तमात्र असून त्यातून साधकांनाच अध्यात्मबोध केला गेला असल्याने त्याचा मागोवा इथे घेतला आहे. सद्‌गुरुकृपेने नामप्राप्ती व्हावी आणि सत्संगती लाभून नामसाधना घडून यावी हा त्यातला मुख्यार्थ होय. परमेश्वर प्राप्तीसाठी ही गोष्ट आवश्यक असल्याने हा बोध प्रेरक-उपकारक ठरावा.

श्रीप्रज्ञानानंद सरस्वती यांनी मराठीतून विपुल लेखन केले आहे. त्यात 'रामचरितमानस' ग्रंथाचा समवृत्त समच्छंद अनुवाद, तसेच 'रामचरितमानस गूढार्थ चंद्रिका (भाग १ आणि भाग २), 'श्रीगोस्वामी तुलसीदासकृत श्रीरामवंदना' हा हिंदी भाषेत लिहिलेला ग्रंथ, 'श्रीगुरुगीता प्रबोधिनी' ही मराठीतून केलेली टीका, 'सुंदर कांड' चा मराठी अनुवाद, 'गीता समश्लोकी' हा ग्रंथ या बरोबरच भागवतातील दशमस्कंधातील 'ब्रह्मस्तुति' ही पुस्तिका, या सर्वांमधून त्यांतील भक्तिबोधाची दृष्टी अग्रणी ठेवून साधकांना मार्गदर्शन केले आहे. अनुवाद वा टीका करताना स्वानुभवास प्राधान्य ठेवून त्यांनी अध्यात्मबोध प्रकट केला असल्याने तो कुणाही साधकास वा अध्यात्म प्रेमीस प्रेरक-उपकारक ठरणारा असा आहे यात मुळीच संदेह नाही. त्यातील 'ब्रह्मस्तुति' या पुस्तिकेतील अध्यात्मबोधाचा मागोवा इथे विनम्रपणाने घेतला आहे. देवत्वाचा प्रत्यय येऊन ब्रह्मदेवाने केलेली ही भगवंत-स्तुती तुम्हा-आम्हास सुख, आनंद, तृप्ती, समाधान, शांती या पारमार्थिक-पंचपदींचा प्रत्यय आणून देईल. अनुवाद हा देखील स्पष्टीकरणाच्या संदर्भात स्वतंत्र चिंतनासारखा होतो, याचाही प्रत्यय 'ब्रह्मस्तुति' वाचताना येईल.

पूर्वपीठिका

महर्षी व्यासांनी भागवत ग्रंथात श्रीकृष्णाची 'भक्तिलीला' हीच प्राधान्याने वर्णिली आहे. निर्गुणदेवापेक्षाही सगुण देवाची ही ओळख करून देऊन त्यांनी 'श्रीकृष्णलीला' सांगून हा देव 'विश्वव्यापी' कसा आहे, याचा सहजसुंदर बोध करून दिला आहे. भागवतातील दशस्कंधात जी श्रीकृष्णकथा येते : त्यात कृष्णजन्म, पूतनावध, गोपींचे श्रीकृष्णावरील प्रेम, शकटासूर वध, लोणी चोरण्याची लीला, वृंदावनलीला, असुरांचा वध, ब्रह्ममोह - निवारण लीला, कालिया मर्दन, गोवर्धन लीला, रासलीला, गोपीगीते, कंसवध, सांदिपनी आश्रमात श्रीकृष्ण, उद्धव-गोपी भेट, रुक्मिणीहरण, नारदाचा अहंनिरास, शिशुपालवध, सुदामा-श्रीकृष्ण भेट,. कुरूक्षेत्री श्रीकृष्ण-यादव मिलन, असा कथाभाग येतो. भागवतग्रंथ हा भगवंताची प्राप्ती करून देणारा ग्रंथ आहे. श्रीकृष्णकथा सांगावी आणि ऐकावी, तर उभयताना ईश्वरदर्शन घडून आनंदप्राप्ती होते, हा या ग्रंथाचा महिमा आहे. संसारात दुःखे फार, म्हणून सुखावह असलेला परमार्थ अनुसरावा, हीच श्रीकृष्णकथेची भूमिका आहे. समाज भक्तिवान आणि नीतिवान व्हावा, यासाठीच भागवतकथा अनेकांनी निरूपिली आहे. दशमस्कंध हा 'श्रीकृष्णचरित्र' सांगणारा असून एकादशस्कंध हा श्रीकृष्णाची प्राप्ती कशी करून घ्यावी, हे 'भक्तिशास्त्र' सांगणारा असा आहे. ईश्वरविषयक प्रेम हीच परमभक्ती आहे. त्यामुळे भागवतातील दशम, एकादश हे दोन्ही स्कंध पारमार्थिकांच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे आहेत. एकनाथांनी तर एकादशस्कंधावर अठरा हजार ओव्या लिहिल्या आहेत. त्यातील श्रीकृष्ण-उद्धव संवाद हा भक्तिशास्त्र सांगणारा आहे. इथे दशमस्कंधातील 'ब्रह्मस्तुति' पहावयाची असून त्यातील अध्यात्म बोधाचा मागोवा घ्यायचा आहे.

प्रश्न असा उद्‌भवतो, ब्रह्मदेव तर सृष्टिकर्ता आहे. मग त्याने श्रीकृष्णाची स्तुती कशाकरिता केली? तर त्यामागेही एक कारण घडले. सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवालाच असा गर्व झाला की, 'मी सृष्टिकर्ता आहे. माझ्यासारखी सृष्टिनिर्मिती जर कुणाला करता आली तरच तो देव.' श्रीकृष्ण हा देव आहे की मानव? असा विकल्पही ब्रह्मदेवाच्या मनात आला. मग ब्रह्मदेवाने श्रीकृष्णाची परीक्षा घ्यायचे ठरविले. त्याने आपल्या मायेच्या बळाने वासरांना ब्रह्मलोकात उचलून नेले. जेवण करता करता गोपबाळांना आपल्या वासरांची आठवण झाली. पाहतात तर काय, तिथे वासरे नाहीत. त्यांनी ही गोष्ट श्रीकृष्णास सांगितली. श्रीकृष्णाने सांगितले की, 'तुम्ही जेवा, मी वासरे घेऊन येतो.' श्रीकृष्ण वासरे शोधायला निघाले. तोवर गोपबाळेही गायब झाली. श्रीकृष्णाने ओळखले की ही सर्व ब्रह्मदेवाची 'मायावी-करणी' आहे. खरे तर श्रीकृष्ण म्हणजे विष्णूच आणि विष्णू हा ब्रह्मदेवाचा पिता आहे. तरी त्याने श्रीकृष्णाची परीक्षा पहावी, ही गोष्ट अजबच म्हटली पाहिजे. श्रीकृष्णाने वासरे आणि गोपबालांची रूपे घेतली. गोकुळात सर्व काही पूर्वीप्रमाणेच चालले होते. हे पाहून ब्रह्मदेवालाच

प्रश्न पडला की, 'मी नेलेली वासरे-गोपबाळे खरी? की इथे नाचत-बागडत आहेत ती वासरे-गोपीबाळे खरी?' सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवालाच कोडे पडले.

श्रीकृष्णाने त्यावर आणखी गंमत केली. त्याने ब्रह्मदेवाचे रूप घेतले आणि आपल्या सेवकांना तो म्हणाला की, 'अलीकडे एक नकली ब्रह्मदेव इकडे-तिकडे फिरत असतो. तो जर इकडे आला तर त्याची खोड मोडा.' ब्रह्मदेव हे ब्रह्मलोकी गेले, तर काय? तिथे सेवकांनी खोड मोडायला प्रारंभ केला. सेवक म्हणाले, 'तू कोण? नकली ब्रह्मदेव दिसतोस ! खरा ब्रह्मदेव राजप्रासादात सिंहासनावर बसला आहे.' ब्रह्मदेवाने ध्यानावस्थेत पाहिले; तेव्हा त्याला तिथे श्रीकृष्णच दिसला. वासरे - गोपीबाळे यांच्यातही त्याला श्रीकृष्णदर्शन झाले. विश्वव्यापक देव त्याने पाहिला. मग त्यांचा गर्वनिरास झाला. मग त्यांनी श्रीकृष्णाची स्तुती केली. 'ब्रह्मदेवाने केलेली श्रीकृष्णाची स्तुती' हीच 'ब्रह्मस्तुति' म्हणून प्रसिद्ध आहे. चाळीस संस्कृत श्लोक हे 'ब्रह्मस्तुति'चे असून श्रीप्रज्ञानानंद सरस्वती यांनी त्याचे दोनशे सत्याऐंशी ओव्यात मराठी भाषांतर केले आहे. चौपाई, दोहा, छंद हे वृत्त वापरून त्यांनी हे काव्य केले आहे.

डोंबिवलीच्या रामचरितमानस प्रेमी मंडळाने ही पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. 'ब्रह्मस्तुति'चे गायन-वाचन-पठन-मनन जो कुणी करील त्याचे भवभय नष्ट होईल' ही फलश्रुती त्यांनी सांगितली आहे.

सद्‌गुरु हाच उद्धारकर्ता

ईश्वराचे दर्शन / ईश्वराची प्राप्ती कशाने होईल? याचे उत्तर सर्व संतसाधुसत्पुरुष यांनी एकमुखाने दिले आहे. ते म्हणजे : सद्‌गुरुंची कृपा व्हावी, त्यांच्या भेटीतून नाममंत्र मिळावा, त्या नाममंत्राचे अहर्निशी स्मरण करावे, नामसाधनेला पूरक-पोषक-प्रेरक अशी संतसंगती प्राप्त व्हावी : म्हणजे साधकाला ईश्वराचे दर्शन / ईश्वराची प्राप्ती होईल. 'ब्रह्मस्तुति'च्या अनुवादाला प्रारंभ करण्यापूर्वी श्रीप्रज्ञानानंद सरस्वती यांनी केलेल्या 'अष्ट-दशोत्तरी' ओव्यात याच भक्तिसूत्राचा उल्लेख केला असून 'ॐ नमोजी सद्‌गुरुआद्या' असे म्हणत म्हणत (१) 'तूं निर्हेतुक जनहित कर्ता' (३) आहेस; 'सद्‌गुरु वपुधर मम उद्धर्ता । त्राता दाता नच तुज पर्ता' (४) असे सांगून भवसागर तरून जाण्यासाठी आपण ईशस्तुती करीत आहोत, अशी भूमिका विशद केली आहे. ईश्वर हा भावाचा भुकेला आहे. प्रत्यक्ष ब्रह्मदेवानेही त्याची स्तुती केली आहे, तर मी ती केल्यावाचून कसा राहेन? तर सद्‌गुरुंनीच आज्ञा दिली की, तू शुभगानाचा प्रारंभ कर. (७-८-९) सद्‌गुरुंना वंदन करून श्री प्रज्ञानानंद सरस्वती यांनी अनुवादाला आरंभ केला आहे. शरणागत होऊन प्रार्थना केल्याने काव्यरचना सिद्धीस जाईल, हे निःसंशय खरे !

ब्रह्मदेवाने श्रीकृष्णस्तुतीस आरंभ केला : हे प्रभो, तुझे स्वरूप वर्षाकालीन मेघाप्रमाणे आहे. पितांबर, मकरकुंडले, मोरपीसाचा मुकुट यामुळे मुखमंडल शोभायमान झाले आहे. गळ्यात माळ, बगलेत काठी, कमरेवर खोचलेली बासरी, चरणसुद्धा कोमल : अशा तुला मी वंदन करीत आहे. जर 'परि अमर नर भजती ना । भाग्यतयांचे मंद' हेंच खरे. ईश्वराला न भजणारा तो अभागीच. पण त्याला हृदयी धराल तर तो सुखकंदच आहे. (२६) ब्रह्मदेव म्हणतो, 'क्षमा क्षमा मतिमंद मी । दिधले क्लेश अपार । कृपाकरांकित करा प्रभो । मजला नंदकुमार ।।' (३३) श्रीकृष्णाची परीक्षा घेण्याचे पाप ब्रह्मदेवाने केले म्हणूनच त्याने श्रीकृष्णाची प्रथम 'क्षमा' मागितली आहे. 'कृपा करा' अशी विनवणी केली आहे.

ब्रह्मदेवाने म्हटले, 'चतुरानन जरि जगत्पिता मी । मम मति - गति न हि तवगुणधामी' (३६) आपल्याला भगवंताची कर्तुमअकर्तुम शक्ती कळली नाही, याची खंत (अपराधभावना) त्याने व्यक्त केली आहे. ईश्वराचे ज्ञान मिळविण्यासाठी 'करी कर्णपुटी पान' असे ते म्हणतात. इथेही एक गोष्ट स्पष्ट आहे ती अशी की, ईश्वराचे ज्ञान कोण करून देतो? तर हे ज्ञान सद्‌गुरु करून देतात ! कशाने? तर कानमंत्र देऊन !! त्यालाच गुरुमंत्र म्हणतात. 'पळे पळे तव नामे स्मरतो ।' (४३) हाच आता तरणोपाय आहे. ईश्वराला वश करणारा तो 'भाग्यवंत विरळा असे' (४७) हेच खरे !! माणसाला दुःख का होते? तर 'भक्ती अशी त्यजती तव मानव । श्रमति सतत केवळ बोधास्तव' (४९) भक्तीवीण माणूस दुःखी होतो. मग सुखबोधासाठी श्रम करतो. 'भूस सांडुनी कण नातळती । श्रम बिंदुपरी भूवरि गळती । भूक न शमते श्रम अपाड ते । श्वान चघळिता जेवि हाड ते ।।' (५१) अशी स्थिती होते. कित्येकांना ज्ञान मिळत नाही. मग भक्तिमार्ग कसा कळावा? म्हणून मग देवास / सद्‌गुरुंना प्रार्थना अशी की 'वाहुनि नेई प्रवाह पूरी । नेऊनि मिळवी आत्मसागरी ।' (५७) भक्तीने ज्ञानप्राप्ती होऊन शांतीलाभ होतो. 'ज्ञान सदुर्लभ सुलभ ते । तव भक्तीने तात । श्रुती स्वये, स्मृति संत हे । कंठरवे वदतात ।।' (५८) सद्‌गुरु हेच उद्धारक आहेत, याचीच ग्वाही इथे 'ब्रह्मस्तुति'च्या संदर्भाने श्रीप्रज्ञानानंद सरस्वती यांनी दिली आहे.

गुरुकृपेची याचना

ईश्वराची प्राप्ती व्हावी यासाठी (१) सद्‌गुरुने (२) नाममंत्र देऊन (३) कृपा करावी लागते. ब्रह्मदेवाने सद्‌गुरुरूप असलेल्या भगवंतास किंवा भगवंत हाच सद्‌गुरु होय, असे मानून प्रार्थना केली आहे की, सद्‌गुरुबोधापूर्वी म्हणजेच नाममंत्रकृपा प्राप्त होण्यापूर्वी साधकाने करावयाची पूर्वतयारी / प्राथमिक तयारी कोणती? तर 'सर्वहि इंद्रिय संयम करूनी । प्राण चित्त मन पूर्ण जिंकुनी । त्यजुनी सर्वही विषय विकारा । वृत्ति करोनी आत्माकारा ।।' (६३) श्रीप्रज्ञानानंद सरस्वती यांनी काव्यात एक सुरेख कल्पना मांडली आहे. ती म्हणजे : जोवर जळात वृक्षाचे केवळ प्रतिबिंब पडते, तोवर जळ आणि वृक्ष भिन्नच राहणार. पण जळ हे जर वृक्षाला मिळाले तर तो वृक्ष बहरेल ! बुद्धिजळी जीव आहे, तर तरुस्थळी शिव आहे. त्यामुळे जीवाने शिवाकडे जायला हवे. ही गोष्ट सद्‌गुरुकृपेवीण कशी घडणार? (६५ ते ६८) म्हणून त्यासाठी 'सद्‌गुरुभक्ती करणे पडते ।' हेच खरे.

भ्रम, विकल्प, अज्ञान या गोष्टी गुरुकृपेशिवाय नाहीशा होतच नाहीत. कारण त्या नाहीशा होण्याचे साधन म्हणजे नाममंत्र होय. तोच मिळाला नसेल तर 'स्मरणोपासना' कशी होणार? तीच घडली नाही तर देवदर्शन कसे होणार? देवदर्शन झाल्याशिवाय भ्रम-विकल्प - अज्ञान दूर कसे होणार? म्हणून सद्‌गुरुकृपा हवी. त्यासाठी गुरुभक्ती म्हणजे गुरुसेवाही घडली पाहिजे. कामविकारात गढलेली माणसे दुःखी आहेतच. पण तीच जर भक्तीकडे वळतील, तर ती दुःखमुक्त होतील. (६९) 'तव गुणसागर ठाव कळेना । ज्ञान कृपेविण सहज वळेना ।।' (७५) म्हणून सद्‌गुरुंनाच शरण जायला हवे. त्यांच्याचरणी लीन व्हायला हवे. देव भक्तीनेच प्राप्त होतो. 'जो अनन्य भावे जगे । पूर्ण पदी अनुराग । अनायासे तो लाभतो ।

मुक्ती स्वदाय - भाग ॥' (७८) खरे तर अनन्यभावानेच भक्ती करायला हवी. पण ब्रह्मदेव म्हणतो, 'मी आशंका घेऊन दुरात्माच झालो होतो. मीच भ्रम झालेला होतो आणि श्रीकृष्णाला भ्रमवू पहात होतो.' भक्ताने अहंकार बाळगून देवाची / सद्गुरुंची परीक्षा घेऊ नये, हा 'महाबोध' इथे केला आहे. देवा / सद्गुरु तुम्ही 'मला क्षमा करा' असे ब्रह्मदेवाने श्रीकृष्णास विनविले आहे. देवाची परीक्षा घेणारा (देवास छळ करू पाहणारा) तो दुष्टच नव्हे काय? (८७) 'मानस मुकुरी रजोगुण शिरला । तिमिर अहंकृती नेत्री भरला ॥' 'जगज्जनक मी' हा मद झाला । 'मी स्वतंत्र' मग गमे मनाला ॥' (८८) अहंकाराने आपण अंध झालो, अशी कबुली ब्रह्मदेवाने दिली आहे. जी माणसे देवाचे कर्तृत्व / अस्तित्व शून्य लेखून मानवी अहंकाराची भाषा करतात, त्यांना काय म्हणावे? असा प्रश्न इथे मनात येऊन जातो. केवळ अज्ञान / अहंकार हेच कारण होय. ते नष्ट होण्यासाठी गुरुज्ञान / गुरुकृपा / नाममंत्र / स्मरणोपासना इत्यादींची आवश्यकता असते. आपण स्वतःभोवती गरगर फिरतो आणि (अज्ञानाने) घर फिरते आहे असे म्हणतो हेही किती विचित्र आहे ना? डोळे असूनही हरिरूप दिसत नाही, हे नवल नव्हे काय? या दोन्हींसाठी ज्ञान हवे, हेच खरे.

संतसाधूंचा द्वेष केला तर आत्महिताचा नाशच होईल. (९३) हे अध्यात्मतत्त्वही श्रीप्रज्ञानानंद सरस्वती यांनी इथे नमूद केले आहे. 'मी चुकलो हरी ! करि कृपा । समजुनी अडला दास । उदासीनता धरू नको । तोडी माया पाश ॥' (९५) अशी विनवणी ब्रह्मदेव करतात. सद्गुरुंनी आईच्या मायेने क्षमा करून मजवर कृपा करावी, अशी प्रार्थना ब्रह्मदेवाने केली आहे. मूल पाय झाडते, पण माता त्याला अपराध म्हणते काय? (१००) असा प्रश्नही ब्रह्मदेवाने केला आहे. 'प्रेमकरिती निर्हेतुक साधु । ज्यांची प्रभुपदी भक्ती अगाधु ॥' (१०३) तशी देवाने / सद्गुरुने कृपा करावी, अशी विनंती ब्रह्मदेवाने केली आहे. 'लघु गुरू वाटे भेद तयासी । फेकी लघु, धरि गुरुहृदयासी ॥' (१०५) इथे 'गुरू' या शब्दावर श्रीप्रज्ञानानंद सरस्वती यांनी कोटी केली आहे. लहान-मोठा हा भेद टाकून 'सद्गुरुस हृदयी धरा' हा इथे बोध केला आहे.

तपश्चर्येनेच देव प्रकटतो...

ब्रह्मदेवाने म्हटले आहे की, खरे तर विष्णूपासूनच माझा जन्म झाला आहे. तरी मी त्याला कसे जाणले नाही? मीच देवाची परीक्षा कशी काय पाहिली? आता मात्र तू श्रीकृष्ण दिसतोस. नारायण दिसत नाहीस. पण 'सर्वेश्वर-सर्वज्ञ' ही तुझी ओळख मला पटली. नारायण कोण? तर जनसमूह म्हणजे 'नार' होय. त्यांना आश्रय देणारा तो अयन होय म्हणून लोकांना आश्रयसीन वाटावे असा तो 'नारायण' होय. (११८) देव केव्हा दिसतो? तर 'शत वर्षे मग तप घडे । प्रगटे तै हृदयात' (१२४) असे अध्यात्मशास्त्र इथे सांगितले गेले आहे. यशोदेलाही श्रीकृष्णाने बालमुखातच विश्वरूपदर्शन दिले. (१२७) देवानेच 'दशावतार' घेतले. (१४०-१४१) पण देव अवतार का धारण करतो? तर, दुःख नष्ट करण्यासाठी आणि सद्धर्म वाढविण्यासाठी ! जेव्हा जेव्हा हे कार्य करण्याची गरज निर्माण झाली, तेव्हा तेव्हा देवाने अवतार घेतले ॥ (१४४) ज्ञानाने दुःख नाहीसे होते आणि तपश्चर्येने देव प्रकटतो. ही गोष्टही इथे स्पष्ट केली गेली आहे. (१५८) भक्ति ज्ञानानेच भवसागर तरून जाता येईल. 'परमभक्ती देवाची करितो । देवाहुनि सद्गुरुवरी धरि तो । चित्ती ऐशा धन्य नराच्या । सुप्रकाश की श्रुति-वाक्यांचा ॥ त्याला होते विमलज्ञानही । द्वैताचे तुटला संधानही ॥ स्वप्न जागृती निद्रा सरती । तरला तोचि म्हणावा जगती ॥' (१६७-१६८) (सर्प - रज्जू न्यायाने अज्ञान कसे? व ज्ञानप्रकाशाने भ्रम नष्ट कसा? याचे तपशीलवार विवेचन (१७० ते १७८) त्यांनी केले आहे.) ज्ञान प्राप्तीसाठी सद्गुरुकृपाच हवी आणि त्यांच्या नाममंत्राचे स्मरणही हवे. तीच तपश्चर्या होय. तपश्चर्येनेच देव प्रकटतो. 'म्हणुनी जे निजहिता समजती । ते भावे कृष्णा । तुज भजती ॥' (१९०-१९१) ब्रह्मदेवाने पुन्हा पुन्हा श्रीकृष्णाची 'क्षमा' मागितली असून 'कृपा करा' अशी विनवणी / आळवणी केली आहे. भक्ताने अपराधाविषयी इतका पश्चात्ताप करायला हवा, हे वेगळे सांगायला नकोच.

तपश्चर्या म्हणा, नामसाधना म्हणा, त्यासाठी आणखी एका गोष्टीची जोड द्यावी लागते. ती म्हणजे : सत्संगती प्राप्त होणे होय. 'सत्संग दे जो विषयसंगा खंग वि, कि रंगा रवी । प्रभु-चरित-गंगा, अगाध - भंगा, चित्त-जंगा भंगवी ॥' (१९७) सत्संग कशाचा हवा? तर देवाचा, गुरुंचा, तीर्थक्षेत्रांचा हवा. खरे तर श्रीकृष्णाचाच सत्संग हवा. म्हणजेच नामाचा सत्संग हवा. देवाचा / सद्गुरुंचा म्हणजेच त्याच्या कृपाशक्तीचाही सत्संग हवा. ब्रह्मदेव श्रीकृष्णाचा धावा करतात. तान्हुल्याने आईस हाक मारावी, तसे आळवितात. भक्तिरसात जे दंग झाले आहेत, ते भाग्यवंत होत. (२२०) 'भावे भगवंतास भजावे । तरुनी कृष्णपदी शुभ जावे ॥' (२२४) 'जेणे तंव चिर घडेल सेवा । महद्भाग्य ते दे मज देवा ॥' (२२६) सेवा म्हणजे तपश्चर्याच होय. त्यायोगे भाग्य कोणते घडेल? तर ईश्वरदर्शन / ईश्वर प्राप्ती हेच महद्भाग्य होय. साधनमार्गाशिवाय ईश्वरप्राप्ती होणे अशक्यच आहे.

'तपश्चर्येने ईश्वरप्राप्ती' असा भक्तिसिद्धांत मांडताना मूळ 'ब्रह्मस्तुति' मध्ये आणखी एक पूरक विचार प्रकट केला गेला आहे : तो म्हणजे तपोभूमीचा ! ही तपोभूमी कोणती? तर 'व्रजभूमी' होय. भारत ही तर तपोभूमी आहेच. पाश्चात्य व युरोपीय राष्ट्रे ही भोगभूमी म्हणून मानली जातात. म्हणून भारतात : त्यातही व्रजभूमीत : गोकुळात : जन्म घेतला तर ती गोष्ट विशेष भाग्याची ठरते. 'विश्वी धन्यची ही व्रजभूमी । जेथे पसरे तव भक्त्यूर्मी । सर्व लोक सत्यादिक देवा । स्तविती व्रजभाग्याचा ठेवा ॥' (२३१) प्रत्यक्ष भगवंतच जिथे जन्मला, ती गोकुळभूमी धन्य का न व्हावी? होईलच !! भगवान श्रीकृष्णास जन्म देणारे नंद-यशोदा हेही धन्यच नव्हेत काय? होय, तेही धन्यच !! गोकुळच्या नर-नारीसुद्धा धन्यच होत !!! सहस्त्र मुखांचा शेषही या भाग्याचे वर्णन करायला असमर्थ आहे. मग ब्रह्मदेव म्हणतो, 'मी तर चारच मुखांचा आहे. मी काय वर्णन करणार?' (२४४) आता मात्र सर्वेंद्रियांनी ब्रह्मदेव श्रीकृष्णाची स्तुती करीत आहे. हे तरी भाग्य काय थोडे आहे? (२४७)

मुखी नाम वसोदे...

व्रजभूमी / गोकुळ भूमी हीच काही तपोभूमी नाही, तर पूर्ण भरतभूमी हीच मुळी तपोभूमी/भाग्यभूमी/मोक्षभूमी आहे. मनुष्याचाच काय, पशू-पक्षी-मनुष्य यापैकी कुणाच्याही पोटी जन्म मिळाला तरी चालेल ! कृष्णमय होऊन राहिले पाहिजे, इतकेच !!

व्रजवासी गोपीजनांचे अहोभाग्य की ते कृष्णभक्तीत रमून गेले. 'तरी भक्तिरसामृत पान करी । हरि राम हरि, हरि राम हरि । न हि मा, गति

ना स्थिती मुक्तीपदी । रति मागति नित्य मुकुंद पदी ॥' (२५६) इतकी भक्ती रूजून राहायला हवी. जो श्रीकृष्णाला भजेल त्याला भवबंधही नाही. तो मुक्तच होतो. मात्र जो भजणार नाही. त्याला मात्र भवबंधाची भीती आहेच. भावभक्ती हीच महत्त्वाची. भक्तालाच ती कळते. इतरांना ती कशी कळावी? नाहीच नाही ! 'मी अज्ञ तुला कष्टविले । चरणी मस्तक ठेऊ दे ॥' (२७०) अशी पुन्हा विनवणी ब्रह्मदेवाने केली. 'सुखवृद्धी करिशी कृष्ण । नमितो नित्य नमितो मी तुला ॥' (२७५) असेही म्हटले. त्यावर श्रीकृष्ण म्हणाला, 'जे मागसी ते देतो आता । काय देऊ तुज ते वद आता ॥' (२७८) एवढंच नव्हे तर 'हे ब्रह्मदेवा ! तुला मोह नव्हताच. पण विश्वहितासाठीच तू विकल्प धरलास. मी खरा तर नंदाचा बालकच आहे.'

श्रीकृष्णाने ब्रह्मदेवास वरदान दिले की, 'तू केलेली ही स्तुती जो कुणी गायील, त्यांना भवाचे / संसाराचे भय राहणार नाही.' (२८०) ब्रह्मदेवाने देवाजवळ प्रेमभक्तीचे दान मागितले. ते देवाने दिलेही ! मग श्रीकृष्णाला ब्रह्मदेवाने चार प्रदक्षिणा घातल्या.

ब्रह्मदेवास आनंद झाला. देव भक्तीचा भुकेला आहे, हेच खरे !!

श्री प्रज्ञानानंद सरस्वती यांनी 'ब्रह्मस्तुति' चा विस्तार श्रीकृष्णाच्या कृपेने सिद्धीस गेल्याचे नमूद केले आहे व प्रार्थिले आहे की, 'संतसंग मुखी नाम दे, गुरुकृपामृत सार ॥' (२८६)

'ब्रह्मस्तुति' ही निमित्तमात्रे आहे. खरे तर हा गुरु-शिष्य, पिता-पुत्र, देव-भक्त यांचाच भक्तिसंवाद आहे. सद्गुरुकृपेने नामप्राप्ती व नामसाधनेसह सत्संग यायोगेच ईश्वरप्राप्ती होईल. हाच त्यातला 'अध्यात्मबोध' आहे. मुक्तीची ती पायवाट आहे.

टीप : कंसातील आंकडे मराठी भाषांतराच्या ओव्यांचे दर्शक आहेत.

प्रा. डॉ. नरेंद्र कुंदे

'प्रज्ञा' ए-७४, आसरा सोसा., होटगी रस्ता, सोलापूर - ४१३००३.

सन्त तेचि देव !

सन्त तेचि देव –
देव मूर्तिमन्त,
भूतलीं अनन्त
अवतार !...

स्वये देव घेती –
सन्त-अवतार,
जाहले...होणार
युगेयुगें !...

देव सन्तुरूप –
वांछिती धराया,
जन उद्धराया
जडमूढ !...

शुद्ध आचरण –
अन्तरीं निष्पाप,
परदुःख, ताप
निवारिती !...

दया क्षमाशान्ति –
सन्तांचे गा ब्रीद
उपदेश - बोध
श्रेयसाचा !...

प्रातःस्मरणीय –
वंद्य त्या विभूति,
चित्तीं सर्वभूतीं
आत्मभाव !...

सन्तसंग सदा –
जिवां लाभे जया,
येतसे उदया
भाग्यकाल !...

सन्त - समागमीं –
कळे जीवनार्थ
जन्म हो कृतार्थ
सन्तकृपें !!...

विश्वनाथ जोशी

बी-२१, श्रीराम अपार्टमेन्ट, श्रीराम मंदिरासमोर, वॉर्ड - २,
इचलकरंजी - ४१६११५

आधुनिक संतश्रेष्ठांच्या मांदियाळीतील श्रींचे स्थान

सौ. विजया प्रल्हाद प्रभुणे

बी.ए.बी.एड, हिंदी पंडित. हिंगणे महिलाश्रम, कॅम्प एज्यूकेशन, न्यू इंग्लिश स्कूल, काही काळ अध्यापन. सातत्याने वीस वर्षे दैनिक प्रभातमध्ये दर गुरुवारी अनेक संतांवर लेखमाला. श्रीगोंदवलेकर महाराज, एकनाथ, रामदास, तुलसीदास, रोहिदास, सूरदास, कबीरदास, ज्ञानेश्वर, जनाबाई, संत तुकाराम इत्यादी लेख अंदाजे १०० च्या वर. प्रपंच, पालवी, माहेर, भाग्यश्री इत्यादी मासिकातून लेखन. आठवी, नववी, दहावी आदी वर्गांचे संस्कृत मार्गदर्शन चालू. अनेक ठिकाणी प्रवचने देण्याचा छंद. उत्तम प्रतिसाद.

ॐ कार रूपा सद्गुरुस्वरूपा ।
अनाथांच्या नाथा तुज नमो - तुज नमो ।

एका संस्कृत सुभाषितकाराने गुरुंची थोरवी अगदी अचूक वर्णन केलेली आहे. कल्पवृक्ष हा कल्पिलेले देतो. कामधेनु ही इच्छिलेले देते. चिंतामणी रत्न हे चिंतिलेली गोष्ट प्रदान करते; परंतु सताम् तु सङ्गः सकलं प्रसूत ते संतश्रेष्ठांचा सहवास हा सामान्यांची ऐहिक आणि पारमार्थिक दोन्हीही उन्नती घडविण्यास समर्थ असतो.

ईश्वर निर्मित नभांगणामध्ये ज्या काही संतरूपी तारका स्वअंगीच्या तेजाने चमचम करीत असतात त्यांचे कार्य एकच असते की ईश्वरीतत्त्वाचे वाराडे बनून कर्म, ज्ञान, भक्ति यापैकी कोणत्याही मार्गाने सामान्य जीवाला साधकाचा सिद्ध मुमुक्षुचा युक्त किंवा ज्ञानमय करून टाकणे आणि भक्त भगवंत यांच्या ऐक्याची अनुभूति काय अपार आनंद देते, याचा अनुभव आणून देणे आध्यात्मिक, अधिभौतिक आणि आधिदैविक अशा त्रिविध तापांनी त्रस्त होवून सुख-दुःखाच्या पाठशिवणीचा खेळ सुख, समाधान, शांति मिळेल या आशेने सामान्य प्रापंचिक खेळतच असतो; पण अशी जी अलौकिक संतरत्ने ह्या भारतभूवर अवतरित झाली ते एकमुखाने सांगतात, अरे मानवा आम्ही ईशाज्ञेने या भूलोकी आलो आहोत. अरे जड जीवा - इकडे तिकडे भरकटू नकोस. विषयांच्या मगरमिठीत सापडू नकोस. लौकिकाची चाड धरू नकोस. मनुष्य जन्माचे सोने करायचे असेल तर गुरुकृपेचा परिसस्पर्श आवश्यकच आहे, नितांत आवश्यक आहे.

वाचकांनो आपल्या मनाला निश्चयपूर्वक सांगा -

चल मन संतांच्या बागेत ।
फुलती फुले ही गगनात ।
चल मन संतांच्या बागेत ।

भक्तिभावाचा सुगंध, सद्गुरुवरील अपार श्रद्धा, प्रयत्नांची पराकाष्ठा इत्यादी सर्वच गोष्टींचा प्रत्यय तेथे तुम्हाला येईल आणि तुमचा मनरूपी भ्रमर हा सद्गुरुचरणी श्रद्धेने गुंजारव करू लागेल.

पडली किरणे आत्मरवीची ।
झोप उडू दे नयनावरची ।
उठ झडकरी या मायेची ।
उघड झाकली मूठ ।
जीवा ऊठ सखा तू ऊठ । झाली सौख्याची लयलूट ।
स्वानंदाचा सुटला वारा । भरला शून्याचा गाभारा ।
सतरावीचा चमके तारा । नाच तूही बेछूट ।

याची प्रत्यक्ष अनुभूती घेतलेले ब्रह्मीभूत परमपूज्य परमहंस परिव्राजकाचार्य तपस्वी संन्यासी परांड्याचे श्री प्रज्ञानानंद स्वामी होते.

त्यांच्या जीवनाचा प्रत्यक्ष कार्यकाल २७।१।१९३४ पासून सुरु होतो. तत्पूर्वी रावजीबुवा या सत्पुरुषाची भेट झाली आणि साडेतीन कोटी नामजपाची आज्ञा त्यांनी आपल्या शिष्याला अर्थात स्वामींना केली. नको यज्ञ याग नको कर्म कांड । रामनाम घ्यावे मुखाने अखंड - हे त्यांचे ध्येय विवाहोत्तर कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत असतानाही प्रयत्नपूर्वक चालू राहिले. संकल्प आणि सिद्धि यामध्ये प्रयत्नांचा पूल हा बांधावाच लागतो हे श्रींच्या जीवनाकडे पाहून मिळणारी एक निश्चित शिकवण आहे आणि नामजप पूर्ण होताच वैराग्याचे तळे काठोकाठ भरले. भक्तिरुपी कमल विकसित झाले. अखंड नाममय जीवन झाले. इतर गोष्टींचे भान निमाले आणि गंगादास बुवा या सद्गुरुंच्या कृपेने २८।१।१९३४ साली पूर्ण गुरुकृपा झाली आणि धन्योऽस्मि कृतकृत्योऽस्मि असे अनुभूतीचे उद्गार बाहेर पडले. त्या जागृतीचे शब्दरूप पहा ना :

तो निजलेला जागा झाला तेव्हा ।
ते स्वप्न निमाले तेव्हा ।
या स्वप्नी तो सदैव जागृत आहे
ती निद्रा दूरची राहे ।

परंतु स्वामींचा विशेष असा की पूर्णबोधाची प्राप्ती होवूनसुद्धा सामान्य जीवांचे उद्धरण ते करीतच राहिले. अनेकदा साधनसिद्ध तीर्थयात्रा तर त्यांनी केल्या. नर्मदा तटाकी एकान्तवासात साधना केल्या. तुलसीदासावर अपार प्रीती-श्रद्धा आणि गुरुकृपा याच्या बळावर संगीत समश्लोकी गीता, श्रीगीता कीर्तन तरंगिणी, अभिनव राभायण, वेदान्तसार अभंग रामायण इत्यादी आणि विशेष म्हणजे रामचरित मानसावरील प्रचंड हिंदी-मराठी ग्रंथसंपदा - एक सामान्य शालेय शिक्षक पण गुरुकृपेचा स्पर्श होताच बहुजनहिताय बहुजनसुखाय आमरण झटत राहून अपूर्व ग्रंथसंपन्न करू शकला. पत्नीच्या संमतीने त्यांनी चतुर्थाश्रम ग्रहण करताच त्यांच्या कार्याला अनिर्बंध, मुक्त असे प्रांगण मिळाले आणि शेवटी -

कार्यमग्नता जीवन व्हावे । मृत्यू ही विश्रांती ।। हेच त्यांचे जीवन ठरले. विविध देवी, शिव, गणेश यांची अनुष्ठाने, साधने शिष्यांकरवी करून घेत. एकांतवास व नामसाधना हे त्यांच्या जीवनाचे मुख्य पैलु होते.

संत हे उदार कृपेचे सागर
इच्छिती कल्याणा देती आत्मधन

ठायीच भगवन्त भेटवीती - भगवंत भेटवीती मग आपल्या सर्वांच्याच तोंडून बाहेर पडेल अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानांजन शलाकया ।

चक्षुरुन्मीलितम् येन तस्मै श्रीगुरवे नमः

श्रीमती कमलताई वैद्य आणि त्यांचे यजमान यांच्यावर केलेली अपार कृपा हे एकच उदाहरण त्यांची शब्दातीत थोरवी पटवून देण्यास समर्थ आहे. त्यांनी कर्ममार्ग सोडला नाही. विधि निरर्थक मानला नाही. मनाला

सातत्याने नाममय ठेवून राममय करून टाकले आणि शिकवण हीच दिली :

स्मरण देवाचे करावे । अखंड नाम जपत जावे
नामस्मरणे पावावे समाधान । श्रीराम

हा त्यांचा जीवनपट अगदीच थोडक्यात पाहताना आपल्याला त्यांच्याच साधारण काळातील नाममहर्षी श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची आठवण येतेच. कारण ते हेच सांगतात -

मानू नका नाम साधन लहान । तुम्हा माझी आण । जीवेभावे सोडू नका नाम । धरू नका काम । नाही नाही नेम आयुष्याचा.

वाईचे देशपांडे नावाचे गृहस्थ दरवर्षी गुरुपौर्णिमेला येत. महाराजांवर त्यांची अपार निष्ठा होती. असेच एकदा गोंदवल्याला आले असताना वाईला जाण्यास सद्गुरुंची संमती मिळेना. पंधरा-वीस दिवस वाट पाहून अखेर एक दिवशी देशपांड्यांनी बैलगाडीत सामान-सुमान भरले आणि गुरुंचा निरोप घेण्यासाठी राममंदिरात आले. श्रीमहाराज म्हणाले, काय निघालात? पण अहो देशपांडे जरा थांबा हं ! मी आलोच पाच मिनिटांत आणि सद्गुरु निघून गेले. देशपांडे आता येतील, मग येतील म्हणून रात्रभर वाट पहात उभेच राहिले. त्यांच्याही नकळत त्यांचा नामजप सुरू झाला - श्रीराम जयराम जयजयराम. आनंदाच्या लहरी मनावर स्वार झाल्या. पूर्व दिशा प्रकाशमान झाली. सूर्यबिंब उदयाचली आले. श्रीमहाराज राजेघरातून बाहेर आले आणि हसून म्हणाले, अहो देशपांडे तुम्ही येथेच ! होय महाराज, नामजपाच्या आनंदात रात्रभर डुंबत होतो. स्थळकाळाचे बंधन नाही. स्मरण तुझे करितो रामा स्मरण तुझे करितो ही मनोवस्था होती. ही तुमची कृपा ! आणि साश्रु नयनाने देशपांडे यांनी सद्गुरुंना साष्टांग दंडवत घातले.

प्रज्ञानानंद काय वा ब्रह्मचैतन्य काय वैकुंठवासी ईश्वर प्रेषितांची ही साधन मार्गातील एकवाक्यता मनाला स्तिमित करून टाकते.

प्रज्ञानानंद स्वामींच्या प्रभावळीतील योगीराज गजानन महाराज हे एक विरक्त योग मार्गी ब्रह्मचारी भक्तवत्सल मुक्तपुरुष होते. त्यांची जीवननिष्ठाच मुळी लोककल्याण ही होती.

गणुजवरी नावाचा एक श्री गजानन महाराजांचा निस्सीम भक्त होता. सद्गुरु आपल्या एकनिष्ठ शिष्याचे रक्षण कसे करतात याचे हे उदाहरण — विहिरीमध्ये पाणी लागावे म्हणून सुरूंग ठासले. एरंडाच्या पुंगळ्या बत्ती लावून वरून सरकवल्या पण एक पुंगळी दोरीच्या गाठीवर मध्येच अडकते. मुकादाम गणूला सांगतो अरे पळ, उतर. पुंगळी सरकव नाहीतर पाणी लागून सुरूंग वाया जातील. दरिद्री असल्याने धोका असतानाही आत उतरतो. तेवढ्यात इतर सुरुंगांना बत्ती लागून धाड् धाड् दगड फुटून उडतात. गणु जवरी बिचारा आत अडकतो - मेलो मेलो सद्गुरुराया धाव रे धाव - त्यांच्या मनोमन केलेला मूक धावा ऐकताच गजानन सद्गुरु धाव घेतात व रक्षण कसे करतात पहा - गणू उडतो तो एका कपारीत जावून अडकतो. एक मोठा धोंडा कपारीवर झाकणासारखा बसतो. गणूच्या चिंधड्या झाल्या असतील असे वाटणाऱ्या लोकांना ओरडून सांगतो, अहो मी जिवंत आहे. फक्त तेवढा धोंडा काढून मला बाहेर काढा. विहिरीतून वर येताच श्रीगजानन महाराजांच्या मठात जावून साष्टांग दंडवत घालतो आणि सद्गुरु स्तवन करू लागतो.

गजाननाच्या कृपेनी । मी वाचलो या ठिकाणी ।
सद्गुरुराया गजानना तव प्रार्थना करितो ।
उद्धारास्तव बहु आवराने चरणद्वया धरितो ।

जीवनमुक्त सिद्धयोगी, कैवल्यदानी गजानन महाराज आधुनिक संतांच्या मांदियाळीतील तेजस्वी शुक्रतारा होते.

श्री संतश्रेष्ठ प्रज्ञानानंदांच्याच समकालीन शांतीचे सागर क्षमेचा मेरू पर्वत सहनशीलतेची परकोटी असलेले पावसचे स्वरूपानंद हेही एक शब्दातीत थोरवी असलेले संतश्रेष्ठ होय. त्यांचा गुरुचरणी किती तीव्रतम भक्तिभाव होता हे त्यांच्या अभंग रचनेवरूनच दिसून येते -

गुरु माता पिता । गुरु ची देवता । गुरु मुक्तिदाता ऐसे मानी । गुरु सेवेवीण जाऊ नेदी क्षण । तेणे तो प्रसन्न स्वामी म्हणे ।

एकदा एक नास्तिक अश्रद्ध, गर्विष्ठ माणूस श्री स्वामींची परीक्षा बघण्यास लोकांच्या गर्दीत प्रवेशपत्र (नावगावाचे) घेऊन उभा असतो. आयुष्याची जवळ जवळ बारा वर्षे स्वामी अंथरूणाला खिळून होते पण आत्मानंदात रत होते. त्या नास्तिक माणसाच्या मनात विचार येतो - स्वामी म्हणजे सर्वज्ञ, त्रिकालज्ञ मग नावगावाची प्रवेशपत्रे यांना हवीतच कशाला? भोंदु बुवाबाजी असेल झाले !

एवढ्यात आपल्या शिष्याकरवी बाहेर असणाऱ्या गृहस्थांच्या नावगावासकट पुकारा झाला आणि भेटीसाठी यावे म्हणून सांगण्यात आले. ते परीक्षा पाहू इच्छिणारे गृहस्थ थक्कच झाले. पावसच्या या संतश्रेष्ठाला माझी काहीच माहिती नाही मग नाव गाव कळले कसे? अहंकाराचा नाश हेच तर सद्गुरुंचे काम.

अभिमान शत्रु मोठा । सर्वांना जाचतो दुराशेने । हाचि सुबोध गुरुंचा मारावा तो समूळ नामाने ।

स्वकर्म कुसुमांनी समाज देवाची पूजा करावी म्हणून अविरत आणि अविश्रांत झटणारे श्री संत गाडगे बाबा हे कर्म मार्गाचे आदर्श होते. गावोगावची नदीनाल्याची स्वच्छता, ठिकठिकाणी अन्नछत्रे ही त्यांची अमर स्मारके आहे.

देव काही बाजारचा भाजीपाला नाही हो ! पाषाणाच्या मूर्तीला मूर्तिभंगाचे भय, लाकडाच्या मूर्तीला अग्नीचे भय - परंतु विश्वरूप विश्वात्मक देवाला कशाचेच भय नाही असे रोखठोक बजावणारे तुकडोजी प्रत्येक भक्ताला सगुणाकडून निर्गुणाकडे नेण्याचा प्रयत्न करत नाहीत काय?

नोकरीमध्ये असताना सातत्याने नामजप - तीर्थयात्रा - साधना - गुरुकृपा नंतर विविध अनुष्ठाने आणि विरक्तिचा परमोत्कर्ष म्हणजे गृहस्थाश्रमाचा त्याग करून संन्यास स्वीकारून दंडग्रहण करणे ही प्रज्ञानानंदाची अध्यात्मिक उन्नती पाहिली व त्यांची प्रचंड ग्रंथसंपदा पाहिली की आपले मन चकित होते. श्रद्धेने पुलकीत होते. काया रोमांचित होते आणि अंतर्मन हळूच मनो गाभाऱ्यात शब्द उमटवते - अरे कोणताही संत त्याची साधना पहा, त्याचा जीवनप्रवास बघा, अरे यात काही सुसूत्रता आहे, एकवाक्यता आहे. लोककल्याणाची भावना आहे. या वैकुंठवासी ईश्वर प्रेषितांचे कार्य एकच आहे, एकमेव आहे ते म्हणजे साधकाला नामदीक्षा देणे. सर्वच संत जणू एकमुखाने सांगतात -

हरिनाम सार हरिनाम सार । तेणेची भवपार पावशील । स्वामी म्हणे अंती हरिनाम एक । तारील निःशंक तुजलागी ।

सौ. विजया प्रभुणे
श्रीमान सोसा., पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक समोरील लेन, गजानन महाराज मंदिराजवळ, कर्वेनगर, पुणे ५२.
फोन : ५४१०६२७

स्वामींची धर्मनिष्ठा

श्री. ऋषिकेश ना. हेर्लेकर

सदवर्धन वेद पाठशाळेत वैदिक शिक्षण.

''ब्राह्मणत्वस्यहि रक्षणेन रक्षितस्यात् वैदिकोधर्मः ॥ जगद्गुरु शंकराचार्य.

वरील वाक्यात आचार्यांना अभिप्रेत असणारे ब्राह्मणत्व ज्यामुळे सिद्ध होईल अशी संध्योपासना. ज्याकडे समाजाचे विशेषतः ब्राह्मण समाजाचे होत असणारे दुर्लक्ष पाहिल्यानंतर प. पू. प्रज्ञानानंद स्वामींसारखे, की ज्यांना अशा ब्राह्मणत्वाबद्दल तळमळ होती; आणि त्या तळमळीतून त्यांचा 'मानवतापूर्तीसाधन व संध्योपासना' नावाचा ग्रंथ तयार झाला.

या ग्रंथात स्वामींनी संध्येविषयी अगदी सांगोपांग विचार केला आहे. ब्राह्मणाने फक्त त्रिकाल वेळेवर संध्योपासना केली तरी पुरेशी आहे. बाकी कोणतीही साधने (परमार्थासाठी) वेगळी करण्याची जरुरी नाही. गायत्री उपासनेने मोक्षसुद्धा मिळतो. ''गायत्री प्रकृतिर्ज्ञेया प्रणवः पुरुषःस्मृतः' (बृहत् पाराशरी अ. ३/५) निष्ठेने केलेला गायत्री जप, ज्यामुळे परावाणीचा गायत्री मंत्र स्पष्ट ऐकू येतो. लय योगात प्रकृतीचा पुरुषात लय होतो. गायत्री जपाने ब्रह्मज्ञान प्राप्त होते व मोक्ष मिळतो तो याच मार्गाने. पण विधीचे पालन व निषेधांचा त्याग करीत जपतत्पर झाल्यानेच हे घडते, घडेल.'' (संध्योपासना पान १७९)

अर्थात् हे विधी व निषेध कोणते? हे स्वामींनी या ग्रंथात विस्तृत मांडले आहेत. शौच व स्नानविधी पासून आचारधर्म मांडला आहे. प्रत्येक प्रकरण लिहिताना श्रुति व स्मृतींचा आधार दिला आहे. 'नामूलं लिख्यते किंचित्' हे पथ्य सर्व ठिकाणी पाळलेले आहे.

वैदिक आचारधर्माबद्दल व कर्मकांडाबद्दल आज सर्वत्र अनास्था तर आहेच. त्यामुळेच त्याचे पालन करणारे फारसे कुणी नाहीत. जे कोणी थोडेफार आहेत ते समाजात टीका व टिंगलीचे विषय होतात. आज शिक्षणाच्या विविध शाखा आहेत. जे शिक्षण उपलब्ध आहे; त्यामुळे मनुष्य नास्तिक बनतो. इंद्रियांना ज्याचे प्रत्यक्ष ज्ञान होते तेच खरे तद्व्यतिरिक्त सर्व खोटे अशी ज्यामुळे धारणा बनत जाते. त्यामुळे आचार पालन, कर्मनिष्ठा इ. त्याला प्रतिगामीपणाचे वाटू लागते. पण ज्याच्या जोरावर तो असा बनतो, विज्ञानावरच आपली निष्ठा आहे असे म्हणतो, ते विज्ञान तरी कुठे पूर्ण आहे? त्यालाही मर्यादा आहेतच. रोज नवे शोध लागत आहेत, जुने रद्दबातल ठरत आहेत.

बुद्धी व तर्काचेही पलीकडे काही आहे असे संशोधकही आता मान्य करतात. त्यामुळे पूर्वीच्या संशोधकांनी आत्मिक शक्तीचे बळावर अतींद्रिय ज्ञानही संपादन करून मानवाच्या परम कल्याणाकरिता त्याने नेमके काय करायला पाहिजे याचा विचार केला. अभ्यास केला. त्याची स्वतः प्रचीती घेतली आणि तसा पुढच्या पिढीला उपदेश केला. ग्रंथबद्धविचार अनुभूतीतून मांडले. त्याचा फायदा सर्वांनी घ्यावा यासाठी प. पू. प्रज्ञानानंद स्वामींनी पुन्हा सांगोपांग विचार करून त्याचे नव्याने संकलन या आपल्या ग्रंथात मांडले आहे. त्याची प्रचीती घ्यावी. काहीही स्वतः न करता अभ्यास न करता कर्मकांड, आचारपालन इ. वर टीका करणे हेच हल्ली पुरोगामित्वाचे लक्षण ठरले आहे. खोलवर अभ्यास करून प्रत्यक्ष प्रयोग करूनही जर प्रचीती आली नाही तर खुशाल टीका करावी.

उपनयनाची आवश्यकता यावरही स्वामींची मते परखड आहेत. शास्त्रोक्त विधीने जर उपनयनासारखा संस्कार झाला तर गायत्री उपदेशाचे वेळी बटूला प्रत्यक्ष गायत्री मातेचे दर्शन होते हे उदा. पान क्र. ७३ वर त्यांनी दिलेले जरूर पाहावे. सदरचे उपनयन स्वामींच्या उपस्थितीतच झाले होते. हल्ली हाही संस्कार, संस्कार म्हणून विधिपूर्वक न होता कसातरी आपल्या सवडीनुसार डामडौल करून साजरा करण्यात येतो. भिक्षावळीच्या मिरवणुकीचाही स्वामी निषेध करतात. उपनयन दक्षिणायनात वर्ज्य आहे. पण दिवाळीची सुटी आहे, नाताळ आहे. मेमध्ये पाण्याची टंचाई असते, म्हणून आताच करू म्हणणारे भेटतात. अशांना कितीही सांगितले तरी आपला हेका न सोडणारे महाभागही भेटले आहेत. अशा मुंजी करून देण्याचे मी नाकारले आहे. पण त्याही करणारा भेटतोच. तो म्हणतो दुसरा कुणीतरी करणारा त्यांना भेटणारच व तो करणारच. मग आपणच करून चार पैसे मिळवले तर काय बिघडले? असे म्हणणारे पुरोहितही भेटतात. म्हणजे सर्वांनाच अनास्था.

वास्तविक हा संस्कार (सर्वच संस्कार) नुसत्या देहावर होत नसून त्या सूक्ष्म पिंडावर (जीवावर) होत असतो. आणि असा हा सुसंस्कारीत जीव आपली आत्मिक उन्नती करून घेत असतो. असे संस्कार जन्मोजन्मी जर त्यावर घडले तर पायरी पायरी ने उन्नत झालेला तो जीव मोक्ष, हे मानवी जीवनाचे परमध्येय निश्चित साध्य करून घेऊ शकतो. 'अनेक जन्म संसिद्धः ततो याति परांगतिम्' (भ.गीता).

डार्वीनचा उत्क्रांतीवाद नंतरच्या संशोधकांनी रद्दबातल ठरविला आहे. वर मांडलेला आत्मिक उन्नतीचा हाच खरा उत्क्रांतीवाद आहे असे मला वाटते.

या सर्वांचा पाया संध्या व गायत्री हा आहे. इथे हे दोन शब्द मी स्वतंत्र दिले आहेत खरे पण 'या संध्या सा एव गायत्री' असे स्वामींनी प्रतिपादन केले आहे. (पान ५२) म्हणून त्यावर प्रत्येकाने विश्वास, श्रद्धा ठेवावी व जरूर संध्योपासना करावी.

ग्रंथाच्या पूर्वार्धात स्नान, संध्येची पात्रे, यज्ञोपवीत याबद्दलही सविस्तर माहिती येते. यज्ञोपवीताबद्दल (जानवे) तर स्वामी कटाक्षाने शुद्धता पाळण्याविषयी लिहितात. शेवटी जानव्याला निदान किल्ली तरी अडकवू नका असे आवर्जून सांगतात. न्यास व मुद्रा यांची आवश्यकता का आहे याचे सोदाहरण स्पष्टीकरण केले आहे. न्यास म्हणजे स्थापन करणे. मंत्राक्षरांच्या देवतांना साधकाने स्वतःच्या शरीरावयवांचे ठिकाणी स्थापन करून 'देवोभूत्वादेवंयजेत्' अशी त्याची धारणा सांगितली आहे आणि 'मुदं ददाति देवानां द्रावयत्यसुरानपि' मुद् द्रा देवांना आनंद देणारी आणि असुरांना पळवून लावणारी म्हणून मुद्रा. त्या २४ सांगितलेल्या आहे. त्या सर्व सचित्र दाखविल्या आहेत. कुशल नर्तक नुसत्या हावभावाने कथा, नाट्य, दर्शवितो. तसेच हे, अनुष्ठानातही देवांना आनंद देणे.

जपाची माळ कशी असावी, कोणती श्रेष्ठ, कशी धरावी, फिरवावी कशी, तिचे शुद्धीकरण, त्यासाठी अष्टगंध कोणते व कसे बनवावे, किती किती म्हणून सांगावे? कोणतेही न्यून राहू नये यासाठी किती कटाक्ष.

खरोखरच त्यांनी केलेले परिश्रम तेव्हाच सफल होतील, जेव्हा आपण त्याचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करू.

या सर्व शास्त्रीय गोष्टींचा उहापोह पूर्वार्धात केल्यानंतर ऋग्वेदी, शुक्लयजुर्वेदी व कृष्णयजुर्वेद यांचे संध्या प्रयोग उत्तरार्धात दिले आहेत. शिवाय गायत्री स्तोत्र, सूर्य स्तोत्र, स्वतः स्वामींनी रचलेली सूर्यस्तुती ज्यात सूर्योपनिषदाचा गोषवारा आला आहे अशी माहितीही येते. खरोखरच मानवतेची पूर्तता स्वामींनी दाखविली आहे, यात शंकाच नाही. ब्राह्मणत्वही त्यामुळेच सिद्ध होणार आहे. त्या ब्राह्मणत्वाच्या रक्षणानेच वैदिक धर्म रक्षण आणि 'धर्मो रक्षति रक्षितः' सर्व समाजाचे रक्षण, इतकेच नव्हे तर ऐहिक व पारलौकिक परम कल्याण साध्य होणार आहे.

इतिशम्

ऋषिकेश हेर्लेकर

रघुवर सुहृदाला नित्य चित्ती धरावे ।
स्थिरचर जग त्याचे रूप हे आठवावे ।
कधी परगुण दोषा अंतरी नाठवावे ।
त्वरित तरीच येथे मुक्ती सायज्य फावे ॥

॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥

अहिल्योधारक, ऋषिमुनीतारक ।
रघुकुलदिपक, त्रैलोक्यतारक ।
जगउद्धारक, एकच नाम श्रीराम जय राम जय जय राम ॥१॥
आदर्श बंधू, आदर्श त्राता ।
आदर्श मित्र, आदर्श पिता ।
आदर्शत्वाचे एकच नाम श्रीराम जय राम जय जय राम ॥२॥
एकपत्निव्रती, एकबाणी ।
रघुकुलनंदन, सत्यभाषणी ।
खलनिर्दालक एकच नाम श्रीराम जय राम जय जय राम ॥३॥
पितृवचनी, आदर्श पुत्र ।
स्वयंप्रकाशी, हा भूमित्र ।
आनंददायक, एकच नाम श्रीराम जय राम जय जय राम ॥४॥
सत्यवचनी, सदाचारी ।
शरसंधाने, दुरीत वारी ।
सद्धर्मपालक, एकच नाम श्रीराम जय राम जय जय राम ॥५॥
क्षमासिंधु, कैवल्यदाता ।
भक्तमनोरथ, पूर्तीकर्ता ।
सुजनउद्धारक, एकच नाम श्रीराम जय राम जय जय राम ॥६॥
मानदंड हा, रघुकुलाचा ।
अटलमेरू हा, वचनपूर्तीचा ।
दैन्यदुःखहारक, एकच नाम श्रीराम जय राम जय जय राम ॥७॥
भक्तसंरक्षक, आनंदघन ।
हरिहराचे, एकच लक्ष ण ।
मृत्युभयहारक, एकच नाम श्रीराम जय राम जय जय राम ॥८॥
हनुमंताचे, आराध्यजीवन ।
बिभीषणाचे, सन्मित्र स्थान ।
कृपाछत्राचे, एकच नाम श्रीराम जय राम जय जय राम ॥९॥
सुग्रीवाचे, संरक्षकधन ।
जानकीचे, पंचप्राण ।
चैतन्यदायक, एकच नाम श्रीराम जय राम जय जय राम ॥१०॥
दशाननाचा, मृत्युदाता ।
अयोध्येचा, जनहितकर्ता ।
परमपवित्र, एकच नाम श्रीराम जय राम जय जय राम ॥११॥

वसंत गोडबोले,
१२४ शनिवार पेठ, "नेनेघाट", पुणे - ४११ ०३०.

स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती

संशोधन : काल आज आणि उद्या

डॉ. सौ. अनिता प्र. केळकर

एम.ए.पीएच.डी - स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती व्यक्ती आणि वाङ्मय १९९२ मध्ये पुणे विद्यापीठ संत नामदेव अध्यासन परिवारात दाखल. १) [illegible] एक चिकित्सक अभ्यास, २) प्रा. श्री. मा. कुलकर्णी व्यक्ती आणि वाङ्मय हे प्रकल्प पूर्ण. ३) १९९६-९७ मधील संतसाहित्य विषयक [illegible]. ४) [illegible] आणि [illegible] पुरस्कार प्राप्त.

प्रज्ञानानंद सरस्वती - पूर्वाश्रमीचे दत्तात्रेय नारायण कर्वे. मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील गिम्हवणे या गावचे. सनातनी, कर्मठ परंतु संस्कारसंपन्न ब्राह्मण कुटुंबात इ. स. १८९३ मध्ये त्यांचा जन्म झाला. स्वामींचे शिक्षण काहीसे उशीरा झाले. त्यांनी शिक्षकी पेशा स्वीकारला. स्वाभिमान व तत्त्वनिष्ठा गहाण ठेवून पत्करलेल्या लाचारीपेक्षा तत्त्वाग्रहासाठी कशाचीही तमा न बाळगणारी निस्पृह वृत्ती आणि लोकमान्य बाणा अंगिकारला. त्यांच्या जीवनविषयक लेखातून हे सहज ध्यानात येईल. संसारात राहूनही ते विरक्त आणि कर्माचरणात शिस्तबद्ध राहिले. गृहस्थाश्रमातील कोणत्याही जबाबदाऱ्या न टाळता त्यांची पूर्तता करूनच चतुर्थाश्रम स्वीकारला. कुटुंबवत्सलता आणि परमार्थपरता यांचा अवघड समन्वय साधून अनासक्त गृहस्थाश्रम आचरला. स्नान, संध्या, जपजाप्य, पुरश्चरणे, ध्यानधारणा, योगसाधना यांमध्ये कधीही खंड पडू दिला नाही. सत्संग, नामस्मरण आणि सत्साहित्याचे अध्ययन या त्रिसूत्री श्रद्धेवर साधकावस्थेची पूर्वयोजना केली. आयुष्याच्या अखेरपर्यंत 'सिद्ध' होऊनही साधक साधकच असतो हा वस्तुपाठ आपल्या आचरणाद्वारा स्वामींनी घालून दिला. इ.सन १९३४ मध्ये तारापूर येथे राहणाऱ्या बाबा गंगादास नावाच्या सत्पुरुषांची व स्वामींची भेट झाली. स्वामींची आध्यात्मिक उन्नती बाबांच्या सहवासात झाली. प्रभुचरणी लीन वृत्ती, रामनामनिष्ठा, प्रेमभक्ती आणि वैराग्य हे स्वभावविशेष स्वामींनी आत्मसात केले. रामचरितमानसाचा प्रचार करण्याची गुरुआज्ञा शिरसावंद्य मानून आयुष्य त्या एका ध्येयापाठी व्यतीत केले. इ. सन १९४३ मध्ये आळे येथील वासुदेवानंद सरस्वती - पोटे स्वामी यांच्याकडून प्रथम संन्यास घेऊन नंतर दण्डग्रहण केला. स्वामींच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होण्यात त्यांच्या दोन्हीही गुरुंचा वाटा फार महत्त्वाचा आहे. तीर्थाटनाची वृत्ती, शिवोपासना, रामनामभक्ती, प्रसिद्धी पराङ्मुखता या गुणांची आचारसंहिता त्यांनी बाबा गंगादासांकडून आत्मसात केली. तर भगवद्गीता, भागवत, उपनिषदे, वेद यांचा अभ्यास, परिश्रमशीलता, अध्ययनशील वृत्ती या गोष्टींचे योगदान त्यांना पोटेस्वामी यांचेकडून मिळाले. तत्त्वनिष्ठ असलेल्या या शिक्षकाने बहुविध व्यासंग केला. लेखन आणि प्रवचनांच्या मार्गाने समन्वयशील रामभक्ती परंपरेचा वारसा मराठी माणसाला दिला. त्यांचे प्रकाशित आणि अप्रकाशित वाङ्मय विपुल आहे. रामचरित मानसाचे अनुवाद, रामचरितमानसातील काव्यकला-अर्थच्छटा स्पष्ट करणारी गूढार्थचंद्रिका, संध्योपासना, वेदांतसार, अभंग रामायण, संगीत समश्लोकी, वेदस्तुती कीर्तन प्रभाकर अशी त्यांची अनेक पुस्तके आहेत. इतर लेखांमध्ये त्याची समग्र नोंद असल्याने येथे पुनरावृत्ती करीत नाही. इतके विपुल मराठी आणि हिंदी साहित्य उपलब्ध असलेले हे अलीकडच्या काळातील अपवादात्मक सत्पुरुष आहेत. समन्वयात्मक दृष्टी ठेवून तुलसीदासांच्या रामचरितमानसाला 'समग्र अभ्यासविषय' बनविणारे हे 'महाराष्ट्राचे तुलसीदास' काहीसे दुर्लक्षित राहिले आहेत. मराठीच्या वाङ्मयेतिहासात प्रज्ञानानंद सरस्वतींच्या साहित्य सेवेची फारशी दखलच घेतलेली नाही. त्यांच्या संशोधन विषयाने आपण जेव्हा मागे पाहतो तेव्हा डॉ. कमल बाळकृष्ण वैद्य लिखित ऐंशी पृष्ठांचे छोटेखानी चरित्र आणि काही स्फुट लेख यांचा अपवाद वगळता अभ्यासक, उपासकांनीही प्रज्ञानानंद सरस्वतींच्या वाङ्मयाचा विचार केलेला दिसत नाही. इ. सन १९७० पासून डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. अशोक कामत, डॉ. आनंदप्रकाश दीक्षित, डॉ. गो. रा. कुलकर्णी, डॉ. कल्याण काळे, डॉ. ग. वा. तगारे यांसारख्या साक्षेपी अभ्यासकांनी या विषयाचा समग्र अभ्यास होण्याची आवश्यकता आपल्या लेखन, भाषणातून प्रकट केली. परंतु अशा प्रकारचा अभ्यास 'स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती : व्यक्ती आणि वाङ्मय' या माझ्या प्रबंधातून सर्वप्रथम झाला. स्वामींच्या संशोधन संबंधाने इ. सन १९९६ मध्ये विद्यापीठाला सादर झालेला हा प्रबंध म्हणजे आजचे संशोधन म्हणता येईल.

सहा प्रकरणे, उपसंहार, सामग्रीखंड, परिशिष्टे असा ह्या प्रबंधाचा पसारा आहे. प्रज्ञानानंद सरस्वतींचा जीवनकाळ इ. सन १८९५ ते १९६८ असा आहे. स्वातंत्र्यापूर्वीचे अर्धशतक आणि स्वातंत्र्यानंतरची दोन दशके असा हा काळ आहे. पहिले महायुद्ध, टिळकयुग, ब्रिटिश वसाहतवादी राजवटीचा मध्यान्हकाळ, गांधी युग, दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्य प्राप्तीसाठी भारतीयांचा अभूतपूर्व लढा, ब्रिटिश राजवटीचे अंतिम पर्व आणि विसर्जन, स्वातंत्र्यासाठी मोजावी लागलेली फाळणीची किंमत, भारतपाक युद्धे अशा राजकीय घटनांनी प्रस्तुत काल व्याप्त आहे. या बरोबरच सामाजिक चळवळींना मिळालेली गतिमानता, समाजजागृती, शैक्षणिक संक्रमण, हिंदु धर्माचे पुनरुज्जीवन याही अंगाने या कालखंडाची बैठक विस्तृत व व्यापक आहे. स्वामींचा आणि प्रस्तुत कालखंडाचा अनुबंध जवळिकीचा आहे. त्यांच्या वाङ्मयातून वारंवार व्यक्त होणारी व्यथित अंतःकरणाची अभिव्यक्ती, आपल्या पद्धतीने त्यांनी केलेले जनजागरण प्रबंधामध्ये विचारात घेतले आहे. कुलवृत्तांत, जन्म, बालपण, शिक्षण, नोकरी, गृहस्थाश्रम, साधकावस्था, गुरुअनुग्रह, संन्यासग्रहण, योगाभ्यास, प्रायोपवेशन व देहत्याग असा हा जीवनक्रम आहे. सदर प्रबंधामध्ये स्वामींचा लोकसंग्रह, स्वामींच्या सहवासातील अनेक सत्पुरुष, या मांदियाळीतील स्वामींचे स्थान, अभ्यासले आहे. कर्माचरण, हरिभजन, सत्संग, सद्गुरुनिष्ठा या चतुःसूत्रीच्या सहाय्याने सहज स्पष्ट होणारी स्वामींची जीवनदृष्टी हे याचे वेगळेपण.

प्रज्ञानानंद सरस्वतींच्या प्रकाशित आणि अप्रकाशित वाङ्मयाचा समग्र अभ्यास हे या प्रबंधाचे वैशिष्ट्य आहे. स्वामींनी आपले संपूर्ण आयुष्य रामचरितमानसाची पारायणे, प्रवचने, चिंतन, मनन यामध्ये व्यतीत केले. तुलसीदास, श्रीराम, सद्गुरु यांच्यावरील पराकोटीची श्रद्धा, मानसाविषयीचे अपार प्रेम, अध्ययनशीलता आणि परिश्रमांची परिसीमा यांमुळे स्वामींनी मानसाच्या अंतरगात अधिकाधिक अवगाहन करून अनेक गूढार्थ जाणले. साडेसात हजार पृष्ठांची मराठी आणि हिंदी अशी महाकाय टीका लिहिली. ही सगळी हस्तलिखिते पाहून त्याचे स्वरूप, कर्त्याचे निवेदन, काण्डशः टीका, मंगलाचरणावरील टीका या सगळ्यामधून प्रकट होणारे कर्त्याचे व्यक्तिमत्त्व, गूढार्थचंद्रिकेची वैशिष्ट्ये असा हा अभ्यास आहे. गूढार्थ चंद्रिकेमध्ये आढळणारी कीर्तन-प्रवचनपर सामग्री या अंगानेही संशोधन प्रबंधामध्ये झाले आहे. या संपूर्ण लेखनामागे लोकरंजन, प्रशस्ती किंवा अर्थार्जन हे उद्देश नाहीत. त्यामुळे स्वामींच्या या लेखनाला वेगळे परिमाण प्राप्त होते. स्वामींनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे 'लेखकाच्या बुद्धीचे पांडित्य प्रकट करण्याचा हेतू या लेखनामागे नाही. तुलसीदासांचे भाव यथार्थ रीतीने समजावेत, ग्रंथवाचनात आनंद मिळावा, साधारण वक्त्यास येणाऱ्या शंकांचे निरसन व्हावे, चंद्र प्रकाशात गेल्यावर जसे तापनिवारण होऊन शीतलता प्राप्त होते तशीच गूढार्थ चंद्रिकेच्या वाचनाने प्राप्त व्हावी. वाचक संसारामधील दुःख, चिंता विसरतील आणि या वाचनाने मिळणाऱ्या प्रसन्नता व आनंद यांच्या जोरावर पुन्हा संसारदुःखाशी सामना देण्यास समर्थ होतील अशी आशा आहे.' या उद्दिष्टांशी ते सदैव प्रामाणिक आहेत. तुलसीदासांच्या उदात्तीकरणाकरिता स्वामींनी घेतलेला पुराण ग्रंथांचा धांडोळा, संदर्भसमृद्धी थक्क करणारी आहे. तुलसीदासांच्या प्रतिभेचे मर्म, रचनाकौशल्यातील गूढ, चरित्रचित्रणातील उदात्तता फक्त मानसाचे श्रवण-पठण करून समजणार नाही. यासाठी 'मानसाचा कोष' ठरू शकेल इतक्या मोठ्या योग्यतेच्या गूढार्थचंद्रिकेला मराठी भाषेत आज दुसरा पर्याय उपलब्ध नाही, हे या प्रबंधाद्वारे स्पष्ट होत जाते.

प्रज्ञानानंद सरस्वतींचे अप्रकाशित स्फुट वाङ्मयही बहुविध आहे. या प्रबंधामध्ये त्यांच्या अनेक अभंगांचे विषयवार वर्गीकरण, त्याची वैशिष्ट्ये, आरत्या-अष्टके-स्तोत्रे-भूपाळ्या, हिंदी-संस्कृत रचना, पुराणविषयक लेखन, आख्यान काव्ये आणि स्वामींच्या काही पत्रांचा अभ्यासही सदर प्रबंधात साकल्याने, साक्षेपाने मांडला आहे. कुठल्याही वाङ्मयाची थोरवी फक्त त्यामधील ललित गुणांवर अवलंबून नसते. लालित्य हा वाङ्मयीन कृतीच्या बाह्य सौंदर्याचा भाग असतो. माणसासारखे साहित्याच्या अंतरंग सौंदर्यालाही वेगळे परिमाण असते. अलंकार, रस अथवा शब्दकलेच्या मापदंडांनी ते मोजता येत नाही. हा स्वतंत्र विचार स्वामींच्या वाङ्मयाची वैशिष्ट्ये पाहताना प्रबंधामध्ये आढळतो. त्यांची लेखनामागील असलेली लोकशिक्षकाची आणि परमार्थ मार्गावरील पथप्रदर्शकाची भूमिका प्रत्ययास येते. प्रज्ञानानंद सरस्वतींना समग्र अभ्यासविषय बनविण्याचा प्रयत्न या प्रबंधाद्वारा प्रथमच झाला आहे. प्रस्तुत प्रबंधाच्या सहाय्याने 'प्रज्ञानानंद सरस्वती आणि रामचरितमानस' असे एक दृढ समीकरण मराठी माणसाच्या, भक्तभाविकांच्या आणि अभ्यासक उपासकांच्या मनामध्ये तयार होईल हे निश्चित !

सदर प्रबंध इ. स. २००१ मध्ये 'महाराष्ट्राचे तुलसीदास स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती' या नावाने प्रकाशित झाला आहे. (संक्षिप्त स्वरूपात) त्या योगे प्रज्ञानानंद सरस्वतींचे तुलसीस्वरूप होणे

'प्रीतीची रीत हो ऐशी । काहीही नच मागणे ।
चिंतिता चिंतिता त्यासी । तद्रूपी ऐक्य पावणे ।'

काही अंशाने तरी मराठी माणसाच्या ध्यानी आले आहे.

स्वामीजींच्या वाङ्मयाच्या संशोधन अभ्यासाची ही सद्यःस्थिती आहे. खरे पाहता संशोधन, अभ्यास, निष्कर्ष ही अखंड चालणारी साखळी आहे. या परंपरेला आरंभ असतो, अंत असतच नाही. आपले संशोधन ग्रंथरूपाने लोकांसमोर ठेवण्याकरिता त्या काळापुरते तरी संशोधकाला थांबावे लागते. निश्चित काहीतरी स्वीकारून फलनिष्पत्ती ग्रंथ रूपाने लोकांसमोर ठेवणे अभ्यासकाला भाग पडते. या संशोधनपरंपरेचा हा भाग त्या अभ्यासकापुरता, त्या संशोधकापुरता गरजेचा असतो. म्हणून अभ्यास-विषयाचा अभ्यासच थांबला असं कधीही होत नाही. प्रज्ञानानंद सरस्वतींनी त्यांच्या काळामध्ये चालू ठेवलेल्या सत्त्वशील आध्यात्मिक आंदोलनास आणि चळवळीस नवे अभ्यासक प्रवक्ते मिळणे गरजेचे असते. या अनुषंगाने पाहिले की प्रज्ञानानंद सरस्वती अजूनही अनेक अंगांनी अभ्यासिता येतील.

मराठीमध्ये तुलसीदासांच्या रामचरितमानसाच्या गद्यपद्यानुवादाची एक सुदीर्घ परंपरा आहे. याचा प्रारंभ इ. सन १९१३ मध्ये झाला. यादव शंकर जामदार, श्री. ना. भा. जोशी, ग. दि. माडगुळकर यांचे गद्यानुवाद सर्वश्रुत आहेत. मूळ ग्रंथकाराशी असलेली तादात्म्यता विशिष्ट भाषेचे भावसंस्कार, मूळार्थाशी जवळीक, मूळ काव्यातील सौंदर्याची अभिव्यक्ती या पद्यानुवादांच्या बाबींना कमी-अधिक प्रमाणात न्याय देत मराठीमध्ये रामचरितमानसाचे एकूण आठ पद्यानुवाद उपलब्ध आहेत, ते असे : श्री. ग. सि. भोपटकर - 'मराठी चौपाई वृत्तरामायण', प्रज्ञानानंद सरस्वती - 'श्रीरामचरितमानस', डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे - 'श्री सुश्लोक मानस', श्री. देवीदास लक्ष्मण महाजन - 'मानसविहार', श्रीमती सुलोचना खांडेकर - मराठी तुलसीरामायण, श्री. महादेव गोविंद नरवणे - 'श्रीरामचरित्र सागर'. प्रज्ञानानंद सरस्वतींनी हा पद्यानुवाद दोनदा केला आहे. अनेक संस्करणे करून केलेला त्यांचा दुसरा पद्यानुवाद स्वतंत्र ग्रंथ वाटावा असा आहे, रामायणातील परशुराम-लक्ष्मण संवाद, श्रीराम-जानकी विवाह, श्रीराम-कैकयी संवाद, शिवपार्वती संवाद अशा काही ठळक प्रसंगाच्या आधारे इतर अनुवाद व स्वामींचा अनुवाद असा तुलनात्मक अभ्यास प्रबंधामध्ये आहे. परंतु तौलनिक साहित्याभ्यास ही विसाव्या शतकातील 'साहित्य समीक्षा व्यवहारात' प्रकर्षाने आवश्यक वाटू लागलेली अभ्यास पद्धती आहे. अशा अभ्यास क्षेत्रात अनुवादांचे मोल अधिक आहे. दोन वेगवेगळ्या भाषांतील साहित्यकृतींचा अभ्यास करताना अनुवादांचा आधार मोलाचा ठरतो. किंबहुना भिन्न भिन्न भाषांतील अनुवादित साहित्यावर तौलनिक अभ्यास क्षेत्राची व्यापकता अवलंबून असते. या दृष्टीने 'अनुवादांचे मध्यस्थपण' लक्षात घेणे आवश्यक ठरते. रामचरितमानसाच्या या अनेक पद्यानुवादांचा सखोलपणे तुलनात्मक अभ्यास होणे उचित ठरेल. त्यामुळे या अनुवादांमधून मूळ तुलसीदासांच्या रामचरितमानसाचे होणारे 'छाया दर्शन' अधिक ठळकपणे लोकांसमोर येईल.

प्रज्ञानानंद सरस्वतींचे 'श्रीमद्भगवद्गीता' (संगीत समश्लोकी हेही एक पुस्तक आहे.) संस्कृत भाषा अवगत नसल्याने अनेक सामान्य जनांना मूळ गीतेचा आस्वाद घेणे शक्य होत नाही. या पार्श्वभूमीवर स्वामींचे हे संगीतातील तालबद्ध मराठीकरण महत्त्वाचे आहे. अलीकडेच समजलेल्या

माहितीप्रमाणे पुणे येथील श्री. वि. रा. साठे यांचेकडे भगवद्‌गीतेचे प्रकाशित / अप्रकाशित असे एकशे तीन पद्यानुवाद उपलब्ध आहेत. यापैकी अठ्ठ्याहत्तर मराठी आहेत. यामध्ये अभंग, आर्यापासून 'सवाई' पर्यंतचे अनेक काव्य प्रकार आहेत. (माधुरी कोटक, हरिकिसन मेहता (संपादक) चित्रलेखा, पुणे, जुलै १९९६, पृ. १९) या अंगानेही स्वामींची समश्लोकी अभ्यासिता येईल.

स्वामींच्या 'गूढार्थ चंद्रिका' या मराठी हिन्दी टीकेचा आजवर झालेला अभ्यास शंभराच्या जवळपास पृष्ठसंख्येत मर्यादित आहे. हिंदी टीकेचा अभ्यास आजवर कुठेही झालेला नाही. हिंदीमध्ये रामचरितमानसाच्या भाष्यकारांची अभ्यासकाची फार मोठी परंपरा आहे. एका मराठी माणसाचे हे एकटाकी लेखन आणि हिंदीमधील इतर टीकाकारांचे लेखन यांचाही अभ्यास व्हावयास हवा. टीकालेखनाची बौद्धिक आणि शास्त्रीय सामग्री आपल्याकडे फार प्राचीन काळापासून असली तरी टीकावाङ्‌मयाला समृद्ध आणि पृथक्‌पणे आस्वाद्य अशा वाङ्‌मयविभागाचे स्वरूप अलीकडे प्राप्त झाले आहे. टीकाकार ग्रंथामधील विविध ठिकाणच्या सौंदर्याचे विषदीकरण करतो. ग्रंथाचे स्वरूप मार्मिकपणे कथन करतो. ग्रंथास्वादाला योग्य दिशा देऊन सहाय्यही करतो. स्वतःच्या मनावर ग्रंथाभ्यासाने खोलवर झालेले परिणाम तितक्याच परिणामकारकपणे टीकाकार कथन करीत असतो. ग्रंथकाराच्या रचनाकौशल्यातील बारकावे, शैलीसौंदर्याचे विशदीकरण, ग्रंथाचे सामाजिक महत्त्व, निर्मळ आणि प्रामाणिक प्रतिक्रिया याही गोष्टी 'टीका लेखनाच्या' दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. 'गूढार्थ चंद्रिका' ही गद्य टीका या सर्व निकषांना पुरून उरते. खरे तर कवी आणि टीकाकार दोघेही आत्माविष्कारच करीत असतात. कवीचा विषय 'ईश्वरसृष्टी' हा असतो. तर टीकाकाराचा विषय 'शब्दसृष्टीच्या ईश्वराची सृष्टी' हा असतो. तुलसीदासांच्या प्रतिभेचे मर्म, रचना कौशल्यातील गूढ, चरित्रचित्रणातील उदात्तता, फक्त रामचरितमानसानुवादाचे श्रवण पठण करून समजणार नाही. ग्रंथानुवादाने ग्रंथाचा स्थूल आविष्कार समजला तरी ग्रंथकार ज्या संप्रदायाशी संबंधित होते ते ज्या परिसरात वाढले, ज्या संस्कारांच्या घडणीतून त्यांनी ग्रंथरचना केली त्याची उकल ध्यानात येण्यासाठी टीकाग्रंथाची मदत आवश्यक ठरते. श्रीरामचरितमानस आणि सर्वश्रेष्ठ भारतीय श्रीराम कवी गोस्वामी तुलसीदास यांच्या सखोल अध्ययनासाठी मराठी भाषेत आज तरी 'गूढार्थ चंद्रिकेला' दुसरा पर्याय उपलब्ध नाही. म्हणूनच याचे सखोल अध्ययन अधिकाधिक व्हावयास हवे. आजच्या बदलत्या काळात सुशिक्षित, सुसंस्कृत माणसे आपल्या परंपरा, प्राचीन इतिहास यांचा शोध घेण्यात सतत प्रयत्नशील असतात. त्यांच्या या जिज्ञासापूर्तीसाठी 'कोश वाङ्‌मयाचे सहाय्य' आवश्यक ठरते. 'मानसाचा कोश' ठरू शकेल एवढ्या योग्यतेच्या या गूढार्थ चंद्रिकेचा हिन्दी/मराठी अभ्यासकांनी विचार करावयास हवा.

'मानवतापूर्ति साधन व संध्योपासना' हे प्रज्ञानानंद सरस्वतींचे सुयोग्य मार्गदर्शन करणारे एक पुस्तक आहे. संध्या ही कुठल्याही वर्गाची मक्तेदारी नसून 'मानवधर्माची' पूर्ती करण्याची शास्त्रशुद्ध उपासना आहे हे त्यांनी ठासून सांगितले. संध्येमधील चोवीस नावांचे अर्थासह स्पष्टीकरण करताना स्वामींनी स्पष्ट केलेला परस्परसंबंध इतरत्र कुठेही आढळत नाही. ते त्रिकाल संध्या करीत. गायत्री मंत्राची अनेक पुरश्चरणे त्यांनी केली होती. त्यामुळे त्यांच्या या लेखनाला अनुभवांचे अधिष्ठान प्राप्त झाले आहे. अलीकडच्या काळात 'उपनयन' या संस्काराला केवळ 'हौस' आणि प्रतिष्ठेचे परिमाण प्राप्त झाले आहे. 'उपनीत' बटू बरोबर गायत्री मंत्राची साधना केवळ हौसेखातर पुत्राला देणाऱ्या पित्यालाही 'स्वामींची संध्योपासना' मार्गदर्शक आहे. या पुस्तकामध्ये स्वामींनी या ग्रंथपठणाने अनेकजण ही उपासना करू लागतील, असा विश्वास प्रकट केला आहे. भौतिक समृद्धीची परमावधी गाठलेल्या आजच्या पिढीत हा विश्वास संपूर्णतया सार्थ ठरणारही नाही परंतु 'संध्योपासना' सारख्या विषयावर अनभिज्ञ असूनही टिंगलखोर वृत्तीने या उपासनेची चेष्टा करणाऱ्यांना या ग्रंथपठणाने योग्य ती 'जाणीव' होईल, हे निश्चित ! त्यासाठी स्वामींच्या या पुस्तकाचा प्रचार-प्रसार व्हावयास हवा.

वेदस्तुती आणि श्रीमद्‌भगवदगीतेमधील पंधराव्या अध्यायावर 'कीर्तना' सारख्या लोकप्रिय माध्यमाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून स्वामींनी 'वेदस्तुती कीर्तन भास्कर', 'वेदस्तुती कीर्तन प्रभाकर' आणि 'श्री गीता कीर्तन तरंगिणी' ही पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या या लेखनात विनयशील आणि साक्षेपी अभ्यासकांच्या भूमिकेशी स्वामी सदैव प्रामाणिक राहिले आहेत. यामधील प्रांजळ सच्चे सूर अभ्यासकांना निश्चितपणे अंतर्मुख करतील.

स्वामींचे बरेच अभंग आहेत. अखंड नामस्मरण, गुरुभक्ती, गुरुकृपा, रामभक्ती या मार्गाने प्रज्ञानानंद सरस्वतींच्या व्यक्तिमत्त्वामधील साधक टप्प्याटप्प्याने सिद्धत्वाला पोहोचला. त्यांची अभंगवाणीही अशीच क्रमाक्रमाने संपन्न होत गेली आहे. साक्षात्कारी सद्‌गुरुंची कृपा, त्यांचे स्मरणचिंतन म्हणजेच आत्म्याचे चिंतन, सद्‌गुरुंकडून मिळालेली नामसाधना म्हणजेच ईश्वरसाधना हे विचार वारंवार त्यांच्या अभंगातून प्रकट होतात. आपल्याकडे ज्ञानदेव, नामदेव, तुकारामादी संतांच्या अभंगांच्या अनेक ध्वनिफिती सहजगत्या उपलब्ध आहेत. त्यांच्या लोकप्रियतेपाठीमागे अभंगांची गुणवत्ता सर्वप्रथम असली तरी संगीत, चाली हेही एक कारण आहेच. स्वामींचे अभंग लोकांसमोर आणायचे असतील तर अशा जास्तीत जास्त ध्वनिफिती तयार करायला हव्यात. या सर्वच दृष्टीने रामचरित मानस प्रेमी मंडळ सदैव प्रयत्नशील आहे. प्रज्ञानानंद सरस्वतींचे अप्रकाशित स्फुट वाङ्‌मय बरेच आहे. त्यामध्ये आरत्या, अष्टके, स्तोत्रे, भूपाळ्या, आख्यान काव्य, हिंदी-मराठी रचना, परमामृत प्रकाश, एकादशोत्तर रुद्रशतनाम स्तोत्र, शंकराचार्यांच्या स्तोत्रांचे अनुवाद, पुराणविषयक लेखन, साकेत प्रताप नावाचे काव्य, काही संस्कृत रचना अशा अनेक रचना आहेत. संतसाहित्याचा अभ्यास करताना अभ्यासक व उपासक हे दोन स्वतंत्र वर्ग असल्याचे दिसते. एक वर्ग केवळ अध्ययन करतो तर दुसरा वर्ग केवळ भक्तीच्या वाटेने जातो. स्वामींच्या साहित्यात या दोन वाटा एकमेकांत बेमालूमपणे मिसळलेल्या दिसतात. हस्तलिखित बाडांमधील लेखन साक्षेप, संदर्भ ग्रंथांच्या सूची, प्रस्तावना लेखन, शुद्धिपत्रके, विषयानुक्रमणिका, संदर्भ नोंदी, तळटीपा, स्वहस्ताक्षरातील मुद्रणप्रती त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधील द्रष्ट्या अभ्यासकाचे प्रभावी दर्शन घडवितात.

सत्पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण, अंतरंगप्रवास, त्यांच्या कार्यप्रेरणा, साहित्यदृष्टी या सगळ्यांमध्ये त्यांनी लिहिलेली पत्रे हे महत्त्वाचे साधन ठरते. बऱ्याच वेळा सत्पुरुषांच्या माघारी फक्त आठवणी, आख्यायिकाच उपलब्ध होतात. फार थोडा भाग विश्वासार्ह स्वरूपात पुढील पिढ्यांकडे संक्रमित होत असतो. या अनुषंगाने सत्पुरुषांच्या

अभ्यासात 'पत्रे' हा घटक प्रभावी ठरतो. त्यांचा संदेश आणि व्यक्तिमत्त्व चांगल्या तऱ्हेने जाणून घेता येते. 'लेखन' हा व्यासंगच असल्याने स्वामींनी अनेक शिष्यांना, संबंधितांना, सत्पुरुषांना जवळिकीच्या नात्याने पत्रे लिहिली. त्यामध्ये काही गद्य तर अनेक काव्यबद्ध पत्रे आहेत. बव्हंशी पत्रांमधून दैनंदिन आचारधर्म, उपासना पद्धती, कुंडलिनी शक्तीचे संस्कार, परमार्थ मार्गावरील मार्गदर्शन, काही वेळा कौटुंबिक अडीअडचणींना मार्गदर्शन असे विषय आढळतात. त्यांचा या पत्रलेखनाचा आवाका फार मोठा आहे. दासगणु महाराज, गुळवणी महाराज, श्रीधरस्वामी, श्री. दा. सातवळेकर, य. गो. जोशी, अनंतदास रामदासी यांच्याशीही त्यांचा सदैव पत्रव्यवहार असे. त्यांच्या पत्रांमध्ये जवळीक, ओलावा आणि उत्कटता प्रकर्षाने जाणवते. भाषिक उंचीपेक्षा वैचारिक उंची अधिक आढळल्याने स्वामींचे पत्रसाहित्य अधिक बोलके आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व धवल करणारे आहे. स्वामींच्या सहवासात अनेक वर्षे राहिलेले साधक आजही आहेत. त्या साऱ्यांकडून अशी अनेक पत्रे नव्याने एकत्रित झाली आहेत. परांडा येथील 'रामविश्रामधाम' या वास्तूमध्ये ती संग्रहीत करण्यात आली आहेत. स्वामींच्या व्यक्तिमत्त्वामधील साक्षेपी मार्गदर्शक अभ्यासायचा झाल्यास हे एक मोलाचे साधन ठरेल.

स्वामींनी स्वतः कोणताही संप्रदाय उभारला नाही. उत्तराधिकारी म्हणून कोणालाही नियुक्त केले नाही. मठपरंपरेत लक्ष घातले नाही. आंतरिक तळमळीने त्यांनी लोकांना 'जीवनदृष्टी' दिली. मराठवाड्यासारख्या (पूर्वीच्या मोंगलाईतील) क्षेत्री निवास असूनही अनेक जातीजमातींच्या बांधवांना एकत्र आणले. वेगवेगळ्या देवतांची उपासना सांगत 'मानसप्रेमाची' शिकवण दिली. 'रामभक्ती'च्या एका सूत्रामध्ये संघटित केले. या बरोबरच या अनुयायी बांधवांना योग, सत्संग, नामसाधना आणि सद्गुरुभक्तीचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. सांप्रदायिक वा स्वकर्तृत्वाचा अभिनिवेश बाळगला नाही. लोकोत्तर प्रसिद्धीच्या आकांक्षेचा मागमूसही त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये नाही. इतर सांप्रदायिकांबद्दल द्वेषभाव वा अधिक्षेपाच्या उद्‌गारांचा मागमूसही या लेखनामध्ये नाही. या साऱ्यामुळे त्यांच्या लेखनाचा बाज सहजच वाढतो आणि संशोधन सूत्र न थांबवता त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा पुनः पुन्हा धांडोळा घेणे गरजेचे वाटते. त्यांचे सारे शिष्य एकत्रित येऊन त्यांच्या जीवनविषयक, परमार्थविषयक अनुभूतींचा, शिकवणीचा प्रचार-प्रसार करीत आहेत. आज मरणोत्तर सन्मान करण्याच्या अनेक प्रवृत्ती वाढत आहेत. यामध्ये जयंती, पुण्यतिथी, उत्सव, पुतळे उभारणे यांसारखे प्रकार अधिक आहेत. खरे तर समर्थ सज्जनांचा आणि सज्जन समर्थांचा आदर्श समाजासमोर ठेवायचा असेल तर स्वामींसारख्या व्यक्ती-शक्तींचा शोध घ्यावयास हवा. त्यांच्या विषयीचे सातत्याने संशोधन करून त्यांना मरणोत्तर सन्मान प्राप्त करून देण्यासाठी रामचरितमानसप्रेमी मंडळाबरोबरच विद्वान, व्यासंगी आणि लोकाभिमुख कार्यकर्त्यांबरोबरच अभ्यासकांनीही पुढे येऊन हे आव्हान पेलावयास हवे !

डॉ. सौ. अनिता प्र. केळकर
२/१, सकाळ नगर, बाणेर रोड, पुणे ४११००७.

संजीवन चिकित्सा आणि श्री प. पू. स्वामी

डॉ. वि. ना. जोशी

बी.ए.एम.एस., श्रींचे अनुग्रहीत शिराळा येथे वैद्यकीय व्यवसाय. [illegible]

संजीवन चिकित्सा पद्धती ही एक संपूर्णपणे स्वतंत्र असलेली अशी एक चिकित्सा पद्धती आहे. तिची माहिती विस्तारपूर्वक लिहिलेला असा एक ग्रंथ 'जीवशास्त्र आणि संजीवन चिकित्सा' या नावाने १९५३ साली श्री. का. य. परांजपे यांनी प्रसिद्ध केला आहे. त्यात श्री. सातवळेकर, स्वाध्याय मंडळ, आनंदाश्रम पारडी जि. सुरत आणि श्री स्वामीजी या दोघांचे अभिप्राय आले आहेत. श्रींचा अभिप्राय वाचला की त्यांनी या चिकित्सेचा किती खोलात जाऊन अभ्यास केला व रुग्णावर उपचार करून कशी खात्री करून घेतली आहे, ते लक्षात येते. तो अभिप्राय त्यांच्याच शब्दात –

जीवन शास्त्र व संजीवन चिकित्सा हा चारशे पृष्ठांचा ग्रंथ साद्यंत लक्षपूर्वक वाचून पाहिला. यांत वेदांत, सांख्य, वैशेषिकादि शास्त्रांच्या आधारे, मानवी जीवनाचा आधार, शक्ति व क्रिया यांचे विवेचन संशोधक व चिकित्सक बुद्धीने करून अंतःकरण, पंचकाचा सूक्ष्म व स्थूल देहाशी संबंध का व कसा येतो, तसेच सूक्ष्म व स्थूल देह ज्या अपंचीकृत व पंचीकृत महाभूतापासून झाले त्यांचा व अंतःकरण पंचकाचा देहाचे पालन, पोषण, रक्षण, आरोग्य रक्षण व रोग निवारणादि दृष्टीने काय व कसा संबंध येतो याचे आवश्यक तेवढे सुटसुटीत व मुद्देसुद विवेचन केलेले पाहिले म्हणजे ही नूतन चिकित्सापद्धती निर्माण करण्यासाठी श्रीहरिकृपेनेच या पद्धतीच्या संशोधकास व आद्यजनकांस निमित्त मात्र केले आहे असे म्हटल्याशिवाय रहावत नाही !

जीवनानुकूल घटना व जीवन प्रतिकूल पदार्थांचे शरीरातून उत्सारण, पंचभूते व पंचप्राण यांच्याकडून जीवनशक्ति स्वतःच कसे करून घेते व देशकाल, परिस्थिति, ऋतुमान, हवा, पाणी, आहार-विहार, विचार व प्रकृतिमान यांचे जीवनास अनुकूल वा प्रतिकूल परिणाम, पृथिव्यादि चार महाभूते व अपानादि पंचप्राण यांच्याकडून शरीरातील विभिन्न घटकसंस्था, अवयव, ग्रंथी इत्यादिकांवर कसे होतात हे फारच मार्मिक पद्धतीने विशद करून सांगितले आहे.

शरीराचे पोषण, पालन व रोग निवारणादि कार्य मुख्यतः जीवनशक्तीच करीत असल्याने जीवनशक्तीला मदत करण्याचे कार्यच रोगनिवारणात मुख्य साध्य आहे हे प्रथम सिद्ध केले आहे.

ही चिकित्सा पद्धति पूर्ण निसर्गानुसारिणी असून एकाच औषधाने दोन विरुद्ध प्रकारचे परिणाम कसे होतात हे सोदाहरण स्पष्ट करून दाखविले आहे, हे वैशिष्ट्य तर इतर कोणत्याही पद्धतीत नाही.

विचार व आहाराचा परिणाम आरोग्यावर कसा होतो, याचे विवेचन करणारी प्रकरणे सर्वांनाच उत्तम मार्गदर्शन करणारी आहेत. रोग झाल्यावर औषधे घेऊन निवारण करण्यापेक्षा आहार व विचारांच्या योग्य उपयोगाने रोग उत्पन्नच होऊ न देणे हे कसे साध्य करता येईल याचे विवेचन अगदी सोप्या भाषेत केले आहे. त्यात प्रकृती भेदाप्रमाणे आहारात भेद कसा करावा हे विस्तारपूर्वक शास्त्रीय आधारांसह दाखविले आहे.

या चिकित्सा पद्धतीचा उपयोग स्वतःसाठी व इतरांसाठी गेल्या वर्षभर करून पाहिल्यावर, तसेच अनेक असाध्य रोग्यांचे अनुभव स्वतः ऐकल्यावर निःपक्षपात बुद्धीने व खात्रीपूर्वक असे म्हणणे भाग पडते की, ही पद्धति अल्पमोली, बहुगुणी, शीघ्रतम फलदायी आहे. कित्येक वेळी तर स्वतःसच आश्चर्य वाटण्याइतके तात्कालिक सुपरिणाम दिसून आले. आयुर्वेद, ॲलोपॅथी, बायोकेमिक, होमियोपॅथी, युनानी वगैरे कोणत्याही पद्धतीपेक्षा ही पद्धति शीघ्रतम गुणकारी, निरुपद्रवी अल्पखर्चात पूर्ण रोग निवारण करणारी आहे. ऑपरेशननेसुद्धा बरे न होणारे असाध्य व कष्ट साध्य रोग संजीवन चिकित्सेच्या अंतर्बाह्य उपचारांनी सहज व अगदी थोड्या खर्चात बरे होऊ शकतात हे स्वानुभव सिद्ध आहे.

ही पद्धति निर्माण करवून ईश्वराने सर्वच जगावर त्यातही भारत वर्षावर व विशेषतः महाराष्ट्रावर अपार दयावृष्टीच केली आहे असे म्हटल्याशिवाय राहवत नाही.

या पद्धतीचा प्रसार दिवसेंदिवस शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे तिच्या अंगच्या सहज गुणांनी झपाट्याने होत असलेला अनुभवास येत आहे. प्रचारक, भडक, प्रलोभक जाहिराती, कमिशन एजंट इत्यादि आधुनिक प्रचार साधनांच्या अभावीही प्रसार वाढत आहे हेच या पद्धतीच्या उपयुक्ततेचे श्रेष्ठतेचे द्योतक आहे.

वरील अभिप्राय वाचल्यावर सहज लक्षात येते की, श्रीस्वामींनी स्वतः अनुभव घेऊन, इतरांवर उपचार करून पूर्णपणे खात्री झाल्यावरच सर्व काही एवढ्या विस्ताराने लिहिले आहे.

डॉ. वि. ना. जोशी
बत्तीस शिराळा, जि. सांगली ४१५४०८

प्रज्ञानानन्द नमामि

रामचरितकथा येन गीता प्राकृतभाषया
प्रतितुलसीदास तं प्रज्ञानानन्द नमामि ।।१।।
लब्ध्वा दीक्षा मानसस्य गंगादासमहोदयात् ।
गंगादासस्य शिष्यं तं प्रज्ञानानन्दं नमामि ।।२।।
वासुदेवानन्दस्वामी अस्मै दण्डं च दत्तवान् ।
वासुदेवानन्दशिष्य प्रज्ञानानन्दं नमामि ।।३।।
देवानां दर्शनं पुण्यं लब्ध येन स्वजीवने ।
अवतारवरिष्ठं तं प्रज्ञानानन्द नमामि ।।

सौ. मनीषा अभ्यंकर, मिरज.

श्री प्रज्ञानानंद स्वामींची संस्कृत स्तोत्ररचना

प्रा. डॉ. अंजली माधव पर्वते

एम.ए., पीएच.डी. (संस्कृत) विषय अध्यापन रामायण एक चिकित्सक अभ्यास, गीताव्रती गीतार्थ मंडळ [illegible] कॉलेज [illegible] संस्कृत [illegible] विवेकचूडामणी, [illegible] महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार [illegible]

'न खलु धीमतां कश्चिदविषयो नाम' - असे विद्वानांचे वैशिष्ट्य शाकुंतलात सांगितले गेले आहे. विद्वानांना कोणताच विषय अस्पर्श नसतो. कोणत्याही विषयात त्यांना गती नाही असे घडत नाही. सारेच विषय त्यांना 'करतलामलकवत्' असतात. प. पू. स्वामींबाबतीतही हेच खरे आहे. त्यांनी केलेला श्रीरामचरितमानसाचा मराठी अनुवाद, संस्कृत भागवतातील 'ब्रह्मस्तुती'चा मराठी अनुवाद, 'गूढार्थचंद्रिका' ही 'मानसा'वरच केलेली विद्वत्तापूर्ण टीका, 'संध्योपासना' या विषयावरील मनोज्ञ चिंतन, वेदांतसार अभंग रामायण, अभिनव रामायण ('नर्कुटक' वृत्तांत याची रचना आहे.) अशा रामकथाविषयक मराठी रचना, स्फुट रचनेत असंख्य ओव्या, अभंग, पदे, गायत्री, भवानी, वत्त इ. च्या प्रासादिक आरत्या, मल्लारी स्तोत्र, ब्रह्मानंद अष्टक अशी मराठी स्तोत्रे आणि संस्कृत भाषेतील स्तोत्ररचना अशी बहुविध साहित्य निर्मिती पाहिली की प्रकर्षाने जाणवते ही त्यांची बहुमुखी प्रतिभा !

मात्र या बहुविध निर्मितीमागचे सूत्र एकच आहे आणि ते म्हणजे 'परमेश्वराचे गुणसंकीर्तन' 'सगुण चरित्रे । परम पवित्रे । सादर वर्णावी' - याच भावनेने स्वामींनी सारी रचना केलेली आहे. संस्कृत स्तोत्र रचनेच्या बाबतीतील हिंदी मनोगतात त्यांनी आपली ही भावना प्रांजलपणे मांडली आहे.

स्वामींची संस्कृत स्तोत्र रचना दोन प्रकारची आहे. पहिला प्रकार आहे स्वतंत्रपणे रचलेल्या छोटेखानी स्तोत्रांचा । श्रीगजानन, भीमाशंकर, वायुनंदन मारुती, जगदाधार भास्कर (सूर्य) या देवतांची त्यांनी अष्टक स्वरूपात स्तुती केली आहे. 'प्रमाणिका' या नावाने फारशा परिचित नसलेल्या पण 'भजे विशेष सुन्दरं समस्तपापखण्डनं...' या चालीने सुपरिचित वाटणाऱ्या वृत्तात ही रचना आहे. प्रथम स्वरूप वर्णन आणि मग गुणवर्णन व शेवटी काहीतरी मागणे अशी जी स्तोत्राची वैशिष्ट्ये असतात ती येथेही आहेत. 'सुमूषक ध्वजं कवि' असे गणपतीचे विशेष, 'दरेन्दुकुन्दसुन्दर' पंचमूर्धक ही शिवशंकराची विशेषणे, 'गुरोः गुरु' असे सूर्यासाठी वापरलेले विशेषण, वायुनंदन अष्टकातील 'अहीशजीवदायक' हे विशेषण. ही विशेषणे वेगळी वाटतात. नृत्य करणारा गणपती आपल्याला परिचित असतो. पण त्याचे कविरूप आपण फक्त मंत्रपुष्पांजलीत 'कविं कवीनां' असे ऐकलेले असते. स्वामींनी ते स्वरूप येथे पुढे आणले आहे. ओंकार रूपाने तोच शब्दसृष्टीचा निर्माता असल्यामुळेही स्वामींनी त्याचा विशेषत्वाने उल्लेख केला असेल. 'दरेन्दुकुन्दसुंदर' या शब्दाचा अर्थ शंख, चंद्र व कुंदपुष्प यांच्यासारखी शुभ्र सुंदर - शंकराचे असे वर्णन फारसे आढळत नाही. 'पंचमुखी' मारुती आपल्या परिचयाचा आहे. 'चतुर्मुखी ब्रह्मदेव' आपण ऐकलेला असतो. मात्र 'पंचमूर्धक' शिव क्वचितच ऐकिवात आहे. (पंचतुंड नरकुंड माळधर' या नांदीतच हा उल्लेख वाचनात येतो.) बहुधा शिवाचे हे पौराणिक रूप असेल. 'अहीशजीवदायक' मधील 'अहीश' म्हणजे शेषनाग. 'शेषावतार लक्ष्मणाला जीवदान देणारा' हे मारुतीचे विशेषण आहे. द्रोणागिरीवरील औषधी आणण्याचा संदर्भ येथे आहे. 'अहैतुकी कृपाकर' असेही विशेषण स्वामींनी मारुतीसाठी वापरले आहे. ते वाचताना 'अहेतुक दयासिंधु' असे श्रीमद् आद्य शंकराचार्यांनी गुरुसाठी वापरलेले विशेषण विशेषत्वाने स्मरते. नेहमीपेक्षा थोडी वेगळी मार्मिक विशेषणे स्वामींनी या स्तोत्रांत वापरली आहेत.

स्तोत्राचे वृत्त मुळातच लयबद्ध आणि स्वामींची शब्दरचना प्रासादिक आहे. तिन्ही, चारी स्तोत्रांमध्ये प्रार्थना किंवा मागणे एकच की या सर्वांच्या कृपेने 'रामभक्ति माझ्या हातून नित्य घडो, रामचरणांवर माझे प्रेम नित्य जडो.' विशेषतः सूर्याष्टकाच्या शेवटी या सर्व प्रकाशक भास्कराच्या कृपेने 'ममापि चित्तवर्त्मगे रघूत्तमः सुबिम्बितः भवेत्' ही जी खात्री व्यक्त झाली आहे ती लक्षणीय आहे. भीमाशंकराला तर ते 'विशुद्ध रामभक्ति'च म्हणतात.

या चार स्तोत्रांशिवाय आणखी एक जरासे मोठे स्तोत्र आहे ते 'श्रीरामजयकार स्तोत्र' होय. हे स्तोत्र 'रघुपतिराघव राजाराम' या भजनाच्या चालीत म्हणता येते. स्वामींचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व या स्तोत्रात प्रकर्षाने जाणवते. काही ठिकाणी 'कुलावतंस' ऐवजी 'कुलावतंसा' 'नामन्' ऐवजी 'नामा' 'राम' ऐवजी 'रामा' असे केले गेल्यामुळे ही संस्कृतातील रचना मानावी की नाही अशी शंका येते पण बहुतांश रचना पाहिली की जाणवते २-३ ओळींबाबतचा हा संभ्रम असला तरी बाकीचे स्तोत्र निःसंशयपणे संस्कृतातच आहे. समासप्रचुर शब्दयोजना आणि प्रास व यमकांचा सहज वापर या स्तोत्रात स्वामींनी केला आहे. येथेही 'कामुकजनअनुकारिन्' हे रामासाठी वापरलेले विशेषण वेगळे जाणवते. अन्य सामान्य प्रेमीजनांप्रमाणे सीताअपहरणानंतर रामही विलाप करत रानोमाळ भटकला या घटनेचा संदर्भ या विशेषणामागे असणार हे स्पष्ट आहे. या स्तोत्राअंती स्वामींनी स्वतःची अवस्था 'गततनुभान' झाली होती - देहभान हरपलेली झाली होती असा उल्लेख केला आहे. उत्कट भावनेने जो हे स्तोत्र म्हणेल त्यालाही असाच अनुभव येईल असेच स्वामींनी यातून सुचवले आहे.

स्वामींच्या स्तोत्ररचनेचा पहिला प्रकार सर्वांनाच उपलब्ध आहे. 'अभिनव रामायण' या पुस्तकाच्या प्रारंभी किंवा 'हनुमानचालीसा'चा मराठी अनुवाद आणि इतर स्तोत्रे अशा स्वरूपात जी छोटी पुस्तिका काढली आहे त्यातही ही स्तोत्रे वाचायला मिळतात. मात्र स्वामींची दुसऱ्या प्रकारची स्तोत्ररचना सहज उपलब्ध नाही. 'मानसगूढार्थचंद्रिके'च्या हिंदी आवृत्तीतील उत्तर

कांडाच्या परिशिष्टातच ती स्तोत्रे अलीकडे छापली गेली आहेत. गीता प्रेस, गोरखपूरने काढलेल्या या हिंदी आवृत्तीत ही स्तोत्रे व त्यावरील स्वामींचे हिंदीतच लिहिलेले प्रांजळ मनोगत - दोन्हीही वाचकांना पाहायला मिळतील.

स्वामींच्या या दुसऱ्या प्रकारच्या स्तोत्रांचे स्वरूप 'श्रीरामचरितमानसप्रणित' आहे. येथे शिवशंकर, श्रीराम, लक्ष्मण, सीता, हनुमंत व भवानी यांची स्तोत्रे आहेत पण ही स्वामींची स्वतंत्र निर्मिती नाही. श्रीरामचरितमानसात श्रीरामादिकांचे वर्णन करणारी जी विविध नामे, विशेषणे त्यांचे स्तोत्ररूपाने संकलन स्वामींनी केले आहे. श्रीरामाच्या एकूण १३०० मानसोक्त नामांपैकी १२५१ नावे, २२५ शिवनामे, ५० हनुमंताची नामे, श्रीसीता व लक्ष्मण यांची अष्टोत्तरशतनामे (१०८), भवानी वर्णनाची १०१ नामे स्वामींनी स्तोत्ररूपात मांडली आहेत. 'श्रीरामसपादसहस्त्रनामस्तोत्र', 'श्रीभवानीशतनामस्तोत्र' 'श्रीहनुमत्सार्धशतनाम स्तोत्र' ही स्तोत्रनामे पाहिली की स्वामींना संस्कृत शब्दयोजनेचे अचूक भान असल्याचे जाणवते.

या स्तोत्ररचनेची प्रेरणा आपल्याला कशी झाली या विषयी स्वामींनी स्वतःच सविस्तर मनोगत व्यक्त केले आहे. श्रीरामचरितमानसावर टीका लिहीत असताना 'मानसा'त श्रीरामाची हजारभर तरी नावे असतील हा विचार स्वामींच्या मनात आला होता. पण ती एकत्र करणे काही त्यांना जमले नव्हते. १९५५ मध्ये त्यांच्या सांगण्यावरून भदौरिया नामक तरुणाने ते काम सुरू केले पण त्याचे अकाली निधन झाल्याने ते काम अपुरेच राहिले. पुढे १९५९ साली स्वतः स्वामींनाच अंतःस्फूर्ती झाली आणि केवळ ७-८ दिवसांत १३०० नावे संकलित झाली. श्रीरामनामे एकत्र करत असतानाच स्वामींना जाणवले की याच धर्तीवर श्रीशिवनामे, श्रीसीतानामे इ.ही संकलित करता येतील आणि याच प्रक्रियेत प्रथम रचना झाली ती 'श्रीशिवशतनामाची. स्वामींनी स्वतःच याचे कारण दिले आहे. ते हे की 'तुलसीमानसात' श्रीरघुनाथ सरकारांनी (हा खास स्वामींचा आवडता शब्द) एक रहस्य सांगितले आहे की 'शंकर भजन बिना नर भगति न पावइ मोरी', त्यामुळे त्यांच्याच प्रेरणेने शिवनामस्तोत्र आधी रचले गेले ! मग रचना झाली ती भवानीशतनामाची. कारण 'शक्तिविना शिव हा' 'शव' होतो याचे स्वामींना पक्के स्मरण होते. मात्र भवानीची (मानसोक्त) वर्णनपर ७०-७१ नावेच स्वामींना मिळाली. उरलेली नामे मानसोक्त भवानी चरित्राच्या चिंतनातून स्फुरल्याचे स्वामींनीच नमूद केले आहे. यानंतर रचना झाली 'लक्ष्मण अष्टोत्तर शतनामांची'. याचे कारण देताना स्वामींनी 'रघुपति किरति बिमल पताका । दण्ड समान भयउ जस जाका' हे 'मानसवचन' उदधृत करून रामाच्या कीर्तिपताकेचा दंड असलेल्या लक्ष्मणालाच प्रथम वंदन योग्य असल्याचे सांगितले आहे. 'सुनु सुत तोहि उरिन मैं नाहीं' असे 'मानसांत स्वतः रघुनाथ सरकारांनी हनुमंताला म्हटले आहे. प्रत्यक्ष भगवंत ज्याचे ऋणी त्या हनुमंताची कृपा झाली तर श्रीरामकृपा होणे सहजसुलभ होईल म्हणून श्रीरामसहस्त्र नामाआधी 'हनुमत्सार्धशतनामस्तोत्र' रचना झाल्याचे स्वामींनी सांगितले आहे आणि सीतारुप मायाविद्येशिवाय राम परमात्मा अपूर्ण म्हणून श्रीसीताअष्टोत्तरशतनामाची रचना स्वामींनी केली आहे. सर्वात शेवटी रचना झाली ती श्रीराम सहस्त्रनामा'ची ! स्वामींच्या या स्तोत्ररचनेचा प्रवास मनोगतात वाचताना संत कवी दासगणूंचे शब्द आठवत राहतात. 'माळा आधी ओविती । मग मेरुमणि जोडिती' कारण 'श्रीरामसहस्त्रनाम' हाच या स्तोत्रनामावलीचा, या स्तोत्ररूपी 'स्मरणी'चा 'मेरुमणि' आहे.

या स्तोत्ररचनेचा आपला हेतू स्वामींनी मनोगतात स्पष्ट केला आहेच - 'मानसोक्त रामकथेचे चिंतन'. त्यामुळे स्तोत्ररचनेच्या अनुक्रमाची कारणमीमांसा करतानाही मुख्य आधार त्यांनी घेतला तो 'श्रीरामचरितमानसा'चा. मात्र या शिवाय आनंदरामायण, श्रीरामार्चनचंद्रिका व उपनिषदे यांचेही संदर्भ त्यांनी दिलेले दिसतात. अनुष्टुभात रचलेली ही सारी स्तोत्रे 'रामकृपा व्हावी' या एकमेव हेतूने रचली गेली आहेत. नवविधा भक्तीतला एक प्रकार असतो. 'परमेश्वराचे गुणसंकीर्तन' स्वामींनी येथे तोच अवलंबलेला आहे. शिव आणि श्रीराम हे वस्तुतः अभिन्न असल्यामुळे दोन्ही स्तोत्रांत काही नावे एकसारखीच आलेली दिसतात. हीच गोष्ट भवानी व सीता यांच्या नामांमध्ये देखील आढळते. लक्ष्मणालाही रामासारखेच 'नारायणावतार' म्हटले गेले आहे. 'जगकारण' म्हटले आहे. त्याबाबत लोकांनी आक्षेप घेऊ नये यासाठी 'लक्ष्मणअष्टोत्तरशतनामा'च्या प्रास्ताविकात स्पष्टीकरण दिले आहे. प्रामुख्याने या नामसंकलनातून रामचरितमानसातील त्या त्या व्यक्तींशी संबंधित रामकथेचा भाग समोर यावा, त्याची स्मृती जागावी हा स्वामींचा प्रयत्न आहे.

ही स्तोत्रे साध्या स्तोत्रांसारखी स्वामींनी रचली नाहीत. प्रत्येक स्तोत्रापूर्वी तुलसीदास हाच ऋषी व अनुष्टुभ हाच छंद आहे. याशिवाय देवता, बीज अशा सर्व तांत्रिक गोष्टी स्वामींनी दिल्या आहेत. ज्यांना न्यास करून स्तोत्रपठण करायचे असेल अशांसाठी स्वरचित न्यास दिले आहेत. मात्र हे न्यास करायलाच हवेत असा आग्रह स्वामींनी धरलेला नाही. या स्तोत्ररचनांच्या दरम्यान जे प्रास्ताविक स्वरूपात विचार स्वामींनी व्यक्त केले आहेत त्यात 'न्यास केल्याने शरीर मंत्रमय होते' असे सांगितले आहे. आणि 'प्रारंभी न्यास केले तर स्तोत्राअंतीही ते करणे आवश्यक' असे स्पष्ट प्रतिपादन केले आहे. मात्र त्याच वेळी आपल्या न्यासात एकाक्षरी वा षडाक्षरी मंत्र आपण दिले नसल्याने त्यांचा वापर ब्राह्मण, ब्राह्मणेतर वा स्त्रिया कुणीही केला तरी अपाय होणार नाही हेही सांगून टाकले आहे. थोडक्यात, स्वामींनी स्तोत्रे अधिक गुणकारी होण्यासाठी न्यासांचा वापर सुचवला असला तरी जास्तीत जास्त लोकांपर्यंत ती पोचावीत यासाठी न्यास न वापरण्याची मुभाही दिली आहे.

ध्यानाच्या श्लोकांचे वैशिष्ट्य हे की काही श्लोक स्वामींनी 'तुलसीमानसा'तून घेतले आहेत. पण काही स्वतंत्रपणे स्वतः रचले आहेत. विशेषतः लक्ष्मणध्यानाचा श्लोक 'श्रीहरीकृपेने' झाल्याचा व 'भवानीच्या ध्यानाचा व सीतेच्या ध्यानश्लोकाचा आधार दोघींचे मानसोक्त वर्णन आणि उपनिषदे हा असल्याचे स्वामींनी आवर्जून सांगितले आहे.

या सर्व स्तोत्रांची काही वैशिष्ट्ये आणि वरपांगी दोष वाटणारे पण प्रत्यक्षात तसे नसणारे असे काही मुद्देही स्वामींनी स्वतःच मांडले आहेत. स्तोत्रांइतकेच त्या स्तोत्रांबाबतचे त्यांचे हिंदीतील मनोगतही वाचनीय, मननीय आहे. वेदांचा, वेदांगांचा आणि शास्त्रादिकांचा अभ्यास झालेला असूनही ३० वर्षांचा खंड पडल्यामुळे स्वामी स्वतःला फारसे संस्कृत येत नसल्याचे ज्या नम्रतेने नमूद करतात ती नम्रता दुर्मिळ आहे. मात्र स्वामींनी पुढे जे महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत, 'अनन्यगतिक' व 'अनन्य गति' 'अनीह', 'निरीह' या शब्दातील सूक्ष्म अर्थभेद सांगितला आहे. 'कोदण्डशरधर' व 'शार्ङ्गपाणि' हे शब्द पुनरुक्त नाहीत. एकाच अर्थाचे नाहीत. त्या त्या शब्दांना विशिष्ट अर्थ आहे हे परखडपणे सांगितले आहे. 'रामचन्द्र' व 'रामचन्द' हे दोन्ही शब्द संस्कृतच आहेत. जिथे रामाचे दाहक तेज व्यक्त करायचे तेथे 'रामचन्द्र' व जिथे दाहकत्व सोडून अन्य गुणांवर (विशेषतः

शीतल स्वभावावर) भर द्यायचा आहे तेथे 'रामचन्द' हा शब्द आपण हेतुपुरस्सर वापरला आहे, असे स्पष्टीकरण दिले आहे. ते वाचले की त्यांच्या सखोल संस्कृत व्यासंगाची यथार्थ कल्पना येते आणि त्यांची प्रारंभीची नम्रताही 'ज्ञात्याची नम्रता' आहे हे जाणवते. 'विष्णुसहस्त्र नाम' या प्रसिद्ध स्तोत्राचे अनुकरण आपण केलेले नाही किंबहुना विष्णुसहस्त्र नाम आपले पाठही नसल्याचे स्वामींनी प्रांजळ भावाने सांगितले आहे. शिवाय विष्णुसहस्त्रनामात विष्णूच्या निर्गुण स्वरूपावर भर दिलेला आहे व आपल्या स्तोत्रात आपण श्रीरामाच्या सगुण स्वरूपावर भर दिला असल्याचे ते नमूद करतात. विचारांचा स्पष्टपणा व प्रतिपादनातील परखडपणा हे स्वामींचे वैशिष्ट्य आहे आणि त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचे स्तोत्ररचनेमागील प्रयोजन दृढ आहे, स्पष्ट आहे. 'मानसोक्त नामसंकलन'. म्हणूनच १२५१, २२५ या नामसंख्येतून 'मानसकवि तुलसीं'ना विशेष आवडणारी अशी ९ हीच संख्या जी अविकारी आहे. (नऊची कितीही पट केली तरी त्या संख्यांची बेरीज ९ च राहते. ९ × २ = १८, ८ + १ = ९, ९ × ३ = २७, २ + ७ = ९ इ.) ती साधली याचे समाधान स्वामींनी व्यक्त केले आहे.

स्वामींची ही स्तोत्रे आणि त्यावरील मनोगत वाचताना समर्थांचे वचन सतत आठवते ते हे 'परमेश्वराचे गुणानुवाद । अखंड करावा संवाद । तेणेकरिता आनंद । उदंड होतो -' खरंच, स्वामींनी याच उद्देशाने स्तोत्ररचना केली आणि त्यातून मिळणारा उदंड आनंदही अनुभवला. आपणही त्याच उत्कट भावनेने स्वामींची स्तोत्रे वाचली तर त्या उदंड आनंदाचे धनी होऊ हे नक्की !

प्रा. डॉ. अंजली माधव पर्वते
५ बी, शिवसाई कॉम्प्लेक्स, आनंदनगर,
सिंहगड रस्ता, पुणे ४११०५१.

विरक्त - संन्यस्त

स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती !

सौ. शरयू दाते - रामदासी

एम.ए. संस्कृत, [illegible] कॉलेजमध्ये प्राध्यापक, उत्तम प्रवचनकार, [illegible]

श्री प्रज्ञानानन्द सरस्वती हे अलीकडील महाराष्ट्रातील संतांच्या मांदियाळीतील एक श्रेष्ठ, तपस्वी संत होते. वयाच्या चाळीस-पंचेचाळीशीनंतर ऐहिक जीवनाचा पूर्णतया त्याग करून, खडतर तपश्चर्या केली. अन् पुढे वयाच्या पन्नाशीला संन्यास ग्रहण केला. पूर्व जीवनातील परमार्थाची बैठक होतीच. आध्यात्मिक ग्रंथांचा अभ्यास व व्यासंगही होता. संन्यासग्रहणानंतर बैठक दृढ झाली. गुरुकृपा झाली आणि त्यांची प्रतिभा सर्वांगांनी फुलून आली. रामायण व भागवतविषयक अनेक ग्रंथांची रचना, तत्त्वविवेचन, अद्वैत वेदांतपर ग्रंथरचना अशी विपुल वाङ्मयनिर्मिती झाली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'रामचरितमानसा'वर मराठी व हिन्दीतून लेखन. त्यांची ही अफाट ग्रंथसंपदा पाहून कोणालाही आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. हे सर्व केवळ गुरुकृपेचेच फळ हाच त्यांचा अखेरपर्यंत भाव होता.

'मी कर्ता ऐसें म्हणसी । तेणें तूं कष्टी होसी ।
राम कर्ता म्हणता पावसी । येश कीर्ति प्रताप ॥ (दा. ६-७)

हे पूर्णतया जाणणारे स्वामी असल्यामुळे त्यांची ग्रंथप्रसूतीही यत्न भावाने झाली आहे. वयाची पाऊणशे वर्षे झाली तेव्हा त्यांनी परंडा (जि. उस्मानाबाद) येथे देह विसर्जित केला.

स्वामीजींच्या जीवनाचे स्थूलमानाने हे टप्पे सांगता येतील. स्थूलमानाने म्हटले याचे कारण याच अंकात अन्यत्र स्वामीजींचे जीवनविषयक सर्व संदर्भ, त्यांचे कार्य याविषयी वाचकांना सविस्तर वाचायला मिळणारच आहे.

या सर्व टप्प्यांचा विचार करता एक गोष्ट लक्षात येते की ते प्रापंचिक होते तरी त्यात गुंतून राहिले नाहीत. 'वाधक्ये मुनिवृत्तीनां योगेमान्ते तनुत्यजाम् ।' या कालिदासोक्तीप्रमाणे ऐहिक जीवनापासून वेळीच दूर राहिले पाहिजे हे त्यांनी जाणले होते. कारण त्याशिवाय जीवनातील अंतिम साध्यापर्यंत जाता येणे शक्य नाही. स्वामींनी हे साध्य केले याचे कारण एकतर पूर्वपुण्याई. शिवाय निग्रह, संयम, सद्गुरुनिष्ठा, ज्ञानप्राप्तीची तळमळ, कठोर साधना - आणि याही सर्वात विशेष म्हणजे - सतत रामाची प्रार्थना. त्यांनी जीवनाला एक शिस्त लावून घेतली होती. पहाटे ४ वाजता उठून, स्नानसंध्या, नित्यक्रम, जप, झडझडून साधना व उपासना. उपासनेचा आश्रयो । उपासनेविण निराश्रयो । (समर्थ) हे त्यांचे जीवन.

सामान्यतः संतचरित्रातून बोध घ्यायचा झाल्यास दोन गोष्टी विचारात घ्याव्या लागतील. १) संतांचा आचार २) संतवचन व विचार. अर्थात् संतांचा आचार तंतोतंत सामान्यजनांना पाळता येईल असे नाही. कारण संतमहात्म्यांच्या ठिकाणी असामान्य तेज व अद्वितीय सामर्थ्य असते. तसे ते सामान्यांमध्ये नसते. तरीपण थोडाफार आचार अनुसरता येण्यासारखा आहे. प. पू. वासुदेवानंद सरस्वती एका अभंगात सांगतात - ५

सदा संतांपाशीं जावें ।
त्यांचे जवळी बैसावे ।
उपदेश ते न देती ।
तरी ऐकाव्या त्या गोष्टी ॥
तेचि उपदेश होती ।
त्याहि कष्ट नष्ट होती ।
वासुदेव म्हणे संत - ।
संगें करिती पसंत ॥

यावरून संतासारखा थोडाफार आचार करता येण्यासारखा आहे. पण याहून साधकांना संतवचनांचा, संतचरित्राचा उपयोग खात्रीने होईल. यासाठी संतांची चरित्रे वाचून स्वतःची उन्नती करून घेतली पाहिजे.

प्रज्ञानानंद स्वामींना विरक्त जीवनामुळे - 'आधी केले मग सांगितले' या न्यायाने साधकांना काही सांगण्याचा, उपदेश करण्याचा अधिकार प्राप्त झाला होता. कुणी काही प्रश्न विचारावेत आणि स्वामीजींनी त्यांचे समाधान करावे असे अनेकदा घडे. असेच एका साधकाला उद्देशून लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात –

'वैराग्येविण ज्ञान । ते श्वानाचे रुदन ।'

ज्ञान खूप मिळविले, अनेक शास्त्रग्रंथ अवगत झाले. खूप पांडित्य जरी मिळविले तरी त्या ज्ञानाच्या जोडीला विरक्ती असेल तर ते ज्ञान शोभून दिसते. अन्यथा ते 'श्वानाचे रुदन' म्हणजे केवळ व्यर्थ होय. ज्ञानाचे केवळ अवडंबर कशाला? प्रत्यक्ष जर त्यानुसार आचार नाही तर त्याला कुणीच विचारणार नाही.

'वरी चांगला अंतरीं गोड आहे ।
तया लागी कोणीतरी शोधिताहे ।'

अशी आचारविचारांची बैठक हवी. स्वतःजवळ जर वैराग्य नसेल तर व्यर्थ योगाचा उपदेश देऊन काय फायदा? 'वैराग्येविण योग । तो जाणावा रोग । अशाने हा संसाराचा ताप शांत व्हावयाचा नाही. एखादा वाघ आहे, पण कसा? खरा वाघ नव्हेच ! वाघाचे कातडे फक्त. त्यात भुस्सा ठासून भरला अन् 'वाघ म्हणून समोर ठेवला' तर ते जेवढे हास्यास्पद होईल तेवढेच - वैराग्याशिवाय केलेले कर्मही निरर्थक होईल. असले लंगडे वैराग्य चित्तशुद्धीला कारण होणार नाही.

म्हणून परमार्थात वैराग्याची अत्यंत आवश्यकता आहे. नव्हे वैराग्य म्हणजेच परमार्थ ! हे उत्पन्न कसे व्हावे? आपणास एक दिवस सर्व सोडून इथले येथे टाकून जावयाचे आहे. याचे अखंड अनुसंधान राहील तरच वैराग्य उत्पन्न होईल.

'अखंड आठवावे हें । मरणाचे ध्यान अंतरीं ।
तेव्हाचि वैराग्य उठे ।
बहु दुःख भोगिलें जेणें । तयासी च परमार्थ बाणें ।
संसार दुःखाचेनि गुणें । वैराग्य उपजे ॥ (दासबोध)

आणि असे विषयाबद्दलचे वैराग्य ज्याच्या ठिकाणी उत्पन्न झाले, त्यालाच परब्रह्मप्राप्ती होऊ शकेल.

स्वामीजी पुढे म्हणतात, 'वैराग्येविण भक्ती । ती दांभिकाची युक्ती ।' भक्तीचा देखावा नको काही ! ती आतून उफाळून आली पाहिजे नाहीतर दांभिक भक्तिद्वारा मुक्ती कशी प्राप्त होणार?

मनुष्य देहात पुरुषजन्म । त्यात ब्राह्मण उच्च परम ।
वरी अव्यंग इंद्रियग्राम । पूर्व पुण्य मिळाले ।

अशी एकाहून एक वरचढ गोष्ट पूर्व पुण्याईनेच मिळाली आहे. तर त्याचा योग्य उपयोग करावा. परमार्थप्राप्तीसाठी धडपड करावी, असे स्वामीजी सांगतात.

काया वाचा जीवें प्राणें । कष्टे भगवंताकारणें ।
मनें घेतलें वरणें । भजनमार्गी ॥
ऐसा भगवंताचा भक्त । विशेष अंतरी विरक्त ।
संसार सांडून जाता मुक्त । देवाकारणे ।

अशा प्रकारची तळमळीची, अंतरीच्या उमाळ्यांनी भक्ती करता आली पाहिजे व मुक्त होता आले पाहिजे. यातच देवाची प्राप्ती आहे. एका रघुपतीवाचून दुसरा कोणीच माझा जिवलग नाहीच. रामनामावाचून या जगात दुसरे कोणीही आपले नाही.

'ऐक म्हणे नानक मतिमंता
नाही कुणी या जगी अपना । हरिनामविना ॥'

परमार्थ प्राप्तीकरिता प्रपंचाचा त्याग अटळ आहे. प्रपंच हा नागवणारा आहे. म्हणून ज्याला वैराग्य प्राप्त व्हावेसे वाटते त्यांनी काही विचार न करता 'उठोनि वाटा चि लागावें । दिगंतराप्रती ।' ह्या विरक्तीकरिता 'वीतरागी व्हायला हवे. निवृत्तरागी व्हायला हवे. मग प्रपंचात राहूनही ते होता येईल. 'निवृत्तरागस्य गृहं तपोवनम् ।' विषयांवरचा 'राग' म्हणजे प्रेम. त्याची निवृत्ती व्हायला हवी. 'राग' हा संस्कृत शब्द. त्याचा अर्थ मराठीत प्रेम, 'आसक्ती' असा आहे. कधी कधी नेमका अर्थ न कळल्यामुळे घोटाळा होण्याची शक्यता असते. साधकांनी 'निवृत्तरागी'चा अर्थ नीट ध्यानात घ्यावा.

साधकाला लिहिलेल्या पत्रात स्वामीजी पुढे म्हणतात – 'पूर्व पुण्याईने अव्यंग देह मिळाला, परमार्थाची आवड उत्पन्न झाली. गुरुकृपा झाली. सर्व सुखाचा संसार झाला. कर्ती मुले झाली. ही सर्व बाबतीतील अनुकूलता आहे. इतके सर्व सुख असूनही जो आपले परमहित साधून घेत नाही; तो आत्मघातकीच नव्हे का? त्याला आत्मघातकी म्हणणे यात चूक काही नाही. अर्थात् हे सर्व अशाश्वत आहे ! - हे जाणूनही त्यातच जो आसक्त होतो, तो दिव्यावर झेप घेणाऱ्या पतंगासारखाच आहे, हे त्याला शोभते का? म्हणजे असे की, 'रत्नपारखी म्हणवून घेतो, आणि गारगोट्या जमवतो - त्याला शहाणा कोण म्हणेल?' नरदेहरुपी रत्न प्राप्त होऊनही विषयकांचासाठी प्रयत्न करणे म्हणजे ज्याने हा देह दिला त्याच्याशी कृतघ्नताच म्हणावी लागेल. कारण देह दिलाय तो काही साधन करण्यासाठी. या नरदेहाचेनि संबंधें । बहुत पावले उत्तमपदे । (दास.) म्हणून साधकाने 'येथानुशक्त्या चित्तवित्त सर्वोत्तमी लावावे' (दास.) स्वामीजी साधकाला सांगतात, 'नाहीतर अमृताचा घडा समोर आहे. तरीपण आळशाला तो नाही प्राप्त होत. प्रारब्धानुसार मिळालेला हा देह परमार्थी प्रयत्नपूर्वक लावायला हवा. ज्याने तो असा लावला त्याचेच जीवनाची सार्थकता झाली. स्वामीजींनी साधकाला केलेला हा पत्रद्वारा उपदेश हे त्यांचे स्वतःचेच जीवन आहे. आपल्या देहाधारे अंतिम उपलब्धी कोणती हे त्यांनी योग्य वेळी - विषय, कामिनी इ. टाकून देऊन सर्वांना दाखवून दिले. चालते-बोलते वैराग्यच त्यांच्या रूपाने या अवनीतलावर अवतरले होते.

सामान्य प्रापंचिक माणसाला वाटते –

म्हणती प्रपंच म्हणिजे कनककांता । हें मीं कैसें टाकूं आतां ।
तरी ईश्वरे विभली ते वनिता । सकळासी ठाउकी ॥

परंतु या ठिकाणी विवेकाने वागणेच शहाणपणाचे ठरेल. तुलसीदासांच्या जीवनातील प्रसंग साऱ्यांना ठाऊक आहे. भर पावसात नदीला पूर आला असता रात्रीच्या वेळी पत्नीच्या विरहाने व्याकुळ होऊन तुलसीदास जेव्हा आपल्या पत्नीला - रत्नावलीला भेटायला श्वशुरगृही जातात तेव्हा ती म्हणते की 'तुम्ही प्रेमाची सीमा ओलांडलीत ! माझ्या प्रेमाच्या ओढीने तुम्ही गंगापार केलीत, तरी जगदाधार श्रीभगवंताच्या चरणांवर प्रेम केल्याने मनुष्य भवसागर सहज तरून जातो.'

पत्नीचे हे उद्‌गार तुलसीदासांच्या ठिकाणी तीव्र वैराग्य उत्पन्न करण्यास कारण ठरले.

'अस्थि चर्ममय देह मम । तामें जैसी प्रीती ।
तैसी जो श्रीराम महुँ । होति न तो भवभीती ॥'

पत्नीच्या या उद्‌गारांनी तुलसीदासांच्या रामप्रेमावरील साचलेले धुके पार वितळले. त्यांना स्वतःची लाज वाटली. स्त्रीप्रेमामुळे प्रभुचरणांचा विसर आपणास पडला याची खंत वाटली. खाड्कन् ते जागृत होऊन त्यांना गुरुवचनाचे स्मरण झाले.

'नरहरि, कांचन कामिनी, यापासुनी अति दूर ।
जरि इच्छी कल्याण, निज रामरस भरपूर ॥'

रामचंद्रांनीच पत्नीच्या रूपात आपणास सावध केले असे वाटून तुलसीजींचे रामप्रेम उफाळून आले. आणि रातोरात ते तिथून निघून गेले. तिथूनच खऱ्या अर्थाने त्यांची साधना सुरू झाली.

तुलसीदासांविषयी विवेकाने मोहावर, माया-ममतेवर मात केली आणि या संसारमोहातून ते मुक्त झाले. प्रज्ञानानंद सरस्वतींच्या ठिकाणी हा विवेक भरपूर होताच. म्हणूनच ते ४५ व्या वर्षीच उग्र तपाचरण करून पुढे अल्पावधीतच संन्यस्त झाले. त्यांचे पुढील संपूर्ण जीवन हे खऱ्या पारमार्थिक लोकांना आदर्शभूत आहे. चुकूनही यापासून मागे हटण्याचा मोह त्यांना झाला नाही. हे सर्व कठीण आहे. पण यावरही मात करतात तेच खरे योगी. तेच खरे विरक्त. तेच तपस्वी अन् तेच संन्यस्त ! अगदी देह विसर्जित करीपर्यंतचे त्यांचे पुढील सर्व जीवन वैराग्याच्या मुशीत तावून सुलाखून गेलेले पहावयास मिळते. आपल्या शुद्ध वैराग्याचा एक ठसा प्रत्यक्ष आचरणातून त्यांनी जनमानसांवर उमटविला. हे नुसते वैराग्य नव्हे, तर 'विवेकयुक्त वैराग्य'. समर्थ रामदासांचा आदर्शही त्यांच्या समोर होताच. समर्थ म्हणत, 'नुसते वैराग्य हेकांड पिसे' वैराग्य अंतर्बाह्य असावे. बाह्य त्यागापेक्षा अंतस्त्यागाची आवश्यकताच जास्त आहे. नाहीतर बाह्यतः त्याग आणि अंतरी विषयध्यान काय कामाचे?

भक्ति-ज्ञान-वैराग्य ही चढती कमान म्हणावी किंवा हे सर्व एक म्हणावे का? एवढे खरे की, या तिन्हीतून कोणत्याही एका गुणाची पराकाष्ठा झाली म्हणजे बाकीचे दोन्ही गुण संभवतात. भक्तीचा कडेलोट होतो तेथे ज्ञान व वैराग्य आलेच. आणि ज्ञान पूर्णत्वाला गेले की त्याच्या आश्रयाला भक्ती आणि वैराग्य येतातच ! आणि शेवटी वैराग्याने वैराग्याची सीमा गाठली की भक्ती व ज्ञान निराळी रहातीलच कशी?

स्वरूपी आसक्ती म्हणजेच भक्ती. त्यात विभक्तपणा नाहीच ! जिथे

देहबुद्धी सुटते तेच ज्ञान. भक्ती आणि ज्ञान एकरूप होते, तेथे वैराग्यही एकरूप झालेले पहावयास मिळते, ते संतांच्या चरित्रातच ! श्रीसमर्थ रामदासस्वामी आणि प्रज्ञानानंद सरस्वती यांची जीवनचरित्रे याहून वेगळे काय सांगतात? स्वरूपानुसंधानावाचून आनंद नाही आणि वैराग्याशिवाय ते अनुसंधान घडावयाचे नाही. म्हणून अशा वैराग्यासारखे मोठे भाग्य नाही. स्वामीजींच्या जीवनात असे 'शुद्ध वैराग्य' होते म्हणूनच त्यांनी साधकांना वैराग्याचा उपदेश केला आहे. ज्याला स्व-रूपी रहावयाचे आहे, त्या साधकांनी अशी विरक्ती अंगी बाणवावी. ही 'विरक्ती' वा हे 'वीतरागीपण' नसेल तर मग ते शास्त्रज्ञान व त्या ज्ञानाचा देखावा ही सारी मनुष्य देहाची विटंबनाच !

सौ. शरयू दाते - रामदासी
सोलापूर.

गुरुपौर्णिमा

श्रीगुरु हा चंद्र पुनवेचा ।
ममहृदयीं प्रकटला दत्त हा अत्रींचा ।।धृ.।।
साऱ्या चिंता कशा मिटल्या ।
ध्यानी मनी दीपज्योती फुलल्या ।।
नवविधा संतुष्ट मनी जाहल्या ।
भक्तीरस हा चहुकडे उधळला मुक्तीचा ।।

श्री. संतोष प्रल्हाद दंडवते

प. पू. प्रज्ञानानंद सरस्वती आणि आयुर्वेद

श्री. नागेश गोविंद हेर्लेकरशास्त्री

[illegible]

एकच व्यक्ति अनेक विद्या शिकू शकते? किंवा अनेक विद्यांमध्ये निष्णात होऊ शकते? आपण म्हणू ही गोष्ट कठीण आहे. म्हणजे कठीण याचा अर्थ अशक्य नव्हे. अप्रतिम बुद्धिमत्ता असणाऱ्यास हे शक्य होईल. पण सर्वज्ञ होऊ शकणार नाही हं ! ब्रह्मज्ञान ज्यास प्राप्त झाले तो सर्वज्ञ होऊ शकतो. कारण ते सर्व विद्यांचे मूळ आहे. मूलस्रोत आहे. याच बळावर 'वेदांचा तो अर्थ अम्हासीच ठावा' असे तुकाराम महाराज म्हणू शकतात. ते कुठे वेद शिकण्यास गेले होते?

'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्' असे वचन आहे. याचा अर्थ व्यासांनी सर्व जगत् अर्थात् सर्व विद्या उष्ट्या करून ठेवल्या आहेत. महाभारतात तर सर्व विद्यांचा कोशच आहे. एकच व्यक्ती पाच लाख श्लोकसंख्या व सर्व विद्यांचा परामर्श घेऊ शकते हे हल्ली लोकांना स्वतःच्या बुद्धीची कुवत पाहून पटत नाही. त्यामुळे कुणी म्हणतात व्यास दोन होते, चार होते. एकाच व्यक्तीकडून इतके प्रचंड काम होऊ शकणार नाही वगैरे.

इतकी प्रस्तावना करण्याचे कारण प.पू. प्रज्ञानानंद सरस्वतींचेही प्रचंड कार्य पाहिल्यानंतर त्यांच्याही बुद्धिमत्तेची झेप केवढी होती ते दिसून येते. गूढार्थ चंद्रिका नावाची मानसाची टीका, ज्यामध्ये अनेक विषयांचे संदर्भ येतात. एखाद्या विषयाचा संदर्भ आल्यानंतर टीकेसारख्या लेखनात काहीतरी उडवाउडवी करून चालत नाही, तर त्याचा पूर्ण उहापोह करावा लागतो. त्या विषयाचा अभ्यास असल्याशिवाय असा उहापोह करणे शक्यच नसते. अशा अनेक विषयांचा संदर्भ टीकेमध्ये येतो. त्यातच वरील आयुर्वेद हा विषय आहे.

स्वामी देहावर असताना काही प्रसंगी त्यांनी विशिष्ट रोगांवर सांगितलेले काही उपाय व त्याची आलेली प्रचीती याबद्दलचे त्यांच्या अनेक शिष्यांचे अनुभव आहेतच. ते स्वतः गरज लागल्यास आयुर्वेदाच्या औषधांचाच वापर करीत असत. प्रायोपवेशनाचे वेळी तर माझ्यावर कोणतेच उपचार करू नका, अशी सक्त ताकीदच दिली होती. पण जिभेवर अति उष्णतेने फोड आल्यामुळे चंदन लावण्याची परवानगी दिली होती. त्यातसुद्धा पाणी थोडे जास्त झाले तर लगेच सूचना मिळे.

गू. चं. टीकेवरून त्यांच्या आयुर्वेदाच्या व्यासंगाबद्दलचा विचार करावयाचा झाल्यास जागोजागी त्याचे संदर्भ मिळतात. मुळात आयुर्वेदाचे प्रयोजन सांगत असताना चरकसूत्रात म्हटले आहे 'स्वस्थस्य स्वास्थ्य. रक्षणम्, आतुरस्य विकार प्रशमनम्' (च.सू. ३०।२६) स्वस्थ म्हणजे निरोगी. त्याच्या त्याच्या निरोगित्वाच्या रक्षणासाठी आणि काही विकार उत्पन्न झाल्यास विकाराच्या नाशासाठी आयुर्वेद उत्पन्न झाला. यात स्वास्थ्य रक्षण होणे म्हणजे 'प्रक्षालनाद्धि पंकस्य दूरादस्पर्शनं वरम्' । म्हणजे चिखल लागल्यानंतर तो धुवत बसण्यापेक्षा तो लागूच नये यासाठी खबरदारी बाळगणे हे शहाणपणाचे नव्हे काय?

हे सर्व लक्षात येण्यास तशी बुद्धिमत्ता पाहिजे. पण आमच्या जवळ तर त्याचीच वानवा ! पण काळजी करू नका. ती वाढविण्यासाठी आमच्याजवळ उपाय आहेत. बालकांड दोहा ३६।३ वरची टीका पहा. 'सुमति' या शब्दाचे संबंधात 'धी' म्हणजे बुद्धीचे गुण सांगतात. बालकाची बुद्धी व धारणा शक्ती वाढविण्यासाठी मेधाजनन नावाचा संस्कार सांगून (गडू चिकाऽपामार्गश्च वङंगं शंखपुष्पिका । विष्णुक्रांतावचापथ्या नागरंच शतावरी ।।' असा श्लोक येतो. वरील सर्व औषधींचे चूर्ण गायीच्या तुपात मिसळून चाटावे. ३ दिवसांत शंभर श्लोक पाठ म्हणेल.

स्वास्थ्य रक्षणाचे जे उपाय आयुर्वेद सांगतो त्यात दिनचर्या, रात्रिचर्या, ऋतुचर्या इ. महत्त्वाच्या आहेत. तसेच 'त्रय उपस्तंभाः आहारः स्वप्नो ब्रह्मचर्य मिती' (च.सू. ११।३५) शरीर धारण करणाऱ्या या तीन महत्त्वाच्या गोष्टी, आहार, निद्रा व ब्रह्मचर्य यांचे नियम जो पालन करतो त्याचे स्वास्थ्य उत्तम राहील. वरील तीन्हींचे अनेक नियम सांगितले आहेत. बालकांड दो. ३५४ 'भोजन कीन्ह अनेक विधी घरी पंच गदू राति' वरील टीका पहा – सायं. चे भोजन फार उशीरा करू नये. दोन तास रात्री पूर्वी सर्वांची (नंतर जेवणाऱ्यांचीसुद्धा) जेवणे झाली. 'जागृयात् दशनायस्तु दशनायस्त संविशेत्' (आयुर्वेद) १० घटी ४ तास रात्रीपूर्वी जेवण व्हावे. अर्थात् जेवण झाल्यानंतर २ तास जागे रहावे. तितकेच पहाटे उठावे असे आयुर्वेद सांगतो.

स्वास्थ्य रक्षणात पुष्टिकारक व मांगल्यकारक औषधींचा ही समावेश आहे. राज्याभिषेक वर्णनात ज्या औषधींचा समावेश आहे त्या सर्व ऋतुचर्येत शरद ऋतू मधील अभ्यंगास सांगितलेल्या आहेत. (अयोध्या. दो. ६।२) मुरामांसी वचा कुष्टं शैलेयं रजनीद्वयम् । शठी चंपक मुस्ताच सर्वौषधि गणः स्मृतः ।। तालपर्णी, जटामांसी, वेखंड, कुष्टकोळिंजन, शिलाजीत, हळद, अंबेहळद, कचरा, नागकेसर, नागरमोथा इ. उटण्यामध्ये यातील बऱ्याचशा औषधी असतात.

इथपर्यंत स्वास्थ्य रक्षणासंबंधी झाले. आता 'आतुरस्य विकार प्रशामनम्' बद्दल काय म्हणतात ते पाहू. अयोध्या. दो. ३४ 'देखी व्याधि असाधिनृप' वरची टीका लिहिताना स्वामींनी व्याधींचे प्रकार वर्णिले आहेत. साध्य, कष्टसाध्य, असाध्य असे आयुर्वेद व्याधींचे तीन प्रकार करतो. त्यात ही वात, पित्त, कफ इ. त्रिदोष जनित. पुन्हा त्याचेही अनेक उपप्रकार. शिवाय सन्निपात म्हणजे एकदम तिन्ही दोष कुपित होणे त्यापासून सन्निपात ही व्याधी सदैव असाध्य सांगतात. कैकयीस झालेली व्याधी 'शीतांग सन्निपात ज्वर' ही होती. ज्या व्याधीत हाताला शरीर थंडच लागते पण ज्वर मात्र १०५° असतो. तसे कैकयीचे वरकरणी बोलणे गोड. हावभाव, कटाक्ष आकर्षक. पण ज्यामुळे आत १०५° ज्वर भरलेला समजला नाही.

जेव्हा प्रगट झाला तेव्हा दशरथ त्या व्याधीस असाध्य समजतात.

या कैकयीच्या असाध्य व्याधीचा परिणाम दशरथांवर इतका भयंकर झाला की त्यांच्यावर शेवटी असाध्य असा विषमज्वर उद्‌भवला. (अयोध्या. दो. ५१।५) 'जरहि विषय जर लेहि उसासा । कवनि राम बिनु जीवन आसा ॥' या चौपाईच्या टीकेत स्वामींचे आयुर्वेदाचे ज्ञान पूर्ण प्रगट होते. हे विषमज्वराचे रूपक स्वामींनी अगदी स्पष्ट करून दाखविले आहे. विषमज्वराची १४ लक्षणे देऊन दशरथांचे ठिकाणी ती कशी प्रकट झाली आहेत ते स्वामींनी तक्ता काढूनच दाखविले आहे. त्यामुळे तो विषय मुळातूनच वाचण्यासारखा आहे. या ज्वराचे सतत, संतत, अंतर्वेग, बहिर्वेग, कष्टसाध्य, असाध्य असे अनेक प्रकार माधव निदान ग्रंथात दाखविले आहेत. पैकी अंतर्वेग, संतत, असाध्य ही सर्व लक्षणे दशरथांचे ठिकाणी स्पष्ट दाखविली आहेत. यात विशेष हे दाखविले आहे की जशी विषमज्वराची ७।१४।२१ दिवसांची मुदत असते तसा इथे १४ वर्षांच्या मोठ्या मुदतीचा हा ज्वर आहे. काहीजण मुदतीतच नष्ट होतात तर मुदत संपल्यावर काहींची व्याधी नष्ट होते. इथे १४ वर्षांच्या मुदतीत दशरथ असाध्यतेने नष्ट झाले आणि मुदत संपल्यावर पुरजनांची व्याधी नष्ट झाली. अशी दोन्ही उदाहरणे आहेत.

अशा व्याधींवर औषध पाहिजे? आयुर्वेदात काही औषधी रसायन म्हणून गणल्या गेल्या आहेत की, ज्या घेतल्यानंतर व्याधी तर नष्ट होतेच शिवाय शरीराला उत्तम पुष्टी, तारुण्यही प्राप्त होते. जसे च्यवनप्राश वगैरे.

अयोध्या. दो. २०४ मध्ये 'राम भगति रस सिद्ध हित' हे रसायनरूपी शुद्ध व सिद्ध औषध दिले आहे. दशरथांना भक्तीतून दर्शनाचीच जास्त आस होती, जी प्राप्त होऊ शकली नाही. भरत मात्र भाग्यवान ठरला. पुरजन देखील तसेच भाग्यवान. या भगति रसायन सेवनाने या सर्वांना पुनरुज्जीवन प्राप्त झाले याचे कारण आयुर्वेदच सांगतो की, कितीही सिद्ध रसायन असो व तो देणारा साक्षात धन्वन्तरी असो, जो रोगी मनाने खचला तो पुन्हा उठून बसणे कठीण. तशी दशरथांची अवस्था झाली. हल्लीदेखील उपचार करत असताना रोग्याचे मनोबल टिकवण्याचाही प्रयत्न केला जातोच. आणि ज्याचे हे मनोबल उत्तम असते अशा रोग्याचे शरीरही औषधाला उत्तम प्रतिसाद (Response) देते व लौकर निरोगी होऊ शकते. पण ते मनोबल मिळवणे ही काही सोपी गोष्ट नाही. त्याला कारण मानसरोग.

उत्तर कांडात काकभुशुंडी-गरुड संवादात गरुडाने सात प्रश्न विचारले आहेत. हे प्रकरण सप्तप्रश्न गीता म्हणून प्रसिद्ध आहे. त्यातला एक प्रश्न मानसरोगांसंबंधी आहे. यावर भुशुंडींनी सविस्तर उत्तर दिले आहे. अर्थात् त्यावरची स्वामींची टीकाही तितकीच विस्तृत आहे.

'ध्यायतो विषयान्पुंस ! पासून 'बुद्धिनाशात् प्रणश्यति' पर्यंत गीतेत जी नाशाची उतरंड सांगितली आहे याची सुरुवातही मनातूनच आहे.आयुर्वेदात सर्व रोगांची सुरुवात पोटातील विकारांपासून होते असे वचन आहे. 'सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपितो मलाः' (वाग्भट) तद्वतच इथे मानस रोगांचे मूळ मोह-अज्ञान हे आहे. म्हणून 'मूलेकुठारः' या न्यायाने एक मोह नष्ट झाला की मानस रोगरुपी महावृक्ष आपोआपच उन्मळून पडणार असे स्वामी प्रतिपादन करतात. शरीरात कफ ९ आढक = २ शेर ५३ तोळे १० मासे असतो. पित्त १ प्रस्थ = ४ कुडव ५.५० तोळे व ४ मासे असते. वायू तर सर्व संचारी आहेच. अशी ही गर्भोपनिषदातील माहिती. हे कफादि त्रिदोष जर पूर्ण नष्ट झाले तर मृत्यू ठरलेलाच. कारण शरीराची धारणाच त्यावर अवलंबून. पण इथे जे कफादी त्रिदोष दाखविले आहेत ते लेशमात्र जरी मनात राहिले तरी दुःखच दुःख म्हणून ते निर्मूलन होणे महत्त्वाचे. इथे काम हा वात असून कफ लोभ आहे. आणि पित्त म्हणजे क्रोध. एखादा अति संतापला तर आपण म्हणत नाही का पित्त खवळले. असे हे त्रिदोष. या तिन्हींचा मिळून सन्निपात झाला तर मग काय बघायलाच नको, जो काही अनर्थ होईल त्यातून वाचणेच अशक्य.

तशी या मानसरोगांवर असलेली स्वामींची टीका बरीच विस्तृत आहे. सर्वांचाच परामर्श घ्यायचा झाला तर लेखन मर्यादा राहणार नाही, म्हणून संक्षिप्त विवेचन केले.

एकंदरीत असा टीकेचा आढावा घेतल्यास स्वामींच्या आयुर्वेदाच्या अभ्यासाची कल्पना करता येईल. कारण गू. चं. टीका हेच महत्त्वाचे साधन स्वामींसंबंधी विचार करायला उपलब्ध आहे. शेवटी ज्याला उत्तम स्वास्थ्ययुक्त जीवनाची अपेक्षा आहे त्याने 'आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः' (अष्टांग हृदय सू. १/२) असे सुचवून व स्वामींना विनम्र अभिवादन करून हा लेख पूर्ण करतो.

इति शम्.

श्री. नागेश गोविंद हेर्लेकरशास्त्री
६२८, विठ्ठल मंदिर, विठ्ठल देव गल्ली, शहापूर, बेळगांव ५९००३.

रामलीला

जीवन मेघास । सौगंध पुष्पास ।
सुरस फळास । रामामुळे ॥१॥
नीलिमा नभासी । प्रकाश भानूसी ।
रम्यता चंद्रासी । रामामुळे ॥२॥
पर्वतासी स्थैर्य । सागरा गांभीर्य ।
समीरा चांचल्य । रामामुळे ॥३॥
सौजन्य मनासी । चैतन्य देहासी ।
सौभाग्य जीवासी । रामामुळे ॥४॥
चराचरी साऱ्या । राम रघुराया ।
तुझी रूपछाया । पसरली ॥५॥
माझ्या मनी एक । उरलीसे आस ।
तव चरणास । बिलगावे ॥६॥
तुझ्या रुपीं रामा । करी मला लीन ।
तुझ्या पायी मन । माझें असे ॥७॥
शरण अनन्य । तुज रघूत्तमा ।
ब्रीद पाळ रामा । रक्षी मज ॥८॥

सौ. रुक्मिणी अष्टेकर

श्रीसमर्थ रामदास व स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती

श्री. सुनीलजी चिंचोलकर

बी.कॉम. १२ वर्षे सज्जनगड येथे मासिकाचे संपादक. १८ पुस्तके प्रकाशित. ज्ञानेश्वरी, दासबोध, गीता यांवर महाराष्ट्र व बाहेर प्रवचने. समर्थ मासिकाचे समर्थ पुरस्कार १९९८ प्रदान.

'आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे
परमार्थ विवेका ।
येथे आळस करूं नका । विवेकी हो ॥'

श्रीसमर्थांच्या या वचनाप्रमाणे तंतोतंत आचरण व पालन करणारे स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतीच होत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रपंचातील कर्तव्ये पार पाडून संन्यास घेते वेळी त्यांनी आपल्या पत्नीची नुसती अनुज्ञा घेतली असे नाही तर त्यांच्या हयातीपर्यंत उत्पन्न मिळून त्यातून त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था केली.

मागील शतकात होऊन गेलेल्या रामदासी संप्रदायात श्रीचौंडे महाराज, श्रीगोंदवलेकर महाराज, श्रीमसुरकर महाराज, श्रीकेशवबुवा बोरगांवकर व प. पू. श्रीधर स्वामी ह्यांच्या प्रमाणे प. पू. प्रज्ञानानंद सरस्वती म्हणजेच ईश्वरदास रामदासी हेसुद्धा रामदासी संप्रदायाचे कार्य करीत होते. संन्यासापूर्वी स्वामी स्वतःला ईश्वरदास रामदासी म्हणवीत असत व त्या संप्रदायानुसार आचारधर्म पाळून त्यांनी आपल्या जीवनाचे सार्थक तर केलेच पण अनेकांना मार्गदर्शन करून सन्मार्गाला लावले. श्रीसमर्थ उक्तीप्रमाणे 'शहाणे करून सोडावे सकल जन' असे वर्तन त्यांनी आचरणात आणले. श्रीसमर्थांप्रमाणे त्यांचे वागणे अत्यंत शिस्तबद्ध, नियमित होते. कुठलीही गोष्ट उदाहरणार्थ लिहिणे, वाचणे, वागणे इ. उत्तम असावे यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या लोकांना ते नियमित दासबोध वाचण्यास सांगत असत. तसेच श्रीसमर्थ व त्यांच्या शिष्यांच्या उद्‌बोधक कथा पण सांगत असत.

श्रीसमर्थांनी ज्याप्रमाणे सबंध भारत पदयात्रा काढली त्याप्रमाणे स्वामीजी पण रामदासी संप्रदायानुसार पायी तीर्थयात्रा, कोरडी भिक्षा मागणे, हरीकथा निरूपण सतत करत असत. मुक्कामाच्या ठिकाणी दासनवमी उत्सव, दासबोध पारायण वगैरे कार्यक्रम आस्थेने साजरे करीत. अशाच एका उत्सव प्रसंगी 'समर्थ कल्याण' यांची काकड आरती केली. बऱ्याच वेळा ते सज्जनगडावर जात असत. सन १९२८ पासून स्वामींनी खऱ्या तळमळीने साधनेस सुरुवात केली. २२-२२ तास जप तसेच मनास केलेला बोध, श्रीरामाचा धावा, श्रीरामस्तुती, रूपवर्णनपर काव्ये आणि श्रीसमर्थांना उद्देशून केलेल्या प्रार्थना वगैरे वाचल्यावर श्रीसमर्थांचा स्वामींच्या जीवनावर केवढा ठसा पडला होता याची जाणीव होते. मनास केलेला बोध यात ते म्हणतातः–

मना मानव 'राम' हे नाम नित्य । मना मानी रे सर्व हे तू अनित्य ।
मना चिंतना श्रीहरीच्या करी रे । करी मुक्ती तेव्हा तुझी चाकरी रे ।१।
मना सर्वदा शं-करा आठवी रे । मना त्यामुळे वा विवेकासी विरे ।
जयाच्या मुळे या मनी राग जुरे । मुमुक्षत्व जेणे क्षणे प्राप्त हो रे ॥२॥
मना तुची रे सौख्य दुखासी हेतु । मना तुचिरे व्यर्थ चिंता वहातु ।
मना तुची रे स्थापिसी भेदभाव । मना तुचिरे दाविसी आत्मठाव ॥३॥

श्रीसमर्थांची करुणाष्टके व स्वामींचे प्रार्थनापर अभंग यातील भावना एकच आहेत. प्रथम 'हरीकथा निरूपण । दुसरे ते राजकारण । या श्रीसमर्थ ओवीप्रमाणे स्वामी देशातील लोकस्थितीबद्दल फार जागृत असत. काळाप्रमाणे राजकारण, समाजकारण करण्यासही सतर्क असत. रझाकार चळवळीच्या काळात त्यांनी 'मी संन्यासी असलो तरी हातामध्ये शस्त्र घेवून प्राणपणाने रझाकारांशी मुकाबला करून जनतेचे संरक्षण करेन' असे उद्‌गार काढले होते.

सन १९४६ मध्ये रझाकार चळवळ जोरात असताना लोकांवर होणारे अत्याचार पाहून स्वामींचे अंतःकरण कळवळत असे. त्या वेळी त्यांनी निर्मिलेले श्लोक त्यांची मनःस्थिती श्रीसमर्थांप्रमाणे कशी होती हे दर्शवितात. जसे

मिळे दुग्ध ना अन्न ना तेल खावे । अहो
राष्ट्र देवा कसे रे पहावे ।
बहु वाढला दंभ भक्ती न नावे । समर्था
गुरु धर्म रक्षार्थ धावे ।
शिवाजी ही कल्याण अक्कादी संगे । त्वरे घेवूनी आत्म भक्तांस वेगे ।
महाराष्ट्र देशी शरीरा धरावे । समर्था गुरो भूमिभारा हरावे ।
नको अंत पाहू अनादिन नाथा । करी घेवूनी राष्ट्र धर्मासनाथा ।
विनंती करी प्रज्ञ हा नम्र भावे । समर्था गुरो शीघ्र वा धाव धावे ।

श्रीसमर्थांप्रमाणे स्वामीजीही द्रष्टे होते हे त्यांच्या खालील ओवींवरून लक्षात येते. त्या काळातील परिस्थिती व आताची परिस्थिती यामध्ये (आपले राज्य असून) फारसा फरक नाही हे सिद्ध होते.

राजपुरुष हे फार मातले । लांच खाऊनी लोक भोंदिले ।
न्याय तुडविती सत्य पद तळे । व्यसन पान ते फार बोकाळे ।

याप्रमाणे त्यांच्या १९३० पासून पुढे स्वातंत्र्य मिळेपर्यंत श्रीस्वामींच्या जीवनावर, काव्यावर आणि वाङ्मयावर श्रीसमर्थांचा चांगलाच प्रभाव पडलेला दिसून येतो. या कालावधीत स्वामींची काव्यसंपदा अफाट असून त्यांत दासनवमी सोहळा वर्णन, दासबोधाची काव्यमय अनुक्रमणिका आहे. प्रभाते मनी राम चिंतित जावा या वचनाच्या श्लोकांचा हिंदी अनुवाद इत्यादींचा अंतर्भाव होतो.

साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपि मिळाले ।
अवघे मिळोन एकची झाले । देहातीत वस्तु ॥

असे श्रीसमर्थ रामदास म्हणतात. त्यानुसार संत जरी वेगवेगळ्या काळात जन्मले असले तरी समाजाचे प्रश्न साधारण सारखेच असतात व त्यावरील सगळ्या संतांची उपाययोजना सारखीच असते. त्यामुळे संतांच्या वाङ्मयात एक प्रकारचे साम्य आढळते. म्हणूनच स्वामी प्रज्ञानानंद आणि श्रीसमर्थरामदास यांच्या वाङ्मयात हे सारे ऐक्य आपणांस पहावयास मिळते.

श्रीज्ञानेश्वर महाराज, श्रीतुकाराम महाराज, श्रीएकनाथ महाराज व श्रीनामदेव महाराज यांच्या वाङ्मयाशी सुद्धा स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांची वैचारिक तार जुळलेली पहावयास मिळेल. हासुद्धा एक तौलनिक अभ्यासाचा सुंदर प्रकल्प होऊ शकेल.

श्री. सुनीलजी चिंचोलकर
अजिंक्य नगर, बी विंग, वृशाली हॉटेल लेन, हिंगणे खुर्द पोस्टापुढे,
सिंहगड रस्ता, पुणे ४११०५१.

प. पू. स्वामींची 'वेदस्तुति-प्रभाकर' टीका

डॉ. कल्याण काळे

एम.ए. (संस्कृत), एम.ए. (मराठी), पीएच.डी. (मराठी), [illegible]

वेदस्तुती आणि तिच्यावरील टीका

श्रीमद्‌भागवताच्या दशमस्कंधाच्या उत्तरार्धातील सत्त्याऐंशीवा अध्याय हा वेदस्तुती या नावाने ओळखला जातो. या अध्यायात साक्षात् श्रुतींनी परमेश्वर नारायणाची स्तुती केली आहे. भागवत हे पुराण नारायण विष्णूच्या भक्तीचा पुरस्कार करणाऱ्या भागवतपंथाचा एक प्रमुख ग्रंथ आहे. त्यात श्रीविष्णूचे व विष्णुभक्तीचे माहात्म्य सांगितले आहे. त्यामुळे वारकरी, महानुभाव, रामदासी, माध्व इ. सर्व वैष्णव पंथीयांचा तो आवडता ग्रंथ आहे. उत्तरेकडील चैतन्य संप्रदाय, रामानंदी संप्रदाय आणि सर्व कृष्णभक्तीत रमणाऱ्या पंथांनाही तो शिरसावंद्य आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य असे की, तो विष्णुभक्तीचे माहात्म्य सांगत असला तरी तो ऐकांतिक नाही. दक्षिणेकडील शैव आणि वैष्णव यांच्यातील जहाल वैरभाव इथे आढळत नाही. उलट इथे त्या दोहोंमधील समन्वयावर भर आहे. या ग्रंथात केवळ पौराणिक कथानके नाहीत तर त्याला एक तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. हा मूलतः अद्वैत तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारा ग्रंथ आहे. महानुभाव आणि माध्वमतानुयायी यांनी मात्र स्वसिद्धान्तानुसार त्याचा अर्थ लाविला आहे. पण भक्तीचे आकर्षण या सर्वच पंथांना सारखेच आहे. त्याशिवाय त्यामध्ये नीती, सदाचार, भूतदया इ. श्रेष्ठ मूल्यांचाही पुरस्कार आहे. त्यामुळे भारतातील अनेक पंथांना तो आदरणीय ठरला आहे.

भागवताची रचना इतर पुराणांप्रमाणेच महर्षी व्यासांनी केली, असे मानले जाते. पण त्याची भाषा बरीच क्लिष्ट व पांडित्यपूर्ण आहे. त्यामुळे भागवत हा ग्रंथ वाचताना प्रासादिक वाटत नाही. मोठमोठ्या विद्वानांनासुद्धा तो कठीण वाटतो. 'विद्यावतां भागवते परीक्षा' असे त्यासंबंधी म्हटले गेलेलेच आहे. त्याचा अर्थ लावण्यासाठी संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, तत्त्वज्ञानाची जाणकारी आणि बऱ्याचशा अप्रचलीत शब्दांना सामोरे जाण्याची तयारी याची अपेक्षा आहे. तो अर्थ लावण्यासाठी भागवतावर अनेक टीका लिहिल्या गेल्या आहेत. भागवत ग्रंथ तर कठीण आहेच. पण त्यातली वेदस्तुतीसारखी प्रकरणे फारच क्लिष्ट उतरली आहेत. वेदस्तुती हे प्रकरण सूत्रबद्ध ग्रंथाप्रमाणे अल्पाक्षर सारयुक्त आणि गूढ आशयाने समृद्ध आहे. त्यावरही श्रीधरी, चित्सुखी, शांकरी, शुकहृदया, प्रहर्षिणी, विजयध्वजा यांसारख्या अनेक संस्कृत टीका झाल्या. मराठीतील सुप्रसिद्ध वामन पंडितांची ही 'श्रुतिकल्पलता' या नावाची एक चांगली संस्कृत टीका आहे. मराठीतही दशमस्कंधावर टीका लिहिणाऱ्या सर्वच लेखकांनी या प्रकरणावर टीका लिहिल्या आहेत. त्यामध्ये शिवकल्याण, कृष्णदयार्णव यांच्या टीका स्वतंत्र ग्रंथरूपानेही प्रसिद्ध झाल्या आहेत. अलीकडे डॉ. द. गं. कोपरकर यांनी संपादित केलेली बहिरा जातवेदांची भागवती दशमस्कंधावर लिहिलेली भैरवी टीका प्रसिद्ध झाली आहे. तिच्यामध्येही या प्रकरणावर ८७५ ओव्यांची विद्वत्तापूर्ण टीका आहे. आधुनिक काळातही श्री. दा. यंदे, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी इ. नी भागवताचे संपूर्ण अनुवाद प्रसिद्ध केले आहेत. त्यातही या प्रकरणाचे अनुवाद उपलब्ध होतात.

प्रज्ञानानंद स्वामींची वेदस्तुतीवरील टीका

प. प. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी यांनीही दशम स्कंधातील ब्रह्मस्तुती, वेदस्तुती या प्रकरणांवर टीका लिहिल्या आहेत. त्यांची ब्रह्मस्तुतीवरील टीका स्वतंत्र ग्रंथ रूपाने प्रसिद्ध झालेली आहे. ती हिंदीतील दोहा, छंद, चौपाई इ. छंदात मराठीतूनच लिहिली आहे. वेदस्तुतीवरील टीका स्वामींनी चासकमान (जि. पुणे) येथील आपल्या वास्तव्यात इ. स. १९४६ मध्ये लिहिली. पण ती त्यांच्या समाधीनंतर जवळ जवळ १५ वर्षांनी म्हणजे इ. स. १९८३ साली पारडी (जि. बलसाड) येथून प्रसिद्ध होणाऱ्या पुरुषार्थ मासिकाच्या अंकातून क्रमशः प्रसिद्ध झाली. ऑगस्ट १९८० पासून ते सप्टेंबर १९८३ या कालावधीत ती कधी सलग, कधी खंडित स्वरूपात प्रसिद्ध झाली. तिचे मूळ हस्तलिखित आता उपलब्ध नाही. ते कुठेतरी गहाळ झाले आहे. तेव्हा पुरुषार्थ मासिकातील मुद्रित संहितेवरच आता अभ्यासूंना अवलंबून राहावे लागणार आहे. पण तीसुद्धा दुर्मिळ झाली आहे.

वेदस्तुतीचा भाग असलेल्या सत्त्याऐंशीव्या अध्यायात एकूण ५० श्लोक आहेत. त्यातील १ ते १३ हे श्लोक वेदस्तुतीच्या पार्श्वभूमीचे आहेत. १४ ते ४१ हे २८ श्लोक ही खरी 'वेदस्तुती' होय. ४२ ते ५० हे नऊ श्लोक समारोपाचे आहेत. प. पू. स्वामींनी समारोपाचे श्लोक वगळता बाकीच्या ४१ श्लोकांवर आपली टीका लिहिलेली आहे. प्रत्यक्ष वेदस्तुती असलेले १४ ते ४१ हे २८ श्लोक भागवतकारांनी नर्दटक अथवा नर्कुटक वृत्तात रचले आहेत. प. पू. स्वामींना हे वृत्त खूप आवडलेले दिसते. त्यांनी नंतर आपले 'अभिनव रामायण' याच वृत्तात रचलेले आहे. प्रस्तुत टीकेत मात्र त्यांनी हे वृत्त वापरलेले नाही. तिच्यासाठी त्यांनी निरनिराळ्या वृत्त, जाती आणि छंद यांची योजना केली आहे. प. पू. स्वामींच्या या टीकेचे नाव 'वेदस्तुति प्रभाकर' असे आहे. या टीकेचे लेखकाचे पद्यबद्ध हृद्‌गत (८५ ओव्या) + वेदस्तुतीच्या प्रास्ताविकाच्या १ ते १३ या श्लोकांवरील टीका (६२ पद्यरचना) आणि वेदस्तुतीच्या मूळ २८ श्लोकांवरील टीका (४४१ पद्यरचना) असे तीन भाग पडतात. संपूर्ण टीकेत एकूण ५८८ पद्यरचना आहेत. या पद्यरचनेचा 'प्राधान्येन व्यपदेशाः' या न्यायाने मी श्लोक असा निर्देश करत आहे. वास्तविक पाहता त्यांमध्ये श्लोकांच्या जोडीला मात्रानियत जाती, अक्षर संख्यानियत छंद, काही पदे

अशा विविध रचना प्रकारांचा समावेश आहे. वेदस्तुती प्रभाकर या ग्रंथातील ५८८ श्लोकांपैकी मला २९ व ३१ या श्लोकांवरची टीका म्हणजे संहिता क्र. १५९ ते १७१ व संहिता क्र. १९९ ते २२० असे एकूण ३५ श्लोक मला मिळालेले नाहीत.

स्वामींचे आरंभीचे हृद्गत

या टीकाग्रंथाच्या आरंभी स्वामींनी एक गद्य लेख विषय-प्रवेश म्हणून लिहिला आहे. या विषय प्रवेशामध्ये त्यांनी वेदस्तुतीत आलेल्या ६४ सिद्धान्तांची नोंद केली आहे. त्याच्यानंतर हे सिद्धान्त समजण्यासाठी वेदस्तुतीत ज्या सिद्धान्तांचे खंडन केलेले आहे त्या वैशेषिक, पातञ्जल, सांख्य, पूर्वमीमांसा, नैयायिक या दर्शनांच्या सिद्धान्तांचीही ओळख करून दिली आहे. या लेखामुळे वेदस्तुती समजायला मदत होते, हे निश्चित.

या विषय-प्रवेशानंतर प. पू. स्वामींनी 'लेखकाचे हृद्गत' या नावाचे ८५ ओव्यांचे प्रास्ताविक लिहिले आहे त्याकडे आपण येतो. हे प्रास्ताविक स्वामींची या टीकालेखनामागची भूमिका समजण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. यात स्वामींनी प्रथम त्यांचे सद्गुरु प. प. वासुदेवानंद सरस्वती (पोटे स्वामी अथवा अळ्याचे स्वामी) यांना वंदन केले आहे. त्यानंतर या टीकेच्या लेखनाचा काल सांगितला आहे. त्यांनी 'वेदस्तुति-प्रभाकर' हा ग्रंथ लिहिण्याची प्रेरणा शके १८६८ व्ययनाम संवत्सर ज्येष्ठ व. १५ (अमावस्या) रविवार रोजी सकाळी सूर्योदयाच्या वेळी झाल्याचे नोंदवले आहे. तो अनुभव सांगताना ते म्हणतात,

आत्मा म्हणजे दिवाकर । त्याचाच होता वासर ।
तोचि सर्व हृदयावर । प्रकाश-कर व्यापला ॥१०॥
तो हृदय-सागरी उगवला । इन्द्रिय तारागण लोपला ।
कामक्रोध उलूक निमाला । ध्वांत पळाला देशोधडी ॥११॥
प्रकाश अंबरी दाटला । न राहे तेथ साठविला ।
तो स्फूर्तिरूपे ओकावला । बाहेर आला काव्यरूपे ॥१२॥
तोच हा वेदस्तुति-प्रभाकर । पाडूनि प्रकाश भूळावर ।
तेथीचा अर्थबोध सुकर । करी मधुर काना-मना ॥१३॥

(लेखकाचे हृद्गत)

हा ग्रंथ स्वामींनी पुणे जिल्ह्यातील खेड (राजगुरुनगर) तालुक्यातील चास (कमान) या गावात लिहिला. ते म्हणतात,

माया महानदी भीमा । तेथ देव सोमेश्वर नामा ।
तीरी निवास चासग्रामा । पांडुरंगाश्रमा प्रगटला ॥१४॥

या वेदस्तुतीचे माहात्म्य सांगताना ते म्हणतात की, भागवत हा ग्रंथ वेदाच्या सारभूत अशा गायत्री मंत्राचा विस्तार होय. त्या भागवतामध्ये दहावा कृष्णचरित्राचा स्कंध अतिशय मधुर आहे. त्यामध्ये 'गर्भस्तुती' हे प्रकरण रम्य आहे. 'ब्रह्मस्तुती' हे प्रकरण सुरम्य आहे तर 'वेदस्तुती' हे प्रकरण परम रम्य आहे आणि ती सबंध भागवताचे सार आहे. स्वामींच्या मते भागवताचे सार पुढीप्रमाणे आहे.

ज्ञानावीण नव्हे मुक्ती । मिथ्या कोण म्हणेल उक्ती ।
परी ज्ञानाची कदा नोहे प्राप्ती । जोवरी चित्ती नसे उपरम ॥२६॥
म्हणोनी भगवत्कृपेवीण । ज्ञानसाधने वृथा शीण ॥२९॥
अर्थात् ईशभक्तीविण ज्ञान । कदापि नोहे हे सिद्धान्त वचन ।
वेदस्तुति वेदांचे मंथन । स्पष्ट करून प्रतिपादी ॥३०॥
तस्मात् भक्तीविण जे ज्ञान । ते केवळ लवण भक्षण ।
भक्ति तेही ज्ञानाविण । लवणावीण अन्न की ॥३१॥

उपनिषदांचेही हेच सार आहे, असे स्वामींनी निरनिराळ्या उपनिषदांचे संदर्भ देऊन स्पष्ट केले आहे. वेदस्तुतीचाही हाच आशय आहे. त्याचप्रमाणे सनकादिक, नारद, शुकाचार्य, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास या सर्वांचीही मते अशीच आहेत. ज्ञानाने मुक्ती प्राप्त झाल्यावर भक्तीचे प्रयोजन राहात नाही असे म्हणणाऱ्यांचेही स्वामींनी येथे युक्तिवादपूर्वक खंडन केले आहे. जीवन्मुक्ताच्या खाण्यापिण्याच्या संचार करण्याच्या क्रिया सगळ्या चालू असतात. मग तो भक्ती करतो यालाच तुमचा विरोध का? असा प्रतिप्रश्न त्यांनी केला आहे. गुंडाळून ठेवलेली चटई आंथरली असता जशी स्थितिस्थापकत्वामुळे परत गुंडाळली जाते तसे जीवन्मुक्त झाला तरी त्याच्या क्रिया चालू असतात. त्यामुळे भक्तीचे त्याला वावडे नाही. साधनभक्ती ही जशी आवश्यक तशी ही मोक्षोत्तर भक्तीही अपरिहार्य ठरते. या दृष्टीने वेदेश्वरीच्या एकवीस, तेवीस, चोवीस, पंचवीस आणि सत्तावीस या श्लोकांची स्वामींनी चर्चा केली आहे. त्यानंतर कर्मयोग असो, योगाभ्यास असो, ज्ञानमार्ग असो सर्वच मार्गांना भक्ती कशी आवश्यक आहे, हे स्वामींनी युक्तिवादपूर्वक सांगितले आहे. पण भक्तीही सद्गुरुवाचून प्राप्त होत नाही. सद्गुरुंचे माहात्म्य सांगताना स्वामी सांगतात,

पुढे भगवन्त कृपाबळे । सद्गुरु सोयरा मिळे
तेव्हा तद्भजनामुळे । ज्ञान निवळे अंतरी ॥६४॥
सद्गुरुवीण विविध साधन । करिता नोहे मनोनिग्रहण
सद्गुरु पंचाक्षरी भेटता जाण । पिशाच्च मन आवरी तो ॥६५॥

जो पर्यंत मनात विषयवासना असते, तोपर्यंत केलेली सर्व साधने दांभिक ठरतात. त्यामुळे वेदस्तुतीमध्ये मनातील काम समूळ उपटून टाका, असे सांगितले आहे. वेदस्तुती पुढे सांगते की, ज्ञानी माणसाला विधिनिषेध यांची बंधने लागू पडत नाहीत. पण

तरीही भक्त ज्ञानी । कर्म न करिती करूनी ।
विधि निषेध तिरस्करणी । तेही न प्रवर्तती संस्कार बळे ॥७०॥

ते कर्म करीत असले तरी त्यांची कर्मे करून न केल्यासारखी होतात. केवळ वळण पडले म्हणून ते कर्म करत असतात. ते विधिनिषेधांचा त्याग करत नाहीत. वेदस्तुतीच्या शेवटच्या श्लोकात वेदस्तुती सांगते की, जिवाशिवाच्या ऐक्याचे ज्ञान ब्रह्मदेवाने सांगितले तरी कळणार नाही. त्यासाठी अतन्निरास म्हणजे जे अनात्मस्वरूप आहे त्याचा निरासच व्हावा लागतो. असे हे अद्वैत सिद्धिविषयक ज्ञान हाच वेदस्तुतीचा मुख्य विषय आहे. ते :

प्राप्त होय शुद्ध चित्तासी । चतुर्विध साधन संपन्नासी ।
हरिगुरुपदी एकनिष्ठासी । अभेदभक्ति अभ्यासे ॥७३॥

अशा तऱ्हेने स्वामींनी या हृद्गतात वेदस्तुतीचे थोडक्यात सारच सांगितले आहे. त्याच्या समारोपात स्वामी विनयाने सांगतात की, वेदस्तुतीचे व्याख्यान करावयास लागणारी विद्वत्ता आपल्यापाशी नाही; परंतु रामरायाने आपल्याकडून ते काम करवून घेतले. ते म्हणतात :

नाही विदित वेदान्तशास्त्र । मीमांसादिकांचे नसता पात्र ।
वेदस्तुति दुर्बोध अतिमात्र । बुद्ध्यादि गात्र हालवी राम ॥७७॥
तेणेचि बुद्धीसी केले स्फुरण । वाचेसी आले बोलकेपण ।
हस्तांकडून हे लेखन । कर्ता जाण रामचन्द्र ॥७८॥
हा ग्रंथ त्यांनी आपल्या सद्गुरुंना अर्पण केला आहे.
कर्ता कर्मादि क्रिया करण । व्यंजनादि स्वर वर्ण ।
सकल एक सद्गुरु पूर्ण । तया अर्पण प्रभाकर ॥८५॥

या हृद्गतात प. पू. स्वामींनी वेदस्तुतीचा मुख्य आशय थोडक्यात सांगितला आहे. त्यामुळे ते महत्त्वाचे ठरते.

'वेदस्तुति-प्रभाकर'चे अंतरंग

'वेदस्तुती प्रभाकर' या टीकेची एकूण पद्यसंख्या ४४० इतकी आहे. मूळ संस्कृत संहितेचे टीकेसाठी विचारात घेतलेले श्लोक ४१ आहेत. त्या सर्वांचा क्रमशः परिचय करून देण्याचा या ठिकाणी उद्देश नाही. या टीकेचे स्वरूप समजावे एवढ्याच मर्यादित उद्देशाने काही वैशिष्ट्ये पुढे मांडत आहे.

स्वामींनी रचलेले संस्कृत श्लोक

ही सर्व टीका स्वामींनी मराठीत लिहिली असली तरी या टीकेच्या आरंभी स्वामींनी चार संस्कृत श्लोकांतून नमन केले आहे. पहिल्या श्लोकात श्रीरामचंद्राला वंदन केले आहे. राम हाच एकमेव परमेश्वर असून मायेमुळे तो भिन्न भिन्न भासतो. सर्व स्थिरचर विश्व त्याच्यापासून जन्म पावते, त्यातच वास्तव्य करते आणि त्यामध्येच त्याचा लय होतो. त्याची भक्ती करणाऱ्याला पुनर्जन्म प्राप्त होत नाही, असे त्याचे वर्णन केले आहे. दुसऱ्या श्लोकात सद्गुरुचरणांना वंदन असून आत्मसुख प्राप्त करून देतात, त्रिविध ताप नष्ट करतात आणि संसारभयाचे निवारण करतात, असे त्यांचे वर्णन केले आहे. तिसरा श्लोक कविकुलगुरु कालिदासाच्या रघुवंशाच्या पहिल्या श्लोकाची आठवण करून देतो. स्वामी म्हणतात,

क्वेयं वेदस्तुतिर्भास्वान् क्वेयं खद्योतवत् - कुधीः ।
प्रवेशिता तथाप्यन्तर्माञ्जा रामेण निर्भयम् ॥३॥

रामानेच आपल्या काजव्याप्रमाणे मंदतेज बुद्धीचा सूर्याप्रमाणे प्रखर तेजाने तळपणाऱ्या वेदस्तुतीच्या अंतरंगात प्रवेश शक्य केला आहे. चौथ्या श्लोकात असाच आशय आहे. दुर्बळ असला तरी राजपुत्रच राजाचा वारस होतो. त्याप्रमाणे माझ्या बालवाणीला रामाच्या कृपेनेच वेदस्तुतीचे विवेचन करण्यास सामर्थ्य प्राप्त झाले आहे.

या टीकेच्या समारोपादाखल स्वामींनी तीन संस्कृत श्लोक लिहिले आहेत. पहिल्या श्लोकात आपण मीमांसा, न्यायशास्त्र इ. चे अध्ययन केले नाही. तरीपण श्रीधरी टीकेच्या आधाराने आपण हे व्याख्यान करू शकलो, असे स्वामींनी म्हटले आहे. दुसऱ्या श्लोकात, सज्जनांनी या टीकेतील दोषांबद्दल क्षमा करून नीरक्षीर विवेकाने फक्त सार तेवढे घ्यावे अशी विनंती केली आहे. तिसऱ्या श्लोकात भवभूतीच्या 'जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्न;' या श्लोकचरणाची आठवण करून दिली आहे. मोहग्रस्त, दुराग्रही, कांचनकामिनी यांच्या मागे लागलेले, पाखंडवादी विचार मांडणारे, शब्द ज्ञानावरच भर देणारे, भक्तिपराङ्मुख आणि स्वतःला मुक्त आहोत असे मानणारे जे लोक आहेत त्यांच्यासाठी हा आपला प्रयत्न नाही, असे स्वामी सांगतात. या नमन आणि समारोपाच्या श्लोकांतून स्वामींचे संस्कृतवरील प्रभुत्व आणि संस्कृतचा व्यासंग यांचा प्रत्यय येतो.

स्वामींची रामभक्ती

या टीकेचे दुसरे वैशिष्ट्य असे की वेदांनी भगवान नारायणाची केलेली स्तुती असा वेदस्तुतीचा विषय आहे. पण प. पू. स्वामी रामभक्त असल्यामुळे त्यांनी वेदांची ही स्तुती प्रभु रामचंद्रांची मानली आहे. या वेदस्तुतीतील अनेक श्लोकांच्या टीकेच्या आरंभी आणि शेवटी त्यांनी त्या श्लोकाच्या आशयाशी सुसंगती राखून रामरायांची आळवणी केली आहे. प्रभु रामचंद्र त्यांना निर्गुण रूपातही जाणवतो तसाच तो सगुणरूपातही जाणवतो. स्वामींच्या ह्या आळवणीचे काही नमुने पुढे दिले आहेत.

१. जय जय रामा सगुण निर्गुणा । वेद तुला विनविती ।
वसुनि हृदयि जे बोलविती तें । वदतो वा प्राकृतीं ॥१॥

२. दुर्निवार भवचक्री, जीव तापडे ।
दुःखे अति भोगी, तो ताप सांकडे ॥
भक्ती तव रघुनाथा, एक साउली ।
वत्साती एक जशी गाय माउली ॥२३२॥

(श्लोक १९/३२ समारोप)

३. कृपालु रघुवीर तू मम मती किती सान ती ।
म्हणोनि तुझिया पदी, मृदु अतीव, शीले नती ॥
कळे न महिमा तुझा विधिहरादिका तेथ मी ।
किती; भजनि ठेवुनी, सकल दोष देवा शमी ॥७१॥

(श्लोक १०/२३ समारोप)

४. शास्त्री वाद नको, मनी कर नको, स्त्री संगती ती नको ।
देही प्रेम नको, मनी भय नको, लोकी प्रतिष्ठा नको ॥
भक्ती नाम वसो, हृदी पद लसो, चित्ती सुभक्ती हसो
संती नित्य वसो, कुसंग न असो, रामा ! कृपाही असो ॥९९॥

(श्लोक १२/२५ - समारोप)

५. श्रीशिव मानस हंसा, भास्कर वंशावतंस रघुवीरा ।
तव मायेचा सागर तरण्या दे शक्ति योग्य, बहु धीरा ॥४००॥

(श्लोक २५ (३८), समारोप)

६. तुझ्या स्वरूपी संत रामा । वृत्ति निर्मळा पडो ।
सुख दुःखांचे स्मरण कधीही चित्तासी ना घडो ॥
किंवा कीर्तनि, तव गुणगानी, प्रेमे बुद्धिहि जडो ।
पुरुषुनि कधिही बहिर्मुखाने, विषय मळे ना मळो ॥४२६॥

(श्लोक २७ (४० समारोप))

या सर्व श्लोकांतून स्वामींची ज्ञाननिष्ठ रामभक्ती दिसून येते. या सर्व श्लोकांचे एक स्वतंत्र स्तोत्र म्हणून स्वीकारायला हरकत नाही.

विविध वृत्तांतील पद्यरचना

या टीकेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिची पद्यरचना. स्वामींनी येथे विविध वृत्ते, जाती, छंद यांचा उपयोग केला आहे. आपल्याला येथे पतितपावन, समुदितमदना, पृथ्वी, गजल, दादरा, चंपकमाला, धवलचंद्रिका, तोटक, सारंग, प्रमाणिका, पंचचामर, आर्या, शिखरिणी, इंद्रवज्रा, शार्दूलविक्रीडित, भुजंगप्रयात, जीवकलिका, ओवी, हरिभगिनी अशा निरनिराळ्या वृत्तांचा उपयोग केलेला आढळेल. स्वामींची ही सर्व पद्यरचना प्रासादिक आणि प्रवाही आहे. त्यांचे वृत्तप्रभुत्व या पद्यरचनेतून सहज दिसून येते.

अध्यात्ममार्गातील गुरुभक्तीचे स्थान

श्रीरामाप्रमाणेच स्वामींची त्यांच्या सद्गुरुंवर नितांत भक्ती आहे. काही ठिकाणी तर ते सद्गुरु आणि राम यांमध्ये अभेदच मानतात. ते म्हणतात,

गुरु तोचि रामचंद्र । दोन्ही नामें सच्चिदानन्द मात्र
तेथे भेदाति अणुमात्र । ठाव नसे कालत्रयीं ॥७१॥ (हृद्गत)

वेदस्तुतीच्या २०(३३) या श्लोकातील 'व्यसन शतान्विताः समवहाय गुरोश्चरणं' या चरणावर भाष्य करण्याच्या निमित्ताने त्यांनी आपला गुरु या संस्थेबद्दलचा आदर प्रकट केला आहे. गुरु म्हणजे अज्ञानांधकाराचे निवारण करणारे, गुणातीत, अरूप असे निखळ ब्रह्मतत्त्वच होय (२३५-२३६) असे त्यांनी म्हटले आहे. गुरुच्या साहाय्यावाचून कोणतेही साधन व्यर्थच ठरते. म्हणून स्वामी म्हणतात,

म्हणुनी गुरुविण साधन करितां । दुःखा पार नसे ।
सार हे चि जा शरण गुरुपदी । सुख चित्ती विलसे ॥२४३॥

यानंतर स्वामींनी पाच आर्या लिहून त्यांच्या ओळींच्या आद्याक्षरांमध्ये 'श्रीवासुदेव गुरवे नमः' हा मंत्र गुंफून मोरोपंती पद्धतीची चमत्कृती साधली आहे. ही शब्दप्रधान चमत्कृती आवडो न आवडो, त्या निमित्ताने स्वामींनी आपल्या गुरुबद्दलची भक्ती प्रकट केली आहे, हे स्पष्ट दिसते. सूर्यामुळेच निर्माण झालेले ढग सूर्यास आच्छादून टाकतात, त्याप्रमाणे ब्रह्मापासून निर्माण झालेली मायाच त्याला झाकून टाकते. सद्गुरुंनी ज्ञानरूपी खड्गाने मायेचा निरास केल्यावरच ब्रह्माचा साक्षात्कार होऊ शकतो असे स्वामी सांगतात. शुकनलिका न्यायाने स्वतःला बद्ध समजणाऱ्या जीवाला सद्गुरुच सत्यज्ञान देऊन बंधनमुक्त करतात. सद्गुरु कल्पवृक्ष, कामधेनू, सम्राट यांच्यापेक्षाही श्रेष्ठ असून त्यांचा महिमा वर्णन करता येणे ही अशक्यप्राय गोष्ट आहे. सद्गुरु मिळणे ही अशक्यप्राय गोष्ट असली तरी रामाच्या अनुग्रहाने सद्गुरुप्राप्ती होऊ शकते असा विश्वास व्यक्त करून स्वामींनी आपली ही गुरुगीता समाप्त केली आहे.

परमेश्वराचे स्वरूप

वेदस्तुतीमध्ये ज्याची स्तुती केली आहे त्या परमेश्वराचे स्वरूप समजून घेणे महत्त्वाचे आहे. वेदस्तुतीने कुठेही त्याला ब्रह्म अशी संज्ञा दिलेली नाही. तरीसुद्धा त्याच्या निर्गुण स्वरूपाची वर्णने ब्रह्माच्या वर्णनाला तंतोतंत लागू पडतात. अर्थात निर्गुणाची ही वर्णने नकारात्मकच असणार हे उघड आहे. पण जेव्हा तो मायेचे आवरण स्वीकारतो तेव्हाच तो सगुण होतो आणि शब्दांनी वर्णन करण्यास योग्य होतो. वेदस्तुतीची जी पार्श्वभूमी सांगितली आहे तिच्यामध्ये राजा परीक्षितीने शुकाचार्यांना प्रश्न विचारला आहे. परमेश्वर जर तत्त्वतः निर्गुण आहे तर शब्दमय वेदाच्या वर्णनाला तो कसा समर्थ ठरतो? या प्रश्नाचे उत्तर वेदस्तुतीच्या अगदी पहिल्या श्लोकातच दिले आहे. परमेश्वर निर्गुण आणि निरुपाधिक असला तरी तो कधी कधी मायेचे आवरण स्वीकारतो व सगुण झाल्यासारखा वाटतो आणि त्यामुळे शब्दमय श्रुतींना त्याचे वर्णन करणे शक्य होते. ते वर्णन शब्दाच्या ठरीव अर्थानुसार सगुणाचे असले तरी त्यामुळे निर्गुणाचा बोध लक्षणेने होतो. परमेश्वर हा श्रुतींनी केलेल्या सगुण स्वरूपाच्या पलीकडचा आहे, असा बोध सहज होतो. सर्व ब्रह्ममयच असल्याने वेदाने केलेले कोणत्याही पदार्थाचे वर्णन, त्या पदार्थात ब्रह्माची व्याप्ती असल्याने पर्यायाने ब्रह्माचेच वर्णन ठरते. (श्लो.१५) एखाद्या व्यक्तीने मी पृथ्वीवर चालणार नाही असे म्हटले तर ते कधीतरी शक्य होईल काय? त्याप्रमाणे श्रुतींनी कितीही आपण ब्रह्माचे वर्णन करणार नाही असे ठरवले तरी त्या जे काही प्रतिपादन करतील ते पर्यायाने ब्रह्माचेच वर्णन ठरणार आहे. (श्लो.१५) विश्वातील सर्व पदार्थांमध्ये परमात्मा केवळ वास्तव्यच करत नाही तर तो त्यांचा नियामक पण आहे. महत्तत्त्वापासून जी सृष्टी निर्माण होते ती परमेश्वराच्याच सामर्थ्यामुळे होते. सृष्टीतील सर्व आकारात परमेश्वर प्रवेश करतो पण साकारांच्या उपाधींचा त्याला लेप लागत नाही. (१७) तो सर्वांचा आधार असून सर्व सृष्ट पदार्थ आधेय होत. आधेयाचा नाश झाला तरी आधाराचा होत नसतो. त्यानुसार सर्व सृष्ट पदार्थ नष्ट झाले तरी आधाररूप परमेश्वर शेषरूपाने शिल्लक राहतोच.(१७) परमात्म्याची उदर, हृदय, मस्तक इ. स्थाने कल्पून त्या त्या ठिकाणी त्याची उपासना करणारे आढळतात. पण त्यामुळे परमात्मा तीन प्रकारचा झाल्यासारखा वाटतो, उपाधिग्रस्त झाल्यासारखा वाटतो. पण परमात्मा कधीच उपाधिग्रस्त होत नाही. अग्नी जसा एकमेव असून सर्व प्रकारच्या काष्ठात राहतो तसा परमात्मा सर्वच ठिकाणी वास्तव्य करतो आणि त्याला उपाधींचा लेप लागत नाही.(१९) हा परमात्माच स्वतःचे मूळ आत्मतत्त्व स्पष्ट होण्यासाठी मत्स्यादी नाना अवतार धारण करतो.(२१) या परमेश्वराचे ज्ञान होणे अशक्य आहे. कारण सृष्टीतील सर्व जीवांच्या तो अगोदर होता आणि ते नष्ट झाले तरी तो असणार आहे. त्यामुळे सृष्टीतील सर्व जीव त्याच्यापेक्षा वयोमानाने लहान आहेत. तेव्हा परमात्म्याचे ज्ञान त्या कनिष्ठांना कसे होणार? (२४) ज्ञानाचे साधन जी शास्त्रे तीही परमेश्वराचे ज्ञान करून देण्यास समर्थ नाहीत. स्वामी म्हणतात,

ज्ञानाचे जे साधन ऐशा शास्त्रांतिही नसे ठाव ।
म्हणुनी श्रुतिसंघ वेद अनन्य शरणे धरी पदी भाव ॥८४॥ (श्लो.२४)

मूलतत्त्वाविषयीचे वाद

सृष्टीचे मूलतत्त्व कोणते आहे यासंबंधी शास्त्राशास्त्रामध्ये वाद आहेत. सृष्टी असत् तत्त्वापासून झाली, असे वैशेषिक मानतात. कार्याच्या उत्पत्तीपूर्वी ते नसते यालाच त्यागभाव म्हणतात. या त्यागभावालाच ते कार्याच्या उत्पत्तीचे कारण मानतात. पण हे मत श्रुतिविरुद्ध आहे. भगवद्गीतेतही नाऽसतो विद्यते भावः असे म्हटले आहे. पतञ्जलीचे अनुयायी म्हणजे योगदर्शनाचे अनुयायी असत असलेल्या जीवालाच योगामुळे ब्रह्मत्व प्राप्त होते असे मानतात. उदा. किमयेने तांब्याचे सोने होते. पण येथेही श्रुतिविरोध पडतो. 'ब्रह्म एव सन् ब्रह्माप्येति' असे श्रुतिवचन आहे. नैय्यायिक जग सत्य मानतात. या जगात ६ इन्द्रिये, ६ विषय, ६ इन्द्रियांचे ज्ञान, शरीर, सुख व दुःख अशी २१ दुःखे मानतात आणि या २१ दुःखांचा नाश म्हणजेच मोक्ष मानतात. पण ज्ञानाने ज्याचा नाश होतो ते कधीच सत्य नसते. ते रज्जुसर्पाप्रमाणे कल्पित, मिथ्या आहे. 'अनशिया (मामया) मुह्यमानः शोचति' असे श्रुतिवचन आहे. पूर्वमीमांसकही जगाला सत्य मानतात. यज्ञाने स्वर्गप्राप्ती होते. स्वर्गात दुःख नसते म्हणून स्वर्गप्राप्ती हाच मोक्ष असे ते मानतात. दुःखाचा त्यागभाव सांभाळणे, जतन करणे म्हणजेच मोक्ष अशी त्यांची धारणा आहे. पण स्वर्गसुख नश्वर आहे असे श्रुती आणि स्मृती स्पष्ट सांगतात. 'यथा इह कर्मचितः लोकः क्षीयते तथा स्वर्गादि लोकाः अपि' असे श्रुतिवचन आहे. 'आब्रह्म भुवनात् लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन' असे गीता सांगते. त्यामुळे इतर मते चुकीची आहेत असे वेदस्तुतीचे मत आहे.(२५)

जगाच्या स्वरूपाविषयीचे वाद

याचप्रमाणे जग हे सत्य की असत्य या संबंधीचे वाद आहेत. मीमांसक जगाला सत्य मानतात. वेद कर्माचे अनुष्ठान सांगतात. त्या कर्मामुळे

स्वर्गप्राप्ती होते, हे खरे आहे. स्वर्ग खोटा मानला तर वेदास मिथ्यात्व येईल, असे ते मानतात. जग सतापासून झाले. म्हणून जगही सत् मानावे लागते कारण, कारण व कार्य यात अभेद असतो असे ते सांगतात. स्वामींनी त्यांचे हे मत खोडून काढले आहे आणि ब्रह्म सत्य आणि जग मिथ्या या मताची स्थापना केली आहे.(३६) छत्तिसाव्या श्लोकाच्या टीकेत मीमांसकांच्या वरील मताचा खूप तार्किक प्रतिवाद केला आहे. शेवटी हे वाद निरुपयोगी असून भक्तीशिवाय तरणोपाय नाही असा निष्कर्ष काढला आहे. (२५,३६)

जीवस्वरूप

अविद्या काम्यकर्मे यांमुळे जीवदशा प्राप्त होते आणि कर्मानुसार जीवाला उत्तम, मध्यम देह प्राप्त होतात. वास्तविक पाहता जीवाला या उपाधी चिकटलेल्या दिसल्या तरी त्या काल्पनिक आणि भ्रममूलक असतात. विपरीत ज्ञानाचा अवलंब केल्यामुळे जीवाला जन्म, मृत्यू इ. विकार प्राप्त झाल्यासारखे वाटतात. पण सत्य ज्ञान होताक्षणीच तो त्यातून मुक्त होतो आणि परमेश्वरस्वरूपात विलीन होतो. खरे पाहता जीव हा परमात्माच आहे. जहदजहल्लक्षणेने जीवाचे परमेश्वरत्व सिद्ध करता येते. सूर्य आणि त्याचे डबक्यातील प्रतिबिंब या प्रमाणेच जीव परमात्म्याचे नाते आहे. परमेश्वर निरुपाधिक असतो. जीव उपाधिग्रस्त असतो. त्या उपाधि भ्रामक अज्ञानजन्य असतात. त्यांचा त्याग झाला की जीव हा परमेश्वरच असतो.(२०,२१) जीव हे परमेश्वराच्या मायेशी होणाऱ्या क्रीडेतूनच निर्माण होत असतात. पण परमेश्वर त्यांच्यापासून अलिप्त असतो. त्याला जीवांबद्दल आपपरभाव नसतो. जीव हे अविद्येच्या उपाधीमुळे निर्माण होतात. ते एक प्रकारे ईश्वराचेच अंश होत.(३०) अविद्या एक असेल तर एका जीवाच्या मोक्षाच्या वेळी तिचा नाश झाला असेल तर सर्व जीव आपोआप मुक्त होतील. अविद्या अनेक असतील तर जीव एकीपासून सुटला तरी इतर अविद्यांच्या उपस्थितीमुळे कधीच मुक्त होऊ शकणार नाही. जीव परमात्म्याचे अंश मानले ते नेहमीच एकदेशी राहणार. त्यामुळे सर्व देहाला प्रभुत्व कसे व्यापणार? जीव देह प्रमाण मानला तर तो साकार, सावयव आणि अनित्य असल्यामुळे सत् असू शकत नाही. म्हणून वैशेषिक जीव हे अनेक आहेत असे मानतात. अविद्या एक की अनेक, जीव एक की अनेक या प्रश्नाला वेदस्तुतीचे उत्तर अविद्या एकच असून ती एकच अग्नी भिन्न भिन्न काष्ठात वास्तव्य करतो त्याप्रमाणे सर्व जीवात राहते. जीव अनेक मानले तर युक्तिवादाला अडचण येत नसली तरी श्रुति वाक्याला त्याचा विरोध येईल. ते प्रतिबिंबच असल्यामुळे मूळ बिंबाला त्यामुळे हानी येणार नाही.(३०) नद्या जशा समुद्रात किंवा सर्व रस जसे मधात विलीन होतात. तसे अनेक प्रकारची नावे व गुण धारण करणारे हे जीव आपल्या नामगुणांसह परमेश्वराच्या निर्गुण रूपात लीन होतात.(३१) जीव हा केवळ उपाधिकृत असल्यामुळे उपाधी नष्ट झाल्यावर तो मुक्तच असतो. यालाच तो आपले उपाधिजनित वेगळेपण (जीवत्व) टाकून ब्रह्मरूपात विलीन होतो असे म्हटले आहे.

जीवाच्या मुक्तीचे भक्ती हेच खरे साधन

भागवत हा ग्रंथच मुळात भक्तिप्रधान ग्रंथ आहे. त्यामुळे त्यातील हे वेदस्तुतीचे प्रकरणसुद्धा भक्तिप्रधानच आहे. वेदस्तुतीची अशी धारणा आहे की जीवांना मानवी देह मिळाला तो परमेश्वराची त्याने भक्ती करावी म्हणूनच होय. पण दुर्दैव असे की जीव उपाधींच्या आधीन होतात आणि त्यामुळे भक्तिपराङ्मुख होतात. केवळ देहात्मवादी झाल्यामुळे ते संसारात यातना भोगत राहतात म्हणून त्यांचे कर्तव्य हे की त्यांनी असंभावना आणि विपरीत भावना यांपासून मुक्त होऊन सगुणनिर्गुण भक्तीच्याद्वारे आत्मस्वरूप समजून घ्यावे आणि संसार यातनातून मुक्त व्हावे.(२२) भगवत्कथा वाचत असताना असे लक्षात येते की जे फळ भगवद्भक्तांना परमेश्वरकृपेच्या रूपाने प्राप्त होते तेच फळ परमेश्वराच्या शत्रूंनाही प्राप्त होते. कामवासनेने प्रेरित झालेल्या गोपींना जे फळ प्राप्त होते तेच परमेश्वराची निष्काम भावनेने सेवा करणाऱ्या श्रुतींनाही प्राप्त होते. या गोष्टी वरवर पाहता खऱ्या वाटत असल्या तरी परमेश्वराच्या समत्वबुद्धीला कोठेही बट्टा लागत नाही. कारण ज्या शत्रूंना परमेश्वराच्या कृपेचा लाभ होतो त्यांचा परमेश्वराच्या भीतीमुळे का होईना, ध्यासच कारणीभूत होतो. तीच गोष्ट गोपींच्या कामभावनेतून निर्माण झालेल्या भक्तीची निमित्त का असेना, गोपी, शत्रू, अथवा श्रुती यांची भक्तिभावना अंतिम टप्प्याला निखळ स्वरूपाचीच असते. स्वामी म्हणतात,

कुणी लोभे, कुणी कामे । स्मरे द्वेषे कुणी तुजला ।
भये कोणीहि भक्तीने । तयांना लाभ तव अंती ॥७३॥
प्रभावा या तुझ्या स्मरणी । जना नाना श्रुती सांगे ॥
मनोवाणी न जाणति ते । कसे जाणे कुणी स्वमती ॥७४॥

(२३ व्या श्लोकाची टीका)

परमेश्वराचे ज्ञान ही फार कठीण गोष्ट होय. म्हणून स्वामी म्हणतात की 'सदा दे राम तव भक्ती । कुणा ज्ञाना नसे शक्ती ।' (६८) श्रुती सुद्धा हेच सांगतात.

'असे दुर्ज्ञेय तो सर्वा', श्रुती ह्या स्पष्ट की वदती ॥७७॥

(२३ वा श्लोक - टीका)

परमेश्वराच्या ज्ञानाची साधनेच परमेश्वराने ठेवली नाहीत. कारण त्याला जाणू शकेल असे कोणीच नाही. एकतर तो सर्व सृष्टी उत्पन्न होण्याच्या अगोदरपासूनचा आहे. मग त्याचा जन्म कुणाला कळणार? तसेच तोच साऱ्या विश्वाचा प्रलय करून अंती एकटाच राहतो. तेव्हा त्याचा अंत तरी कुणाला कळणार? म्हणून स्वामी म्हणतात,

भो भगवन्ता, जगती सर्वांपूर्वीच सिद्ध तू असशी ।
तुजनंतर जे झाले जन्मल्ये युक्त त्यां कसा कळसी ॥८०॥
उपसंहारहि करुनी, सर्वांचा जेधवा स्वये करिशी ।
तेव्हा ही जीवांना ज्ञानाची साधने न उरवीशी ॥८२॥
ज्ञानाचे जे साधन ऐशा शास्त्रांसि ही नसे ठाव ॥८३॥

या कारणांमुळे सगळे वेद परमेश्वरालाच शरण जाऊन भक्तीची कास धरतात.(२४)

वेदश्रुतीच्या सत्ताविसाव्या श्लोकाच्या टीकेत स्वामींनी भक्तीला विरोध असणाऱ्यांचा पूर्वपक्ष मांडला आहे. ज्ञान होणे म्हणजे असंभावना, विपरीत भावना यांचा नाश होणे. प्रत्यक्ष ज्ञान सोडून त्या पलीकडचा परमेश्वर नाहीच असे मानणे ही असंभावना आणि परमेश्वराच्या सत्तेने सर्व काही घडत असता ते नाकारून वेगळ्याच चुकीच्या कारणाला ते श्रेय देणे याला विपरीत भावना म्हणतात. दोरीच्या ठिकाणी साप भासणे ही विपरीत भावना होय. आता जाणकाराने सत्य परिस्थिती लक्षात आणून दिली आणि सर्पाचा भास नाहीसा झाला की ज्ञान झाले. तोच मोक्ष होय. ज्ञानानेच जर मोक्ष प्राप्त होत असेल तर मग भक्तीची गरज काय?

'ब्रह्म म्हणति ते असे चि साक्षात् अपरोक्षचि' हे श्रुती ।
महा वाक्य योगे ते होते, जैसे दशमाप्रती ॥१२२॥
म्हणूनि म्हणु की ज्ञानालाही, भक्ति-अपेक्षा नसे ।
तशी दावची श्रुती पहा की, भ्रामक मत हे कसे ॥१२३॥

(श्लोक २७)

यावर स्वामींनी जे उत्तर दिले आहे ते बिनतोड आहे. ते म्हणतात की, श्रवणाने जे ज्ञान प्राप्त होते ते शब्दज्ञान केव्हाही परोक्षच असते, म्हणून तर वेदामध्ये 'स एष आत्मा श्रोतव्यो निदिध्यासितव्यः' असे म्हटले आहे. केवळ शब्द ज्ञानाने ब्रह्मज्ञान होत नाही, तर त्याचे मनन, निदिध्यासन झाले पाहिजे आणि स्वामींच्या मते कोणत्याही गोष्टीचा निदिध्यास हा भक्तीवाचून शक्य नाही.

'श्रोतव्यो मन्तव्यो' श्रुति ही । निदिध्यास सांगे ।
निदिध्यास जरी अवश्य तरि मग, भक्तीही लागे ॥१३०॥

२७ वा श्लोक

त्याचप्रमाणे,

जन्मांतरि या जन्मी केल्या, दोषा निरसाया ।
ज्ञान एकले शक्त असे ना, भक्तीविण वाया ॥१३३॥

जन्मांतरीचे दोष निरसन करायला एकटे ज्ञान पुरेसे नाही. भक्ती नसेल तर ते विफल होय. तसेच,

दोषक्षयनिर्विण चित्त न होई, निर्मळ जाणावे ।
चित्तशुद्धिविण रामकृपा ती, कोणी ना पावे ॥१३४॥
झाला नाही प्रसाद जोंवरि रघुवर सदयाचा
साक्षात्कारा गगनकुसुमता सिद्धान्तचि साचा ॥१३५॥

(२७ वा श्लोक)

म्हणजे दोष नाहीसे झाल्याशिवाय चित्तशुद्धी नाही, चित्तशुद्धीवाचून रामाची कृपा नाही, रामाची कृपा नसेल तर साक्षात्कार ही आकाशाच्या फुलांप्रमाणे केवळ कविकल्पनाच ठरेल. तेव्हा भक्ती ही आवश्यकच आहे. वेदातही देव, त्याची भक्ती, याचे महत्त्व जागोजाग सांगितले आहे. भगवद्गीतेतही 'मद्भक्तः भव' 'भक्त्या मामभिजानाति', इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन' इ. वचने भक्तीची आवश्यकता सांगणारी आहेत. या श्रुति-स्मृति वचनांप्रमाणेच भारतातले सर्व संत एकमुखाने भक्तीचे माहात्म्य सांगत असतात. स्वामी म्हणतात,

भक्तिमहत्ता आवश्यकता, जाणे अनुभविता ।
विमानि बसल्याविण कळेना, काय लाभ होता ॥१४५॥
म्हणूनच समारोपात ते म्हणतात,
अन्य साधने सांडुनि अभेद भजनात चित्त रंगावे ।
मन गुण गरिमा गाता प्रेमरसी शान्तची तरंगावे ॥१५०॥

(२७ वा श्लोक)

दुर्निवार अशा भवसागरात जो जीव सापडतो, त्याला रामावाचून कोणीही त्राता नाही.(३२) आणि म्हणूनच पुढील समारोपाच्या श्लोकात स्वामी म्हणतात,

दुर्निवारभवचक्री जीव सापडे ।
दुःखे अति भोगी, तो ताप सांकडे ॥
भक्ती नव रघुनाथा, एक साउली ।
वत्साती एक जशी माय माउली ॥२३२॥

(३२ वा श्लोक)

तसे पाहिले तर स्वामींच्या टीकेत जवळ जवळ प्रत्येक श्लोकावरील विवरणात स्वामींनी भक्तीचे माहात्म्य गायलेले आहे. स्वतः स्वामी योगाभ्यासक होते, अतिशय बहुश्रुत होते. अनेक शास्त्रांचे जाणकार होते. सर्व विद्या त्यांना अगदी तळहातावरील आवळ्याप्रमाणे अवगत असाव्यात असे त्यांच्या सान्निध्यात आलेल्या प्रत्येकाला वाटत असे. या पार्श्वभूमीवर त्यांचा हा भक्तिमार्गाकडील ओढा लक्षणीय वाटतो. ते खऱ्या अर्थाने भागवतधर्मरहस्याचे जाणकार होते. भागवतधर्मात अद्वैत तत्त्वज्ञान आणि भक्तिसाधना यांचा सुरेख मेळ घातला आहे. महाराष्ट्रातील वारकरी पंथ, समर्थसंप्रदाय, उत्तरेकडील कबीर, तुलसीदास इ. श्रेष्ठ संत यांचीही या संदर्भात एकवाक्यता आहे. तेच संस्कार स्वामींवरही असल्याने त्यांनी त्याच संतांच्या उपदेशाचा पुनरुच्चार करावा यात आश्चर्य ते काय? सकृद्दर्शनी वेदस्तुतीची भाषा फार क्लिष्ट आहे. पण श्रीधर, वामन पंडित यांसारख्या 'शाब्देच परे च' निष्णात अशा भाष्यकारांच्या अथवा प्राकृतातील शिवकल्याण, कृष्णदयार्णव अथवा आजच्या काळातील प. प. प्रज्ञानानंद स्वामींच्या संगतीने ती वाचल्यास तिचे माधुर्य मनावर ठसते. बाहेरून खडबडीत अशा नारळाचे अंतरंग मात्र मधुर आणि निर्मळ असते तसे या वेदस्तुती प्रकरणाचे आहे. स्वामींनी ते अतिशय रसाळ भाषेत मांडून सर्वांची चांगलीच सोय करून ठेवली आहे.

डॉ. कल्याण वासुदेव काळे
ए ५, प्रज्ञानगड, दातार फार्म्स, वीटभट्टी मागे, नवश्या मारुतीची गल्ली,
सिंहगड रस्ता, पर्वती, पुणे ४११०३०.

॥ ॐ नमो भगवते शिवानंदाय ॥

ॐ मालतीदेवी

ऋषिकेश निवासी सन्यस्त योगी प. पू. शिवानंद सरस्वती यांच्या शिष्या. १९५६ मध्ये प. पू. स्वामी शिवानंद यांनी प्रथम भेटीत प्रसाद म्हणून स्वलिखित 'शिवानंद योगमयी' पुस्तक भेट दिले. त्यानुसार घरीच साधना सुरु केली. ध्यानात स्वामीजींचे मार्गदर्शन. १९६३ मध्ये निर्विकल्प समाधीचा अनुभव. पू. स्वामींच्या आदेशानुसार दिक्षा देण्यास सुरुवात १९१० साली ॐ मालती सर्वेश्वरी स्थापना. सद्गुरु इच्छेप्रमाणे १९१८ पासून विरत संन्यास. ह्यावर्षी ८१ व्या वर्षी सामर्थ्य अध्यात्मिक मार्गदर्शन.

आदरणीय कमलताई वैद्य यांनी. पूजनीय ब्रह्मीभूत श्री प्रज्ञानानन्द सरस्वती यांचे दोन अमोल ग्रंथ मला भेट दिले व त्यांचेवर चार शब्द मी लिहावे असे त्यांचे पत्र मला सौ. कमल थत्ते यांचेकडून मिळाले. इतके अवघड कार्य श्री. कमलताईंनी मला सांगितले की, जणू टिटवीला समुद्रप्राशन करायचे कार्य त्या मला सांगत आहेत असेच वाटले. पण त्यांना नाहीही म्हणवेना. आता ह्या रामचरितमानस सरोवरातला जो शिंपला उचलला त्यातला मोती अमोलच.

आम्ही वीस वर्ष उत्तर भारतात असलेने गोस्वामी तुलसीदासांचे श्री रामचरितमानस म्हणजे तिकडच्या लोकांचा आत्मारामच. कुठल्याही मंदिरात जा हे गोड महाकाव्य गायन तुमच्या कानांवर पडेलच आणि तुम्हीही त्याच तंद्रित पुढे चालत राहाल. कारण हे काव्य रामायणाचा गाभा आहे. गातच रहावेसे वाटते. महाराष्ट्रात आल्यावर तुलसी रामायणाची गोडी व ओढ कायम राहिली. पण सामुहीक आनंद घेता येत नव्हता. पण सत्य संकल्पाचा दाता परमेश्वर. काही वर्षांपूर्वी गोरे मंगल कार्यालयात स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींच्या शिष्य परिवाराचा सत्संग झाला. तेथे मला श्री. कमलताईंनी प्रवचन संपल्यावर हे मराठी रामकाव्य हाती दिले.

ते वाचले आणि खूप आनंद झाला. गोस्वामींचे कुठले? नि स्वामी प्रज्ञानानंदजींचे कुठले? असा प्रश्न पडला. चौपाही, दोहे, सोरठे, छंद नी चालही जशीच्या तशीच. संसारात राहून आत्मविद्येचा हव्यास असणाऱ्या साधकांना हा अनुभव येतोच म्हणून ह्या ओळी फार आवडतात.

वंदू संत असंत पदाही, दुःखदं उभय भेद परि काही
हरूनी वियोगी प्राणा नेती, एक मिलन दारूण दुःख देती

रामायण ग्रंथ हा महासागर नी तुलसीदासांचे तर मानस सरोवराचे मंथन. त्यामुळे ह्या महासागराला ना आदि ना अंत. पण ह्या रामायणाचे वैशिष्ट्य असे की कवीला ना त्यात दुःख दिसले ना कुणीही दुष्ट दिसले. कुठेही, कुणाची निंदा नाही. विवेक, वैराग्य, भक्ति, प्रेम, माधुर्य, नीती, धर्म, कर्तव्यपरायणता, त्यागाची परिसीमा ह्यातून ज्ञानाशिवाय दुसरे काही दिसतच नाही. हे काव्य महासागर मंथन करून काढलेला अमृतकलशच आहे आणि तो ही आपल्या महाराष्ट्रात हा अमृत कलश. त्यातला एकही थेंब न सांडता आम्हाला लाभला. थोर उदार भक्त कृपानिधान स्वामी प्रज्ञानानंदांनी आम्हाला दिला. त्यांच्या चरणाला कोटी कोटी प्रणाम. स्वामीजींनी सुरुवातीलाच आरती नी समाप्तीचे चार शब्द नव्हे अनमोल हिरे आम्हाला दिलेत. त्यांचे मनन करण्यातच आम्ही ज्ञानमग्न होऊन जातो.

हरि ॐ तत् सत् ।

आता प. पू. स्वामी प्रज्ञानानंदांची संगीत समश्लोकी गीता हे ही अप्रतिम काव्य जणू अंधाऱ्या मनाच्या खोलीत ते ही अज्ञानी मानवाने चाचपडत राहावे. हताश व निराश व्हावे, अशा अज्ञान रात्रीच्या अंधारात जणू मध्यरात्री सूर्यप्रकाश प्राप्त व्हावा तसे. भगवत गीता श्रीकृष्ण योगेश्वर भगवान सांगणारे. ऐकणारा त्यांचा सखा अर्जुन, अशांवर चार शब्द मी काय लिहावे? एखादी स्त्री प्रथम सासरी गेल्यावर प्रथम स्वयंपाक करते, त्या वेळी ती हळूच चमच्याने दोन थेंब प्रत्येक पदार्थ चाखून पहाते. चव कळते. पण पोट कुठे भरणार? तसा माझा गीतेचा अभ्यास शून्य. मी ती चाखली प...पण शब्दाचा कीस काढून वाचली नाही. मराठीत आता ती सुलभ करून हा प्रसाद स्वामींनी सर्वांना मुक्त हस्ते वाटला आहे. सर्वांना तो सेवन करता येईल. तो प्रसाद खायला सोपा आणि जाणायला, पचवायलाही सोपा असा आम्हा सर्वांना दिलाय. पण थोडी थोडी गीता चाखली नी बापरे ! कुठे कुरुक्षेत्र आणि धर्मक्षेत्रावरच असे घनघोर महायुद्ध विचारच करवेना म्हणून सर्वधर्म परित्याज्य सर्वज्ञान संपन्नता परित्याज्य करून स्वस्थच बसले.

गुरु शरणम् हरि शरणम् करत अस्तु.

ॐ मालती देवी

भावफुले

स्वामी प्रज्ञाना, अजि माझ्या, पुरवी लेखनछंदा
लेखन घडवोनी, मजहाती, देइ क्षणी-आनंदा ॥धृ.॥

जाणसि वेदांता, वदलासी, म्हणोनिया गीतार्था
तशीच समजावी, साहस्त्री गीता जशि रे पार्था ॥१॥

लेखनबंध असे, मजसाठी, गुरुशिष्यांची गोठी
त्याने साह्य करो, जगजेठी, कृपा तुझी रे मोठी ॥२॥

देई स्फूर्ति अता, हलवि मला, तुझ्याविना ना कोणी
दधिमंथनाविणा, मेळविणे, शक्य असे का लोणी ॥३॥

करुणासागर तूं, मस्तकिरे, वरदकरा धरि आजी
अंजलि वाहतसे, भावफुले, तव चरणी रे ताजी ॥४॥

सौ. मनीषा अभ्यंकर, मिरज.

श्रीमद्भगवद्गीता - संगीत समश्लोकी

डॉ. सौ. सुमती देशपांडे

एम.ए. (मराठी) एम.एड. पीएच.डी. [illegible]

प्रास्ताविक

ईश्वर कृपेने प्रत्येक व्यक्तीची इंद्रियशक्ती निरपवादरीत्या समान आहे. तरीही प्रत्येकाची कार्यक्षमता भिन्न असते. कारण व्यक्तिशी निगडीत अन्य घटकांच्या अनुकूलतेनुसार त्याचे क्रिया सामर्थ्य बदलते. सुसाधनांची उपलब्धता, इच्छा, इच्छाशक्ती, स्वास्थ्य, कल्पकता, सृजनशीलता, सकारात्मक दृष्टिकोन, वेळेचे नियोजन अशा निरनिराळ्या घटकांचा कार्यक्षमतेशी थेट संबंध आहे आणि त्यांना नियंत्रित करणारा व्यक्तीचा स्वभाव ! केवळ या सर्वांची उपलब्धता असून उपयोग नाही तर योजकताही असावी लागते.

'बुद्धिः पश्यति या भावान् बहुकारण योगजान् ।
युक्तिः त्रिकाला सा ज्ञेया ॥'

बुद्धीला विविध गुणांचे उपयोजन करता आले पाहिजे. शिवाय व्यक्तीची अभिरुची आणि त्याचे कार्य, व्यवसाय यांचा मेळ असला, तर कार्यक्षमता अधिक दिसून येते. अशी कार्यक्षमता लाभलेले स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती - महाराष्ट्राचे तुलसीदास यांच्यामध्ये सर्वश्रेष्ठ भक्तीभावना, भक्तीच्या आधारे गृहस्थधर्म आणि परमार्थ साधना यांचा मनोज्ञ संगम आढळतो. साधी, सरळ भाषा, युगानुयुगे अजेय राहिलेली, भारतीय संस्कृतीतील उदात्त मूल्यांचे सारसर्वस्व असलेली स्वामींची ग्रंथसंपदा अभ्यासल्यानंतर पूर्वाश्रमी सर्वसामान्य शिक्षक असलेले, आयुष्याच्या उत्तरार्धात 'प्रज्ञानानंद सरस्वती' कसे झाले याचे गूढ उकलते. पूर्वाश्रमी तत्त्वनिष्ठ असलेल्या या शिक्षकाचे बहुविध व्यासंग, सद्गुरु निष्ठा, परिश्रमशीलता, अनन्य रामभक्ती हे बळ होते. गोस्वामी तुलसीदासांवर त्यांची कमालीची श्रद्धा होती. लेखन प्रवचनांच्या मार्गाने त्यांनी समन्वयशील रामभक्ती परंपरेचा वारसा मराठी माणसाला दिला. शास्त्राचा कोठेही अपलाप न करता, लोकरंजन किंवा बुद्धिभेद न करता अनेक अनुभवसिद्ध उदाहरणे देत सामान्यजनांच्या शंकांचे साधार निराकरण करीत आपल्या वाङ्मयाला एक वेगळे परिमाण प्राप्त करून दिले. याखेरीज श्रीगुरुगीता प्रबोधिनी, ब्रह्मस्तुती, श्रीमद्भगवद्गीता समश्लोकी, वेदस्तुती कीर्तन प्रभाकर, वेदस्तुती कीर्तन भास्कर, भगवत्गीता कीर्तन तरंगिणी, परमामृत प्रकाश या ग्रंथांची निर्मिती केली. याखेरीज स्वामींचे अप्रकाशित वाङ्मयही विपुल आहे. यामध्ये अभंग, आरत्या, अष्टके, स्तोत्रे, भूपाळ्या, अनुवादीत काव्य, आख्यानकाव्य, संस्कृत, हिन्दी रचना यांचाही अंतर्भाव आहे. त्यांनी साधकांना लिहिलेल्या असंख्य पत्रांतून स्वामींचे प्रबोधनकर्त्याचे, परमार्थमार्गावरील पथदर्शकाचे, धवलरूप प्रकट होते. गुरुआज्ञेनेच एका हिन्दी ग्रंथाचा स्वीकार करून त्याला समग्र अभ्यासविषय बनवून 'महाराष्ट्राचे तुलसीदास' च ते झाले.

स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींचे चरित्र

स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींचे मूळ नाव श्री. दत्तात्रय नारायण कर्वे ! कर्वे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील, दापोली तालुक्यातील 'गिम्हवणे' गावातील गार्ग्य गोत्रीय त्रिप्रवरी चित्तपावन कोकणस्थ ब्राह्मण ! स्वामींचे पणजोबा श्रीधर कर्वे यांनी आपल्या भावाच्या मुलास - 'गोविंद' यास दत्तक घेतले. हे स्वामींचे आजोबा ! कोकणातील एकंदरीत मंदावलेली प्रगती, कुटुंबाची आर्थिक पिछेहाट यामुळे स्वामींच्या आजोबांनी 'गिम्हवणे' सोडले आणि ते बेलापूर गावी रहाण्यास आले. त्यांना हरी, नारायण व केशव असे तीन मुलगे झाले. पैकी नारायण हे दत्तात्रयांचे वडील ! ते शिक्षक, धार्मिक वृत्तीचे आणि संत वाङ्मयाची आवड असलेले होते. स्वामींचा जन्म १५ मे १८९३ रोजी पालघर तालुक्यातील 'माहीम' या गावी झाला. गोड आवाज, संगीताची जाण बालवयातच असल्यामुळे ते वडिलांना कीर्तनात साथ करीत. त्यांचे प्राथमिक शिक्षण बेलापूरमध्ये झाले. माध्यमिक शिक्षण मुरुड-जंजिरामध्ये झाले. महाविद्यालयीन शिक्षण बडोदा येथे झाले. वयाच्या तिसाव्या वर्षी शिक्षण पूर्ण झाले. त्यांनी काही वर्षे माध्यमिक शाळेत शिक्षकाची नोकरी केली. पण तत्त्वांसाठी नोकरीत कोणतीही तडजोड केली नाही. लाचारी न पत्करता निस्पृह वृत्ती आणि लोकमान्य टिळकांचा बाणा त्यांनी अंगिकारला. इ. स. १९१५ मध्ये त्यांचा विवाह झाला. टिटवाळा तालुक्यातील चौकचे श्री. रा. जोशी यांची कन्या द्वारका ही त्यांची पत्नी. त्यांच्या पहिल्या अपत्याचा जन्म मृतावस्थेत झाला. दुसरा मुलगाही फार काळ जगला नाही. अत्यंत स्थितप्रज्ञ वृत्तीने ते सर्व घटनांना सामोरे गेले. सांसारिक अडीअडचणी, पुत्रनिधन यापेक्षाही सद्गुरुची ओढ, परमार्थाची उत्कट अभिलाषा, नामजपाची अनुष्ठाने यामध्ये स्वामी व्यग्र असत. इ. स. १९३५ मध्ये त्यांनी आपल्या पत्नीला 'मंत्रदीक्षा' दिली. चतुर्थाश्रम स्वीकारताना त्यांनी पत्नीची अनुज्ञा तर घेतलीच; पण तिच्या चरितार्थाची सोयही केली. गृहस्थाश्रमात गीतापठण, स्नान-संध्या, पूजाअर्चा, जप-जाप्य असे काटेकोरपणाने ते आपले जीवन आचरीत असत. इ. स. १९२९ मध्ये श्रीधरस्वामी बिडवाडीकर उर्फ रावजी बुवा यांच्याशी त्यांचा परिचय झाला. त्यांच्या मठात स्वामींना 'राममंत्र' आणि साडेतीन कोटी जप करण्याची आज्ञा मिळाली. इ. स. १९३० मध्ये तारापूर येथील बाबा गंगादास यांचेशी त्यांचा परिचय झाला. सत्‌शास्त्र श्रवणाबरोबरच कीर्तन-प्रवचनाच्या अनुषंगानेही 'रामभक्ती'चा स्वीकार केला. इ. स. १९५३ मध्ये त्यांनी श्रीरामचरितमानस स्वहस्ते लिहिले. ग्वाल्हेर संस्थानातील एका गावी जन्मलेल्या बाबा गंगादास यांनी स्वामींना अनुग्रह दिला. त्यानंतर इ. स. १९४३ मध्ये संन्यासाश्रम स्वीकारल्यानंतर आळे येथील वासुदेवानंद सरस्वती - पोटे स्वामी यांच्याकडून स्वामींनी दंडग्रहण केले. स्वामींच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होण्यात दोन्ही सद्गुरुंचे योगदान फार मोठे आहे. स्वामींचे मराठी, हिन्दी, इंग्रजी, संस्कृत, गुजराथी या भाषांवर प्रभुत्व होते. शिस्तबद्धता त्यांच्या अभिजात शिक्षकी वृत्तीतच होती. चमत्कारांना त्यांनी कधीच वाव दिला नाही. सिद्धावस्थेनंतरच्या त्यांच्या

जीवनात, त्यांच्या प्रकाशित आणि अप्रकाशित वाङ्मयाची भरपूर भर पडली. त्यांनी लोकसंग्राहकाची भूमिका घेऊन 'अनुवाद' या तंत्राचा वापर केला. संस्कृतमधील अनेक रचनांचे सुलभीकरण केले. प्रत्येक संस्कृत ग्रंथ प्राकृतामध्ये आणण्याचा ध्यास घेतला. 'प्रवचनांचा' अंगिकार केला. लोकभाषेच्या माध्यमातून अध्यात्म विचारांचे भांडार त्यांनी रामकथेद्वारे लोकांपर्यंत पोहोचविले. त्यांचे बहुतेक साहित्य प्रवचनकार, कीर्तनकार यांना मार्गदर्शन करणारे आहे. स्वामी स्वतः शिस्तप्रिय, आत्मसाक्षात्कारी, सत्पुरुष होते. अनेक लोकांना वेगवेगळ्या उपासना पद्धती त्यांनी दिल्या. दैनंदिन जीवनातील सात्त्विक आचारविचारांचा महामंत्र त्यांनी आपल्या आचरणाद्वारे लोकांच्या ठायी रुजविला. हे सर्व करीत असताना हिंदुत्वनिष्ठाही त्यांनी जपली. पण कोठेही मठ किंवा संप्रदाय उभारणीचा अभिनिवेश त्यांच्या ठायी आढळत नाही. स्वामींचा योगाभ्यासही दांडगा होता. स्वामींनी आपल्या साधकावस्थेमध्ये साडेचार कोटी नामजप केला होता. गुरु अनुग्रहापूर्वीच नामजपाने त्यांना कुंडलिनी जागृती आणि योगमार्गातील दिव्य अनुभव येत असत. स्वामींचे सिद्धावस्थेनंतरचे जीवन लेखन, व्यासंगात, रामचरितमानसाच्या प्रचारात, परमार्थमार्गावरील पथप्रदर्शकांची भूमिका निरपेक्षपणे पार पाडण्यात, व्यतीत झाले. इ. स. १९६६ पासून त्यांच्या मनात 'प्रायोपवेशन' करण्याचे विचार येऊ लागले. १५ मार्च १९६८ पासून त्यांनी प्रायोपवेशनास प्रारंभ केला. मुंबई, खेड, कल्याण, उमरगा, सांगली, माधवनगर, इस्लामपूर, अहमदनगर अशा ठिकाणच्या परिचितांना, शिष्यांना त्यांनी पत्रे पाठविली. देहत्यागानंतरच्या अनेक गोष्टींचा शास्त्राधारे निर्देश करून मृत्यूपत्रासारखे व्यवस्थापन, वस्तूंची क्रमशः नोंद केली. या कालावधीत त्यांचे वास्तव्य परांडा येथील नानासाहेब देशमुख यांच्या घरी होते. २३ मार्च १९६८ फाल्गुन वद्य दशमी या दिवशी स्वामींनी पार्थिव देहाचा त्याग केला.

सांगितिकता

संगीतासारख्या श्रेष्ठ दर्जाच्या, दैवी आणि पवित्र कलेची स्वामींची निश्चित उपासना असावी असे म्हणता येते. त्यामुळेच या कलेतील राग, चाली, लय, ताल या संकल्पना त्यांच्या वाङ्मयात बऱ्याचदा आढळतात. 'श्रीमद्भगवद्गीता कीर्तन तरंगिणी' 'श्रीमद्भगवद्गीता संगीत समश्लोकी' 'वेदस्तुती कीर्तन भास्कर', 'वेदस्तुती कीर्तन प्रभाकर' ही पुस्तके या वाङ्मयीन विशेषासाठी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. स्वामींचे संगीत विषयक जाणतेपण दिसून येते. त्यासाठी त्यांना चासकमान येथील संगीत तज्ज्ञ व गवई समजल्या जाणाऱ्या गृहस्थांची मदत होत असे. प्रत्येक तरंगाच्या आरंभी गीताश्लोकावरील समश्लोकी 'पंचतुण्डनररुण्डमालधर' किंवा 'मित्रा मम जन्म कथा पुसिली का तिने' या चालीवर लिहिली आहे. प्रारंभीच्या निवेदनात संगीतातील अठरा रागांचा निर्देश केला आहे. प्रारंभी कल्याण, यमन कल्याण सारखे पूर्वरात्रीचे राग आणि शेवटी मालकंस, भूप, भैरवी यासारखे उत्तर रात्रीचे राग आढळतात. गायनाच्या अनेक शैली असतात. त्यासाठी वेगवेगळे ताल असतात. गीत, वाद्य, नृत्य यांच्या गतीचे नियमित प्रमाण या तालांच्या योगे दाखविले जाते. साधारणपणे असे एकोणीस ते वीस ताल प्रचलित आहेत. यापैकी दादरा, झपताल, धुमाळी, त्रिताल, एकताल यांचा वापर 'कीर्तन तरंगणीत' केलेला दिसतो. 'वेदस्तुती कीर्तनभास्कर' मध्ये अशाच प्रकारच्या चाली, राग, ताल यांच्या नोंदी आहेत. श्रीरामाच्या आरतीला स्वामी 'भुवन सुंदराची' चाल देतात. वेदान्तपर भूपाळीला 'पंचतुण्डनररुण्डमालधर' हीच चाल देतात. सद्गुरुवंदनासाठी 'त्रिताल' किंवा 'पंचपदी' ताल सुचवितात. संगीताच्या ज्ञानाखेरीज हे येणे अशक्य आहे. आजही साधकांची जी शिबिरे घेतली जातात त्यामध्ये श्रीमद् भगवद्गीता समश्लोकी व 'मानसानुवादा'चे पारायण करताना श्रवणीय चाली लावलेल्या आढळतात. त्यातील ठेकासुद्धा श्रवणीय असतो.

श्रीमद्भगवद्गीता (संगीत समश्लोकी)

भारताच्या इतिहासात जे नवनवीन विचारप्रवाह धार्मिक, तात्त्विक, संप्रदाय निर्माण झाल्याचे दिसते, त्या सर्वांचे मूळ 'भगवद्गीता' असल्याचे मानले जाते. अठरा अध्याय असलेल्या या ग्रंथांमध्ये भारतीय धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक इतिहासाचे सार सामावलेले आहे. उपनिषदे आणि ब्रह्मसूत्रे या दोहोंच्या बरोबरीने जनमानसात भगवत्गीतेचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. भारतातील तसेच पाश्चात्य देशातील विचारवंतांनाही गीतेविषयी आकर्षण वाटलेले आहे. मराठी भाषेत तर सर्वाधिक ग्रंथ गीतेवर झालेले आढळतात. त्यामध्ये श्रीसंत ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', दासोपंतांची 'गीतार्णव', वामन पंडितांची 'यथार्थ दीपिका', तुकारामांची प्रसिद्ध झालेली 'मंत्रगीता', लोकमान्य टिळकांचा 'गीतारहस्य' हे ग्रंथ सर्वश्रुत आहेत. या टीकात्मक, विवेचनात्मक, ग्रंथाप्रमाणे गीतेचे समश्लोकी अनुवादही मराठीमध्ये उपलब्ध आहेत. ज्यांना संस्कृत भाषा अवगत नसते त्यांना मूळ गीतेचा आस्वाद घेता यावा म्हणून विनोबा भावे यांची 'गीताई', बाबा गर्दे यांची 'शतामृतपदी' स्वरूपानंदांची 'भावार्थ गीता' मराठी भाषेत लिहिल्या गेल्या. अलीकडेच पुणे येथील श्री. वि. रा. साठे यांचेकडे भगवत् गीतेचे प्रकाशित-अप्रकाशित असे १०३ पद्यानुवाद उपलब्ध आहेत. यामध्ये 'अभंग', 'आर्या', पासून 'सवाई' पर्यंत विविध काव्यप्रकार आहेत. यापैकी ७८ पद्यानुवाद मराठीत आहेत.

स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांनी लिहिलेले पुस्तक इ. स. १९४९ मध्ये श्रीरामचरितमानसप्रेमी मंडळाने डोंबिवली येथे प्रकाशित केले. यामध्ये डाव्या बाजूस मूळ गीता आणि उजव्या बाजूस त्याचे संगीत समश्लोकी रूपांतर आहे. सातशे श्लोकांना सातशे पर्यायी श्लोक आहेत. संगीताच्या चाली कंसांमध्ये निर्दिष्ट केलेल्या असून त्या परिचित आहेत. प्रारंभीचे शार्दूलविक्रीडीत आणि आर्या वृत्तातील श्लोक यातून प्रज्ञानानंद सरस्वतींचे हृदगतच उलगडून दाखविले आहे. थोडक्यात गीतेमधील विषयच त्यांनी स्पष्ट करून दाखविला आहे. 'भगवत्गीता शिकवण आचरणी

'ज्या दिनीं जगीं पसरे ।
तद्दिनीं दैन, दुराशा, दुर्जनता, दुःख, दोष, ताप सरे ॥'

असा विश्वास त्यांनी प्रकट केला आहे. भगवत्गीतेचा दैनंदिन जीवनातील अभ्यास हेही लेखनामागील कारण आहे. सर्वच संतपुरुषांशी मिळती-जुळती असलेली प्रभुप्रेरणा प्रज्ञानानंद सरस्वतींच्या सगळ्याच लेखनामागे असलेली दिसते.

'मानोनि भगवंत सांगति - करी गीतानुवाद असा ।
चिंतुनी रघुनाथ पादकमला प्रज्ञा लिही पंचसा ।'

कोणत्याही भाषेतील काव्याचा समच्छंद अनुवाद करताना अनुवादकाला अनेक अडचणी येतात. संस्कृत भाषेतील काव्याचा अनुवाद करताना मूळ शब्दाला पर्यायी शब्द योजणे मोठ्या कौशल्याचेच काम असते. प्रज्ञानानंद

सरस्वतींनी 'समश्लोकी' मध्ये ते नेटकेपणाने बजावले आहे. उदाहरणार्थ :

'वासांसि जीर्णानि यथा विहाय, नवानि गृण्हाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥
अनुवाद : जैसी वस्त्रे जीर्ण टाकुनी धारण पुरुष नवी करितो ।
तशी शरीरे जीर्ण सोडुनी देही नूतन की धरितो ॥
नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥

अनुवाद : शस्त्रें यास न तोडिति, अग्नी यातें दहन कधी न करी ।
जळ ही भिजवू शके न याला वायू न सुकवू शके तरी ॥
'यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत...
अनुवाद : कारण धर्मग्लानि भारता, जेव्हा जेव्हा या लोकी ।
अधर्म-वृद्धी तशीच होता, स्वयें निर्मितो आपणां की ॥
साधुजनांना संरक्षाया आणि दुर्जना निवराया ।
धर्मस्थापना करावया मी प्रतियुगीं संभवतो सखया ॥

यातील प्रत्येक चरणात आणि चरणपादात प्रत्येक जागी समाक्षरांनी ठेका साधलेला आहे. 'अर्जुना'साठी योजलेला 'सखया' शब्द काव्यामध्ये अधिकच माधुर्य आणतो. मात्र काही संस्कृत शब्दांना समानशब्द मिळण्यास अवघड गेलेले आहे. उदा. क्लीबता, विमर्दक, रुधिर, वार्ष्णेय, चिद्‌भानु, चिद्‌भक्ति इत्यादी.

प्रज्ञानानंद सरस्वतींची ही संगीतातील तालबद्ध केलेली मराठीत अनुवाद केलेली समश्लोकी गीता प्रसारात आली, तर ती पाठांतरास सुलभ आणि सोपी वाटेल. यामध्ये संगीताच्या चाली सुपरिचित असल्यामुळे ही समश्लोकी अधिकच गेय ठरते. तसेच मूळ गीतेतील सर्व सिद्धान्तांचे सुलभ, सहजस्फूर्त प्रासादिक दर्शनही घडते. भारतीय संस्कृतीचा एक प्रातिनिधिक ग्रंथ म्हणून भगवत्‌गीता लोकमान्य झाल्यानंतर रामगीता, शिवगीता, हंसगीता, अनसूयागीता कपिलगीता, पांडवगीता, गणेशगीता, गोरक्षगीता अशा सुमारे दोनशे गीतारचना झाल्या. या सर्वच गीतांमधून गुरुगीतेचे तत्त्वज्ञान अधिक विस्ताराने सांगितलेले आहे. म्हणूनच प्रज्ञानानंद सरस्वतींनी गुरुगीतेला प्राकृतरूप देण्याचे ठरविले असावे. 'गुरुभक्ती' हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. प्रज्ञानानंद सरस्वतीलिखित 'श्रीगुरुगीता प्रबोधिनी' ही संक्षिप्त टीका इ. स. १९७९ मध्ये 'संतसेवाहंस मंडळ' यांनी परांडा (उस्मानाबाद) येथे प्रकाशित केली. प्रज्ञानानंद सरस्वतींचे गुरु श्रीवासुदेवानंद सरस्वती (पोटे स्वामी) यांना ती समर्पित केली आहे. 'श्रीवासुदेवानंद सरस्वती यांच्या चरणकमळी पदरजकिंकर स्वामी प्रज्ञानानंदाने अत्यादरे समर्पिता' या भूमिकेमुळे या गुरुगीतेचे महत्त्व अधिक आहे. या गीतेत वेगवेगळ्या पाठांमध्ये १७६ श्लोकांपासून ते १८२ श्लोकांपर्यंत श्लोकसंख्या आढळते. या लेखनामागील आपली भूमिका स्पष्ट करताना ते लिहितात 'गुरुगीता व त्यावरील रंगनाथ स्वामींची टीका वाचीत असता पाठभेदाच्या दृष्टीने बऱ्याच महत्त्वाच्या श्लोकांवर टीका लिहिलेली नसल्याने ही टीका लिहिली गेली. यामध्ये एका श्लोकाचा एकाच श्लोकात किंवा एकाच ओवीत अर्थ दिलेला आहे. मुळातील १८५ श्लोकांवर २४६ श्लोक एवढा विस्तार आहे. प्रारंभी ९ श्लोकांचे संस्कृतमधील मंगला चरण व त्याचा अनुवाद आहे. या लेखनामध्ये गुरुमहिमा, गुरुतत्त्वज्ञान, गुरुभक्ती, गुरुविषयीचे प्रेम, विश्वास, नम्रभाव, गुरुपदीमोक्ष, गुरु हीच देवता या धारणा वारंवार प्रगट होतात. श्रीगुरुगीतामधील लेखनामागे अनुभवाचे अधिष्ठान असल्याचे जाणवते.

श्रद्धायुक्त गुरुपादसेवक । करिता सर्वपापमोचन ।
होता विशुद्ध अंतःकरण । गुरुकृपेने ब्रह्म होय ॥

त्यांचे जीवनचरित्र अभ्यासत असताना याचे मोल अधिक जाणवते.

'गुरुगृहीचे नीच कर्म । स्वयेचि करणे आवडीने परे ।
हेचि एक स्वोद्धार कर्म । मुमुक्षुने जाणावे ॥'

'गुरुमार्ग' हाच अत्यंत सुलभ, निर्भय, सुखकर व सहजसाध्य होणारा असल्याचे ते आवर्जून सांगतात. श्रीगुरुगीतेवर अनेक टीकाभाष्ये उपलब्ध आहेत. वीरशैव संप्रदायातील बसवलिंगांची 'शिवानंद बोध' उर्फ 'गुरुगीता' मन्मथ शिवलिंगांची वीरशैवांचे तत्त्वज्ञान सांगणारी 'श्रीगुरुगीता' प्रसिद्ध आहे. इ. स. १९८३ मध्ये गायत्री साहित्य प्रकाशन यांनी श्रीसमर्थ रामदासकृत 'प्राकृतगुरुगीता' प्रसिद्ध केली आहे. याखेरीज गोविंद रघुनाथ पुरंदरेशास्त्री यांची 'श्रीगुरुगीता' समश्लोकी व कुसुमेश्वरी लिखित 'श्रीगुरुगीतार्थेश्वरी' उल्लेखनीय आहेत. परंतु प्रज्ञानानंद सरस्वतींचा काल लक्षात घेता इ. स. १९६६ मध्ये विश्वनाथ भाऊसाहेब घोलप यांनी प्रकाशित केलेली सातारा येथील श्रीगोपालनाथ महाराजांची 'श्रीगुरुगीता टीका' ही अधिक विस्तृत आणि काही अंशी समजण्यासही अधिक सुलभ आहे. यामध्ये संस्कृत शब्द योजनेचा अभावच जाणवतो. 'सद्‌गुरुचरणी अनन्यभावाने लीन झाल्याखेरीज योग्य मार्ग सापडत नाही, हेच त्यांच्या गुरुगीतेचे मर्म म्हणावे लागेल. शब्दातील पदलालित्य मात्र उल्लेखनीय आहे.

श्रीगुरुगीता प्रबोधिनी

प्रज्ञानानंद सरस्वतींनी लिहिलेली 'श्रीगुरुगीता प्रबोधिनी' ही संक्षिप्त टीका इ. स. १९७९ मध्ये प्रकाशित केली गेली. याचे लेखन अवघ्या नऊ तासांत झाल्याचे स्वामींनी लिहून ठेवले आहे. या लेखनामागची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात, 'गुरुगीता व त्यावरील रंगनाथस्वामींची टीका वाचीत असता पाठभेदाच्या दृष्टीने बऱ्याच महत्त्वाच्या श्लोकांवर टीका नसल्याचे आढळल्याने ही टीका लिहिली गेली.' गुरुकृपा आणि सद्‌गुरु महात्म्य हा स्वामींचा जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे अनेकदा टीकेमध्ये हे विषय येतात. एकंदरीत गुरुगीतार्थ सुलभ करून रोचक पद्धतीने देशी भाषेत मांडून परमार्थ मार्गावरील मार्गदर्शकाची त्यांची भूमिका त्यांनी चोख बजावली. परमार्थाचे प्रबोधन करण्याच्या दृष्टीने श्रीगुरुगीता प्रबोधिनी हे नावही सार्थ आहे.

अनुवादाची वैशिष्ट्ये

मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासात आणि सांस्कृतिक इतिहासात प्रज्ञानानंद सरस्वतींचे स्थान निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्रातील संतांची मांदियाळी भक्ती, अध्यात्म आणि व्यवहार यांची सांगड घालून सर्वसामान्यांना व्यवहारात वागताना अध्यात्मदृष्टी मिळावी म्हणून प्रयत्नशील असल्याचे दिसते. संत तुलसीदासांची रामभक्ती महाराष्ट्रामध्ये आणताना स्वामींनी आत्मानुभूती आणि तत्त्वज्ञान असूनही काव्य प्रतिभेची जोड त्याला दिलेली आढळते. या अनुवादात पांडित्य प्रदर्शनही नाही, वादविवादाचा गदारोळही नाही. मूळ स्वरूप कायम ठेवून अभिप्रायाच्या जास्तीत जास्त जवळ जाण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. प्रज्ञानानंद सरस्वतींनी रामचरितमानस या महाकाव्याचे सतत अध्ययन केले. त्याचा समच्छंद अनुवाद करून त्याला भावार्थ रूप दिले. गद्यस्वरूपात रामचरितमानस या महाकाव्यातील अनेक गूढार्थाची उकल केलेली आढळून येते.

स्वामींनी अनुवाद केलेली एकूण पाच स्तोत्रे आहेत. आद्यशंकराचार्यांच्या चर्पटपंजारिका, द्वादशपंजारिका, आत्मषटकम् या स्तोत्रांचा अनुवाद हस्तलिखितांमध्ये असून 'जरा' व 'मणिरत्नमाला' ही अपरिचित स्तोत्रेही अनुवादित केलेली आहेत. शंकराचार्यांच्या ललित आणि रसार्द्र स्तोत्रांची निवड स्वामींनी केली. हलकीफुलकी भक्तीय संतपरंपरेची धारणा स्पष्ट करणारी ही स्तोत्रे आहेत. अनुवादाबाबत स्वामींची भूमिका खालील श्लोकांत सांगितलेली आहे.

'प्रज्ञानानंद यती स्वान्तः सौख्यार्थ विरची अनुवादा ।
हृदयस्थ राम जेवी प्रेरी पावोत चिंतनी मोदा ।'

केवळ संस्कृतमधील व्याकरण सूत्रावर भर न देता कोरड्या कर्मकांडाने जीवनाचे सार्थक होणे सर्वथैव अशक्य आहे. याचा अनुवाद स्वामी असा करतात.

'पुनरा जन्मणे, पुन्हाही मरणे, पुन्हाही जननी जठरे शयनम् ।
दुस्तर ऐशा या संसारी । कृपा करुनि तू तारी मुरारी ॥'

माणसाचा शत्रू म्हणजे इंद्रिय गण, अधिक हव्यास-तृष्णा असलेले लोक, 'मी' आणि 'माझे' हे मुख्य पाश. स्त्री म्हणजे मदिरा हे आहेत. या सर्व रोगांवरील उपाय 'सदविचार' हाच आहे. सुविरागी आणि परमात्मस्वरूपी स्थिर असतील ते संत आणि भोगूनही अतृप्त राहतो तो काम असे अनेक विचार स्तोत्रांच्या अनुवादातून स्पष्ट होतात.

समारोप

प्रज्ञानानंद सरस्वतींना हिंदी बरोबरच संस्कृत भाषेचेही ज्ञान उत्तम होते. त्यामुळेच त्यांनी आपल्या नियोजित कार्यासाठी अनुवादकाची, टीकाकाराची, स्वतंत्र रचनाकाराची आणि मानसाचे अंतरंग उलगडणाऱ्या जाणकाराची भूमिका घेतली. रामभक्ती, सद्गुरुभक्ती आणि तुलसीभक्ती त्यांच्या वाङ्मयीन आविष्काराशी सातत्याने निगडीत राहिली. प्रज्ञानानंद सरस्वती अभ्यासक, उपासक होते तसेच ते एक लोकशिक्षकही होते. समाजावलोकन करताना त्यांच्या सभोवतालच्या घटनांचे पडसाद त्यांच्या लेखनात पडलेले दिसतात. गोहत्या बंदी, वंगभंग चळवळ, स्वदेशी पुरस्कार, रझाकार आंदोलन, हिंदु-मुस्लीम दंगे, हिंदुंवरील अत्याचार इत्यादी विषय त्यांच्या स्फुट काव्यातून आलेले आहेत. दांभिक आचारविचारांवरील हल्ला, रझाकार आंदोलन आणि सक्तीचे धर्मांतर या विषयीच्या त्यांच्या प्रतिक्रिया कमालीच्या तीव्र आहेत. 'प्रभो, तुम एक ही सहाय, सभी हिंदू भये असहाय ।' या शब्दात त्यांची अस्वस्थता प्रकट होते. 'धर्मस्थापनेचे नर म्हणजे ईश्वरी अवतार' अशी धारणा बाळगण्याचे ते आव्हान करतात. त्यांचे सर्वच लेखन स्वानुभवावर आधारलेले आहे. तरीही साहित्यनिर्मितीत कोठेही स्वकर्तृत्वाचा अहंभाव नाही. ते म्हणतात,

'क्रिया मात्र जगदीश करितसे ।
प्रज्ञानाचे काव्यचि कैसे ॥'

प्राकृतातून सद्गुरुंचे गुणवर्णन करण्यासाठी स्वामींनी 'गुरुगीता प्रबोधिनी' ची रचना केली. भारतीय संस्कृतीतील उपनिषदे, ब्रह्मसूत्रे यांच्या बरोबरीने भगवद्गीतेचे प्रातिनिधिक स्थान स्वामींनी जाणले आणि तिचे तालबद्ध मराठीकरण केले. भगवद्गीतेचा अर्थ माहीत नसूनही बारावा, पंधरावा आणि अठरावा अध्याय मुलांकडून मुखोद्गत करून घेण्याची परंपरा आजही काही घरातून चालू आहे. स्वामींच्या या समश्लोकी 'गेय' श्रीमद्भगवद्गीतेचे अध्याय पाठ करून घेणे अधिक सोपे जाईल आणि मूळ गीतेतील सर्व सिद्धान्तांचे सहज, सुलभ, उत्स्फूर्त आणि प्रासादिक दर्शन घडल्याने श्रीकृष्ण अर्जुनाच्या प्राकृतातील संवादसागरात प्रवेश करणे सुकर होईल. मूळ संस्कृत गीता आणि प्राकृत संगीत गीता यांचे पठण एकाच वेळी करता येईल ! या बाबत शंकाच नाही.

'पुरुषोत्तम योग' म्हणून गणला गेलेला पंधरावा अध्याय निवडून कीर्तन प्रवचनकारांना उपयोगी होईल अशा वीस श्लोकांवरील श्रीगीतातरंगिणीची रचना केली. संपूर्ण भागवताचे सार 'वेदस्तुती' वरील टीकेमध्ये सांगितले. स्वामींच्या संपूर्ण साहित्यातील विषयांमध्ये वैशेषिक, पातंजल, सांख्य, नैय्यामिक मीमांसक या पाचही दर्शनांचे थोडक्यात केलेले स्पष्टीकरण आहे.

रामचरितमानसातील चरित्र चित्रणाची अनेकविध अंगे स्पष्ट करताना शिष्टाचार, मर्यादांचे पालन, अनेक मंत्र, त्याद्वारे होणारे संस्कार, त्या संस्कारांचे महत्त्व, परिणाम, शकुन - अपशकुनांच्या चर्चा, मानसाविषयींच्या शंकांचे निरसन यामध्ये स्वामींची वैचारिक शुद्धता आढळते. पत्रलेखनातूनही विचारांमधील सत्यता, स्पष्टपणा आणि आत्मविश्वास दिसून येतो. स्वामी आपल्या प्रत्येक ग्रंथाचे लेखन करताना आपल्या लेखनाचा सारांश, अल्पनिवेदन, हृदगत, अशी सदरे लिहून आपली भूमिका, प्रेरणा अतिशय स्पष्ट शब्दात मांडतात. प्रत्येक प्रकरणाच्या प्रारंभी प्रास्ताविक आणि मंगलाचरण हेही निवेदन शैलीचे त्यांचे विशेष आहेत. हस्तलिखितांच्या मुखपृष्ठावर लेखनकाल, तिथी, वार, शके यांची कटाक्षाने नोंद केलेली आढळते. भक्तीभावाइतकाच पराकोटीचा विनम्र भाव त्यांच्या लेखनातून, काव्यातून दिसतो. संपूर्ण रामचरितमानसाचा समछंद अनुवाद आणि गूढ अर्थ स्पष्ट करणारी महाकाय टीका हिंदीमध्ये लिहूनही त्यांना आपल्या हिंदीच्या ज्ञानाबद्दल 'अकटाविकटायते' आहे असेच वाटते. आपल्या सर्वच लेखनाचे श्रेय ते रामरायांना देतात. 'श्रीमद्भगवद्गीता समश्लोकी' च्या प्रारंभी शार्दूलविक्रिडित आणि आर्यावृत्तामधील एक निवेदन आहे. त्यातून असाच भाव प्रकट होतो. ते असे

'भगवत्गीता भास्कर दिवटीने केवि दावू तेजासि ।
लागे न अंत गरुडा तरी गगनी उडतसेचि की माशी ॥'

स्वामींनी संस्कृत भाषेबरोबरच हिंदी ग्रंथांचाही स्वीकार करून त्याला समग्र अभ्यास विषय बनवून 'महाराष्ट्राचे तुलसीदास' च ते झाले. अशा या संतमहात्म्याला 'महाराष्ट्राच्या तुलसीदासाला' शतशः प्रणिपात !

संदर्भ ग्रंथ : *१. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती; व्यक्ती आणि वाङ्मय प्रबंध - डॉ. सौ. अनिता केळकर.*

२. 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - भाग २' डॉ. अ. ना. देशपांडे.

३. मराठी वाङ्मयाचा इतिहास - ह. भ. प., ल. रा. पांगारकर.

४. संत वाङ्मयाची फलश्रुती - गं. बा. सरदार

५. महाराष्ट्र सारस्वत - वि. ल. भावे

६. महाराष्ट्राचे तुलसीदास - स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती : डॉ. सौ. अनिता केळकर

डॉ. सौ. सुमती देशपांडे

३६/४, संकल्प बंगला, पांडुरंग कॉलनी, एरंडवणा, पुणे - ४११०३८.

फोन : ५४३०५७६

मानसभक्तिसूत्रम्

प्रास्ताविक - डॉ. कमल वैद्य

प.पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींच्या अंतरंग शिष्या. पति निधनानंतर मॅट्रिकपासून एम.ए., पीएच.डी. पर्यंत शिक्षण चिकाटीने पूर्ण. 'एकनाथी भागवतातील प्रबंधास' 'वाङ्मय चर्चा मंडळ, बेळगांवचे' पारितोषिक प्राप्त. ब्रिटिश कौन्सिलच्या Article Writing Course सर्टिफिकेट कोर्स केला आहे. 'स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती व गोस्वामी तुलसीदास' ही चरित्रात्मक पुस्तके प्रकाशित. प्रपंच नेटका करून परमार्थात निमग्न राहून श्रीरामचरितमानसबाबत आपले जीवन-पुष्प तद्गुरुंना समर्पित करीत आहेत. स्वामींच्या सर्व शिष्य परिवारात त्या प्रतिस्वामी असून त्या लाडक्या 'पू. कमाताई' आहेत.

प्रास्ताविक

प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांनी तुलसीदासकृत श्रीरामचरितमानसावर 'मानस गूढार्थ चंद्रिका' ही टीका लिहिली आहे. ह्या ग्रंथात अरण्य कांडात श्रीराम प्रभूंनी लक्ष्मणास जो उपदेश केला आहे तो 'रामगीता' या नावाने प्रसिद्ध आहे. यात लक्ष्मणांनी एकूण पाच प्रश्न केले आहेत. ते असे १) ज्ञान म्हणजे काय? २) विराग - वैराग्य कशास म्हणावे? ३) मायेचे स्वरूप काय? ४) ज्या योगे तुम्ही दया करता ती भक्ति कशी आहे? ५) ईश्वर व जीव यांत काय भेद आहे? या प्रश्नांची उत्तरे रामप्रभूंनी थोडक्यात पण परिपूर्ण अशी दिलेली आहेत. तो सर्वच भाग साधकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. विस्तारभयास्तव येथे देता येत नाही.

यांत भक्तीची व्याख्या गोस्वामी तुलसीदासांनी जी केली आहे ती अशी 'जाते बेगि द्रवउँ मैं भाई। सो मम भगति भगत सुखदाई - 'वेगें जिने द्रवे मी भाई। ती मम भक्ति भक्त - सुखदाई। (मराठी अनुवाद पू. स्वामी प्रज्ञानानंदकृत) यावर भाष्य करताना पू. स्वामी म्हणतात, 'ही प्रभूंनी केलेली व्याख्या अत्यंत निर्दोष आहे. यात भाव असा आहे की भगवंताच्या हृदयास तात्काळ द्रवित करणारे (पाझर फोडणारे) जे साधन त्याचे नाव भक्ति ! पू. स्वामींच्या मते नारद, व्यास, शांडिल्य यांनी भक्तिच्या ज्या व्याख्या केल्या आहेत त्या अव्याप्ति दोषयुक्त आहेत. हे म्हणणे कदाचित धाडसाचे वाटेल पण शास्त्र हे निर्भीक, निःस्पृह शस्त्र असते असे म्हणून पू. स्वामींनी उदाहरणे देऊन आपले म्हणणेही सिद्ध केले आहे.

'सा (भक्ति) तु अस्मिन् परम प्रेमरूपा' असे नारदभक्तिसूत्र आहे. पुंडलिकाने फक्त मातापित्यांची सेवा केली मग तरीही भगवान स्वतःहून त्यास दर्शन देण्यास का बरे गेले? त्याचे भगवंतावर परम प्रेम तर राहो प्रेमही नव्हते ! त्याने भगवंतास एका विटेवर उभे राहण्यास सांगितले. तात्काळ दर्शनही घेतले नाही. प्रणामही केला नाही ! ज्या वृंदेने भगवंतास शाप दिला तिचे काय भगवंतावर प्रेम होते? तरीही भगवान तिच्यावर अत्यंत प्रसन्न झाले आणि अजूनही वृंदा (तुळस) त्यांना अत्यंत प्रिय आहे ! कारण केवळ तिचे पातिव्रत्य ! श्रीगुरुचरित्रात गुरुभक्त दीपकाचे उदाहरण आहे. तो गुरुसेवेत इतका गढून गेला होता की काशीत राहूनही विश्वेश्वराचेही दर्शन घेत नव्हता. उलट ब्रह्मा, विष्णू, महेशांनी त्याच्या गुरुभक्तीवर प्रसन्न होऊन स्वतः त्यास दर्शन देऊन वर मागण्यास सांगितले.

येथे जी उदाहरणे दिली आहेत ती नारद, व्यास, शांडिल्य आदींच्या व्याख्येत कुठेच बसत नाहीत. पण येथे गोस्वामींनी जी भक्तिची व्याख्या केली आहे त्यातून एकही उदाहरण सुटू शकत नाही. म्हणून ज्या योगे भगवान द्रवतात ती भक्ति ! गोस्वामींनी ठिकठिकाणी रामप्रभूंचे जे वर्णन केले आहे, तेथेही 'नीति प्रीति पालक रघुराई' 'शील स्नेह निभावणारे' असेच वर्णन सर्वत्र सापडते. श्रीरामप्रभू शील, नीती यांना प्रेमाइतकेच महत्त्व देतात असेच सर्वत्र दिसून येते. वर जी उदाहरणे दिली आहेत त्यात पुंडलीकाने मातृदेवो भव, पितृदेवो भव, वृंदेने 'पति हाच परमेश्वर, तर दीपकाने 'गुरु हेच ब्रह्मा, विष्णु, महेश नव्हे साक्षात् परब्रह्म वगैरे या प्रमाणे त्या त्या व्यक्तीने शास्त्राज्ञांचेच कसोशीने, प्राणप्रणाने पालन केलेले आढळते. 'माझे अनुशासन मानतो तो मला परम प्रिय असतो' असे रामप्रभूंनी उत्तरकांडात पुरजनांना केलेल्या उपदेशात म्हटले आहेच.

या विषयासंबंधी चर्चा चाले तेव्हा प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती, नेहमी म्हणत की, 'मानस भक्तिसूत्रा'ची रचना करणे आवश्यक आहे. तसेच श्रीरामचरितमानसांत गोस्वामींनी ठिकठिकाणी भक्तिचे जे विवेचन केले आहे त्याचा गोषवाराही त्यात येणे आवश्यक आहे. श्रींचे हे शब्द सतत रामायण वाचताना आठवत असत. पण 'मानसभक्तिसूत्रा' ची रचना करणे येरागबाळाचे काम नव्हते ! त्याला पू. स्वामींसारखीच कुणी रामायणप्रेमी व रामायण, भागवतादीचे सार सर्वस्व जाणणारी अधिकारी व्यक्ति हवी होती. या दृष्टीने परमपूज्य स्वामी तेजोमयानंदजी (चिन्मय मिशन प्रमुख) यांना विनंती केली गेली आणि श्रीराम कृपेने त्यांनी ती मान्यही केली. प्रभु प्रेरणेने दिनांक १४।१२।२००१ रोजी अचानक त्यांच्याकडून 'मानसभक्तिसूत्रम्' ची रचना झाली ! यात गोस्वामींना अभिप्रेत असे भक्तीचे सर्व वैशिष्ट्य सामावले गेले आहे ! अभ्यासकांना हे निश्चितच जाणवेल.

या विशेषांकाचे निमित्ताने ही 'मानस भक्तिसूत्रे' सर्व भाविकांपर्यंत अनायासे पोहोचतील असे वाटल्यावरून त्यांचा समावेश या अंकात करण्यासाठी त्यांनी अनुमति द्यावी म्हणून विनंती करण्यात आली. त्यांनी ती मोठ्या आनंदाने आणि तत्परतेने दिली. त्यांच्या सूचनेवरूनच ही संक्षिप्त पार्श्वभूमि आणि सूत्रांचा मराठी अनुवाद देण्यात येत आहे. प. पू. स्वामींचे आभार मानण्यास खरोखर शब्द अपुरे आहेत ! त्यांच्या चरणी विनम्र अभिवादन !

हरि ॐ तत् सत्

डॉ. कमलताई वैद्य

जगात संत व परमात्मा या शिवाय कोणी कोणाचे नाही हेच खरे. समजते सर्वांना, पण उमजते कोण्या भाग्यवंतासच !

मानस भक्तिसूत्रम्

अथ श्रीरामचरितमानसानुसारिणी भक्तिव्याख्या ।।१।।

यया स द्रुतं द्रवति ।।२।।

निर्भरा अनुपमसुखमूला परमविश्रान्तिरूपाच ।।३।।

चतुर्विध पुरुषार्थानुपेक्ष्य भगवच्चरणारविन्दरतिरूपा ।।४।।

शंकरभजनात्सत्संगाच्च लभ्यते ।।५।।

साधुसमाजस्तीर्थराजरूपः ।।६।।

त्रिवेणीसंगमरूपत्वात् ।।७।।

रामकृपासाध्यः ।।८।।

सा कृपा तु साधनासापेक्षा निरपेक्षाऽपिच ।।९।।

साधनंनाम विप्रचरणरत्यादि भागवतधर्मपरिसमापनम् ।।१०।।

नामस्मरणं श्रेष्ठं सुलभञ्च ।।११।।

सगुणरूपान्निर्गुणस्वरूपादपि महत्तरं नाम ।।१२।।

तयोः परिच्रायकत्वाद् बहूनामुद्धारकत्वाच्च ।।१३।।

तस्माद् भगवन्नामरूपगुणधामकथारतिः कर्तव्या ।।१४।।

विषयविषयिजनासक्तिरूपो दुःसंगस्त्याज्या यतो

नरकादपि भयंकरः ।।१५।।

निःसंगा अनन्याश्चरणानुरक्ता भक्ता हि भगवत्प्रियाः ।।१६।।

यथा भरत लक्ष्मणहनुमच्छबर्यादयः ।।१७।।

इति गोस्वामितुलसीदसोपदिष्टं येऽनुतिष्ठान्ति तेषां द्रवति

स भगवाञ्श्रीराम इति ।।१८।।

मानस भक्तिसूत्रम् (मराठी अनुवाद)

१) येथे श्रीरामचरितमानसास अनुसरून भक्तिची व्याख्या देण्यात येत आहे.

२) ज्या योगे भगवान् द्रवतात !

३) ती भक्ती निर्भरा, अनुपम सुखाचे मूळ आणि परम विश्रांतिरूप आहे.

४) चतुर्विध पुरुषार्थाची अपेक्षा न करता केवळ भगवत चरणकमलांच्या ठिकाणी परम प्रेम हेच तिचे स्वरूप आहे.

५) शंकरभजन आणि सत्संग या योगे तिची प्राप्ती होते.

६) साधुसमाज हा (जंगम) तीर्थराज प्रयागच होय.

७) या प्रयागराजात भक्ती भागीरथी, ज्ञानरूपी सरस्वती आणि कर्मरूपी यमुना यांचा हरिहरकथारूपी त्रिवेणीसंगम होतो.

८) साधुसमाजरुपी प्रयागराज (सत्संग) हा रामकृपासाध्य आहे.

९) ती कृपा साधनसापेक्ष तसेच साधननिरपेक्षही असू शकते.

१०) विप्रचरणरतिपासून प्रारंभ होऊन भागवतधर्माचे (प्रेमाने आणि नेमाने) पालन करण्यात परिसमाप्ति साधन होय.

११) नामस्मरण हे (सर्वात) श्रेष्ठ आणि सुलभ (साधन) आहे.

१२) सगुणरूप आणि निर्गुण स्वरूप यापेक्षाही नाम हे श्रेष्ठ आहे.

१३) कारण ते सगुण निर्गुणाचा परिचय करून देऊन अनेकांचा उद्धार करते.

१४) म्हणून भगवंताचे नाम, रूप, गुण, धाम आणि भगवत् कथा यांच्यावर अत्यंत प्रेम करणे आवश्यक आहे.

१५) विषय आणि विषयीजनांची आसक्तीरूपी दुःसंगाचा सर्वथैव त्याग करणेच योग्य आहे. कारण ती नरकापेक्षाही भयंकर आहे.

१६) निःसंग आणि भगवत् चरणी अत्यंत अनुरक्त असणारे अनन्य (इतर कुणाचा वा साधनांचा ही भरवसा न धरणारे) भक्तच भगवंतास प्रिय असतात.

१७) उदाहरणार्थ, भरत, लक्ष्मण, हनुमान, शबरी आदि.

१८) या प्रमाणे गोस्वामी तुलसीदास यांनी उपदेशिलेल्या भक्तीचे जे कोणी (दृढ श्रद्धेने) अनुष्ठान (आचरण) करतात त्यांच्यावर त्या भक्तीने द्रवलेले भगवान श्रीराम कृपा करतात.

स्वामी तेजोमयानंद

भावाभिनिवेश

श्रीमती मंगलाताई ज. ओक

१० वर्षे कीर्तन प्रवचनाद्वारे भगवत् सेवेतरत प्रसिद्ध कीर्तनकार रेडिओवर कीर्तने होत असत. रामायण, महाभारत, भागवत, ज्ञानेश्वरी, दासबोध इ. वाचन करतात. प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींच्या अनुग्रहित. गेली २५ वर्षे स्वामींच्या पुण्यतिथी दिनी कीर्तन सेवा - गुरु सेवा म्हणून करतात.

प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांच्या कृपेने त्यांच्या शिष्यांपैकी अनेकांना भावाभिनिवेशाचा अनुभव येत असे. खरे तर चैतन्य महाप्रभू, श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या चरित्रातूनच या विषयी वर्णने आढळतात. तसेच श्रीएकनाथ महाराज, प. पू. टेंबे स्वामी यांच्या चरित्रातही या संबंधी त्रोटक माहिती, काही उल्लेख आढळतात. प. पू. स्वामींच्या स्त्री व पुरुष शिष्यांना असे अनुभव आलेले मी स्वतः जवळून पाहिलेले आहेत. संतकृपा झाली की अशक्य गोष्टी कशा शक्य होतात याची कल्पना यावरून येईल.

सन १९५३/५४ मध्ये श्री. लंबोदर वि. काशीकर (सातारा) हे पू. स्वामींच्या संपर्कात आले व काही अनुभवाने श्री रामकृष्ण परमहंस व पू. स्वामीजी एकरूपच आहेत अशी त्यांची खात्री पटली.

पू. स्वामींसमोर ध्यानास बसल्यावर त्यांना भावावेश सुरू झाले. ते रामकृष्ण परमहंसांचे परम भक्त होते. त्यांचे भाव अतिशय उत्कट असत. त्या वेळी पद्यरचना संस्कृतात होई. संस्कृतमधूनच आशीर्वाद, उपदेश दिला जाई. नंतर ते साताऱ्यास गेले आणि त्यानंतर हळूहळू पू. स्वामींच्या शिष्य परिवारातही अनेकांना भावावेशाचे अनुभव येऊ लागले.

श्री. ना. भा. जोशी यांना पू. आळ्याचे महाराजांचा भाव अनेकदा येई.

श्री. ग. गं. पुरंदरे यांना श्रीकृष्ण भाव बरेचदा येई.

सौ. शीला मोने (कुसुम जोशी) श्रीरामाचा भाव येई.

सौ. कुसुमताई जोग यांना श्री दत्ताचा भाव येई.

श्री. अण्णा पाठकजी यांना हनुमान किंवा देवीचा भाव येई.

डॉ. बा. श्री. वैद्य यांना श्री दत्तभाव येई.

सौ. कमलाताई वैद्य यांना श्रीराम, श्रीशिव, श्रीदत्त वगैरे अनेक भाव येत.

भाव येणे म्हणजे रामायण श्रवण अथवा पारायण, गुरुचरित्रादि ग्रंथ श्रवण करताना त्या त्या प्रसंगावेळी तो तो प्रसंग डोळ्यांसमोरून जात असताना त्यातील देवता अगर व्यक्तीचे स्वतःचे शरीरात प्रवेश होत असल्याचे जाणवते व नंतर त्याच्या शरीराचा संपूर्ण ताबा घेतला जातो. काही व्यक्तींबाबतीत त्या काळा पुरते देहभान संपूर्ण नाहीसे होते, तर काहींची जाणीव थोडीफार शिल्लक असते.

जोरात भाव येतात त्या वेळी बहुतेक वेळा देहभान हरपते.

इ. स. १६ जून ते १८ जून १९५५ या तीन दिवसांच्या काळात पू. स्वामींच्या नेतृत्वाखाली इस्लामपूर येथेच सगुण साक्षात्कारासाठी सामूहिक अनुष्ठान करण्यात आले होते. त्या वेळीही अनेकांना अनेक भाव येऊन, भावावस्थेत देवता दर्शने झाली.

श्रीमती कमलाताई वैद्य सांगतात की, त्या वेळी ३ दिवस त्यांना जे भाव येत होते ते सगळे विरहावस्थेतील होते. म्हणजे रामदर्शनासाठी व्याकुळ भरतभाव - तर अशोक वनातील सीतामाई, कृष्ण विरहाने व्याकूळ झालेली राधिका वगैरे. त्या वेळच्या विरह व्याकुळतेचे काय वर्णन करणार ! पू. स्वामी समक्ष उपस्थित होते म्हणूनच सर्व निभावले. त्या वेळी ता. १८ व १९ ला फक्त पू. स्वामींना रामप्रभूंचे साक्षात् दर्शन झाले.

त्यानंतर ८-८-१९५५ ला सातारा येथे अदालत वाड्यात श्री. ना. भा. जोशी यांचे घरी, श्रीस्वामींनी जी 'गूढार्थ चंद्रिका' मराठी लिहिली त्याची समाप्ती झाली. नंतर दुसरे दिवशीपासून ता. ९ पासून पू. स्वामींनी हिंदी रामायणाची रोज एक अशी ९ दिवस ९ पारायणे विधिवत केली.

श्री. ना. भा. जोशी हे देवता स्थापना, पूजन, हवन वगैरे करीत व मग पू. स्वामी वाचनास सुरुवात करीत - सबंध पारायणास १४/१५ तास लागत. स्वामीजी मुळीच उठत नसत - उपवासच असे. वाचन मोठ्याने असे. भरभर असे. त्यामुळे आवाज बसला की आडुळसा, तुळशी, खडीसाखर याचा काढा फक्त चमचाभर तोंडात टाकीत. बाकी पाणीही पीत नसत.

त्या वेळी पूर्ण ९ दिवस अशा १४ व्यक्ति श्रवणास बसल्या होत्या. बाकी कोणी कोणी मधूनच उठत-बसत होते.

त्या वेळी वाचनात जो प्रसंग चालू असेल त्या प्रमाणे निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळे भाव येत व जणू रामलीलाच चाले.

श्री. ना. भा. जोशींना कैकयीचा भाव तर डॉ. बा. श्री. वैद्य यांना दशरथांचा भाव आला होता. त्या भावात इतकी व्याकुळता आली होती की प्राण जातो का राहतो. पू. स्वामींनी लगेच नियंत्रण केले म्हणून बरे !

श्री. जोशी सांगत की त्या वेळी कैकयीच्या भावात हृदय इतके कठोर झाले होते की सांगता येत नाही.

श्री. पाठकजींना परशुराम व हनुमंताचा भाव रोजच येई. सौ. कमलताई वैद्य (कमाताई) यांना श्रीरामप्रभूंचे आवाहन केल्यापासून जो श्रीराम भाव येई तो अनुष्ठान संपेपर्यंत असे - १४/१५ तास भुक, तहान, झोपच नव्हे तर देहभानच नसे. ९ दिवस त्या कमल वैद्य म्हणून अस्तित्वातच नव्हत्या, असे म्हटले तरी चालेल. त्या संबंधी त्या म्हणतात की त्या वाचनाचे दालनात येऊन आसनावर बसले की एकदम आपण श्रीरामच आहोत असे वाटून देहभानच नाहीसे होई. सबंध वाचन होईपर्यंत तशीच स्थिती राही. नंतर विसर्जन केले गेले की हळुहळु देहभान येत असे. गुरु माउलींच्या कृपेने हे ९ दिवस कसे गेले हे कळलेच नाही. आनंदसिंधु रामांनीच कब्जा घेतल्यावर आणखी काय हवे?

हे सर्व पाहिलेली आम्ही काही मंडळी जीवंत आहोत. या सर्व काळात मला कमाताईचा सहवास बराच मिळाला. त्यांना भाव वगैरे आले की मी पुष्कळदा जवळच असे. १९५४ साली आम्ही उभयतांनी अनुग्रह घेतला होता. यांना राममंत्र व राम उपासना सांगितली होती तर मला महालक्ष्मीची उपासना व मंत्र दिला होता.

पण आम्हा दोघांनाही भावावस्था वगैरे येत नसे. एक प्रसंग मात्र आठवतो - ५५ सालात कमाताईच्या मुलाची चि. रमेशची मुंज झाली. मुंजीनंतर बोडण भरावयाचे होते. मला सवाष्ण म्हणून बोडण कालवण्यास बोलाविले होते. माझी देवीची उपासना होती. सकाळपासूनच मला खूप

आनंद झाला होता. १९||-५२ चे सुमारास आम्ही सवाष्णी पाटावर बसलो. घरात पाहुणे मंडळी मुंजीनिमित्त बरीच जमलेली होती. आमच्या भवतालीही स्त्रिया जमलेल्या होत्या नि त्या खूप बोलत होत्या. तेव्हा मी एकदम मोठ्याने म्हणाले, "बडबड बंद करा नि इकडे लक्ष द्या.' सर्व एकदम शांत झाल्या. माझ्या शरीरात किंचित थरथर होत होती. बोडण झाल्यावर नैवेद्य आत वाढत होते - एकदम मी म्हटले नैवेद्यावर पुरणपोळी घातली नाही आहे. आत जाऊन कमाताईंनी पाहिले तो खरोखरच नैवेद्यावर पुरणपोळी नव्हती. सर्वांना वाटले हे यांनी कसे ओळखले? यांच्या अंगात संचार झालाय. मग बायका प्रश्न विचारू लागल्या. मी सांगितले की, मला काही विचारू नका. मी पूर्ण भानावर आहे. मग ताटात वाढलेले पहिले सर्व खाल्ले. पुन्हा काहीच घेतले नाही. भांडेभर पाणी प्याले नि थरथर वगैरे सर्व थांबले. मला आलेला हा एवढाच अनुभव आहे.

सन १९५३ ते ५९ या काळात स्वामींचा मुक्काम बराच काळ इस्लामपूर, सांगली, माधवनगर, कुंडल, सातारा या भागात होता. त्या काळात इस्लामपूर येथे डॉ. बा. श्री. वैद्य यांचे घरी कमाताई या आजूबाजूच्या भगिनींना जमवून स्वामींनी लिहिलेल्या मराठी रामायणाची पारायणे व त्यांनीच लिहिलेल्या 'मानस गूढार्थ चंद्रिका' या टीकेचे वाचन करीत. थोडेसे विवरण करीत असत. दुपारी ३ ते ५ या वेळात हा कार्यक्रम बरीच वर्षे चालू होता. क्वचितच मधेच थोडा खंड पडे. ८/१० भगिनी नियमितपणे येत. श्री स्वामींचा मुक्काम माडीवरच होता. या भगिनींना वाटे आपणही अनुग्रह घ्यावा. स्वामींचे सांगण्यानुरूप त्यांनी 'हरे राम हरे राम राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥' या ३२ अक्षरी मंत्राचा ५०/६० हजार जप केला होता आणि अनुग्रह घेतला होता. त्याचा परिणाम असा झाला की नित्य रामायण वाचनाचे वेळी त्या सर्वजणींना विविध भाव येऊन रामायण नाट्यच तेथे घडू लागले. त्याचे वर्णन किती करणार ! पण नमुना म्हणून काही प्रसंगांचे वर्णन करीत आहे. पुढे श्री स्वामी इतरत्र गेल्यावर त्या भगिनींनी आपल्या अनुभवांचे वर्णन पत्राने स्वामींना कळवले होते - त्या पत्रांचे संकलन करून ती पत्रे परंडा येथे जपून ठेवलेली आहेत.

२४-७-६२ च्या पत्रात माई हरदास या भगिनी लिहितात की गुरुपौर्णिमेस दुपारी सौ. वहिनींकडे (कमाताईकडे) जमलो होतो. भजन करत होतो तेव्हा इतका गोंधळ झाला ! सगळ्यांनाच भाव येत होते. सौ. शांताबाई आठले या ही असेच लिहितात. गुरुपौर्णिमेस दुपारी वहिनींनी स्वामींच्या पादुका मधे ठेवल्या होत्या. त्यावर फुले तुळशी वाहताना सर्वांच्याच डोळ्यांतून पाणी येत होते. 'रामकृष्ण हरी' असे भजन करीत होतो तेव्हा शांताबाई कुलकर्णी यांना यशोदेचा भाव आला आणि मला बालकृष्णाचा भाव आला. पुढे काय झाले ते समजलेच नाही.

राखी पौर्णिमेला श्रीरामप्रभूंनी भावरूपाने दर्शन देऊन प्रत्येक भगिनीकडून राखी बांधून घेतली. त्या वेळी काय आनंद लुटायला मिळाला.

८ जुलै ६२ चे पत्रात सौ. इंदिरा कुलकर्णी लिहितात की, मास पारायण कमाताईचे घरी चालू आहे. त्या वेळी आपणच सुतीक्ष्ण आहोत आणि आपल्यापुढे श्रीरामांची चतुर्भुज मूर्ती उभी आहे असे वाटले व तेवढा वेळ कदाचित मला भान नसावे.

होळी, रंगपंचमी वगैरे सणांना काही विशेष घडे. कधी बालदत्तात्रेय - अनूसया सती, कधी कौसल्या माता, रांगते श्रीराम बाळ, कैकयी, दशरथ, चारी बंधू व भावजया - अशा सर्वांचे भाव येत. पुष्कळ पत्रे आहेत - सर्वत्र हाच नमुना आहे.

दिनांक १७-४-६२ चे पत्रात सौ. कमलताई वैद्य लिहितात की, येत्या शुक्रवार पासून श्रीरामचरितमानसाचे पारायण करणार आहोत - त्या वेळी कुणालाही प्रगट भाव न येता पारायण व्यवस्थित पार पडावे अशी कृपा करावी. कारण हल्ली अयोध्याकांडाचे वाचन चालू असताना सौ. शांताबाई कुलकर्णी यांना दशरथांचा व सौ. शांताबाई आठले यांना कौसल्येचा भाव येतो. दशरथांचे भावात मोठी विचित्र अवस्था होते. मूर्च्छित पडल्या म्हणजे माझी गाळण उडून जाते - घशातून चमत्कारिक आवाज येऊ लागतो. प्रार्थना विनंत्या केल्या तरी कठीण अवस्था होते. परवा शेवटी घाबरून मी त्यांना आपली शपथ घातली तेव्हा प्रकार थांबला. पण अशी पाळी येऊ नये अशी कृपा आपण करावी.

पुढे लिहितात, आपण सांगितल्याप्रमाणे सर्व देवांना प्रार्थना केल्या. त्यामुळे आता भाव जरी आले तरी बेतात येतात - पारायण व्यवस्थित झाले.

६०/६१ सालापासून श्री स्वामींचा मुक्काम मराठवाड्यात व विशेष करून परांडा येथे झाला. पुढे १९६८ साली स्वामींनी समाधीच घेतली. भावांचा अभिनिवेश सर्वांनाच होतो असे नाही किंवा व्हायलाच हवा असेही नाही. प. पू. स्वामींचे अनेक शिष्य आपापल्या कर्तव्यात, साधनेत गढून गेलेले आहेत. परमार्थमार्गात प्रगतीपथावर आहेत.

कमाताई वैद्य यांचे पूर्वसुकृत उत्तम, त्यात गुरुकृपा आणि त्यांची स्वतःची तळमळ, अभ्यास, यामुळे त्यांचे अनुभव विशेष आहेत. आपल्या लिखाण कार्यात या वयातही त्या कार्यतत्पर असतात. आनंदात असतात. गुरुकृपा तर आम्हा सर्वांवरच आहे.

प. पू. स्वामींनी टीकेत लिहिलेला मजकूर :

भावावेश - यास कुणी भावसमाधीही म्हणतात. तिचा अनुभव ज्यांनी घेतला असेल ते मान्य करतील की त्या अवस्थेतही पहाणे, ऐकणे, परस्परांस भेटणे वगैरे सर्वांचा अनुभव हृदयातच घेतला जातो. पण त्या व्यक्तीस त्या वेळी तसे वाटत नाही की हे सर्व हृदयातच होत आहे. चैतन्य गौरांग प्रभूंचे चरित्र वाचले असता भावावेशासंबंधी काही कल्पना येऊ शकेल. स्वप्नात ज्याप्रमाणे जागृतीप्रमाणे सर्व प्रकारचे अनुभव येऊ शकतात. त्याप्रमाणेच जागृतीतही बाह्य जगाचे भान हरपून बाह्य जगाचा विसर पडून हृदयांत सर्व अनुभव येऊ शकतात. स्वप्नात जसे हे बाह्य जगात होत नाही आहे याचे स्मरण नसते तसेच भावावेशांतही पण स्वप्नांतील अनुभव दीर्घकाळ स्मरणात राहात नाहीत पण भावावेशातील अनुभव मनुष्य कधी विसरू शकत नाही. जसे निद्रा आणि जागृती यांच्या संधिकाळात आलेल्या अनुभवांना लोक स्वप्न समजतात पण तो अनुभव म्हणजे स्वप्न नसून एक प्रकारचा भावावेशच असतो आणि त्या काळातील दिसलेली दृश्ये व शब्द वगैरे मनुष्य विसरत नाही. त्या गोष्टी घडून २०।४० वर्षे लोटली तरी त्या गोष्टींचे स्मरण होताच ते दृश्य तात्काळ डोळ्यांसमोर दिसू लागते. पण एखाद्या विरळा व्यक्तिलाच हे अनुभव येऊ शकतात.

श्रीमती मंगलाताई ओक
जोगवाडा, दंडगे हायस्कूल जवळ, शिवाजी नगर, सांगली ४१६४१६.

प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती आणि सगुण साक्षात्कार

श्री. अविनाशराव मावळ

एम.एस्सी. १९५६ मध्ये [illegible] १९५९ ते ७० [illegible] व १९८० [illegible] [illegible] [illegible]

श्रीरामचरितमानसावर लिहिलेल्या आपल्या 'मानस गूढार्थ चंद्रिका' या बृहत् टीकेत प्रसंगानुसार ठिकठिकाणी ईश्वर प्राप्तीच्या साधनांचे वर्णन करून शेवटी सर्वांचे फळ 'हरिपदरसरति' म्हणजे ज्ञानोत्तर भक्ति हे असून अशी भक्ति प्राप्त झाली की भगवंताची प्राप्ती होते. ते सगुण साकार रूपाने त्या भक्ताच्या हृदयसिंहासनावर विराजमान होतात; एवढेच नव्हे तर त्या भक्ताच्या प्रेमाला वश होऊन सगुण साकार रूपाने त्याच्या पुढे प्रकट होतात. असे झाले म्हणजे त्या भक्तास 'परम विश्राम' प्राप्त होतो, असे वर्णन केले आहे. हे सर्व विवरण त्यांच्या स्वानुभवावर आधारीत आहे म्हणूनच ते अत्यंत महत्त्वाचे आहे.

सन १९३० मध्ये श्रींना श्रीश्रीधरस्वामी बिडवाडीकर ऊर्फ रावजीबुवा यांच्याकडून त्रयोदशाक्षरी राममंत्र मिळाला होता. त्यानंतर त्याच वर्षी चिंचणी - तारापूर येथे पूज्य श्रीबाबागंगादास यांचा परिचय होऊन श्रीरामचरितमानस या ग्रंथाचीही गोडी लागली होती. या काळात अत्यंत तीव्रतर साधना चालू होतीच. त्यातच दिनांक २७।१।१९३४ रोजी रात्री १ वाजल्यानंतर प. पू. श्री.बाबागंगादासांच्या कृपेने निर्विकल्पाची प्राप्ती होऊन जीवनमुक्तता प्राप्त झाली. त्या वेळी 'धन्योस्मि, कृतकृत्योस्मि ! प्राण देहांतून निघून न जाताच आज मी मरण पावलो ! वा ! वा ! आनन्द ! धन्य राम ! धन्य राम ! धन्य दास ! धन्य गुरु ! धन्य शास्त्र ! असे उद्‌गार त्यांच्या मुखांतून निघाले होते ! पण तरीही रामप्रभूंचा सगुण साक्षात्कार व्हावा अशी तळमळ मात्र वाढतच चालली होती.

शेवटी सन १९३९ मध्ये महाशिवरात्रीच्या सुमारास एकतर सगुण साक्षात्कार करून घेणे किंवा देहविसर्जन हे दोनच पर्याय निश्चित करून श्री. कर्वे (पूर्वाश्रमीचे नाव) यांनी दूर नर्मदेच्या काठी घोर अरण्यात श्री. अहिल्यादेवींनी बांधलेल्या 'कोटेश्वर' मंदिरात राहून अकरा दिवसांचे अनुष्ठान करण्याचे ठरविले. बरोबर ११ दिवसच पुरतील एवढेच फराळाचे घेऊन (शेंगदाणे, खजूर, गूळ) जाणे झाले. हे मंदिर ओंकारेश्वर व बढवाईच्या मध्ये आहे. या स्थानाभोवती १२ मैल सर्वत्र जंगल पसरलेले असून पहाटे व रात्री वाघाच्या डरकाळ्या व अस्वलांच्या आरोळ्या ऐकू येत. मोठ मोठे भुजंग भरपूर होते. अगदी निर्मनुष्य स्थान होते. अशा त्या शिवमंदिरात मुक्काम असता एक दिवस अचानक एक वृद्ध ब्राह्मण तेथे आला. भोजनाची वेळ, त्यात अतिथि पाहून श्रींनी आपल्या जवळील पदार्थांतून खजूर, शेंगदाणे इत्यादी देऊन त्यास तृप्त केले. खाऊन-पिऊन आशीर्वाद देत तो ब्राह्मण तेथून बाहेर पडला न पडला तोच श्रींच्या मनात आले, हा इतका वृद्ध ब्राह्मण इतक्या घोर अरण्यात आला कसा? हा विचार येताच तात्काळ धावत जाऊन रस्त्यावर खूप दूरवर शोध घेतला पण तो ब्राह्मण कुठे दिसला नाही. यावरून त्या ब्राह्मणाच्या रूपाने श्रीशिवजींनीच दर्शन दिले असावे, असे श्रींना वाटले.

या प्रमाणे बरोबर मोजक्याच आणलेल्या अन्नपदार्थांतील काही भाग दिला गेल्याने उरलेले दिवस ते पदार्थ पुरणे शक्यच नव्हते. पण बाबा श्रीगंगादासांच्या शब्दावर पूर्ण विश्वास असल्याने जराही चिंता उत्पन्न झाली नाही आणि खरोखरच अनुष्ठान संपते न संपते तोच 'जय सियाराम' असा घोष करीत ३/४ साधू देवळात आले. हे वास्तविक रामचतुष्टयच तेजस्वी सगुण रूपात प्रकट झाले होते. श्रींनी त्यांना ओळखून चरण घट्ट धरले व त्यांनी प्रेमाने श्रींना आलिंगन दिले व सर्व स्वाऱ्या तेथून अंतर्धान पावल्या. ज्या उद्देशाने हे कठोर अनुष्ठान केले होते ते अशा रीतीने सुफळ संपूर्ण झाले. नंतर एक माणूस कमी पडलेले फराळाचे सामान घेऊन बरोबर वेळेवर अचानक आला.

यानंतर सप्टेंबर १९ (१९५४) ते १ जुलै १९५५ या काळात श्रींचा मुक्काम इस्लामपूर येथे डॉ. बा. श्री. वैद्य यांच्या घरी असताना जून १९५५ मध्ये सगुण साक्षात्कारासाठी सर्वांनी मिळून निर्जळ, निराहारित, मौनयुक्त अनुष्ठान करावे असा विचार ठरला. यात एकूण १४ स्त्री-पुरुषांनी भाग घेतला होता. दिनांक १६ जूनला हे अनुष्ठान सुरू झाले. श्रींनी एक दिवस आधीच अनुष्ठानास सुरुवात केली होती. दिनांक १८ जूनला सकाळी १० वाजता श्रींना एकट्यांना श्रीरामचंद्राचा सगुणसाक्षात्कार झाला. पदकमलापासून कटीपर्यंत स्पष्ट दर्शन झाले. पुढे वर दृष्टी जाताच श्रींचे देहभानच हरपले ! त्या वेळची श्रींची भावविव्हल अवस्था पाहून सर्व मंडळी घाबरूनच गेली ! नंतर सावध झाल्यावर श्रींनी सर्वांना आश्वासन दिले. या अनुष्ठानात इतर सर्वांना 'प्रेमभक्ती' प्रभूंनी देऊ केली !

या अनुष्ठानाची समाप्ती शनिवारी रात्री १२ वाजता (१८ जून) झाली. पाणी, सरबत वगैरे सर्वांनी घेतले. या अनुष्ठानात अन्नावाचून सर्वांचेच ८२ तास गेले. पाण्यावाचून व झोपेवाचून ४८ तास तरी गेलेच. ज्यांना पुढे निभावले नाही त्यांना ४८ तासांनी थोडे पाणी घेऊन विश्रांती घेण्याची परवानगी श्रींनी दिली होती. या अनुष्ठानात देवदेवतांची दर्शने, ध्यानाच्या व जपाच्या वेळी अंतःचक्षूसमोर सर्वांनाच झाली. दुसऱ्या दिवशी रविवारी ता. १९ जूनला परत सकाळी श्रींना सगुण साक्षात्कार झाला. या वेळीही त्यांची आदले दिवशी सारखीच स्थिति झाली पण या वेळी कुणी घाबरले नाही.

यानंतर सन १९६४ साली चातुर्मासात श्रींचा मुक्काम उस्मानाबाद येथे गरड वकिलांच्या माडीवर होता, त्या वेळी एके दिवशी संध्याकाळी ६॥ वाजता स्नान करून श्रीस्वामी माडीवर स्वतःच्या आसनाकडे चालले होते. गरड वकिलांचा छोटा मुलगा राम व राणी वडगांवकर ही मुले समोर बसलेली होती. तोच दक्षिणेकडच्या बाजूने नंदीवर बसून शंकर-पार्वती श्री

(स्वामी) जेथे आसनावर बसत तेथे आले. ही दोन्ही लहान मुले 'शंकरपार्वती' म्हणून ओरडू लागली. स्वामींनी हातांनी मुलांना गप्प बसण्याची खूण केली. श्री. वडगांवकर तेवढ्यात तेथे आले. तेव्हा 'शंकरपार्वती आले आणि गेले. तू आता नंतर आलास. तुला काही दर्शन झाले नाही. या मुलांना दर्शन झाले !' असे स्वामी म्हणाले व 'हे चौथे दर्शन' असेही त्या वेळी म्हणाले.

या शिवाय गोस्वामी तुलसीदास यांचेही प्रत्यक्ष दर्शन त्यांना झाले होते. यासंबंधी श्रींच्या तोंडून प्रत्यक्षही ऐकले होतेच. एकदा श्रीरामचरितमानसाची परंडा येथे केवळ शहाळ्याचे पाण्यावर राहून १०८ पारायणे चालू असताना एका पारायणाचे वेळी श्रींना रात्री झोपले असता अचानक जाग आली व उठून पहातात तो ते ज्या आसनावर बसून मानसाची पारायणे करीत त्या आसनावरच गोस्वामी तुलसीदासजी बसलेले दिसले व तेही त्या पोथीवरून पारायण करीत आहेत असेही दिसले. मात्र हे दर्शन होताच श्री स्वामी इतके थक्क झाले की उठून नमस्कार करावा किंवा काही बोलावे वगैरेही सुचलेच नाही ! आणि एवढ्यात गोस्वामी अंतर्धान पावले. हे श्रींच्या मुखाने ऐकलेच होते. पण याला सबळ पुरावा 'मानस गूढार्थ चंद्रिका' हिंदी खंड ४ था (अयोध्याकाण्डातील तापस प्रकरणांवरील टीका) पृष्ठ ४२४ यांत मिळाला. तेथे पूज्य स्वामींनी हिंदी टीकेत हिंदीत जे लिहिले आहे त्याचा मराठी अनुवाद येथे देत आहे, त्यावरून वाचकांना कल्पना येईलच.

'गोस्वामी तुलसीदासजी कसे होते हे स्पष्ट करताना स्वामीजी लिहितात की, 'तुलसीदासांचे छायाचित्र ज्यांनी पाहिले असेल आणि ज्यांना गुरुहरिकृपेने त्यांचा सगुण साकार साक्षात्कार प्रत्यक्ष जागृतीत, उघड्या डोळ्यांनी झाला असेल ते निःसंदेह सांगू शकतील की, तुलसीदासजी सुंदर, गोरे, अति तेजस्वी, विरागी वेष धारण केलेले आणि प्रसन्नमुख होते !'

या शिवाय त्यांनी ज्या वेळी प्रायोपवेशनाने देहत्याग केला त्या वेळीही त्यांना प्रत्यक्ष दर्शन झाले असावे, असे अनुमान करण्यास जागा आहे. कारण त्यांचे नेत्र एकदम उघडले गेले आणि कुणाला तरी आलिंगन द्यावे अशा प्रकारे हातांची हालचाल झाली !

एकनाथ महाराज म्हणतात त्याप्रमाणे खरोखरच भक्त म्हणविणे गोड वाटते खरे ! पण ते सोपे नाही. खरा भक्त असतो तोच भक्तीने अंतःकरण कसे पिळवटून निघते हे जाणतो ! खरे तर ती सुळावरची पोळीच आहे यात जराही शंका नाही !

श्री. अविनाशराव यशवंत यादव
'कैवल्य' शिवाजी नगर, उपळाई रोड, बार्शी - ४१३४११.

श्रीगुरवेनमः

गौरांगो भस्म लेपश्च –
दंडधारी दृढव्रतः ।
दयालुश्च क्षमाशीलः –
तस्मै श्रीगुरवेनमः ॥१॥
सत्यवादी तपोनिष्ठो –
पूर्ण वैराग्यधारी ।
तुलसी दासावतारश्च –
प्रज्ञानानंद नमोऽस्तुते ॥२॥

रचयिता - डॉ. बि. ना. जोशी, शिराळा

श्री. प्रज्ञानानंद सरस्वती यांची हिंदी काव्यरचना

श्रीमती उषाताई बेलसरे
बी.एस्सी. बाजली चौकी

श्रीप्रज्ञानानंद सरस्वती स्वामी हे पूर्वाश्रमात स्वतःला 'ईश्वरदास रामदासी' म्हणवत असत व त्यांच्यावर समर्थ रामदासांचा व त्यांच्या वाङ्मयाचा जबरदस्त प्रभाव पडलेला आहे यात संशय नाही.

श्रीगोस्वामी तुलसीदासांच्या श्रीरामचरितमानसाशी त्यांचा संबंध १९३० मध्ये श्री बाबागंगादासांची गाठ पडल्यावर आला पण रामदासांच्या वाङ्मयाने ते त्यापूर्वीच प्रभावित झालेले होते. नंतर जरी त्यांनी आपले जीवन श्रीरामचरितमानस व तुलसी साहित्य यांच्या परिशीलनात घालविलेले असले तरी त्यांनी श्रीरामचरितमानसावर लिहिलेली हिंदी 'मानस गूढार्थ चंद्रिका' टीका वाचत असता जेथे जेथे त्यांनी महाराष्ट्रीय संतांची वचने आधारासाठी, संदर्भासाठी घेतली आहेत तेथे मूळ वचनांचा तात्कालीक हिंदी अनुवादच त्यांनी केला आहे. अशा वचनात मनोबोध व दासबोध यांतील वचनांचा भरणा अधिक आढळतो. शिवाय एकनाथ, नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, मुकुंदराज वगैरेंची वचने देताना त्यांचाही हिंदी अनुवाद त्यांनी केला आहे. बऱ्याच ठिकाणी तो पद्यांत व मुळाबरहुकूम वृत्तात केला आहे, तर क्वचित गद्यांतही केलेला दिसतो.

मोरोपंत आर्या

'श्री बाल्मीकिहि तुलसीदास भये राम सुयश गाने को ।
ताते वश भइ बानी अरु खानी प्रेम सुरस की उनको ॥'

तुकाराम महाराज -

'दया नाम भूतोंका पालन । अरु उस हेतु दुष्ट निर्दालन ॥'
'संत चरण रज सहज लगे जब । जरत वासना बीज, तुरत तब ॥
राम नाम सुनेह तब उपजत । सुख घडि घडि तब बाढ़न लागत ॥
'बिनु अहार भल जाहिं सात दिन । तदपि न कबहूँ छाडिअ कीर्तन ॥
'नहिं निर्मल जीवन । क्या करेगा साबुन ॥'
'ब्रह्मरूप काया कीर्तनमें होती है ॥'
समर्थ रामदास स्वामी कह गये हैं कि,
'मेरी काया गयी यह सत्य है पर मैं जगदन्तरमें हूँ ।'
'भजत सगुण को पावत निर्गुण'
'आनन्दका जो अनुभव । वह भी वृत्तिका की भाव ॥'
'दुखी भयो संसार दुःखोंसे त्रिबिध तापतें दाझ्यो जब ।
परमारथ का नर अधिकारी शुद्ध जानना उसको तब ॥'
मुखसे राम नाम कहनेमें कुछ नष्ट नहीं, गाँठका धन खर्च करना नहीं पडता । इससे -
'महा घोर संसार अरि जीत लीजे ।
'बडे भोर मन 'राम' उच्चार कीजे ॥७२॥'
'मुखे राम आता नहीं, घोर हानी ।
'अभागी महा सो इहाँ व्यर्थ प्रानी ॥'
'जिसके मुखमें रह नाम सदा ।
उसे न पीडत काम कदा ॥'
'नहीं नाम मुखमें उसे मुक्ति नहीं ।
अहंता उसे देत है यातनही ॥
नाम सुरुचि नहिं जिसके मनको ।
यम यातना देत बहु उसको ॥
बहु बेद पठन से कंठ शोष मत करना ।
बहु साधन कष्ट गुहाँ मत गिरना ।
बनै कर्म खोटे बडा सो दगा रे ।
'हरे राम आसान मन्त्रा जपो रे ॥
कर्म यथाबिधि नहीं होता है ।
कर्म करक कछु फल न मिलत है ॥
भूत-मात्र पर दया नही है ।
नाम मुफ्त, सो मुख न बसत है ॥
(मनोबोध)
'जानै भूत भविष्य वर्तमान । उसे भी कहते है ज्ञान ।
पर जिससे मिले समाधान । वह ज्ञान यह नहीं ॥ (दासबोध)
'जन्म दुःखोंके पहाड'
'बहुत अनाज नापा गया । पर नापने कण नहीं खाया ।
वैसा बिना मनन श्रवण किया । निरर्थक ॥ (दासबोध)
'ऐसे जो पापरूप दीर्घ दोषी वज्रलेप । उन्हें प्रायश्चित पश्चाताप ॥'
वे शरण जाइ चरण बहुरि । सद्‌गुरु कर संतोष करि ।
जब पावहिं कृपादृष्टि लहरि । तबही होवैं पुनीत ॥ (दासबोध ५/३)
जो संसार-दुःख दुखारी । त्रिबिध तापैं दाझ्यो भारी ।
वही कोई अधिकारी । परमार्थ का ॥'
'गुरुद्रोह जो कोइ नर करई यावच्चन्द्र नरक सो परई ।
पुनि गुरुपद वह शरण जाइ जब । एक गुरुकृपा राखै तेहि तब ॥'
'नमनसे लीनता मिलै । नमनसे विकल्प गलै ॥
नमनसे सख्य उपजै । नमनसे कृपा निपजै ॥
नमनसे प्रसन्नता वृद्धि । नमनसे अन्याय क्षमा सिद्धि ॥
'भिक्षा यानि अमरवल्ली, (दासबोध)

समर्थांचा प्रभाव दर्शविणारी पू. स्वामीकृत रचना

क्रोध न देख यह गुरु । मैं इसे कैसा मारूँ ।
क्रोध चांडाल पौंवज । अविचार सिन्धु ॥१॥
क्रोध न जान मैं पतिव्रता । पतिसम आन न देवता ।
न विचारइ मम भर्ता । मरे या जीवे ॥२॥
क्रोध न जानत ज्येष्ठ बंधु । यह है परम सच्छील सिंधु ।
उसे मैं कैसा निन्दु । मारौं कैसा ॥३॥
या प्रमाणे आणखी बरेच आहे. विस्तार भयास्तव येथेच थांबावे लागेल.
ज्याचे वंशी कुलधर्म राम सेवा ।
त्याचे वंशी मज जन्म देगा देवा ॥ याचा अनुवाद
'हरिसेवा कुलधर्मबंश जेही । प्रभु, मोहि जनम वँश देहु तेही ॥'

ज्ञानेश्वर -

'योगयागबिधि । इससे नहीं सिद्धि ।
निकम्मी उपाधि दंभ धर्म । मुखसे हरि कहना ।
मुखसे हरि कहना । पुण्यकी गणना । कौन करै ॥
'तुझे सगुण कहूँ या निर्गुण रे । सगुण निर्गुण एक गोविन्दू रे ॥'

'करइ बाल अपराध अनन्ता । खद न मानत कबहूं माता ।'
(व्यंकटेश स्तोत्र)
मुकुंदराज
'गुरु संतति जब लगि नहिं जानत ।
मोह राति तब लगि नहिं नासत ।
ग्यान भानु तब लगि नहीं प्रगटत ।
निगमागम पुरान यह बोलत ।
अधःपतन कैसे नर पावत ।
जो गुरु - परम्परा नहिं जानत ॥'
नामदेव - 'तूँ ऐसा उदार है कि जब लेता है तब ही देता है ।'
एकनाथ - तत्काल पावै ब्रह्मपूर्ण । सर्वाभूती भगवद् भजन ।
छोड देना दोषगुन । यही साधन मुख्यत्वें
'अति परिचय खोटा कवि कहई । कीमत मान बडाइ न रहई ॥'
'अमृत मिलइ ते मद्य न सेवहिं' (मराठी सुभाषिते)
समर्थ रामदास
'नाना भूषण तनहिं सजावत । दर्पण देखि मोद मनें पावत ॥
रूप जरिहिं ईंधन महें ज्ञान न । सरल मंत्र रटु 'हरे राम' मन ॥ (मनोबोध)

या शिवायही बरीच वचने आहेत पण लेखन मर्यादाही सांभाळणे भाग आहे. 'शितावरून भाताची परीक्षा' या न्यायाने वाचकांना कल्पना येईलच.

शिवाय प. पू. स्वामींची स्वतंत्र रचना तर खूपच आहे. पण ती सर्व तुलसी रामायणावरील विविध प्रसंगांवर आधारित असल्याने या छोट्या लेखात तिचा अंतर्भाव करता येत नाही. थोडा नमुना देऊन लेख पूर्ण करणे भाग आहे.

'ग्यान विहीना भगति जो होई । लवन बिना जिमि भोजन सोई ॥
भगतिहीन जो केवल ग्यानहि । गनिये केवल लोन भच्छ नहि ॥''
'नारि जाति माँ जानकी पुरुष पिता श्रीराम ।
सब कहँ कर जुग जोरि कै ईश्वरदास प्रनाम ॥'
'गंगाजलकी मिति नहीं भाई । मुझसे तो वह पिया न जाई ।
अस कहि जो नहि परसत पानी । आत्मघातकी मूढ सो प्रानी ॥'
'पुनः जन्मना दुःख भोगना । नाना चिंता कष्ट उठाना ॥
मैं मेरा फंदेमें पडना । नाम दासको नाहीं ॥'
'बडे आचरहिं जगमें जैसे । इतर लोग आचरत हि तैसे ॥'
'मन करि अर्पण एक को तन दूसर कहँ देत ।
सो नारी व्यभिचारिणी नरकँ हि उसे निकेत ॥'
''स्तुति करिअ एक परमेश्वरकी । कबहूँ न करिये नारी नरकी ।
भगवानहि स्तुति पात्र सदा है । नरस्तुति करना ही वृथा है ॥'
'जिसके पास जैसा । उसके लिये वैसा देव ॥'
'भक्त भक्ति भगवंत गुरु नाम कथा गुण धाम ।
मानसँ आठउँ सदृश ये भजत मिलै बिश्राम ॥' (प्रज्ञानानंद)

या प्रमाणे स्वतंत्र रचना खूपच आहे. पण ती हिंदी टीकेतूनच जिज्ञासूंनी पहावी. आर्या वृत्त पू. स्वामींचे फार आवडते होते. मराठी समवृत्त समच्छंद 'मानस' अनुवादांत बालकांडात ३६१ दोहयांच्या दोहयांतील मराठी अनुवाद बरोबर तितक्याच आर्याही त्यांनी रचल्या आहेत. कवि मोरोपंतानंतर इतक्या विपुल प्रमाणात आर्या अन्य कुणी कविनी उपयोगात आणल्या असतीलसे वाटत नाही.

हरि ॐ तत् सत्

श्रीमती उषाताई बेलसरे
उषा अपार्टमेंट, रामलाल चौक, सोलापूर.

भारतीय संस्कृतीतील गुरुमाहात्म्य

भारतीय संस्कृतीत (यात बौद्ध व जैन येतात) गुरुंचे स्थान अत्यंत श्रेष्ठ मानले जाते. गुरु साक्षात् परब्रह्म आहे.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः॥
देवी भागवत- ११-१-४९

जगाची उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय यांच्या अधिष्ठात्या देवता गुरुस्वरूप आहेत इतकेच नव्हे तर या सर्वांचे आदितत्त्व परब्रह्म हेसुद्धा गुरुस्वरूप आहे हे देवी भागवतातच सांगितले आहे असे नसून रुद्रयामल (II–65) तंत्रात 'गुरु केवळ माता, पिता किंवा देव नसून त्यांचे सामर्थ्य एवढे आहे की' भगवान शिव क्रुद्ध झाला तरी गुरु आपले (शिष्याचे) रक्षण करतो, पण गुरु जर कोपायमान झाले तर कोणीही रक्षण करू शकणार नाही.

गुरुः पिता गुरुर्माता गुरुर्देवो गुरुर्गतिः ।
शिवे रुष्टे गुरुस्त्राता गुरौ रुष्टे न कश्चन
॥ रुद्रयामल (II 65)

म्हणून कुलार्णव तंत्रात (XII-45) सूचना दिली आहे. गुरुला सामान्य मनुष्य मानू नका. मंत्रांना नुसती अक्षरे मानू नका आणि देवमूर्तींना दगड मानू नका, तसे मानणारा नरकात जातो.

गुरौ मनुष्यबुद्धिंच, मंत्रे चाक्षरबुद्धिकम् ।
प्रतिमासु शिलाबुद्धिं कुर्वाणो नरकं व्रजेत् ॥ - कुलार्णव (II 45)

स्वर्ग-नरक यांच्या अस्तित्वाविषयी विश्वास नसलेल्या या काळात गुरुंना सामान्य माणूस मानू नये, एवढी सूचना मान्य करण्यास हरकत नाही.

गुरुपासून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाची महती प्राचीन उपनिषदातून स्पष्टपणे सांगितली आहे. छांदोग्य या प्राचीन उपनिषदात म्हटले आहे, 'ते ज्ञान झाल्यावर पाप आणि पुण्य (या दोन्ही प्रकारांच्या कर्मांचा) क्षय होऊन मनुष्य परम साम्यत्वाला (परब्रह्मत्वाला) प्राप्त होतो.

तदा विद्वान् पुण्यपापे विधूय निरञ्जनः परमसाम्यमुपैति । छांदोग्य (VII 19)

श्वेताश्वर उपनिषदात तर गुरुमार्गाशिवाय (मोक्षासाठी) दुसरा मार्ग नाही. (नान्यः पन्था विद्यतेऽयनाय) असे म्हटले आहे. सारांश भारतीय संस्कृती गुरुला सर्वश्रेष्ठ मानते.

२. गुरुगीता

स्कन्दपुराण हे आपल्या संस्कृत महापुराणात सर्वात मोठे – त्याच्या पुष्पिकेत म्हटल्याप्रमाणे ८१००० (एक्याऐंशी हजार) श्लोकांचे आहे. पण मी भाषांतरास बसलो तेव्हा त्यात नव्वद हजारांहून अधिक श्लोक असल्याचे आढळले. पण हे पुराणग्रंथ पुष्कळदा संकलनात्मक असतात. उदाहरणार्थ गरुड पुराणात चरक-सुश्रुतांचे वैद्यक (त्यांच्या ग्रंथातील अनेक श्लोक)

श्री परमपूज्य परमहंस परिव्राजकाचार्य – श्री स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती विरचित श्रीगुरुगीता प्रबोधिनी

डॉ. ग. वा. तगारे

एम.ए.पीएच.डी. [illegible] (महाराष्ट्र राज्य) १९४० पासून [illegible], [illegible], [illegible] इ. [illegible] संस्कृत [illegible] (भागवत, मत्स्य, स्कंद, नारद, कूर्म इ.) एकूण ११ खंड प्रसिद्ध. [illegible] संपादन व अनुवाद. शिवसूत्र, स्पंदकारिका, [illegible] इ. स्वतंत्र संपादन [illegible], पालीसाहित्याचा इतिहास, प्राकृत साहित्याचा इतिहास.

घेतले आहे. कूर्मपुराणात ईश्वरगीता घेतली आहे. तसे स्कंदपुराणात इतर ग्रंथातून गुरुविषयक-माहात्म्य वर्णन करणारे श्लोक एकत्र गुंफून गुरुगीता तयार केली आहे. मी वरील प्रास्ताविकात ज्या ग्रंथांची अवतरणे घेतली आहेत (पुराणकारांनी त्या त्या ग्रंथांची नावे न देता) ती अवतरणे दिली आहेत. ती गुरुगीतेतही आली आहेत. लेख विस्तार होऊ नये म्हणून गुरुगीतेत आणखी कोणत्या ग्रंथातून ते श्लोक घेतले आहेत यांचे उल्लेख टाळले आहेत. **असे जरी असले तरी गुरुगीता सलग वाचताना हे स्वयंपूर्ण स्तोत्र आहे संदर्भरहित अवतरणांची माळ नाही हे लक्षात येते.** केवळ पुराणांतूनच नव्हे तर शास्त्रीय (संस्कृत) ग्रंथातून अशी अवतरणे आढळतात. त्यामुळे गुरुगीताकारास एका विशिष्ट विषयावर गुंफलेले सुंदर स्तोत्र एवढे श्रेय देणे योग्य आहे.

गुरुगीता प्रबोधिनीकार

गुरुगीता-प्रबोधिनीकार प. पू. परमहंस परिव्राजकाचार्य श्री प्रज्ञानानंद सरस्वतींचे चरित्र आणि कार्य याबद्दल मी केलेले अल्पसे निवेदन प्रसिद्ध झालेले आहे. (इंग्रजी भाषेत) इतर लेखकही त्यांच्या चरित्र आणि कार्याविषयी चर्चा करतीलच. गेल्या शतकात महाराष्ट्रात जे तपस्वी, तेजस्वी, विद्वान यती होऊन गेले त्यापैकी एक श्रेष्ठ दर्जाची संत **विभूति असे ब्र. भू. प्रज्ञानानंदजींना म्हणणे अन्यायाचे ठरेल. कारण ते त्यांच्यापेक्षाही श्रेष्ठ आहेत.** काही अधिकारी यती महाराष्ट्रात होऊन गेले त्यांच्याबद्दल आदर बाळगून मी म्हणतो –

शैले शैले न माणिक्यम् ।

संत तुलसीदास चार शतकापूर्वी होऊन गेले पण त्यांची दखल किती महाराष्ट्रीय विद्वानांनी घेतली? पण तुलसीदासांचा अवतार मानण्याइतकी ज्यांची पात्रता आणि रामचरितमानसाची ती प्रचंड ७०० पानांची प्रस्तावना, आणि ७००० पृष्ठांची हिंदी व मराठी 'मानसगूढार्थ चंद्रिका' ही टीका रामचरितमानसाचा समछंद, समवृत्त अनुवाद आणि मराठी छंदोरचनेत घातलेली भर, इतर मराठी संतांवरील लेखन आणि परमार्थपर स्वतंत्र रचना, स्वदेश, स्वधर्म व भारतीय संस्कृति यांचा जाज्वल्य अभिमान यांमुळे जगन्मिथ्यावादाने भारतीय पौरुषाची खच्ची करणाऱ्या वेदान्तापेक्षा स्वामीजींचे समाजाभिमुख कार्य अधिक मोलाचे आहे. स्वतः स्थलकालातीत असल्याप्रमाणे स्वतःचे लेखन, काल, स्थल याबद्दल इतर संतांचे अनुल्लेख पाहता 'अवघ्या नऊ तासांत ही टीका लिहिली' हा उल्लेख आणि इतर ग्रंथांचे शेवटीसुद्धा असे उल्लेख नमूद करणे हे (जुन्या कवींची परंपरा लक्षात घेता) स्पृहणीय वाटले.

४. गुरुगीता

ही गुरुगीता स्कंदपुराणाच्या उत्तर खंडात शिव आणि पार्वती यांच्या संवादाच्या स्वरूपात सांगितली आहे. पुराणपद्धतीप्रमाणे सूत ही 'कथा' सांगतो. 'श्रीदेवी (पार्वती) ईश्वराला (शिवाला) विनंति करते. 'मनुष्य (देही) कोणत्या मार्गाने (उपायाने) ब्रह्ममय होईल, त्याला ब्रह्मत्वाची प्राप्ती होईल? भगवान शिव तिला मार्गदर्शन करून या मार्गाचे महत्त्व सांगताना 'हा मार्ग प्रयत्नपूर्वक गुप्त ठेव. विष्णु, गणेश इत्यादी देव यांच्या ठिकाणी गुरुभक्ति नसेल तर त्यांना सांगण्याचे मनातसुद्धा आणू नकोस. तसेच धूर्त, पाखंडी, नास्तिक इत्यादी अपात्रांना सांगू नकोस.' अशी सूचना दिलेली १८५ श्लोकांची ही गुरुगीता संपते. त्यावर स्वामींनी श्लोक आणि ओव्या मिळून २५५ काव्य टिका लिहिली आहे.

५. श्री प्रज्ञानानंद सरस्वतीकृत 'गुरुगीता-प्रबोधिनी'

स्वामीजींनी ही टीका आपले गुरु श्रीवासुदेवानंद सरस्वती (पोटे स्वामी) यांना शके १८६५ कार्तिक शुद्ध ४-५ ला अर्पण केली.

लेखकाने आपले हृद्गत व्यक्त करताना 'गुरुगीता (रंगनाथ स्वामी टीकायुक्त) वाचताना तिच्यातील त्रुटी लक्षात आल्या अन् आपण टीका लिहावी अशी स्फूर्ती घेऊन नऊ तासांत २५५ (ओव्या आणि श्लोक) असलेली ही टीका पुरी केली. मूळ संकल्प गीताईप्रमाणे श्लोकाचा अनुवाद एकाच ओवीत किंवा श्लोकात करण्याचा असला तरी आवश्यक तेथे विस्तारही केला आहे. 'गुरुभाव' तर हवाच पण गुरुही ब्रह्मनिष्ठ हवेत. योग्य गुरु भेटले म्हणजे प्रपंच परमार्थरूप होतो आणि परमार्थ राजमार्गासारखा होतो.

हे हृद्गत चासकमान (जिल्हा पुणे) येथे लिहिले आहे.

प्रबोधिनीचे स्वरूप

स्वामींनी मंगलाचरण संस्कृतमध्ये लिहिले असून त्यात गणेश, रामदास स्वामी, तुलसीदासकृत रामचरित मानस-गुरु-बाबा गंगादास आणि आपली संन्यासाश्रमातील गुरुपरंपरा यांना वंदन केले आहे. मराठी मंगलाचरणांत आपल्याला 'गुरु-पद-रज लागता पदी ठेला' असा आत्मलाभ सांगितला आहे. पुढे संस्कृतमध्ये भगवान शिव आणि स्वतःचे गुरुंचे ध्यान आहे आणि त्यानंतर सुताने रम्य कैलास शिखरावर झालेला शिव-पार्वती संवाद सांगितला आहे.

पार्वती विचारते : 'केन मार्गेण भो स्वामिन् देही ब्रह्ममयो भवेत्'
प्रबोधिनी : "देही म्हणजे जीवासी । केवीं प्राप्ती ब्रह्मत्वासी ।
ईश्वर उवाच : 'देही ब्रह्म भवेद्यस्मात् तत् कृपार्थ वदामि ते ।'
सर्व पाप विशुद्धात्मा श्रीगुरोः पादसेवनात् ।।१६।।
प्रबोधिनी : श्रद्धायुक्त गुरुपादसेवन । करिता सर्व पापविमोचन ।
होतां विशुद्ध अंतःकरण । गुरुकृपेने ब्रह्म होय ।।२५।।

पण ज्या वेळी अधिक विवेचनाची त्यांना आवश्यकता वाटते तेव्हा एक श्लोक - एक ओवी हे बंधन ते पाळत नाहीत. किंबहुना त्या श्लोकात जे म्हटले नाही तेसुद्धा प्रबोधिनीत सांगतात. उदाहरणार्थ -

स्वश्रियं च स्वजातिंच स्वकीर्तिं पुष्टिवर्धनम् ।
एतत्सर्व परित्यज्य गुरोरन्यन्न भावयेत ।।२५।।
प्रबोधिनी - धन - ऐश्वर्य - कुळ महत्तेसी । विसरोनि स्वशक्तिकीर्तिसी ।
अनन्यभावे गुरुसेवेसी । नम्रपणे झिजावे ।।३५।।

या एका ओळीत सुरेख संपूर्ण अनुवाद आहे. पण स्वतः गुरुसेवा केलेल्या स्वामींनी त्यात नसलेला विषय घेतलेला दिसतो आणि त्यासाठी ३५ ते ४० ओव्या लिहिल्या आहेत. स्वामींनी स्वतःच्या गुरुंची - पोटेस्वामींची देह-धर्म-शुद्धीपासून सेवा केली असल्यामुळे 'आधी केले मग सांगितले' असा अधिकार त्यांना होता म्हणून ते म्हणू शकले. 'गुरुगृहीचे नीच कर्म । स्वयेंचि करणें आवडीनें परम । हेंचि एक स्वोद्धारधर्म । मुमुक्षूनें जाणावें ।।३७।। इत्यादी. प्रश्न इतकाच आहे की हे विवेचन मूळ संस्कृत श्लोकाचे आहे का जो श्लोक आधाराला घेऊन स्वामीजींनी आपला आणखी तपशील भरीला घातला आहे. तो असंबद्ध नाही हे मान्य. पण ओव्या ३५ ते ४० मधील मजकूर मूळ श्लोकावरील स्वामीजी-भाष्य आहे । न होता गुरुदर्शन । करू नये अन्नभक्षण । ऐसी निष्ठा असावी' या त्यांच्या मताशी सहमती असली तरी तो श्लोकार्थ नाही असे नम्रपणे सुचवावेसे वाटते.

एकाक्षर कोशामुळे 'गु' - 'रु' या प्रत्येक अक्षराचा मनासारखा अर्थ पुराणकार लावत. उदा. श्लोक २८ मध्ये गु = अंधःकार, अज्ञान (२४) मायादि गुण (२९); रु = नाशक. म्हणून 'गुरु' म्हणजे अज्ञाननाशक. पण या एकाक्षरकोशाने गंमत कशी होते पाहा : 'अज्ञान' म्हणजे 'ज्ञानाचा 'अ-भाव' असे आपण मानतो पण 'अ' इति विष्णुः । अस्य ज्ञानम् इति विष्णोः ज्ञानम्' तस्मात् अज्ञानं ज्ञानमेव ! -

संस्कृत २८-३० श्लोकातील 'गु', 'रु' शब्दांचा स्वामींनी अर्थ बरोबर केला पण विद्वान लोक त्या कोशाधारे कसा विपर्यास करतात अन् पुराणकार त्या मोहातून सुटले नाहीत.

श्लोक ३१ ते ३५ अखेर गुरुंना सर्वस्व-आपले शरीर सुद्धा अर्पण करावे असे म्हटले आहे. श्लोक ३७ ते ४८ मध्ये सद्गुरु ब्रह्मस्वरूप आहेत सांगताना पुराणकार सद्गुरुंना 'कार्यकारणरूप' मानून नमस्कार करतात. त्या श्लोकांचा सारांश सांगताना 'प्रबोधिनी' म्हणते, 'सद्गुरु तुंचि सर्वाकारण ! कार्यकारणासी नाही भिन्न । कार्यकारणात अभिन्न । गुरुमूर्ते तुज नमो ।।६५।।

सद्गुरुना ब्रह्मरूप मानल्यावर त्यांना परत ब्रह्मा-विष्णु-शिवस्वरूप मानण्यात पुराणकारांना काय स्वारस्य कुणास ठाऊक?

श्लोक ५७ मध्ये 'गुरुमंडळा'चा तपशील देताना ६४ तंत्रग्रंथांपैकी काहींचा उल्लेख आहे. पण त्या श्लोकावरील टीपेत म्हटल्याप्रमाणे ती वेद-विरोधी नाहीत. श्लोक ५८ वरील भाष्य ओव्या ७१ ते ९२ भाष्य महत्त्वाचे आहे. त्यात शक्ति-जागृतीसाठी तीन मार्ग सांगितले आहेत. (१) हठयोग (२) गुरुकडून शक्तिपात, (३) ईशकृपा. यांपैकी हठयोग कलियुगात अवघड आहे. (२) ईशकृपा ही पूर्वपुण्याई आहे आणि जपयज्ञाने मिळते पण गुरुकृपेने शक्तिपात झाला तर जीव सहस्त्रार कमळामध्ये जाऊन विसावतो. याच 'सिद्धयोगा'ला 'महायोग' म्हणतात आणि 'योगशिखोपनिषदात' शिवाने त्याचे वर्णन केले आहे. या सहस्त्रदल कमलात गुरुस्मरण करावे. (६३)

त्यानंतर श्लोक ५९ ते ६३ मध्ये सद्गुरुंच्या सामर्थ्याचे वर्णन आहे. सद्गुरुंचे परब्रह्मस्वरूप सांगताना ते अनादि, अनंत, अजरामर आहेत. त्यांच्या स्मरणाने प्रमाण, प्रमेय इत्यादि चतुष्यानीयुक्त, स्वसंवेद्य असे जे ज्ञान आहे ते केवळ सद्गुरु स्मरणाने मिळते असे म्हटले आहे.

श्लोक ७१ ते ७९ अखेर सद्गुरुंच्या निरनिराळ्या विशेषांचे वर्णन करून 'तस्मै श्रीगुरवे नमः' असे वंदन केले आहे. उदाहरणार्थ :

'अनेक जन्म संप्राप्त - सर्व कर्म विदाहिने ।
ज्ञान बोध प्रभावेन तस्मै श्रीगुरवे नमः ।।७७।।

स्वामीजींचा अनुवाद

अनेक जन्मांची कर्मे गहने । समस्त जेणें दहन करणें ।
कैवल्या बोधाग्नि प्रभावाने । तया गुरुतें नमन माझें ॥२३॥

गुरुहून कोणी श्रेष्ठ नसल्यामुळे गुरुची नित्य आराधना करावी.

यस्मात् परतरं नास्ति नेति नेतीति वै श्रुतिः ।
मनसा वचसा चैव नित्यमाराधयेत् गुरुम् ॥८५॥

प्रबोधिनी - गुरुहूनि पर न देखती । नेति नेति वेद बोलती ।
म्हणूनि आराधावी गुरुमूर्ती । काया वाचा मनाने ॥१२०॥

गुरुसेवेशिवाय कोणालाही मुक्ति मिळत नाही (८६-९१) असे सांगितल्यानंतर सुप्रसिद्ध वचन :

ब्रह्मानंद परम सुखदं — भावातीतं... सद्गुरुं तं नमामि ।

श्लोक दिला आहे आणि सद्गुरुंचे ब्रह्मत्व पुनः पुढे सांगितले आहे. (श्लोक ९३-९४) भगवान शेवटी सांगतात - 'गुरु हेच शिव आहेत अशी माझी आज्ञा (शासन) आहे. अशा श्रद्धेने गुरुचे ध्यान केले तर ज्ञानप्राप्ती होऊन मुक्ति मिळाली अशी भावना करावी. 'एवं विधं गुरुं ध्यात्वा ज्ञानमुत्पद्यते स्वयम्' - इत्यादी स्वामीजींचे योगविषयक महत्त्वाचे विवेचन श्लोक १२७ वर आहे. तो श्लोक असा –

'पिंडं कुण्डलिनी शक्ति पदं हसमुदाहृतम ।
रूपं बिन्दुरिति प्रोक्तं, श्रेयं रूपातीत निरंजनम् ॥१२७॥

ओव्या १६८ ते १८३ मध्ये स्वामीजी सांगतात – पिंड = गुप्त कुंडलिनी; पद = सोऽहम्. याचा गुरुंनी सांगितलेल्या पद्धतीने जप केल्यास कुंडलिनी सुषुम्ना मार्गाने (भ्रूमध्यामधील) आज्ञाचक्र पार करून, तिसऱ्या भूमिकेत नील बिंदूचे दर्शन होऊन निर्विकल्प समाधीप्रत पोचतात आणि ब्रह्मविद् स्वतः ब्रह्म होतात. हे देवी, गुरुमार्ग मोक्षदायक आहे. ध्यान कसे करावे हे सर्व तुला सांगितले आहे. (१३३-१३५)

फलश्रुति

गुरुगीता जपाने सर्व पाप, दारिद्र्य, अकालमृत्यू, महाव्याधि निवारण होते. (१३९-१४३)

जप पद्धती

दर्भासनावर कांबळे घालून, शांती हवी असल्यास उत्तराभिमुख धनप्राप्तीसाठी पश्चिमाभिमुख बसून जप करावा. जपाचे स्थान ज्ञानेश्वरीतील 'शुचौदेशे प्रतिष्ठाय' यावरील टीकेसारखे आहे. गुरुगीतेसारखे धर्मसार नाही असे मी त्रिवार सत्य सांगतो.

'गुरुगीता समं नास्ति सत्यं सत्यं वरानने'

अभक्त, धूर्त वंचक यांना मनानेही 'गुरुगीता गुह्य' सांगू नको.

'मनसाऽपि न वक्तव्या गुरुगीता कदाचन ॥ (१८५)

इति श्री स्कंदपुराणे उत्तराखण्डे ईश्वर-पार्वती संवादे

गुरुगीता समाप्त

समारोपात स्वामीजींनी ही गीता शके १८६५ कार्तिक शुद्ध ४-५ ला संपवली आणि याचे श्रेय हा श्रेष्ठ गुरुभक्त आपल्या गुरुंना देतो.

श्रीवासुदेव कृपेचा प्रभाव । अंतः स्फूर्तीस उठाव ।
प्रबोधिनी अर्पूनि शुद्ध भाव । तत्पाद भजनी मागणे ॥२५॥

ॐ तत् सत्
श्रीमद् गुरवे परमहंसाय वासुदेवाय अर्पितास्तु ॥

डॉ. ग. वा. तगारे
द्वारा सौ. आशाताई कुलकर्णी, डॉ. श्रीनिवास हॉस्पिटल जवळ,
मिरज ४१६४१०.

परमपूज्य स्वामी श्रीप्रज्ञानानंद सरस्वती अष्टोत्तर शतनामावली

(रचना : दिनांक १८।११।२००२ रात्री १ ते २)

१) ॐ अजाय नमः
२) ॐ आद्याय नमः
३) ॐ अनंताय नमः
४) ॐ अक्षराय नमः
५) ॐ अनंतरूपाय नमः
६) ॐ अनंतगुणाय नमः
७) ॐ गांगेयाय नमः
८) ॐ नारायणसूनवे नमः
९) ॐ स्वकर्वेकुलोद्धारकाय नमः
१०) ॐ गौरांगाय नमः
११) ॐ काषायवस्त्रधारिणे नमः
१२) ॐ भस्मचर्चितन्वे नमः
१३) ॐ तेजोमयाय नमः
१४) ॐ मृदुअरुणचरणपदकमलाय नमः
१५) ॐ श्रीधरशिष्याय नमः
१६) ॐ समर्थरामदास भक्ताय नमः
१७) ॐ दासबोधप्रियाय नमः
१८) ॐ सदाचारिणे नमः
१९) ॐ श्रीरामैकनिष्ठाय नमः
२०) ॐ सन्ध्यावन्दनप्रियतमाय नमः
२१) ॐ शास्त्रानुगामिने नमः
२२) ॐ वर्णाश्रमधर्मनिष्ठाय नमः
२३) ॐ नामनिष्ठाय नमः
२४) ॐ अनुशासनप्रियाय नमः
२५) ॐ श्रीबाबागंगादासप्रियशिष्योत्तमाय नमः
२६) ॐ श्रीरामचरितमानसप्रियजीवनाय नमः
२७) ॐ श्रीगोस्वामी तुलसीदास - साक्षात्कारिणे नमः
२८) ॐ गुरुभक्ताय नमः
२९) ॐ गुर्वाज्ञापालकाय नमः
३०) ॐ गुरुसेवातत्पराय नमः
३१) ॐ श्रीमानसपारायणविशारदाय नमः
३२) ॐ ब्रह्मानन्दमग्नाय नमः
३३) ॐ परधनविमुखाय नमः
३४) ॐ परस्त्री-मातृभावधारिणे नमः
३५) ॐ सत्यवादिने नमः
३६) ॐ वासुदेवानंद पदपंकजपरागरजः सेवकाय नमः
३७) ॐ योग पट्टाभिषिक्ताय नमः
३८) ॐ प्रज्ञानानन्दस्वामिने नमः
३९) ॐ परमविरक्ताय नमः
४०) ॐ ज्ञानभास्कराय नमः
४१) ॐ भक्तिसुधाकराय नमः
४२) ॐ शाब्देपरेच निष्णाताय नमः
४३) ॐ निग्रहानुग्रहसमर्थाय नमः
४४) ॐ शिष्यभक्तवत्सलाय नमः
४५) ॐ अधिकारानुरूप साधन उपदेशकाय नमः
४६) ॐ अपरिमितसुखप्रदायकाय नमः
४७) ॐ नामसंकीर्तनप्रियाय नमः
४८) ॐ सत्यभाषणप्रियाय नमः
४९) ॐ परमहंसाय नमः
५०) ॐ परिव्राजकाचार्याय नमः
५१) ॐ समस्तशिष्यप्रियाय नमः
५२) ॐ तीर्थाटणकारिणे नमः
५३) ॐ करतलभिक्षाग्राहकाय नमः
५४) ॐ श्रीरामपंचायतन पूजकाय नमः
५५) ॐ धर्मसंस्थापकाय नमः
५६) ॐ स्वनामधन्याय नमः
५७) ॐ बालरामरूपवर्णिताय नमः
५८) ॐ वृषस्कंधारूढानुगृहिताय नमः
५९) ॐ संस्कृतप्रियाय नमः
६०) ॐ लोकसंग्रहकारकाय नमः
६१) ॐ प्रसिद्धि पराङ्मुखाय नमः
६२) ॐ शरणागत वत्सलाय नमः
६३) ॐ परस्पर्शदोषवर्जिताय नमः
६४) ॐ द्रव्यस्पर्शदोषरहिताय नमः
६५) ॐ आदर्शाध्यापकाय नमः
६६) ॐ ज्योतिर्विदे नमः
६७) ॐ श्रीरामचरितमानस-प्रवचनकाराय नमः
६८) ॐ मंत्रबीजोच्चारपरिणामाभ्यासकाय नमः
६९) ॐ विज्ञान-प्रयोगशीलाय नमः
७०) ॐ अध्यात्मविधानिपुणाय नमः
७१) ॐ शांकरवेदान्तप्रियाय नमः
७२) ॐ निष्काम-कर्मयोगिने नमः
७३) ॐ ब्रह्मस्तुति-भाष्यकाराय नमः
७४) ॐ वेदस्तुति प्रवचनकाराय नमः
७५) ॐ गुरुगीता प्रबोधनकाराय नमः
७६) ॐ वेदान्तसार अभंग रामायण रचयित्रे नमः
७७) ॐ संगीत प्रियाय नमः
७८) ॐ संगीतगीताकाराय नमः
७९) ॐ मानस-गूढार्थ-चन्द्रिका भाष्यकाराय नमः
८०) ॐ मानस - मराठी अनुवादकाय नमः
८१) ॐ सन्ध्योपासना - ग्रंथकाराय नमः
८२) ॐ प्रेमसागराय नमः
८३) ॐ कृपामृतमेघाय नमः
८४) ॐ परहितत्पराय नमः
८५) ॐ परदोषनिवारकाय नमः
८६) ॐ गुणग्राहकाय नमः
८७) ॐ व्यासपूजनकाले भावविह्वलाय नमः
८८) ॐ सगुण-निर्गुण बोध प्राप्ताय नमः
८९) ॐ आदर्श गुरुसत्रमाय नमः
९०) ॐ शिवरात्रि यामपूजा तत्पराय नमः

९१) ॐ लिंगार्चनानुष्ठान प्रवर्तकाय नमः
९२) ॐ भगवद्-साक्षात्कारिणे नमः
९३) ॐ भावविश्वप्रवर्तकाय नमः
९४) ॐ सहजसमाधिस्थिताय नमः
९५) ॐ दृढव्रताय नमः
९६) ॐ तुलसीसाहित्यप्रियाय नमः
९७) ॐ तुलसीमानस स्थिताय नमः
९८) ॐ मानस शंकानिवारणकोविदाय नमः
९९) ॐ पत्रोत्तरलेखन तत्पराय नमः
१००) ॐ मानसभावरक्षणे दक्षाय नमः
१०१) ॐ कोट्याधिक प्रणवजपानुष्ठानरताय नमः
१०२) ॐ सरळस्वभावप्रियाय नमः
१०३) ॐ वासुदेवसर्वमिति दर्शकाय नमः
१०४) ॐ तुलसीमानस बहिश्चर प्राणाय नमः
१०५) ॐ पुण्यश्लोकाय नमः
१०६) ॐ ईश्वरावताराय नमः
१०७) ॐ तेजोवलयांकिताय नमः
१०८) ॐ परंडा ग्रामे प्रायोपवेशन देहत्यागिने नमः

इति श्रीअष्टोत्तरशत नामावली समाप्ता -
श्रीगुरुचरणारविन्दे समर्पितास्तु ।

श्रीचरण रज

श्रीरामचरितमानस प्रेमी मंडळाची वाटचाल

श्री. श्रीराम मिल्हा

प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींचे अंतरंग शिष्य. ज्ञान व गीताभ्यासी तरीही विष्णुसंप्रोक्तविद्, हनुमानभक्त व्यक्तिगत 'हनुमान चक्र' सुमारे १५० सामुहिक हनुमान चक्र, १८ पुरी १०८ पारायणांचे सफल त्यांचे मार्गदर्शनाखाली नित्य येथे आयोजन. श्रीरामचरितमानस प्रेमी मंडळाची सर्व कार्ये स्वामीकार्य समजून सर्व समर्पण भावनेने करतात. १९८६ पासून संपूर्ण जीवन श्रीसद्गुरु समर्पित.

श्रीरामचरितमानस प्रेमी मंडळ हे पंजीकृत न्यास आहे. हे न्यास दि. २५-११-१९८८ रोजी ठाणे येथे रजिस्टर्ड झाले. या मंडळाचा जन्मेतिहास व या मंडळामार्फत होणाऱ्या विविध कार्याबद्दल जनसामान्यांना माहिती व्हावी, या उद्देशाने हे निवेदन आपल्यापुढे सादर करीत आहोत.

परमहंस परिव्राजकाचार्य ब्रह्मीभूत संत प्रज्ञानानन्द सरस्वती यांच्या प्रचंड वाङ्मय निर्मितीचे विवेचन, या अंकाच्या वेगवेगळ्या लेखांतून आले आहे. मुळात हे प्रसिद्धी पराङ्मुख संत. त्यांची उपाधीरहित पराङ्मुखता, श्रीरामकृपेने प्रचंड संतसाहित्य निर्मितीस कारण झाली ही वास्तविकता आहे. परन्तु व्यावहारिक दृष्टीने विचार करता अशा प्रसिद्धी पराङ्मुख संताचे वाङ्मय छापले जरी गेले तर त्याला ग्राहक मिळतील का? असा भव्य प्रश्न मंडळासमोर होता. व्यवहारात खरे तर असेच ग्रंथ छापले जातात जे ताबडतोब विकले जातील व प्रकाशकांना त्यातून फायदा होईल. हे संत वृत्तीने अती वैराग्यवान असल्यामुळे त्यांच्या चाकोरीत बसणाराच त्यांचा छोटासा शिष्य सम्प्रदाय होता. त्यात पण विशेष करून मध्यमवर्गीय व आर्थिक दृष्टीने असमृद्ध अशीच ही मंडळी होती. तीपण महाराष्ट्रात एक-दोन, एक-दोन अशी ठिकठिकाणी विखुरलेली होती.

पू. प्रज्ञानानन्द सरस्वतींचा जन्म १५ मे १८९३ रोजी झाला. त्यांनी आपली इहलीला दि. २४-३-१९६८ रोजी, प्रायोपवेशन व्रताने संपविली. त्यांच्या हयातीत त्यांचे ग्रंथ छापण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांचे अती प्रिय शिष्य श्री. ना. भा. जोशींचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. त्यांनासुद्धा अशाच अडचणींना सामोरे जावे लागले. खूप संघर्ष करावा लागला. त्यानंतर त्यांना काही ग्रंथ छापता आले.

दण्डी स्वामी प्रज्ञानानन्द सरस्वतींचा अंतिम निवास मुक्काम परंडा (जि. उस्मानाबाद) येथे श्री. आदिनाथराव यादव (ॲडव्होकेट) यांचेकडे होता. त्यांनी आपल्या सद्गुरुंची अखंड सेवा, मनोभावे आठ-दहा वर्षे केली. त्यांचेवर सद्गुरुंची कृपा पण तशीच होती. काही वेळा स्वामी परंडा सोडून गेले. परन्तु फिरून पुन्हा ते परंडा येथे आले. लीलया देह ठेवण्याचे स्थान पण त्यांनी परंडाच निश्चित केले. फाल्गुन वद्य १०, शके १८९० दिनांक २३ मार्च १९६८ रोजी त्यांनी आपला देह ठेवला. त्यानंतर त्यांची समाधी प. प. हंसराज स्वामींच्या शेजारी श्रीहंसराज मठात बांधली गेली, तेव्हापासून आतापर्यंत प्रज्ञानानन्द सरस्वतींचा पुण्यतिथी महोत्सव ते इतर गुरुबन्धूंच्या व गावातील लोकांच्या सहाय्याने सातत्याने करीत आहेत. यात त्यांना श्री. कृष्णाथ मा. पूरमवार गुरुजींची साथ नेहमी मिळत गेली. स्वामींचे शिष्य कै. श्री. वासुदेव श्रीनिवास आरे आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काळी हंसराज स्वामी मठात येऊन राहिले. पाच-सहा वर्षे त्यांनीपण खूप खूप सेवा केली. संतांचे कार्य ईश प्रेरणेने अशा प्रकारे होत असते.

श्री. आदिनाथराव यादव यांनी पू. स्वामींचे संपूर्ण साहित्य जपून ठेवले व त्याचे उत्तम संरक्षण केले. त्यांच्या मनात एक तळमळ व चिंता होती की, श्रीसद्गुरुंचे असे उत्तम मौलिक साहित्य कसे छापून निघेल. त्यांच्यासमोर पण आर्थिक प्रचंड अडचणी होत्या. संयोगवश त्यांची श्री. काकतकार, संपादक संतकृपा मासिक, पुणे यांची भेट झाली. बऱ्याच ऊहापोहानंतर श्री. काकतकर श्रीरामचरितमानस गूढार्थ चन्द्रिका (मराठी) छापण्यास तयार झाले. श्री. आदिनाथराव यांनी कसेबसे प्रत्येकी रु. १०००/- या प्रमाणे तीस लोकांकडून जमा करून, ठरल्याप्रमाणे रु. ३०,०००/- श्री. काकतकर यांना, डॉ. कमल वैद्य ज्येष्ठ गुरु भगिनींच्या सल्ल्याने दिले. त्यानंतर मानस गूढार्थ चंद्रिका किरण १ व २ त्यांनी छापले. ही अंदाजे २०० पानांची छपाई होण्यास बराच काळ लागला. पुन्हा प्रश्न उभा राहिला या गतीने मा. गू. चं. जवळ जवळ ६००० पृष्ठ टीका छापण्यास किती काळ लागेल. त्यावर बराच विचार व चर्चा झाली व शेवटी असे ठरले की, पू. स्वामींच्या साहित्याच्या छपाईसाठी स्वतंत्र यंत्रणा उभी केली गेली पाहिजे. त्याशिवाय हे काम होणे शक्य नाही. यासाठी 'श्रीरामचरितमानस प्रेमी मंडळ' या नावाने अकरा ट्रस्टींचा एक ट्रस्ट उभा केला गेला. त्याचे रीतसर रजिस्ट्रेशन झाले. या ट्रस्टच्या अध्यक्षा डॉ. कमल वैद्य यांनी छपाईची सूत्रे आपल्या हातात घेतली. कै. रामचन्द्र वामन चिटणीस हे उपाध्यक्ष होते. ते निवृत्त प्राध्यापक व संत साहित्याचे गाढे अभ्यासक होते. त्यांच्या अनुभवामुळे ट्रस्ट रजिस्टर करून घेण्यास त्रास झाला नाही. ट्रस्टचे मुख्य कार्यालय डोंबिवली (जि. ठाणे) येथे ठेवण्यात आले. श्री. चिटणीसांच्या मार्गदर्शनाखाली एक त्रैमासिक काढण्यात आले. या त्रैमासिकातून पू. प्रज्ञानानंद सरस्वतींच्या साहित्याची ओळख जनसामान्यांना व्हावी, हा मूळ उद्देश होता व तो उद्देश बऱ्याच अंशी यशस्वी झाला. एक कार्यरत संघटना उभी राहणे महत्त्वाचे होते. या चैतन्यामुळे लोकांकडून निश्चित प्रतिसाद मिळेल असा विश्वास होता.

या मंडळाचे दोन प्रमुख वक्ते श्रीमती मंगलाताई ओक व श्री. नागेश हेर्लेकर शास्त्री यांनी ठिकठिकाणी श्रीरामकथा व कीर्तनांच्या माध्यमातून पू. स्वामींच्या कार्याचा गौरव केला व मंडळाच्या उद्देशाला अनुसरून भरघोस सहाय्य केले. श्री. पूरमवार गुरुजी मानस गू. चंद्रिकाचे गाढे अभ्यासक असून ते याचा नित्य प्रचार करतात. आम्ही या सर्वांचे ऋणी आहोत.

पू. आचार्य किशोरजी व्यास यांची व पू. प्रज्ञानानन्द सरस्वतींची कधीही प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही. ते ज्या वेळेस उच्च शिक्षण घेत

होते, त्या वेळी त्यांच्या वाचनात पू. स्वामींचा सन्ध्योपासना ग्रंथ आला. त्या अलौकिक ग्रंथाने आचार्यांना भारावून टाकले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप त्यांच्या अंतःकरणात कायमची कोरली गेली. त्या अत्यंत करुणामय दयाळू हृदयाने या मंडळाला सतत भरीव सहाय्य केले. यामुळे पुढे या कार्याला पू. आचार्य किशोरजी व्यास यांचे संपूर्ण आशीर्वाद प्राप्त झाले. त्यांच्या तन-मन-धनाच्या भरीव सहाय्यामुळे या ट्रस्टला काहीसे आर्थिक स्थैर्य आले. त्यानंतर एक एक करून श्रीरामचरितमानस गूढार्थ चंद्रिकाचे ग्रंथ हिन्दी व मराठीतून छापण्यास सुरुवात झाली. हा ग्रंथ प्रकाशनाचा विभाग अत्यंत समर्थपणे सद्गुरु कृपांकित, परमप्रिय शिष्या डॉ. कमल वैद्य यांनी चालविला. तोच उपक्रम, त्या आजसुद्धा वयाची ७५ वी ओलांडल्यावरसुद्धा त्याच जिद्दीने व उत्साहाने चालवीत आहेत.

या मंडळाच्या कार्याला राष्ट्रसंत पू. मोरारी बापूंचे भरीव सहाय्य सतत मिळत गेले. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या चिन्मय मिशनचे अध्यक्ष पू. तेजोमयानन्दजींचेपण आशीर्वाद व भरीव सहाय्य या मंडळास मिळत गेले. या संत मांदीयाळींमध्ये प्रथम आशीर्वाद परमपूज्य प्रातःस्मरणीय डोंगरे महाराज यांचे लाभले. पूज्य 'प्रज्ञानानन्द सरस्वतींच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख प्रथम त्यांना झाली. त्यांच्या मूल्यांकनानंतर या कार्यास खरी गती आली.

पू. मोरारी बापूंचे मनोगत होते - असले मौलिक साहित्य गीता प्रेस गोरखपूरने छापले तर जनसामान्यास त्याचा खरा फायदा होईल. त्यांनी त्या वेळी तसा प्रयत्न केला परन्तु त्यास तसे यश आले नाही. परंतु त्यांच्या या पवित्र संकल्पास उशीरा यश यावयाचे होते. काळ लोटत गेला. मा. गू. चं. चे हिन्दी प्रकाशन, परमपूज्य रामसुखदासजी महाराजापर्यंत पू. डुंगरजी महारातजर्फे पोहोचले. गीता प्रेस, गोरखपूर चे संपूर्ण कार्य पू. रामसुखदासजींच्या मार्गदर्शनाने चालते. बऱ्याच उहापोहानंतर मानस गूढार्थ चन्द्रिकाचे हिन्दी प्रकाशन गीता प्रेसने आपल्याकडे घेतले. मा. गू. चंद्रिकाचे सात खंड हाहा म्हणता संपूर्ण छापले व बाजारात, रामभक्तांना स्वस्त दरात उपलब्ध करून दिले. याचे खरे श्रेय पू. डुंगरजी महाराज व श्री. विष्णुप्रसादजी चांदूगोढीयाजींना जाते. गीता प्रेसने जे हे मौलिक सहाय्य या मंडळास त्यांनी केले ते आम्ही कधीही विसरू शकणार नाही. आज संपूर्ण विश्वाच्या धार्मिक साहित्य प्रेमी वाचकांसमोर प्रज्ञानानन्दांची महान कलाकृती आली, त्यास अत्यंत उदार संतांची परम प्रेममयी कृपाच कारण आहे. परमपूज्य स्वामी रामसुखदासजींचा कृपामय आशीर्वाद या मागे नसता तर ही घटना घडलीच नसती.

श्री. आदिनाथराव यादव यांचे मित्र प्राध्यापक श्री. अशोकजी कामतांच्या सूज्ञ सल्ल्याने पू. संत प्रज्ञानानन्द सरस्वतीवर कोणी एकास संशोधनात्मक प्रबंध लिहिण्यास सांगणे हा सल्ला सर्वांनी मान्य केला. श्री. अशोकजी कामत स्वतः पीएच.डी. आहेत. त्यांनी आपल्या निरीक्षणाखाली श्रीमती अनिता केळकर यांना पीएच.डी केले. या उपक्रमामुळे प्रसिद्धी पराङ्मुख संताचे खरे कार्य जनसामान्यापुढे आले. श्रीमती केळकर यांचा प्रबंध छापला गेला व श्री. अशोकजी कामत यांच्या मार्गदर्शनाखाली त्याचे प्रकाशन पुणे येथे झाले. ही अचिंत्य घटना, अविस्मरणीय आहे खरी. परंतु त्यामागे श्री. कामत यांचे उदार धोरण व त्यांची विचक्षण निश्चयात्मक बुद्धी कारणीभूत आहे. संतांच्या साहित्याचे कार्य प्रभू योग्य व्यक्तीकडून अशा प्रकारेच करवून घेतात. त्यांचे आभार मानावे तितके थोडे आहे.

संतसाहित्य प्रकाशनात हंसराज स्वामीकृत "चुडालाख्यान" या ग्रंथाचे पुनर्मुद्रण या प्रकल्पा अंतर्गतच केले गेले. अर्थ उपलब्धी प्रमाणे हंसराज स्वामींच्या ग्रंथांचे पुनर्मुद्रण या मंडळातर्फे व्हावे असा पवित्र विचार आहे. संतांचे कार्य प्रभू प्रेरणेने पार पडेल यात तीळमात्र शंका नाही.

"मानवतापूर्ती साधन व संध्योपासना" हा पू. प्रज्ञानानन्दजीद्वारा लिखित ग्रंथ अत्यंत मौलिक असल्याने याचे हिन्दीत भाषांतर करण्याचा आदेश आचार्य किशोरजी व्यास यांनी डॉ. प्रभाकर पंडित (पीएच.डी.) अमळनेर यांना दिला. डॉ. प्र. पंडितांनी अतिशय श्रम घेऊन हिन्दीत या ग्रंथाचे भाषांतर तर केलेच; शिवाय मुद्रण प्रत तपासण्यात मोलाचे सहकार्य केले. डॉ. प्र. पंडितांनी या कार्यात जे अनमोल सहाय्य केले आहे त्यास आम्ही कधीही विसरू शकणार नाही. पू. आचार्य किशोरजी व्यास यांनी आपल्या प्रतिष्ठानामार्फत यांचे प्रकाशन केले. ती आवृत्ती संपल्यामुळे ते आता दुसरी आवृत्ती छापत आहेत. या प्रमाणे पू. किशोरजींचे अहेतुक प्रेम किती व कसे हे अवर्णनीय आहे. अशी संतकृपा आम्हास सतत लाभत गेली. सर्व संतांनी आमच्यावर अपार प्रेमाचा वर्षाव केला.

पुढे मंडळाच्या सभेत, परम गुरु भक्त श्री. आदिनाथराव यादव, डॉ. कमल वैद्य व सौ. रेखा नीलकंठ पटवर्धन यांचेकडून प्रस्ताव आला. पू. प्रज्ञानानन्दजी हे प्रातः स्मरणीय गोस्वामी तुलसीदासांसारखे परम रामभक्त आहेत. परंडा येथे त्यांच्या निवासस्थानाचे नामकरण पण त्यांनी 'रामविश्रामधाम' म्हणून केले होते. अशा परम रामभक्ताचे, ज्यांना महाराष्ट्राचे अवतरीत तुलसीदास म्हणण्यात कोठेही अतिशयोक्ती होणार नाही. त्यांचे स्मारक श्रीराममंदिर उभारणीतच उत्तम प्रकारे होईल, हा विचार बहुतेक सर्वांना मान्य झाला. पू. स्वामींची राहती जागा मंडळाने विकत घेतली व त्यांवर श्रीराममंदिर उभारणीचे काम वेगाने सुरू झाले. सर्व कार्यात अर्थाची आवश्यकता नेहमीच असते. परन्तु ही अपूर्णता पू. मोरारी बापू द्वारा प्रेरित श्रीहनुमानचालीसा यज्ञाने बऱ्याच अंशात पूर्ण झाली. श्रीहनुमानचालीसाचे मराठी भाषान्तर पू. स्वामींनी चौपाईबद्ध अगोदरच करून ठेवले होते. त्याला पण तुलसीकृत श्रीहनुमानचालीसाप्रमाणे प्रासादिकता प्राप्त झाली. श्रीराम भक्तांनी अत्यंत उत्साहाने या यज्ञकार्यात भाग घेतला व भरघोस सहाय्य केले. तुलसीदासांच्या श्रीरामचरितमानस व श्रीहनुमानचालीसास मंत्रमय सिद्धता आहे, हे या चारशे वर्षात सिद्ध झाले आहे. या प्राकृत रचनेत पण मंत्रमयता आहे. तुलसींच्या बैरागी आखाड्यातून 'चालीसा' चे असे यज्ञ सतत होत होते. त्यानंतर परम रामभक्त पू. मोरारी बापूंमुळे या यज्ञ प्रक्रियेत संजीवनी फुंकली गेली. जनजागरासाठी सामूहिक श्रीहनुमानचालीसाचे यज्ञ दि. १४-४-२००१ रोजी मिरज येथे करण्याचे ठरले. महाराष्ट्रातून विविध ठिकाणाहून १२९ यजमान मंडळी मिरजेत दाखल झाली व हे यज्ञ श्रीहनुमान जयंती रोजी अत्यंत यशस्वी रूपाने पार पडले. खर्च जाऊन शिल्लक राहिलेली सर्व रक्कम श्रीराम मंदिर कार्यासाठी खर्च होत आहे. आतापर्यंतच्या सर्व यजमानांचे आम्ही फार फार आभारी आहोत. खेडेगावात अशा मंदिराच्या उभारणीसाठी शहरी लोकांनी उदारत्व दाखवावे यात त्यांचे मोठेपण आहे. शिवाय धर्मकार्याचा प्रचार प्रसार खेड्यापर्यंत पोहोचविणे हा प्रथम व अंतिम उद्देश असलाच पाहिजे. सर्व जगात शांतता आली तरच आम्ही शांतीने जगू शकतो. विज्ञानाच्या प्रगतीने मुळात आज जग एका लहानशा खेड्याप्रमाणे आहे. धर्माचे मूळ कार्य आहे पशुतुल्य मनुष्यास, आदर्श

सहिष्णु मानव बनविणे. प्रत्येक धर्माचा उद्देश हाच आहे. परन्तु भ्रान्त तमोगुणांमुळे एक धर्म दुसऱ्या धर्मापुढे स्वार्थान्धतेमुळे व द्वेष भावनेने भिडतो व लढाया करतो, यात मूळ धर्माचे कोठेही असे आदेश नसतात. सर्व धर्मांना अंतिमतः शांतता व सौहार्द्रता पाहिजे. ही सर्व एकाच प्रभूची लेकरे आहेत, हे तत्त्व सर्व धर्मांना मान्य आहे. तरीपण काही विकृत घटना इतिहासात सतत घडत असतात, याला माणसातला आसुरी भाव कारणीभूत आहे. अंतिम विजय सात्त्विक दैवी भावाचाच होत असतो. म्हणून घाबरण्याचे कारण नाही. ही सर्व प्रभू लीला आहे. त्या प्रभू लीलेचे मनोगत कोणासही कळणे शक्य नाही.

श्रीराम प्रेरणेने सौ. श्यामला दिवाकरांस, पू. प्रज्ञानानन्द सरस्वतीकृत मराठी श्रीरामचरितमानसाचे १०८ सामूहिक पारायण करण्याची प्रेरणा झाली. त्यांचे भगिनी मंडळ गावोगावी जाऊन मराठी मानसाचा प्रसार व प्रचार करीत आहेत. आतापर्यंत त्यांची जवळ जवळ चाळीस पारायणे झाली असावीत. सद्गुरु प्रेरणेने सुरू झालेले हे कार्य पूर्णतेस जाईल यात शंकाच नाही. या कार्यात ज्या भगिनी स्वखर्चाने, आपल्या संसारातून वेळ काढून गावोगावी फिरत आहेत, हे अत्यन्त स्तुत्य आहे. जनजागरणासाठी या प्रकारे करण्यात येणाऱ्या स्वार्थत्यागाने, या कार्यरत भगिनींनाच स्वान्तसुख मिळेल असे नाही. त्यांच्यामुळे त्यांच्या संपर्कात येणाऱ्या परम भाविक भक्तांना त्याचा अनुभव येईल. श्रीरघुनाथाचे गायन करण्यात गोस्वामी परम धन्य झाले. त्यांचे अनुकरण सर्वांनी करावे व या धन्यतेचा अनुभव सर्वांनी घ्यावा. प्रत्येक मानवी हृदयात हा शान्तीचा अनुभव आला पाहिजे. तपाचे सामर्थ्य अलौकिक आहे. तपानेच जगाची निर्मिती, संहार व पोषण होते. वैश्विक शान्तीसाठी तपाशिवाय दुसरा कोणताच उपाय नाही. तपात निष्ठा पाहिजे. तपासाठी प्रभूचरणी अनन्य शरणागति भाव पाहिजे. भारत ही महान तपोभूमी आहे. परम प्रेममय मंत्र या तपोभूमीतून सर्व जगभर प्रसारित झाला व होणार. यामुळेच अंतिम लक्ष शान्तिचे प्राप्त होणार.

श्रीराम मंदिर उभारणीत श्री. संतोष चिटगोपकर इंजिनियर व श्री. अजित काळे यांचे कार्य मोलाचे आहे. विरोधी परिस्थितीवर मात करून त्यांनी हे कार्य तडीस नेले आहे. त्यांचे आम्ही आभारी आहोत.

या श्रीराम मंदिर मूर्तीची प्राणप्रतिष्ठा दि. २८ मार्च २००३ ला होण्याचे ठरले आहे. ही प्राणप्रतिष्ठा परम रामभक्त (श्रीरामचरितमानस भक्त) पू. मोरारी बापूंचे हस्ते व्हावी असा मानस होता. परम कृपामय या संतांनी परांडा सारख्या ठिकाणी येऊन प्राणप्रतिष्ठा करण्याचे मान्य केले, हे मंडळाच्या कार्यास अत्यंत भूषणावह आहे. आम्ही काय त्यांचे आभार मानणार? प्रभू प्रेरणेने हे सर्व घडत आहे. श्रीसद्गुरु कृपेस आम्ही पात्र व्हावे, हीच इच्छा.

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

श्रीराम गील्डा

नको यज्ञयाग, नको कर्मकांड ।
राम नाम घ्यावे, मुखाने अखंड ॥

श्रीमद्सद्गुरु प्रज्ञानानंद स्वामी यांची अवर्णनीय कृपा

श्रीमती कमलताई निलंगेकर

काय सांगो आता संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ।१।
काय द्यावे त्यासी व्हावे उतराई । ठेविता हा पायी जीव थोडा ।२।
सहज बोलणे हित उपदेश । करुनि सायास शिकविती ॥३॥
तुका म्हणे वत्स धेनुवेचे चित्ती । तैसे मज येती सांभाळीत ॥४॥

खरोखर संत व सद्गुरु इतके प्रेमळ व कृपाळू असतात. तुकाराम महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे नुकतीच व्यालेली गाय चरण्याकरिता रानात गेली म्हणजे तिचे चित्त जसे वासरापाशी असते व संध्याकाळी घराकडे येताना पळत व हंबरत येते व वासराला प्रेमाने चाटते त्याप्रमाणे सद्गुरु व संत एकदा जिवाला आपले म्हटले व अनुग्रह दिला की अतोनात कृपा करतात. त्या जीवावर नाना प्रकारांनी उपदेश करून रागवून, गोड बोलून, समजूत घालून त्या जीवाचे कल्याण करतात व अनेक कष्ट सहन करून त्याला मार्गाला लावून त्याचे परमकल्याणच करून सोडतात व शाश्वत सुखाची प्राप्ती करून देतात म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात, ठेविता हा पाइ जिव थोडा, मनुष्याला सर्वात प्रिय वस्तू जगात कोणती असेल तर तो स्वतःचा जीव. पण माऊलीची उतराई होण्याकरिता तोही कमीच आहे कारण माऊली जे देते ते शाश्वत देते. अमित अखंड देते. भगवंताचे शुद्ध प्रेम, भक्ती देते. या माऊली देण्याकरिताच जीवाचा उद्धार करण्या करताच अवतार घेतात. आता जीवाची जशी पात्रता असेल त्याप्रमाणे पदरात पडते ते तर सतत आमच्या सारख्या सामान्य जीवांना जागे करण्याच्या प्रयत्नातच असतात. प. पू. सद्गुरु माऊलींनी या अज्ञान जीवावर अधिकार नसताना, काही साधना नसताना, पुण्याचा ठेवा नसताना केवळ त्यांच्या ब्रिदामुळेच आतोनात कृपा केली आहे. एकदा आपले म्हटले की त्याचे परमकल्याणच करून सोडणार. चुकत असतानासुद्धा किती प्रकारांनी जागेवर आणून सोडतात हे माऊलीच्या सहवासात अनेकदा अनुभवले आहे. सामान्य जीवासाठीसुद्धा स्वतः किती कष्ट सहन करतात. आपले नियमसुद्धा बाजूला ठेवतात. शुद्ध प्रेमाचे किती भुकेले असतात व अज्ञानामुळे न कळत आमच्या हातून काही नियम व चुका घडल्यामुळे गुरुमाऊलीस शेवटच्या काळात किती त्रास सहन करावा लागला, याची आठवण झाली की हृदय भरून येते. पश्चाताप होतो व डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागतात. जगाच्या कल्याण संताच्या विभूती देह कष्टविती उपकारी. याची साक्ष स्वामींविषयी व हे केवळ मोठेपणा म्हणून मुळीच लिहीत नाही व एवढी मोठी व्यक्ती व सामान्य माणसाकरिता इतके कष्ट घेणे शक्य नाही. कुठे सूर्य व कुठे काजवा इतका फरक पण असा संशय येतो. माझासुद्धा विश्वास बसत नाही. पण खरे मोठे ते मोठे व संत ते संतच व याला साक्ष त्यांचीच हस्ताक्षरातील पत्रे आहेत. आता निरंतर जागविती कसे ते पाहू. एकदा मला काही कारणामुळे दर्शनास जाणे झाले नाही व मी स्वामींना पत्र लिहिले की, हा देह परस्वाधीन म्हणून दर्शनास येऊ शकले नाही. त्यांचे उत्तर असे आले की हल्ली मुलींना असे वाटते परस्वाधिन पण बायकापेक्षा पुरुषच परस्वाधीन आहेत. कारण त्यांना कुटुंबाचे पोषण करण्याकरिता नोकरी करावी लागते. अधिकारी नीच जातीचे, स्वभावाचे असले तर त्यांची गुलामगिरी (सेवा) करावी लागते. मानहानी सहन करावी लागते व रजा दिली तरच ते कुठे जाऊ शकतात. तुला त्यांनी अनुग्रह घेण्यास परवानगी दिली व जप करू देतात हे त्यांचे अनंत उपकार समज. कसे जागे केले पहा. खरा विचार केला तर त्यांच्या (पतिदेवाचा) कष्टाचा विचार न करता आपलाच विचार करणे व परवानगी मिळाली नाही हा सूरसुद्धा स्वामींना आवडला नाही व चांगले अंजन घातले व जागे केले. पुन्हा हा विचार परस्वाधीनतेचा मनाला शिवला नाही.

एकदा माझ्या साधनात माझ्यात शिथिलता यायला लागली. ध्यानास किंवा जपास बसले की झोप यायची. मी त्याप्रमाणे स्वामींना पत्राने कळवले, तर त्यांनी उलट टपाली असे लिहिले की तुला कष्ट करावे लागतात. लांबून पाणी आणावे लागते म्हणून तंद्री येणे सहाजिकच आहे त्याकरिता असे साधन सांगितले. त्राटक करण्याकरिता समोर स्वामींचा किंवा गोपालकृष्णाचा फोटो ठेवावा व फोटोतल्या डोळ्यांकडे पहात जप करावा म्हणजे झोप येणार नाही. तरी तंद्री यायचीच पण त्या वेळेसच एक घटना घडली होती. मधल्या मुलाची मुंज झाली होती व त्याचे भिक्षावळीचे पैसे मी त्यांना (यजमानांना) न सांगता बाजूला ठेवले होते. प्रापंचिक लोकांचे असे म्हणणे असते की अडीअडचणींस पैसे मागे ठेवावेच लागतात व त्यासाठी खोटे बोलावेच लागते. बहुतेक बायकांना तर अशा सवयी असतातच. त्याप्रमाणे माझेही चालू होते पण पू. स्वामींचे प्रवचन ऐकण्यामुळे (असत्यासारखे मोठे पाप नाही) मनाला ते पटेना व अशी बुद्धी झाली की पू. स्वामींनाच असे विचारून घ्यावे म्हणून पत्र लिहिले. माझ्या यजमानांच्या हातात पैसा राहात नाही तर अडीअडचणींच्या वेळी त्यांनाच देण्याकरिता किंवा प्रपंचात खर्चण्याकरिता खोटे बोलावं का? कारण पैसा मागे ठेवायचा म्हटले की खोटे बोलणे आलेच. तर त्यांचे उत्तर असे आले की, तुझ्या साधनात व्यत्यय का येतो ते तुझ्या पत्रानेच बाहेर पडले व तुम्ही बायका पतिदेवापाशी इतके खोटे बोलता तर इतरांशी किती खोटे बोलत असाल आणि रामायण अनेक वेळा वाचूनसुद्धा (की 'नहि असत्य सम पातक पुंजा' गिरीसम होती कोटी किगुंजा) खोटे बोलता हे एक आश्चर्यच आहे व आता यापुढे खोटे बोलणे व लपवा-लपवी करणे हे अजिबात सोडले पाहिजे व पतिदेवाच्या पायावर डोकं ठेवून पश्चात्तापपूर्वक क्षमा मागून तसे न करण्याबद्दल सांगितले पाहिजे व हे सर्व केल्याबद्दल त्याच्या सहीचे पत्र आले पाहिजे नाहीतर स्वामींशी पत्रव्यवहार बंद. त्यांच्या आज्ञेप्रमाणे तसे करून यजमानाच्या सहीचे पत्र पाठवले व माऊलींनी अशा प्रकारे असत्याचा मळ धुवून काढला. पुन्हा जीभ असत्याकडे वळली नाही हे त्यांचे सामर्थ्य व अनुभव येऊ लागला. १० रु. मागितले तर २० रु. मिळायचे व जीवनात कमतरता कशाची वाटलीच नाही. सर्व काही दोघांच्या विचारांनीच खर्च करत असू. हेपण कधीच काटकसर करत नसत. सहन करतात हे माऊलीच्या सहवासातून कळते व त्यांचे वागणेही शास्त्र प्रचिती

गुरु प्रचिती व आत्म प्रचितीतूनच असे. जसे वाचले तसे लिहिले व लिहिले तसे आचरण केले. ज्या प्रमाणे एक म्हण आहे - बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले. असेच स्वामींचे होते व स्वभाव अत्यंत प्रेमळ होता. दुसऱ्याच्या कल्याणाकरिता आपले नियमसुद्धा मोडण्यास तयार असत. रामचरितमानसात भरत रामप्रभूंच्या स्वभावाचे वर्णन करताना म्हणतात, चौ. (राखीमम पण आपुली मोडी । कृपा प्रीती मजवरी न थोडी) या प्रमाणे पू. गुरुमाऊलीसुद्धा आपला श्रेष्ठपण मोडण्यास तयार झाले होते. हे मुळीच असत्य नाही. त्यांचे पत्र साक्ष आहेत. पू. गुरुमाऊलींचा नियम, नैव्येद्य वैश्वदेव झालेल्याच घरची भीक्षा घेण्याचा होता. पण मला पू. स्वामींची काही सेवा घडावी अशी तीव्र इच्छा होती, त्यासाठी १ वर्ष गुरुवारचे उपवास केले होते हे स्वामींना कळले व त्यांचे पत्र आले. स्वामी तुमच्याकडे उमरग्यासही येतील त्या वेळी आम्ही उमरग्यास होतो. पत्र आल्यानंतर खूप आनंद झाला व त्या प्रयत्नांस लागले. आम्ही त्या वेळी पंचायत समितीच्या क्वार्टरमध्ये राहात होतो. तिथे दोन-चार तळघरे ब्राह्मणाची होती पण वैश्वदेव एकाही घरी होत नसे. आमच्याकडे पण नाही. गावात दोन-तीन होती. पण खूप लांब, राहण्यास खोली होती पण आमच्या घरापासून थोडी अंतरावर व तिथे आधी इतर जातीचे लोक राहात असतील म्हणून स्वामींचे पत्रात होते की ती ब्राह्मणांकडून पंचगव्यांनी शुद्ध करून घ्या व सामानसुद्धा तिथे काय काय आहे व बरोबर काय आणावे लागेल, वगैरे माहितीपण दिली होती पण येण्याकरिता अनुकूल दिवसही नेमले होते. पण मला सर्व सोई करणे जमेना. इच्छा असूनही सर्व अनुकूलता. पाहिजे ते काही जमेना त्यांना काय पत्र लिहावे सुचेना. यात महिना गेला. शेवटी स्वामींचेच पत्र अले आता नैवेद्य वैश्वदेवच्या अन्नाची भिक्षा नसेल तरी चालेल. ते नियम आता सोडल्यासारखेच आहेत. श्रद्धेने देणाऱ्याकडची एका घरची ही चालेल. म्हणजे हे नियमही या अज्ञान जीवाकरिता सोडण्यास तयार होते व पुन्हा एका पत्रात लिहितात, स्वामींना राहण्याची खोली जवळ असेल तर स्वामी तुझ्या घरीसुद्धा स्नानास येत जातील. किती कळवळा या जीवाचा. गुरुवार उपवास बंद व्हावेत म्हणून व अशक्तपणा येऊ नये म्हणून व स्वतःचा उपवास करतानाचा अनुभवही लिहिले आहेत की एक दिवस पूर्ण उपवास केला, तर रोज एक पौंड वजन कमी होते. नारळाच्या नुसत्या पाण्यावर अनेक रामचरितमानसाचे पारायण केले आहे, याचा अनुभव आहे या देहाला. किती काळजी, त्रास, आम्हा लेकरांना होऊ नये म्हणून. जन्म देणाऱ्या मातेपेक्षाही कळवळा. एवढे नियम कमी करूनसुद्धा जमेना. तळमळ मात्र होती. त्यांचेही लक्ष्य इकडेच. पुन्हा १५ दिवस गेले व पुन्हा त्यांचेच पत्र आले, अग कमल मौन धरून काय उपयोग? सध्या भुगावकराकडे वृद्धी आली आहे. तरी तूच आठ-दहा दिवस राहण्यासारखे परंड्यास ये. येण्याजाण्याचे भाड्याचे व थोडे पैसे वर घेऊन ये म्हणजे तुला इथे आता सर्व सेवा करता येईल. स्वयंपाक करण्यापासून ते स्वामींची सर्व कामे तुला करता येतील. स्नानास पाणी देणे, वस्त्र धुणे वगैरे व मंगळवारातल्या लोकांना तितक्या लांबून भिक्षा आणावी लागणार नाही. मला खूप आनंद झाला व माझ्या यजमानांनी परवानगीपण दिली. घरी लहान जाऊबाई होती. त्यामुळे मुलांची व यांची खाण्याची व दोघांचा विचार एक असल्यामुळे जीवनात समाधानता आली व ही सद्गुरुमाऊलीचीच कृपा ! नाहीतर अज्ञान जीव कुठे गेला असता विचारच न करणे बरे. तसेच व्यवहारातही चोख कसे असावे हेही माऊलींनी एका घटनेवरून सांगितले. मी काही दिवस मुल लहान असताना सर्व घरचे कपडे घरीच शिवत असे. मुलींचे फ्रॉक, मुलाचे ड्रेससुद्धा व कधी कधी बाहेरचे पण कपडे शिवणास घेत असे. पण यामुळेही साधनात व्यत्यय येत असे. ध्यानातही कपडे कात्री दिसे. म्हणून स्वामींना विचारले, शिवू का नको म्हणून. तर त्यांचे उत्तर आले तुझ्या मालकांस पसंद असल्यास शिवण्यास हरकत नाही; पण पतीसेवा या भावनेने शिवावे व शिंपी घेतील तेवढे पैसे घ्यावे व शक्यतो पैसे घेतल्याशिवाय कपडे देऊ नये नाही तर पुन्हा पैसे वसूल करणे, हिशोब ठेवणे ही उपाधी आली व ओळखीचा चोर जिवानीशी मारी, ही म्हण हल्ली खरी होत आहे. म्हणजे लोकांशी वागताना कशी खबरदारी घ्यावी हे इथे शिकवले. जगात अनेक प्रकारचे लोक आहेत. बुडवणारे, फसवणारे तेव्हा सावध राहावे. किती बारीक लक्ष होते. एकदा सद्गुरुमाऊलींवर भाव विवश होऊन एक पद केले व ते पत्रात लिहून पाठवले होते. त्यात एक ओळ अशी होती (संत दर्शने जीव उद्धरती) ते पद शुद्ध करून पाठवले. पण या ओळीपुढे कंसात असे लिहिले होते नुसत्या दर्शनानी जिवाचा उद्धार होत नसतो. (इथे बुद्धीला चालना दिली) काही करावे लागते. हं काही पापे मात्र जळतील. पुन्हा दुसऱ्या एका पदात लिहिले होते. (अनुग्रहे आपल्या कृतार्थ झाले.) त्यापुढे लिहितात, (नुसता अनुग्रह घेऊन जीव कृतार्थ होत नाही.) अज्ञानामुळे काहीच कळत नाही. कृतार्थता जीवाला केव्हा येते हे आता अनेक वेळा रामायण वाचल्यानंतर थोडी जाणीव होत आहे.

पार्वतीमाता गरुड व काक भूशुंडी यांच्या चरित्रावरून असे प्रत्येक पत्रात जागे करत. पण केवढे मन कधी उपहास केला नाही व पत्राचे उत्तर न देता राहिले नाहीत व माझे शिक्षण कमी असल्यामुळे लिखाणातही खूप चुका होत असत. त्याबद्दल स्वामी म्हणत, अगं कमल पत्रात लिखाणात किती चुका. तुझी मुलंसुद्धा वाचून हसतील. तू छापील पुस्तकावरून लिहिण्याची प्रॅक्टिस कर. माझे एवढे अज्ञान व माऊलींची विद्वत्ता कुठे. गूढार्थ चंद्रिकेचे लिखाण पाहिले म्हणजे कल्पना येते. मोठे मोठे राष्ट्रसंत सुद्धा स्वामींचे वाङ्मय पाहून इतके प्रभावित होतात. श्री. प. पू. किशोरजी व्यास, पूज्य श्री तेजोमयनंदजी, श्री पुण्य मुरारी बापू वगैरे. पू. श्रीडोंगरे महाराजांनी तर स्वामींचे चरित्र पाहून भाव विवश होऊन असे उद्गार काढले होते की अशा संतांच्या चरणरजाचीसुद्धा आम्ही बरोबरी करू शकत नाही. तर आम्ही सामान्य जीवांनी काय वर्णन करावे. पण (यथाशक्ती माशी जसी आक्रमिते आकाश) त्याप्रमाणे वाणी पवित्र करण्यासाठी व पुन्हा पुन्हा स्मरण होण्यासाठी हा प्रयत्न व मनाला एकच गोष्ट अशी ठसली आहे पहिल्या दर्शनापासून की यांच्यापेक्षा (पू. स्वामींपेक्षा) जगात दुसरे कोणीच श्रेष्ठ नाही. (अशी दृढ श्रद्धा आहे.) आणि ते खरेही आहे. (न गुरोरधिकं तत्वं न गुरोरधिकंतपः । तत्त्वज्ञानं परं नास्मि । तस्मै श्रीगुरवेनमः (गुरुगीता) एवढी थोरवी असून सामान्य जीवावर किती प्रेम करतात व कसे लक्ष्य असते व त्याच्या कल्याणाकरिता कष्टही किती सोसतात. परवानगी दिल्याबरोबर लगेच परांड्यास आले व ९-१० दिवस तिथे राहिले व जी इच्छा होती स्वामींच्या सेवेची - ती सर्व सेवा पहाटे स्नानास पाणी देणे व पदरज धुणे, स्वयंपाक करून ताट नेऊन देणे व सांगितलेली कामे करणे आणि विशेष म्हणजे माऊलींच्या सान्निध्यात ध्यानास बसणे, ही इच्छा होती ती सद्गुरु माऊलींनी अशा प्रकारे पुरविली. दुपारच्या वेळी थोडा वेळ समोर बसले म्हणजे डोळ्याला डोळे भिडवण्याचे

सामर्थ्य नव्हते. पण समोर बसले म्हणजे ते आपल्याकडे कूर्म दृष्टीने पाहात आहेत याची जाणीव मात्र होत असे व आताही ते आठवले म्हणजे हृदय भरून येते. त्याच वेळी एकदा-दोनदा मनात असे आले की माऊलीचे पाय घट्ट धरून ठेवावे पण धैर्य झाले नाही. कारण स्वामी अनुग्रह घेतल्यापासून कोणासच पायास स्पर्श करू देत नसत. पूर्वी अनुग्रहितांना मंत्र घेतल्या दिवशी व गुरुपौर्णिमेदिवशी पायास स्पर्श करू देत असत. पण नंतर नंतर त्यांना स्पर्शामुळे खूप त्रास सहन करावा लागे म्हणून स्पर्श बंदच ठेवला होता. लांबूनच दर्शन देत असत. एक दिवस परंड्यास असताना स्वामींचे क्षौर चालू असताना माझ्या मनात असा विचार आला की या न्हाव्याला यतीचा स्पर्श घडतो व आपणास पायाचे दर्शनही घडत नाही. पण ते मनातच राहिले व नंतर १० दिवसांनी परत उमरग्यास आल्यानंतर हे विचार पत्रांनी स्वामींना कळवले तर त्यांचेही उत्तर असे आले, कमल, तुला अपवाद म्हणून पायांवर डोके ठेवून दर्शन घेण्यास सांगायचे होते पण विस्मरणामुळे राहून गेले. आता ध्यानात तुला दर्शन होईल. त्याच वेळेस त्यांचे देह ठेवण्याचे चालले होते. सेवेची इच्छा परंड्यास बोलावून पूर्ण केली. तसेच दर्शनाची इच्छा स्वतःच्या देहास किती कष्ट सोसून या अज्ञान बालिकेला दर्शन दिले. स्वामींना इतके कष्ट सहन करावे लागतील याची कल्पना असती तर त्यांना सांगितलेच नसते. आता पश्चात्ताप होतो. माऊलीला किती यातना सहन कराव्या लागल्या असतील म्हणून? काय उपयोग आता त्याचा (खरोखर) जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारी। हे तुकाराम महाराजांचे म्हणणे किती सत्य आहे. मी माघ महिन्यात परंड्यास सेवेला गेले होते व पुढे फाल्गुन वद्य दशमीस प्रायोपवेशन करून स्वामींनी देह ठेवला. त्या आधी सर्व शिष्य वर्गाला भेटून जाण्यास सांगितले व त्यांच्या जवळ ज्या वस्तू होत्या त्या प्रत्येकास प्रसाद म्हणून दिल्या. त्या वेळी न येणाऱ्यांना देण्याकरिता लिहून ठेवल्या व मला त्यांची पूजेची चंदनाची पेटी, त्यात त्यांच्या गुरुंचा वासुदेवानंद स्वामींचा फोटो, एकीकडे व त्यांचा स्वतःचा फोटो एकीकडे असलेली दिली. त्यातले फोटो आता जीर्ण झाले होते म्हणून काढून आता कृष्णाचा व पू. स्वामींचा (माऊलींचा) फोटो बसवले आहेत. कुठेही प्रवासात नेता येतात. सर्वांना वस्तू दिल्या व आदिनाथरावांच्या माडीतून नानासाहेब देशमुखांच्या माडीवर राहण्यास गेले. फाल्गुनी पौर्णिमेदिवशी नुसते पाणी प्याले व प्रतिपदेपासून अन्न व पाणी पूर्ण बंद केले. प्रायोपवेशनास सुरुवात झाली. सर्वांनी मिळून रामचरितमानसाचे नवाह पारायणास सुरुवात केली. पुन्हा एकदा सर्वांना आदिनाथरावांकडून पत्रे लिहिली, की या देहाचा अंत बहुतेक नाथषष्ठीस होईल. मलाही दोन पत्रं व तार आली. ताबडतोब ये तुझी पायावर डोके ठेवून पाया पडण्याची इच्छा नाथषष्ठीच्या आत आलीस तर पूर्ण होईल. केवढे सर्व अनुग्रहितांकडे लक्ष. मला ध्यानात दर्शन होईल म्हणून सांगितले होते पण माझी पात्रता नसेल इतकी म्हणून पुन्हा पत्र पाठवले. पत्र आल्यानंतर माझ्या यजमानांनी पत्र पाहून परवानगी दिली. पण दुसऱ्या अडचणी घरातल्या होत्या. घरातल्या दुसऱ्या वडील मंडळींचा विरोध होता. त्यांचेही बरोबरच होते. महिन्यापूर्वीच १० दिवस राहून आले होते. वरवर सारखे चालले तर कुणालाही आवडणार नाही. पण मी असा विचार केला, माऊलींचे पाय पुन्हा दिसणार नाहीत. ते स्वतः दर्शन देण्यास तयार आहेत व मुख्य मालकांनी परवानगी दिली. बाकीच्या लोकांना आल्यानंतर आपण स्वतः काम वगैरे खूप करून खूष करू. पण ही वेळ पुन्हा येणार नाही म्हणून सर्व तयारी करून ठेवली. पिशवी भरून पहाटे उठून सकाळच्या गाडीने जावे म्हणून व सद्गुरु माऊली इतकी उदार होऊन दर्शन देण्यास तयार असताना माझे प्रारब्ध कर्म आडवे आले आणि मी रात्रीच मासिक पाळीने बाजूला बसले. त्या वेळी मनाची काय अवस्था झाली असेल? रात्रभर झोप आली नाही व लगेच एक ४ ओळींचे कार्ड लिहिले, की माझे प्रारब्ध आडवे आले. आता पाचवे दिवशीं स्नान करून येत आहे. असे लिहिले खरे पण त्यांचा एकनाथ षष्ठीचा निर्याणाचा योग होता असे त्यांनी सर्वांना कळवलेही होते म्हणून दर्शनाची शाश्वती वाटत नव्हती. ते ४ दिवस कसे गेले सारखी तळमळ होती व ५ वे दिवशी स्नानानंतर निघाले. मन सारखे परंड्यात होते. कुठे वार्ता समजते काय म्हणून अशी सारखी भीती वाटत होती. शेवटी परंड्यास पोचले. हृदयात सारखी धडकी होती; पण कसेतरी धैर्य धरून नानासाहेब देशमुखांच्या वाड्यात गेले. तिथे रामायणाचे वाचन नुकतेच संपले होते व मी येत आहे म्हणून पाठवलेले पत्र तिथे मिळाले होतेच. वाट पहातच होते. स्वामींचे आसन माडीवर होते. मी वर गेले पू. गुरुमाऊलींची तब्येत क्षीण झाली होती. ते झोपले होते. माईनी नानासाहेबांच्या बहिणींनी मी आलेली त्यांना सांगितले. हसरा चेहरा करून इशारा केला. मी लांबून दर्शन घेतले. माईनी मला स्नान करण्यास सांगितले व त्यांचे नऊवारी साडी-सोवळ्यात घातलेलीच होती ती मला नेसण्यास दिली व पुन्हा मी स्वामींपुढे गेले. दर्शन घेण्यास परवानगी दिली व मी त्यांच्या पायांवर डोके ठेऊन दर्शन घेतले व मनाची काय अवस्था झाली ते वर्णन करता येत नाही. त्या दिवशीची रात्रीची स्वामींची आरती पण सर्व बंधु-भगिनींनी या देहाला करायला लावली व त्याच दिवशी फाल्गुन वद्य दशमी दिवशी रात्री ९ वाजून १० मिनिटांनी माऊली अनंतात विलीन झाली व हा सर्व सोहळा पुढचा समाधीचा या डोळ्यांनी पाहिला व आम्ही सर्व माऊलींच्या सगुण दर्शनास पारखे झालो. पण ते अनंतात विलीन झाले म्हणजे सर्व ठिकाणी आहेतच. प्रत्येकाच्या हृदयातही त्यांनीच आश्वासन दिले होते हा देह जरी गेला तरी स्वामी तुमच्या जवळच आहेत. तुमच्या संकटाच्यावेळी कळवळून हाका मारत ते आहेतच त्याप्रमाणे ते आठवण रूपाने नेहमी करिता हृदयातच आहेत व सर्व कार्य तेच करून घेतात. पण आता राहून राहून वाईट वाटते ते आपल्या अज्ञानामुळे व स्वार्थामुळे माऊलीला नाथषष्ठी दशमी किती यातना सहन कराव्या लागल्या याची जाणीव आता होते व वाटते धन्य त्या गोपी ज्यांनी भगवंतास पायाची धूळ दिली. किती निःस्वार्थपणा. आम्हाला नर्क मिळाला तरी हरकत नाही. पण कृष्णमाऊलीस त्रास होऊ नये, किती उदात्त प्रेम, निष्काम प्रेम. म्हणून त्या भक्तीच्या प्रेमाच्या आचार्य झाल्या. आम्ही अज्ञानी स्वार्थी जीव आमच्या इच्छेकरिता माऊलीस किती कष्ट होतील याचा विचारही करत नाही. अज्ञानीच पण माते क्षमा कर. दूर सारू नको. आम्ही तुझेच आहोत हे विसरू नको व न विसरणे तुझे ब्रीद आहे व अशी कृपा असू दे. तुझ्या चरण कमलाचे विस्मरण या जीवाकडून होऊ नये व पुन्हा पुन्हा त्रिवार वंदन करून हे स्मृतीरूपी पुष्प आपल्या चरण कमलावर वाहून लेखणीस विराम देते.

श्रीमती कमलताई मुकुंदराव निलंगेकर
औरंगाबाद

प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांच्या आठवणी

कमलताई वैद्य

श्रीरामकृपेने म्हणा अथवा पूर्वपुण्याईने म्हणा माझे पती डॉ. बाळकृष्ण श्री. वैद्य यांना व मला १९५१ मध्येच प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांच्या अनुग्रहाचा लाभ झाला होता. त्यांच्या कृपेने परमार्थात प्रगतीही होऊ लागली होती. सर्व काही ठीक चालले असताना सन १९५४ मध्ये डॉ. बा. श्री. वैद्य यांची तब्येत एकाएकी बिघडली. एकाएकी अशक्तपणा जाणवू लागला. गर्दीत वगैरे गेले की एकदम जीव घाबरा होई. १॥-२ तास झाला की काही ना काही खावे-प्यावे लागे. ताप वगैरे काहीच नव्हते. त्यांना स्वतःलाही काही निदानच होईना. माझे वडील मुंबई येथे डॉक्टरच होते, त्यांनी आम्हास मुंबईस बोलावून घेतले. सर्व प्रकारच्या तपासण्या वगैरे झाल्या. दोष कशातच आढळला नाही. नाही म्हणायला थोडा हायपोग्लासिमिया म्हणजे डायबेटिस मधुमेहाच्या उलट, रक्तातील साखर कमी होत आहे, असे निदान झाले. पण तब्येत सुधारेना. महिनाभर यामुळे त्यांची प्रॅक्टिस बंदच होती. आम्ही मुंबईला मुलांसह माझ्या माहेरीच होतो. प. पू. स्वामींना पत्राने तब्येतीविषयी वरचेवर कळवीत होतोच.

एक दिवस दुपारची वेळ होती. दारावरील बेल (घंटा) वाजली म्हणून दार उघडले तर प. पू. स्वामी स्वतः दारात ! त्यांच्याबरोबर आमचे मुंबईतील गुरुबंधु श्री. गोपाळ कृष्ण घाटे (सायन) ही होते ! आम्ही एकदम थक्कच झालो ! काही कल्पनाच नव्हती. त्यामुळे दारात औक्षण करणे वगैरे वगैरे सर्वांचा विसर पडला ! हे आतील खोलीत झोपलेले होते ! 'स्वामी आले, स्वामी आले.' हे शब्द ऐकून ते एकदम उठून बाहेर आले आणि पू. स्वामींना नमस्कार करण्यासाठी वाकले तो पू. स्वामींनी त्यांना वरचेवर धरून मिठीच मारली ! ते शिष्यवात्सल्य पाहून आम्ही सर्व अवाक् झालो ! अंतःकरण भरून आले. डोळ्यात अश्रूंनी गर्दी केली ! काय करावे, काय बोलावे काही सुचेनाच ! पू. स्वामी नेहमी सोवळ्यात असत. कुणाला स्पर्श करू देत नसत ! लांबूनच नमस्कार करावा लागे ! फक्त श्रीगुरुपौर्णिमेला पादस्पर्शास परवानगी असे ! आणि आज त्यांनी चक्क ह्यांना मिठी मारली हे पाहून श्री. घाटे काका मला हळूच म्हणाले, 'ताई, डॉक्टरांचे दुखणे आता गेले म्हणून समजा !'

नंतर पू. स्वामींनी स्नान करून दूध वगैरे घेतले आणि सरळ जाहीर करून टाकले की, 'मी बाळला व कमाला चासकमानला घेऊन जाणार आहे !' आश्चर्य म्हणजे माझ्या वडिलांनीही विरोध केला नाही आणि दुसरे दिवशी आम्ही आमच्या गाडीतून मुंबईहून पू. स्वामींच्या बरोबर चासकमानला रवाना झालो. दोन्ही मुली मी माझ्या सौ. आईजवळच ठेवल्या होत्या. फक्त धाकटा मुलगा बरोबर होता. चासकमानला गेल्यावर पू. स्वामींनी ह्यांना 'संजीवनी चिकित्सेनुसार' औषधयोजना सुरू केली.

विठ्ठल मंदिराशेजारी मठात माडीवर पू. स्वामी राहात असत व खालच्या ओसरीवर आम्ही राहिलो होतो. तेथील आमचे गुरुबंधु श्री. काका गुळाणीकर यांनी मला आपल्या मुलीप्रमाणे समजून आमचे खाणेपिणे, जेवण वगैरे सर्व जबाबदारी उचलली. ह्यांची सेवा करण्याखेरीज मला दुसरे काही काम करू दिले नाही. प. पू. स्वामी रोज सकाळ-संध्याकाळ ह्यांना बरोबर घेऊन फिरावयास जात. हळूहळू ह्यांची तब्येत सुधारू लागली. नंतरही महिन्याने परत आम्ही इस्लामपूरला निघालो तेव्हा श्री. काका गुळाणीकरांना मुद्दाम आमच्या बरोबर धाडले व ह्यांना संजीवनीची औषधे देणे, रोज बरोबर फिरावयास जाणे वगैरे जबाबदारी त्यांच्यावर सोपविली ! श्रीगुरुकृपेने यानंतर ह्यांची तब्येत उत्तम सुधारली.

१९५५ मध्ये आमच्या घरी सगुण साक्षात्कारासाठी अनुष्ठान झाले तेव्हा ह्यांनीही ८२ तास अन्नपाणी, निद्रा या शिवाय काढले होते. तरी त्यांना कुठलाही त्रास झाला नाही ! नंतर १९६५ पर्यंत श्रीसद्गुरु कृपेने आमच्या हातून इतकी अनुष्ठाने झाली व प्रापंचिक जबाबदाऱ्याही खूपच पूर्ण झाल्या. नंतर १९६५ जूनमध्ये ह्यांना देवाज्ञा झाली. पण त्या वेळी भगवान दत्तात्रेयांचे दर्शन व नामस्मरण करीत त्यांनी देह ठेवला. त्या वेळी डॉक्टरांनी ज्या वेळी 'आता सर्व उपाय खुंटले' म्हणून सांगितले तेव्हा मी त्यांच्याजवळ बसून पहाटे ६ ते दुपारी २-२॥ पर्यंत करुणात्रिपदी व दिगंबरा दिगंबरा श्रीपाद श्रीवल्लभ दिगंबरा असे भजन म्हणत त्यांचा हात हातात घेऊन त्यांच्या शेजारी बसून होते ! जेव्हा त्यांचे ओठ हलायचे थांबले तेव्हा कळले की, सर्वच संपले आहे ! माझ्या डोळ्यांपुढे अंधेरीच आली व मी एकदम खाली कोसळले ! क्षणभर वाटले की आपलाही प्राण जाईल तर बरे ! पण इतक्यात कानात 'क्षिति जल पावक गगन समीर । पंचरचित हे अधम शरीर । ती तनु प्रकट पुढे तव आहे । जीव नित्य रडणें कोणा हें?' या 'श्रीरामचरितमानसातील ओळी स्पष्ट ऐकू आल्या आणि रडे एकदम जणू आटलेच ! त्या वेळीच असे नव्हे तर आयुष्यात ज्या ज्या वेळी असे प्रसंग उद्भवले त्या वेळी दर वेळी असाच अनुभव येई ! की जीव तर नित्य आहे, मग कुणासाठी रडतेस ! आणि एकदम मन शांत होऊन रडू यावे वाटले तरी येत नसे !

आश्चर्य म्हणजे ह्यांना १५ जूनला देवाज्ञा झाली आणि त्यानंतर ऑगस्टमध्ये (१९६५) पू. स्वामींचा मुक्काम चिकुर्डे येथे होता. तेव्हा मी तेथे त्यांच्या दर्शनास गेले तर त्या वेळी पू. स्वामी तर शांत होतेच पण माझ्या डोळ्यांतही एकही अश्रू आला नाही ! नाहीतर माझे पत्र गेले तरी ह्यांच्या आणि माझ्यावरील प्रेमामुळे ज्या सद्गुरुंच्या डोळ्यांत अश्रू येत असत आणि ज्यांचे स्मरण झाले तरी अजून अंतःकरण भरून येऊन ज्या माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागतात ! त्यांची तशा परिस्थितीतही समक्ष गाठ पडल्यावरही जणू काही घडलेच नाही अशी स्थितप्रज्ञ दशा त्यांच्या कृपेनेच केवळ लाभली असेच म्हणावे लागते ! पू. स्वामींच्या चरणी मी फार पूर्वीच 'रामभक्ती'ची याचना केली होती आणि त्यांनी ती दिलीही

होती ! त्या भक्तीच्या आवेगामुळे कधी अत्यंत व्याकुळता येई, तर कधी खूप हसू येऊ लागे, तर नामसंकीर्तन सुरू झाले की देहभान विसरून नृत्यच सुरू होई ! एकदा माझी तब्येत फार बिघडलेली होती; पण नामसंकीर्तन कानावर पडल्यावर जे आतूनच भजन सुरू झाले ! त्या वेळी खरोखर 'फुटो हे मस्तक तुटो हे शरीर नामाचा गजर सोडू नये' म्हणजे काय याची अनुभूती आली असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही ! हे डॉक्टर असल्याने ह्यांना चिंता पडली की (पत्नीचे) माझे आता काय होणार? ह्यांनी पू. स्वामींना सर्व जाऊन सांगितले. तेव्हा मी ज्या खोलीत होते तेथे पू. स्वामी आले आणि म्हणाले, 'कमा ! शांत हो, शांत हो, शांत हो ! तुला आणखी काय देऊ? हे चरण तुझ्याकडे गहाण आहेत !'' आणि ते शब्द कानांवर पडताच आवेग एकदम कमी झाला ! पण ते शब्द कायमचे हृदयात कोरले गेले आहेत ! या पेक्षा आणखी कृपा कृपा म्हणजे काय असते !

आमचे एक गुरुबंधू श्री. श्रीरामजी गिल्डा यांच्या प्रभुप्रेमाने प्रसन्न होऊन त्यांनाही एकदा आशीर्वाद दिला गेला की, 'माये अपसर, अपसर' तेव्हा पासून त्यांच्या ठिकाणी वैराग्य उत्पन्न झाल्याचे आम्ही अनुभवत आहोत ! पू. स्वामींच्या शब्दांत विलक्षण सामर्थ्य होते ! त्यांची आठवण होत नाही असा क्षणही जात नाही ! त्यांच्या कृपेचे अनुभव सतत येत असतात.

सन १९७९ मध्ये त्यांचे चरित्र लिहावे म्हणून त्यांच्या हस्तलिखित वह्या सर्व परंडा येथून मागवून घेतल्या. त्या वाचून संकलन करीत असता त्यांनी लिहिलेले काव्य ज्यात त्यांनी लिहिले होते की 'सोने आणि माती' आम्हास समान आहेत, हे वाचनात आले आणि चमत्कार असा झाला की त्या वेळी वाटले की आपल्यालाही आजपासून सोने आणि माती समान झाली ! आणि सरळ अंगावरचे सोन्याचे दागिने उतरून ठेवले ! आणि त्यांच्या कृपने परत कधी मोह झाला नाही !

एक का दोन अद्यापही कृपेचे इतके अनुभव येतात की, लिहावे तेवढे थोडेच ठरतील ! १९९१ मध्ये म्हणजे ह्यांना देवाज्ञा झाल्यावर २५ वर्षे उलटल्यावर एकदा स्वप्नदृष्टांत झाला की 'कुणाला अनुग्रह घेण्याची तीव्र इच्छा असेल तर तू मार्गदर्शन कर ! पण तुझ्या हातून दोष घडतात म्हणून आम्ही मात्र उपोषण करू !' तेव्हापासून पू. स्वामींच्या समाधीवर माळ ठेवून त्यांचा अनुग्रह घेणारांना मार्गदर्शन फक्त मी करते ! पण माझे दोषासाठी सद्गुरुंना त्रास होतो ही खंत सतत वाटत असते !

हरि ॐ तत् सत्

●●●

काही वैयक्तिक स्वरूपाच्या आठवणी

डॉ. वि. ना. जोशी

श्री प. पू. स्वामींचा संबंध माझ्या आयुष्यात १९५१ सालापासून आला. तत्पूर्वी कै. वडिलांसह (श्री. वा. भा. जोशी) त्यांचे प्रथम दर्शनास गेलो होतो इतकेच. माझा विवाह त्यांच्या आदेशानुसारच झाला. त्या वेळी श्रींचा मुक्काम ईस्लामपूरला श्री. डॉ. वैद्य यांचेकडे होता. त्यांचा आशीर्वाद मिळावा म्हणून मुद्दाम विवाह तेथेच केला होता. लग्नानंतर आम्ही नवविवाहीत लगेच दर्शनास गेलो. त्या वेळी जोडप्यास चार शब्द सांगावेत अशी विनंती ती. कै. काकांनी (वडिलांनी) केल्यावरून त्यांनी सांगितलेले शब्द अद्याप स्पष्ट आठवत आहेत. 'विवाह हा दोघांनी गृहस्था धर्माचे पालन करण्यासाठी असतो. दोघांनीही परस्परांस सहाय्य करून पारमार्थिक उद्दिष्ट साध्य करावे इ.'' संततीस काही त्रास आहे असे कुंडलीवरून समजल्याने श्रींनी आमचेकडून दर मंगळवारी मंगळाच्या शांतीसाठी होम, जपादि ६४ विधि असे करून घेतले होते. पुढे व्यवसायासाठी शिराळा जि. सांगली येथे वास्तव्य झाले तेही श्रींचे आदेशामुळे. येथे येऊन स्थिर झालेवर एका पत्रात 'आता तेथे एखादे घर बांधावे' असे कळविल्यावर मी जागा घेऊन लहानशी वास्तु उभी केली. त्या वास्तूस श्रींचे चरण लागावेत अशी प्रार्थना केल्यावर 'पाहू तशी वृत्ति उठली तर येऊ.' असे उत्तर मिळाले. माझे दवाखान्यात दर सोमवारी व शुक्रवारी इस्लामपूरहून डॉ. वैद्य रोगी तपासण्यासाठी येत. श्रींचा मुक्कामही तेथेच होता. आणि एक दिवस अचानक दुपारी ४ चे सुमारास श्रींचे आगमन झाले. आमची खूप तारांबळ उडाली. पूर्वतयारी काहीच नाही. स्वागत तरी कसे करणार? दारात पाट मांडला त्यावर येऊन उभे राहिले व सौ.स म्हणाले सावकाश कर आम्ही थांबतो. मग पाय धुणे, दूध घालणे, ओवाळणे वगैरे विधी करून आसनावर बसले. आम्ही दोघांनी कृतज्ञतेने (आमची घरांस पाय लागावे ही इच्छा पूर्ण झाल्यामुळे) वाकून गुडघे टेकून नमस्कार केले. मुलांना करण्यास सांगितलेवर त्यांनीही आमचे सारखेच केले. 'अरे लांबडा नमस्कार पाय पसरून करा' असे म्हटल्यावर, 'आईवडील करतील तर मुले करणार' असे स्पष्ट उद्गार श्रींनी लगेच काढले. कोणतीही भीडभाड न ठेवता तोंडावर बजावण्याच्या त्यांच्या स्वभावाची कल्पना सर्वांना होतीच. नंतर परत जाताना सर्व घराची मुद्दाम आस्थेवायिकपणे पाहणी करून 'चांगले डीसेंट झाले आहे' असे उद्गार काढून परत गेले. वास्तुपुरुष चांगला असून शांत आहे असे म्हणाले. आम्हास खूप धन्य वाटले !

शिक्षा व अत्यंत प्रेमपूर्वक क्षमा

श्रींचे रागास व प्रेमास पात्र झालेले आमचे सारखे अनेक अनुग्रहीत आहेत. एक वेळ माझेकडून मला अजिबात कल्पना नसता त्यांचे दृष्टीने अपराध घडला ! झाले मग एकदम रागही तसाच ! दोघाही पती व पत्नीना मुखावलोकनही बंद ! 'श्रीराम' या मंत्राचा १ कोटी जप, दर शनिवारी हनुमानचालीसा पाठ. दर पौर्णिमेस नरसोबावाडीस जाऊन दर्शन घेऊन मनापासून प्रार्थना करून येणे. हे सर्व झालेवर पाहू. अशी एकदम शिक्षा सुनावली. अपराध कसा झाला? मी मुद्दाम केला का? याबद्दल काहीच विचारांत न घेता शिक्षा कानांवर पडल्याने तरुण वय, पूर्वीचा काहीही अनुभव नाही असे असल्याने मी खूप घाबरून गेलो. श्रींचा संबंध, अनुग्रह वगैरे सर्व काही कै. वडिलांचे मुळेच झालेने मी त्यांनाच शरण गेलो. ते माझा स्वभाव-चारित्र्य पूर्ण जाणून असल्याने मी सर्वस्वी निरपराधी असल्याची त्यांची खात्री होती. ते अशा प्रसंगी माझ्या पाठीशी उभे राहिले. 'आपल्या सद्गुरुंवरील निष्ठेची अशा वेळी कसोटी लागते. आपण मनाने शांत राहिले पाहिजे. जे होते ते आपल्या अंतिम कल्याणासाठीच होते असे पक्के समजून वागावे.' असे सांगून त्यांनी मला धीर दिला.

अशा प्रकारे काही महिने गेले. मी साधारण ७५ लक्ष पर्यंत जप केला असेल. नरसोबा वाडीच्याही २/३ खेपा केल्या असतील. एक दिवस श्री. डॉ. वैद्यांचेकडे आम्हा दोघांना संध्याकाळी मुक्काम करण्याची पाळी आली. श्रींची खोली माडीवर होती. संध्याकाळचे ध्यानादि कार्यक्रम सुरू होते. आम्ही त्यात भाग घेणे शक्य नसल्याने खालीच थांबलो होतो. तेवढ्यात कै. डॉ. दादा (डॉ. वैद्य) वरून खाली आले व श्रीस्वामींनी आम्हास बोलाविले आहे. क्षमा केली आहे. घाबरू नका वस्त्रे बदलून वर चला असे सांगितले. आम्ही दोघे त्या प्रमाणे भीतभीतच श्रींचे समोर जाऊन सद्‌गदित अंतःकरणाने दंडवत केला. त्या वेळी श्रींनी लगेच जवळ घेऊन मांडीवर दोघांचे डोके घेऊन अत्यंत प्रेमाने कुरवाळले. पाठीवरून हात फिरवून आश्वासित केले. तो स्पर्श व ते शब्द अद्याप ताजे असल्यासारखे जाणवत आहेत. आम्ही धन्य झालो ! राग गेला !

असे आमचे सद्‌गुरु ! त्यांचेकडून जे नाम मिळाले ते अशा प्रकारे अंतःकरणातच पक्के बसले. पुढे कालांतराने नामाबद्दल प्रेम निर्माण झाले. उपासनेची दिशा केवळ नामच अशी पक्की श्रद्धा निर्माण झाली. अशा प्रकारे श्रींचा रागही अनुराग ठरला. जन्मोजन्मी फिटणार नाही एवढी कृपा मिळाली. 'काय करू मी प्रत्युपकारा पाया पडतो वारंवार'' यापेक्षा काय करू शकतो?

●●●

सौ. शशी जोशी

श्री गुरवे नमः

श्री राम समर्थ

आधी वंदू गणेशा, मग सरस्वती मातेसी, नमन माझे सद्‌गुरु माऊलीसी । द्यावी बुद्धी चरित्र लिहिण्यासी

चास कमान हे माझे माहेर. पुणे जिल्ह्यातील छोटेसे गाव. तेथे माझे वडील (कै. काका गुळाणीकर) रहात होते. ते वृत्तीने धार्मिक, उदार, शिस्तप्रिय होते. त्यांचा गृहस्थाश्रम अत्यंत उत्तम उदाहरण घ्यावे असाच होता.

माझी आई अतिशय प्रेमळ व गरीब स्वभावाची होती. त्यांच्या आज्ञेबाहेर ती कधीच चुकूनसुद्धा जात नसे. अशा पुण्यवानाच्या पोटी जन्म झाल्याने मला लहानपणी थोडा न कळता संतसंग घडला असावा, असे मला वाटते.

वडील वैद्यकी उत्तम जाणत होते व मोफत जन्मभर पदरची औषधे देऊन त्यांनी लोकांची सेवा केली.

तसेच आमचे घरी गावात कुणी बैरागी, संत, अगर फौजदार, पोलीस, तलाठी, कोणी नवखा माणूस या सर्वजणांना काकांचे घर दाखवित असत. त्यामुळे श्रीप्रज्ञानानंद स्वामी इ. सन १९४३ साली कार्तिक महिन्यात आमचे घरी आले. तेव्हा दुपारची वेळ होती. मोठी माणसे विश्रांती घेत होती व मंदिरात (पांडुरंगाच्या) आम्ही मुले (माझी मामे भावंडे शिकायला आमचेकडे होती) सर्व खेळत होतो.

जाळीचा दरवाजा होता. स्वामीजी त्या वेळी आले व मुलांनो काका गुळाणीकर येथेच राहतात का? असे विचारले तेव्हा आम्ही दरवाजाचे कुलूप काढून त्यांना आत पाट मांडून मंडपात बसण्यास सांगितले व ती. काकांना बोलावले. त्यांनी पाणी मागितले. ते त्यांना दिल्यावर त्यांनी प्रथम मला प्रश्न केला, तुझे नाव काय सांग? मी शशिकला असे सांगताच त्या नावाचा अर्थ काय? कथेकरी बुवा आमचे उत्सवात येत त्यांच्याकडून नुकताच समजलेला अर्थ सांगितला. शशि म्हणजे चंद्र व कला म्हणजे प्रभा. त्यावर ते हुशार आहेस असे म्हणाले. त्या बालवयात अगदी मुठभर मांस चढल्याचा आनंद झाला. माझे ९।१० वर्षाचे वय होते.

ते दिसण्यास तेजस्वी असल्याने त्यांच्या बद्दल आदरभाव वाटला व स्वामी कुणीतरी मोठे आहेत असे वाटले. तेथील चासच्या वास्तव्यात त्यांचे एखादे काम करण्यात आनंद वाटे. ते कायमच एका ठिकाणी रहात नव्हते. मध्येच आळ्याला जात. मध्येच नगर, खेड, पुणे कुठेही जात.

ते त्या वेळी पहाटे ५ ला उठत. दक्षिण वाहिनीवर (भीमानदी) स्नान करून येत व रामायण वाचन, लिखाण हेच करीत असत. कधी कधी चातुर्मासात दुपारी प्रवचन वगैरे असे. रामायण किंवा गीता हे विषय असत. सायंकाळी परत स्नान असे.

भिक्षा मागत पण वैश्वदेव नैवेद्य ज्या घरी सोवळ्याने होत असेल अशा तीन घरात म्हणजे गुळाणीकर, चासकर व जोगळेकर बाई या घरांत भिक्षेला जात. सायंकाळी जेवण नसे, कॉफी अगर दूध कोणी दिले तर घेत.

जोगळेकर बाई बाल विधवा होत्या. केशवपन केलेल्या सोवळे-ओवळे व्यवस्थित पाळणाऱ्या अशा होत्या. त्या व माझे वडील हे दोघे जण अनुग्रहीत होते. त्या काळात फारसे दीक्षा देत नव्हते.

आम्हा मुलांना सारखे त्यांच्याकडे जावू देत नव्हते. ठराविक वेळी शाळा सुटल्यावर ५ ते ७ या वेळात नमस्कार करण्यास गावातील कोणी येणारे व आम्ही घरातील सर्व जात असू. 'नारायण' असे नमस्कार केल्यावर म्हणत. काही त्यांनीच विचारले तर थांबत असत. नाहीतर लगेच खाली यावयाचे.

संन्याशी, बैरागी यासाठी स्वतंत्र मठ बांधलेला मंदिराजवळ होता. बाबूशेट कटारे (मारवाडी) हे पण अनुग्रहित होते. ते दुकान बंद केल्यावर दर्शनासाठी रात्री ८ वाजता येत. स्वामी द्रव्य स्पर्श करीत नसत. काही आणण्याचे लिखाण, साहित्य वगैरे त्यांना किंवा माझ्या भावाला सांगत व ते पुण्याहून आणून सुद्धा देत असत. कारण चास अगदी खेडे होते. नाकाच्या सायनसच्या आजाराने त्रास होत असे. त्यामुळे सुगंधी तपकीर ओढत. ती आणण्यास सांगत. पुढे तीही एकदम सोडली.

त्यांच्याकडे परगावहून बरेच जण मधून मधून येत. त्यापैकी कै. ग. वि. जोशी मुंबई, आबासाहेब काळे (परंडा) अय्याबुवा (सज्जनगड) ना. भा. जोशी, सौ. सत्यभामाबाई (कुंडल) सह येत.

स्वामीजींनी एक-दोन वेळा दासनवमीचा उत्सव रामाचे देवळात करून घेतला. त्या वेळी सोनोपंत दांडेकर यांचे स्वामीसमोर कीर्तन झाले होते.

त्यांना पाहण्याचे भाग्य लाभले आहे. त्या उत्सवात आम्हा मुलांकडून करुणाष्टके, श्लोक, सवाया पाठ करायला लावून ठराविक वेळेला म्हणवून घेत. कशा पद्धतीने म्हणावे, हे ते शिकवत. त्यात चिणे यांच्या दोन मुली, त्यांचा भाऊ शंकर, माझे मामे भाऊ, बहीण बसत. मजा येत असे. गेले ते दिवस, स्वप्नमय झाले.

शंकर चिणे परांडेस आला होता. तसेच नरहरी आपटे संघ शाखा घेत असे. तोही यावयाचा. त्याने सातारला असताना येऊन दीक्षा घेतली. तो गेल्यावरही त्याची बायको, सून, मुलगा व मुलगीही स्वामींकडे ओढली

जाऊन मागचे वर्षीच समाधीजवळ अनुग्रहित झाली.

पुणे, पनवेल येथून ते येताना स्वामींची सद्गुरु म्हणून त्यांना ओढ वाटून ते स्वामींचे अनुग्रही झाले. हे त्यांचे भाग्य थोरच आहे.

माझे ५१ साली लग्न झाले. मी श्री. ना. भा. जोशी यांची सून झाले. त्यामुळे पुढील आयुष्य मला पारमार्थिक वातावरणात घालवता आले. ही पण स्वामीजींची कृपा होय.

एकदा माझे वडील रोज पूजेनंतर गुरुपुजा करीत. हे करत असताना जोशींच्या मुलाला शशी देऊन टाका, असे काका म्हणाले. तत्क्षणी माझे वडील म्हणाले, 'दिली' महाराज 'ब्रह्म वाक्यो जनार्दना' असे म्हणाले. मी दिली महाराज, त्यांनी नकार दिल्यास दुसरे बघेन. नाहीतर नाही. त्यांना पाहिलेही नव्हते. तरी दोन वर्षांनी माझे लग्न त्यांच्याशी (डॉ. वि. ना. जोशी) यांच्याशीच झाले. आम्हाला वर्षभरात अनुग्रहीत केले. ती. काका (सासरे) ह्यांच्या पुण्याईने अनुग्रह मिळाला. कारण त्या काळात आम्हाला त्यांची अमोल किंमत कुठे कळत होती?

माझ्या सासूबाई कै. काकी ह्याही अनुग्रहीत होत्या. त्या खूप प्रेमळ होत्या, सोवळ्याचे बाबतीत त्यांना स्वामींकडून सर्टिफिकेट मिळाले होते.

त्यांनाही स्वामींची सेवा घडली. ते दोघेही अत्यंत प्रेमळ होते. ती. काका (सासरे) तर आम्हाला (माझी जाऊ व मी) यांना माझ्या मुलीच म्हणत. सुना असं कधीच म्हणत नसत.

त्यांचा परमार्थातील अधिकार खूप मोठा होता. स्वामीजी त्यांच्या प्रवचनांस आवर्जून बसत. इतके ते प्रवचन सुंदर, तळमळीने सांगत. माझ्या वडिलांशी गुरुबंधू म्हणूनच प्रेम करीत. (व्याही असं वागत नसत) जनक दशरथ सारखे वाटायचे. माझे वडील गेल्यावर आता तुझे वडील माझ्यात आहेत. तू गेले असे समजू नकोस, असे म्हणाले व तसे वागलेही.

इस्लामपूरला लग्न झालेनंतर तेथेच पू. श्री कमाताई व डॉ. वैद्य यांचेही प्रेम मिळाले. त्यांच्यामुळेच आम्ही शिराळ्याला दवाखाना घातला व यशही मिळाले. त्यांचे हे ऋण खूपच मोठे आहे. नंतर स्वामींच्या आशिर्वादाने व त्यांचे सांगण्यावरून जागा घेतली व ७/८ वर्ष भाड्याचे घरात होतो. नंतर घर बांधले. तेथेही सद्गुरु स्वामी महाराज येऊन घर पुनीत करून वास्तु पुरुषाजवळ आसन घाल असे सांगून तेथे बसले. सर्व घरात हिंडून वास्तू पवित्र करून गेले.

ते एकदमच आल्याने माझी गडबड झाली. दारात उभे राहिले, अगं तुला काय करायचे आहे ते सावकाश आण. आम्ही जरा थांबतो. गडबडून जाऊ नकोस. मी पाय धुवून ओवाळल्यावर आत आले. असे प्रेमाचे अनुभव बरेच आहेत. त्यांची कृपा अलौकिक होती. पण आमच्या भल्यासाठी रागवतही असत. त्यांच्या रागाची भीती वाटत असे. सर्वांनाच, मोठ्यांना सुद्धा. ते शिस्तप्रिय व सर्वांबद्दल तळमळ त्यांना जास्त, त्यामुळे वरचेवर विचारीत. तुमचे रोजचे काय चालले आहे. आयुष्य वाया जाते याचा विचार करा. जप, रामायण वगैरे चालू आहे का? बायकांनी काही नाही केले तरी रामायण, दोन दोहे तरी मारुतीचे आवाहन करून वाचावेत, असे सांगत. रोज पतीला पायावर डोके ठेवून नमस्कार करावा असेही सांगत. त्यांची सर्वांवरच कृपादृष्टी असे. पण ज्याचा जेवढा अधिकार ग्रहण करण्याचा त्याला ती जाणवणार.

सद्गुरुंबद्दल किती लिहावे तेवढे थोडेच आहे, त्यांचे वर्णन शब्दात होणे अशक्य.

काही वैयक्तिक आठवणी राहून गेल्या त्या लिहीत आहे. माझ्या वडिलांची गुरुनिष्ठा फारच होती. ते कधीही समोर गुरु दिसले की साष्टांग नमस्कार करीत असत. त्यांचे वय ८० चे पुढे होते. त्यामुळे स्वामींनाच त्यांच्या समोर सारखे जाण्याचा संकोच वाटे. ते गेले तेव्हा सद्गुरुंचे शब्द आहेत, 'काका वैकुंठाला गेले, यात शंका नाही.' रामायण वाचनही मरेपर्यंत चुकले नाही. माझी गोड आठवण अशी – माझे लग्न झाले तेव्हा मी अवघी पंधरा वर्षांची. माहेर खूप दूर. पाठराखीण कोणी नव्हते. माझे वडील दोन दिवस राहिले व निघाले. मला रडू आले. का रडतेयस मी आहे ना तुझ्याकडचा पाठीराखा. जां रडू नकोस. आम्ही राहणार आहोत. 'सद्गुरुसारिखा असता पाठीराखा। इतरांचा लेखा कोण करी' हे तेव्हा समजत होते कुठे?

माझी गंमत करायची लहर आली की सर्वदेखत तेवढा समचरण हा पांडुरंगाचा श्लोक म्हणायला सांगत. त्यात विठ्ठल चिंतयामी असे. शेवटी म्हणाले की कसे नाव घेतले म्हणून टाळी वाजवत. धन्य ते वात्सल्य असे कितीतरी प्रसंग आहेत. अशा मला न कळलेल्या असामान्य, ब्रह्मनिष्ठ सद्गुरु स्वामी महाराजांना माझे सादर सविनय चरणी मस्तक ठेऊन कोटी कोटी नमस्कार.

त्यांचीच चरण रज.

●●●

सौ. राजश्री दिवाकर

प. पू. प्रज्ञानानंद स्वामींचे अनुग्रहीत नसूनपण कै. शंकरदेव नरहर वैद्य रा. परंडा हे माझे वडील (आम्ही त्यांना आप्पा म्हणत असू.) त्यांचा स्वामींशी नित्य सहवास येत असे. आप्पा वेदशास्त्र संपन्न असल्यामुळे परंड्यात त्या वेळी त्यांचे शिवाय दुसरे कोणीही वैदिक करणारे नव्हते. त्यामुळे स्वामींच्या प्रत्येक धार्मिक कार्यात म्हणजे गुरुमंत्र देणे, लिंगार्चन पूजा, सत्यनारायण पूजा, महाशिवरात्रीची ४ धामांची पूजा इ. स्वामींच्या मार्गदर्शनाखाली आप्पांना बरोबर घेत असत.

मला आठवतंय, रोज सकाळी ति. आदिनाथराव यादव यांचेकडून गडी ति. अप्पांना घेऊन जाण्यास येत असे व त्या प्रमाणे ते पू. स्वामींकडे जात असत व दोघांत धार्मिक विषयावर चर्चा होत असे. पू. स्वामी 'संध्योपासना' ग्रंथ लिहीत असताना हाताच्या मुद्रा वगैरे बद्दल माहिती सांगत. संदर्भासाठी ती. आप्पा धर्मसिंधु ग्रंथ घेऊन जात असत. कोणतीही पूजा सांगणेचे अगोदर स्वामी आप्पांकडून मंत्रोच्चार करून घेत. जर कुठे पाठभेद असेल तर सुधारणा करून देत व आप्पा त्याप्रमाणे वागत असत. आप्पांचा स्वभाव शांत होता. त्यांना स्वतःस काही शंका वाटल्यास त्यांचे निरसन ते स्वामींच्याकडून करवून घेत.

एके वर्षी अधिक मासात स्वामींनी महिनाभर सामुहिक सत्यनारायण पूजा करविल्या. एका एका दिवशी १० ते १५ पूजा होत असत. तसेच श्रावण महिन्यात, महिनाभर लिंगार्चन पूजा करवून घेत. श्री. मुगांवकर वकिलांचे घरी गावातून लांबून लोक सोवळ्यात पूजा साहित्य घेऊन, पहाटे ५ वाजता जात असत. पूजा ७ वाजेपर्यंत चाले. पूजेला महिलावर्गपण असे. सामुहिक पूजेचे दृश्य फारच सुंदर दिसत असे. नंतर सर्वजण पाटावर केलेली पूजा विसर्जन करणेसाठी विहिरीवर जात. तेव्हा पाटावर दिवे असत.

बेल, फुले यांनी सजवलेली पूजा पाहून मनाला फारच आनंद वाटत असे.

माझी आई सौ. अन्नपूर्णा शंकरदेव वैद्य ही पण फार धार्मिक. अशिक्षित असूनसुद्धा तिने आमच्यावर सुसंस्कार केले. ती. अप्पा व आईनी पू. अंमळनेरकर महाराजांचा अनुग्रह घेतला असूनही ते स्वामींच्या नित्य सेवेला, दर्शनाला व प्रवचनास जात.

पू. स्वामींचा स्वभाव वरवर रागीट व करारी दृष्टी असायची. त्यामुळे इतर कोणीही त्यांचेशी बोलण्यास सहसा धजत नसत. पण आई व आप्पा घरातील नित्य घटना स्वामींना सांगत असत. आई मंगळवारातून मंडईत नित्य लिंगार्चन पूजेस पहाटे ५ वाजता जात असे. पुढे पुढे आईस व इतरांना अंतर लांब असल्याने जाणे कठीण होई. त्यामुळे आईने स्वामींस ही अडचण सांगितली. त्या ऐवजी आम्ही इकडील सर्व मंडळी आमच्या घरासमोर पू. कल्याण स्वामींचा मठ आहे त्या ठिकाणीच आम्ही लिंगार्चन पूजा करतो व स्वामींनी एकदा पूजा पाहण्यास यावे अशी विनंती केली. त्याप्रमाणे दरवर्षी श्रावण मासात लिंगार्चन पूजा होत असे व स्वामीसुद्धा एकदा मठात येऊन गेले.

आईची इच्छा असायची की स्वामींच्या आवडीचे पदार्थ सोवळ्यात करून स्वामींना पुडी घेऊन जावी. त्या प्रमाणे स्वामींना विचारून ताट घेऊन जात असे. तसे स्वामी म्हणत एवढ्या लांबून अनवाणी पायाने ताट आणण्याचा कशाला त्रास घेतेस?

अशा सत्‌शील आईवडिलांमुळे माझीही अध्यामिकाकडे प्रवृत्ती झाली. स्वामींचे पट्टशिष्य पू. जोशी काकांच्या मराठी सुश्राव्य रामचरितमानसाचा खूपच प्रभाव पडला व तशी पात्रता नसतानापण स्वामींचा अनुग्रह झाला. गुरुमंत्र कशासाठी घ्यायचा हे कळण्याचे वय नव्हते. आईवडिलांची कृपा व माझी पूर्वपुण्याई यामुळेच पू. स्वामींचा अनुग्रह घ्यावा अशी इच्छा झाली. तसे पहाता मी स्वतः स्वामींशी बोलले नव्हते. वडिलांमार्फत मला स्वामींनी ६० हजार रामनामाचा जप करण्यास सांगितला व १९६३ च्या चातुर्मासात लोहारा मुक्कामी गुरुपौर्णिमेस मला घेऊन येण्यास कळविले. परंतु वडिलांच्या काही अडचणींमुळे आम्ही जाऊ शकलो नाही. नंतर स्वामींनीच दि. ३.१०.१९६३ रोजी परंड्यासच गुरुमंत्र देण्याचे ठरविले. त्यास लागणारे साहित्यपण विकत आणून खर्चात पडू नका असे सांगितले. घरातील आर्थिक परिस्थिती बेताचीच. घरातील पांढऱ्या (पंचांना) वस्त्रांना गेरू लाऊन आणा, असे सांगितले व त्या प्रमाणे आईवडिलांच्या उपस्थितीत आमचा गुरुमंत्र सोहळा पूर्ण झाला. एवढ्या महान गुरुंचा आपणास अनुग्रह मिळाला याचं आत्मिक समाधान वाटत असे. त्या वेळी वय फक्त १५ किंवा १६ वर्षाचं असेल. तेव्हा स्वामींना (गुरुंना) काय विचारावं, अध्यात्मिक प्रगती कशी करावी काहीच कळत नव्हतं.

पू. स्वामींनी स्थूल देहाचं कार्य संपल्याचे सांगून प्रायोपवेषन घेऊन पुढे देह विसर्जन करण्याचे ठरविले. तेव्हा प्रायोपवेषनास कोठे बसायचे हे ठरवीत असताना पू. स्वामी ती. आप्पांना म्हणाले तुमच्या घरी बसता येईल. तेव्हा आप्पांनी बसण्यासाठी आसन मांडून ठेवले होते. परंतु माणसे खूप येतील, जागा पुरणार नाही असे वाटल्यावर पू. स्वामींनी ती. नानासाहेब देशमुखांचे घरीच राहण्याचे ठरविले. तसेच देह ठेवल्यानंतर अंत्य संस्काराचा सर्व विधी ती. आप्पांना सांगितला व पुढे स्वामींनी सांगितल्याप्रमाणे ती. आप्पांनी तो विधी केला. त्यानंतरही पू. स्वामींच्या पूजेचा विधी प्रतिवर्षी ती. आप्पाच सांगत असत.

गुरुची अपरंपार कृपा आहे. त्यामुळे त्यांचे नित्य मार्गदर्शन होते. श्री रामचरित मानसाचे १०८ पारायणे त्यांच्याच प्रेरणेने करण्याचा संकल्प ते करवून घेत आहेत.

'शुभं भवतु'

●●●

ब्रह्मीभूत परमहंस परिव्राजकाचार्य श्री प्रज्ञानानंद सरस्वती

श्री. विष्णूपंत देव

परंडा येथे यांची समाधी हंसराज स्वामी मठामध्ये स्थित आहे. दरवर्षी फाल्गुन वद्य १० ला समाधी सोहळा संपन्न होतो. दरवर्षी प्रमाणे चालू वर्षी पण फाल्गुन वद्य १० शके १९२३ रविवार दि. ७।४।२००३ समाधी सोहळा आहे. म्हणून हा अल्पसा लेखन प्रपंच.

स्वामींचे पूर्वाश्रमीचे नाव दत्तात्रय नारायण कर्वे. नारायणराव हे शिक्षक होते. धार्मिक वृत्ती व संत वाङ्मयाची आवड त्यामुळे हेच संस्कार पुढे स्वामींचे ठिकाणी अवतरले.

स्वामींचा जन्म वैशाख वद्य ३० दि. १५ मे १८९३ रोजी माहीम ता. पालघर येथे झाला. वयाचे १० वे वर्षापासून कथाकीर्तनाचा छंद लागला. १९१८ मध्ये बडोदा कॉलेजमधून संस्कृत विषय घेऊन ते बी.ए. झाले होते. पुढे एस.टी.सी. उत्तीर्ण होऊन त्यांनी १६ वर्ष शिक्षकाची नोकरी केली. पण सद्‌गुरु कृपेची तीव्र ओढ लागल्याने श्रींना रावजीबुवा व श्री बाबा गंगादास या सत्पुरुषाची कृपा लाभली व त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले.

पुढे स्वामींचे गायत्री पुरश्चरण, अनुष्ठान हे यथाक्रम स्वामींचे चरित्रामध्ये आपण सर्वांनी वाचले आहे. स्वामी १९५९ ते समाधी काळापर्यंत (१९६८) परंडा येथेच वास्तव्यास होते. शके १८८१ श्रावण शु. १ पासून लिंगार्चन सुरू झाले. या काळात स्वामी कै. श्रीधरराव देशमुख यांच्या वाड्यात वास्तव्यास होते. प्रत्येकजण १२१ लिंग करून पूजा करीत. लिंगार्चन पूजा सांगण्यास माझे पिता श्री. वे. शा. सं. शंकरदेव वैद्य हे पौरोहित्य करीत असत. पुढे स्वामींनी सामुदायिक सत्यनारायण पूजेचा संकल्प करून दर पौर्णिमेस श्रीसत्यनारायण पूजा होई त्याचे पण पौरोहित्य माझे वडीलच करीत होते.

एकदा एका पौर्णिमेस वडील कामानिमित्त परगावी गेले होते व त्यांनी पूजा सांगण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली होती. स्वामी समोर असताना पूजा सांगण्याचे धाडस माझ्यात नव्हते. कारण मी शिक्षकी पेशा स्विकारलेला होता. भिक्षुकीचा अनुभव नव्हता फक्त संस्कार होते. स्वामींनी पूजा सांगण्यास मला बसविले. मी पूजा सांगू लागलो. स्वामी ऐकत होते. मी फुले वाहताना मंत्र म्हणत होतो, 'मयाहुतानी पूजार्थ पुष्पाणी प्रतिग्रीह्यतां' स्वामींनी दुरुस्ती केली 'मया आहुतानी'. मी उदबत्ती ओवाळताना म्हणालो, धूपं दर्शयामि, स्वामींनी सुधारणा सांगितली, 'धूपं आघ्रापयामि' शेवटी स्वामींनी जवळ बोलावून सांगितले, कोणतीही विद्या कठीण नाही. प्रयत्न साध्य आहे.

मी परंडा तालुक्यातील लोणी येथे शिक्षकाची नोकरी करीत होतो. वहानाची सोय नव्हती. मला स्वामी विचारीत, तू चालत प्रवास करून जेवण करतोस का? का जेवण करून प्रवासास जातोस? इतके सूक्ष्म निरीक्षण स्वामींचे होते. भेंड मूळीच्या औषधाचा उपयोग ते सांगत म्हणजे आयुर्वेदाचे त्यांचे ज्ञान अगाध होते.

स्वामींनी मानवतापूर्ती साधन संध्योपासना हा ग्रंथ १९६३ मध्ये प्रकाशित केला होता. त्यात ज्या मुद्रा छायांकित केल्या आहेत त्या मुद्रा कै. शंकरदेव वैद्य व कै. माधवराव देशमुख यांचेकडून स्वामींनी करवून घेतल्या व त्याचे छायांकन केलेले आहे. माझे वडील स्वामीचे दर्शनास गेल्यावर त्यांना बसवून 'मृतयती संस्कार' कसा करावा हे वहीवर नोंद करून घेण्यास अगोदरच पूर्वतयारी म्हणून त्यांच्याकडून लिहूनच घेतले होते.

स्वामींचा प्रायोपवेशनाचा कृत निश्चय झाल्यावर जागा शोधण्यासाठी मंगळवार पेठेतून श्रीकल्याण स्वामी मठात आले होते. तेथे दर्शन घेऊन स्वामी आमचे घरी पण आले होते. पण ही दोन्ही ठिकाणे लहान आहेत, लोक दर्शनास व अंत्य यात्रेस भरपूर येतील जागा पुरणार नाही, म्हणून श्री वासुदेवराव उर्फ नानासाहेब देशमुख यांच्या वाड्यातील माडीवरची प्रशस्त जागा पसंत केली व तेथेच त्यांचा शेवटचा मुक्काम झाला. फाल्गुन वद्य प्रतिपदेला प्रायोपवेशनास सुरुवात झाली अन्न, पाणी वर्ज्य झाले. श्री नानासाहेब देशमुख यांचे मेहुणे डॉ. निळकंठराव कुलकर्णी हे स्वामींची प्रकृति तपासत. नित्य झालेले प्रकृतीतील बदल लिहून स्वामींना सांगत होते. अर्थात हीसुद्धा श्रींचीच इच्छा होती.

माझे वडील कै. शंकर देव वैद्य हे देशमुखाकडे नित्य दैनंदिन पूजेस होते. पूजा झालेवर ते दररोज तीर्थ स्वामींना देत असत. वडिलांना एक दिवस वाटले स्वामींचे पोटात तीर्थ रूपाने पाणी थोडे जास्त द्यावे म्हणून त्यांनी तीर्थ जादा हातावर घातले. पण स्वामी रागावले व म्हणाले तीर्थ तीर्थाच्याच प्रमाणात द्यावे.

मी अन्नपाणी वर्ज्य केले आहे, तीर्थ म्हणून मला पाणी पाजू नका.

स्वामी म्हणत मी देहत्याग केल्यावर माझे शरीराचे तुकडे करून जलाशयात टाका म्हणजे जलचर ते खातील. माझी समाधी बांधू नका कारण कालांतराने त्यावर श्वान लघुशंका करतील. कावळे त्यावर बसतील. ही विचारांची त्यांची दूरदृष्टी योग्य होती. हे अनुभव आजही प्रत्ययास येत आहेत.

बहुतेक बऱ्याच गावी व शहरातसुद्धा ज्या सत् पुरुषाच्या समाध्या आहेत त्या एकतर उघड्यावर आहेत. उत्पन्नाचे साधन असतानासुद्धा त्यांची पूजा होत नाही. ही वस्तुस्थिती स्वामींच्या सूक्ष्म दृष्टीतून सुटलेली नव्हती. म्हणूनच स्वामी समाधी बांधू नका म्हणत होते.

परंतु शिष्य वर्गाचे आग्रहास्तव स्वामींनी समाधीची जागा श्री हंसराज स्वामींचे शेजारी निश्चित केली होती. त्यांचे इच्छेप्रमाणे त्याच जागी आज श्री स्वामींची समाधी स्थित आहे.

●●●

आठवणी - श्री प्रज्ञानानंदांच्या

सौ. कुसुमशीला मोने

'आठवणी दाटतात धुके जसे पसरावे' तसे प. पू. स्वामींच्या आठवणींच्या धुक्यात ही कुसुमशीला केव्हा विरून जाते ते कळतच नाही. बाह्य जगाचा विसर पडून अंतर्विश्वात रमून त्या गोड आठवणींचा आस्वाद घ्यावा व पुनः प्रत्ययाच्या आनंदाचा अनुभव घ्यावा.

प. पू. स्वामींच्या आठवणी म्हटल्या की ते प्रसंग जसेच्या तसे अंतःचक्षूंपुढे उभे राहतात. तशी मी लहानच होते. १४-१५ वर्षांची असेन. त्या वेळी मी एकदा चासकमानला माझ्या वडिलांबरोबर गेले होते. त्या वेळी तेथे स्वामींचा मुक्काम होता. वडील गुरुपौर्णिमेसाठी म्हणून गेले होते. तेथे काका गुळाणीकर व श्री ताराबाई जोगळेकर रहात असत. एक प्रकारची ओढ वाटत होती. स्वामी गरम पाण्याने कधीही स्नान करीत नसत. पण त्या वेळी म्हणाले तुम्ही गरम पाण्याने स्नान घातलेत तरी चालेल. गुरुपौर्णिमेसाठी बरीच माणसे जमली होती. बाबुशेट कटारे फार सेवा करीत असत. मी व सौ. शशी जोशी (पूर्वीची गुळाणीकर) सर्वात लहान होतो. स्वामी म्हणाले, तुम्हाला काय करायचे ते करून घ्या. तेल लावा, उटणे लावा, गरम पाणी घाला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे व आमच्या आवडीने आम्ही सर्वांनी तो आनंद लुटला. गजाननविजयमध्ये एका अध्यायात महाराजांना स्नान घातल्याचे वर्णन आहे, ते वर्णन वाचताना मला नेहमी या प्रसंगाची आठवण होते. स्वामी पौर्णिमेशिवाय कधीही कुणाला स्पर्श करून देत नसत. तसेच पैशालाही स्पर्श करीत नसत.

त्यानंतर बरेच दिवस गेले. स्वामींची कृपा व्हावी असे सारखे वाटत होते. तत्पूर्वी माझा भाचा चि. राम हा व्हायरस न्युमोनियाने आजारी होता. ७-८ दिवस झाले तरी ताप निघेना म्हणून स्वामींना कळवले, तेव्हा त्यांनी हनुमानचालीसाचा पाठ करण्यास सांगितले. त्याप्रमाणे रात्री बसून आम्ही चौघांनी पाठ सुरू केला. रात्री अचानक राम घाबरून जागा झाला. तो म्हणाला, माझ्या उशाशी एक सोनेरी, केसाळ माकड बसले होते व पायाशी एक काळा राक्षस बसला होता. तो माझे पाय सारखे ओढत होता. दोघांची रस्सीखेच चालू होती. शेवटी त्या माकडाने जोरात मला ओढले व राक्षसाच्या डोक्यात गदा मारली. नंतर राक्षस निघून गेला. अंग गार पडत होते. एवढ्यात डॉ. आले. त्यांनी एक मोठे इंजेक्शन दिले. त्याला इतका दरदरून घाम सुटला होता की, अंथरूणही ओले झाले होते. आम्ही स्वामींना कळवले तेव्हा ते म्हणाले, गंडांतर टळले. रामाला हनुमंताने वाचवले.

माझ्या वडिलांना स्वामींनी वैश्वदेव करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे ते नेहमी अखंड वैश्वदेव करीत असत. असं साधन केलं की चित्तशुद्धी होते असे स्वामी म्हणत. वडील नेहमी खरं बोलत. शेअर ब्रोकर होते. पण कधीही कुणाला लुबाडून पैसा घेतला नाही. 'यथालाभ'संतुष्ट असे त्यांचे जीवन होते. ते बाहेर कुठेही पाणीही पीत नसत. रामायण वाचन, ज्ञानेश्वरी, गीता इ. रोज वाचन असे.

माझी सौ. आई काही दिवस अंथरूणावर आजारी होती. त्यामुळे तिला असे वाटे की माझे कसे होणार? पण एकदा वडील म्हणाले, तुला काही काळजी नको. तुझे सर्व व्यवस्थित करीन व मग मी निरोप घेईन.

त्याप्रमाणे सौ. आई गेल्यानंतर ४ वर्षांनी त्यांनी या जगाचा निरोप घेतला. स्वतः ३ वर्षे पिंडदान केले व आता मी मुक्त झालो म्हणून वयाच्या ८९ व्या वर्षी सांगून-सवरून ३१ डिसें. ८४ ला रात्री ११॥ वा. परमेश्वर चरणी विलीन झाले. स्वामींच्या कृपेने घरात एकी व आनंद नांदत होता. सज्जनगड जवळ असल्यामुळे मी एकदा स्वामींना प्रार्थना केली की, मी गडावर जाऊ का? तेव्हा ते म्हणाले, स्वामी येथे असताना गडावर जाणे महत्त्वाचे आहे का? तेव्हा मी तो विचार सोडून दिला. त्यावर स्वामी हसले व म्हणाले, बरं जा. आमचा मुक्काम येथून गेल्यावर तू कशाला इथे येणार आहेस. नंतर सौ. कमूताई लेले त्यांची मुले अशी १०-१२ जण गडावर जाऊन आलो. या मुक्कामात पहाटे ध्यानाला बसणे, आरती, काकडा इ. कार्यक्रम होत. एकदा वाड्याच्या वरच्या मजल्यावर मी ध्यानाला बसले होते. पण वृत्ती काही केल्या खाली येईना. तेव्हा स्वामी वर आले व कुंडलिनीचा श्लोक म्हटला व मग मी सावध झाले. मंत्रोच्चाराने कुंडलिनी जागृत करण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ होते. पाद्यपूजेच्या वेळीही काही चांगले अनुभव येत. स्वामींचे पाय धुताना स्वामी म्हणत, अगदी हळू धुवा. कुणी स्पर्श केलेला सहन होत नाही. इतके त्यांचे पाय मृदु, मखमलीसारखे वाटत. गुरुपौर्णिमेच्या दिवशी त्यांना विलक्षण तेज चढे. तेजोवलय फिरताना दिसे. तसेच त्यांच्या गुरुंची आरती करताना त्यांना अश्रूंचा आवेग आवरत नसे.

स्वामींची कृपा सदैव अनुभवास येते पण विशेष काहीच अनुभव आले नाहीत. पण काही काळ या जगापासून अलिप्तपणाचा व सुखद आनंदाचा अनुभव येत असे. आनंदाच्या लहरी अंतरगांत उसळत असत. आनंदाचे डोही आनंद तरंग याचा अनुभव जाणवत असे.

लग्नानंतर साधनेत थोडा खंड पडला. त्यातच सासर म्हटले म्हणजे थोडे वातावरण वेगळे पडते. घरात परमार्थाची विशेष आवड नाही. तरी पण मी नेहमी परमेश्वराजवळ अशी प्रार्थना करीत असे की, यजमानांना परमार्थाची आवड उत्पन्न व्हावी. पण काही वर्षांनी अशा काही घटना घडल्या की, तेव्हापासून ते संध्या करू लागले. आता ते नियमित संध्या करून काही ओव्या गुरुचरित्राच्या वाचतात. उशीरा का होईना पण त्यांना ही प्रेरणा मिळाली ही जणू स्वामींची कृपाच असे मी समजते.

संसारात पडल्यामुळे साधनशैथिल्य आले. मुली मोठ्या झाल्या. त्यांची लग्ने होऊन त्या सुस्थळी पडल्या आहेत ही स्वामींची कृपाच. त्यानंतर अलीकडेच दासबोध वाचावा असे सारखे वाटे. ही प्रेरणा मला स्वस्थ बसून देत नव्हती. म्हणून दासबोध परीक्षा देण्याचे ठरविले तेही योगायोगाने. एका मैत्रिणीने मला ती पुस्तके अभ्यासासाठी दिली. मी तीन वर्षे दासबोधातील निवडक समासांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. नंतर काय हा प्रश्न माझ्यापुढे उभा होता. कारण दासबोधाच्या अभ्यासाची ३ वर्षे इतकी सवय लागली होती की वेळ कसा जाणार असे वाटत होते. एके दिवशी पुण्याहून संयोजक श्री. द्वा. वा. केळकर यांचे समीक्षक म्हणून माझी निवड झाल्याचे पत्र आले. मला खूपच आनंद झाला. समर्थांची काही कृपा आहे असे वाटले. प्रथम २० अभ्यासार्थी होते. पण दुसऱ्या वर्षी १८ राहिले. काही प्रकृतीच्या कारणाने गळले पण शेवटपर्यंत १४ अभ्यासार्थी टिकून राहिले. तेव्हा श्री. केळकरांचे पत्र आले की, बरेच अभ्यासार्थी टिकवून ठेवण्यात तुम्हाला यश आले, त्याबद्दल अभिनंदन. मलाही खूप आनंद झाला. समीक्षकाची पुन्हा निवड झाली. पण मला डोळ्यांचा त्रास होऊ लागला म्हणून मी पुन्हा ती जबाबदारी घेतली नाही.

१९९१-९२ सालची गोष्ट. मी सुंदरकांडाचे ३० दिवसांत ३० पाठ करण्याचे ठरविले. कोणतीही अडचण न येता पाठ पूर्ण झाले. शेवटचा दिवस शनवारचा होता. शेवटच्या दिवशी दुपारी १२-१ चे सुमारास आमच्या ओळखीचे एक गृहस्थ आले. त्यांनी सांगितले की, ही रामचरितमानसाची (हिंदी मोठी प्रत गोरखपूर) प्रत तुम्हाला प्रसाद म्हणून अमूक एका व्यक्तिने दिली आहे. ती व्यक्ती माझ्या ओळखीची होती. पण त्यांचा परिचय वगैरे नव्हता. मी तर या अजब अनुभवाने चकितच झाले. प्रभुकृपेचा एक सुंदर अनुभव आला.

साधनहीनतेमुळे आपण सद्गुरुकृपेस पात्र आहोत की नाही असे वाटते. पण निर्हेतुक कृपा करते तीच खरी गुरु माऊली. याचं उत्तम उदा. म्हणजे रामचरितमानसातील उत्तरकांडातील विप्रजन्म कथा, शिवजी कोप पावतात पण सद्गुरु कृपा करतात अशी ती कथा आहे.

माझ्या मुलींनाही चांगले अनुभव येतात. हनुमानचालिसावर त्यांचा विशेष विश्वास आहे. त्याचप्रमाणे माझी धाकटी मुलगी चि. सौ. मनीषा हिला एक स्वप्न पडले. तिच्या खिडकीतून एक मोठे पांढरे, केसाळ माकड घरात आले. त्याची शेपटी खूप लांब होती. ते सर्व घरभर फिरले. फ्रीज उघडून त्यातील काही पदार्थ खाल्ला व देवांच्या येथे जाऊन अदृश्य झाले. प्रथम ती खूप घाबरली. पण नंतर हनुमंताची स्वारी असणार असे वाटून मनात नमस्कार केला. जागी झाली. ती पुण्याला एकदा एका अधिकारी व्यक्तीच्या दर्शनाला गेली होती, तेव्हा तिला सांगितले की, तुझ्या माहेरहून तुला गुरुकृपेचे बळ आहे. हे ऐकल्यावर मलाही स्वामींच्या कृपेची प्रचिती आली.

हीच मुलगी लहान म्हणजे चारच महिन्यांची असताना स्वामींनी समाधी घेण्याचे ठरविले. मुलगी लहान असल्यामुळे मला घरातून परवानगी मिळाली नाही. मला खूप वाईट वाटले. पण 'पराधीन सपनेहु सुखं नाही' या उक्तीप्रमाणे मी जाऊ शकले नाही. पण स्वामींनी लिहिले होते, पति आज्ञा प्रमाण याप्रमाणे यायला नाही मिळाले तरी चालेल. त्यातच सुख मानून रहा.

जीवनाच्या उतरणीला लागलेल्या ह्या बालिकेवर स्वामींची कृपा आहे. काही वेळा दर्शनाने तृप्त करतात. जीवनात सदैव मार्गदर्शन करून काही वेळा अंतर्मुख झाल्यावर त्यांच्या कृपेचा अनुभव येतो. काही विशेष साधन नाही, तेव्हा त्यांच्या कृपेला आपण अपात्र तर ठरलो नाहीना, याची खंत वाटते. असे हे श्रद्धायुक्त शीलपुष्प स्वामींच्या चरणी अर्पण करते.

आज्ञाधारक घाटे काका

प. पू. स्वामींचे एक अनुग्रहीत श्री. घाटे हे सायनला रहात असत. ते फार आज्ञाधारक होते. आमचेकडे स्वामी आले की, ते आमचेकडे रोज दर्शनासाठी येत. ते आल्यावर पाय धुवून मला नमस्कार करीत व उभेच रहात. स्वामींनी सांगितले की बसत असत. तसेच आम्ही चहा दिला तर दुसऱ्या खोलीत येऊन घेत. एक दिवस स्वामी बराच वेळ काही बोललेच नाहीत पण तोपर्यंत घाटे काका उभेच होते. नंतर थोड्या वेळाने स्वामी म्हणाले, अहो घाटे, आता बसा. तेव्हा पुन्हा नमस्कार करून ते बसले. पण त्यांना कधीही राग येत नसे. ते म्हणत, स्वामी आपली परीक्षा पाहतात.

तुका म्हणे घालू देवावरी भार । वाहू हा संसार देवापायी । असे साधन करावे 'त्याच्या'वर सर्व जबाबदारी टाकावी 'मोह दास कहाई नर आसा । करइ तो कहहु कहां विश्वासा ॥ साधनाची आशा वाटणे ही विश्वासाची न्यूनता सिद्ध करील. रामाचे ध्यान, भजन, मानसपूजा, जप चरित्रवाचन, श्रवण, कथन इ. साधन करावे. तसेच सतत नामस्मरण करावे असा त्यांचा उपदेश होता. सर्वत्र रामरूप पाहून वावरावे ही आईला दिलेली विवेकी शिकवण होती. बिनुसतसंग विवेक न होतो । याचा अनुभव फार येतो.

●●●

श्रीमद्‌सद्‌गुरु प्रज्ञानानंद स्वामी यांच्या आठवणी

सौ. कालिंदी देसाई

माझ्या माहेरी एकत्र कुटुंब पद्धत होती. माझे चुलते (श्री. वासुदेवराव मुगांवकर जे आबासाहेब म्हणून ओळखले जात) व वडील (श्री लक्ष्मणराव मुगांवकर जे तात्यासाहेब म्हणून ओळखले जात.) एकत्र होते. आमच्या घरात धार्मिक व परमार्थिक वळण होते. तात्यासाहेब वकिली करत होते तर आबासाहेब सर्व व्यवहार पहावयाचे. तात्यासाहेबांना गायत्री मंत्राचे पुरःचरण करावयाचे होते. त्यांना माहिती मिळाली की, पुणे जिल्ह्यामध्ये खेड तालुक्यात एक स्वामी आहेत. ते याबद्दल सांगोपांग मार्गदर्शन करू शकतील. तात्यासाहेब स्वामींकडे गेले. त्यांनी आपला मनोदय त्यांच्यापुढे व्यक्त केला. तात्यासाहेबांचे म्हणणे ऐकल्यावर स्वामींनी सांगितले की, 'सर्वप्रथम तुला वकिली सोडली पाहिजे.' त्यावर तात्यासाहेबांनी सांगितले, 'आमचे कुटुंबात माझे थोरले बंधू आहेत. आम्ही सर्व एकत्रच आहोत. बंधू सर्व व्यवहार पाहतात. मी फक्त वकिली करतो. त्यामुळे वकिली सोडता येणे जमणार नाही. तात्यासाहेबांनी स्वामींना परांड्यास येणेविषयी निमंत्रण दिले. स्वामींनी सांगितले की, आबासाहेबांना निमंत्रण देणेचा अधिकार आहे. त्यांनी जर निमंत्रण दिले तर आम्ही येऊ असे सांगितले.

श्री. आबासाहेबांनी प. पू. स्वामींना परांडा येथे भेट देणेविषयी निमंत्रण दिले. प. पू. स्वामी हे त्यांच्या आमंत्रणावरून १९४५ मध्ये परांडा येथे प्रथम आले. ते सकाळी मळ्यात जाऊन स्नान करून, सर्व आन्हिक पूर्ण करून पुजेसाठी घरी येत. दुपारचे वेळेस बैठकीत बसत. असेच एके दिवशी बैठकीत बसले असताना त्यांनी 'वासुदेवा, वासुदेवा लवकर ये' अशी हाक मारली. आबासाहेब त्यांच्याजवळ गेल्यावर प. पू. स्वामींनी त्यांच्या डोक्यावर हात ठेवला. आबासाहेबांना जवळ जवळ २ तास समाधी लागली होती. प. पू. स्वामींना अंतःप्रेरणेने आबासाहेबांना अनुग्रह देणेसाठी जबरदस्त उमाळा आला होता म्हणून स्वामींनी त्यांना बोलावून घेऊन अनुग्रह दिला. स्वामी त्यानंतर परत १९४६ मध्ये परांडा येथे आले असताना माझ्या काकूंना (सौ. वत्सलाताई) अनुग्रह घ्यावा असे फार वाटत होते. त्या काळात लहानग्या गावात पती-पत्नी एकत्र कधीच बोलत नसत. त्यांनी त्यांच्या मुलीला म्हणजे कु. कुसुमला 'तू वडिलांना सांगून मला अनुग्रह देणेविषयी स्वामींना आग्रह करण्यास सांग.' प. पू. स्वामींच्या कानांवर हे गेल्यावर त्यांनी काकुंना (सौ. वत्सलाताईना) अनुग्रह दिला.

त्यानंतर परांड्यातील ती. बाई (श्री. नानासाहेब देशमुख यांच्या मातोश्री), श्री. माधवराव काळे, श्री. श्रीनिवासराव पै यांनी अनुग्रह घेतला. माझी चुलत बहीण सौ. कावेरी (पुष्पाताई अन्नछत्रे) व मेहुणे श्री. अन्नछत्रे यांनी अनुग्रह घेतला.

मला स्मरते त्याप्रमाणे प. पू. स्वामी परांडा येथे पुन्हा १९५७ अथवा १९५८ ला आले. ते आमच्या कुटुंबात कुटुंबातील एक घटक म्हणून राहत होते. घरातील प्रत्येकजण प. पू. स्वामींची जास्तीत जास्त सेवा करणेत गुंतले होते. त्या वेळेस प. पू. स्वामींची दिनचर्या - पहाटे ५ ला उठणे. काकड आरती नंतर ध्यानाला बसणे. सकाळी ७.३० वा. दूध घेऊन लेखनास सुरुवात करत. प. पू. स्वामींबद्दल आसपासच्या गावांमध्ये वार्ता पोहोचली होती. प. पू. स्वामींना भेटणेसाठी (दर्शनासाठी) गावातील व परगावाहून बरीच मंडळी येत असत. त्यांच्याशी चर्चा करत असत. प. पू. स्वामींकडे येणाऱ्यांमध्ये वकील, व्यापारी, अधिकारी वर्ग, डॉक्टर्स, समाजातील सर्व थरांतील व्यक्तिंचा समावेश असे. निरनिराळ्या विषयांवर, निरनिराळ्या प्रश्नांवर सखोल चर्चा करून योग्य मार्गदर्शन करत होते. उपस्थितांना प. पू. स्वामींची वैद्यकशास्त्र, ज्योतिषशास्त्र, निरनिराळ्या शास्त्रांतील त्यांचा गाढा अभ्यास व गती पाहून आश्चर्य वाटे. प. पू. स्वामींचे मार्गदर्शन प्रत्येक व्यक्तिच्या आयुष्यात उपकारकच ठरले. प. पू. स्वामींना त्यांच्या सेवेत असणाऱ्या आम्हा सर्व मुलींना अनुग्रह द्यावा असे वाटत होते. म्हणून तसे त्यांनी आबासाहेबांना सांगितले. तेव्हा आबासाहेबांनी सांगितले की, 'या मुलींची लग्न व्हावयाची आहेत. प्रत्येकीच्या सासरी कसे वातावरण असेल? त्यांना त्यांच्या गुरुमंत्राचा उपयोग होईल का?' असे विचारले. तेव्हा प. पू. स्वामींनी सांगितले की, 'ह्या मुली अनुग्रह घेतल्यावर सासरी चांगले वातावरण निर्माण करतील व स्वतःचे आयुष्याचे सार्थक करतील.' या प्रसंगाच्या थोडे अगोदर त्यांनी श्री. आदिनाथराव व सौ. कौसल्या वहिनी आणि श्री. गिल्डा व सौ. भाभी ह्यांना अनुग्रह दिला होता. प. पू. स्वामींनी मला व यमुला नंतर सुधा व मालू, मग महाजनांची लता व उषा तांबोळकर यांना अनुग्रह दिला. त्यामुळे आमचा ८/१० जणांचा रामायण पारायण करणेचा एक समूह झाला होता. आम्ही चैत्री पाडवा ते रामनवमी, गुरुपौर्णिमा, दसरा, नवरात्र ह्या वेळी रामायणाचे पारायण करत होतो. दररोज रात्री स्वामींच्या समवेत स्वामींनी रचलेल्या भजनाचा कार्यक्रम रात्री ९ ते १० होत असे.

प. पू. स्वामींचे खाणे, लेखन, विश्रांती वक्तशीर होते. ते दररोज दोन वेळा गार पाण्याने आंघोळ करत. त्यांची शिस्त वाखाणण्याजोगी होती. त्यामुळे बरीच मंडळी स्वामींकडे येणेसाठी आदरयुक्त भीतीने येत असत.

स्वामींनी आम्हाला पाकशास्त्राचेही धडे दिले. त्यांनी आम्हाला विविध पदार्थ (रूचकर) कशा प्रकारे करावेत हे शिकविले. त्यातील काही पदार्थ - श्रीखंड वड्या, केळाच्या वड्या, आल्याच्या वड्या, शेंगदाण्याचे म्हैसूर पाक, भरली केळी ही प्रमुख होत.

माझे लग्न झालेवर फारसा देवधर्म होत नव्हता. प. पू. स्वामींनी

स्त्रियांना 'पती हाच देव मानून त्यांची सेवा करावी. रोज पतीच्या पायावर डोके टेकून नमस्कार करावा, हाच स्त्रीधर्म आहे' अशी शिकवण दिली होती. संसारात पडल्यावर बऱ्याच अडचणी येत होत्या. पण प. पू. स्वामींच्या कृपेने सर्व अडचणींवर व्यवस्थितपणे मात करता आली. आता मुले मोठी झाली आहेत. त्यांच्या संसाराला लागली आहेत.

प. पू. स्वामींच्या सहवासात ४/५ वर्षे गेल्यामुळे प. पू. स्वामींबद्दल लिहावे ते थोडेच आहे. माझ्या अल्प बुद्धीला जे उमजले ते लिहिले आहे. प. पू. स्वामींच्या कृपेने आमच्या आयुष्याचे सार्थक झाले. तसेच आमच्याकडे माझ्या जन्माच्या अगोदरपासून प. पू. अनंतदास महाराज आमच्या घरी येत होते. हंसराज स्वामींचा उत्सव आमच्याकडेच असल्यामुळे घरात सतत परमार्थिक वातावरण होते. त्यामुळे प. पू. स्वामींनी त्यांच्या प्रायोपवेशनाच्या वेळेस माझ्या वडिलांना त्यांच्या सान्निध्यात असणेबद्दल आज्ञा दिली होती.

प. पू. कमाताईची प. पू. स्वामींवर असलेली निष्ठा व गाढ श्रद्धा या प्रबळ इच्छेमुळे आज परांड्यासारख्या ठिकाणी भव्य श्रीराम मंदिर साकार होत आहे.

प. पू. स्वामींबद्दल खूप लिहावेसे वाटते; पण मला ते शब्दात मांडता येत नाही. स्वामींची कृपा जन्मोजन्मी अशीच माझ्या पाठीशी असो, ही सद्‌गुरुचरणी इच्छा.

●●●

हनुमानचाळिसाचा अद्‌भुत अनुभव

मी अच्युत शंकर दामले - रिटा. पोलीस सब. इन्स्पेक्टर, सांगली. मी १९५७ मध्ये प. पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतींच्या सांगलीच्या विष्णू मंदिरातील प्रवचनांनी इतका प्रभावित झालो की याच सालच्या एकनाथषष्ठीस पत्नीसह स्वामींचा अनुग्रह घेतला देखील !

तेव्हापासून श्रीरामचरितमानस व हनुमानचाळिसाचे पाठ करू लागलो. माझ्या पत्नीस लहानपणापासूनच दम्याचा विकार. तो एकाएकी इतका बळावला की तिच्या प्राणांतिक यातना पाहवेनात. कोणीतरी तिच्यावर 'मारणा'चा प्रयोग केल्याचे समजले व मी ते आव्हान स्वीकारले.

प. पू. स्वामींच्या सल्ल्यानुसार रात्री ११ वा. स्नान करून सोवळ्यात हनुमानचाळिसाचे ३३ पाठ दररोज याप्रमाणे तीन दिवस केले. अन् आश्चर्य वा चमत्कार असा की त्या जीवघेण्या दुखण्यातून माझ्या पत्नीची यमद्वारातून सुटका झाली.

अर्थात मारणाच्या प्रयोगाने तीही एक कनिष्ठ का असेना पण विद्याच असल्याने त्याचा त्रास हा भोगावाच लागला पण मृत्यूशी झुंज देऊन त्या मृत्यूपासून सुटका झाली. ही घटना सुमारे १९६४-६५ सालची प्रत्यक्ष घडलेली आहे. त्यानंतर इ. स. १९७७ जुलैपर्यंत माझी पत्नी होती.

यापूर्वीची एक घटना अशीच अद्‌भुत !

माझ्या पूर्वजांकडून घडलेल्या सर्प हत्येमुळे. माझी सुमारे १२ अपत्ये ! मला काही ना काही कारणाने सर्पदर्शन घडे व सर्प हत्या मजकडून वा माझेसमोर कोणी करी अन् त्यामुळे माझे पत्नीचा गर्भपात तरी होई वा नवजात अर्भक मृत्यूतरी पावे. या दुष्ट चक्रातून श्रीगुरुचरित्र पारायणांनी प्रसन्न झालेल्या श्री दत्तगुरुंचे प्रसादे माझी मोठी मुलगी चि. मेरु उर्फ मृणालिनी पंढरपूर येथे श्री. बाबासाहेब जव्हेरी यांनी अतिशय प्रेमाने सांभाळली होती. एकदा ती पाच वर्षांची असताना तिसऱ्या मजल्यावरील गच्चीवरून पडल्याची तार आली.

ती वाचताच माझी पत्नी अगदी निर्धास्तपणे, शांतपणे म्हणाली, 'तो प. पू. स्वामींचा प्रसाद आहे ना, मग मी इथून सांगते तिला काहीही झालेले नाही.' अन् त्याप्रमाणे तेथे जाऊन पाहता खरोखरच तिला साधे कुठे खरचटलेलेही नव्हते. मात्र तीन दिवसांनी बेशुद्धीतून नेहमीच्या झोपेतून जागी झाल्याप्रमाणे ती जागी झाली.

जन्मदाती माऊली असूनही, माझ्या पत्नीचा त्यावेळचा तो शांतपणा व गुरुनिष्ठा वा सद्‌गुरुंवरचा तो विश्वास वा अढळ श्रद्धा याला खरोखरीच कोटीशः प्रणाम !

अन् सद्‌गुरुंनी देखील माझ्या दोन्ही मुलींवर धरलेले प्रेमळ छत्र, कृपेची सावली... ! हे जगातले आश्चर्यच नव्हे काय?

हा अनुभव कै. अच्युत शंकर दामले यांची कनिष्ठ कन्या, सौ. रेखा दामले पटवर्धन यांनी शब्दांकित केला आहे.

●●●

श्री प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी महाराजांसंबंधी आठवणी

सौ. सुधा कुलकर्णी

प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी महाराजांनी परांड्यात आमच्याकडे (काळे, मुगावकर) आल्यावर तुलसीदास रामायण हस्तलिखित केले. हे लिखाण करण्यासाठी लागणारी शाई ते माझ्याकडून तयार करवून घेत. त्यांनी दोन रंगांची शाई तयार करायला मला शिकवलं. लाल आणि हिरवी. लाल रंगाच्या शाईने ते दोहे लिहीत व हिरव्या रंगानी चौपाया लिहीत. शाई तयार करण्यासाठी आधी काही पानं व मुळे कुटून उकळायला ठेवली जात. त्यात थोडा डिंक व लाख टाकली जात असे. हे मिश्रण घट्ट होत आल्यावर ते ३-४ वेळा गाळून घेतलं जाई व प्रत्येक वेळेस त्या शाईने कागदावर रेघ ओढून ती पाण्यात बुडवून तपासली जात असे. जर शाई पसरली तर पुन्हा ती आटवायला ठेवली जात असे. (टीप : पानं व मुळं या संबंधीची अधिक माहिती आदिनाथराव यादव यांच्याकडे मिळू शकेल.)

स्वामी रोज सकाळी त्यांचे गुरु वासुदेवानंद सरस्वती यांची काकडारती करत. या आरतीच्या नैवेद्यात आल्याच्या वडीला खास महत्त्व असे. स्वामींच्या आहारातही वडीचा बराच वापर असे. आल्याची, आंब्याची, श्रीखंडाची, केळाची अशा अनेक वड्या त्यांनी मला करायला शिकवल्या. त्याचबरोबर त्यांनी मला शेंगदाण्याचा म्हैसूरपाकही करायला शिकवला.

स्वामींना औषधांची बरीच माहिती होती. विविध रोगांवर ते औषधे देत. माझे काका (वासुदेवराव गोपाळ काळे - भाऊ) यांना मधुमेहाचा त्रास होता. त्यावर स्वामींनी दिलेल्या औषधांमुळे मधुमेहाची त्रासदायकता भाऊंना कधीच जाणवली नाही. स्वामींनी मला पंचांग बघायला व कुंडली

माडायिलापण शिकवले आहे.

उसण भरल्यावर पायाळू व्यक्तिचा पाय उतरवल्यास उसण कमी होते असं म्हणतात. स्वामींना अनेकदा उसण भरत असे व ते मला मी पायाळू असल्यामुळे पाय उतरवण्यास सांगत. परंतु स्वामींच्या पाठीला पाय लावायचा मला संकोच वाटत असे. एकदा भाऊंनी मला सांगितलं, की पाय उतरवून दे व त्यांच्या पायांवर डोकं टेकवून नमस्कार करेन असं म्हण. एका स्त्रीला संन्यासी व्यक्तिच्या पायावर डोकं टेकवून नमस्कार करायला मिळणं दुर्लभ होतं. परंतु स्वामींनी ते मान्य केलं व मला त्यांच्या पायावर डोकं टेकवून नमस्कार करायचं भाग्य पुढे अनेकदा मिळालं. त्याचबरोबर गुडघ्यातल्या शिरा चोळून उसण कमी होते. सकाळ संध्याकाळ हे काम मी करत असे. अशी कामं करायला मिळणं हे भाग्य असतं, हे कळायचं तेव्हा वय नव्हतं. मी फारच लहान होते. परंतु स्वामी आमचा बराच हट्ट पुरवत असत.

स्वामी महाशिवरात्रीला भक्तांना महादेवाची पूजा करायला सांगत. २४ तास पाणीही न पीता ही पूजा चाले. ते स्वतः ही पूजा सांगत. मातीचं लिंग तयार करून त्याची पूजा केली जाई व नंतर ते विसर्जित केलं जाई. अशी संपूर्ण रात्र पूजा चाले. मधल्या वेळात भजन असे. अधिक महिन्यात 'सत्यनारायण', श्रावणात लिंगार्चन, रामायण वाचन असे धार्मिक विधी असत.

एकदा पाऊस पडला नाही म्हणून स्वामींनी परंड्यातल्या भवानी शंकराच्या देवळातील महादेवाची पिंड पूर्ण बुडेल इतक्या पाण्यात ठेवायला सांगितली व अभिषेक केला. परिणामतः पाऊस पडला.

श्रीनिवास विद्वत (शिनू) या माझ्या मामेभावाला मधेच काहीतरी होत असे. तो एकदम अंग वाकडेतिकडे करी. खाली डोकं आणि वर पाय करून उलटा उभा राही व त्याच्या तोंडातून फेस येई. असे झाले की त्याला स्वामींसमोर आणण्यात येई. स्वामी मंत्र म्हणून सपकन कमंडलूतील पाणी त्याच्या अंगावर मारत व तो शांत होई.

असेच एकदा नाशिकचे एक गृहस्थ आले. त्या वेळी त्यांना ब्रह्मसंमंध लागला असं म्हणत. ते बेशुद्धावस्थेत चालत जात. अशी त्यांनी बऱ्याच तीर्थक्षेत्रांची यात्रा केली. कोणत्याही तीर्थक्षेत्री गेल्यावरच त्यांना शुद्ध येई व आपण कुठे आलो आहोत हे समजले की पुन्हा बेशुद्ध होऊन ते दुसऱ्या ठिकाणी चालत निघत. असेच ते एकदा परांड्यात आले. त्यांचा हा त्रासही स्वामींनी कमंडलूतील पाणी मारून व मंत्र म्हणून दूर केला. हे आम्ही घरातील सगळ्यांनी प्रत्यक्ष पाहिलं आहे.

सर्व बंधू भगिनींचा गुरुमंत्र सोहळा हा एक अविस्मरणीय अनुभव होता.

पू. स्वामींनी रामायणाची १०८ पारायणं केली. ते दररोज पहाटे ५ ला वाचायला सुरुवात करत. ८ ते ९ तास हे वाचन चाले. उपास असे. दूध, शहाळ्याच्या पाण्यावर ते असत. या दिनचर्येत कधीच बदल होत नसे.

प. पू. श्री अनंतदास महाराज व पू. स्वामींची भेट हा एक मोठा आनंद सोहळा होता. एक 'ब्रह्मचारी' एक 'संन्यासी'. दोघांची भाषा एक 'नारायण' एक 'श्रीराम' याशिवाय फारसं बोलणं नाही पण 'नरनारायणाची' भेट. असा आनंदी प्रसंग कधीच विसरू शकत नाही.

पू. स्वामींनी प्रायोउपोषण करण्याचे ठरविले तेव्हा ही खूप मोठे लोक येऊन भेटत. स्वामींचे बोलणे थोडक्यात पण मार्मिक असे. 'प्रायोपवेषण' श्री. देशमुखांचे घरी करण्याचे ठरले. तेव्हा मीही तिथेच रहात असे. त्या रात्रीचे भजन झाल्यावर स्वामींनी संध्याकाळचे स्नान केले व आसनस्थ बसले. फुलाच्या पाकळ्या सुकाव्या तसं शरीर सुकत गेलं होतं. ओठ कोरडे, शरीर पांढरं, सुकलेल्या गुलाबाच्या फुलाप्रमाणे शरीर मलून झालं होतं. डॉ. निळकंठराव सतत नाडी पहात असत. स्वामींना काही हवं असल्यास ते देण्यास त्यांना उठवून बसवण्यासाठी मी ही तिथे सतत सोवळ्यात उभी असे. मी तुळशीचं पान घेऊन उभी होते. डॉ. नाडी पहात होते. स्वामींचं मस्तक गरम गरम होत चाललं होतं व पाहता पाहता जोरदार रामनामाच्या गजरात ते अनंतात विलीन झाले. हे आजही मी तितक्याच उत्कटतेने अनुभवते आहे. स्वामींच्या इच्छेप्रमाणे नंतरचे सगळे विधी झाले. त्यांची मोठी मिरवणूक काढून नंतर त्यांचा देह मठात सोवळ्यात आणण्यात आला. समाधीचं काम पूर्ण झालं. अगदीच एकटं वाटलं की, मठात जावंसं वाटतं. पुढे संसारात अनेकदा अडचणी आल्यावर स्वामी नेहमी मार्ग सुचवतात. त्यांचा वरदहस्त सतत मस्तकावर असल्याचं जाणवतं व कृतकृत्य वाटतं.

आम्हाला जसा त्यांच्या सहवासाचा व आशिर्वादाचा उपभोग घेता आला तसा इतरांनाही शब्दरूपाने तो कळावा यासाठी हा लिखाणाचा खटाटोप केला आहे.

●●●

श्रीमती पद्मा पारखी

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवेनमः ॥

श्री प. पू. स्वामींच्या दर्शनाचा, सेवेचा व अनुग्रह मिळण्याचा योग माझे वडील ती. कै. ना. भा. जोशी तथा काकांच्यामुळे आला. श्रींचा मुक्काम कुंडल येथे होता. अंदाजे ५७/५८ साल असेल. माझे वय ९/१० वर्षाचे असेल. माडीवर त्यांचे वास्तव्य होते. बरीच स्त्री-पुरुष मंडळी दर्शनासाठी येत. रामायण, भजन, ध्यानाभ्यास वगैरे कार्यक्रम असे. आपणासही अनुग्रह मिळावा असे मला सारखे वाटायचे. मिळेल का? मी ती. कै. काकांना विचारले तर, ते मला तूच विचार असे म्हणाले. माझे धाडस होईना. अखेर त्यांनीच श्रींना विचारले. त्या वेळी माझी परीक्षा घेण्याच्या उद्देशाने त्यांनी एक प्रश्न विचारला, 'प्रथम नमस्कार कोणास करायचा?'

मी – प्रथम आई, नंतर वडील व मग गुरु असे म्हटल्यावर श्रींनी पास झालीस असे म्हणून त्याच दिवशी अनुग्रह दिला. श्रींची कृपा झाली ! लहानाबरोबर मिसळून वागत. सातारला मुक्काम असता मी, माझी तेथील बालमैत्रिण सुशीला लेले फुले काढून त्याचे गजरे करून श्रींचे पुढे ठेवत असू. ते त्याचा प्रेमाने स्वीकार करून हातात घालीत. आम्हाला भजन म्हणावयास सांगत. 'अंबा राज राजेश्वरी, अंबा सद्गुरु कृपा करी' हे भजन म्हटले की विनोदाने म्हणावयाचे काय, 'आमचेकडे अंबा मागता काय? देतो हं !'

भूत पिशाच्च ओळखणे व आपल्या सामर्थ्याने लगेच घालवणे या संबंधीची एक आठवण. सातारलाच असतानाच माझी भाची (भावाची

मुलगी) हिला ती ९ म. असता बाहेरची बाधा होऊन एकाएकी जुलाब व उलट्या होऊन ती आता हाताला लागत नाही अशी अवस्था झाली. औषधोपचाराला दाद लागेना. ५४/५५ साल असेल. वाड्यात साधक मेळावा भरला होता. दुपारी १२/१ ची वेळ होती. आम्ही सर्वजण खूप घाबरून गेलो. अखेर श्रींच्या पुढे घेऊन जाऊ या असे ठरवून नेले. तिला पाहताच बाहेरची बाधा आहे. या वाड्यातील पूर्वज आहे म्हणून श्रींनी आपल्या कमंडलूतील पाणी तिच्या अंगावर शिंपडले व कृपादृष्टीने पाहिले. मात्र लगेच ती शुद्धीवर आली व थोड्या वेळांतच धोका टळला ! श्रींची कृपादृष्टी असल्यावर तेथे भूत काय साक्षात यमाचेसुद्धा काय चालणार?

पुढे कालांतराने माझा विवाह पुणे येथील कसबा पेठेतील श्री. विनायकशास्त्री पारखी यांचेशी झाला. त्यांनाही श्रींविषयी अतिशय आदर होता. श्रींचे संध्येचे पुस्तक लिहिणे चालू असता कित्येक वेळी काही शास्त्राधार वगैरे पाहिजे असले की त्यांना विचारीत व तेही तत्परतेने काढून पाठवीत. या संबंधीचा उल्लेख संध्येच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत श्रींनी आवर्जून केला आहे. श्रींच्या परांड्याच्या समाधीच्या दर्शनासाठी व पुण्यतिथीच्या कार्यक्रमासाठी एक वेळ मुद्दाम प्रकृति बरी नसतानाही मला बरोबर घेऊन माझे यजमान आम्ही जाऊन आलो होतो.

कितीतरी लहान-मोठे प्रसंग आठवतात. श्री प. पू. सद्गुरुंनी मला चरणाची भक्ति द्यावी. कृपेचा वर्षाव करावा अशी प्रार्थना करून त्यांचे चरणी लीन होऊन पुरे करते. त्यांची चरण रज.

●●●

'गुण लावण्याची खाणी ।
संतांच्या रुपे उभे माझे चक्रपाणी'

आपल्या भरत खंडामध्ये अनादिकालापासून दैवी गुणसंपन्न असलेल्या संतांची कधीच वाण पडली नाही. ओंकार ट्रस्टने गेली बारा वर्षे भारतामध्ये जन्म घेतलेल्या संतांवर स्मरणिका काढल्या आहेत. त्यांचा उपक्रम चढत्या भांजणी प्रमाणे वाढतच आहे. मानवी अवतार घेऊन कार्य करणाऱ्या राम-कृष्ण यांच्यावरही तीच अध्यात्माची व परमार्थाची वाटचाल करणारे हे संत परमेश्वराचेच अंश अवतारच आहेत.

"श्रीराम जयराम जय जय राम"

"रामनाम ज्याचे मुखी । तो नर धन्य तिन्ही लोकी" ह्या उक्तीप्रमाणे परमहंस परिव्राजकाचार्य परमपूज्य प्रज्ञानानंद सरस्वती यांच्यावर निघालेली स्मरणिका २००३ ही निश्चितच अभिनंदनास पात्र आहे. मी स्वतः नाथपंथी असून आळंदीच्या वाटेवर घडलेले एक चिंतन खाली देत आहे. साधकाचा शेवटचा दिस गोड व्हावा ह्या हेतूने परमेश्वरापाशी केलेली प्रार्थना.

पाहीन तुझी मी वाट श्रीरामा पाहीन तुझी मी वाट

आर्त स्वरानें आळविन तुजला ।
अंतकाळी तुजविण श्रीरामा ।
कोण देईल मजसी साथ ॥ध्रु.॥
आदर्श जीवन तव ते रामा ।
पुढे ठेविले तू प्रजाजनाना ।
असत्य न होई कधी ते सत्य ।
अंतरी वैराग्य परंतु वर मांगल्याचा हात ॥१॥
श्रीराम - श्रीराम - श्रीराम ।
शब्द हे नसती साधे ।
श्रीराम-श्रीराम म्हणता पाषाणही तरले ।
श्रीराम-श्रीराम म्हणता वाल्हाही बनले ।
कैक ऋषिमुनी ।
संत आजवरी रामा मुक्त झाले ॥२॥
ओंकारसहित स्फुरता वाचे ।
मन जाई उन्मनी चिद्गगनी नाचे ।
सद्गुरु मूर्ति तेथे भासे ।
दर्शन होई गुरु कृपेचे ।
सार्थक झाले नर जन्माचे ।
कळेना-वळेना बोध कुणाला ।
श्रीसंत ही आर्तस्वराने सांगुनि कितीदा नाथ
दमले ॥३॥
अज्ञानचि ते आहे सर्वत्राला ।
दोष कुणाचा? कधी न कळला ।
एकचि ज्ञात परमेश्वराला ।
'संतांना' तो आधि कळला ।
म्हणूनिचि म्हणतो...।
जन्म-मरण विषय संपला ।
पुनः न येईन जन्म अवनीवरती ।
पुरवा माझी एकचि विनंति ।
अखेर गाईन सतत तव स्तवी -
तुझेच मंगल नाम ॥४॥

चैत्र शुद्ध ॥९ रामनवमी दि. २४-३-१९८०
'आळंदीच्या वाटेवर'

'परमपूज्य प्रज्ञानानंद सरस्वती' ह्यांच्यासारख्या सिद्ध संतावर निघालेल्या २००३ च्या स्मरणिकेत ओंकार ट्रस्टने खारीचा वाटा म्हणून संधी दिल्याबद्दल अंतःकरणापासून धन्यवाद.

संतचरणरज - माधवदास उर्फ
अनंत केशव पाकणीकर
१२५ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.
दूरध्वनी - ४४७०८३०.

आरती श्रीगुरुरायाची

आरती श्रीगुरुरायाची । श्री प्रज्ञानानंदाची ।।ध्रु.।।

जेथे सहज होइ वास । तेथे दीनोद्धार खास ।
कितीही पातकाची रास । करीना विन्मुखही त्यास ।
निष्कपट होऊनिया । भरवसा दुजा सोडुनियां ।
येइ जो शरण । धरी जो चरण । नित्य करी स्मरण ।
तया दे छाया कृपेची ।।१।। आरती श्रीगुरुरायाची

ज्यावरी कृपा राघवाची । तयासचि भेटी हो तुमची ।
लेकरे सर्वही भाग्याची । तया द्या सेवा पायाची ।
सर्वदा चुकत असोनियां । करितसा तुम्ही किती माया ।
शक्य उतराई । नसे प्रज्ञाई । नमी जो पायी ।
तयासी लूट आनंदाची ।।२।। आरती श्री गुरुरायाची

परांडे ग्राम धन्य खास । श्रींचा जिथे नित्य वास ।
पाहुनि समाधिस्थानास । अश्रु येती लोचनास ।
पुण्यातिथी पर्वणीला । भाविक येती दर्शनाला ।
निरसुनी पाप । शमवुनि ताप । शांतिचे माप ।
घालितो पदरी जो त्याची ।।३।। आरती श्रीगुरुरायाची